म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २८१८

# विचारप्रबोधिनी

ना. रा. शेंडे

श्रीशेष प्रकाशन

REFBK-0022982

निबंध

जीवन आणि संस्कृतिदर्शक निवडक लेखांचा संग्रह

# विचारप्रबोधिनी

लेखक :
**ना. रा. शेंडे**

•

संपादक :
**निशिकान्त शेंडे**

REFBK-0022982
REFBK-0022982

श्रीशेष प्रकाशन

श्रीशेष प्रकाशन : पुष्प चवथे

प्रकाशक :
**रामकृष्ण सोनकुसरे**
श्रीशेष प्रकाशन
मुन्नामाता सोनकुसरे सदन
गणेशपूर, भंडारा
४४१९०४

* *

© सर्व हक्क संपादक
निशिकान्त शेंडे यांच्या स्वाधीन
प्रथमावृत्ती : वैशाख पौर्णिमा, शके १९०२
३० एप्रिल १९८०

* *

मूल्य : **पन्नास रुपये**

* *

शब्दांकन :
सौ. जयश्री बोरकर

* *

मुद्रक :
**दिवाकर धाक्रस**
नाग मुद्रणालय
रुईकर पथ, महाल
नागपूर–२

लेखनकाल व स्थळ :
१९४४ ते १९८०
'शेषकुटी,' धर्मपेठ, नागपूर
आणि
श्रीशेषाश्रम, गणेशपूर, भंडारा

निबंध
२८९७
२२९८२
संदर्भशाखा
१४।१०।८०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

01 SEP 1984

3 1 ... 1985

17 JAN 1990

( कु. मा. प. )
५०००-४-८०

श्रीशेष प्रकाशन : पुष्प चवथे

प्रकाशक :

**रामकृष्ण सोनकुसरे**
श्रीशेष प्रकाशन
मुन्नामाता सोनकुसरे सदन
गणेशपूर, **भंडारा**
४४१९०४

* *

© सर्व हक्क संपादक
निशिकान्त शेंडे यांच्या स्वाधीन
प्रथमावृत्ती : वैशाख पौर्णिमा, शके १९०२
३० एप्रिल १९८०

* *

मूल्य : **पन्नास रुपये**

* *

शब्दांकन :
सौ. जयश्री बोरकर

* *

मुद्रक :
**दिवाकर धाक्रस**
नाग मुद्रणालय
रुईकर पथ, महाल
नागपूर–२

लेखनकाल व स्थळ :
१९४४ ते १९८०
'शेषकुटी,' धर्मपेठ, नागपूर
आणि
श्रीशेषाश्रम, गणेशपूर, भंडारा

निबंध
२८९८
२२०८२
संदर्भशाखा
३१।१०।८०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

*सत्त्वशक्तीच्या चैतन्यलहरींना–*

२८९० २२९८२ निबंध

# अल्पसे भावदर्शन

विचारप्रबोधिनी :

गेल्या छत्तीस वर्षांतील माझ्या निवडक लेखांचा संग्रह.

राष्ट्रीय वृत्तीने प्रेरित.

सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक व साहित्यविषयक विचारांचा आणि भावनांचा थोडासा परामर्श घेण्याचा मजसारख्या एका खेंडूत लेखकाचा अल्पसा यत्न.

स्वातंत्र्यापूर्वीचा आणि स्वातंत्र्योत्तर काळाचा, म्हणजे १९४४ ते १४ एप्रिल १९८० या तीन तपांतील शहरी व ग्रामीण जीवनाच्या अन्तरंगातील काही प्रवाहांचा वेध आणि शोध घेऊन, सध्या आपण कुठे व कसे उभे आहोत; आपल्याला कोणत्या दिशेने नि कोणत्या वेगाने कसे जायचे आहे याचा ' विचारप्रबोधिनी ' हा ग्रंथ एक सूचक आलेख ठरावा !

राष्ट्राभिमान राखून, देशाचे जतन, संवर्धन व संरक्षण व्हावे; लोककल्याणकारी त्याच्या आध्यात्मिक पिंडाचे सम्यक दर्शन घडावे; सांस्कृतिक जीवन प्रगत होऊन भारतीय माती पावन नि सुगंधित व्हावी; निसर्गाची तेजस्वी प्रकृती असलेल्या नि पुरुषालाही पुरुषार्थ प्रदान करण्याचे सामर्थ्य राखणाऱ्या स्त्रीत्वाचे व सत्त्वशक्तीचे रक्षण होऊन, ते अधिक तेजोवर्धित व्हावे; खालचा थर उन्नत नि प्रगत होऊन त्याला समानतेचे व मानाचे स्थान प्राप्त व्हावे; दलित व बौद्ध जनांचे राष्ट्रीय स्तरावर उत्थान होऊन त्यांची ज्ञानास्मिता तेजस्वी व्हावी आणि जनकल्याणाच्या दृष्टीने, अध्यात्म व विज्ञान यांचा परस्पर संबंध विशेष जाणिवेने लक्षात घेऊन, अध्यात्मशक्ती आणि अतीन्द्रिय शक्ती यांचा आविष्कार घडावा याबाबत ' विचारप्रबोधिनी ' काही सांगू शकेल, काही दर्शवू शकेल अन् काही संकेतही प्रस्फुटित करू शकेल. माझा हा विश्वास.

कोणाला रुचो वा न रुचो; कोणाला पटो वा न पटो, कोणाला उमगो वा न उमगो आणि वास्तवता जाणवो वा न जाणवो, मी मात्र पवित्र हृदयाला साक्षीला ठेवून, वस्तुस्थिती दर्शविली आहे.

माझे कथन कुणाला काही अद्भुत वा अतिरंजित वा काही वेळेला आत्मप्रौढीचेही वाटू शकेल, पण कुणाला काय वाटेल हे जमेस धरून मी तराजू हाती घेतला नाही. माझ्या कोणत्याही लिखाणात झुकते माप मी कधीच राखले नाही. तराजूचे दोन्ही पारडे काटेकोरच राखण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करीत आलो आहे.

'मी आणि माझे लेखन' हा एक प्रदीर्घ प्रबंध, प्रस्तुत 'विचारप्रबोधिनी'त जोडला आहे. बालपणापासून आजपर्यंतच्या म्हणजे बाहत्तर वर्षांच्या माझ्या तप्त आध्यात्मिक जीवनाचे व साहित्यसाधनेचे ते आत्मकथन आहे. काहीसे विचित्र, काहीसे चमत्कृतिजन्य वाटायचे; परंतु जसे अनुभवले व जसा प्रखर मार्ग आक्रमिला, त्याचे ते धावते सम्यक आत्मसंशोधन आहे. माझा मी कोण आहे हे मला आत्मलक्षी होऊन विचारात घेतले पाहिजे. तसेच, माझ्या लेखनाबरोबर, आध्यात्मिक प्रखर जीवनाचे शेवटचे पर्वही सादर केले आहे, ते आजच्या या यंत्रयुगात, काही विशेष दर्शविण्याची क्षमता राखू शकेल, असे वाटते.

प्रस्तुत 'विचारप्रबोधिनी' या लेखसंग्रहाचे संपादन विशेष जाणिवेने, माझे ज्येष्ठ पुत्र चि. निशिकांत शेंडे यांनी आणि शब्दांकन सौ. जयश्री बोरकर व श्री. प्रेमानंद बोरकर यांनी श्रमपूर्वक केले आहे. या ग्रंथाचे संशोधन, संकलन व संपादन करणे जिकिरीचे व कष्टप्रद होते. त्यासाठी सौ. यमुना शेंडे या माझ्या निसर्गसत्त्वशक्तीच्या व श्रीशेषाश्रमाच्या उपासिका असलेल्या धर्मपत्नीने आणि चि. अविनाश शेंडे व सौ. अर्चना शेंडे, सौ. सुनीता शेंडे, सौ. ज्योत्स्ना निकोसे, सौ. लीला सायरे, सौ. देवयानी गणवीर, सौ. क्षमा भिमगडे आणि चि. केवलेन्दू शेंडे व चि. मनीष शेंडे या सर्वांनी, या ना त्या दृष्टीने सहकार्य दिले आहे.

'श्रीशेष प्रकाशन'चे सुहृद श्री. शिवशंकर सोनकुसरे व श्री. रामकृष्ण सोनकुसरे या बन्धुद्वयांनी माझे उर्वरित साहित्य प्रकाशित करण्याची एक योजना आखली. त्या योजनेखालील प्रस्तुत 'विचारप्रबोधिनी' हा जाडा लेखसंग्रह. त्यांची मजवर असीम निष्ठा. हा ग्रंथ त्याचे एक बोलके प्रतीक. शिवाय, श्री. गुलाबराव लारोकर आणि श्री. जगदीश सुखदेवे यांची साथ लाभली. सुप्रसिद्ध 'नाग मुद्रणालया'चे श्री. दिवाकर धाक्रस व श्री. प्रभाकर धाक्रस यांची विशेष जिव्हाळ्यासह साथ आहेच.

सर्व सुहृदांप्रती कृतज्ञता.

— ना. रा. शेंडे

श्रीशेषाश्रम : गणेशपूर, भंडारा
वैशाख पौर्णिमा, शके १९०२
३० एप्रिल १९८०

# ऋणनिर्देश

महाराष्ट्राचे ख्यातनाम दार्शनिक साहित्यकार आणि प्रखर अध्यात्मवादी व अतीन्द्रिय विश्वाचे एक संशोधक श्री. ना. रा. उपाख्य अण्णा शेंडे यांच्या उच्च विचारांना व उदात्त भावनांना केवळ आविष्कृतच करणारा नव्हे तर मराठी मनेही सुगंधित करणारा ' विचारप्रबोधिनी ' हा जाडा लेखसंग्रह सादर करताना आम्हाला विशेष आनंद व अभिमान वाटतो.

अण्णांनी गेल्या पन्नास वर्षांत फार मोठी साहित्यसाधना केली आहे. त्यांची ही साहित्यसाधना त्यांच्या आध्यात्मिक साधनेच्या तपस्येवर निर्भरित आहे. मराठी साहित्याचे जे विदग्ध, वैचारिक व संशोधनपर प्रवाह आहेत त्या प्रवाहांना अण्णा शेंडे यांचा स्पर्श झाला नाही असे कधी घडलेच नाही. प्रत्येक प्रवाहाशी आत्मीयतेने समरस होऊन त्यांनी आध्यात्मिक, सामाजिक, साहित्यिक व सांस्कृतिक जीवन फुलविले आहे व सुगंधित केले आहे, त्याचा हृदयस्पर्शी प्रत्यय, प्रस्तुत ' विचारप्रबोधिनी ' हा वैचारिक लेखसंग्रह आणून देण्यास निःसंशय समर्थ ठरेल, असा विश्वास वाटतो.

प्रस्तुत लेखसंग्रहात विविध प्रकारच्या विचारांचा व भावनांचा विशेष जाणिवेने परामर्श घेणारे आठ सर्ग आहेत आणि प्रत्येक सर्गात समाजजीवनातील विविध पैलूंचा आविष्कार घडविण्यात आला आहे. ज्ञान, बुद्धी आणि शक्ती या त्रयींवर ' विचार-प्रबोधिनी ' मानवी मनाचा व निसर्गसत्त्वशक्तीच्या चैतन्यलहरींचा वेध घेत, आल्हाददायी वीणाझंकार करीत असल्याचे आढळून येईल.

गेल्या पन्नास वर्षांत अत्यंत दाहक अवस्थेत श्री. ना. रा. शेंडे यांचे जे भरदार व डौलदार लिखाण झाले ते या ना त्या रूपाने प्रसिद्ध झालेच आहे; पण गेल्या छत्तीस वर्षांत प्रसिद्ध झालेले त्यांचे काही लेख पुस्तकरूपाने मात्र प्रसिद्ध होऊ शकले नाहीत. लेखकाने ते लेख आयुष्याच्या उत्तरपर्वात ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्याचे ठरविले होते. अनेक प्रकाशकांनी ते लेख पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यासाठी अनेकदा मागणीही केली होती पण अण्णांनी इतक्यात घाई करायची नाही म्हणून सर्वांना नकार दिला होता; पण, आता आम्ही जेव्हा ' श्रीशेष प्रकाशन 'तर्फे त्यांना काकुळतीने विनंती केली तेव्हा, ' श्रीशेष प्रकाशन 'चे त्यांचे स्वतःचे हितसंबंध लक्षात घेऊन, त्यांनी आम्हाला ' विचारप्रबोधिनी ' हा महत्त्वपूर्ण लेखसंग्रह प्रकाशित करण्यास सहर्ष मान्यता दिली, याचा आम्हाला कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे. त्या ऋणाची आम्हाला विस्मृती होणार नाही.

निवडक लेखांचा ' विचारप्रबोधिनी ' हा स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतर याचे विषुववृत्त दर्शविणारा व अढळ असलेल्या धृवताऱ्याकडे एका नेणिवेने अंगुलिनिर्देश करणारा मोलाचा संग्रह आहे. वेधकता, बोधकता व प्रेरकता या तिन्ही दृष्टींनी त्याची झालेली घडण चित्त वेधून घेईल व हृदयसौंदर्याला उठाव देईल यात संदेह नाही.

श्रीशेष प्रकाशनतर्फे श्री. ना. रा. शेंडे यांची ' काजळी रात्र ' ( दुसरी आवृत्ती ) आणि ' गायत्री ' या दोन श्रेष्ठ दर्जाच्या कादंबऱ्या आम्ही दोन वर्षांपूर्वी प्रकाशित केल्या; आणि आता, एकाच वेळेला ' विचारप्रबोधिनी ' (वैचारिक लेखसंग्रह), ' मी आणि माझे लेखन ' (आत्मपर प्रबंध), ' प्रतिध्वनी ' (निवडक कथांचा संग्रह) आणि ' शृंगारलेले प्रेत ' (कादंबरी) ही यांची दर्जेदार पुस्तके आम्ही सहर्ष प्रसिद्ध करीत आहोत.

प्रस्तुत लेखसंग्रहाला सुप्रसिद्ध लेखिका सौ. जयश्री बोरकर, कादंबरीकार श्री. निशिकांत शेंडे व एक लेखक श्री. जगदीश सुखदेवे प्रभृतींचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. विशेषत: श्री. ना. रा. शेंडे यांचे ज्येष्ठ पुत्र श्री. निशिकांत शेंडे यांनी लेखांचे संकलन व संपादन मोठ्या कुशलतेने केले आहे तर सौ. जयश्री बोरकर यांनी मोठ्या तत्परतेने श्रमपूर्वक शब्दांकन केले आहे.

' नाग मुद्रणालया 'चे सहृद बंधुद्वय श्री. दिवाकर धाक्रस व श्री. प्रभाकर धाक्रस यांनी अल्पावधीत मोठ्या जिव्हाळ्याने मुद्रणाची सुबक घडण घडविली आहे आणि पुण्याच्या ' जोशी आर्टस् 'चे नामवंत चित्रकार श्री. जोशी यांनी मोठे वेधक व सूचक असे चार रंगी चित्र रेखाटून आपली मनोज्ञ कल्पकता दर्शविली आहे. त्यामुळे ' विचारप्रबोधिनी ' हा लेखसंग्रह उठावदार व चित्ताकर्षक झाला आहे. आम्ही सर्वांप्रती मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

प्रस्तुत ' विचारप्रबोधिनी ' हा लेखसंग्रह आमच्या सुहृद वाचकांना काही बुद्धिखाद्य देऊ शकेल, विचारांना प्रेरणा व गती देऊ शकेल आणि उदात्त भावनांची एक तेजस्वी दिशाही दर्शवू शकेल, असे आम्हाला वाटते. त्याचा जनमानसावर काही प्रभाव घडू शकला तर प्रस्तुत मौलिक ग्रंथाचे सार्थक झाल्याची प्रसन्नता आम्हाला लाभेल !

वैशाख पौर्णिमा : शके १९०२
३० एप्रिल १९८०

– रामकृष्ण सोनकुसरे
प्रकाशक

# विषयप्रवेशानुक्रम


**सर्ग १ : राष्ट्रीय, सामाजिक व सांस्कृतिक : १**

**१. स्वातंत्र्याचे अढळपद : ३**

सरकारचा आदेश प्रमाण मानावा : ४, राष्ट्राच्या रक्षणार्थ असंख्य वीर निर्माण करा : ४, शिक्षण संस्थांचे आद्य कर्तव्य : ५, स्वतंत्र वाङ्मयाच्या निर्मितीची आवश्यकता : ६, साहित्यिकांची व पत्रकारांची भूमिका पवित्र असावी : ६, लोकसेवा साधा : वीर वृत्तीची घडण निर्माण करा : ७, पोटभर भाकरीचा अर्थ : ७, कर्मसिद्धीचे कर्ण निर्माण व्हावेत : ८, चित्तशुद्धीतच राष्ट्रशुद्धी : ८, नागरिकांच्या श्रेष्ठतेवर राष्ट्रतेज : ९, उपेक्षेने काही साध्य नाही : ९, स्वातंत्र्य आम्हास काय शिकविते : १०, पोटभर भाकरी म्हणजेच सुराज्य : १०, बहुजनसमाज आणि रामराज्य : १०, सेवाच मानवीधर्म : ११, बहुजन समाजाचे मूल्यमापन : ११, बहुजनसमाज व लेखकाचे कर्तव्य : १२, रामराज्य कोणते ? : १२, माझा देव : १३, माळयाला त्याचा देव गवसला पण मला ? : १४, राष्ट्रसिद्धीचा यज्ञ : १५, वाटेत कुठेही थांबू नका : १६, भारताच्या विजयाचे मर्म : १६, स्त्रिया आणि दलित यांचा प्रश्न : १७, आधी मुक्काम गाठा : १८.

**२. सेवा आणि आत्मदान : २०**

लोकहितवादी सेवकाची अवहेलना : २०, सच्छील सेवकांची आवश्यकता : २०, आत्मदान हेच सेवेचे मुख्य गमक : २१, सेवेसाठी हृदय हवे हृदय : २१, प्रसंगी सेवेची कसोटी : २२, परस्परांचे दु:ख जाणले पाहिजे : २२, सेवा जनमान्य असावी : २३, सेवेचे आणि आत्मदानाचे मोल : २३.

**३. कार्यकर्त्यांच्या मर्यादा : २४**

**४. इतिहासाचे एक पान : २८**

नेपोलियनचे आपल्या मुलास अखेरचे पत्र : २९.

**५. आजचे समाजजीवन : संस्कृती आणि व्यक्तिविकास : ३६.**

**सर्ग : २ : मराठी साहित्य : समाजसुधारणा आणि राष्ट्रीय जबाबदारी : ४७.**

**१. मराठी वाङ्मय आणि समाजसुधारणा : ४९.**

**२. लोकसाहित्य : दलित जीवन आणि संस्कृती : ५४.**

**३. अतीन्द्रिय विश्वातील प्रभाव : ६६.**

**४. क्रौर्य नको, शौर्य हवे : ७४.**

**५. राष्ट्रीय एकतेसाठी साहित्यिकांची जबाबदारी : ७७.**

**सर्ग : ३ : महाराष्ट्रातील संतांची वाणी आणि प्रभाव : ८३.**

**१. महाराष्ट्रातील काही पुरोगामी संत : ८५,** भागवत धर्म संस्थापक संत ज्ञानेश्वर : ८७, बंडखोर संत चोखामेळा : ९३, प्रगतिशील संत एकनाथ : ९५, लोकप्रतिनिधी संत तुकाराम : ९८.

**२. क्रान्तदर्शी श्री संत चोखामेळा : १०४,** चोखोबाचा मानवतेला जोहार : १०४, उपेक्षित प्रज्ञावंत संत : १०४, शासनाची संत चोखामेळा समिती : १०४, थोडा पूर्वेतिहास : १०५, चोखामेळा : जन्म व मृत्यू : स्थळ : १०७, संत चोखोबाचे संत घराणे : १०७, बंडखोर चोखोबांची झुंजार बंडखोरी : १०८, समतेचा आणि माणुसकीचा पुरस्कार : १०८, समाजक्रान्तीचा पहिला उद्गाता : १०९, श्री संत चोखोबांची तेजोवर्धित अस्मिता : ११०.

**३. वाहती सन्तामृतवाणीचे झरे : ११४.**

**सर्ग : ४ : आम्ही आणि आमची आजची व उद्याची दिशा : १२९.**

**१. आजचे उपासक, उद्याचे प्रवर्तक : १३१,** तरुणांपुढील राष्ट्राची बिकट समस्या : १३१, उपासकांना निश्चित मुक्काम हवा : १३१, आत्मविश्वासावरच कार्यसिद्धता : १३२, एकलव्याचा आदर्श पाठ : १३२, शुभ वर्तमानाची बीजे रोवता यावीत : १३२, उपासकांचे व प्रवर्तकांचे मार्ग : १३३, क्रियाशील वृत्तीने राष्ट्राची इच्छा पूर्ण करावी : १३३.

**२. एक राष्ट्र, एक जनता : १३४.**

**३. ठोठवा म्हणजे उघडेल, शोधा म्हणजे सापडेल : १४०.**

**४. बहुजनसमाज आणि कर्मसिद्धीचा यज्ञ : १४३,** समाजजीवनातील प्रज्ञाशक्ती : १४४.

**५. पं. राहुल सांस्कृत्यायन : एक अभ्यास : १५१.**

**सर्ग ५ : आजच्या दलित साहित्यातील काही अन्तःप्रवाह : १५५.**

**१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साहित्यसाधना : १५७.**

**२ : डॉ. आंबेडकरांच्या अमरत्वाचा सुगंध : १७७.**

**३ : आजच्या विद्रोही साहित्याचे काही संकेत : १९४.**

दलितांचे उद्धारक साहित्य : १९४, मानवतेसाठी संघर्षाचा मार्ग : १९५, अटळ स्फोटक बीजे : १९५, विशाल नेत्रातील स्फुल्लिंग : १९६, क्रान्तदर्शी कविता : १९७, मानवतेच्या आविष्कारार्थ विद्रोह : १९९, विद्रूपतादर्शक आरसा फोडा : २००, आता निखाऱ्याचा हात : २००, आधुनिक जीवनविषयक प्रमेय : २०१, बुद्धिवादी नव्हे, बुद्धियोगी बैठक : २०२, प्रखर झुंज घेण्याची प्रक्रिया : २०२, ध्येयवादाच्या प्रेरणाशक्तीवर सामाजिक क्रान्ती : २०३, मराठी मुलुखव्याप्तीचे विद्रोही साहित्य : २०३, दलितांच्या साहित्याचे स्वतंत्र बौद्धपीठ : २०४, शौर्यतेजः कर्तृत्वांचा नवा इतिहास : २०५.

**४ : 'गीता माय'च्या सावलीत : २०७.**

**सर्ग : ६ साहित्याच्या श्रेष्ठ व्यासपीठावरील एक अध्यक्षीय भाषण : २२१**

विदर्भात भाषा, उत्खनन व संशोधनाचे खाते हवे : २२६, वाङ्मय लोकाभिमुख असावे : ते खेड्यातील हृदयापर्यंत पोचावे : २२६; लोकभाषा. लोकसाहित्य व लोककला : २२८; संतांचे लोकोत्तर कार्य अंगी बाणवा : २२८; लोकसाहित्याच्या चिरंतन मूल्यांचे दर्शन घडवा : २३०; अलिखित वाङ्मय हेच खरे लोकसाहित्य : २३१; संस्कृतिपोषक वातावरण निर्माण करा : २३२; साहित्यातील शाश्वत मूल्यांची दिशा : २३३; साहित्यात उत्कट जीवनदर्शनाची नितांत आवश्यकता : २३४; साहित्यातील विकृतीला आळा घातला पाहिजे : २३५; काही नामवंत साहित्यिकांचे कार्य : २३६; विद्वज्जनांच्या उच्च साहित्याचा आदर्श राखा : २३७; स्त्रिया व बालके यांच्यासाठी उत्कृष्ट वाङ्मय हवे : २३८; विविध बोली अभ्यासून मराठी भाषा समृद्ध करा : २३८; वास्तववादी शुद्धलेखन व लिपीत सुधारणा हवी : २३९; अज्ञात जगाचे शास्त्रीय संशोधन व्हावे : २४०; मानवांच्या कल्याणार्थ 'सांस्कृतिक व्यासपीठ' निर्माण करा : २४१.

**सर्ग : ७ : मी आणि माझे लेखन २४५**

एक अपूर्व योग : २४८; विविध सुधारणांचे कार्य : २५०; साहित्यसाधनेचे दोन प्रबळ प्रयत्न : २५४–२५५; माझे दुसरे पलायन : २५९; अनुभव सिद्धी : २५९–२६०; साहित्य यज्ञ : २६३; अध्यात्मसाधना, साहित्यसाधना आणि समाजसाधना : २६३–२६४; काव्य : २६५–२६६; कथा–कादंबऱ्या : २६६–२७२; मी आणि ब्राह्मण वर्ग : २७५–२७७; लेखनिर्मिती : प्रबंध : लोकसाहित्य : २७८–२८०; व्यक्तिचित्रण, : २८१–२८२; 'प्रकाश' व 'दीपक' साप्ताहिक : २८२–२८३; चरित्रग्रंथ : २८३–२८४; वृत्तपत्र : २८५–२८६; साहित्य व संस्कृतिसंबंधित संस्था : २८७–२९२; श्रीशेषाश्रम : २९२–२९४; काही बोधवचने : २९४–२९५; आणखी काही कथा, काही कादंबऱ्या व चरित्रग्रंथ : २९९–३०५; श्रीसंत चोखामेळा आणि समिती : ३०४–३०५; राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि चरित्रात्मक कादंबरी : ३०५–३१०; अध्यात्म- शक्ती आणि अतीन्द्रिय शक्ती : ३१०–३१५.

**आध्यात्मिक पर्व : ३१७–३५८.**

**सर्ग : ८ तीन गद्य काव्ये : ३५९.**

**१ : शेतकऱ्यास पहिला मुजरा ! : ३६१.**

**२ : कंगालाचे समाधान : ३६२.**

३ : **आराधना** : ३६४.

सर्ग १

# राष्ट्रीय, सामाजिक व सांस्कृतिक

१. स्वातंत्र्याचे अढळपद
२. सेवा आणि आत्मदान
३. कार्यकर्त्यांच्या मर्यादा
४. इतिहासाचे एक मंगल पान
५. आजचे समाजजीवन :
संस्कृती आणि व्यक्तिविकास

# १.

## स्वातंत्र्याचे अढळपद

**स्वातंत्र्याचे रक्षण करणे हेच आमचे ब्रीद**

आम्ही स्वतंत्र भारताचे स्वतंत्र नागरिक आहोत. आमची लेखणी स्वतंत्र आहे. आमची भाषा स्वतंत्र आहे. आमची विचारसरणी स्वतंत्र आहे आणि आमचे कार्य स्वतंत्र आहे. जाणिवेने आमचे हृदय आनंदाने उचंबळून येत आहे, दुर्दमनीय उत्साहाने बाहू स्फुरत आहेत. प्रसन्नतेने आमचे मन स्वकर्तव्याकडे ओढले जात आहे आणि देशाभिमानाच्या द्विगुणित झालेल्या जागृतीने आमची शक्ती मायभूमीच्या सेवेसाठी आसुसलेली आहे. हे सर्व काही खरे असले तरी आम्हाला स्वातंत्र्याचा यथेच्छ उपभोग घेण्याची सुस्थिती प्राप्त झालेली नाही. स्वतंत्रता लाभली काय आणि गुंतागुंतीचे अनेक बिकट प्रश्न डोळ्यांसमोर राहिले काय? या अडचणीमुळे आमचे स्वातंत्र्य एकप्रकारे जाळ्यात गुरफटल्यासारखे झाले आहे. हे जाळे अर्थात आमच्याच देशबांधवांच्या राज्यपिपासू प्रवृत्तीमुळे निर्माण झाले आहे, असे म्हणताना जितके दुःख होते तितकाच संताप तीव्र होतो आणि या उद्विग्नतेमुळे शांतता स्थिर राहत नाही, तोल सावरण्याचा प्रयत्न करूनही तो सुटूच पाहत आहे. संभ्रमालाही मर्यादा आहे. ती मर्यादा जर कोणी बळजबरीने छेदू लागला तर सात्त्विक प्रवृत्तीचा माणूससुद्धा आपल्या सत्त्वरक्षणासाठी ती तोडणाऱ्या दुष्टाला प्रतिकार करण्यास कसा मागेपुढे पाहील? आज अशीच परिस्थिती उद्‌भवली आहे. स्वराज्यप्राप्तीच्या वेळी भारताचा एक लचका मोठ्या शिताफीने तोडण्यात आला. तो आम्ही सहन केला. परंतु लगेच दुसऱ्या तुकड्यावरही अमानुष प्रहार होऊ लागले

व देशाचे स्वास्थ्य अधिक बिघडविण्याचा अट्टाहासाने उपक्रम सुरू झाला. तरी गांभीर्य राखून स्थिती काबूत राखण्याचा सौजन्यपूर्वक यत्न हिंदवासी करू लागले. परंतु हे यत्न प्रतिपक्षाला केवळ त्यांच्या मनसोक्त स्वार्थासाठी रुचेनात. त्यांनी भारताचा नक्षा विच्छेदनास जोराने सुरुवात केली. रक्ताचे ओघळ सैरावैरा वाहू लागले. घरे लुटल्या गेली, जाळल्या गेली. सारे वित्त हरण झाले. अन्नूवर घाला पडू लागला. अर्भके छाटण्यात येऊ लागली. स्त्रियांच्या अपहरणाला ऊत येऊ लागला. साऱ्या भरतखंडभर करुण आक्रोशाचा भयावह ध्वनी दुमदुमू लागला. रक्ताच्या चिरकांड्यांनी राष्ट्रातील शहराशहराच्या, खेड्यापाड्याच्या सीमा माखल्या गेल्या, आणि अवघ्या वर्षात भारताची दशा अनुकंपनीय व अतिभेसूर दिसू लागली. स्वराज्यप्राप्तीच्या समुद्रमंथनातून निपजलेले हे हलाहल भारताला पचविणे भागच होते. आणि हे जहाल विष मोठ्या विशाल अंत:करणाने संयम राखून पचवीत असताना, आता मात्र स्वातंत्र्याचे रक्षण होईल त्या उपायाने करणे क्रमप्राप्तच झाले आहे.

**सरकारचा आदेश प्रमाण मानावा**

स्वातंत्र्यदिनाचे मन:पूर्वक स्मरण करताना राजकीय प्रश्नासंबंधाने अधिक काही सांगणे वा ठरविणे आमचे काम नाही. तो आमचा अधिकार नाही. आम्ही आपले हृदय काय ते व्यक्त केले आहे आणि आमच्या सरकारच्या आज्ञेसाठी आम्ही वाट पाहत असतो. फक्त इतकेच म्हणू शकू की, जी जबाबदारी आमच्या सरकारवर आहे ती आम्हा प्रजाजनांवरही आहे. तेव्हा, सरकारला जराही धक्का पोहोचेल असे कृत्य आमच्या हातून घडता कामा नये. उलट, सरकारच्या आदेशाची वाट पाहत राहून, आलेली जबाबदारी प्राणाची पर्वा न करता निभविण्यास आम्ही सदैव तत्पर असावयास पाहिजे. नव्या भारताला आज अग्निदिव्यातून पार पडावयाचे आहे. वैयक्तिक व राजकीय भेदाभेदांना आज अवसर मिळू नये. जोपर्यंत नवप्राप्त स्वातंत्र्याचे हे रोपटे खोलवर मुळे धरीत नाही, तोपर्यंत आम्ही कोणत्या गटाचे, कोणत्या विचारप्रणालीचे व कोणत्या राजकारणाचे पक्षपाती आहोत हे आपण विसरून जाऊ या. भारतवर्ष हाच आपला आदर्श आणि त्याची सेवा हेच आपले राजकारण. म्हणून प्रत्येक मजूर आणि मालक, किसान आणि जमीनदार, व्यापारी आणि नोकर, विद्यार्थी आणि शिक्षक प्रत्येक नागरिक स्त्री-पुरुषाचे हे कर्तव्य आहे की राष्ट्राच्या हितात आपले हित त्याने विलीन करावे आणि एका महान गौरवशाली भारताच्या निर्मितीस लागावे.

**राष्ट्राच्या रक्षणार्थ असंख्य वीर निर्माण करा**

आता, स्वराज्य याचा अर्थ काही लोक विपरीत करून घेतात याचा थोडा विचार करणे आवश्यक आहे. स्वराज्य म्हणजे आपले राज्य. आपले स्वत:चे राज्य जेव्हा आम्ही म्हणतो तेव्हा आम्ही आपल्यावर कसलीही जबाबदारी नसल्याचे

राज्य समजतो आणि निर्धास्तपणे सुखाचीच अपेक्षा बाळगतो. स्वराज्याचा अर्थ जर चैनीचे राज्य असा करू लागलो व तसे वागू लागलो तर आमच्यासारखे मागासलेले दुसरे लोक कोणी नाहीत असेच म्हणावे लागेल. स्वत:चे घर म्हटल्या-वर त्या घराची काहीच जबाबदारी मजवर नाही असे का म्हणता येईल ? मी माझे घर म्हणून मला सर्व काही सांभाळले पाहिजे म्हणून मला दक्षतेने काही गोष्टी करणे आवश्यक होईल. घरात पैसा नाही, अन्नाची व्यवस्था केली पाहिजे, मुलगा आजारी आहे त्याची सोय लावली पाहिजे, दुसऱ्या भावाला अजून शिक्षण नाही त्याच्या शाळेची व्यवस्था केली पाहिजे, घर जीर्ण झाले आहे, थोडी डागडूजी करणे जरूर आहे, अशा अनेक गोष्टींची जबाबदारी आपल्याला पार पाडावयाची असते. इकडे दुर्लक्ष करून भागत नाही. आणि नेमके हेच पण थोड्या व्यापक स्वरूपात ' स्वराज्य ' म्हटल्यावर आपल्या स्वतंत्र राष्ट्रासाठी काही करणे क्रम-प्राप्तच ठरते. आचार्य दादा धर्माधिकारी तर स्पष्ट म्हणतात, ' स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर जो जबाबदाऱ्यांनी गांगरून जातो तो साधकच नव्हे, स्वराज्याचा अधिकारीच नव्हे.' हे विचार लक्षात घेतले म्हणजे आता आपल्यावर काय जबाब-दारी उरली, असे म्हणणारे किती असमंजस आहेत याचे वैषम्य वाटून, भारताच्या स्वतंत्र नागरिकाच्या असल्या कोत्या समजुतीबद्दल दु:ख होते, आणि विशेष दु:ख वाटते ते शहरातील सुशिक्षित म्हणवणाऱ्या उपरिनिर्दिष्ट विचार-सरणीच्या व्यक्तीबद्दल. त्याला प्रखरतेने जाणायला पाहिजे की तो भारत-राज्य-शकटाचा एक कर्तव्यप्रेरक घटक आहे. देशाच्या सामाजिक जीवनाच्या पुनरुत्थानात त्याला अवश्य ते साहाय्य देणे जरुरीचे आहे. त्याने जर आपले कर्तव्य नीट पार पाडले नाही तर त्या प्रक्रियेमुळे राष्ट्रयंत्राच्या कार्यात नकळत बिघाड होतो आणि म्हणून प्रत्येक व्यक्तीला समाजसेवेचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. त्याला आपल्या स्वार्थी दृष्टिकोनाचे रूपांतर लोककल्याणार्थ करावयास हवे. आपल्या उत्तर-दायित्वालाच त्याला मानावयाचे नाही तर दुसऱ्यांनाही त्याने आपल्या उत्साहवर्धक कृतीने समाजसेवेसाठी उद्युक्त केले पाहिजे. म्हणजे पर्यायाने स्वातंत्र्यात त्याला आपल्या राष्ट्राची उन्नती करता येऊन असंख्य वीरांना राष्ट्राच्या कामासाठी सुसज्ज करता येईल.

**शिक्षणसंस्थांचे आद्य कर्तव्य**

आपल्या राष्ट्रात विद्यमान शिक्षणसंस्था अनेक आहेत. परंतु नवराष्ट्राच्या वर्धमान होणाऱ्या शक्तीसाठी त्यांना तरुणांचा बौद्धिक विकास करता आला नाही, तो होणे अत्यावश्यक आहे.

याशिवाय भ्रष्टाचार तथा स्वैराचार यांचाही विचार योग्य दिशेने व्हावयास पाहिजे. शिक्षणसंस्थांवर याची फार मोठी जबाबदारी आहे. तसेच औद्योगिक विकासाचे महत्त्व शिक्षणक्रमात किती निकडीचे आहे, हे सांगायला नको. आधुनिक

राजकीय स्थिती तथा राष्ट्रीय आवश्यकता यांचे अनुकूल असे शिक्षणसूत्र अमलात आणणे फारच जरुरीचे आहे. मोजक्या शब्दांत सांगावयाचे झाले तर समाजाची बौद्धिक शक्ती वाढविणे, सार्वजनिक कर्तव्यभावनांना चालना देणे, राष्ट्रीय अभिरुचीचा पुरस्कार करणे, युगाच्या विचाराचे परिमार्जन करणे, सार्वजनिक भावनांच्या सत्य सिद्धान्तांचा प्रसार करणे, समतेसाठी गटागटांचा समेट करून बंधुत्व निर्माण करणे आणि राष्ट्रीय चेतना तथा शक्ती यांच्या संवर्धनाने समाजाच्या व्यक्तिगत जीवनाला सुसंस्कृत करणे आजच्या स्वातंत्र्यातील शिक्षणसंस्थांचे तथा जनतेचे आद्य कर्तव्य आहे.

**स्वतंत्र वाङमयाच्या निर्मितीची आवश्यकता**

आज स्वतंत्र राष्ट्रात स्वतंत्र वाङमयनिर्मिती व्हावयास पाहिजे. कारण आपल्यासमोर असे कितीतरी कूट व संकीर्ण प्रश्न आहेत की, त्यांचा छडा लावल्याशिवाय समाजाला योग्य मार्गदर्शन होणे कठीण आहे. आजपर्यंतचे वाङमय या एका शतकात एका निराळ्या चाकोरीत निर्माण झाले. बंधनातून सुटका नसल्यामुळे हृदयातील इच्छा तशाच अपुऱ्या राहिल्या. भारतीयांचे ऐक्य व्हावे, पददलितांचा उद्धार व्हावा, ग्रामीण जीवनात चैतन्य ओतले जावे, भेदभाव नष्ट व्हावेत, श्रेष्ठ-कनिष्ठ समपातळीवर यावेत आदी गोष्टींसंबंधी उदात्त व प्रेरक वाङमय निर्माण झाले नाही. सुखासीन व त्यातल्या त्यात एका विशिष्ट वर्गाच्या जीवनावर बरेच असे वाङमय अमाप प्रसृत झाले. पण अशाने राष्ट्राची घडी दुरुस्त होणे दुरापास्तच. कथा, लघुनिबंध, गीतें, कादंबऱ्या इत्यादी ललितवाङमय केवळ मनोरंजनार्थच नसावे तर आज या प्रत्येक वाङमय-प्रकारात काही संशोधनाचे, बोध घेण्याचे, चुकलेला मार्ग सापडण्याचे व सद्‌भावना जागृत होऊन एकमेकाविषयी आदर, श्रद्धा व विश्वास उत्पन्न होण्याचे विशेष आढळले पाहिजेत. काही गोष्टी काल चांगल्या होत्या, आज चांगल्या आहेत व उद्याही चांगल्या राहतील अशा कल्पनेच्या भरारीत वाङमय-निर्मिती राष्ट्राला तारक होणार नाही तर वाङमयाचे तंत्र काहीही असो, पण हृदय मात्र जिवंतपणाचे असावे असे कोण म्हणणार नाही ? आणि म्हणून 'स्वतंत्र, हिंदुस्थानात वाङमय-सेवकांची महत्त्वाकांक्षा उच्च असावी. जातिभेद आणि वर्णभेद यांचा समूळ नाश करण्याचा विडा वाङमयाने उचलला पाहिजे.' असे स्वच्छ मत आचार्य काकासाहेब कालेलकर यांनी देऊन, साहित्य-सेवकांना योग्य मार्गदर्शन केले आहे.

**साहित्यिकांची व पत्रकारांची भूमिका पवित्र असावी**

आजच्या काही साहित्यिकांना जीवनाच्या खोलीत शिरण्याचे धाडस करता येत नाही, असे म्हटले तर वाईट वाटण्याचे काही कारण नाही. वरपांगी जे दर्शन घडते त्यावर शाब्दिक मुलामा चढवून वाचकांची किंवा श्रोत्यांची करमणूक करून त्यांना गुंगविणे एवढ्याच चतुराईवर त्यांची मजल असते. पण आता, असे करून कसे

चालेल ? बाजारात भरपूर किंमत येते म्हणून हवे ते झोकून देण्याची प्रवृत्ती आता सोडून सत्यदर्शनाच्या सीमेवर नेण्याची मौलिक कामगिरी, साहित्यिकांनी पत्करली पाहिजे. राष्ट्रोन्नतीचे मोठे कार्य साहित्यिकांना, कलाकारांना व पत्रकारांना करावयाचे असते. पत्रकार तर राष्ट्रसेवकांच्या प्रथम श्रेणीत येतो, कारण तो जो मार्ग दाखवील तो मार्ग इतरांना बव्हंशी विचारात घ्यावा लागतो. तेव्हा, जनतेचा बुद्धिभेद होईल, चुकीचे मार्गकथन केले जाईल, आपसात कलह निर्माण होईल, असे काहीही स्वतंत्र राष्ट्राच्या पत्रकारांना करता येत नाही. ज्या पत्रकाराची लेखणी अशा दुष्ट प्रवृत्तीला बळी पडेल त्या पत्रकारासारखा राष्ट्रद्रोही पत्रकार नाही, असे ठरेल. गटासाठी, पक्षासाठी पत्र काढणे व स्वतःचे चूक असून ते सत्य व दुसऱ्याचे सत्य असूनही चूक दर्शविणे यासारखे घोर पातक ते कोणते ? समतोल बुद्धीने आपली परोपकारी लेखणी कसाला लावून आपल्या मायभूची सेवा इमाने-इतबारे बजाविणारा पत्रकार अथवा साहित्यिक हाच खरा राष्ट्राचा एकनिष्ठ सेवक आहे. पत्र गडगडले तरी चालेल पण लेखणी गडगडू देणार नाही, हृदय डागाळू देणार नाही अशीच ईर्षा साहित्यभक्ताची असावी, अशी अपेक्षा भारताचा कोणताही नागरिक करील, आणि ती पूर्ण करणे साहित्यिकांचे, कलाकारांचे व पत्रकारांचे परम कर्तव्य राहील.

**लोकसेवा साधा : वीरवृत्तीची घडण निर्माण करा**

लोकसेवा ही काही सोपी गोष्ट नाही. वाटेल त्याने उठावे व मी पुढारी आहे म्हणून लोकसेवा करतो असे दाखवावे, हे भयंकर हास्यास्पद आहे. लोकसेवा स्वच्छ हृदयाने करावयाची असते. ‘ ही पाहा माझी लोकसेवा ’ असे म्हणणारा खरा लोकसेवक ठरत नाही. लोकसेवक तर प्रसिद्धीपासून पूर्ण अलिप्त असतो. कारण तो, ती सेवा कर्तव्य म्हणून करतो. मला कुठे वरची जागा मिळावी, माझा मान व्हावा म्हणून काही करीत नाही. सुबुद्ध जनता लोकसेवकाला सहज ओळखून त्याची किंमत ठरविते आणि हेच त्याचे मूल्य आहे. तेव्हा सत्प्रवृत्तीने लोकसेवेची खूणगाठ बांधून प्रत्येकाला कुठेही, कोणत्याही स्थितीत लोकसेवा साध्य करता येते. आज तर निःस्वार्थ बुद्धीच्या लोकसेवकांची भारीच गरज आहे. साक्षरतेचा प्रसार करणे, पददलितांच्या दुःखविमोचनार्थ पुढे सरकणे, मालक मजुरात सलोखा निर्माण करणे, राष्ट्रीय भावना जागृत करून वीरवृत्तीची घडण निर्माण करणे व स्वातंत्र्यातील अढळपद ढळू न देणे आपले पहिले आवश्यक कर्तव्य आहे.

**पोटभर भाकरीचा अर्थ**

आपल्याला स्वराज्याचे ‘ सुराज्य ’ निर्माण करावयाचे आहे, म्हणजे, आपल्या अंगी राष्ट्रोन्नतीच्या ज्या काही सद्‌भावना आहेत त्या सर्वांशाने कृतीत उतरावयाच्या आहेत. अर्थात हा ‘ आचार ’ आपल्या दूरगामी पण परिणामी इष्ट विचारांच्या आधारावर अवलंबून आहे. प्रत्येकाला आपल्या ‘ गृह शोभे ’ ची

लालसा आहे. त्यासाठी तो नसतील त्या धडपडी, उठाठेवी करतो. पण ' राष्ट्रशोभे 'साठी शक्ती कसाला लावण्याचा मात्र मागमूसही नसतो. आज आम्हा सर्वांवर ' राष्ट्रशोभे 'ची अतिशय मोठी जबाबदारी पडली आहे. तीवरच आपले ' स्वत्व राखून,' स्वावलंबी व स्वयंपूर्ण जीवन जगावयाचे आहे; परंतु हे सर्व काही, स्वराज्य प्राप्त झाले म्हणजे मी पूर्ण मोकळा झालो; मला काही कर्तव्ये नाहीत, अशा कृतघ्न कल्पनांवर नाही तर दुःखद जीवन सुखद कसे होईल; दीनदुबळा माणूस जगून समर्थ कसा बनेल, माझी सोय ती दुसऱ्याची सोय आहे की नाही; सर्वांत समता, बन्धुत्व व चैतन्ययुक्त जीवन कसे राखता येईल या कृतज्ञशील गोष्टींवर निर्धारित आहे. ' सुराज्य ' हे अशाच उदात्त व प्रभावी विचारसरणीच्या प्रात्यक्षिकतेवर अवलंबून आहे, हे विसरून भागावयाचे नाही.

**कर्मसिद्धीचे कर्ण निर्माण व्हावेत**

आज सर्वांना ' कर्मसिद्धी ' चे महत्त्व उमगले पाहिजे. मला काही करावयाचे आहे, करून तारावयाचे आहे, जोडून काही बलवत्तर असे निर्मावयाचे आहे अशा प्रेरणेने आमची निर्धाराची व चिकाटीची सुरुवात होणे अगत्याचे आहे. कर्माचा प्रारंभच केला नाही तर कोणत्याही पुरुषाला नैष्कर्म्यता प्राप्त होत नाही. नैष्कर्म्यता म्हणजे निष्क्रियता नसून, कर्मसिद्धी किंवा संसिद्धी होय.

न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।

' कर्मसिद्धी ' चे उदाहरण द्यावयाचेच झाले तर दातृत्वशील अशा शूर कर्णाचे देता येईल. भक्ती, शक्ती व बुद्धी यांनी त्याने आपल्या जीवनाचे साफल्य केले. त्याच्या बाहूंत जोर, डोळ्यांत विनयता, शब्दांत बोध आणि हृदयात उदारता ओतप्रोत साठवलेली होती. आज भारतात ' कर्मसिद्धी ' च्या कर्णाची अतिशय आवश्यकता आहे. नजरेने स्वमरण पाहत असताही दुसऱ्याला अभय देऊन तारणारे कर्ण किंवा दधीचीसारखे वीर महात्मे राष्ट्राला हवे आहेत. स्वराज्यातील ' सुराज्य ' कर्णकृतीच्या उच्च व तारक धोरणावर निर्भरित असणे कोणताही भारतीय मान्य करील व त्याचे अनुकरण करून, ध्येयदृष्टीने आपले पाऊल राष्ट्रसंवर्धण्यास, रक्षण्यास पुढेच टाकील.

**चित्तशुद्धीतच राष्ट्रशुद्धी**

' क्रांती ' या शब्दाने मानवाचे हृदय परिवर्तित होऊन त्याच्या कार्याची दिशा अधिक विशाल, अधिक व्यापक व अधिक उत्तेजक व्हावी. ता. १४ जानेवारी १९४८ हा क्षण भारताच्या स्वातंत्र्यातील पहिल्या मकर संक्रांतीच्या संक्रमणाच्या क्रांतीचा राष्ट्रोद्धारक असा पवित्र क्षण ठरला पाहिजे. या संक्रमणाने हिंदभू शूचिर्भूत होऊन तिचा कण न कण पुलकित व्हावा व तो प्रत्येक व्यक्तीच्या विकासाला कारणीभूत ठरावा, अशी सदिच्छा या शुभदिनी कोणीही हिंदवासी धरील त्याबरोबर या संक्रमणाच्या क्षणाला जागून भारतातील हरेक पुत्र, स्वामी शिवानन्द सरस्वतींनी

येशु ख्रिस्ताच्या ' आपल्या शत्रूवर आपल्यासारखे प्रेम करा. जो तुम्हाला शिवी देतो त्याला तुम्ही आशीर्वाद द्या. जो तुमचा द्वेष करतो त्याचे तुम्ही भले करा आणि जो तुम्हाला दु:ख देतो, अत्याचार करतो, त्याच्यासाठी प्रार्थना करा, ' या शब्दांना हृदयात बसविले याचे मर्म ध्यानी घेऊन, स्वातंत्र्यातील पहिल्या संक्रांतीच्या संक्रमणाचा ' अर्थ ' सार्थकी लावील, असा विश्वास वाटतो. ' चित्तशुद्धी ' हा या क्रांतीचा अभिप्रेत अर्थ आहे. या शुद्धीत राष्ट्रशुद्धीचे मूळ आहे, हे आम्हाला दृष्टि-आड करावयास नको. अर्थात स्वातंत्र्यातील संक्रांतीच्या या क्षणापासून आपल्या आचारविचारात पूर्ण बदल करून राष्ट्राला ऐक्य, समत्व, सहिष्णुत्व निर्माण करणे म्हणजेच स्वराज्य टिकविणे होय.

**नागरिकाच्या श्रेष्ठतेवर राष्ट्रतेज**

इतर राष्ट्रांपेक्षा आपले राष्ट्र फार भिन्न आहे. येथील रीतभात, संस्कृती, नीतिमत्ता व वागणूक काही विशेष आहे. पूर्वजांनी घालून दिलेला स्वाभिमानाचा व कर्तव्यवृत्तीचा धडा काही काळ विसरल्यासारखा झाला तरी तो आता गिरविला पाहिजे. परोपकार व निरपेक्षबुद्धीने त्याचे पालन करणे आपले परम कर्तव्य आहे. कारण या कर्तव्यावर आपण आपल्या राष्ट्रातील जबाबदार नागरिक ठरतो. तेव्हा भारतातील नागरिक हा उच्चतम ध्येयाचा, प्रामाणिक आणि न्याय्य दृष्टीचा असण्यात राष्ट्राच्या श्रेष्ठतम संस्कृतीचा, वैभवाचा खरा विलास आहे. जॉर्ज लाँग नावाच्या एका सद्‌गृहस्थाने उद्‌गार काढल्याप्रमाणे, ' नागरिकाचा श्रेष्ठपणा त्याच्या जीवनातील प्रामाणिकपणाच्या सत्यावर व आत्मविश्वासाने योग्य अशा संशोधिलेल्या तत्त्वाच्या वागणुकीवर विशेष अवलंबून आहे.' ( A man's true greatness lies in the consciousness of an honest purpose in life, founded on a just estimate of himself and everything else and a study of obedience to the rule which he knows to be right. ) प्रत्येक नागरिक या उक्तीप्रमाणे समर्थ होऊन राष्ट्राचे बळ कसे वर्धमान होईल इकडे लक्ष केन्द्रित करील तर भारत स्वतेजाने इतर राष्ट्रांनाही प्रकाशमान करण्यास समर्थ ठरेल.

**उपेक्षेने काही साध्य नाही**

आज आपणाला वाद नको. न्याय्य धोरण मात्र हवे. तेव्हा संघर्षाची व वादाची जराही बाजू येऊ न देण्याची कृती आचरून, कोण कुठे चुकतो हे न पाहता, राष्ट्रहित कसे साधता येईल हेच पाहणे इष्ट आहे, उपकारक आहे. तसेच, अद्ययावत् दृश्यते वाक्यं शक्तिश्चात्रास्य यावती । तावत्कार्या न चोपेक्षा युक्ता वैगुण्यशंकया ।।' म्हणजे ज्या वाक्याचा जितका अर्थ दिसतो व जितकी शक्ती दिसते, त्याप्रमाणे वागावे. उगीच त्या वाक्यात काही वैगुण्य म्हणजे कमीपणा राहिला आहे, असे मानून त्याची उपेक्षा करू नये, हे श्रीमाधवाचार्यांचे मत आज

आम्ही आत्मसात केले पाहिजे. भारताचे खरे बीज इतरांना उद्धरून आत्मशांती प्राप्त करणे आणि म्हणून उपेक्षेने कसलाही विचार न करता धान्याची कोठारे लुटविणारा दामाजीपंत आणि जीवांना ममतेने कुरवाळणारा एकनाथ आपणांत व्हावयास हवे. आज राष्ट्राला अशा विभूतींची व श्री. छत्रपती शिवाजीसारख्या एकछत्री स्वराज्यसंस्थापकांची भारीच गरज आहे. म्हणजे राष्ट्राचे दारिद्र्य नष्ट होऊन, ' आमुचे राष्ट्र ' म्हणून सर्वांना अभिमानाने राष्ट्रगुणगान करता येईल.

**स्वातंत्र्य आम्हांस काय शिकविते ?**

पण भारताला स्वातंत्र्य लाभूनही आम्ही संघटना, शिस्त, प्रेम व प्रामाणिकपणा आदी उतरवू शकलो नाही तर आमचा राष्ट्राभिमान काय कामाचा ? कसली ती एकराष्ट्रनिष्ठता ! उलट, स्वातंत्र्यात जे तीव्रतेने अनुभवास येते, ते काही वेगळेच. जिकडे तिकडे अंदाधुंदी, भांडवलदारांची मगरमिठी, सत्तेचे आवळते पाश, काळ्याबाजारांचा सुळसुळाट व देशसेवेच्या क्लृप्तीने उपभोगिले जाणारे स्वार्थी जीवन म्हणजे स्वातंत्र्यातील सुराज्य नव्हे. परंतु घडत आहेत त्या अशाच गोष्टी. ह्या गोष्टी राष्ट्राला केव्हाही बाधकच नव्हे मारकच ठरतात. तेव्हा क्रांतीची उत्क्रांती घडविताना अराजकता घडली तर ते कसले स्वराज्य ? सुराज्य तर नाहीच नाही. अर्थात ही सर्व जबाबदारी जशी सरकारवर येते तशी बव्हंशी नागरिकांवरही येते. म्हणून राष्ट्राचा नकाशा डोळ्यांसमोर असावयास पाहिजे, त्यात एकजात कोण हसतो व एकजात कोण रडतो हे आम्ही शोधून, हसणारा तो एकच व रडणारा तो एकच असा मार्ग निर्मिला पाहिजे. असे करताना आम्हाला आपली सर्व संपत्ती तद्वतच जात, पक्ष व वर्ण हे सर्व एकसंध करावे लागणार. तेव्हाच राष्ट्राला स्वातंत्र्य लाभले व ते संवर्धिले जात आहे, असे सिद्ध होईल.

**पोटभर भाकरी म्हणजेच सुराज्य**

अशा वेळी आपण फ्रेंच राज्यक्रांती व रशियन राज्यक्रांती अनुभवादाखल नजरेपुढे ठेवली पाहिजे. दोन्ही क्रांतीच्या वेळेला म्हणजे उत्क्रांतीच्या सुरुवातीला तेथील जनतेने एकमुखाने उच्चारलेली ' तुमची ही क्रांती व प्रतिक्रांतीचे उत्सव हे रोटीवाल्याच्या भट्टीत जाळून टाका. आमचे समाधान केवळ पोटभर भाकरी मिळाल्याने होणार आहे ' असा टाहो फोडला. आपल्या भारतातील आजही टाहो असाच असल्याचे आढळून येते. तेव्हा ' पोटभर भाकरी ' या शब्दातच स्वराज्य व ' सुराज्य ' याचा अर्थ सामावला आहे. पण आपण केवळ टाहो न फोडता, राष्ट्रीय वृत्ती राखून सहजीवनाने आणि परिश्रमाने ' पोटभर भाकरी ' व ' अंगभर वस्त्र ' निर्माण करावयास पाहिजे.

**बहुजन समाज आणि रामराज्य**

बहुजनसमाज म्हणजे राष्ट्रात पीडित असलेला, दुरावलेला, अज्ञानात व पर्यायाने राष्ट्रकार्यासाठी निरुपायाने वंचित झालेला व अशा समुच्चयात बहुसंख्येने

असलेला समाज. जात, पक्ष व धर्म यांनी बद्ध झालेला समाज म्हणजे बहुजन-समाज नव्हे. काही तज्ज्ञ अशा अर्थाने बहुजन समाजाची व्याख्या करून उगीचच वैमनस्य पत्करण्याचा रोष ओढवून घेतात. आमच्या राष्ट्रातील जो वर निर्देशिलेला बहुजनसमाज आम्ही समजतो, त्यात सेवेच्या मापाने सामान्यतः शेतकरी, मजूर, कामगार, दलित असा अवाढव्य वर्ग मोडतो. यात ब्राह्मणही येऊ शकेल व महारही. ज्यांची स्थिती साधारणपणे खाऊन पिऊन सुखी असते असा समाज आणि त्याहीपेक्षा आपल्या पैशाने इतरेजणांना लगाम लावून आपल्या कह्यात ठेवू पाहणारा समाज बहुजनसमाजात मोडत नाही. या विशिष्ट समाजात काही विशिष्ट वर्गाचे लोक प्रामुख्याने मोडत असतील व त्यांना बहुसंख्य बहुजन समाजाच्या पुनरुत्थानाचे शल्यही बोचत असेल. त्यांनी बहुजन समाजाची आपल्या पकडीची कसलीही व्याख्या करून, सुधारणेचा अथवा पुढारीपणाचा पुळका आणला तरी हा डाव न उमगण्याइतका पीडित पण अज्ञानी असलेला बहुजन समाज भोळा राहिला नाही. तो असमर्थ असेल पण शरणार्थी नाही. तो भिकारी असेल परंतु फेकून दिलेली भीक चाटणारा नाही, तो लाचार असेल परंतु आपली नीती सोडणारा नाही.

**सेवाच मानवी धर्म**

अशा दग्ध बहुजनसमाजाची सेवा करण्याचे प्रत्येक धर्मातील, प्रत्येक पक्षातील, प्रत्येक जातीतील समर्थ इसमाचे आद्य कर्तव्य आहे. परिस्थिती चिताळून वाट दाखविणारा ज्ञानेश किंवा एकनाथ, सेवाधर्म स्वीकारून सेवेचे मोल स्पष्ट करणारा चोखोबा किंवा तुकाराम बहुजनसमाजाची सोयीची व्याख्या करून कर्तव्यकर्म करीत बसला नाही. आपल्यासारखे इतरांचे आत्मे आहेत. पण जे विव्हळत आहेत, त्यांना मानवीधर्माने आंजारून गोंजारून सुख शांती देण्याचे कार्य करणे, याचेच नाव ' सेवा ', हाच मनुष्याचा जीवितधर्म. याच व्यापक व खऱ्या अर्थाने त्यांनी बहुजनसमाजाची स्वतः प्रहार सहन करून सेवा केली, पूजा केली, त्या वेळी राष्ट्र परतंत्र होते. आज स्वतंत्र आहे. अर्थात त्याकाळच्या आपल्या थोर व पुण्यश्लोक पूर्वजांचे हृदयपूर्वक स्मरण करून, स्वातंत्र्यात राष्ट्रवंचित असलेला बहुजनसमाज होईल त्या उपायाने, करता येईल त्या मार्गाने, देता येईल त्या बलिदानाने समर्थ करून राष्ट्र अभेद्य, बलशाली व गौरवपूर्ण करावयास पाहिजे.

**बहुजनसमाजाचे मूल्यमापन**

साधारणतः बहुजनसमाजाच्या व्याख्येचे मूल्यमापन करण्याचे गमक तसे सोपे आहे. आगगाडीच्या तिसऱ्या डब्यात अथवा चित्रपट, नाटकगृहाच्या तिसऱ्या वर्गात कोणता समाज असतो ? जात, धर्म व पक्ष पाहून का या वर्गात बसावयाचे असते ? आणि पहिल्या वर्गात बसणारा वर्ग तरी काय उद्गारतो, ' काय तिसरा वर्ग ? After all it is third Class, All third Class people

are there आणि म्हणूनच गांधीजींनी प्रवासात तिसऱ्या वर्गाच्या डब्यात का बसावयाचे ते उलगडते. अशा वेळी मला बहुजनसमाजासंबंधी कै. विश्वकवी रवीन्द्रनाथ टागोर यांनी एका प्रसंगी उच्चारलेले मार्मिक शब्द स्मरतात, ' I can see very few in first rank..., but I am in dark for the nation ' म्हणजे ' पहिल्या रांगेत कोण झळकतात ते मी पाहू शकतो... परंतु मी राष्ट्रात नाही, अंधारात आहेसे वाटते.'

**बहुजनसमाज व लेखकाचे कर्तव्य**

अशा प्रकारे दलित असलेल्या, अंधारात तडफडत असलेल्या बहुजनसमाजाची सेवा करता येण्यासारखी आहे. हृदय स्वच्छ ठेवून सेवेची खरी कळकळ, तळमळ मात्र पाहिजे. त्या वेळी कोण कुठला, कोण कोणाचा असा भेद जराही नसावा. उद्याचे तेजोमय, प्रभावशाली, स्वयंपूर्ण राष्ट्र याच बहुजनसमाजाच्या उन्नतीवर पूर्णत: अवलंबून आहे. प्रत्यक्ष कृतीबरोबर लेखणीने केली जाणारी त्यांची सेवा ही आज अत्यावश्यक आहे. आज अनेक प्रकारचे वाङमय प्रसृत होत आहे. त्यांना आपल्या सामर्थ्याचे प्रतिबिंब आपल्या वाङमयनिर्मितीच्या शुद्ध व स्वच्छ आरशात न्याहाळता येऊन ' एकमेका करू साहाय्य अवघे धरू सुपंथ ' अशा वाणीत त्यांचा राष्ट्राभिमान प्रज्वलित झाला पाहिजे, जीवन जगविण्याची आशा निर्मून त्यांचा कर्तव्यमार्ग आक्रमिता आला पाहिजे, अशी सेवा-स्वरूपी लेखणी कामी आणण्यात पत्रकारांनी, कवींनी, लेखकांनी अहमहमिकेने पुढे सरसावले पाहिजे. त्यामुळे कदाचित बाजार साधता येणार नाही पण हृदय मात्र साध्य करता येईल, हे खास.

**रामराज्य कोणते ?**

आम्हाला रामराज्य पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला जीवनात ' राम ' असल्याचे वाटावे, असे असायला हवे. लोकरंजनार्थ म्हणजे समाजाच्या कल्याणार्थ ज्या रामाने गर्भवती पत्नीचा-सीतेचा त्याग केला त्या रामाच्या राज्याबद्दल आजची आधुनिक जनता साशंक राहू शकेल पण ' मरा 'चा ' राम ' साध्य करून वाल्या कोळी वाल्मीकी ऋषी झाला व ' वाल्मीकी-रामायण कर्ता ' बनला, त्या अर्थाने कल्याणकारी राज्य या स्वतंत्र भारतात होणे कोणता राष्ट्राभिमानी मान्य करणार नाही ? परंतु त्याला त्यागाची फार गरज आहे. कोणी मला मानेल, कोणी मला काही देईल म्हणून नव्हे तर ते माझे कर्तव्य आहे. ' मी मरेन पण माझा बांधव मी तारीन, मी माझे राष्ट्र तारीन, ' या भावनेने तो समाजात तळपला पाहिजे. त्याचप्रमाणे अन्न-वस्त्रांचा, संपत्तीचा व अधिकारांचा समाजातील सर्व थरांना समानतेने व न्यायाने वाटा मिळून, त्यांना जगण्यात ' जीवन ' आहे याचा प्रत्यय यावा व त्या प्रत्ययाने त्यांनी आपले राष्ट्र प्रगत व संपन्न करण्यात हिरिरीने झटावे. या खडतर कर्तव्यास्तव आम्हाला पूर्ण कस लावला पाहिजे.

त्या दृष्टीने प्रथमत: ‘आपन्नार्तिप्रशमनफला: संपदोहृचुत्तमानाम्’ या हितैषी सूत्राने पाऊल पुढे पडावे.

**माझा देव**

अगदी प्रात:काळचा समय. निसर्गाच्या प्रांगणात उतरत असलेली मोहक प्रभा. उत्साहवर्धक पवनाचा मंद-मंदसा विहार. प्रफुल्लित झालेला सबंध आसमंत, सौंदर्यशालिनी उषेचं पान करण्यात गुंगलेला. सारी दृष्टी अगदी निर्मल, अगदी स्वच्छ. हातात झरा घेऊन माळी, उद्यानातील असाहाय्य बालकांसारख्या असलेल्या अंकुरांना जीवन देत असलेला. झऱ्याला असलेल्या गोलकाच्या छिद्रातून तुषारणारं—सजीव करणारं जल अंकुरावर पडत असल्यानं माळ्याकडे लागलेली त्यांची कृतज्ञदृष्टी. माळ्याचा दुसरा हात नुकताच उमलणाऱ्या भाबड्या कळ्यांना गोंजारीत असलेला. एक हात कर्तव्याचा आणि दुसरा भावनेचा. कर्तव्य अन् भावना यांचा अतीव मधुर, असीम हृद्य संगम !

अल्पावकाशातच माळ्याची नजर दूरवर असलेल्या, शून्यातून दृग्गोचर होणाऱ्या क्षितिजावरील भास्करावर रोखली गेली. त्यानं दोन्ही हात जोडले. स्वर्गातील देवांनाही विनयमंत्र शिकवील इतका त्याचा अदब भाव होता. कर्तव्याची जाणीव करून देण्यास उदयमान होणाऱ्या सूर्यास प्रणाम करताना तो केवळ एकच क्षण. पण या क्षणाची केवढी महत्ता, केवढं मोल !

माळ्यानं मान खाली वाकविली, आणि आर्जविलं, ‘प्रभो !’ इतक्यात त्याचा लहान मुलगा दुडदुड धावत त्याच्याजवळ आला अन् त्यानं हाक दिली, ‘बाबा’. बापानं मुलाला कडेवर घेतला. त्याचे चिमुकले हात आपल्या हातात जोडले आणि त्याच्या पाठीवर ममतेचा हात फिरविला. माळी, आणि त्याचं श्रेष्ठत्व. भावना आणि कर्तव्य यांची प्रखरतेनं जाणीव करून देणारा निसर्गभक्त माळी म्हणजे, खरा माणूस. देव आणि देवत्व यासंबंधी तो अनभिज्ञ नाही कारण तो आपल्या कर्तव्याला ओळखून वागतो. तो भावनेत वाहून जात नाही. त्याला वाटतं भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे.

मी माळ्याजवळ गेलो. त्याला नमस्कार केला आणि म्हटलं, ‘माळी दादा, तुझं कार्य फार मोठं आहे. देव आणि देवपण तूच शिकवू शकतोस. तू धन्य आहेस !’

आम्रवृक्ष फलभारानं नम्र झाला होता. ‘ही माझी कृती’ माळी उद्गारला. अंकुर आणि हा बालक मला सारखाच. अंकुर कोमेजू नये, याची सारखी वाढ व्हावी. तो सदैव टवटवीत असावा आपल्या सौंदर्यानं त्यानं इतरांना आनंद द्यावा आणि आपल्या मधुर फळांनी त्यानं दुसऱ्यांची तृप्ती करावी हाच हेतू परिपूर्ण करण्यास मी झटतो, माझं खरं कर्तव्य आहे ते. हीच माझी सेवा, हाच माझा धर्म व हेच माझं राष्ट्रकार्य. माझी देवप्राप्ती इथेच आहे, स्वर्गसुखाचा लाभ मला येथेच मिळतो. चुकून

जर अंकुरवाढीत मजकडून कसूर झाला तर भारीच दुःख होतं मला. मुलाचं दुःख पाहून जेवढ्या वेदना मला होत नाहीत तेवढ्या वेदना या अंकुराची म्लान दशा पाहून होतात. कालांतरानं असा भव्य वृक्ष झाला व तो आपल्या शीतल छाये-खाली पांथस्थांना आश्रय देऊ लागला की आटोपलं माझं कर्तव्य. अन् दादा, माझा देव माहीत आहे का तुम्हाला ? हे बघा, असं म्हणून त्यानं झरा हाती उचलला. काय थोरवी ही !

**माळ्याला त्याचा देव गवसला, पण मला ?**

माळ्याची दिव्य कृती हृदयात कोरून मी जाऊ लागलो. मार्गावरील एका भव्य इमारतीच्या गच्चीवर उभा राहून एक धनवान तुळशीला पाणी देत होता. हातातील पाणी वृन्दावनावर पडत होतं अन् त्याची पापी नजर रस्त्यानं जाणाऱ्या तरुणीवर खिळली होती. केवढा उपहास होत होता देवदेवतांचा ! दिवसभर लबाडी करावी, गरिबांना फसवावं, अनैतिक आचरण करावं आणि मारुतीला नारळ फोडावा, सत्यनारायणाची पूजा करावी नि म्हणावं, 'देवा मला शक्ती दे— माझं वैभव वाढव— माझं रक्षण कर !' ही आजची देवावरील श्रद्धा ! कर्तव्य नाही, सद्‌भावना नाही, सेवा नाही पण देवभक्तीचा असला हा भाव आहे. खरोखरीच काय देव त्यांना क्षमा करणार ? त्यापेक्षा पूजाअर्चा केली नाही, अनेक देवांची नामावली उच्चारली नाही म्हणून कोणी देवभंजक म्हटले, श्रद्धावान नाही म्हटले तरी पुरविले. कुठे दरिद्री पण अस्सल देवभक्त माळी अन् कुठे हा धनवान पण पापी भगत !

देव–देव–देव जगात देवच मुळी नाही. हृदयच साफ नाही तर देव कुठला ? आणि ती पूजा तरी कसली ?

शिशुवर्गात दाखल झालो तो त्या लहान लहान बालकांनी उभं राहून माझं स्वागत केलं. किती वरमलो मी ! त्यांनी मला 'गुरू' मानले. गुरू ? छे छे, मी कसला गुरू ? जिथे माझे व्यवहार खोटे आहेत, जिथे माझी वाचा अशुद्ध आहे, जिथे माझी वागणूक फसवणुकीची आहे तिथे मी त्या पवित्र निर्विकार बालकांचा गुरू कसा ? डोकं सुन्न झालं ! सचिंत बसलो. एका बालकानं माझा ध्यानभंग केला. त्यानं तक्रार केली. म्हणाला, 'गुरुजी, पाहा किसन काय खातो ते.' मी किसनला बोलाविलं आणि म्हटलं, 'काय खातोस बाळ ? तो चटकन् उत्तरला, 'खोबलं.' उत्तर देताना त्याचा चेहरा किती निरागस, किती निर्भय होता ! त्यानं खिशातून खोबऱ्याचा एक तुकडा माझ्या हातावर ठेवला. मी विचारलं, 'कुणी दिलं खोबरं तुला ? ' त्याचा चेहरा एकदम उतरला. तो म्हणाला, 'माई मालते. खायला नाही देत. बाबानं पूजा केली. नालल फोल्ला. मी खोबलं घेतलं न् पलालो.'

'अरेरे बाळ, देव रागावेल. तुझ्या आईबापास वाईट वाटेल. चोरी करू नये. फार वाईट गोष्ट आहे ही,' मी त्याला उपदेश केला. हे बोलताना कसं जीवा-

वर आलं होतं माझ्या ! मन आतून डिवचत होतं— उपदेश करायचा तुला हक्क काय ?

पण तो बालक हसला. त्याचं ते हसणं किती उपहासात्मक वाटलं मला. तो मला बिलगला आणि म्हणाला, ‘ गुरुजी कुथं आहे देव ?’

‘ तुझ्या बापानं पूजा केली ना, तोच तुझा देव ?’

‘ नाही गुरुजी, तो माझा देव नाही. तो दगलाचा देव आहे. त्याला शेंदूल लावतात. तो बोलत नाही. त्याला हातपाय नाही. त्याच्यावर कोंबला बकला कापतात.’

‘ मग कुठं आहे तुझा देव ?’ माझ्या प्रश्नावर तो खदखदा हसला. मी विस्मयानं त्याच्याकडे पाहिलं. तो म्हणाला, चला गुलुजी, मी देव दाखवतो.

तो पुढे झाला. मी त्याच्या मागोमाग जाऊ लागलो. तो एका देवळाच्या गाभाऱ्यात शिरला आणि खूप जोरानं ‘ ओ ’ असा त्यानं आवाज काढला. ‘ ओऽ ऽ ’ असा प्रतिध्वनी आला. बालक आनंदून मला म्हणाला, ‘ पाहा गुलुजी, देव बोलतो.’

मी म्हटलं, ‘ अरे हा तर तुझा आवाज आहे.’ बालकाला कोडे पडले असावे की गुरुजीला आता कसे समजावून सांगावे ? तो त्या ओबडधोबड दगडाच्या मूर्तीला टेकून मला म्हणाला, ‘ गुलुजी, आता तुम्मी ओलडा.’

‘ ओ ऽ ऽ ’ मी आवाज काढला. प्रतिध्वनी आला ‘ ओ ऽऽ ’. बालक मजकडे धावत येऊन म्हणाला, ‘ पाहा गुलुजी देव बोलला.’

‘ अरे हा माझा आवाज आहे.’

‘ बलोबल आहे. माझा आवाज माझा देव. तुमचा आवाज तुमचा देव.’ बालकाचा हा निर्णय ऐकून मी थक्क झालो. लहानसा तो बालक. पण त्याच्या निर्णयाचं सार केवढं मोठं ! बालकाच्या त्या आवाजात मला देववाणी आढळली आणि माझ्या वाणीत ? – माझा देव ?

रात्री झोपलो असताना मला एक स्वप्न पडलं. शुभ्रवस्त्र परिधान केलेली एक तेजस्वी मूर्ती माझ्यासमोर प्रकटली. ती गंभीरपणे मला म्हणाली, ‘ भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे. कर्तव्यात त्याग पाहिजे. त्यागात समाधान पाहिजे.’

‘ पण मी तर फार गरीब आहे, मला हे कसे जमेल ?’

‘ तू देवाला शरण जा.’

‘ परंतु माझा देव कुठं आहे ?’

माझ्या डोक्यावर हात ठेवीत ती उद्‌गारली—

‘ तुझं पवित्र मन तुझा देव आहे. त्याला विचार आणि पाऊल पुढे टाक. तुझा मार्ग तुला सापडेल !’

**राष्ट्रसिद्धीचा यज्ञ**

प्रत्येक मनुष्य सुखी जीवनासाठी सारखा धडपडत असतो. स्वतःच्या आनंदासाठी तो दुसऱ्याचे दुःख नजरेआड करतो. अशी प्रवृत्ती निर्माण झाली की

विषमतेच्या ज्वाळा उफाळू लागतात. आपापलं भलं पाहण्याच्या ह्या संघर्षात मनुष्य आपली रीत सोडतो. रीत सुटली की मानवी धर्माची दोरी गंजते आणि ती एकदा तुटली की मनुष्यत्व म्हणून काही उरत नाही. याचे नीट निदान अर्ध्या शतकापूर्वी स्वामी विवेकानंद यांनी केले आणि त्यांनी सर्व मनुष्यजातीच्या अधःपतनाचे मूळ शोधून काढले. देवादिकांच्या अवतारांनी पुनीत होऊन जगात उच्च व पवित्र असलेल्या भारताकडे स्वामी विवेकानंदांनी जेव्हा चिकित्सेने पाहिले, तेव्हा, त्यांना जी भयावह दशा आढळली आणि अवनतीच्या कडेवरील हे छिन्नविच्छिन्न चित्र जेव्हा भेडसावू लागले त्या वेळी त्यांना भारताचा प्रश्न हा ' स्त्रिया ' आणि ' अस्पृश्य ' यांचा प्रश्न आहे, असे स्पष्ट कळून आले. त्या क्षणापासून त्यांचा आत्मा हा प्रश्न हिरिरीने सोडविण्याचे कामी लागला.

**वाटेत कुठेही थांबू नका**

भारतात अनेक थोर पुरुष झाले. साधू, संत, काही पुण्यशील राजे आणि काही अस्सल देशभक्त. त्यांनी भारतीय संस्कृती आणि धर्म अबाधित ठेवण्यासाठी आत्मदान केले. पण पुढे, भारतीयांच्या दुफळीमुळे आणि परकीयांच्या पाशवी सत्तेमुळे परिस्थिती विसकटू लागली. एकोणविसाव्या शतकाच्या मध्यकाळी तर तिने भयंकर उग्र रूप धारण केले. मोगलशाहीचे घट्ट होत गेलेले पाश आणि नंतर इंग्रजांचा करडा अम्मल भारतीयांना गुलामीचे गुलाम करीत गेला. राष्ट्राभिमान संस्कृतिप्रेम आणि धर्मनिष्ठा लोपू लागली. उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरीऐवजी उत्तम नोकरी (गुलामी) धरसोडीचा मध्यम व्यापार व कनिष्ठ शेती असा प्रकार झाला. अशा अवस्थेत स्त्रिया आणि दलित यांचा प्रश्न तो कुठला ? स्वतंत्र विचाराला वाव नाही, राष्ट्रकार्याला जागा नाही तेव्हा लोकजागृतीचे कंकण कोण बांधणार ? परकीयांच्या खंजिराखाली भारतीयांच्या माना वाकल्या होत्या. याही बिकट स्थितीत भारतीयांचे रक्त आटले नव्हते. काहीत ते सळसळत होते. काहीत ते संथपणे वाहत होते. त्यामुळे आतून का होईना दोन प्रवाह वाहू लागले. राजकारण आणि धर्म. स्वामी विवेकानंदांनी दुसरा मार्ग स्वीकारला. धर्माच्या नावाखाली त्यांनी तत्त्ववेत्त्यांची चिलखते अंगावर घातली. नीतीची ढाल हाती घेतली आणि विचारांची तलवार घेऊन अखिल जगाच्या आंगणात ते मांडी थोपटून उभे राहिले. कार्याला लागताना एक वाक्य मात्र त्यांनी हृदयावर कोरून ठेवले, ' तुझे नष्ट झालेले साम्राज्य तू पुन्हा मिळव. ऊठ, उभा राहा आणि मुक्कामाला पोहचेपर्यंत वाटेत कोठेही थांबू नकोस.'

**भारताच्या विजयाचे मर्म**

स्वामी विवेकानंदाच्या त्या दूरगामी पण ज्वलंत विचारसरणीत तत्त्वज्ञान, व्यवहार आणि धर्म यांचा प्रभावी, उत्तेजक मेळ आढळून, त्यांनी पाश्चात्यांच्या सैतानी आमदनीत आपल्या देशबांधवांना कसे जागृत आणि कर्तव्यप्रेरित केले हे

स्पष्ट होते. समाजातील विस्कळीतपणा, आपपरभाव, विचारातील न्यूनगंडता आणि भ्याडवृत्ती यांचा खरपूस समाचार घेऊन त्यांनी भारताला चैतन्यमय केले. त्यांचे त्या काळचे विचार आजही उपयुक्त आणि भरीव स्वरूपाचे वाटतात. दादाभाई नौरोजी, लाला लजपतराय, राजा राममोहनराय, पंडित मालवीयजी, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी प्रभृती नेत्यांनी राष्ट्रासाठी जे अविश्रांत श्रम घेऊन जनतेला व भारताला सचेतन केले त्याच प्रभावळीत स्वामी विवेकानंदांचे कार्य तितकेच उठावदार, ठसठशीत आणि हृदयाविष्कार करणारे होते.

स्वामीजींच्या कार्याची यशस्विता केवळ भारतापुरतीच मर्यादित नव्हती तर तिने अखिल जगाला दिपवून टाकले होते. भारताचा धार्मिक आणि सांस्कृतिक उच्च दर्जा सिद्ध करण्यासाठी स्वामीजींनी जगभर प्रवास आरंभिला होता.अमेरिका व ब्रिटन येथे तर त्यांनी हिंदभूचे वैभव असे उभे केले की तेथील जनता पुण्यपावन भारताच्या वर्णनाने भारून गेली. ' हिंदुस्थानने इतर देश जिंकण्याची अभिलाषा बाळगली नाही– अशी अभिलाषा बाळगण्याचा हिंदवासीयांचा धर्म नाही, तर न्यायनीती आणि ईश्वर व धर्म यात भारताचा प्रत्येक नागरिक उच्च आणि पवित्र आहे,' हाच उपदेश त्यांनी इतर राष्ट्रांना करून त्यांची मने भारतनिष्ठ केली. कोणी न केलेली ही जाज्वल्य कामगिरी प्रथमतः स्वामीजींनी केली आणि यातच त्यांचे मोठेपण समाविष्ट आहे.

**स्त्रिया आणि दलित यांचा प्रश्न**

स्वामी विवेकानंदांना अधिक डिवचीत होता तो स्त्रिया आणि दलित यांचा प्रश्न. दलितांचा उद्धार होऊन समाजात त्यांना मानाचे स्थान असावे यासाठी त्यांचा आत्मा तळमळत होता. ते म्हणत, ' अस्पृश्य इतर वर्गांना भिऊन वागतात. हातून कसूर घडू नये म्हणून दक्षता बाळगतात. आपले कर्तव्यकर्म इमाने इतबारे बजावतात. याच लोकांच्या सेवेवर राष्ट्राची इतर कामे सुरळीत चालतात. अशा लोकांना नीचाप्रमाणे वागवून पायाखाली तुडविण्याचा उच्चवर्णीयांनी प्रयत्न करणे भयंकर निंद्य आहे. असाच काळ राहिला तर भारताला स्वातंत्र्य लाभले तरी तो उन्नत होणार नाही.' स्त्रियांसंबंधी स्वामीजी उद्‌गारतात, ' पुरुष स्त्रियांवर सत्ता गाजवू पाहतात. त्यांना गुलामाप्रमाणे वागवितात. किती अधमपणा आहे हा ! स्त्रिया आहेत म्हणून मनुष्यत्व आहे. पण त्या अबला नाहीत, सबला आहेत. त्यांची कर्तृत्वशक्ती पुरुषांपेक्षाही दांडगी आहे. पण लक्ष कोण देतो ? त्यांच्या सुखदुःखाचा साक्षेपाने कोण विचार करतो ? आता स्त्रियाच आपला प्रश्न सोडवतील. आपले हक्क त्या स्वतःच मिळवतील. स्त्रियांमध्ये असलेल्या दैवी अंशाला कुणी फसवील असे तुम्हाला वाटते काय ? हा दैवी अंश कधीच फसला नाही व फसणार नाही.'

'पावित्र्य म्हणजे काय हे आपल्या हिंदू स्त्रियांना सहज कळते. कारण तो त्यांचा आनुवंशिक गुण आहे. तेव्हा आदर्श म्हणून ते पावित्र्य सर्वाआधी त्यांच्यात विशेषत्वाने एकजीव झाले पाहिजे. म्हणजे अशा पवित्र चारित्र्याच्या जोरावर आयुष्यातील कोणत्याही अवस्थेत, मग त्यांची लग्ने होवोत किंवा स्वखुशीने त्या अविवाहित राहोत, पावित्र्यापासून इंचभरही ढळण्यापेक्षा आत्मबळी द्यायला त्यांना मुळी देखील भीती वाटणार नाही.'

त्याचप्रमाणे समतेच्या आणि न्याय्य हक्कांच्या पुरस्कारार्थ स्वामी विवेकानंदांनी सारे वेद व पुराण पालथे घालून अनेक दृष्टांतांनी भारताला ऐक्य व बंधुत्व यांची जी जाणीव करून दिली ती अभ्यसनीय आहे. त्यांचा विशाल पण पुरोगामी दृष्टिकोन या आधुनिक काळातसुद्धा अधिक तारक आहे. भेदभावाचे व श्रेष्ठ–कनिष्ठपणाचे बुजगावणे झुगारून देऊन, राष्ट्र एकसंध व अभेद्य कसे निर्माण करावे याची योग्य दखल घेऊन, स्वामीजी म्हणतात...

'समता उत्पन्न होण्याकरिता आपण केलेल्या अनेक खटपटींचे अत्युच्च फळ म्हटले म्हणजे विशेष हक्क नाहीसे करणे हे होय. आपणापुढे जे काही कार्य आहे ते हेच. समाजातील एखादा व्यक्तिसमूह बाकीच्या व्यक्तींहून बुद्धिमत्तेने श्रेष्ठ असेल पण एवढ्याकरिता बाकीच्या समाजातील साऱ्या घटकांचे शरीरस्वास्थ्यसुद्धा त्याने हिरावून घ्यावे हा कुठला न्याय ? दुसरे कित्येक लोक जन्मतःच द्रव्यदृष्टी असतात. पैशाचे दोन पैसे कसे करावे ही अक्कल इतरांहून त्यांना अधिक असते. पण जवळ चार पैसे अधिक झाल्याबरोबर गोरगरिबांस खुशाल तुडविण्याचा हक्क त्यांस प्राप्त होतो काय ? हे कर्म नीतीला सोडून असल्यामुळे श्रीमंत आणि गरीब यांच्यातील तेढ सांप्रत विकोपास जाऊ पाहत आहे. या सर्व गोष्टींचा नीट विचार करून सर्व समाज समसमान हक्काने वागला पाहिजे. त्याशिवाय भारत बलशाली होणे शक्य नाही.'

**आधी मुक्काम गाठा**

सुमारे अर्धशतकापूर्वी स्वामी विवेकानंदांनी केलेले महनीय कार्य आणि त्यांचे तेजस्वी विचार यांचा आज साकल्याने विचार करणे व तसे पाऊल पुढे टाकणे प्रत्येक भारतवासीयाच्या कल्याणाचेच आहे. महात्मा गांधींच्या काय किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अवतारकार्याचीसुद्धा आपल्याला हीच शिकवणूक आहे. पूर्वी अपूर्ण राहिलेले कार्य स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पूर्ण करून दाखविण्याची संधी प्राप्त झाली आहे. राष्ट्रसिद्धीचा हा यज्ञ आहे. पण खेदाची गोष्ट ही आहे की राष्ट्रकार्यसिद्धीपेक्षा आम्ही स्वार्थकार्यसिद्धीच्या आहारी आपले स्वत्व नष्ट करीत आहोत. सहकार्याच्या आणि परस्पर हिताच्या सद्भावनेपेक्षा नसतील ते वाद उकरून आम्ही स्वदेशाशी एक प्रकारे प्रतारणा करीत आहोत. तेव्हा राष्ट्राची महत्ता व स्वकर्तव्याची जाणीव करून न घेता आपापसात दुफळी, भेदभाव व मत्सर करू लागलो तर हाती लाग-

लेले स्वातंत्र्याचे मधुर फळ गमावून आपल्या देशाला खोल गर्तेत लोटल्याचे घोर पातकच लागणार नाही तर, आपला पूर्ण अध:पात होईल. तरी, आपल्याला वेळीच सावध होऊन, राष्ट्रकार्यसिद्धीच्या यज्ञास्तव कुठेही न थांबता स्वामी विवेकानंदांच्या शब्दांत आपला मुक्काम गाठला पाहिजे.

□ □ □

# २.

# सेवा आणि आत्मदान

मनुष्य हा कर्तव्यनिष्ठ असला पाहिजे. जे कार्य तो अंगीकृत करतो त्याची परिपूर्ती करण्यासाठी त्याने सदैव जागरूक असायला पाहिजे. कोणतीही गोष्ट करायला मनुष्य प्रथमतः एक काल्पनिक चित्र नजरेपुढे ठेवतो व मग साध्यासाठी तो धडपडू लागतो. पण कोणतेही उदात्त ध्येय राबल्याशिवाय, चटके सहन केल्याशिवाय किंवा स्वार्थत्याग केल्याशिवाय सहसा साध्य होत नाही. 'सेवा करणे' हे मनुष्यमात्राचे सर्वात उच्च ध्येय आहे. परंतु हे ध्येय पूर्णतः निभवण्यासाठी आत्मदान करावे लागते.

**लोकहितवादी सेवकाची अवहेलना**

अलीकडे आम्ही सेवक आहोत असे म्हणणाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे. सेवा ही इतकी सोपी गोष्ट आहे असे त्यांना वाटते. दिखाऊपणा करून 'सेवकाची' भूमिका वठविणारे अनेक लोक समाजात वावरताना दिसतात तेव्हा प्रामाणिक व निःस्वार्थी सेवकाला साहजिकच दुःख होते. कारण हा खरा सेवक पुढारीपणाचा मक्ता घेऊन आपल्या नावाची भडक जाहिरात करवून घेणाऱ्या नामधारी सेवकांच्या दडपणाखाली चेंगरून जातो. वस्तुस्थिती ओळखून वास्तविक सेवेचे मूल्यमापन करण्याची समंजस दूरदृष्टी जनतेत नसल्यामुळे सर्वस्वाची राखरांगोळी करणाऱ्या लोकहितवादी सेवकाची अवहेलनाच झाल्याची अनेक दृश्ये पाहावयास सापडतात. त्यामुळे अंतःकरणापासून सेवाधर्म पाळणारी व्यक्ती ओळखणे आज तरी मोठे दुष्कर झाले आहे.

**सच्छील सेवकांची आवश्यकता**

आज पैसा आणि सेवा असे समीकरण आहे. ज्याच्याजवळ पैसा असेल व

जो त्याच्या बळावर अधिक पैसा कमवून लोकांना भुरळ घालील असे धोरण ठेवील तो सेवक असा एक जोराचा प्रवाह वाहू लागला आहे आणि जो निष्कांचन असूनही लोकसेवेसाठी तळमळत असेल तो मतलबी आहे असा समज पसरू लागला आहे. म्हणजे आज हृदयापेक्षा पैशाने मोलाने घेतलेल्या सेवेला महत्त्व चढले आहे. पण आता ह्या सेवकाच्या चलाखीला ओळखून जनतेने सावध व्हायला पाहिजे. स्वतंत्र भारतात सच्छील आणि निर्व्याज सेवकांची अतिशय गरज आहे. अशाच सेवकांच्या बळावर आपणांस आपले राष्ट्र बलशाली आणि वैभवशाली करावयाचे आहे.

**आत्मदान हे सेवेचे मुख्य गमक**

आत्मदान हे खऱ्या सेवेचे मापन आहे. हृदयाला हृदय भिडविणे हे त्या सेवेतील मर्म आहे. कसलाही भेदभाव न बाळगता प्रसंगी दुसऱ्याला हात देऊन सावरणे हे सेवाधर्माचे खरे इंगित आहे. पांढऱ्या कागदावर उरफाटया तिरफाटया रेघोटया ओढल्याने सेवा साधत नाही. लोकांचा पैसा लुबाडून दान केल्याचे सोंग धारण केल्याने सेवा पदरी पडत नाही. पुढारीपणाचा आव आणून मानासाठी हपापल्याने सेवा पावन होत नाही. हृदयाचे दान—आत्म्याचे दान हेच सेवेतील मुख्य गमक आहे आणि ह्याच गमकाच्या अनुरोधाने जो जर्जर होऊनही आनंद व्यक्त करतो त्याचीच सेवा खरी सेवा आहे.

**सेवेसाठी हृदय हवे हृदय**

सेवा थोडया फार प्रमाणात सर्वांनाच साध्य करता येते. पण त्यासाठी हृदयात ओलावा पाहिजे. हा ओलावा म्हणजेच सहानुभूती होय. कोणी मोठा अधिकारी असो किंवा कोणी पाथरवट अथवा ओझे वाहणारा हमाल असो. त्यांचे परस्पर संबंध आपुलकीने बांधलेले असावेत. प्रत्येकाच्या कार्यात प्रामाणिकपणा असला तर कोणतेही काम व्यवस्थित आणि सरळसे होते. मालकाने नोकराकडे सहानुभूतीने पाहिले तर नोकर उल्हासाने आपले कर्तव्य पार पाडतो. मजुराला त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळाला तर तो आपले काम अधिक चांगले करण्याचा प्रयत्न करतो म्हणजेच पर्यायाने एकमेकांबद्दल सहानुभूती वाटून परस्पर सेवा घडते. काही लोक सेवेचा अर्थ व्यासपीठावरून व्याख्यान दिले किंवा खेडयापाडयात केवळ भ्रमण केले म्हणजे आटोपले असा करतात, परंतु असे नाही. ज्या मनुष्याकडे जे काम असेल ते त्याने कितपत इमाने इतबारे बजावले, त्यात तो इतरांच्या कामी कितपत आला, त्या वेळी त्याची वागणूक कशी होती आणि त्याने जे काम केले त्यात त्याला किती सात्त्विक आनंद झाला यावरून त्याची सेवा कशी होती हे कळून येण्यासारखे आहे. काही लोक म्हणतात की आम्ही सरकारी नोकर आहोत तेव्हा आम्ही सेवा ती काय घडविणार ? पण असे म्हणणे चुकीचे आहे. सरकारी नोकरावर अधिक जबाबदारी आहे. त्याच्या वाटयाला आलेले काम त्यांनी वेळच्यावेळी करून आपले कर्तव्य चोखपणे बजावले आणि आपल्या संबंधात येणाऱ्या व्यक्तींशी माणुसकीचे

वर्तन ठेवले तर हीदेखील काही कमी सेवा नाही. हाताखालच्या माणसावर थोडा आपुलकीचा हात फिरविला तर बारीकसारीक कामे करणारी ही माणसे आपल्या वरिष्ठांची आज्ञा प्रामाणिकपणे पाळण्यास जागरूक असतात. अरेरावीचे धोरण सेवेला तर पात्र होत नाहीच पण उलट व्यक्तित्व नष्ट करायला मात्र कारणीभूत होत असते आणि मग परस्परातील सद्भावना दुरावली जाऊन वातावरणात बिघाड होतो. ह्यास्तव सेवा साध्य करायला हृदयच पाहिजे.

**प्रसंगी सेवेची कसोटी**

सर्वसामान्य व्यवहारांतही मनुष्याची वागणूक सुज्ञपणाची आणि परोपकार प्रवृत्तीची असणे अत्यावश्यक आहे. एक दुसऱ्याशी जसा व्यवहार ठेवतो तसा दुसराही त्यांच्याशी तसाच व्यवहार राखतो. श्रीमंत असो की गरीब असो, व्यवहारात सर्वांनाच अडचण असते. कोणावर केव्हा कसा प्रसंग येईल हे सांगता येत नाही. तेव्हा श्रीमंताने आपले कोण काय बिघडवितो किंवा जगात आपल्याला उणीव ती कसली, अशी घमेंड बाळगून व्यवहार ठेवले म्हणजे त्याला आयुष्यात धोका नाही असे नाही. म्हणून एकमेकांची अडचण समजून घेऊन शक्य ते साहाय्य करण्याची वृत्ती प्रत्येकाने अंगी राखली पाहिजे. पण व्यवहारात सत्प्रवृत्तीचा अभावच आढळतो. प्रत्येक जण स्वतःच्याच भल्याचा विचार करतो. आणि इतकेच नव्हे तर दुसऱ्याला कसे फसविता येईल व आपली पोळी कशी पिकेल याचाच अधिक विचार केला जातो. पण तो दाखविताना असेच भासवितो की जणू आपण दुसऱ्याच्या कल्याणासाठी सर्व काही करतो. परंतु असली रीत व्यवहारात फार दिवस टिकत नाही आणि मग एखादे दिवशी त्याची सर्व क्लृप्ती उघडकीस येऊन त्याचे सर्व व्यक्तित्व नष्ट होते. वस्तुतः व्यवहारात एकमेकांच्या उपयोगी पडण्याची सेवा ही फार मोठी सेवा आहे. खऱ्या आत्मदानाचे प्रत्यंतर प्रसंगाच्या वेळीच पाहावयास सापडते.

**परस्परांचे दुःख जाणले पाहिजे**

पण, आम्ही आपला साधा शेजारधर्मही पाळू शकत नाही. शेजारी कोणी आजारी असला तर निदान त्याची चौकशीसुद्धा करणे आमच्याकडून होत नाही. इकडे लोकसेवक मात्र म्हणवून घेतो. आपल्याजवळ चार पैसे अधिक आहेत अन् दुसरा अतिशय संकटात सापडला आहे तर आपल्या ह्या चार पैशांतून एक पैसुद्धा त्याच्या कामी आपल्याला आणता येत नाही. उलट खोटा बहाणा करून त्याची अवहेलना मात्र करतो. दिसायला ही गोष्ट फार साधी असते पण पुढे ती उग्र रूप धारण करते हे आम्ही विसरतो. पैशाची गोष्ट सोडा पण निदान हृदय तर कामी आणता येते ना ! दुसऱ्याच्या आजारात किंवा अडचणीत थोडा वेळ दिला किंवा थोडी मेहनत घेतली तर काय ही कमी सेवा आहे ? परंतु इतकीशी साधी गोष्ट तरी आम्ही करतो काय ? आपण दुसऱ्यासाठी मात्र काही करायचे नाही पण दुसऱ्याकडून मात्र चांगलेपणाची अपेक्षा बाळगावयाची हा कुठला न्याय आहे ?

पण खरा सेवक स्वतःवर आलेला प्रसंग सहन करूनही दुसऱ्यावर आलेल्या प्रसंगात मदत करण्यास सरसावतो. परंतु ह्या अस्सल सेवकाची कदर कोणाला आहे ?

**सेवा जनमान्य असावी**

मी रस्त्याने जात आहे आणि मला अपघात झाला. काही पोशाखी बघे नुसते पाहत आहेत. पण वाटेवरचा भिकारी मात्र मला सावरतो. माझ्या तोंडात पाणी टाकतो. माझा श्रीमंत स्नेहीसुद्धा निमूटपणे बघतच राहतो. अशा वेळी मला कोण श्रेष्ठ वाटणार ? मग मी बड्यांना काय म्हणून नमस्कार घालणार ? समाजसेवक म्हणून कौतुकाचे काम करणारा कोणी असला तर तो समाजसेवक कसला ? खेड्यापाड्यात जनसेवा करीत असल्याची बतावणी करून आपला पुढील स्वार्थ साधणारे असे कितीतरी लोक पाहावयास सापडतात. अपेक्षेने काम करणाऱ्या सेवकांचा अभिमान बाळगता येत नाही. जनतेने त्याची सेवा मान्य केली पाहिजे. जो मनुष्य कोणत्याही गोष्टीची आस न धरता स्वेच्छेने व सरलतेने सेवा करतो ती सेवा उचित मानून जनतेने अशा सेवकाला अवश्य सहकार्य दिले पाहिजे. लोक पुढारीपणाचा आव आणून किंवा आपल्या बोलघेवड्या स्वभावाने नुसती बडबड करून ब्रह्मज्ञान पाजळतात ते सेवकच नव्हत. सेवेबरोबर आत्मदान करण्याची प्रवृत्ती ज्यांच्यात असते ते आपल्या कार्याचा गवगवा न करता आपले कर्तव्य निरलसपणे रेटत नेतात. समाजाने अशा सेवकाला ओळखले पाहिजे आणि त्याला आश्रय दिला पाहिजे.

**सेवेचे आणि आत्मदानाचे मोल**

सेवेचे आणि आत्मदानाचे मोल पैशाने किंवा अधिकार दिल्याने होत नाही. हे मोल हृदयानेच दिले जाते. आमच्या स्वतंत्र राष्ट्रात सेवेचे महत्त्व कळून जेव्हा श्रीमंत आणि गरीब, श्रेष्ठ आणि कनिष्ठ, मालक आणि मजूर हे सर्व परस्पर हिताच्या दृष्टीने विचार करून एकमेकांना साहाय्य करण्याची सत्प्रवृत्ती बाळगतील, निरपेक्ष सेवावृत्तीचे लोक खेड्यापाड्यातून अज्ञ जनतेला सुज्ञ करून त्यांची दैना नष्ट करायला कंबर कसतील आणि सरकार व जनता एका विचाराने प्रेरित होऊन राष्ट्रसेवा साध्य करतील तर आमचा देश सदासर्वदा अभिमानाने तळपत राहून जगाचे कल्याण साधण्यास तत्पर राहील.

म्हणून आम्हाला एकच पुण्यप्रद गोष्ट शिकावयाची आहे– " सेवा आणि आत्मदान "

□ □ □

---

नागपूर, ' विकास ' साप्ताहिक : ऑक्टोबर १९४९. हाच लेख पूर्व मध्यप्रदेश शासनाच्या १६ ऑक्टोबर १९४९ च्या ' प्रकाश ' पाक्षिकात प्रसिद्ध झाला होता.

# ३.

## कार्यकर्त्यांच्या मर्यादा

लोककल्याणार्थ कार्य करणारा तो कार्यकर्ता.

कार्यकर्ता म्हटला की समाज त्याच्यापासून काही अपेक्षा करतो. ती अपेक्षा पूर्ण करणे कर्तव्य ठरते. पण कार्यकर्ता बहुधा कर्तव्यनिष्ठ राहत नसल्याचे प्रत्ययास येते. त्यामुळे जनतेचा त्याच्यावरील विश्वास उडून, ती कोणतेही काम हाती घेण्याचे धाडस करीत नाही. कारण कार्यकर्ता जेव्हा काही कार्य करतो तेव्हा त्याच्या पाठीशी काही लोक असतातच. त्याशिवाय त्याला आपला हेतू साध्य करता येत नाही. परंतु पाठीशी असणाऱ्या लोकांना त्या कार्यकर्त्याच्या बाबतीत कटू अनुभव आला म्हणजे, हे लोक तो सांगेल त्या गोष्टीचे अनुकरण करावयास तयार होत नाहीत. म्हणून सर्वात महत्त्वाची पहिली गोष्ट म्हणजे कार्यकर्ता जनतेच्या विश्वासास पात्र झाला पाहिजे.

कार्यकर्त्याची भूमिका लोकसेवेची असल्यामुळे त्याच्यावर विशेष जबाबदारी असते. त्याच्या जबाबदारीचे सूत्र असे—

लोकजागृती करणे,<br>
अज्ञानाला सज्ञान करणे,<br>
संघटना निर्माण करून<br>
शिस्त राखणे,<br>
लोकजीवनाशी समरस होऊन<br>
संयमाने काम घेणे,<br>
वस्तुस्थितीची अचूक<br>
माहिती पुरविणे,<br>
प्रसंगी जनतेला दिलासा देऊन<br>
योग्य मार्गदर्शन करणे.

ह्या सूत्राप्रमाणे कार्य करणारा कार्यकर्ता समाजाला हवा आहे. त्यातून असला कार्यकर्ता पुढील बाबींच्या कसोटीला उतरला पाहिजे.

निष्कलंक चारित्र्य,
नि:स्वार्थ बुद्धी,
दु:खितांसाठी तळमळ,
ध्येयपूर्तीस्तव कळकळ,
अंगी सहनशीलता,
समतेची दृष्टी.

ह्या व्यापक दृष्टीने कार्यकर्ता जेव्हा कार्याला लागतो तेव्हाच तो पुढे केल्या जाणाऱ्या कार्यक्षेत्रातील जनतेचा मुकुटमणी होतो. जनता आपले हृदय अशा कार्यकर्त्याच्या स्वाधीन करून एका शब्दावर मरण पत्करण्यास तयार होते. पण जर का हा कार्यकर्ता मतलबी, ढोंगी आणि अप्रामाणिक निघाला तर तीच जनता त्याचे हाल हाल केल्याशिवाय स्वस्थ बसत नाही. कोणत्याही कार्यकर्त्याची भूमिका प्रथम नीट उमगत नाही किंवा त्याचे अंतरंग स्पष्ट होत नाही. पण नंतर त्याच्या कृतीचा सुगावा लागून त्याच्याबद्दल मत तयार होते. काही कार्यकर्ते सुरुवातीला असा काही दिखाऊपणा करतात की जनता त्याच्या बतावणीला बळी पडते आणि मग अनुभव आल्याने ती त्याच्याविरुद्ध बंड पुकारते.

आज तरी कार्यकर्त्यांच्या बाबतीत जनता उदासीन दिसते. तिचा त्यांच्यावरील विश्वास उडाला आहे. त्यामुळे समाजात एकसूत्रीपणा आढळत नसून गोंधळ निर्माण झाल्याचे दिसते. कारण जो कार्यकर्ता उठतो तो देशभक्तीचा पुळका आणून आपले घर समृद्ध करतो. देशासाठी किंवा समाजासाठी आत्मीयतेने आणि निरपेक्ष वृत्तीने जीवन कामी आणणारे कार्यकर्ते बोटावर मोजण्याइतकेसुद्धा नाहीत. जनतेने एखाद्यावर विश्वास टाकावा आणि त्याने तिला हुलकावणी देऊन आपले वर्चस्व कायम करावे असे अनेक प्रकार सुरू झाले आहेत. अस्सल देश-भक्त किंवा समाजभक्त रंगढंग खेळणाऱ्या कार्यकर्त्यांच्या बजबजपुरीत मान वर करू शकत नाहीत.

एका गावात एक कार्यकर्ता होता. त्या गावच्या लोकांनी त्याच्या जीवनाची सगळी तरतूद केली. कारण कार्यकर्ता आपला सगळा वेळ लोकांच्या कामासाठी देऊ लागला तर त्याला जीवनासाठी पैका हा पाहिजेच. त्याशिवाय तो प्रामाणिक-पणे काम करूच शकणार नाही. काही काळ ह्या कार्यकर्त्याने गावच्या लोकांसाठी बरेच काही केले. पण पुढेपुढे तो लोकांशी चलाखीने वागू लागला. एखादे काम पुढे करावयाचा आणि आसपासच्या गावातून बराच चंदा वसूल करायचा. लोकांनी त्याच्यावर विश्वास टाकून बरीच मदत केली. त्याने जमा केलेल्या रकमेतून काही पैसा अलगद काढून ठेवला आणि थोडयाशा पैशात अर्धवट काम करून फिरून पैशाची मागणी केली. लोकांनी तीही पूर्ण केली. असे अनेकदा घडले. कार्यकर्त्याने एक मोठी माडी बांधली. थोडी शेतजमीन घेतली. शानशोकीचे कपडे लत्ते घेतले आणि

पुढे ज्या लोकांनी त्याला मदत केली त्याच लोकांत त्याने सावकारी सुरू केली. सेकंड क्लासमधून त्याचा प्रवास सुरू झाला. आणि आता तर तो कोणाचीच पर्वा करीनासा झाला. पण लोकांचाही त्याच्यावरील विश्वास उडाला. कोणत्याही कामात त्याला सहकार्य मिळेनासे झाले. त्याचे घर समृद्ध झाले पण समाजातून त्याची पत अगदी नष्ट झाली. अशी अनेक उदाहरणे आहेत. काही लोकांनी मिळून को–ऑपरे-टिव्ह सोसायटी काढली. एका कार्यकर्त्याकडे सर्व काम सोपविण्यात आले. त्याने सोसायटीच्या मालातून घरखर्च चालविला. सहा महिन्याच्या अवधीतच त्याने एक वेगळे दुकान काढून त्यावर आपला नातेवाईक बसविला. वर्षाकाठी जेव्हा देवाण-घेवाणीची चाचणी झाली तेव्हा लोकांना भयंकर तूट आढळली. कार्यकर्त्याच्या फसवणुकीमुळे असा प्रकार घडल्याचे निदर्शनास येऊन सोसायटी बंद पडली आणि लोकांचा उत्साह मावळला. तिसरा एक कार्यकर्ता माझ्या पाहण्यात आला. गावची सुधारणा घडावी म्हणून तो एका खेडेगावात गेला. गावच्या लोकांनी त्याचे उत्सा-हाने स्वागत केले. एकाने त्याला आपल्या घरी राहायला जागा दिली. काहींनी त्याला आठवडी धान्य देऊ केले. त्याचे काम सुरू झाले. पण काही दिवसानंतर त्याने आरंभिलेला एक अनैतिक प्रकार लोकांच्या निदर्शनास आला. लोकांनी त्याला चोपून गावातून हाकलून दिले. काही कार्यकर्ते दारू पिणे किंवा जुगार खेळणे वाईट आहे, त्यामुळे माणूस माणुसकी गमावतो असा उपदेश करतात. पण हेच कार्यकर्ते नेमके ह्या व्यसनाला बळी पडल्याचे दिसतात. अशा प्रकारे कार्यकर्ते स्वतःचे स्वत्व गमावून जनतेच्या विश्वासातून उतरतात आणि व्हावे ते कार्य किंवा ध्येय साध्य होत नाही.

कार्यकर्त्यांची एक दुसरीही बाजू आहे जी लोकसेवेला विशेष कारणीभूत झालेली आहे. ह्याच दुसऱ्या प्रकारच्या प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या भरवशावर राष्ट्राला स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. यांत काही कार्यकर्ते असे आहेत की ज्यांनी आपल्या घरादाराची राखरांगोळी करून नेटाने कार्य केले. काहींनी राष्ट्रासाठी प्राणाहुतीही दिलेली आहे. प्रामाणिक, विश्वासू आणि चारित्र्यशील कार्यकर्त्यांत शहरापेक्षा खेड्यातील खेडुतांचाच विशेष भरणा आहे. पण अशा कार्यकर्त्यांकडे तज्ज्ञांचे जावे तसे लक्ष गेलेले नाही. त्यांची व्हावी तशी कदर झालेली नाही. माझ्या पाहण्यात असे काही कार्यकर्ते आहेत की आज सर्वस्व पणाला लावून ते पोटासाठी भटकत आहेत. तरी त्यांनी कधी कोणाला दूषण दिलेले नाही. हे केवढे मोठे अंतःकरण आहे ! नाही तर काही असे बाता झोकणारे कार्यकर्ते आहेत की, दुसऱ्यांच्या नावावर स्वतःचा बडेजाव मिरवून मानाच्या जागेसाठी भांडण करीत असतात. त्यांना कार्यासाठी मोबदला हवा असतो आणि हवा तो मोबदला मिळाला नाही तर विरुद्ध वातावरण निर्माण करावयास ते मागेपुढे पाहत नाहीत.

कष्टाने स्वातंत्र्य प्राप्त झालेल्या आपल्या राष्ट्राला आज प्रामाणिक व

खंबीर कार्यकर्त्यांची फार गरज आहे. खेड्याची सर्वांगीण सुधारणा घडून स्वावलंबी जीवन निर्माण करावयाचे आहे. आम्हाला थोडे लिहिता येते किंवा बोलता येते म्हणून आम्ही खरे कार्य करू शकतो असा दावा करणाऱ्यांना सांगावयास पाहिजे की 'आम्हीच सर्वज्ञ' म्हणून काही करता येत नाही. कार्यासाठी मनाची उदारता आणि वाचा–लेखणीची उद्धारक कृती पाहिजे. आपला कामधंदा सांभाळूनही आपल्याला कार्यकर्त्याची भूमिका निरलसपणे पार पाडता येते. पण यासाठी कळकळ व तळमळ पाहिजे. जनतेचा विश्वास संपादून, फार मोठे काही करीत आहोत असा आभास निर्माण करण्यापेक्षा, अगदी छोटेसे पण भरीव कार्य आपल्या हातून पार पडले पाहिजे. साध्या बोलण्यावागण्यातही आपल्याला कार्य साध्य करून घेता येते. कार्यकर्त्यांच्या ज्या उपर्युक्त मर्यादा सांगितल्या त्याप्रमाणे आपण राहू त्या स्थितीतही थोडी थोडकी का होईना लोकहिताची बाजू आपण राखली पाहिजे. आज अनेक संस्था निर्माण होत आहेत. कार्यकर्ते ह्या संस्थांसाठी लोकांकडे मदतीला जातात तेव्हा लोक मदत देण्यास नाकारतात. ह्याचे कारण म्हणजे त्याचा कार्यकर्त्यांवरील उडालेला विश्वासच होय. अशा परिस्थितीमुळे हाती चांगले काम घेऊनही ते पार पडत नाही. म्हणून यापुढे तरी कार्यकर्त्यांनी जागरूकतेने जनतेच्या विश्वासास प्रथम पात्र झाले पाहिजे आणि तिच्या कल्याणासाठी सतत मेहनत घेतली पाहिजे. पैशापेक्षा हृदयाचे दान कार्यकर्त्यांनी करावे. स्वतःच्या स्वार्थासाठी सेवेचा डोलारा उभा करण्यात पुरुषार्थ नाही. त्यातून आपल्या स्वतंत्र राष्ट्राला मानाचा दर्जा प्राप्त करून देण्यास प्रत्येकाने कार्यकर्त्याची अस्सल भूमिका वठवून जनतेचे कल्याण चिंतिले तर भारताचे वैभवशाली चित्र ते सहज निर्माण करू शकतील.

□ □ □

---

पूर्व मध्यप्रदेश शासनाच्या १ डिसेंबर १९४९ च्या 'प्रकाश' पाक्षिकात प्रसिद्ध.

# ४.

## इतिहासाचे एक पान !

सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी फ्रेंच राज्यक्रांती होऊन नेपोलियन बोनापार्ट-सारखा मुत्सद्दी, राजधुरंधर महत्त्वाकांक्षी व धाडशी शूर पुरुष उदयास आला. इ. स. १७९५ हे वर्ष भाग्याचे वर्ष ठरले. सम्राट नेपोलियनने आपल्या तरवारीने जगाला हादरून सोडले. त्याचे राजकारण खरोखरी अभ्यासण्यासारखे आहे. विशेषत: फ्रेंच राज्यक्रांतीचा संपूर्ण इतिहास नजरेसमोर ठेवून भारतवासीयांनी आजची आपली स्थिती न्याहाळली तर त्यांना काही विशेष ज्ञान प्राप्त होऊन आपल्या राष्ट्राची मशागत कशी केल्याने आपण स्वातंत्र्यात सुखाने नांदू याचा धडा घेता येईल असे वाटते.

फ्रेंच राज्यक्रांती काय किंवा रशियन राज्यक्रांती काय ती एकाच वलयातून निर्माण झालेली महागाथा आहे. तिचा अभ्यास आजच्या भारतातील प्रत्येक व्यक्तीने जरा सूक्ष्म रीतीनेच केला पाहिजे. आम्ही जेव्हा याचा विचार करतो तेव्हा नेपोलियन बोनापार्टच्या शेवटच्या दिवसांचे व त्यातून त्याच्या मृत्यूच्या दिवसाचे भयावह चित्र डोळ्यांपुढे येते.

आज आम्ही आमच्या वाचकांसमोर नेपोलियन बोनापार्टच्या मृत्यूच्या वेळी त्यांनी आपल्या दहा वर्षांच्या बालकास लिहिलेले अखेरचे मर्मभेदी पत्र जसेच्या तसे ठेवीत आहोत. त्याने हे पत्र ता. १७ एप्रिल १८२१ रोजी सेंट हेलिना बेट येथे मृत्यूपूर्वी तीन आठवड्यांआधी लिहिले. काउंट मांथोलान या नेपोलियनच्या परिवारापैकी एकाने, नेपोलियनने तोंडाने भराभर जे निवेदिले ते लिहून काढले व साहित्यसम्राट कै. तात्यासाहेब उर्फ न. चिं. केळकर यांनी आपल्या फ्रेंच

राज्यक्रांती या ग्रंथात नेपोलियनाचे हे पत्र मोठे मुद्देसूद व सुबोध रीतीने दिले आहे, ते जसेच्या तसेच पुढे उद्धृत करीत आहोत.

**नेपोलियनचे आपल्या मुलास अखेरचे पत्र**

" सेंट हेलिनासारख्या दूरच्या बेटावर मला बंदिवासात मृत्यू आला, म्हणून काही तरी कल्पनेने माझ्या मृत्यूबद्दल सूड घेण्याचा विचार माझ्या मुलाने करू नये. उलट माझ्या अकाली मृत्यूमुळे उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा स्वतःला फायदा करून घ्यावा ! मी ज्या ज्या गोष्टी केल्या त्या त्याने सतत मनात घोळवाव्या व माझ्याप्रमाणेच फ्रेंच राष्ट्राचा अभिमान बाळगावा. शक्य तितके शांततेने करण्याचे धोरण ठेवावे. मी लढाया केल्या म्हणून काही कारण नसता त्यानेही लढाया उपस्थित केल्या तर हे अनुकरण हास्यास्पद तर होईलच पण मी जणू काहीच केले नाही असा त्याचा अर्थ होईल ! त्याला कराव्या लागणाऱ्या लढाया सर्व आयुष्य खपून मी केल्या व एका अर्थी त्याचे श्रम वाचविले; याकरिता लढायांमुळे माझ्या मनातील ज्या इतर गोष्टी करण्याच्या राहून गेल्या त्या त्याने पुऱ्या कराव्या. हे केले असता माझ्या मनाच्या भूमिकेत व्यापक अशी एक विधायक कल्पना होती व माझी विध्वंसक कामगिरी हा त्याच विधायक कामगिरीचा केवळ एक भाग होता, याची सत्यता लोकांच्या नजरेस येईल. महायुद्धासारख्या गोष्टी शतकातून एकेकदा होतात. माझ्या दुर्दैवाने मला तेच काम प्रथम अंगावर घ्यावे लागले. पण आता शांततेच्या व परानुनयाच्या मार्गानेच जनतेची मने आपलीशी करण्याचा काळ आहे. फ्रेंच राज्यक्रांतीत लोकांनी इतके अत्याचार केले की, ज्या काही चांगल्या मूलभूत कल्पना त्यात होत्या त्याही नष्ट होण्याची वेळ आली होती. मी पुढे होऊन तो प्रसंग टाळला आणि राज्यक्रांतीमधील बीजभूत मूलतत्त्वे जिवंत ठेवली. माझ्या आमदानीत किती तरी नव्या कल्पना मी उदयास आणल्या आहेत की, खास माझ्या म्हणून लोकांना केव्हाही त्याचे श्रेय माझ्याकडे देता येईल म्हणून जे मी पेरले आहे ते उगवून त्यांचे फल पदरात पाडून घेण्याचा विचार मुलाने करावा ! इतके जरी त्याने नीट केले तरीही 'एक मोठा राजा' म्हणून इतिहासात त्याचे नाव होईल.

हल्ली माझ्या सिंहासनावर बुरबॉन राजे बसले आहेत, पण त्यांना आपले पद टिकविता येणार नाही. माझ्याकरिता लोकमतात नक्की प्रतिक्रिया होईल व ती माझा वंश पुनः गादीवर आणील. नुसत्या युरोपातच नव्हे तर खुद्द इंग्लंडमधील लोकही माझ्या बाजूने सहानुभूतीने बोलावयाला लागतील. आपल्या हातून झालेल्या छळाची थोडी तरी निष्कृती व्हावी अशी पश्चात्तापाची भूमिका इंग्लंडात उत्पन्न झालेली दिसेल व तीच माझा वंश पुनः गादीवर येण्याला सुवर्णसंधी आणील. अर्थात घेणाऱ्याने शहाणपणाने त्या संधीचा उपयोग केला तर ! म्हणून इंग्लंडशी सलोखा राखण्याकरिता कसेही करून त्यांच्या व्यापाराला अप्रतिबंध

सुरक्षितता दिलीच पाहिजे. इंग्लंडशी युद्ध करणे शक्य नाही. तेव्हा जगाच्या व्यापारात इंग्लंडशी भागीदारीच केली पाहिजे. असे सलोख्याचे धोरण ठेवले व सांभाळले तरच सार्वत्रिक सहानुभूती मिळून माझ्या मुलाला माझे कार्य पुढे चालविता येईल.

माझा मुलगा शत्रूंच्या हाती सध्या नजरकैदेत व्हिएन्नाला आहे. त्याची बिनशर्त सुटका कशी होईल ती होवो, पण त्याने हे लक्षात ठेवावे की फ्रान्सच्या शत्रूंची मदत घेऊन त्याने फ्रेंच सिंहासनावर कधीही पाऊल ठेवू नये ! असे करून त्याला कदाचित फ्रान्सची गादी मिळेलही पण असले नामधारी जिणे जगण्यात स्वारस्य काय ? राज्य करावयाचे तर असे की भावी पिढ्या व इतिहास दुवा देईल. माझ्या कुटुंबातल्या नातेवाइकांशी त्याने जिव्हाळ्याचे संबंध ठेवावे व वाढवावे. यूजिन त्याचा सावत्र भाऊ असला तरी तो व जोसेफ त्याला नेहमी हिताचा सल्ला देतील. माझी आई बिचारी जुन्या वळणाची आहे. पण हॉरटेन्स (जोसेफाईन राणीची मुलगी) व कॅरोलिन या नव्या मताच्या आहेत. त्यांची बंदिवासातून सुटका न झाली तर आपल्या एखाद्या पुतणीशी त्याने लग्न करावे. पण फ्रान्सची गादी मिळाली तर त्याने रशियन राज्यकन्येशी विवाह करावा. कारण हे एकच राज्य असे आहे की त्याच्याशी रक्तसंबंधाने उत्पन्न केलेला ऋणानुबंध, राजकीय सलोखा व धोरण यांना मदत करील. रशियाची सोयरीक केली तरी त्याचा उपयोग फ्रान्सचे परराष्ट्रीय संबंध दृढ करण्याकडे त्याने करावा. पण रशियातली माणसे फ्रान्सच्या कायदेमंडळात घुसवू नयेत ! तसे करण्याचे कारणही नाही. फ्रेंच राष्ट्र हे साधेसुधे धोपटमार्गी आहे. त्याला न बुजविता न बिचकविता त्यावर सुखाने राज्य करता येते. असे प्रामाणिक दिलाचे गरीब लोक दुनियेत आढळावयाचे नाहीत. आपल्या हिताकरिता कष्ट करणारा, भांडणारा कोण व हितशत्रू कोण हे त्यांना समजते. पण नेहमी त्यांच्या विवेचक बुद्धीला उद्देशून बोलले पाहिजे. त्यांच्याशी आडमुठेपणाने वागले म्हणजे त्यांनाही राग येतो, असंतोष उत्पन्न होतो व मग त्याचा स्फोट होतो.

ड्यूक ऑफ ऑरलीन्स याच्या पक्षाकडूनच फक्त माझ्या मुलाला धोका आहे; कारण या पक्षाची मुळे फार पूर्वीपासून रुजली आहेत. पण कोणत्याही पक्षाच्या नादी न लागता बहुजनसमाज हाच आपला पक्ष असे माझा मुलगा समजेल तर त्याला कोणालाच भिण्याचे कारण नाही. चुका पुष्कळांच्या होतात. पण ज्यांनी देशद्रोह करून देशाचा घात केला अशांखेरीज, कोणी कसाही असला तरी त्याचे पूर्ववृत्त विसरावे. आणि माणसाची बुद्धिमत्ता, गुण व देशसेवा याकडेच लक्ष देऊन चांगल्या चांगल्या लोकांचा संग्रह करावा. चेत्तूब्रिआँ याने माझी बदनामी केली असली तरी तो देशभक्त आहे हे विसरू नये.

सरदार लोकांना फ्रान्समध्ये काडीमात्र महत्त्व नाही. त्यांच्या पाठबळावर

आपले मनोरथ रचणे म्हणजे वाळूच्या पायावर किल्ला उभारण्याप्रमाणे आहे. ज्याला काही तरी महत्कृत्य करावयाचे आहे त्याने बहुजनसमाजाचाच आश्रय केला पाहिजे. लोकांची संमती हाच सर्व सत्तेचा मूलाधार. म्हणून मूळ केव्हाही सोडून उपयोगी नाही. पूर्वीच्या बुरबॉन राजांनी सरदार, धर्माधिकारी यांच्या मदतीवर विश्वास टाकला. पण अशी का राज्ये चालतात ? पाणी आपली पातळी गाठणारच आणि ही पातळी बहुजनसमाज, नागरिक, व्यापारी, सरदार, धर्माधिकारी यांपैकी केवळ कोणाही एकाकरिता अगर एकाच्याच मदतीने मी कधीही राज्य केले नाही. जसे एखादे अविभक्त कुटुंब असते त्याप्रमाणे सर्वांकरिता आणि या सर्व वर्गांच्या मदतीने मी राज्य केले.

सरदारवर्गाचा व माझ्या सेनापतींचा माझ्या मुलाला राज्य मिळण्याच्या दृष्टीने काही उपयोग नाही. पण कॅप्टनपासून सैन्यातले एकूणएक शिपाई मात्र माझ्या वंशाला केव्हाही भक्तिभावाने स्मरतील. त्यांची सेवाही मी तशीच केली आहे. त्यांचा खरा प्रतिनिधी जर कोणी असेल तर मीच. मी डिक्टेटर किंवा सर्वाधिकारी होतो. पण तसे होणे अपरिहार्य होते. याबद्दल पुरावा हा की जितकी सत्ता मी मागितली त्यापेक्षा काहीतरी अधिक सत्ता लोकांनी वेळोवेळी मला खुशीने दिली आहे. प्रत्यक्ष माझा मुलगा झाला तरी आता त्या गोष्टी तितक्या सोप्या नाहीत. त्याला पदोपदी लोकमताचे बंधन जाणवेल व विरोधही होईल. लोकांना स्वातंत्र्य पाहिजे ही जाणीव, राज्य करीत असता त्यानेही ओळखलीच पाहिजे. असेंब्लीसारख्या राज्यकारभाराला जबाबदार असणाऱ्या सभेत तुमच्या बाजूचे हुकमी बहुमत हाती ठेवता येईल. पण त्याचा दुरुपयोग करून देशहिताचा घात होणार नाही याकडे सदैव लक्ष ठेवले पाहिजे. फ्रान्सची सगळी प्रजा सनदशीर वागणारी, कायद्याला मान देणारी आहे. म्हणून राज्यकारभारात लाचलुचपतीचा प्रयोग करण्याची पाळीच येणार नाही. राज्यकारभार करणे म्हणजे लोकांना आपले सार्वजनिक हित व नीतिमत्ता यांचे शिक्षण देणे होय, दुसरे काय ? हे विसरून काही तरी असत्पक्षाची उभारणी करणे किंवा डाव खेळत बसणे याने फार तर गावगुंडी साधेल, खरे राजकारण साधणार नाही.

तरुणपणी फारसा अनुभव नव्हता त्या वेळी माझ्याही डोक्यात काही काही भ्रामक कल्पना होत्या. अर्थात कालांतराने त्या निघून गेल्या. असेंब्लीमध्ये वक्तृत्व गाजवून सभा जिंकणारे मोठमोठे वक्ते घेतले तरी त्यांचे खरे राजकीय ज्ञान अगदी बेताचे, सामान्यच आढळते. त्यांच्या पद्धतीचे अनुकरण करावयाला जाऊन वक्तृत्वात त्यांना विरोध करू नये. कारण जो गर्जून बोलेल त्याला केव्हाही टाळ्या अधिक. म्हणून अशा रीतीने फड अंगावर घेऊ नये. भावनाप्रधान भाषणात खरा प्रतिकार तर्कशुद्ध विचारसरणीने व ठाशीव युक्तिवादानेच होतो. भावनांचा कापूस पिंजून निव्वळ धुके आणि अभ्रे निर्माण करतात त्यांना तार्किक प्रश्न विचारून

व्यावहारिक भूमिकेवर आणले की त्यांच्या व्याख्यानांचा निकाल होतो ! माझ्या कौन्सिलात वक्तृत्वात माझ्याहून श्रेष्ठ असे पुष्कळ लोक होते. पण दोन आणि दोन चारच होतात ना ! असा मी साधा व्यावहारिक सिद्धान्त पुढे मांडून किती तरी वेळा बाजू जिंकली आहे.

फ्रान्समध्ये गुणवान व व्यावहारिक माणसे किती तरी आहेत. त्यांची किंमत जाणून त्यांना योग्य स्थान दिले पाहिजे. दिवाण होण्याला लायक असा एकजण हल्ली राजकारणाला विटून स्वस्थ शेतकी करीत आहे आणि हल्लीच्या कौन्सिलात एकजण असा आहे की तेथून त्याला पिटून तो नांगराला जुंपण्यालायक आहे. नाना गोष्टी लोक सांगतात, त्या सर्व ऐकून घ्याव्या. पण अखेर ऐकावे जनाचे, करावे मनाचे, हे विसरू नये. अगदी मूर्खपणाचा सल्लादेखील शहाणीसुर्ती माणसे तोंडावर तत्त्वज्ञानाचा गंभीर आव आणून देतात. तथापि हे लक्षात ठेवावे की, जिच्याबद्दल समर्थनपर चार वाक्येही सांगता येणार नाहीत अशी जगात एक तरी वस्तू आहे काय ? म्हणून प्रत्येक वस्तूची, प्रत्येक माणसाची प्रत्येक विचाराची खरी किंमत किती हे सुवर्णाच्या सूक्ष्म ताजव्याने मनात नेहमी तोलून ठेवावे व देशातली गुणवान मातब्बर माणसे नेहमी आपल्याभोवती ठेवावी.

फ्रेंच लोकांना दोन गोष्टी मोठ्या प्यार आहेत. एक स्वातंत्र्येच्छा व समता. व दुसरी म्हणजे मानमरातब. या दोन्ही गोष्टींत वाटतो तितका विरोध नाही. एकातूनच दुसरी निर्माण झाली आहे. पण काटेकोर न्यायपद्धतीनेच लोकांना त्या देणे साध्य होईल. कायद्याला सगळे लोक सारखेच. पदव्या, मानमरातब जहागिरी जरी कोणाला दिल्या तरी ज्यांच्या लायकीबद्दल दुमत नाही अशांनाच त्या दिल्या तर कोण का तक्रार करील ? माझी 'लीजन ऑफ ऑनर' संस्था अशीच आहे. पलटणीतल्या अगदी साध्या शिपायालादेखील तो बहुमान मिळविण्याची महत्त्वाकांक्षा धरता येते, म्हणूनच ही संस्था लोकप्रिय झाली. त्यांत खऱ्या गुणांचीच किंमत आहे. कारवाईला तेथे जागा नाही. आणि एकदा तेथे कारवाई शिरली व पैशाने हा बहुमान विकत घेता येतो असे सिद्ध झाले म्हणजे ही संस्था धुळीला मिळालीच !

वर्तमानपत्रांना जे एक जन्मसिद्ध स्वातंत्र्य आहे ते माझ्या मुलाला त्यांना द्यावे लागेल. सध्याच्या काळात या स्वातंत्र्याची जरुरी आहे. अमुक एक तत्त्व डोळे मिटून पाळणे म्हणजेच राज्य करणे असे नव्हे; तर हाती असलेल्या गोष्टीत निर्वाह करणे, अडचणीच्या प्रसंगी सलोख्याने गम खाणे व प्राप्त परिस्थितीचाही उपयोग करून घेणे यातच खरे राजकीय शहाणपण आहे. वर्तमानपत्रांची हाक देशातल्या अगदी कोनाकोपऱ्यात ऐकू जाते. नुसते कायदे लोकांना काय शिकवणार ? म्हणून चांगली तत्त्वे आणि हितकारक मत प्रसृत करून लोकांना शिक्षण देण्याच्या कामी या वर्तमानपत्रांचा उपयोग करून घ्यावा, त्यांना मोकळे रान सोडणे म्हणजे मात्र

स्वत: एखाद्या कडयाच्या काठावर झोपण्यासारखे भयंकर आहे. लढाईनंतर शांतता प्रस्थापित झाल्यावर माझ्या मनात असे फार होते की देशातल्या विद्वान व कर्तबगार संपादकांची एक संघटना करून माझे हेतू व राजकीय कल्पना यांचे शिक्षण अगदी खेडोपाडी प्रसृत करावे. समाज शहाणा होईल, बदलेल मग आपण त्यांना सांगू ही आशा व्यर्थ आहे. तो तीनशे वर्षांपूर्वीचा जुना काळ आता गेला. जगाच्या जीवनकलहात एक तर नेटाने पुढे आले पाहिजे अगर नामशेष झाले पाहिजे; दुसरा मार्ग नाही.

माझ्या मुलाने आपले मन नवनवोन्मेषशाली ठेवले पाहिजे. नवी कल्पना चटकन ग्रहण करता यावी, तिचा प्रसार करता यावा, ज्या कार्याकरिता मी झगडलो व जे मी यशस्वी केले त्याचा त्याने अभिमान बाळगला पाहिजे. पूर्वी मोठेपणा काही एका मिरासदारीवर चिकटलेला असे. ते सर्व घालवून जो व्यक्तिगत मोठेपणाचा गुण तोच जगातही मोठा ठरेल. व्यक्तीचा विकास होईल, समाजाचा विकास होईल असे केले पाहिजे. या सुप्त समाजशक्ती आपला उद्या भाग्योदय होईल म्हणून शतकानुशतके वाट पाहत आहेत. ख्रिस्ती धर्म व संस्कृती यांचा जगभर फैलाव केला पाहिजे. याच कार्यात मी माझे प्राण वेचले म्हणून ज्यांनी मला विरोध केला ते एका अर्थाने मनुष्यजातीचेच शत्रू होत. लोकांना 'मुकी बिचारी कुणी हका' अशी जनावरे समजून फ्रान्सवर जुलूम करावा अशी या विजयोन्मत्त राष्ट्रांची इच्छा आहे. काळाचा प्रवाह मूळ उगमाकडे त्यांना रेटीत न्यावयाचा आहे. पण जुलुमाची शीग संपून एकदा प्रतिक्रिया सुरू झाली म्हणजे ती कसलीच बंधने जुमानणार नाही.

राजपद हे भयंकर समजून त्यावर आजच तिलांजली घेऊन उठण्याचे कोणाला कारण नाही. मध्ययुगीन काळात राजा हा सुलतान असे व सर्वत्र अमीर-उमराव यांचीच बडेजावी असे. पण राज्यक्रांतीनंतर प्रत्येक मनुष्याला हक्क व स्वातंत्र्य आहे व प्रत्येक नागरिकाच्या हक्काचा राजा हा प्रतिनिधी व पालनकर्ता आहे ही कल्पना आम्ही पुढे आणली. ही कल्पना नीटशी रुजण्याला दुर्दैवाने सवड दिली नाही. माझ्या मरणानंतरही माझ्या वारसाबद्दल शत्रूंचा द्वेष असेल तर, युरोपखंड किती काळ रक्तात आकंठ बुडून राहणार आहे याची कल्पनाही करवत नाही.

जे जे मी लिहिले अगर तोंडाने सांगितले ते सर्व प्रसिद्ध करण्यात यावे. त्या गोष्टी नीट मनन करण्यास मुलास सांगावे. ज्यांनी माझी सेवाचाकरी बजावली त्यांचा त्याने स्मरणपूर्वक प्रतिपाळ करावा. अशा निष्ठावंत सेवकांची संख्याही थोडी थोडकी नाही. माझे शूर शिपाई आज कदाचित भाकरीच्या तुकड्यालाही महाग झाले असतील. या फ्रेंच लोकांच्या अंगी केवढे शौर्य, केवढी समजूत आहे! यापुढे त्यांचे अंगी असलेले हे संपत्तिगुण कदाचित जगास दिसणारही नाहीत.

म्हणून हल्ली जे समाजात विचाराचे स्थित्यंतर चालू आहे त्याला मदत करावी. त्याचे पाय पाठीमागे खेचू नयेत.

प्रत्येक राष्ट्राला आपले राष्ट्रीयत्व कायम ठेवण्याची तीव्र इच्छा असते. या इच्छेला मान दिला पाहिजे. मी अनेक राजे निर्माण केले पण ती गोष्ट यापुढे विसरावी. वॉटर्लूच्या आधी माझ्या भावांच्या कानीकपाळी ओरडून मी त्यांच्याकडून कबुली घेतली की त्यांनी आपले राजपद विसरून आपणाला यापुढे फ्रेंच राजघराण्यातील राजकुमार असे म्हणत जावे. माझ्या मुलानेही असेच करावे.

यापुढे जागतिक खळबळीचा बिंदू उत्तर युरोपात राहणार नाही. तो भूमध्यसमुद्रात येईल आणि रानटी व ख्रिस्तेतर समजल्या जाणाऱ्या राष्ट्रांचे लचके तोडून युरोपियन राष्ट्रे आपले समाधान मानतील ! व्यापाराच्या वाहतुकीचे रस्तेही वाढत आहेत. यामुळे कोणा एकाच राष्ट्राच्या यापुढे ते सर्व ताब्यात राहतील असे नाही. म्हणून माझ्या मुलाने स्वतःच्या देशाच्या अंतर्गत कारभाराकडे अधिक लक्ष द्यावे. लोकांच्या चालीरीती व कायदे यात अंतर नसावे. न्यायकोर्टात शिक्षा किती जणांना झाल्या त्याचा रिपोर्ट जवळ ठेवावा. गुन्हे अधिक असले तर त्याचा अर्थ समाजात दारिद्र्य तर आहेच; पण राज्यव्यवस्था वाईट आहे, गुन्ह्यांची संख्या कमी होणे हाच राज्य नीटपणे चालल्याचा पुरावा होय.

काही संकुचित दृष्टीचे तत्त्ववेत्ते धर्माची किंमत कमी लेखून त्यांची हेटाळणी करतात. पण असे करणे चूक आहे. धर्म या कल्पनेचा पगडा मनुष्यजातीच्या मनावर इतका जबरदस्त आहे की तो कधीही दूर होणे शक्य नाही. धर्म आपणांस पाहत असतो या कल्पनेने मनुष्यजातीचे आजवर कितीतरी हित झालेले आहे. पोपचे अधिराज्य लोकांच्या 'मनावर' असल्या कारणाने नुसत्या पोपला मान वाकविण्याने कोटचवधी माणसांचे मन आपलेसे करता येते. हल्लीचा वयोवृद्ध पोप विद्वान, सुसंस्कृत असून तो केव्हाही माझ्या मुलाला अनुकूल असेल. आमच्या कौन्सिलात निष्कारण धर्मविषयक वितंडवाद होत. कार्डिनल फेच याने माझे मत समजून न घेतल्यामुळे तो निराळा पक्ष घेत असे. पण माझे धर्मविषयक धोरण जाणणारी माणसे आजही कौन्सिलात सापडतील. माझी आठवण म्हणून माझे चिरंतन स्मारक जर त्यांना करावयाचे असेल तर राज्यकारभाराविषयी कौन्सिल ऑफ स्टेटमध्ये जे विचार व कल्पना मी प्रदर्शित केल्या त्यांचा त्यांनी संग्रह करावा. मी कोणकोणती कामे केली, फ्रान्स व इटाली या देशांमध्ये कोणकोणत्या भव्य इमारती बांधल्या त्यांची यादी करावी. कौन्सिल ऑफ स्टेटमधील भाषणात निव्वळ प्रासंगिक काय व तत्त्वदर्शक व चिरंतन महत्त्वाचे कोणते याचाही भावी संग्रहकाराने विवेक करणे जरूर आहे. माझ्या मुलाने इतिहासाचे सतत वाचन ठेवावे.

इतिहास नीट मनन करणे यासारखा दुसरा गुरू नाही. ज्याला आयुष्याचे

तत्त्वज्ञान म्हणतात ते इतिहासाच्या वाचनानेच निर्माण होते. युद्धशास्त्र शिकावयाचे तरी मोठमोठ्या जगज्जेत्यांनी जिंकलेल्या लढायांचा अभ्यास करावा. पण हे लक्षात ठेवावे की, सत्य आणि सद्‌गुण यांवर अंतःकरणातूनच खरी भक्ती असल्याशिवाय केवळ पुस्तकी वाचन अगर कोणीही दिलेला सल्ला, उपदेश, फुकट आहे. तेथे पाहिजे जातीचे. काही तरी स्वयंभू अंतर्गत असावेच लागते. ते असले तर इतर बाह्य गोष्टींचा उपयोग. असो. भाग्यदेवतेने जे भाग्य त्याच्या नशिबी लिहिले असेल ते उपभोगण्याला माझा मुलगा लायक निपजेल इतकीच मी आशा करतो."

हे पत्र लिहिल्यानंतर नेपोलियन ता. ५ मे १८२१ रोजी सेंट हेलिना येथे मरण पावला. त्याने आपल्या पत्रात जे भाकीत केले होते ते शेवटी खरे ठरले. नेपोलियनचे आपल्या मुलास लिहिलेले हे पत्र म्हणजे आजच्या भारताला एक नवीन धडा शिकविण्याचा एक उत्कृष्ट ऐतिहासिक पाठ आहे. त्याने फ्रेंच राज्यातील जे खाचखळगे दाखवून, राष्ट्र बलशाली होण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत होतात व त्याचे पालन कसे केले पाहिजे याचे मार्मिक विवेचन केले आहे, ते अभ्यासकांनी नीट अभ्यासिल्यास राष्ट्राचे आजचे व उद्या राहणारे स्थान स्पष्टपणे खास उमगेल. आणि म्हणून नेपोलियनने आपल्या बालकास दिलेला इषारा पर्यायाने भारताला इषारा आहे, असे आम्ही आज म्हणू लागलो तर ते अतिशयोक्तीचे ठरणार नाही. उलट, हे पत्र भारतवासीयांना उत्तम मार्गदर्शन करील यात संदेह नाही.

□ □ □

# ५.

## आजचे समाजजीवन, संस्कृती आणि व्यक्तिविकास

जनतेच्या नीतिमत्तेवरच धर्म आणि संस्कृती निर्भर असते. अलीकडे 'समाज' या संज्ञेने जनता निरनिराळ्या प्रकारे विभागली गेली आहे. गट, पक्ष, जाती आणि पंथ आपापल्या परीने हित पाहून आपले वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे न्यायान्यायाचा, हिताहिताचा, व्यवहाराव्यवहाराचा प्रश्न उग्र स्वरूप धारण करतो आणि मग एकमेकात वैमनस्य, हेवादावा आणि जुलूमजबरदस्ती निर्माण होऊन समाजाची नीतिमत्ता ढासळू लागते.

आजच्या समाजजीवनात आपला मुक्काम कुठे आणि कसा आहे याचा आपण आत्मलक्षी होऊन विचार करण्याची नितांत आवश्यकता आहे. विशेषतः समाजाची नीतिमत्ता आणि संस्कृतीबाबत आपला दर्जा काय आहे याचे मोजमाप करणे व व्यक्तिविकासाला ते कितपत बाधक अथवा पोषक आहे हे पाहणेही आज तरी आवश्यक झाले आहे. समाजाच्या नीतिमत्तेला राष्ट्रधर्माचे महत्त्व आहे हे आता दुर्लक्षून भागावयाचे नाही. समाजाची नीतिमत्ता भ्रष्ट होऊ लागली की राष्ट्रधर्म खिळखिळा होतो आणि असे झाले म्हणजे त्याचा परिणाम स्वातंत्र्यावर व स्वायत्तेवर होतो. इ. स. १८०० च्या पूर्वी अनेक राज्ये हिंदुस्थानात नांदत होती. परंतु ती आपसातील यादवीमुळे आणि आपला नीतिधर्म सोडल्यामुळे नामशेष झाली. त्याचा परिणाम परकीयांनी हिंदुस्थानात आपले पाय मजबूत केले. दुर्दैवाने दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिण्याचा प्रसंग येऊन, भारतवासीयांना आपल्या इच्छेने काहीही करता येऊ शकले नाही. पण आता सुदैवाने आपण

स्वातंत्र्य–मंदिरात जगत आहोत. तेव्हा राष्ट्राच्या दृष्टीने समाजाने आपली उदात्त नीतिमत्ता व संस्कृती राखून देशाचा दर्जा उन्नत व इतर राष्ट्रांना अनुकरणीय वाटेल असा उच्च प्रतीचा राखण्याचा हृदयपूर्वक प्रयत्न केला पाहिजे.

समाजाची नीतिमत्ता विशेषत: आध्यात्मिक, नैतिक, सांस्कृतिक व सामाजिक जीवनावर विशेष अवलंबून असते. त्या दृष्टीने जीवनात चारित्र्याला फार मोठे महत्त्व आहे. व्यक्तीचे जसे आचारविचार असतील तसे वातावरण निर्माण होते. एका मोहल्ल्यात एक भांडखोर आणि लबाड माणूस असेल तर तो त्या मोहल्ल्यातील व्यक्तींना डोईजड होतो. आपल्या व्यवहारामुळे तो चार सोबती जमा करतो. याप्रमाणे मोहल्ला आणि नंतर गाव अशा व्यक्तींनी व्यापला जाऊन सामाजिक जीवन दूषित होते. दारुबाज किंवा जुगारी यांची उदाहरणे आपण नेहमीच पाहतो. यांच्या नैतिक अध:पातावर गावात बजबजपुरी माजते आणि वस्तीत भांडण, दुफळी आणि द्वेष बळावतो. अर्थातच गावातील सामाजिक जीवन स्वच्छ न राहता, ते केव्हा केव्हा इतके गढूळ होते की, त्याचा उपसर्ग आसपासच्या गावांस पोचतो. तीच गोष्ट परस्पर व्यवहाराची. एकाने दुसऱ्याला प्रसंग म्हणून काही रकम दिली. मुदतीच्या आत ती परत करणे तर दूरच राहिले पण कधी कधी रकम घेतलीच नव्हती असा खोटा व्यवहार अनेक व्यक्ती करू लागतात. पत किंवा विश्वास याला थारा न मिळाल्यामुळे रोजच्या व्यवहारात फसवणुकीला तीव्र स्वरूप प्राप्त होते. त्यामुळे खोटया बाजारात सुशीलांच्या शहाणपणाचा रिघाव लागत नाही. मनुष्य बदफैली किंवा विषयासक्त असला तर तो नैतिक बंधनांना तोडून स्वैराचाराचा अवलंब करतो. याचा परिणाम इतका जबरदस्त होतो की गावच्या गावं पेटून उठतात आणि बेबंदशाहीची परिस्थिती निर्माण होते. दिलेली ही उदाहरणे केवळ वैयक्तिक स्वरूपाची नाहीत तर ती सामुदायिक अशा स्वरूपाने घेरली जाणारी आहेत. जे उदाहरण ज्या पक्षात, गटात, पंथात अथवा जातीत घडेल तो तो पक्ष, गट, जाती किंवा पंथ आपापली बाजू खोटी असूनही सत्य असल्याचे दाखवितो. त्यामुळे पक्षापक्षात, गटागटात, जातिजातीत आणि पंथा–पंथात वैमनस्य येऊन समाजाची नीतिमत्ता काळवंडते, बिघडते आणि त्याचे दुष्परिणाम समाजाला पर्यायाने राष्ट्राला भोगावे लागतात. राज्यशासनात बिघाड होऊन स्वातंत्र्याला बाध येतो.

ज्या गोष्टी आपण क्षुल्लक समजतो त्यातच भयंकर विस्फोटाची बीजे रुजलेली असतात. खेडयातील खेडुतांचा प्रश्न थोडा बाजूला सारून शहरातील सुसंस्कृत आणि सुशिक्षितांकडे थोडे लक्ष दिले तर अधिकांश प्रमाणात अशा व्यक्ती सापडतील की ज्यांना नीतिमत्तेची जराही चाड नाही. कोणतीही गोष्ट करायला जणू आपण सर्व समर्थ आहोत या अहंभावनेने त्यांचे निंदास्पद वर्तन असल्याचे आढळून येते. प्रथम दिसणारे तुरळक पण दिवसेंदिवस फोफावत जाणारे

हे लोक समाजाची नीतिमत्ता उच्छेदनास कारणीभूत होतात, अशी कित्येक उदाहरणे आपल्या नित्याच्या पाहणीत येतात. सुशिक्षित समजली जाणारी अनेक माणसे एखाद्या गोष्टीचा प्रतिकार करण्यासाठी आघाडी निर्माण करतात आणि त्या आघाडीत नसतील ती दुष्कृत्ये स्वतःच निर्माण करून ठेवतात. वस्तुतः त्यांची कामगिरी दुष्कृत्याचा प्रतिकार करण्यासाठी असायला पाहिजे. पण अगदी उलट ती घडली जात असल्याने समाजावर भलताच आघात होतो याला कारण आपणच सर्व कर्तेसवरते असा झालेला त्यांचा समज. त्यांची राहणी, वागणूक आणि व्यवहार अशा प्रकारचे असतात की सर्वसामान्य जनतेवर त्यांचा अनिष्ट परिणाम होतो. त्यामुळे खेडे आणि शहर यात सद्भावना निर्माण होण्याऐवजी एक वेगळीच विभिन्नता निर्माण होते आणि परस्पर हितसंबंध दुरावतो. शहरात फॅशन म्हणून जो एक प्रकार इंग्रजी राजवटीपासून उद्भवला त्याची झळ खेड्यापर्यंतही जाऊन पोचली, त्यामुळे संस्कृतीवर व राहणीवर एक भलताच परिणाम होऊन समाजाच्या मूळच्या साधेपणात खर्चिक असा बहुरंगीपणा आला. अर्थात त्याचाही कळत वा नकळत नीतिमत्तेवर परिणाम झालेला आढळून येतो. एका गावातील दोन सोबती, परिस्थितीने एक खेडूतच राहिला तर दुसरा प्राध्यापक झाला. या प्राध्यापकाला आपल्या जुन्या सोबत्याबरोबर चारचौघात बसायची लाज वाटते. मग तो खेडूत कितीही सरळ, नम्र व सच्छील असो. अशा दुजाभावदर्शक प्रवृत्तीमुळे गट निर्माण होऊ लागले आणि त्यांचे परस्पर सहकार्याचे व्यवहार दुरावू लागले. खेड्यातील समाज आणि शहरातील समाज म्हणजे अडाणी आणि सुशिक्षित असा भेद उत्पन्न होऊन परस्परांना समपातळीवर वावरता येणे दुष्कर झाले. एक आपल्या दारिद्र्याला भिऊन वागतो तर दुसरा आपल्या प्रतिष्ठेसाठी मिरवतो. हा प्रश्न आज प्रामुख्याने भेडसावीत आहे. खेड्यातील बहुसंख्य जनतेने आपला धर्म व संस्कृती अजूनही काही प्रमाणात तरी टिकविण्याचा प्रयत्न केला. पण, शहरातील मूठभर सुशिक्षितांनी पाश्चात्यांच्या राहणीचे व विचारांचे अनुकरण करून भारतीय संस्कृतीला आणि धर्माला गालबोट लावले असे म्हणणे अत्युक्त ठरणार नाही.

सुशिक्षित किंवा सुसंस्कृत म्हटला की त्याच्याकडून आपण सभ्यतेची अपेक्षा बाळगतो. पण सौजन्य आणि सभ्यता यांना अलीकडे इतके विकृत स्वरूप प्राप्त होत चालले की केव्हा केव्हा लाजेने खाली मान घालावी लागते. चौरस्त्याच्या बाजूला सुशिक्षित तरुणांचे घोळके उभे राहून रेडिओची रसभरीत गाणी ऐकत रहदारीचा मार्गही अडवितात. त्या मार्गाने जाणाऱ्या तरुणीकडे मिस्किलपणे पाहून वा एकमेकाला उद्देशून अभद्रवाणी काढून त्या तरुणीची अवहेलना करणे असे समाजाला काळिमा फासणारे जसे अश्लाघ्य वर्तन आढळते तसेच ज्यांच्यावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून आहे, असे अनेक विद्यार्थी विद्यालयात, रस्त्यावर किंवा अन्य

ठिकाणी बीभत्स असे काही लिहून किंवा बोलून फिदीफिदी हसताना आढळतात. आजचा पुत्र पित्याला ' हॅल्लो फादर हॅव् इट ' म्हणून सिगारेट ' ऑफर ' करतो तर पिता, पुत्रापुढे पेग घशाखाली रिचवून आपला मद्यपी आदर्श राखतो ! सूनबाई आलेल्या चार मित्रांबरोबर–मैत्रिणींबरोबर नाही-गप्पा मारीत बसते व म्हाताऱ्या सासूला चहा फराळासाठी राबवते. तिचे ते बोलणे अन् हसणे तर सोडाच पण अवेळी मित्रांबरोबर चित्रपटाला अथवा सहलीला नटूनथटून जाण्याचे धाडस पाहिले की, " हीच का ती आधुनिक स्त्री " ! असा उद्‌गार बाहेर पडतो. काही सौभाग्यवतींच्या कपाळाला कुंकू नाही, हातात बांगड्या नाहीत, गळ्यात पोत नाही ! सौंदर्यप्रसाधनांनी मात्र ती सजूनधजून पुरुषा–इतकेच स्वैराचाराचे हक्क आपल्याला आहेत या दिमाखाने शहरभर आपल्या दिखाऊ सौंदर्याचे प्रदर्शन मांडते ! हे सर्व पाहिले म्हणजे भारतीय संस्कृतीचा दर्जाच कळेनासा होतो.

समाजाच्या नीतिमत्तेला वाचन आणि लेखन हेही कारणीभूत आहे. लेखकांनी, बाजारात बराच भाव येतो म्हणून वाटेल त्या बाजारी उत्तान साहित्याने भरून टाकावे आणि वाचकांनी ते वाचून तसे चाळे सुरू करावे अशा अनेक गोष्टी अनुभवास येतात. समाजाच्या नीतिमत्तेवर याचा आघात होतो हे या विषयासक्त लेखकांना काय कळत नाही ? आणि ह्याच लेखक मानाचे स्थान पटकावून समाजात प्रतिष्ठित समजला जातो. समाजाच्या नीतिमत्तेसाठी पत्रकारही जबाबदार असतात. समाज दिवसेंदिवस शिक्षित होत आहे. त्याला कसल्या प्रकारची माहिती पुरवावी हे पत्रकारांनी जाणून साक्षेपी, समतोल व न्याय्य अशी माहिती देणे अत्यावश्यक आहे. पत्र कोणत्याही पक्षाचे, गटाचे, पंथाचे वा जातीचे असो. पत्रकारावर राष्ट्राची घडण घडविण्याची फार मोठी जबाबदारी आहे. समाजाला योग्य वळण देऊन त्याची नीतिमत्ता सांभाळण्याचे महत्‌कार्य पत्रकार करू शकतात. आजच्या स्वातंत्र्यात तर पत्रकाराकडून नवचैतन्याचे व सृजनशीलपणाचे सर्वपोषक विचार जनतेच्या उत्थानास कारणीभूत होणे एक मोठे राष्ट्रकार्य आहे. पक्षापक्षात किंवा गटागटात भांडणे लावून चुकीचे मार्गदर्शन केल्याने आपणच आपल्या राष्ट्राचा घात करीत आहोत याची जाणीव सुज्ञ पत्रकारांना देण्याची आवश्यकता नाही.

या सर्व गोष्टींचा प्रौढावर तर अनिष्ट परिणाम होतोच पण नवांकुरित बालकांवर भलतेच संस्कार घडून त्यांना बहकलेल्या मार्गावर आणून सोडण्याचे दुष्ट कर्म आपल्या हातून घडते हे विशेषकरून ध्यानी आणले पाहिजे. यासाठी पालकावर आणि शिक्षकावर विशेष जबाबदारी असते. लहान बालकांचा वर्ग समाजातील अतिशय महत्त्वाचा घटक आहे. तेव्हा बालपणापासून त्यांना इष्ट वळण लावून त्यांच्या प्रगतीची जोपासना दक्षतेने करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आजच पाहिले तर समाजातील अनिष्ट गोष्टींमुळे अदब, शिस्त व प्रामाणिकपणा

याचा बराच अभाव या बालकांत आढळून येऊन मन व्यग्र होते. घरातून बाहेर पडलेली मुले बाहेर किंवा शाळेत काय वर्तन ठेवतात, त्यांची आवडनिवड काय आहे याचा मागमूसही पालकांना राहत नाही. नव्हे, पालक बेपर्वाईने इकडे दुर्लक्षच करतात असे अनेकदा अनुभवास येते. त्यामुळे या बालकांच्या नीतिमत्तेवर योग्य वा अयोग्य असा काय परिणाम घडतो हे पाहावे तरी कोणी ? यास्तव चारित्र्य बनविणे व उत्तम आचार राखून सुविचाराने त्यांना योग्य वळण लावणे आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

समाजाची नीतिमत्ता बिघडवायला काळाबाजार, संप आणि काही प्रमाणात चित्रपटही कारणीभूत आहेत. काळ्याबाजारामुळे लाचलुचपतखोरी, फसवणूक आणि गैरविश्वास इतका बोकाळला आहे की समाज आज अधांतरीच लटकत असल्याचे वाटते. काळाबाजार नष्ट करण्याचे काम सर्वस्वी नागरिकांवरच अवलंबून आहे. नागरिक आपले स्वत:पुरते पाहून काळाबाजाराला एकप्रकारे प्रोत्साहनच देतात असे काही प्रकार दिसतात. दोन पैसे आपल्याजवळ आहेत म्हणून भावापेक्षा अधिक किंमत देऊन काही लोक माल आपल्या संग्रही साठवून ठेवतात. कदाचित उद्या माल मिळणार नाही म्हणून त्यांची ही स्वार्थी दक्षता असते. यामुळे बहुसंख्य जनतेला जीवनापुरतासुद्धा माल मिळणे कठीण जाऊन त्यांचा अन्नवस्त्राचा प्रश्न बिकट होतो. व्यापारी किंवा भांडवलदार अशा संधीचा फायदा घेऊन आतून काळाबाजार तेज करतात. प्रत्येकाने मग तो श्रीमंत असो की गरीब असो पोटापुरते अन्न व अंगापुरते वस्त्र घेतले तर काळ्याबाजाराला आपोआपच आळा बसतो. किंमती माल मिळाला नाही तरी साध्या पण आवश्यक मालावरच गुजराण करू, या प्रवृत्तीने काळाबाजार माजणे शक्यच नाही. पण असे होत नसल्याने हवालदिल झालेली जनता जर्जर होऊन एक प्रकारचे बंड पुकारते. त्याचा व काळ्याबाजारवाल्या अनैतिकांचा समाजाच्या नीतिमत्तेवर फारच मोठा परिणाम होऊन अराजकतेचे स्वरूप प्राप्त होते. संपाचाही तोच प्रकार आहे. आजचा काळ याच भयावह परिस्थितीतून जात आहे. त्यामुळे अनैतिक मार्गाचे अवलंबन फार मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. सरकारला नागरिकांनी जर योग्य सहकार्य दिले तर हा अनैतिक प्रकार शक्यतितक्या लवकर बंद पडण्यासारखा आहे. चित्रपटसुद्धा नीतिमत्तेला बाध येईल असे निघू लागले आहेत. प्रेक्षक अशा चित्रपटाने बेछूट व गैरवागणुकीचे धोरण अवलंबित असल्याचे केव्हा केव्हा दृष्टोत्पत्तीस येते. हा शौक इतका वाढला की दामदुपटीने तिकीट खरेदून लोक आपली करमणूक करून घेतात. पण याचा समाजाच्या नीतिमत्तेवर हळूहळू अनिष्ट परिणाम घडत जातो. प्रेक्षक जी मादक शृंगारपूर्ण दृश्ये बघतो किंवा तेथील उत्तान गाणी ऐकतो तसेच वर्तन तो जीवनात उतरविण्याचा प्रयत्न करतो. बुद्धीला चालना देणारी, ध्येयाने प्रेरित झालेली, कलेने परिपूर्ण झालेली, समाजाला धडा शिकविणारी चित्र-

सृष्टी निर्माण झाल्याशिवाय समाजाच्या नीतिमत्तेला चांगले वळण लागणार नाही. आज तरी बालकांच्या दृष्टीने शैक्षणिक चित्रपटांची फार मोठी आवश्यकता आहे.

आता प्रश्न उरला तो राजकीय, सामाजिक आणि धार्मिक चळवळीचा. अशा चळवळी एकांगी आणि आपमतलबी असल्या की पक्षापक्षात, गटागटात जातीजातीत आणि पंथापंथात एकमेकांबद्दल मत्सर, द्वेष सारखा धुमसत असतो आणि त्याचा परिणाम भांडण, मारपीटीपर्यंतही जाऊन पोचतो. अर्थातच अशाच कृत्यांचा नीतिमत्तेवर जबरदस्त परिणाम घडून सामुदायिक वातावरण भयंकर कलुषित आणि शिवराळ होते. प्रत्येक पक्ष किंवा गट आपलेच घोडे दपटण्याचा प्रयत्न करतो. सारासार विवेकबुद्धी नष्ट होऊन शत्रुत्वाला भीषण स्वरूप प्राप्त होते. आम्हाला आज अशी पक्षबाजी किंवा गटबाजी ओळखून दूरदृष्टीने राष्ट्राकडे पाहणे आवश्यक आहे. जातिभेद हा एक या चळवळीतील महत्त्वाचा भाग आहे. खेड्यापासून जाती–जातीची विकोपाला गेलेली भांडणे आजही हृदयाला घरे पाडतात. अस्पृश्यता आणि कमीपणा लेखण्याची प्रवृत्ती जितक्या लवकर नष्ट होईल तितका राष्ट्राचा अभ्युदय लवकर होईल. या बाबतीत पुढाऱ्यांवर विशेष जबाबदारी आहे. पुढारी चारित्र्यहीन व स्वार्थी असले तर त्यांच्या पाठीमागे असणारी जनता चुकीच्या मार्गावर येऊन थडकते. सत्ता हाती आल्याबरोबर सरकारने अस्पृश्यता नष्ट करण्याचे उपाय अमलात आणले. परंतु खेड्यातील जनता पूर्वापार रूढीमुळे आहे तशीच आहे. अशा वेळी जनतेला समतेचा व न्यायाचा मार्ग दाखविण्याचे अस्सल कार्य त्या त्या ठिकाणच्या पुढाऱ्यांनी जिकिरीने पण जिव्हाळ्याने करणे अगत्याचे आहे. जातीय तेढीमुळे घरेच्या घरे उद्ध्वस्त होतात. नीतिमत्ता इतकी बिघडून जाते की मनुष्य मनुष्याला ओळखू शकत नाही. भीतिप्रद वातावरण निर्माण होऊन लोक अनैतिक मार्गांचे अवलंबन करावयाला प्रवृत्त होतात. याला तुम्ही–आम्हीच कारणीभूत आहोत. पण असली स्थिती यापुढे राहणे राष्ट्राला फारच धोक्याचे आहे. सर्व भिस्त समंजस नागरिकांवर आहे. सर्वांनी आपुलकीने सहकार्य दिले आणि राष्ट्रीय वळणाचे, बंधुत्वाच्या भावनेचे आणि समानतेच्या धोरणाचे जर विश्वासपूर्ण मार्गदर्शन केले तर बोकाळलेली जातीयता, गटभेद, पक्षभेद यांना आळा बसून राष्ट्रात ऐक्य व स्थैर्य प्रस्थापित करणे सुलभ जाईल.

समाजाच्या नीतिमत्तेवर राष्ट्रीय नीतिमत्ता अवलंबून असल्याने ती अधिक उज्ज्वल होण्यासाठी सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक जीवन पवित्र झाले पाहिजे. यासाठी प्रत्येकाने आणि पर्यायाने समाजाने (१) चारित्र्यशील वर्तन, (२) परस्पर सद्भावना, (३) समानतेची वागणूक, (४) संयमपूर्ण धोरण आणि (५) प्रामाणिक व्यवहार राखणेच म्हणजे समाजाची नीतिमत्ता शाबूत राखून समाजजीवनातून मंगलत्व निर्माण करणे आपले कर्तव्य आहे.

या अनुषंगाने समाज–जीवनात व्यक्तिविकास कसा घडला पाहिजे आणि

राष्ट्राभिमान राखून शालीनतेबरोबर वीर वृत्तीची घडण घडविताना विविध गुणांचा परिपोष कसा साधला पाहिजे याचाही आज दक्षतेने विचार करणे आवश्यक आहे. अर्थात हा विचार काहीशा आध्यात्मिक व सांस्कृतिक बैठकीच्या उच्च स्तरावरून व्हायला पाहिजे.

'शिक्षण' हे व्यक्ति–विकासाकरिता आहे. व्यक्तिविकासातील 'चिकित्सा' आत्मनिरीक्षणात्मक आहे. त्यात दृग्गोचर होणारे 'आत्मतेज' व्यक्तिविशेष दर्शविणारे आहे आणि व्यक्तिविशेषातच 'स्वयंपूर्णता' सिद्ध आहे. तेव्हा शिक्षण, चिकित्सा, आत्मतेज आणि स्वयंपूर्णता या गोष्टी जन्मसाफल्याच्या मुळाशी तादात्म्य पावल्या आहेत, म्हणून त्या आत्मसात करून घेणे मनुष्याला आवश्यक आहे. तिकडेच सुखाचा मार्ग आहे आणि म्हणून अधिकाधिक सुख मिळवून घेण्याकरिता मनुष्याची कृती अव्याहतपणे तिकडे धाव घेत असते. यातील सुख हेच मानवाच्या टप्प्यातील परमोच्च शिखर होय. मनुष्य आपली सर्व शक्ती या सुखात सामावलेल्या स्वयंपूर्तीकरिता खर्च करतो. तेच त्याच्या पूर्णविकासाचे एकमेव साधन आहे.

सदा वै सुखं लभतेऽथ करोति नासुखं लब्ध्वा
करोति सुखमेव लब्ध्वा करोति सुखं त्वेव विजिज्ञासितव्यम् ॥ २२ ॥

हे छांदोग्योपनिषदातील वचन उपर्युक्त कथनाला सिद्ध करते. अर्थात व्यक्तिविकासातील सुख समजून घेणे व मग तशी कृती आचरणे हा क्रम नियमबद्ध ठरतो. आता या सुखाची प्राप्ती कशी करता येईल हा प्रश्न उरतो.

नीच व उच्च हे दोन प्रकार या वृत्तीशी येतात. क्लृप्तीने दुसऱ्याचे ताडन करून, त्यातही परोक्ष व अपरोक्ष राहून, मी सदाचारी म्हणून मिरवून आनंद मानणारा हा एक आणि स्वतःचे ताडन होत असताही आहे त्याचे दान करण्यास प्रवृत्त असलेला हा दुसरा; म्हणजे दुसऱ्याच्या दुःखात एकाचे सुख व दुसऱ्याचे दुःख तेंच एकाचे सुख, अशी प्रचीती भिन्न स्वरूपात आढळते. या दोन प्रकारांत प्रथम सुख व नंतर दुःख व प्रथम दुःख तर नंतर सुख व्यक्तिविकासाच्या मागोमाग असते. यातील अत्यंत सुखावह मार्ग अर्थात पहिल्यापेक्षा दुसराच आहे. क्षणिक सुखासाठी गुलदस्तात राखलेला अमानुषपणा आज जरी व्यक्तिविकासमान भासत असला तरी उद्या तो खास विघातक ठरतोच. आणि व्यक्तिविकासातील खरे सुख या प्रकारात प्राप्त होणे शक्य नाही. उरलेला दुसरा प्रकार नेहमीच कसोटीला लागतो व त्यात तो व्यक्तिआभासाला बळी पडणाऱ्या शेकडा नव्वद लोकांना हास्यास्पद वाटतो. तीवर होता होईल तेवढा आघात केला जातो व बव्हंशी ती व्यक्ती न चमकता लुप्तही होऊन जाते. परंतु तिचा दर्जा या ना त्या प्रकारे जनतेच्या प्रत्ययास आल्याशिवाय राहत नाही. आणि मग तिची पूजाच केली जाते. लोकरंजनार्थ झिजत असताही उलट मारा सहन करणारी व्यक्ती जी दुःखातही

समाधानाचा सुस्कारा टाकते व होऊ दे त्याचे कल्याण म्हणून स्वतः जर्जर होते तेथेच व्यक्तीचा खरा विकास आहे. सुखाचा खरा आनंद अन्तरात्म्याला अनाहूतपणे याच वेळेला लाभतो. लोकांनी पाठ थोपटली नाही, पण मनाला ' मनुष्य म्हणून काही केले ' हे जे समाधान तेच परमोच्च सुख नव्हे काय ? भरतखण्डातील आपल्या पूर्वजांनी असल्याच सुखाच्या पाठीमागे स्वतःचे बलिदान केले आहे. व्यक्तिविकासाचा सत्यार्थ सोडून आजच्या शालेय शिक्षणाबरोबर आम्ही व्यक्तिविकासाच्या खुळचा गप्पा मारून स्वतःला धन्य मात्र समजतो.

आजची सुसंस्कृत समजली जाणारी व्यक्ती शिक्षणाचा भलताच अर्थ करू पाहत आहे. शिक्षणाचा अर्थच जबर स्वार्थाने भरलेला तर ती चिकित्सा तरी करून आत्मनिरीक्षण काय करील ? मग स्वयंपूर्णता तर दूर राहो. मी शिकलो, इतके अध्ययन केले, माझे वाक्‌बाण मर्मभेदी आहेत, शास्त्रपारंगत असून माझा कुणीही हात धरीत नाही, असा अहंभाव करणाऱ्याला मी म्हणेन दुबळ्या प्राण्या, तू कोणीच नाहीस, अरे, तुझा तू नाहीस. तू विद्वान झालास पण तुझी विद्वत्ता दुसऱ्याला बोधकारक ठरली नाही. तुझे चातुर्य तुझ्या बांधवांना भावळेच बनविते. तुझी मार्मिक दृष्टी दुसऱ्याचे हालच पाहत मंदावली. आंबा पिकला, गळून जागीच सडला, कुणी चाखला नाही, त्याचा काही उपयोग झाला नाही. तेव्हा अशा विद्वानाचा जनकल्याणासाठी उपयोग होत नसला तर ते असून नसल्यासारखेच ठरतात व मार्गात त्यांना जो जबर धक्का बसतो, त्यातच त्याची विद्वता विराम पावते.

व्यक्तीचे मूळचे सौजन्य अधिकाधिक सुखावत असताना ढासळत जाते, ताठरपणा निर्माण होतो. दुसरा माझ्यापुढे कुणीच नाही अशी अहंमन्यता निर्माण होते. कार्याच्या दृष्टीने सेवेच्या स्वरूपाने कोण लायक हे तिच्या जड होत गेलेल्या बुद्धीला दिसत नाही आणि दिसत असले तरी दोन पैसे पदरी असल्यामुळे दुसऱ्याला चिरडून टाकण्यास ती मागे-पुढे पाहत नाही. मग शिक्षण घेऊन असली कृती घडत असलेल्यांचा विकास होतो असे म्हणता येईल का ? पाशवी विकास होतो असे मात्र म्हणता येईल. व्यक्ती गरीब असली, भिकार असली, तरी तिला हृदय असते. ती हृदयाच्या श्रीमंतीचे वर निर्देशिलेल्या निष्क्रिय कृतीच्या व्यक्तीचे कल्याणच इच्छिते. हेही सुख काही कमी नाही कारण यात समाधान हे प्रमुख असते.

जिहीं आपल्या सर्व यत्ने । पराचे क्लेश परि हरणे ।
श्रमोनी पुढल्या सुख दावणे । तो एक धन्य संसारी ॥

मुक्तेश्वरांची ही उक्ती हृदय-विकास-वाद्यांनी अवश्य ग्रहण करावी. आता हृदय-विकास म्हटला की आत्मनिरीक्षणाला महत्त्व प्राप्त होते. आणि आत्मनिरीक्षण परिस्थितीची चिकित्सा झाल्याशिवाय परिपूर्ण होणे अशक्य. या वेळेस शिक्षणाचे

मुख्य साधन जो 'अनुभव' तोच श्रेष्ठ ठरतो. म्हणजे जो जो अनुभव वाढला तो तो दोन स्थितीतील फरक व्यक्तीला अजमावता येईल व तिची चिकित्सा 'मी कुठे' या प्रश्नाकडे अधिकाधिक झुकेल. अर्थात या ठिकाणी सारासार विचार करावा लागतो. आणि या कामी बुद्धी आणि मन यांची जोड लागते. व्यवसायात्मिका बुद्धिः मनोव्याकरणात्मकम् म्हणजे बुद्धीला व्यवसाय म्हणजे सारासार विचार करून निश्चय करणारे आणि मनाला व्याकरण म्हणजे व्यवस्था करणारे प्रवर्तक इंद्रिय समजण्यात येते. (म. भा. शां. २५१ :: ११ भ. मी. २४४) अर्थात हृदयविकास पावणाऱ्या व्यक्तीला या चाकोरीतूनच जावे लागते. फॅशनयुक्त लाभणाऱ्या आजच्या शिक्षणात व्यक्तीचा दृष्टिकोन फारच आकुंचित व अनुभवशून्य असा होत गेल्याने कितीही शिक्षण घेतले तरी वर उल्लेखिलेल्या चाकोरीतून ती न गेल्याकारणामुळे ती हृदयविकासाच्या क्षेत्रात मान्य होत नाही. पण ती स्वत:ला तशी समजून वावरते म्हणून विकासयुक्त ती आहे असे कसे म्हणता येईल ? आजचे शिक्षणच असे होऊन बसले की व्यक्ती स्वत:पुरतेच पाहते. ती अंगी असलेल्या शक्तीचा उपयोग लोककल्याणार्थ करीत नाही. तिची विचारधारणाही संकुचित होऊन जाते. तेव्हाच वृत्तीला वश होऊनच आपले वर्तन पुष्कळ अंशी होत असते. म्हणूनच वृत्तीला जर नीट वळण दिले नाही तर ज्ञान केवळ दुर्बळ व व्यर्थ होते. ते पोकळ नव्हे, शुष्क होय असा मार्मिक शेरा कै. न्या. मू. रानडे यांनी दिला, तो आजच्या शिक्षणाने रंगलेल्या विद्वानांनी नजरेआड करू नये.

"वाणी" आणि "विवेक" या दोन गोष्टी व्यक्तिविकासातील महत्त्वाच्या आहेत. वाणीची देवाण–घेवाण विवेकपूर्ण असावयास पाहिजे. तो ज्याच्याशी बोलेल त्याला 'आनंद' च देऊन व ज्याला कार्याला लावेल त्याला 'विवेका'च्या संगतीनेच ! विवेक नसला तर तो शिक्षणतज्ज्ञ असून बेकामच आहे. मग त्याने कितीही मोठेपणाचा आव आणला तरी टाकाऊच ठरतो. कारण मोठेपणाच्या गुर्मीत त्याची वासना नको ती गोष्ट करून बसते. काही 'अधिकारी'वर्गात मोडणाऱ्या व्यक्तींचे आचार–विचार लक्षात घेतले म्हणजे निरनिराळ्या छंदापायी त्यांच्या हातून घडणारे अक्षम्य गुन्हे त्यांच्या व्यक्तित्वावरील काळे ठिपके ठरतात व तेच त्यांच्या विनाशाचे द्योतक ठरतात. यात त्यांचा अधिकार, पैसा व दर्जा एका साध्या पण हृदयवान मजुरापेक्षाही कमी प्रतीचा ठरतो. योग नको याग नको वा त्रिदंडसंन्यास। एक विवेक पुरे, त्या आवरती वासना न अन्यास ।। मोरोपंतांच्या या वचनातील आदेश किती मोलाचा आहे हे कळून येईल. विवेकाबद्दल हे जसे, तसे वाणीबद्दल "वाच्यार्था नियताः सर्वे वाङमूला वाग्विनिसृताः तां तु यः स्तेनयेद्वाचं स सर्वस्तेयकृन्नरः" (मनु. ४.२५६) हे वचन होय. मनुष्याचे सर्व व्यवहार वाणीने चालले आहेत. एकमेकांचे विचार एकमेकास कळविण्यास शब्दांसारखे दुसरे

साधन नाही. मग या सर्व व्यवहाराला आश्रयीभूत असा जो हा वाणीचा मूळ झरा तोच जो गढूळ करतो, तो मनुष्य सर्व मुद्दलाचीच एकदम चोरी करणारा होय. म्हणून "सत्यपूतां वदेद्वाचं" (मनु. ६. ४६) जे काही बोलावयाचे ते सत्याने पवित्र झालेले असेच बोलत जा, असा वरील वचनाचा भावार्थ व्यक्तिविकासाशी संलग्न नाही काय? एकसमयावच्छेदेकरून व्यक्ति–विशेषात मोडणाऱ्या या सर्व गोष्टी व्यक्तिविकासात अंतर्भूत होतात.

व्यक्तीने कधीही दुर्मुख असू नये. सर्व कळत असताही प्रसंगी दुर्बलता व्यक्त करणे, स्वतःला व स्वतःच्या राष्ट्राला आचवण्यासारखे आहे. तेव्हा व्यक्तीची चमक उठलीच पाहिजे. अत्याचारापासून निरपराध्याचे संरक्षण करणे व्यक्ति-विकासातील व्यक्ति-तेजाचे एक प्रमुख लक्षण आहे. आणि म्हणून स्वार्थाने आक्रमण करणाऱ्या अथवा दुष्टपणा करून अघोर कृत्य करणाऱ्या दुष्टांना सरळ मार्गावर अर्थात प्रथम मानाने, लीनतेने नि नंतर बुद्धिबलाने व शेवटी अंगबलाने आणणे प्राप्त कर्तव्य ठरते. अशावेळी भलत्याच शिक्षणाने सुखलोलुप झालेल्या व्यक्ती भीरुता दाखवून दुष्टांनाच साथ देण्याचा प्रयत्न करतात. वैयक्तिक अशा क्षणभंगुर सुखासाठी आपल्या बांधवांना फासाला लटकविणारे असे नराधम कबजीकलुषाप्रमाणे औरंगजेबाचे हित साधताना स्वातंत्र्यसिंह छत्रपती संभाजीस पकडून देतात व जो आपल्या धर्माचे आपणहून छेदन करतो व आपला माणूस स्वार्थासाठी बळी देतो, तो आपल्याला काय साथ देईल, हे समजून औरंगजेब त्याचाही शिरच्छेद करतो, हे विसरून जातात. व्यक्तिविकासात महत्त्वाचे अंग म्हणून याचा निर्देश केला आहे. तेव्हा जे स्वतःचे अस्तित्व नष्ट करून हातपाय गाळून बसतात अशांनी "मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरम्" (महा. भा. उ. १३२ : १५) हे उदाहरण अंगी बाणवावे. यात वीरपत्नी विदुला आपल्या पुत्रास असे सांगत आहे की "अंथरुणावर पडून कुजत किंवा घरात शंभर वर्ष फुकट धुमसत पडण्यापेक्षा घटकाभर पराक्रमाची ज्योत दाखवून मेलास तरी बरे." आणि मला वाटते हा कित्ता भारतवासीयांनी गिरवायला पाहिजे. ही शक्ती आपणात नसेल तर पुरुषार्थ नाही. कारण पुरुषार्थात कोणताही प्रसंग सावरता आला पाहिजे. त्यात व्यक्तीकडून लेशभरही उणीव नसावी. व्यक्तिविकासात याला प्रामुख्याने स्थान दिले जावे. कारण विकासात "भ्याडपणा" नसावा. तो मानवी प्रगतीवरील कलंक आहे. त्यात जोमच लागतो व तो "स्वयंसिद्ध" असावा लागतो. सत्कारणी देह ठेवण्याची ही उच्च कसोटी आहे. ते पार पाडण्याचे सामर्थ्य व्यक्तीला राखलेच पाहिजे. असे करताना सत्पुरुष स्वतःच्या अन्तःकरणाचीच साक्ष धरतात.

सतां हि संदेहपदेषु वस्तुषु
प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ॥

अशा तऱ्हेने मनुष्याच्या जीवनक्षेत्रात नानाविध प्रकाराने अंतिम सुखाची पण

व्यक्तिमहत्त्वाची सार्थ कल्पना सामावली असते. समंजसांनी आपल्या बुद्धिमत्तेने, अभ्यासाने दृष्टीसमोरील दृश्ये अनुभविली पाहिजेत आणि कसलाही भेद न बाळगता मी याचक, मी सेवक, मला ऐकले पाहिजे, मी राबणार, स्वत: मरणार पण दुसऱ्याला तारण्याचा शेवटचा श्वास पणाला लावणार असा बाणा जर प्रत्येक व्यक्तीकडून राखला गेला तर त्या व्यक्तीचा पूर्ण विकास जसजसा ती आपले हृदय कामी आणत जाईल तसतसा फलद्रूप होऊन आत्मतेज प्रकट होईल व त्यातच लाभणाऱ्या "सुखात" त्या व्यक्तीची स्वयंपूर्णता सिद्ध होईल.

□ □ □

---

पुरुषार्थ : मे १९४५ च्या अंकात 'व्यक्तिविकास' व पूर्व मध्यप्रदेश शासनाच्या १५ ऑगस्ट १९४९ च्या 'प्रकाश' पाक्षिकात 'समाजाची नीतिमत्ता' हे लेख प्रसिद्ध. या दोन्ही लेखांचा प्रस्तुत समन्वयात्मक लेख पुणे–नागपूर येथील १९६१ च्या 'तरुण भारत'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध.

सर्ग २

# मराठी साहित्य : समाजसुधारणा आणि राष्ट्रीय जबाबदारी


१. मराठी वाङ्मय आणि समाज-सुधारणा
२. लोकसाहित्य : दलित जीवन आणि संस्कृती
३. अतीन्द्रिय विश्वातील प्रभाव
४. क्रौर्य नको, शौर्य हवे
५. राष्ट्रीय एकतेसाठी साहित्यि-कांची जबाबदारी

# १.

## मराठी वाङ्मय आणि समाजसुधारणा

खेड्यापाड्यांची सुधारणा कशी घडविता येईल व त्यासाठी कोणत्या साहित्याची कशी आवश्यकता आहे याचा विचार होणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्रातील बहुजन-समाजाच्या कल्याणार्थ जे साहित्य निर्माण झाले, ते म्हणजे 'संतवाङ्मय'च होय. तसे पाहू गेल्यास, आज नामवंत गणलेल्या साहित्यिकांचे वाङ्मयभांडार मराठीत काही कमी नाही. पण त्या वाङ्मयाचा उपयोग केवळ विशिष्ट वर्गाच्या जीवनासाठी म्हणजे शहरवासीय लोकांसाठी, त्यातूनही मोजक्यात मोजक्या लोकांसाठी उपयोगी ठरत असावे. खेड्यातील कोट्यवधी लोकांच्या तर ते जराही उपयोगी नाही असे आढळून येते. जे खेड्यातील प्रत्येक व्यक्तीच्या जिभेवर कोणत्या ना कोणत्या प्रकारे नाचत असते, ते म्हणजे संतवाङ्मय व लोकसाहित्यच काय ते आहे.

अज्ञानांना सज्ञान करणे व त्यांच्यात सर्व प्रकारची जागृती निर्माण करून त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटणे याचीच नितांत गरज आहे. वाङ्मयनिर्मितीसुद्धा त्या दृष्टीने व्हायला पाहिजे. एका विद्वानाने संस्कृतप्रचुर म्हणा अथवा भारदस्त भाषेत म्हणा एक मोठा ग्रंथ निर्माण केला. खेड्यातील जीवनावर प्रकाश पाडावा, हा त्याचा हेतू. ज्या उद्देशाने ग्रंथ निर्माण केला गेला, त्या दृष्टीने या ग्रंथाच्या किती प्रती खेड्यातील किती लोकांच्या हाती पडून ते आपले जीवन सावरण्यास समर्थ होऊ शकतील. ग्रंथच काय मासिक किंवा वर्तमानपत्र घ्या. ज्या गावात शाळा असेल त्या ठिकाणी एखादे मासिक वा वर्तमानपत्र पोचत असेल, तर पोचते त्यातूनही केवळ बोटावर मोजण्या-

इतपत असणारा शिक्षकवर्ग चटकदार माहिती वाचून ते टाकून देईल ! तेव्हा खेड्याच्या हृदयाला जाऊन भिडणारे व जनमनाची पकड घेणारे साहित्य किती व कसे आहे आणि त्याचा समाजकल्याणार्थ कितपत उपयोग होतो याचा सुधारकांनी आत्मलक्षी होऊन विचार करावयास पाहिजे.

ग्रंथसंपत्ती म्हणून जे वाङमय साहित्यकार निर्माण करतात, त्याला खेड्यातील जीवनाच्या निकषावर ठेवायला हवे. कारण आपल्या भारतात ज्यांचे जीवन हे जीवनच ठरत नाही; उलट ज्यांच्या कष्टावर शहरवासीय लोक जगतात, अशा श्रमजीवी, शेतकरी, मजूर, दलित इ. वर्गाच्या उद्धारार्थ आपण आज कोणते साहित्य निर्माण करीत आहोत ? अव्यक्त ते व्यक्त करणे व स्वत: शिकून इतरांना धडा देणे, हे कार्य प्रत्येक सुज्ञाचे आहे व त्या दृष्टीने प्रत्येक व्यक्ती सुसंस्कृत झाली पाहिजे; तिने आपल्या सुखदु:खाचे समालोचन स्वत:च केले पाहिजे व राष्ट्राचा दर्जा वाढेल अशी सत्कृती आचरली पाहिजे. सत्कृती म्हणजेच संस्कृती आणि संस्कृती म्हणजेच जीवनाकार. अर्थात तसल्या उदात्त विचारांनी प्रेरित होऊन साहित्य निर्माण व्हायला पाहिजे तेव्हाच ग्रामीण लोकांच्या खडतर जीवनावर त्याचा इष्ट प्रकाश पडून त्यांची सुधारणा घडायला मदत होऊ शकेल आणि तेच साहित्य लोकोपयोगी 'साहित्य' ठरेल.

दिवसभर राबल्यानंतर खेड्यातील लोक रात्रीचे भोजन आटोपून, जमावाजमावाने ठिकठिकाणच्या अड्ड्यांवर एकत्रित होतात. अर्धा, एक तास कामधंद्याच्या गोष्टी झाल्यानंतर, गोष्टीवरून गोष्ट निघते आणि त्याचे रूपांतर काही अद्‌भुतरम्य तथा बोधप्रद लोककथांत होते. काही अड्ड्यांवर भक्त दामाजी, संत तुकाराम, संत नामदेव इत्यादी भक्तांच्या चोपड्या एखाद्याकडून वाचल्या जातात व त्यावर साधकबाधक चर्चाही होते. काही वेळा त्यांच्या मनाला रंजवितील अशा तोतामैना, गुलबकावली, अकबर–बिरबल, हातीमताई आदी चटकदार वर्णनांच्या कथांतून नीतिबोध होईल, अशी गोष्टींची पुस्तके वाचली जातात; तर काही ठिकाणी भजनी मंडळात लोक रंगून जातात. वर्षाच्या काही काळात हे लोक दंडारी, तमाशे, गोंधळ, नाच–गाणे इ. करमणुकीच्या गोष्टींत इतके रममाण होतात की, उद्या आपल्यावर कसले संकट ओढवेल याची त्यांना जराही जाणीव नसते. तसेच कर्जबाजारीपणा, निरक्षरता, रोगराई, विविध व्यसने आणि त्यांचा जीवनावर होणारा अनिष्ट परिणाम यांकडे त्यांचे पूर्ण दुर्लक्ष होते. त्यामुळे त्याचा परिणाम आपली खेडी दुर्बल होण्यात आणि राष्ट्राच्या शक्तीत शिथिलता उत्पन्न होण्यात झाला आहे. याला कारण निष्ठावंत कार्यकर्त्यांचा अभाव व दुसरे म्हणजे साहित्याचे लोण खेड्यापर्यंत न पोचणे हे होय.

व्यासपीठावरून सुधारणांच्या घोषणा केल्याने आणि त्यासाठी वर्तमानपत्राचे रकाने भरविल्याने व्हावे ते कार्य होऊ शकत नाही. यासाठी खेड्यातील

जीवनाशीच सुधारकांना समरस व्हायला पाहिजे. त्यांच्या अडचणी लक्षात घेतल्या पाहिजेत; आणि ते आपल्या कार्यात बाध न आणता हिरिरीने सहकार्य करण्यास सहज प्रवृत्त होतील अशी वर्तणूक राखली पाहिजे. 'ग्रामसुधारणा झाली पाहिजे' म्हणून आपले मत व्यक्त करणे सोपे आहे, पण सुधारणा घडविण्याचे कार्य मात्र सुधारकाला जिद्दीने उचलता येत नाही. आजकाल तर सुधारणेच्या नावाखाली लोकांना खोटी अभिवचने देऊन व निरनिराळ्या क्लृप्त्या रचून सुधारक निवडणुकी लढवितात व राष्ट्राची उन्नती घडविण्यापेक्षा त्याच्या अधोगतीलाच कारणीभूत होतात; असे बहुतांशी आढळून येते.

खेड्यातील स्थितीचे चिकित्सक दृष्टीने निरीक्षण केल्यास आणखी एक गोष्ट मनाला जाणवते. ती म्हणजे आपली संस्कृती व तिची होणारी अवहेलना. ग्रामसुधारणेच्या बाबतीत हिंदुधर्मातील लोकांनी बेफिकिरी बाळगल्यामुळे आपली उज्ज्वल संस्कृती एका निराळ्याच प्रवाहाने वाहू लागली. याला जबाबदार आपल्या काही सुधारकांची अदूरदर्शी तऱ्हा आणि साहित्यिकाचा 'पुरोगामी' या नावावर केवळ शाब्दिक रण माजविण्याचा हव्यास. तद्वत संस्कृतिपोषक साहित्याच्या निर्मितीचा अभाव. आज 'पुरोगामी' म्हणविणारे साहित्यकार जे साहित्य निर्माण करतात किंवा ज्या कल्पनांचा पुरस्कार करतात, ते खेड्यातील जीवनाशी कितपत संबंध राखून आपल्या लेखणीचा सदुपयोग करतात याचाही विचार केला पाहिजे.

माझ्या दृष्टीने सुधारणेसाठी पुढील सूचना कराव्याशा वाटतात— (१) खेड्यातील लोकांच्या जीवनाशी समरस होणे, (२) त्यांच्या अडचणी आस्थेने लक्षात घेऊन त्यांसाठी उपाययोजना त्वरित अमलात आणणे, (३) साक्षरतेच्या प्रसारासाठी ग्रामपंचायतीप्रमाणे ठिकठिकाणी साक्षरता–प्रसार-केन्द्रे स्थापन करणे, (४) त्याचबरोबर, फिरत्या वाचनालयाची व्यवस्था करणे, (५) भेदभाव न राहता खेळीमेळीचे वातावरण निर्माण करण्यासाठी व नीति-विषयक दर्जा कायम राखण्यासाठी आध्यात्मिक आणि राष्ट्रीय स्वरूपाच्या व्याख्यानमाला सुरू करणे, (६) त्या त्या जातीच्या रीतिरिवाजाप्रमाणे लग्नादी कार्यास आजकाल जे थाटामाटाने व परिणामी घातुक स्वरूप येत चालले आहे, त्यासाठी त्या त्या जातीत परिणामी इष्ट स्वरूप येण्यास लग्नमंडळे व धर्मविधि-मंडळे स्थापन करणे, (७) आणि 'आरोग्यविषयक मंडळे' निर्माण करून फिरत्या औषधालयांची व्यवस्था करणे.

या सूचना नवीन नाहीत, हे खरे. पण डोळ्यांसमोर आज अमलात येणारे काहीच विधायक कार्य नाही हेही तितकेच खरे आहे. अपवादात्मक घडणारी ग्राम-सुधारणा म्हणजे अभिमानाने दर्शविली जाणारी सुधारणा नव्हे. तेव्हा नमूद केलेल्या सूचना कशा अमलात आणाव्यात की ज्यामुळे आहे त्यापेक्षा समाजाची स्थिती सुधारेल, हे सुधारकांनी ठरवावयास हवे. तद्वतच विविध प्रकारचे दलित समाज

आहेत. त्या समाजात त्यांच्या अवस्थेचा व समस्यांचा नीट अभ्यास करून, हितप्रद नवविचारांचे लोण पोचविणे आणि जातिभेद व विषमता नष्ट करण्याचा कसोशीचा प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. या उद्देशाच्या सफलतेसाठी वाङमय खेड्यापर्यंत पोचावयाचे, म्हणजे प्रथम खेडुतांना वाचता आले पाहिजे, नंतर त्यांना सुलभतेने पुस्तके मिळाली पाहिजेत व जे वाङमय आज राष्ट्रीय जीवनावर परिणाम घडवीत आहे, त्या वाङमयाचे मर्म प्रचारकांनी त्यांना नीट समजावून सांगितले पाहिजे.

ग्रामसुधारणेच्या दृष्टीने ज्या सूचना विशद करीत आहे त्या एका ठराविक दिशेने अमलात आणणे सोपे नाही, असा त्यावर कोणी आक्षेप घेईल. परंतु माझ्या अल्पमतीने प्रत्येक जाणत्या व्यक्तीने ते आपले कर्तव्य मानून थोडेबहुत कार्य केले तरी विशेष श्रम न पडता हे कार्य सहज पार पाडता येईल. फक्त आपल्या अंतः-करणात खेडुतांविषयी तळमळ व कार्य यशस्वी करण्याची तत्परता मात्र असावी, म्हणजे ‘ आदर्श खेडे ’ निर्माण होऊ शकेल. पण सर्व भर कृतीवर हवा आहे आणि कृती निरपेक्ष सेवावृत्तीने घडावी. आपल्या चांगुलपणाने आपणाला शत्रूंचाही मित्र करता आला पाहिजे. खेड्यात ही दक्षता बाळगावीच लागते. ज्याच्याशी आपण बोलतो, त्याची भाषा व वर्तण्याची तऱ्हा लक्षात घेऊन त्याला उमगेल व तो आपला होईल अशी उच्च भूमिका आपण सदैव आचरली पाहिजे.

‘ साक्षरता प्रसार ’ झाल्याशिवाय खेडुतांचा बुद्धिविकास होणार नाही, हे कोणीही मान्य करील. पण बुद्धिविकासासाठी प्रथम खेडुतात चांगल्या विषयाची गोडी निर्माण केली पाहिजे. त्यासाठी त्यांना कोणत्या गोष्टी रुचतात, त्या लक्षात घेऊन आपणाला त्यांच्या रीतिरिवाजाप्रमाणें वागावे लागेल, त्यांच्या कलाने पावले पुढे टाकावी लागतील. लोकसाहित्य व लोककथा यांचा अभ्यास करून ग्रामसुधा-रणेचा दृष्टीने त्यांचा आविष्कार घडवावा लागेल. तसेच ग्रामीणांची आवड व दृष्टी ओळखून शक्यतोवर त्यांच्याच बोलभाषेत पण अधिक सुबोध व बोधप्रद स्वरूपात गोष्टी तयार केल्या पाहिजेत. अशा साहित्याचा प्रसार करण्यात कसूर करून भागणार नाही.

ग्रामसुधारणा करीत असताना संस्कृतीवर अधिक भर देण्यात यावा. नीतिमत्तेला व सदाचाराला प्रभावी उठाव मिळेल असे धोरण निर्माण करण्यात यावे. त्याच्यासाठी छोटचा छोटचा चोपडचांच्या रूपाने बोधक वाक्प्रचार, म्हणी, जानपद गीते वगैरे गोवून त्याचा सर्रास प्रसार व्हावा. त्यांची भजनी मंडळे, चर्चा मंडळे इत्यादी स्थापन करून त्यांना जीवनाची यथार्थ कल्पना आणून देण्यात यावी. तेव्हा खेडुतांची सेवा करू म्हटले तर आत्मदानाचीच तयारी असली पाहिजे. केवळ इतर राष्ट्रांची कोरडी उदाहरणे देण्यात व व्याख्यानबाजी करण्यात काहीच लभ्यांश नाही.

त्याचप्रमाणे फिरत्या वाचनालयांची योजना बऱ्याच प्रमाणात अमलात

यावयास पाहिजे. आता वाचनालय म्हटले की, सर्वच लोक तेथे येऊन भाग घेतील असे नाही. तेव्हा ठिकठिकाणच्या अड्डयांवर जाऊनही खेडुतांच्या जीवनावर प्रकाश पडेल अशी माहिती त्यांना वाचून दाखविली पाहिजे व त्यावर साधकबाधक चर्चाही व्हायला हवी. या सर्व गोष्टी करताना मातृभाषेकडे मात्र जराही दुर्लक्ष होऊ नये. तसेच, परकीय शब्दांची यत्किंचितसुद्धा सावली पडू देऊ नये. ग्रामसुधारणेत ' आरोग्यमंडळा ' चीही अतिशय आवश्यकता आहे. त्या मंडळामार्फत लोकांना रोगांची सचित्र माहिती अत्यंत सुबोध भाषेत पुरविण्यात यावी. त्याचप्रमाणे या मंडळातर्फे खेड्यातील रोग्यांची शुश्रूषा होऊन त्यांना मोफत औषधोपचारही करण्यात यावा. त्यासाठी औषधालय फिरते ठेवावे व त्यात देशी औषधांचाच व उपचारांचाच शक्यतो उपयोग करण्यात यावा.

लग्नमंडळे व विधिमंडळे निर्माण केली पाहिजेत हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मुद्दाम घेतला आहे. खेड्यापाड्यातून जुन्या चालीरीतींप्रमाणे लग्नपद्धतीला फारच वेगळे व फाजील खर्चाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्याचा परिणाम त्यांच्या जीवनावर इष्ट होत नाही. यासाठी सुधारकांनी तेथील लोकांची मने वळवून जाती-जातीतून लग्नमंडळासारखी मंडळे स्थापावी व हे अनिष्ट प्रकार थांबविण्याचे प्रयत्न करावेत. हा प्रश्न बिकट व नाजूक असला तरी तो सोडविणे संस्कृतिदृष्ट्या अगत्याचे आहे. खेड्यातील जनतेची संस्कृती, व्यवहार, शिक्षण इत्यादी बाबतीत उन्नती कशी करता येईल यासंबंधी ज्या काही सूचना केल्या आहेत, त्या दृष्टीने उपयुक्त वाङ्मय साहित्यिकांनी निर्माण करून त्याचे लोण खेड्याखेड्यातून पोचविल्यास समाजाचे व पर्यायाने राष्ट्राचे कल्याणच घडेल यात संदेह नाही.

□ □ □

---

*तरुण भारत : मराठी वाङ्मय खेड्यापर्यंत कसे पोचेल ? – ८ मार्च १९४४ व खेड्यांची सुधारणा कशी घडविता येईल – ७ जून १९४४. हे दोन्ही लेख संकलित.*

# २.

## लोकसाहित्य : दलित जीवन आणि संस्कृती

लोकसाहित्य हे वेद, श्रुति-स्मृती, गाथा-संहिता, शास्त्र-इतिहास आदी मान्य-वर ग्रंथमंडळाच्या अग्रभागी अधिष्ठित होणारे आणि चिरंतन अशी उदात्त जीवन व सांस्कृतिक मूल्ये सिद्ध करणारे ‘अलि-खित अक्षर वाङ्मय’ आहे. पण त्याहीपेक्षा ते वेद-शास्त्रादी पूर्वीच ध्वनित झाले, प्रस्तुत झाले, हे लक्षात घेतले म्हणजे त्या श्रेष्ठतम लोकसाहित्याचे उद्‌गाते, वारस-दार कोण, याचा सम्यक् दृष्टीने विचार केल्यास, आदिवासी म्हणजे भिल्ल, कोरकू, माडिया, गोंड, नागा, कोळी, ढिवर, कोलम, वारली आदी वन्य व पहाडी प्रदेशांत वास्तव्य करणारे; महार, मांग, चांभार आदी अन्त्यज समजले जाणारे आणि मग क्रमाने उदयास आलेले धंदाप्रधान असे मराठा, कुणबी, विणकर, लोहार, सुतार, सोनार अशा जाती–जमाती मोडत अस-ल्याचे आढळून येते. पण मूळचे म्हणजे जाती-जमातीचे थर दोनच. अन्त्यज अति-शूद्र म्हणून नोंदलेले आणि आदिवासी म्हणजे वन्य. अर्थात लोकसाहित्य-धनाचे तेच खरे उद्‌गाते व वारसदार ठरतात.

लोकसाहित्याच्या या जनकांनी आणि प्रवर्तकांनी आपल्या मातृभूमीचे रक्षण, जतन व संवर्धनही केले आहे. त्यांनी प्राचीनत्वाच्या शुचितापूर्ण विशेषांचे, जीवन आणि संस्कृतीचे अबाधित्व प्राण पणाला लावून राखले आहे. मांगल्याचे निदर्शक असणारी आणि नीतिनियमांचे व रीति-भातींचे उदात्त प्रतीक असलेली भारतीय प्रकृती जोपासली आहे, त्या दलितांनी नियतीच्या कलानुसार शून्यातून जीवन आविष्कृत केले, नव्हे ते अलंकृतही केले आहे. त्यांनी ध्वनी निर्माण केला आणि त्याला शब्दाकार दिला. शब्दात त्यांनी

विविध भावरंग भरले. तरल कल्पकतेने शब्दाशब्दांची मधुर व प्रभावी जुळणी केली आणि नवरसांनी त्यांनी लोकवाङ्मयाची सहजस्फूर्त उभारणी करून, रंग-रूपासह त्याचा मधुर गंध सर्वत्र दरवळविला. ध्वनी, शब्द, रंग, रूप, रस आणि गंध यांचा लोकसाहित्यात आविष्कार घडवूनच नव्हे तर नाट्य, नृत्य, चित्र व संगीत कलांची निर्मिती करून, दलित या आदिसंतानांनी सांस्कृतिक जीवन तेजोवर्धित केले आहे. विविध प्रतिमा व प्रतीके आणि प्रमेये दर्शवून त्यांनी जीवनातील विविध पैलूंची रसोत्कट अभिव्यक्ती घडविली आणि आपल्या जीवन व संस्कृतीची अस्मिता प्रकट केली.

लोकसाहित्य हे अलिखित अक्षरवाङ्मय आहे. त्याची अस्मिता काही आगळीच आहे. ते काही पुरातन काळच्या भूर्जपत्रावर, ताडपत्रावर, ताम्रपटावर किंवा स्तंभ-स्तूपावर कोरलेले अथवा आधुनिक यंत्रसामग्रीच्या साहाय्याने निर्माण केलेले साहित्य नाही. स्वयंस्फूर्तीने निर्माण होणारी ती दलितांची अमर लोकवाणी आहे. हृदयाचे ते उत्स्फूर्त व उत्कट बोल आहेत. कृषीवलजीवनातून पाझरणारे ते निर्मळ निर्झर आहेत. दलित ग्रामीणांच्या हृदयसागरातून उगम पावलेली व त्यांच्या जिव्हेवरून तरंगत गगनाला जाऊन भिडणारी ती लोकगंगा आहे. त्या गंगेत दलित खेडुतांच्या सुख-दुःखाचे, आचार-विचारांचे, कर्तव्यधर्मांचे, नीतिनियमांचे आणि रीतिरिवाजांचे अनेक प्रवाह आहेत. त्यांच्या भावभावनांची अनेक मूल्यवान रत्ने तिच्या पोटी दडली आहेत. वस्तुतः या रत्नांची कोणी कितीही लूट करू शकतो, त्यांचा यथेच्छ उपभोग घेऊ शकतो. परंपरागत सद्‌भावदर्शक व्यवहार, आचार-विचार, सभ्यता, संस्कृती आणि प्रखर अनुभव भावनासंचित लोकोक्तीत सामावले असून, गीत, वृत्त, कथा, नाट्य, नृत्य व संगीत आदी प्रकारांनी ते ध्वनित केले आहे. दलितांचे जे अलिखित पण मानवजीवनाला पूर्णतः स्पर्शजन्य असे वाङ्मय, कला, संस्कृती आदी सारे त्यांचा ' प्रत्यक्षदर्शी लोकांना सर्वदर्शी भवेन्नरः ' असा मंत्र झाला आहे.

दलितांनी निर्माण केलेल्या लोकसाहित्यसृष्टीच्या अत्यंत विशाल अंगणात ' बाळ शूर खोसे कंबरेले कट्यार धारेची । दुस्मनाले धक्का देई लाज राखे मायेची ।। ' अथवा ' रक्ताचा सळा(डा) रणावर सांडीन, जीवही देईन, भाऊ माहा वाचवीन ।। ' अशा वीररसाचे ध्वनी गगनाला भिडतात, तर कुठे, ' भारत-भू ' चे वारस आमी देह हा निष्प्राण, सजीव न झाले तर मग गेला राष्ट्राचा प्राण ।। अशी प्रखर देशभक्ती आकाराला येऊ लागते. कुठे ' जीवाचा स्वामी माहा दोषात फुसफुसे, परपंचाचा तागा माहा कचून जाईल । इठोबा माह्या देवा सर्गातून गा पाव, नायत, पोतीची गाठ तुटून जाईल । ' असा करुणरस हृदयाला पीळ पाडतो, तर कुठे, ' सासरचे कष्ट राया सारे साहून घेईन, जीव मी अर्पीन, वात बिन्द्राबनी ठेवीन । दिलाचा हेत राया तुमा सांगू कवन्यापरी, उभी साउली खाली तुमी एकटे

माहे हरि ।। ' अशी सद्भावपूर्ण ऋजुता थयथयत असते. ' रानाच्या येली गाती, चांदाले झोके देती । भरती मदनाले येई, मुके सुंदरीचे घेई ।। ' अथवा ' सारजा तुहं रूप आभारात नाहे धोये, गंगीच्या आरस्यात बिंदीची टिकली लावे ।। सारजा चंदेरीचा शालू उरावर्न सरे, गोरं बदन पाहून पापी इंदर ग झरे ।। ' असे श्रृंगाररसाचे हृद्य प्रवाह वाहत असतात. त्यावरून लोकसाहित्याच्या सुंदर रूपाचे, वेधक रंगाचे, मनोज्ञ रसांचे आणि अवीट गोडीच्या गंधाचे लोकसाहित्यमंदिर आपल्या डौलाने हृदय व मन आकर्षून घेते.

दलितांचे जीवन अत्यंत कष्टप्रद, हालअपेष्टाव्याप्त आणि दाहकच राहिले नसून, अनन्वित छळांनी आणि घोर अपमानांनी ते अधिक ज्वलंत झाले आहे. पण त्याही जर्जरावस्थेत दलितांनी आपल्या लोकसेवेचा सत्त्वशील धर्म सोडला नाही. शौर्य व धैर्य राखून त्यांनी आपल्या रखरखीत जीवनातून दुसऱ्यांचे जीवन फुलविले आहे. प्रामाणिकपणा, सचोटी व सद्व्यवहार प्रांजळपणे पाळून, त्यांनी सद्भावना, सत्प्रवृत्ती व सदाचार प्राण पणाला लावून जोपासला आहे. त्यांच्या श्रमावर व बळावर लोकजीवनाची इमारत उभी झाली आहे. पाषाण युगापासून दलितांच्या जीवन व संस्कृतीची पावनगंगा अव्याहतपणे वाहत आली आहे लोकसाहित्यात दलितांच्या जीवन व संस्कृतीचे विविध प्रवाह वाहत असल्याचे प्रत्ययास येऊन, त्यांच्या अस्मितेचे तेज सहजतेने प्रकट होते.

दलित शेतीवर राबतो आणि राबतच जातो. शेती उत्तम पिकावी, हाच एक त्याचा ध्यास असतो. निसर्गाची तो आराधना करीत असतो—

चला बायांनो बायांनो, रोवनं बसून जाईल ।
आला सावनाचा मास, डोंगर डोंगर चिखल ।।
दादा सोनबाचं शेत, सावनाची आली छाया ।
ओरी ओरी पात धरा, नाय तं पेंड्या जातीन वाया ।।
अवो रोवा घाई घाई, बादल गरजते लई ।
घरामंधी वाट पाहात असल सई जाई ।।
सावना माह्या बापा, नजर ठेव शेतावर ।
गावामंधी तुहे लेक, बसले उपासी वाटेवर ।।

दलितांच्या कष्टाने शेत पिकाने बहरून येते. श्रमिकांची आनंदोर्मी उसळून येते. हर्षानं ते आपला भाव व्यक्त करतात.

बहरलं बहरलं शेत जोंधऱ्याचं बाई
कनसं डुलले डुलले मोतीयांचे लई

त्ये बाई मोती क् मोती क् हासाया लागले
गहू काय बोलले बोलले त्या जोंधऱ्याइले

तू दादा कनिसा कनिसा, भाग्याचा गा पुरा
जोंधरा बोलला बोलला, मले तुहाच आसरा.....

तूर–तीर मुंग व् जवस जाऊ–नंदा घरी
त्या बाई आंगनी आंगनी नेसून आली जरी

आणि कापसाचं शेत फुलून आलं. कापूसवेचणी होऊ लागली. कापूस मोजून घेणाऱ्याला बोल देऊन, बाया म्हणतात–

कापूस येचूनी दुखती नख–बोटं
कापूस मोजणाऱ्या नोको लावू मनगट

कापूस येचूनी परखाटी पळली सूनी
कोनाचं नाई कोनी समज धरा मनी

नखबोटं दुखेपर्यंत कष्ट घेऊन आपण कापूस वेचीत आहोत आणि वेचलेला कापूस मोजून घेणारा दांडी मारून खोट करीत आहे, हे पाहून त्यांचा आत्मा तळमळतो. कितीही कष्ट घेतले व इमानदारीने काम केले तरी त्याचे मोल कोणी करीत नाही. कोणी कोणाचा नाही, असा स्वानुभव त्या व्यक्त करतात. कष्टाने त्या निःश्वास टाकतात–

कापूस येचीन पर्‌खाटी धरून
माये तुहं गोत–नात् वळखलं दुरून
कापूस येचून येचून दुखते कंबर
भाऊ माह्या तुह्या नावाचे नंबर
बलांग्याच्या सेती जागले जागले
भावाच्या सेतामंधी मोती कनसाले लागले

अशा अभिमानाच्या शब्दांनी आपले कष्ट हलके करून, त्या भावाच्या शेतीचा गौरव करतात.

दलिताची मोडकी तुटकी झोपडी आहे. आतील देव्हाऱ्यावर दिवटी जळत आहे. घराला मोठ्या डेळी किंवा मोठे वासे नाहीत; केवळ बारीक कामटचा आहेत. त्या कामटयांना, दोरी नसल्यामुळे जुन्या धोतराची किनार काढून व तीच बांधून पाळणा केला आहे. त्यात लहान मूल झोपी गेले आहे. घरात खायला दाणा नाही. तेल, मीठ नाही म्हणून जंगलातील मोहांचाच रस काढला आहे आणि भाजी म्हणून अगदीच हलक्या प्रतीचा तऱ्होटा आणून त्याची भाजी केली आहे आणि मोठ्या प्रयासाने तयार केलेला मोहाचाच रस व तऱ्होटयाची भाजी सांडून जाऊ नये म्हणून शिक्यावर ठेवून दिली आहे. गृहिणीचा नवरा औषधपाण्याशिवाय विषमज्वरानं झोपडीच्या एका कोपऱ्यात तडफडत पडला आहे. अशा वेळी वीज

कडाडू लागली. सोसाटच्याचा वारा सुटला. ढग गडगडू लागले. आता कसे होईल, कोणता प्रसंग गुदरेल या भीतीने ती साध्वी स्त्री परमेश्वराजवळ करुणा भाकते :

इज क् चमकते वारा धुंद वो सुटला
माही इवलुसी झोपळी उळून जाईल...

आभारामंधी ढग गळगळे वाऱ्यासंगं धावे
देवाऱ्याची दिवनाली इझून जाईल...

धोतराची काठ–दोरी कमच्याले बांधली
पोराचा पारना माहा तुटून जाईल...

मोहाचा रस, तरोटच्याची भाजी सिकीवर
फुकाच्या लासानं माय् गरून जाईल...

जीवाचा स्यामी माहा दोसानं फुसफुसे
परपंचाचा तागा माहा कचून जाईल...

इठोबा माह्या देवा सर्गातून गा धाव
नाय त् पोतीची क् गाठ तुटून जाईन...

आज तरी काय आहे ? दलितांची हीच दैना, हेच दारिद्रय आणि हीच उपासमार चालू आहे. पूर्वीच्या काळात आणि आजच्या काळात कोणती तफावत पडली ? महागाई कडाडली आहे आणि दलितांना साधी मोलमजुरी करूनही अर्धपोटी तरी अन्न मिळेल, असे काहीच नाही. वनविभागाकडील दलित खरोखरीच आज, १९७४ साली, मोहाचा कच्चा चीक किंवा विशिष्ट प्रकारची झाडपत्ती खाऊन जगण्याचा कसाबसा प्रयत्न करीत आहे तर कुठे पुरलेल्या प्रेतांची हाडे काढून, दलित दोनचार पैशासाठी धडपडतो आहे. इतकेच नव्हे तर काही ठिकाणी दलित स्त्रिया आपल्या देहाची विक्री करून–अब्रू गमावून जगू पाहत आहेत ! दलितांचे केवढे घोर दारिद्रय आहे हे !

ग्रामीण गीतात एक दलित स्त्री एका शेजारीण असलेल्या स्त्रीला–सखीला–आपल्या कर्माची, उद्ध्वस्त होत असलेल्या संसाराची करुण माहिती निवेदन करीत आहे. ती डोळ्यांत आसवं आणून सांगते : ' अग सखे, माझ्या कर्माची गोष्ट ती तुला काय सांगू ? अग, माझ्या हातातील बांगडी तडकली ! सखे, माझ्या घरी आहे तरी काय ? जीर्ण फाटकी गोधडीच ना ! तिला केवळ काठच उरले आहेत. ते काठच म्हणजे अमावस्या पौर्णिमा ! जे उरलेले धागे दिसतात ना, आता ते धागे वंकट नावाचा सावकार डिक्री करून घेऊन जाणार आहे. त्याचे कर्ज फेडायला आणखी दुसरे काय आहे ? नाही म्हणायला संसार चालवायला कोंबडा होता. पण त्याला जगण्यासाठी जोंधळ्याचे दोन चार दाणे नको का द्यायला ? पण ते न

मिळाल्याने बिचारा टोपलीखाली झाकला होता, तेथेच मूर्च्छित झाला. नाही म्हटले तरी एक म्हैस होती तीही मृत्युमुखी पडली. दुधावरली सावळचा रंगाची वगार उरली होती. पण कोण्या दुष्टानं सुरी चालवून तिला घायाळ केले. चुलीत जाळायला तरी काय आहे ? एक उधार कोलती काय ती जळत होती. परंतु निसर्गालाही ती जळावी असे वाटले नाही. आभाळातून धो धो पाऊस पडला. धार चुलीत पडू लागली आणि जळती कोलतीही विझून गेली. राहिला तो घरधनी. खरेच सखे, असा गुणी नवरा कोणाच्या भाग्यात नसेल. पण आता तर तोही आजाराने कण्हत खाटेवर पडला आहे—एकेक पळ मोजत आहे !'

कावो सांगू सये माह्या करमाची गत
हातची बांगळी माये टिचकली !

अवस पुनव सये बोथरीच्या झाल्लरी
ठिगराचे उसळे धागे आली बंकट-डिग्री
हातची बांगळी माये टिचकली !

झाकला कोंबळा टोपलीखाल्या व्हता
जागचि मावुला माये मुर्झावून गेला
हातची बांगळी माये टिचकली !

दुधावर व्हती माही वगार सावरी
कवन्या पगारानं केल्ली तिह्यावर सुरी
हातची बांगळी माये टिचकली !

चुलीमंधी सये व्हती जरती कोलती
अभाराची धार माये इझवून गेली
हातची बांगळी माये टिचकली !

घरचा घरधनी सये पुथ्व्यामंधी येक
कन्हते बाजीवर पर पर मोजते येक येक
हातची बांगळी माये टिचकली !

अशी ही आपल्या कर्माची कथा ' हातची बांगळी माये टिचकली !' या शब्दांवर जोर देऊन ती स्त्री व्यक्त करताना आपल्या अंतरीच्या खोलवर चुरचुरत असलेल्या तीव्र जखमा दीनवाणे सांगत आहे. सावकाराचे घट्ट आवळलेले पाश आणि दुष्टांचा उगीचचा जुलूम यामुळे कशी शोचनीय अवस्था होऊन संसार उद्ध्वस्त होत आहे, यांचे हृदयद्रावक वर्णन यात आहे. ' बांगडी टिचकणे ' या दोनच शब्दांत जो खोल भावार्थ सामावलेला आहे, तो संपूर्ण दाहक परिस्थितीचं दर्शन घडविण्यास समर्थ आहे; आणि गरिबी हृदय कसे जाळत नेते ते स्पष्ट होते. खेड्यापाड्यातील त्या

स्वस्ताईच्या जुन्या काळी अशी दारुण अवस्था तर आजच्या महागाईच्या काळाचा महिमा तो काय वर्णावा ? गरीब खेडूत जनता आपले प्राण मुठीत धरून धगधगते क्षण कसे सहन करीत जीवन कंठते, याचे कितीतरी दाखले सादर करता येतील. गरिबीसंबंधीचे, 'गरीब फिफुली' (फुलपांखरू) हे रूपकात्मक गीत पाहा :

आरे रे भगवाना ! बाप्पा कसी येळा आली
इकुसी फिफुली धळकली !
फिफुलीचा संसार कनसावरला थेंब
कसा इरून गेला लांब !
बाप्पा इवलाले डोरे, इवलाले हातपाय
नाक्तोळच्यानं केला घात !
मोरपखाचा गा सेला फिफुली नेसली
दुस्मनानं चोरी केली !
मनाची भावूक दिलाची लई प्यारी
कसी आली तिले घेरी !
गरीबाची गरीब लेक फिफुली मायवंत
पाठिराखा तूच गा भगवंत !

आचाराविचाराने शुद्ध असलेल्या गरिबांवर, निरुपद्रवी जीवावर दैवी आपत्तीच म्हणून नव्हे तर जाणूनबुजून कोणते आघात कसे केले जातात ते या गीतातून प्रकर्षाने दिसून येते.

एका खेडूत विधवा बाईला एकच एक तान्हे मूल आहे. हा बाळच त्या माउलीचा एकमेव आधार. मूल दुधावरचे आहे; पण आईला दूध येत नाही. मूल दुधासाठी टाहो फोडते ! दुसरीकडून दूध आणायला तिच्याजवळ एक पैसाही नाही मुलाचा आर्त टाहो ऐकून ती व्याकुळ होते. ती गहिवरून म्हणते :– तान्हुल्या, कशाला बरं स्तनाला झोंबतोय, बाळा ! स्तनातून एकही थेंब दूध येत नाही रे ! – उगा राहा बाळा गोविंदा, उगा राहा. मातेचे नेत्र झरू लागतात. हृदय धडधडू लागते. शरीराला कंप सुटतो. कंठ भरून येतो. आणि ती पुत्राला कुरवाळीत म्हणते, 'माझी कूसच खराब, बेईमान जाली आहे रे ! तान्हुल्या, तुला मी जन्म दिला, त्या वेळी सायंकाळ झाली होती व ती रात्र– काळ रात्र होती. घरात असं काय होतं बाळा, की जे खाऊन मी पुष्ट होईन आणि मला भरपूर दूध येईल ! त्या रात्री तर तुझ्या जन्माच्या साथीला केवळ पोपटीचे दोनच दाणे काय ते होते. ते मी तुझ्यासाठी राखून ठेवले होते. बाळा, आता मजजवळ काय उरलं आहे बरं !' दु:खवेगाने आलेले हुंदके आवरणे तिला कठीण झाले. अश्रुधारा सैरावैरा धावू लागल्या. कोरडा आवंडा गिळण्याचा प्रयत्न करून ती करुण शब्दांत म्हणाली, 'होय,

आता सूर्य उगवला आहे. त्याचा प्रकाश तुळशीवर पडला आहे. तीच काय आता ग्वाहीला आहे. तिचीच सावली तुझ्यावर आहे. बाळा, अशा भेदक नजरेने इकडे तिकडे काय बघतोस रे ! अरे, तुझी ही दयनीय अवस्था पाहून चंद्रदेखील लाजेने खाली मान घालून पळून जाईल. लंगोटीसाठी कोणाकडून बोटभर चिंधी मिळेल अशी आशा नाही. गोविंदा बाळा, दूध नाही तर नाही, पण या भयंकर जंगलात चिकाची झाडे फार आहेत. ते चीक दूध म्हणून चाट. पण टाहो मात्र फोडू नकोस रे ! उगा राहा !' हृदयाला पीळ पाडणारे हे एक लोकगीत पाहा :

नोको झोम्बू तान्या, थानी नाई बूंद
कूस झाली वेईमान, उगा रे माह्या गोईन्दा ... उगा रे.
देल्ला जल्म सांजिले, तान्या व्हती कारी रात
घुगऱ्याचे दाने दोन, तुह्या जलमाची साथ ... उगा रे.
उगवला सुर्व्या, आली तपन तुरसीवर
गवाई हाये तान्या, तिची सावली तुह्यावर ... उगा रे.
आको नोको पाहू, चांद लाजेल गोईन्दा
बोटीच्या लंगुटीले, त्येची आस नाई बाळा ... उगा रे.
भारी चिकाचं जंगल, चिक चाट रे गोईन्दा
कारजाचा इकुसा टुकडा, नोको तोळू माया...उगा रे.

आपल्या तान्हुल्याला 'दुधा'ऐवजी 'चीक' चाटून जिवंत राहा पण माझी माया सोडू नकोस, अशी आर्त विनवणी करणाऱ्या अभागी मातेच्या भकास जीवनाचे चित्र सुखलोलुपी जीवन जगणाऱ्या व्यक्तींना पाझर फोडणारे नाही काय ? आणि त्या मातेची व बाळाची दारुण अवस्था समाजाला जागृत करायला समर्थ नाही काय ?

आणि मग–

त्या विधवा मातेच्या पुत्राचा अंत झाला ! दुधाच्या थेंबाविना, अन्नाच्या कणाविना बाळ तडफडून मेला ! पुत्राने अभागी मातेची माया टाकून दिली. परिस्थितीच्या तीव्रतर, धगधगत्या ज्वाळेत उडी घालून, आपली कैफियत सादर करायला तो बाळ देवलोकी निघून गेला ! त्या वेळी मातेने हृदय बडवून, दगडावर माथा आपटून जो आक्रोश मांडला, त्यासंबंधी हे हृदयभेदक शोकगीत पाहा :

बाळ साजरं गोजरं
मया लावूनिया गेलं
माहं कारज हरवलं...अगा ये देवा ऽ ऽ
नाई देल्लं थेंब दूध
म्हूनशा सोळलास नाद
आता देऊ कोना हाक...अगा ये देवा ऽ ऽ

बापा रानाचं पंखेरू
अगा जाऊ कोठी धरू
कवन्या राहुळात जाऊ...अगा ए देवा ऽ ऽ
बाळा इवलाले डोरे
इवलाले हात पाय
गेल्ला कायातला जीव...अगा ये देवा ऽ ऽ
तान्या रुसून तू गेला
कोन खजिना चोरला
समदा देह पेटला ... अगा ए देवा ऽ ऽ
नाई हासला येक येळ
नाही बोलला घळीभर
खसलं आभार उरावर ... अगा ए देवा ऽ ऽ
बाळा, गेलास देवाघर
देजो गावची खबर
खाक झालं समदं घर ... अगा ए देवा ऽ ऽ
देवा येकटी मी येक
आता नोको मले भीक
माह्या बाळाची झाली राख ... अगा ए देवा ऽ ऽ
देवा येकटी मी येक
आता नोको मले भीक
माह्या बाळाची झाली राख ... अगा ए देवा ऽ ऽ

कालचेच नव्हे तर आजचेही समाजजीवन दाहकतेने आणि कारुण्याने कसे ग्रासले गेले आहे हे हृदयवंतांना उमगत नसेल असे कसे म्हणावे ! ती दाहकता, ते कारुण्य व तो अनन्वित-छळ साहूनच, दलित उद्वेगाने तळतळून उद्गारतो :

जाळा तुमचे ग्रंथ । आमुचा वेगळाची पंथ ।
आमुचा निराळा भगवंत ।।
कोण दीनांचा साथी । आम्ही आमुचेच साथी ।
आमुची आम्हावर भक्ती ।।
चला पुढे वीरांनो, शूर दलित बायांनो ।
तारक व्हा मर्दांनो ।।

सवर्ण हिंदू आपल्याला नीच लेखून अनन्वित छळ करतात आणि आपल्याशी क्लृप्तीने वागतात तेव्हा ते खेदाने उद्गारतात :

दिसाया आपुला भाऊ गोळ भाषा बोले ।
पर नाई साथी, उरावर नांग डोले ।।

तसेच, हिंदू समाजाच्या नीच वागणुकीचा एक ज्वलंत नमुना दलित दर्शवितात :

नीचा करा सेवा बांधा गऱ्याले वाहाना
घान काढा, घान खावोनी दूर बसा
ही सावली झाळाची, नोको छायेवर तुमची छाया
इटाळ हामाले, तुमचा धर्‌म सांभाळा

असल्या कडक वाणीनं हिंदू समाजाकडून दलित समाजाची हजेरी घेतली जात होती आणि—

सांगू कर काम, तू गुलाम हामचा ।
दंड तुह्यावर, बळी घेऊ रे पोराचा ।

असा जबर धाक घालून अत्याचाराचे प्रदर्शन केले जात होते.

पण याही ज्वलंत परिस्थितीत दलितांनी आपलें सत्त्व, वीरत्व आणि आपला राष्ट्रधर्म गमावला नाही. दलित प्रभूची करुणा भाकत—

देवा तुह्यावर लई आस गरिबांची ।
धावून पुस आसू घे कारुण्या आमुची ।।

देवा तुह्या दारावर मान हाये महाराची ।
तुही तूच घे गा, लाथ नोको दुसऱ्याची ।।

नोको देऊ बापा धाक तूहि आता आमा ।
जीव घायबरा होते तार आडून गा हामा ।।

पण त्याबरोबरच, दलितांनी आपला राष्ट्रीय बाणा राखला आहे. वीरवृत्तीची घडण त्यांनी निर्माण केली आहे. सेवा आणि शूरत्व त्यांनी संपादिले आहे. राष्ट्ररक्षणार्थ त्यांचे बाहू स्फुरतात. ते उद्‌गारतात—

बाळ शूर खोसे कंबरेले कटचार धारेची ।
दुस्मनाले धक्का देई लाज राखे मायेची ।।

इतकेच नव्हे तर दलित स्त्री आपल्या पराक्रमाची ज्योत अखंड तेवत ठेवते. ती प्रखरतेने उद्‌गारते—

रक्‌ताचा सळा रणावर सांडीन ।
जीवही देईन भाऊ माहा वाचवीन ।।

चला ऊठा भाऊ नाही बांगळी हाती ।
मांगाचे जरी मांग ठेवू उघळी छाती ।।

दलितांचे शौर्यतेज आहे ते असे ! आजही दलितांवर घोर जुलूम होत आहे. पण कालचा दलित आज राहिला नाही. त्याचा जोश आणि जोम आता काही वेगळाच झाला आहे. त्यांच्यावर होणाऱ्या जुलुमातून कोणती ठिणगी कुठे कशी पडेल आणि काय घडेल हे सांगणे कठीणच !

दलितांनी आपल्या उदात्त संस्कृतीचे जतन व संवर्धन त्याच निष्ठेने केले आहे. सामाजिक व नैतिक मूल्ये जोपासली आहेत. दलित सुनेचा हा सद्भाव पाहा :

> सासूचा सासुरवास साहून घेईन ।
> लेक भल्याची व्हईन जाब शेवटी देईन ।।
>
> भूकेच्या तान्हेच्या येती मला कल्पना ।
> मातेच्या घरावरी धीर धर माझ्या मना ।।

किंवा–

> चाचू नोका राया, तुमच्या पायाची मी दासी
> राहीन उपासी, घास घालीन तुमासी
>
> सासरचे कष्ट राया, सारे साहून घेईन
> जीव मी अर्पीन, वात बिन्द्राबनी ठेवीन
>
> जल्माची दुखी राया, सुख तुमच्या चर्नावर
> निखारे अंगावर, बसेल बर्साद माझ्यावर
>
> दिलाचा हेत राया, तुमा सांगू कवन्या परी
> उभी साउली खाली, येकटे तुमी माझे हरी

केवढी घराण्यासंबंधीची निष्ठा आणि जाज्वल्य पति-भक्ती ! आणि एक सखी दुसऱ्या सखीला सत्त्वाची जाणीव करून देताना म्हणते–

> सारजा माझे बाई कर दरनकांडन ।
> तुहा येईल भरतार कर आंसूनं पूंजन ।।
>
> सारजा तुही ओटी भरली खोबऱ्याची वाटी ।
> नथीच्या लाजीसाठी देव येईल वो पोटी ।।

आईबाप व भाऊ यासंबंधी दलित कन्येचे हे उत्कट प्रेमाचे बोल लक्षात घ्या–

> भरल्या बाजारात भारी दुकान कोनाचं ।
> माझ्यान् बंधुजीचं किल्लीकुलुप सोन्याचं ।। ...
>
> बाप माहा बाई चांद, माय माही चांदयेनी ।
> दोघाचा उजवळ माझ्या बंधूच्या अंगनी ।।

मुलीने आपले पावित्र्य, आपले स्त्रीत्व अबाधित राखावे आणि सासर-माहेरची इभ्रत जाणिवेने राखावी, अशा नैतिक दर्जासंबंधीचा अत्यंत हृद्य व पवित्र नमुना पाहा :

जा पोरी सासुरी, मान राख सासऱ्याचा ।
सासूचे पाय पूंज, दर शब्द झेल तिचा ।।
पदर ओढून चाल, पुळ्हे पाहू नोको आटेवाटे ।
नवरा तुहा देव, घरचे सार दूर काटे ।।

अशी उदात्त, निर्मळ व सद्भावप्रेरक शिकवण आई मुलीला देते; तर बाप–

लाज राख माही, नाक ठेव पोरी माहेरचं ।
जाऊ दे गेला पऱ्यान्, सत राख अबरूचं ।।

असा मोलाचा धडा देतो. कोणत्याही दृष्टीने पाहू गेल्यास दलित समाजाने भारतीय संस्कृतीचे व समाज–नीतीचे जतन व संवर्धन करून आपली अस्मिता निःसंशय तेजोवर्धित केली आहे.

लोकसाहित्यात भाषासौंदर्य, भावसौंदर्य व विचारसौंदर्य कसे विनटले आहे आणि त्याची महती किती आहे हे जसे कळून येईल तसेच त्यातील मूल्ये इतर कोणत्याही साहित्यातील मूल्यांपेक्षा रतिमात्र कमी प्रतीची नाहीत असेही निदर्शनास येईल. खेडूत दलितांच्या भव्य कल्पनेबद्दल, सूक्ष्म निरीक्षणाबद्दल आणि परिस्थितीच्या तीव्र जाणिवेबद्दल कोणीही बाळगतील अशी हृदयस्पर्शी चित्रे त्यात सुलभतेने व स्वयंस्फूर्तीने आकारली गेली आहेत. त्यांच्या ज्ञान-भांडारात उधार-उसनवारी नाही, कसले वाङमयचौर्य नाही, कसला दिखाऊपणा नाही. अनुभव हेच त्यांचे खरे ज्ञान, निसर्ग हेच त्यांचे वैभव. त्यांच्या अलिखित साहित्यात जिव्हाळा, प्रेम, ऋजुता, उत्कटता, निष्ठा, प्रामाणिकपणा, परोपकार, उदात्त सात्त्विक भाव इत्यादी सद्गुणांची जशी रेलचेल दिसेल तसेच दलितांचे जीवनात संस्कृती, रीति-रिवाज, व्यवहार, सेवाभाव, राष्ट्रप्रेम, भक्ती यांचे विविध तेजस्वी प्रवाहही प्रकर्षाने आढळतील !

□ □ □

# ३.

## अतीन्द्रिय विश्वातील प्रभाव

अतीन्द्रिय विश्व आणि अतीन्द्रिय शक्ती यांचे, दृश्य जगातील लोक-कल्याणाच्या दृष्टीने, शास्त्रीय संशोधन झाले पाहिजे, अशी घोषणा १९६० साली विदर्भ साहित्य संघाच्या, साहित्य सम्मेलनाच्या व्यासपीठावरून, अध्यक्ष या नात्याने मी केली होती. माझ्या दृष्टीने, अदृश्य जगात अव्यक्त रूपाने भ्रमण करणाऱ्या भूत-पिशाच्चांच्या मनोद्रव्याचा वेध घेणे आणि त्या सत्त्वशक्तीचा मानवाच्या कल्याणासाठी उपयोग होणे अत्यावश्यक असल्याचे वाटते. भूत–पिशाच्च योनी आणि तिचा दृश्य जगावर होणारा इष्ट–अनिष्ट परिणाम याबाबत अनेक संभ्रम आहेत–अनेक प्रवाद आहेत. ते एक असे अनाकलनीय गूढ ( Ununderstandable Mystery ) आहे की त्याचा उकल मानवाला अजूनही करता आला नाही. पाश्चात्य राष्ट्रांनी विशेषत: जर्मनी, इटली, इजिप्त, टांगानिका, अमेरिका, ब्रिटन आदी देशांतील विज्ञानशास्त्रज्ञांनी आणि मानसशास्त्रज्ञांनी, भूत–पिशाच्च योनीचा–तिच्या प्रभावाचा आणि त्याद्वारे घडणाऱ्या अत्यंत चमत्कारिक ( Miraculous ) व अद्‌भुत घटनांचा निरनिराळ्या सूक्ष्म प्रयोगांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला पण भूत–पिशाच्च किंवा त्यारूपी अवशेष ( Aspect ) अथवा अस्तित्वाचे चिन्ह ( Sign of entity ) त्यांना गवसले नाही. त्या अव्यक्त भ्रमणाची खूण वा चाहुलीचा मागोवासुद्धा स्वच्छपणे संशोधिता आला नाही. त्या बाबतीत शास्त्रीय असे काही सिद्ध झाले नाही. धर्मभोळ्या समजुतींवर (Superstitious beliefs) आधारलेली अनेक भाष्ये आढळतील पण वस्तुस्थिती-

बावत अधिकृत प्रमाण मात्र नाही. उलट काही शास्त्रज्ञांची फसगतच झाली आणि त्यांचे प्रयोग आभासमय (Visionable) ठरले असे कळून येते. पण काही असले तरी विश्वातील अंतराळात काही तरी विलक्षण, अगम्य, अतर्क्य अशी प्रबल शक्ती वास करते की जिच्यामुळे मानवाला भूत–पिशाच्चांची प्राणघातक बाधा होते आणि त्यातून मुक्त होणे कठीण जाते. असा उपसर्ग कधी कधी व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही तर तो केव्हा केव्हा कुटुंबांना व घराण्यालाही पोचतो, असा अनुभव येतो.

पण जगात भूत–पिशाच्चांचे अव्यक्त असे दुसरे जग आहे काय ? मरणोत्तर पुढे काय ?—असा प्रश्न उपस्थित करण्यात येऊन, मानवाच्या मृत्यूनंतर त्याचा आत्मा अव्यक्त रूपाने वास करीत असतो व आपल्या जिवंतपणी राहून गेलेल्या इच्छातृप्तीसाठी तो इतस्ततः भटकत असतो आणि त्याची दृश्य जगातील व्यक्तीला झळ पोचली की भूतबाधा झाली असे आपण समजतो; आणि मग, भूतबाधा काढण्यासाठी तंत्रमंत्र विद्येचा आपण वापरही करतो. परंतु भूत–पिशाच्च बाधा आणि तंत्रमंत्र विद्या ही तरी कितपत प्रमाणभूत मानावी हाही आजच्या विज्ञान–अणुयुगातील एक बिकट प्रश्न आहे.

भूत–पिशाच्चयोनीसंबंधित शकुनापशकुनाचे जसे काही प्रकार आहेत तसेच त्यावर तंत्रमंत्राचे अघोरी सिद्धी साध्य करणारे अन्य वाममार्ग आणि काही जादूपद्धतीसंकेत ( Methods of Magic ) असल्याचे आढळून येते. त्यामुळे भूत–पिशाच्च योनी असो वा नसो, मृत व्यक्तीचे अस्तित्व व्यक्त वा अव्यक्त राहो वा न राहो, चमत्कृतिजन्य सिद्धि–साधनांचा आणि तंत्रमंत्रांचा जोष व जल्लोष काही कमी नाही. त्या काल्पनिक ( Hypothetical ) मायावी चमत्कार-दर्शक कल्लोळाच्या आवरणात मी मी म्हणविणारे दार्शनिक विद्वान व पंडित जेथे लोळण घालतात तेथे सामान्य जनतेची काय कथा ! विश्वास असो वा नसो, विविध प्रकारचा जादू टोणा, वशीकरण, सम्मोहन, नजरबंदी, भानुमती, अन्तर्भेदी आदी प्रकारांना अलौकिक सिद्धीच्या नावाखाली आलेला ऊत आणि त्यात गुरफटून समंजस व विचारवंत स्त्री–पुरुष त्या त्या महाराजांच्या भजनी लागलेले पाहिले म्हणजे स्तंभितच व्हावे लागते ! चुटकी वाजवून बुक्का–कुंकू काढणे, पाठीवर थाप मारून पूजेचा बाण काढणे, एखादा स्वर लावून सुगंध दरवळणे, जमिनीवर पंजा फिरवून वा हवेवर हातवारे करून पेढा, केळी, आंबे आदी आणणे, दगडावर–जमिनीवर नारळ फोडून पाण्याचा झरा काढून दाखविणे आणि कधी एखादे वस्त्र वा पैसेही दर्शविणे असे कितीतरी प्रकार विशिष्ट प्रकारच्या सिद्धीने–काही प्रकार तर अघोरी सिद्धीने करून आपण सिद्धपुरुष असल्याचे प्रदर्शन मांडणारे आणि कीर्ती–पैसा व ऐष प्राप्त करणारे महाभाग या पृथ्वीतलावर काही कमी नाहीत आणि अशा चमत्कृतिजन्य आकर्षणाला बळी पडून, आपले पौरुष, सत्य व

सत्त्वही गमविणारे स्त्री–पुरुषही काही कमी नाहीत. विशिष्ट सिद्धि–साधनेचे व तंत्रमंत्राचे क्षणैक चमत्कार दर्शविणारे अलीकडील स्वार्थी, लोभी, स्त्रीलंपट साधु–बैरागीमहाराज हे वेगळे आणि आपल्या आध्यात्मिक तपस्येने लोककल्याणकारी आत्मशक्ती (Will Power) प्राप्त करणारे अस्सल दैवी पुरुष (fetish man–totem) वेगळे ! आत्मशक्तिधारी हे पुरुष आपल्या शक्तीचे–प्रखर साधनेचे कधीही प्रदर्शन मांडणार नाहीत–कीर्ती, पैसा व ऐष यांपासून पूर्णतः अलिप्त राहून, आपत्प्रसंगी कल्याणकारी कार्यच करतील. त्यांची आध्यात्मिक बैठक संवर्धक (Productive) व संरक्षक (protective) असते. अति–प्राचीन, ज्याला आद्य पाषाणयुग (Palaeolithic Age) म्हणतात त्या काळापासून अतीन्द्रिय विश्व व अतीन्द्रिय शक्ती यांची महत्ता मानली गेली आहे. मानवांच्या मृत्यूनंतर त्याचा आत्मा निसर्गात अव्यक्त रूपाने वास करीत असतो व त्याचे अनिष्ट परिणाम निरनिराळ्या रूपाने दृश्य जगातील मानवांना भोगावे लागतात; दैवी प्रकोपही घडत असतात व त्याचे परिणाम मानवाबरोबर त्याचे कुटुंब, धंदा, संपत्ती व व्यवहार यावरही घडून अतीन्द्रिय विश्वातील दुष्ट शक्ती (evil spirits) विनाशक कार्य करीत असते. त्यामुळे जीवनात स्थैर्य, संपन्नता व सुबत्ता लाभत नाही आणि म्हणून तशा प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी तंत्रमंत्रविद्येचा व सिद्धि–साधनांचा सर्रास वापर करण्याची क्रिया परंपरागत चालत आल्याचे आढळून येते. त्या प्राचीन पाषाणयुगात काय अथवा नवपाषाणयुगात (Neolithic Age) काय अथवा आधुनिक काळात (Modern Age) काय वन्य विभागातील आदिम जाती–जमातीमध्ये तंत्रमंत्र व सिद्धिसाधना चालत आल्याचे आणि त्यापासून अनेकांनी अनुकरणात्मक पद्धतीचा वापर करून आपल्या प्रभुत्वासाठी तंत्रविद्या, मंत्रशक्ती व अल्पसिद्धी यांचा प्रसार व प्रचार केल्याचे दिसून येते. त्यात सत्कृत्याऐवजी अपकृत्यच (Tort) अधिक असते. त्यातूनच भूतपिशाच्चांना जागृत करून वा स्मशान जागवून अथवा विशिष्ट प्रेतांच्या अवयवांचा अघोरी वापर करून नव-नवीन तंत्र व मंत्र यांचे प्रकार थैमान घालू लागले. त्यात चेटकक्रिया (witchcraft) करणारी चेटकीण किंवा चेटूक (sorcery) आणि विविध प्रकारची जादू व किमया करून दाखविणारा जादुगर जन्माला आला. त्याबरोबर शकुन (Omen), शक्तिवाद (Animatism) व देवकवाद (Totemism) यांचे प्रवाह वाहू लागले. मरीमाय, मातामाय, भूत्यादेव, पिसाळदेवी, खंड्यादेव अशा अनेक ग्रामीण दैवतांना मंत्रोच्चाराने जागवून येणाऱ्या वा आलेल्या आपत्तींना–प्रकोपांना प्रतिबंध घालण्याचे खेडुत भगत म्हणा अथवा त्या मार्गातील तांत्रिक–मांत्रिक प्रयत्न करीत असतात.

काही काही वेळेला तर संकटमुक्त होण्यासाठी ते अंधश्रद्धाळू तांत्रिक–मांत्रिक नरबली देण्यासारखा अमानुष, निर्घृण असा अघोरी प्रयत्न करतात, असा

आजही काही ठिकाणी अनुभव येतो. चेटकीण म्हणून समजल्या जाणाऱ्या स्त्रीला नग्न करून तिची गावभर धिंड काढणे व तिला झाडाच्या फांदीला लटकावून जाळण्याचा प्रयत्न करणे अशा गोष्टी घडल्याचेही प्रत्ययास येते. असे सर्व अमानुष प्रकार अतीन्द्रिय विश्वातील लीलांमुळे आणि त्यातून निर्माण झालेल्या तंत्रमंत्र-विद्येमुळे घडत असतात याची जाणकार माहिती देतात. काळा दोरा ( Black thread ), ताईत ( Amulet ), जादूची काठी ( Wand ), त्रिशूळ–लिंबू, कंटकगोळा, सुपारीकांड आदी मंतरलेल्या वस्तू ( Charms ) अपायकारक बाबींना–भूतपिशाच्चांच्या बाधांना, भूताटकींना दूर सारण्यासाठी ( To punish evil spirits and black germs ) वापरण्यात येत असतात. तर्कशून्य उपायां-बरोबर ( irrational methods ) सामाजिक संसक्तीखाली ( Social cohesion ) मंत्राचा ( Incantation ) वापर करून तर कधी अनुवर्तनात्मक धातूचा ( Mimetic magic ) विशिष्ट विधियुक्त भूत काढण्याचा (Exorcism) यत्न करण्यात येतो. पण अशा प्रकारच्या क्रियाशील बाजू (Dynamic aspect) समर्पणात्मक ( Submissive ) स्वरूपाच्या भिन्नतादर्शक ( Divergence ) असतात व त्याचे परिणाम कधी कधी चक्रीय रूप ( Cyclical forms ) धारण करून भूतबाधेची व्यक्ती दगावण्याचा संभव असतो. व्यक्त आणि अव्यक्त जगात परस्पर विरोधी ( Diametrically opposite ) झंकार झाला की साध्यात रीति–विधानात्मक चूक होत असते व त्यामुळे कार्यकारणात अंतर पडून, मंत्र शक्तिक्रिया चुकीच्या मार्गाविरून घडत असते आणि त्याचा परिणाम मनुष्य-मात्रावर व पर्यायाने समाजावर घडत असतो. तंत्रशक्ती व मंत्रशक्ती साधकाच्या क्रियासंपन्न गुणवत्तेवर निर्भरित असते. पण साधक नैसर्गिक पथ्यावरून ढळला तर त्याचे भयंकर परिणाम होतात हे जाणिवेने लक्षात घेतले पाहिजे. सिद्धि–साधना करणारे व निसर्गबद्ध मंत्रविद्या प्राप्त करणारे लोककल्याणाच्या कक्षेबाहेर जाऊन, स्वतःच्या बडेजावासाठी अथवा पैशादी लोभासाठी पथ्याचा कळत वा नकळत दुरुपयोग करतात. तेव्हा ती मंत्रविद्याशक्ती एक वेगळे विनाशक तीव्र रूप धारण करते आणि त्यातील पवित्रता ( Sacredness ) नष्ट होऊन, संबंधित मूलाधार प्रेरणा (Basis drives) यथार्थता (Ralidity) दर्शवू शकत नाही. पारस्परिक (Reciprocal) पूज्यभाव (Reverence) दुभंगला म्हणजे घटक ( Component ) विरल होतो व तो निष्प्रभ ठरतो. संपादित तंत्रविद्या (Acquired technology) आणि अधिकृत मंत्रशक्ती (Authorized spell-power) यांचा नैसर्गिक स्वरूपाचा नैतिक (Ethical) संबंध असतो आणि त्यातील चेतन–प्रवाह (Animate current) नैसर्गिक पर्यावरण व सामाजिक पर्यावरण ( Natural and social environment ) यांशी निगडित असून, त्याची अभिवृद्धी ( Attitude ) सत्कृत्यांसाठी ( Nobel deeds ) प्रतिबद्ध

(Restricted) असते आणि त्यासाठी कमालीची अभियोग्यता (Aptitude) व उपजत ( Climate ) शुद्ध प्रवृत्ती ( Pure tendency ) असणे अपरिहार्य असते.

मानव व त्याच्या भोवतालची समग्र परिस्थिती (Total surroundings) अगर पर्यावरण ( Environment ) या दोहोंमध्ये निश्चित स्वरूपाचे संबंध प्रस्थापित करणे हे धर्माने पार पाडलेले मूलभूत कार्य ( Primary function ) होय. भोवतालच्या नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणाशी समन्वय साधून आपला जीवनक्रम सुरळीतपणे चालू राहावा अशी मानवाची अव्याहतपणे धडपड चाललेली असली तरी तीत हमखास यश नेहमी येईलच अशी मानवाला खात्री नव्हती. तसेच पर्यावरणात घडणाऱ्या अनेक घटना मानवाला अनाकलनीय होत्या. इतकेच नव्हे तर त्यांच्या संहारक प्रभावापुढे मानवाला हतबल व्हावे लागत असे. अशा निराशाजनक परिस्थितीत अनपेक्षित आपत्तींना तोंड देऊन आपला निर्वाह कसा करावा व पर्यावरणाशी कसे संबंध ठेवावेत अशी अतिशय गंभीर समस्या मानवा पुढे उभी होती ही अवघड समस्या सोडवून धर्माने मानवाला एक प्रकारचे स्थैर्य प्राप्त करून दिले. या विश्वाच्या पलीकडे अदृश्य स्वरूपाचे असे दुसरे अलौकिक विश्व ( Supernatural world ) असून त्यात वास करणारे दिव्य प्राणी (Spiritual beings) व तेथील अलौकिक शक्ती (Supernatural Power) अतिशय सामर्थ्यसंपन्न असून ते प्राणी अगर ती शक्ती या विश्वातील सर्व प्रकारच्या घडामोडींवर संपूर्ण नियंत्रण ठेवते अशी संकल्पना धर्माने दिली. या संकल्पनेच्या आधारे अलौकिक विश्वातील दिव्य प्राणी अगर शक्ती यांच्या साहाय्याने वैयक्तिक अगर सामुदायिक स्वरूपाच्या सर्व आपत्तींचे निराकरण करणे व आपली उद्दिष्टे साध्य करून घेणे या सर्व गोष्टी शक्य होतात अशी ग्वाही धर्माने दिली आणि त्याचबरोबर या गोष्टी साध्य करून घेण्याचे विविध मार्गदेखील धर्माने विशद केले. साहजिकच या धर्मप्रणीत मार्गाच्या आचरणामुळे मानवाचे अलौकिक विश्वाशी व निसर्गातील वस्तूशी अत्यंत घनिष्ठ व निकटचे संबंध प्रस्थापित झाले. मेलेल्या व्यक्तीचे आत्मे हेच अलौकिक विश्वात आपापल्या मगदुराप्रमाणे भूत, पिशाच्च, देव इत्यादी दिव्य प्राणी होतात व या विश्वातील घडामोडींवर संपूर्ण ताबा ठेवतात अशी धर्माची धारणा असल्याने विशिष्ट दिव्य प्राण्यांना प्रसन्न करणे, त्यांच्या कृपेची याचना करणे, त्यांच्याशी विविध उपायांनी सतत संपर्क साधणे इत्यादी क्रियाविधींचा अवलंब करून त्यांच्याशी जवळीक निर्माण करण्याचा मानवाने सातत्याने प्रयत्न केला ( धर्माचरण, पृ. २५७).

अशा प्रकारच्या भिन्न भिन्न सिद्धान्तांची, मतांची व प्रमेयांची मीमांसा करून अतीन्द्रिय विश्व, दिव्य प्रेरणाशक्ती, पिशाच्चवाद, व्यक्त-अव्यक्त संचारवाद, मरणोत्तर अवस्थेचा प्रभाव, आत्मा व मृतात्मा यांचे देहावस्थाचेतनागती आदी प्रश्नां-

बाबत, एक श्रेष्ठ अध्यात्मवादी आणि अलौकिक शक्तिधारी स्वामी अभेदानंद यांनी A critical study in the science of spiritualism म्हणून आपल्या 'Life Beyond Death' या अत्यंत महत्त्वपूर्ण पुस्तकात अनुभवसिद्ध असे जे मार्मिक विवेचन केले आहे आणि जे संकेत दर्शविले आहेत, ते विशेषत्वाने विचारात घेण्यासारखे आहेत.

'अदृश्य असे एक शक्तिशाली जग आहे. ते मृतात्म्याच्या सत्त्वपूर्ण मनोद्रव्यांनी व्याप्त आहे आणि ते पिशाच्च्यांच्या जडाशयांनी फार प्रभावी आहे. ते नैसर्गिक पण आन्तरायिक आणि अभौतिक असे जादुमय वा अलौकिक-स्वरूपमय आहे. त्यातील सत्त्वशक्ती मनुष्य जर हस्तगत करू शकला तर तो या जगातील काही ज्वलंत आणि गूढात्मक प्रश्न, सत्कृत्याच्या दृष्टीने सोडविण्यास समर्थ ठरू शकेल असे पाश्चात्य प्रयोगशील मानसशास्त्रज्ञ डॉ. फित्झर, डॉ. जेम्स, मिस अंडरहिल प्रभृतींचे मत आहे. ' No doubt, there is a very powerful unknown world, and in it, there is a attenuated matter- ectoplasm which is very powerful, and effective forces of a spirit that is natural but intermittent, and incorporeal magic, or supernatural beings. If the man succeed to get that power, he can certainly able to solve some burning and mystical problems in this world for the noble causes.'

मंत्रशक्तीचा प्रभाव काही विशेषच असतो. प्राचीन काळी मंत्रशक्तीनेच लोककल्याणाचे कार्य बहुतांशी साध्य केले जाई. त्या दृष्टीने, ऋषि-महामुनींची तपस्या, त्यातून निर्माण होणारी आत्मशक्ती व त्याद्वारे उच्चारला जाणारा शब्द मंत्ररूप धारण करीत असे. निसर्गाच्या सान्निध्यात राहून, निसर्गातील पर्यावरणात असणाऱ्या सत्त्वशक्तींना आपल्या तपोबलाने अंकित करण्याचे अलौकिक सामर्थ्य राखले जाई. अशी आत्मशक्तिशाली व्यक्ती इतरांना वरदान, शाप, उःशाप देऊनही निर्लेप राहत असे. ती मंत्रविद्या व्यक्तिमात्रापुरतीच मर्यादित राहत नव्हती तर प्रसंगी सामूहिक स्वरूपाचे कार्य साधत होती. महाभारत-रामायण कालखंडातील समरप्रसंगी, आवश्यकतेनुसार मंत्रशक्तिसंपन्न रथी-महारथी विविध मंत्रकिमयाशक्तीचा अहमहमिकेने वापर करून, आपले प्रभुत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत. मंत्रशक्तीव्यतिरिक्त, प्राकृतिक प्रखर ध्यानावस्थेतून प्राप्त होणारी देवत्वधारी असामान्यशक्ती ही एक तर काही विशेषच असते. योगसाधनेचा तिचा प्रतापी प्रभाव अधिक उच्च, अधिक उदात्त असतो. मंत्रशक्ती सुष्ट व दुष्ट या दोन्ही प्रकारांत गुरफटलेली, ईर्षा, बदला, निःपात, संहार या कामी आणली जाणारी मंत्रविद्या अर्थातच परिणामी घातकच ठरत आलेली. त्यात क्षणैक समाधान वाटत असले तरी ती मनःशांती देणारी नाही. मंत्रविद्येतील वज्रशक्ती आटोक्यात राखणे व

तिचा समाजाला तारणदायी उपयोग करणे हेच त्या विद्येतील सत्त्वतेज. पण मंत्रधारी व्यक्ती आपल्या स्वार्थापायी तिचे प्रदर्शन मांडू लागली की ती निष्प्रभच ठरत नाही तर ती उलटत असते व अंगलटी येऊन नाशकारी ठरते. प्राचीन काळी त्या त्या मंत्रशक्तीचा कुठे, केव्हा, कसा व किती प्रमाणात वापर करावा याचे सम्यक् ज्ञान राखून, तोंडाला तोंड दिले जाई. ती उच्च धारणा आज नाही. ती तपस्या, ते ध्यान व ती सम्यक् बुद्धी जिथे नाही, तिथे ती आत्मबलवाहिनी मंत्रलहरीही नाही.

आत्मा अथवा श्वास (शरीरातील चैतन्य ज्योत) ज्या अव्यक्त चेतनेने निसर्गाच्या एका तरल द्रव्यात एकजीव होतो, त्याला 'मनोद्रव्य' म्हणतात. हे मनोद्रव्य एक विशिष्ट शक्ती राखत असते. निसर्गातील अंतराळात अव्यक्त रूपाने वास करणाऱ्या पवित्र आत्म्याला-मनोद्रव्याला, अविकल्प बैठकीवरून शास्त्रीय पद्धतीने अंकित केले गेल्यास, जनकल्याण साधणारी एक विशेष शक्ती मनुष्यमात्राला प्राप्त होऊ शकते. अघोरी सिद्धि-साधनेने नव्हे तर, निसर्गसाधनेच्या एका पवित्र बैठकीने, अध्यात्म आणि अतीन्द्रिय विश्‍व या दोन भिन्न बाबी असल्या तरी, त्या दोन शक्तींचा हितप्रद सांधा जोडता येतो. जीवोद्धारक मंत्रशक्तीसुद्धा त्यातूनच निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने, अध्यात्मशक्ती, अतीन्द्रिय शक्ती व मंत्रशक्ती यांचे शास्त्रीय संशोधन होणे आवश्यक आहे.

व्यक्ती मृत झाली म्हणजे तिचा आत्मा म्हणजे शरीरातील चैतन्यज्योत शेवटल्या–अंतिम–श्वासाने निसर्गात विलीन होते. त्या अंतिम श्वासात जीवंतपणातल्या साऱ्या शक्ती एकवटल्या असतात. व्यक्ती सुष्ट वा दुष्ट असो, शेवटला श्वास निसर्गात विलीन झाला की तो अपवित्र राहत नाही; तो दुष्टात्मा उरत नाही; शेवटला श्वास निसर्गात विलीन होताना ज्या दिशेने व ज्या गतीने तो जातो, त्याच दिशेने व गतीने जेथे त्याचा मृत्यू होतो तिकडे झेप घेण्याचा त्याचे मनोद्रव्य प्रयत्न करते. काही वेळेला व्यक्तीच्या प्रकृति प्रवृत्तिधर्मानुसार आत्मारूपी मनोद्रव्य त्या त्या व्यक्तीच्या प्रिय जागी व प्रिय वस्तूशी अथवा प्रिय जीवाशी संपर्क साधू इच्छितो. मृत झालेल्या व्यक्तीच्या अंतिम श्वासातील काही अंश हवेतील दाबानुसार कधी तिच्या शय्येशी, खुर्चीशी, पुस्तकाशी, दाराशी, छपराशी, दागिन्याशी, चहाच्या पेल्याशी, घड्याळाशी, तपकिरीशी, लेखणीशी, चष्म्याशी म्हणजे जी व्यक्ती ज्या वस्तूशी विशेष संबंधित राहत असेल तिकडे रेंगाळण्याचा प्रयत्न करते. त्यात भीतिप्रद असे काही नसते. पण भासमान प्रकारामुळे एक वेगळे दडपण मात्र जाणवू लागते. वस्तुतः ते मनोद्रव्य अंतराळातील अतीन्द्रिय विश्‍वाच्या काही चैतन्यमय सत्त्वकणांशी एकजीव होत असते. आणि एक वेगळी शक्ती त्या मनोद्रव्याला प्राप्त होत असते. ती शक्ती म्हणजेच अतीन्द्रिय शक्ती होय.

मृत व्यतीचे अव्यक्त पण चैतन्यमय मनोद्रव्य वायूच्या लहरीबरोबर अन्त-

रिक्षात अनेक थराथरातून तरंगत जाऊन, त्यातील अत्युच्च अशा सत्त्वांकित वलयातील प्रबल असलेल्या पंचतत्त्वपूर्ण केंद्रस्थानी येऊन पोचते. हे केंद्रस्थान अंतराळातील विशिष्ट सत्त्वकणांनी तेजःपुंज व अत्यंत प्रभावी असते आणि मनोद्रव्याच्या सत्त्वप्रमाणानुसार गती आणि शक्ती देण्याचे अलौकिक चक्र प्रवाहित करीत असते. अत्यंत सूक्ष्म पण अत्यंत तेजस्वी असे हे केंद्रस्थान असते; आणि महानिर्वाणपदाचे ते अंतिम पवित्र स्थान असते. मृत व्यक्तीच्या मनोद्रव्याचे प्रमाण ज्या प्रमाणात विरळ अथवा प्रबळ असेल त्या मानाने, त्याला त्या अतीन्द्रिय विश्वातून गती मिळत असते. भूत–पिशाच्च अशी योनी त्यात मूलतः अन्तर्भूत नसते. अदृश्य जगातील मनोद्रव्याचा गतीमुळे कधी कधी नकळत जो बाधक परिणाम होतो त्यातून भूत–पिशाच्चाची कल्पना आकारली गेली आहे; आणि नसेल ते उग्र रूपही त्याला दिले गेले आहे. वस्तुतः अतीन्द्रिय विश्वातील मनोद्रव्य पवित्र व शक्तिशाली असते. आपल्या विशिष्ट आत्मबलाने ती अतीन्द्रिय शक्ती अंकित केल्यास, तिचा जनकल्याणार्थ सदुपयोग करता येतो. तशा आत्मशक्तीतूनच मानव व निसर्गसंबंधित मंत्रशक्तीचा उद्भव झाला आहे. अर्थात त्या शक्तीचा वापर कुणी कसा करावा हे त्या त्या मंत्रशक्तिधारी व्यक्तीवर अवलंबून आहे. अतीन्द्रिय विश्वातील जी शक्तिच्छाया अव्यक्तरूपाने दृश्य जगावर पडलेली असते व तिचा जो प्रभाव पडतो तो मंत्रच्छायाधारी असतो. जो अघोरी सिद्धि–साधनेने अतीन्द्रिय शक्ती प्राप्त करतो व त्यातून जो मंत्र तो घेतो, त्याचा बहुतांशी मतलबी दृष्कृत्यांसाठी वापर होत असतो. तशी मंत्रशक्ती असलेली व्यक्ती जनकल्याण तर नाहीच पण प्रसंगी स्वतःवरच आपत्ती ओढवून घेत असते. चमत्कृतिजन्य प्रयोगामुळे ती व्यक्ती आपला प्रभाव दर्शविण्याचा प्रयत्न करते पण त्यात योग्य समयी फसगतच होते. पण जी व्यक्ती आध्यात्मिक बैठकीवरून, अतीन्द्रिय शक्ती प्राप्त करून जो मंत्र ज्या ध्यानाने आत्मसात करते, ती व्यक्ती निःस्पृहतेने आपल्या मंत्रशक्तीचा लोककल्याणार्थ वापर करण्यास समर्थ ठरते. त्यात आत्मतेज असते हे निःसंशय !

□ □ □

# ४.

## क्रौर्य नको, शौर्य हवे

आम्हाला क्रौर्य नको, शौर्य हवे. प्राचीनकाळी आमचा देश शौर्याने व पराक्रमाने तळपत होता. ऋषि-महामुनी आपल्या प्रखर तपस्येने आत्मतेज व आत्मबल प्राप्त करीत होते त्या तेजाने व बळाने देश दीप्तिमान होत होता. तें तेज व बळ पराक्रमी व शौर्यवान पुरुष निर्माण करण्यासाठी प्रदान केले जात होते. त्या काळी आध्यात्मिक बैठकीवरून योग-साधना केली जात होती; तेजासाठी-शौर्यासाठी उपासना केली जात होती, कालची योगसाधना केली जाणारी-उपासना धारण करणारी व्यक्ती, उद्याची प्रबल शक्ती बनत होती, म्हणजे आजचा उपासक उद्याचा प्रवर्तक होत होता; आणि आपल्या तपोबलाने देशाची अस्मिता तेजोवर्धित करीत होता.

त्या प्राचीन काळी पुरुषांबरोबर स्त्रियाही योगसाधनेत अग्रेसर राहत होत्या. स्त्री ही निसर्गाची प्रकृती. तिच्या तेजस्वी सत्त्वबीजावर आत्मबलाची उभारणी होत होती. पुरुष शौर्यशाली, धैर्यशाली व्हावा व आपल्या गुणसंपन्नतेने त्याची कृती प्रभावशाली ठरावी, अशी भारतीय तेज:पुंज स्त्रीची आकांक्षाच राहत नव्हती तर ती आपल्या सत्त्वाने पुरुषार्थाची पार्श्वभूमी मोठ्या जाणिवेने निर्माण करीत असे. तिच्या पोटी जन्माला आलेला बालक वीरवंत, ज्ञानवंत व प्रज्ञावंत म्हणून कीर्तिमान व्हावा यास्तव ती आध्यात्मिक बैठकीवरून आपल्या बालकाचे जतन व संवर्धन करून, त्या आत्मतेजाच्या प्राप्तीस्तव निसर्गाराधना करीत असे. वनवासी सीता हिने लव-कुशाची प्रतापी घडण घडविली होती, शकुंतलेने पराक्रमी भरत निर्माण केला.

वीर पत्नी विदुला हिने निसर्गाची आराधना करताना प्रभुचरणी अशी मागणी केली की, हे देवते, मला दीर्घायुष्यमान असलेले पण निर्बल राहणारे शंभर पुत्र देण्यापेक्षा एकच पुत्र दे. तो अल्पायुषी असलेला चालेल पण तो शौर्यशाली, वीरपुत्र असावा स्त्रीने केलेली वीरश्रीची ही महापूजा होय. छत्रपती शिवाजी काय किंवा महाराणा प्रतापसिंह काय, त्यांच्या वीर मातांनी आपल्या बालकांमध्ये वीर वृत्तीची घडण निर्माण करण्यातच आपले तेज प्रकट केले होते.

आध्यात्मिक बैठक, निसर्गसाधना आणि योगसाधना हे अत्यंत गहन विषय आहेत. आत्मोन्नतीच्या दृष्टीने प्रत्येक भारतीयाने त्याच्या क्रिया व प्रक्रिया जाणिवेने समजून घेणे अत्यावश्यक आहे. सध्या शरीरसंवर्धन व बुद्धिविकासाच्या बाबतीत योगसाधनेचे जे महत्त्व आहे ते जाणून घेतले पाहिजे. वस्तुतः योग म्हणजे समत्वभावाने निसर्गाला अंकित करणे. ते आध्यात्मिक बैठकीद्वारे साध्य करता येते. ' समत्वं योग उच्यते ' हे लक्षात घेऊन, अंतःशुद्धीने निसर्गज्योतीच्या प्राप्तीस्तव ' एक ध्यास,' ' एक ध्यान ' घ्यावे लागते. त्यायोगे प्राप्त होणारे चैतन्य, आत्मबल वाढविण्यास व शरीर आणि मन हे दोन्ही विशुद्धतेने सुदृढ करण्यास समर्थ ठरते. योगाची अष्टांगे आहेत. ' यमनियमासनप्राणायाम-प्रत्याहारधारणाध्यान समाधयोऽष्टाङ्गाः ।। ' यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी या अष्टांगाच्या क्रियेने मानव चित्तशुद्धी राखून, सुदृढ, दीर्घायुषी, विवेकी, वीर, प्रज्ञावंत आणि शक्तिमान होऊ शकतो.

आजच्या परिवर्तनाच्या अणुयुगात ' समाधी ' व्यतिरिक्त, योगाच्या सप्तांगांचे अनुसरण करण्याची आवश्यकता आहे. अध्यात्म आणि विज्ञान यांची जोड देऊन मानवशक्तीबरोबर समाजशक्ती व राष्ट्रशक्ती वृद्धिगत करण्याची गरज आहे. अध्यात्म आणि विज्ञान हा प्रस्तुत ठिकाणी वेगळा विषय असला तरी तो अभ्यासला गेला पाहिजे. त्या अभ्यासाप्रमाणेच, प्राचीनकाळी अनुसरलेली परातत्त्वस्पर्श योगांची क्रिया व प्रक्रियाही अभ्यासणे आज व्यक्तिविकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. हठयोग, राजयोग, कर्मयोग, भक्तियोग, मंत्रयोग, लययोग, ज्ञानयोग व कुंडलिनीयोग काय आहेत व जीवनात त्यांचे काय महत्त्व आहे याची जाणीव विज्ञानाबरोबर धाव घेणाऱ्या आजच्या समाजाला नाही. हे योग असाध्य असून ते केवळ साधु-संत, संन्यासी व योगी अशांसाठीच मर्यादित आहेत, असा समज आहे; पण, अन्तर्मुख होऊन चिकित्सेने या योगांचा व परिणामांचा सूक्ष्म विचार केल्यास विज्ञानावरही मात करण्याची प्रबल शक्ती त्यात कशी आहे याचा प्रत्यय येऊ शकेल; आणि त्यातून आज मानवपोषक व राष्ट्रपोषक अशी सहजसाध्य आवश्यक मूल्ये संशोधून ती त्यांना आविष्कृत करता येतील, असे वाटते.

योगसाधनेत तेजाची, शौर्याची आराधना आहे, पूजा आहे. प्राचीन काळ सोडला आणि भारतातील मध्ययुगीन काळ लक्षात घेतला तरी या प्रदीर्घ

कालखंडात सर्वत्र वीरताच प्राप्त करून राष्ट्र बलशाली व वैभवसंपन्न करण्यासच त्या काळच्या राजे-महाराजांनी व प्रजाजनांनी भर दिला होता. क्षात्रतेजाने भारत दीप्तिमान झाला होता. शौर्य व तेजाशिवाय राष्ट्राचे जतन, संवर्धन व संरक्षण करता येत नाही. त्या दृष्टीने त्या काळात वीर-वृत्तीची घडण निर्माण करण्याचे शिक्षण दिले जात होते. विविध आयुधांचा-नेमबाजीचा, धाडसी प्रयोगांचा प्रत्यक्ष पाठ देऊन युवक-युवतींना तरबेज करण्यात येत होते. आत्मविश्वास, मनोधैर्य व कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी लागणारी जिद्द, ध्यास प्रयत्नपूर्वक अमलात आणली जात होती. शौर्याने झुंज घेण्यासाठी तरवारीचा, बाणांचा, भालाबर्च्यांचा वापर, कुठे व कसा करायचा याचे ज्ञान उप-लब्ध करून दिले जात होते. शौर्य-धैर्याची पारख करण्यासाठी प्रसंगी सत्त्वपरीक्षाही घेतली जात असे. त्या बाबतीत स्वयंवर हा एक प्रकार होता. शौर्यतेज व्यक्त करणाऱ्या तरुण वराला वधू वरत असे. पराक्रमी पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनीही रणांगणावर आपले अतुलनीय शौर्य व धैर्य सिद्ध केले. राणी दुर्गावती, चांदबीबी, रायबागीण, झाशीची राणी लक्ष्मीबाई आदी वीर मातांचा उल्लेख करता येईल. मोगलाईच्या व मराठेशाहीच्या काळात तर राष्ट्राभिमानाने प्रेरित होऊन वीरश्रीची पूजा केली जात होती. धनुर्विद्या, मल्लविद्या, शस्त्रविद्या आदींच्या बाबतीत आखाडे निर्माण केले जात होते. छत्रपती शिवरायाच्या काळात निर्माण झालेल्या आखा-ड्यांची परंपरा काही प्रमाणात का होईना आजमितीसही प्रत्ययास येते.

आज आपण स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत. देशाचे रक्षण करून त्याला बलवान करण्याची आपली विशेष जबाबदारी आहे. योगसाधनेव्यतिरिक्त शक्तिवृद्धीचे आणि शौर्य व तेज प्राप्त करण्याचे जे मार्ग आहेत ते आपणाला आत्मसात केले पाहिजेत. जे शरीरबळ व जे शौर्य आपण प्राप्त करतो ते आपसात संघर्ष निर्माण करण्यासाठी नाही, समाजात शौर्याचा उपयोग क्रौर्य निर्माण करण्या-साठी नाही; तर शौर्याने समाजात व पर्यायाने राष्ट्रात भावनात्मक एकता निर्माण करून, राष्ट्र बलशाली करण्यासाठी आपली शक्ती कामी आली पाहिजे. व्यक्तिविकासाबरोबर समाज-विकासही साध्य करून, देश शौर्याने व तेजाने तळपेल अशा कल्याणकारी दिशेने आपली पावले पुढे पडावीत.

□ □ □

*जागृती : गणराज्य दिन विशेषांक १९७१*

## ५.

# राष्ट्रीय एकतेसाठी साहित्यिकांची जबाबदारी

आम्ही स्वतंत्र भारताचे नागरिक. आम्ही निरोगी, सुदृढ बनून क्रियाशील व्हावे व आपले राष्ट्रीय जीवन उन्नत होण्यास सामंजस्याने सदैव प्रयत्नशील राहावे हेच खरे राष्ट्रीयत्व होय. समता, बंधुत्व आणि सदाचाराचे व्यवहार राखणे आणि राष्ट्र समृद्धिशाली होण्यासाठी आपले जीवन सर्मपित करणे माझ्या दृष्टीने सर्वात मोठा राष्ट्रधर्म आहे. अर्थात राष्ट्रात भावनात्मक एकता निर्माण करणे आणि राष्ट्रकार्याच्या पूर्तीसाठी आपली सर्व शक्ती खर्ची घालणे हे आपले कर्तव्य ठरते.

प्राचीन युगाकडे दृष्टी टाकली तर आध्यात्मिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात भावनात्मक एकतेच्या पार्श्वभूमीवर जनकल्याणाचा जो आदर्श भारतवासीयांनी राखला व जे दिव्यरूप दर्शविले आणि त्यानुसार जी उच्च परंपरा चालत राहिली ती मध्ययुगाच्या कालखंडात मात्र आपापसातील कलहाने व संघर्षाने खंडित झाली. भारताच्या त्या उच्च व उदात्त आदर्शांना फार मोठचा तडा गेल्या आणि त्या जागी वर्णभेद, जातिभेद आणि विषमता यांनी उग्ररूप धारण केले. वस्तुतः ऋषि–महामुनींनी आपल्या तपस्येने आणि विशाल दृष्टिकोनाने लोकोत्तर कार्यांची पावनगंगा निर्माण केली. प्राचीन पूर्वजांनी भारतभूमीप्रीत्यर्थ केवळ आपले सौहार्द, श्रद्धा आणि निष्ठा व्यक्त करून मानवकल्याणच साध्य करण्याचा प्रयत्न केला नाही तर राष्ट्राचा माथा संपूर्ण विश्वात उच्च व वंदनीय राखण्याचाही प्रयत्न केला होता. प्राचीन अपौरुषेय ग्रंथ आणि शास्त्र ते जुने विशुद्ध आदर्श आजही सिद्ध

करण्यास पूर्णत: समर्थ आहेत. परंतु भारताची समाजनीती आणि सांस्कृतिक धोरण असे बदलून गेले आणि अशा दिशेने धावू लागले की ते पाहून साधुसंतांना आपल्या आध्यात्मिक पिंडबळाने जनकल्याणकारी ब्रह्मांडाचा परिचय करून देण्याचा यत्न करावा लागला आणि तसेच मानवाचा उद्धार होण्यास भावनात्मक एकतेची प्रबल पार्श्वभूमी निर्माण करावी लागली. ऋषिमहामुनी व साधुसंतां-सारख्या महात्म्यांचा आदर्श राखण्यास आम्ही असमर्थ ठरलो आणि त्याचे कटु-फळही आम्हाला भोगावे लागले.

तसे पाहिले तर, भौतिक आणि आधिभौतिक, लौकिक आणि पारलौकिक, दार्शनिक आणि वैज्ञानिक, ज्ञेय आणि अज्ञेय, सचेतन आणि अचेतन आदी मनुष्यमात्राच्या आणि निसर्गाच्या परिक्षेत्रात भारत आपल्या आगळ्या वैशिष्टयांनी अग्रेसर आहे. आपल्या ज्ञानवंत पूर्वजांनी तपस्येच्या बळावर या सर्व क्षेत्रांत सफलता प्राप्त केली; भारताच्या मूळ सिद्धांतांनी कल्याणकारी आदर्शांचे दिव्य दर्शन घडविले, त्यांनी शब्दांत मंत्र भरला आणि कर्मात अमृताचे सिंचन केले. शून्यात आत्मा भरला आणि देहात मनाला प्रवाहित केले. त्यांनी चमत्कृति-जन्य गोष्टींना थारा दिला नाही. देह, आत्मा आणि निसर्ग यांच्या प्रभावाने मनुष्यजन्माचे सार्थक घडेल असा आविष्कार घडविला. मनुष्य मनुष्याला पूर्णपणे ओळखत होता. आपापसात कोणत्याही प्रकारची विषमता अथवा संघर्ष निर्माण होईल अशी विकृतिदर्शक गोष्ट नव्हती आणि समाजजीवनात कसल्याही प्रकारची बाधा उत्पन्न होईल असे काही नव्हते. उलट प्रत्येकाने एकमेकाला आधार देऊन उन्नत करावे, त्यांच्यात भावनात्मक एकता व प्रबल संघशक्ती निर्माण व्हावी आणि पंचमहाभूतांनी निर्माण झालेला मनुष्य मनुष्यत्वाचे दर्शन देण्यास पूर्णत: समर्थ ठरावा अशीच सत्कृती आचरली जात होती. जीवनसाफल्याचे मार्ग भिन्न भिन्न राहणे शक्य असले तरी मानवमंदिर मात्र एक होते. कोणी कोणत्याही मार्गाने आला तरी तो या ध्येयमंदिराच्या पवित्र चबुतऱ्यावर चढू शकत होता. परंतु बदलत्या काळाला न ओळखता, नियतीची दिशा लक्षात न घेता, आम्ही स्वयं आणि अहं, हा आणि तो, आवृत आणि अनावृत, भावनांच्या शिरोबिंदूवरील आपले सत्त्व आणि स्वत्व, ज्ञान आणि कर्म, भाव आणि भक्ती या सर्वांना, मनुष्य-मात्रांच्या उद्धारक दिशा बदलून जातील अशा रीतीने तिलांजली दिली आणि आपली प्रज्ञाशक्ती गमावली.

जेव्हा आम्ही पारतंत्र्यात होतो, ब्रिटिश राजवटीखाली होतो तेव्हा तर आमची संस्कृती, कला, साहित्य आणि नीतीही बंदिस्त झाली, आमचे आचार विचार पालटले आणि रीतिरिवाजसुद्धा बदलून गेले. आम्ही कुठे उभे आहोत, का उभे आहोत आणि धर्म, नीती व कर्तव्याची आमची दिशा काय आहे हेही समजून घ्यायला आमच्यात क्षमता उरली नाही. सदाचार आणि सत्प्रवृत्तीला विकृत आणि

भ्रष्ट रूप येऊ लागले. आम्ही भारतीय असून देशात संस्कृती, धर्म आणि साहित्य यांचा दर्जा काय आहे आणि उन्नतीचा कोणता मार्ग आक्रमिला पाहिजे हे आम्ही विसरून गेलो. या सर्वांचा अनिष्टच परिणाम झाला. आपसातील कलह, वर्णभेद, जातिभेद व विषमता यांच्या ज्वाळा अधिकच फोफावल्या ! त्यामुळे आमची संस्कृती ढासळली व त्या पथावर साहित्य आणि कलेची सृजनताही अध:पतित होत राहिली. अशा त्या संक्रमणकाळात धर्म, संस्कृती आणि साहित्याच्या रक्षणार्थ व संवर्धनार्थ संतमहंतांनी धाव घेऊन ईशभक्तीच्या माध्यमाद्वारे त्यांनी जनजागृती निर्माण केली आणि एकतेचा दिव्य संदेश दिला. मोगलशाहीत आणि ब्रिटिश राजवटीच्या काळात तर संतांचे कार्य विशेष प्रभावशाली राहिले. संत ज्ञानेश्वर, संत तुलसीदास, संत कबीर, भक्त सूरदास, संत मीराबाई, संत बसवेश्वर, संत चोखोबा, संत एकनाथ, संत तुकाराम, रामदासस्वामी प्रभृती संतांनी आत्म-निरीक्षण करून आपल्या अमृतवाणीने जो प्रकाश दर्शविला तो त्या काळात भारताला मोठा आधार राहिला. त्याचप्रमाणे श्री रामकृष्ण परमहंस, श्री दयानंद सरस्वती, श्री स्वामी विवेकानंद, श्री अरविंद घोष आदी महंतांनी आपल्या आध्यात्मिक बैठकीवरून राष्ट्रीय धर्म, नीती आणि एकता यांचे केवळ समर्थनच केले नाही तर कल्याणकारी भावना व मनुष्यत्व यांची ज्योत प्रज्वलित केली आणि त्या उदात्त दृष्टीने भाष्य करून व साहित्य निर्माण करून त्यांनी विश्वक्षेत्रात भारताचे गौरवशाली व प्रभावशाली स्थानही अंकित केले.

स्वातंत्र्यापूर्वी भाषण, लेखन व मतप्रदर्शनाची स्वतंत्रता नसतानाही जे साहित्य निर्माण झाले ते वास्तवदर्शी व सर्जनशील होते. राष्ट्रीय भावनेची प्रखर प्रेरणा त्यात नव्हती तरीसुद्धा सामाजिक, व्यावहारिक व आध्यामिक रूपात त्याची महत्ता काही विशेष होती. कथा–कादंबरी असो अथवा काव्यनाटच असो, एका निराळ्या शैलीने आणि ढंगाने त्या साहित्याने उदात्त भावनांना व विचारांना आविष्कृत केले. त्या माध्यमाद्वारे त्या वेळच्या कादंबरीकारांनी, कथाकारांनी, नाटककारांनी व कवींनी भारतीय संस्कृती, नीती, धर्म व व्यवहार यासंबंधी आपा-पल्या शैलीने जे समाजचित्रण केले ते नि:संशय लोकाभिमुख असल्याने लाभदायकच ठरले. त्यात राष्ट्रीय अंगाच्या सूक्ष्मधारा प्रवाहित झाल्या होत्या आणि या ना त्या रूपाने एकतेची चित्रेही दिग्दर्शित करण्यात आली होती. राजकीय धोरणांचे ललित-विवेचन अथवा विदग्ध वाङमयाचे राजनीतिपूर्ण विवरण नसतानासुद्धा, रंजना-बरोबर बोधक प्रवाहांचे व सामाजिक पैलूंचे दर्शन अवश्य घडत होते. उच्च श्रेणीच्या ह्या साहित्यकारांनी आपल्या साहित्याची विविध अंगे प्रभावीपणे अभि-व्यक्त केली होती; इतकेच नव्हे तर भारताच्या नवजीवनासंबंधी काही संकेतही दर्शविले होते. मुन्शी प्रेमचंद, शरत्चन्द्र चटर्जी, बंकिमचन्द्र, हरिभाऊ आपटे, रवींद्रनाथ टागोर, वामन मल्हार जोशी, ज्योतिबा फुले, लोकहितवादींसारख्या

साहित्यकारांनी तर समाजापुढे उच्च व उदात्त आदर्श प्रस्थापित केला.

ज्या काळी आम्ही रगडले जात होतो, आमची वाचा बंद केली जात होती आणि चारही दिशांनी आम्ही बंदिस्त केले जात होतो तो कर्दनकाळ आता मावळला. आज आमचा देश स्वतंत्र आहे, आम्ही स्वतंत्र आहोत आणि आमच्या विकासाची सर्व दारे पूर्णत: मोकळी आहेत. आमचे राष्ट्र स्वतंत्र झाल्यावर आम्ही गुलामीतून मुक्त झालो. पण त्याबरोबरच नवराष्ट्र निर्माण करण्याची व एकतेने समाजजीवन समृद्ध करण्याची विशेष जबाबदारीही आमच्यावर आली. या महान कार्याच्या पूर्तीस्तव पाऊल पुढे टाकणे आणि कितीतरी भयावह समस्या आमच्या पुढे उभ्या राहणे याची एकच गाठ पडली. तरी न डगमगता आत्मविश्वासाने व निर्धाराने राष्ट्रकल्याणाचे पवित्र कर्तव्य आम्हाला बजावलेच पाहिजे. माझ्या दृष्टीने तर राष्ट्रीय एकतेसाठी व कार्यासाठी साहित्यकारांवर विशेष जबाबदारी आहे. तेव्हा ' सत्यम् शिवम् सुंदरम् ' असे राष्ट्राचे तेजस्वी चित्र निर्माण करण्यासाठी साहित्यकारांनी हिरिरीने पुढे सरसावले पाहिजे.

आमच्या देशाचा आत्मा गावागावात सामावलेला आहे. स्वातंत्र्यापूर्वी हे गाव भकास आणि दुर्बल होते. मनुष्यधर्म आणि संस्कृती खालच्या पातळीवर उतरली होती. आम्ही उत्साहाने व उमेदीने पावले पुढे टाकू अशी समाजात ध्येयनिष्ठाही नव्हती. आम्ही निष्क्रिय झालो होतो. परंतु आता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आमच्या राष्ट्राच्या सर्वांगांचा विकास व्हावा, प्रत्येक गाव व प्रत्येक मनुष्य समर्थ बनावा, आपली संस्कृती व नीती उच्च व उदात्त व्हावी अशा प्रभावी आदर्शाच्या ध्येयाने प्रेरित होऊन, तळमळीने आणि कळकळीने साहित्यकारांनी आपल्या लेखणीला तेजस्वी रूप देणे व राष्ट्रातील सात लाख गावे प्रकाशित करणे त्यांचे आद्य कर्तव्य आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी अर्थातच आम्हाला जिद्दीने कार्यप्रवण होणे अत्यावश्यक आहे. पण हे उदात्त स्वप्न साकार करण्यासाठी ज्या उच्च प्रकारचे साहित्य निर्माण व्हायला पाहिजे तसे ते आढळत नाही. राष्ट्रीयत्वाचा, मानवतेचा अथवा एकतेचा पुरस्कार करण्यास ते समर्थ नाही. स्वातंत्र्यानंतरची आमची जबाबदारी आम्ही सहजतेने विसरलो आणि भलत्याच रंजनात्मक बाजारू साहित्याला महत्त्व द्यावयाला लागलो. जे काम अधिकांश साहित्य निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न करतो तेही शहरी, दिखाऊ जीवनावर आणि रीतिरिवाजही दर्शवितो तेही पाश्चात्यांच्या आदर्शांवर ! राष्ट्रीय कार्यापासून तर आम्ही फार दूर आहोत. वस्तुतः नवराष्ट्र व नवसमाज निर्माण करण्याची जबाबदारी पर्यायाने साहित्यकारावरही येते हे आम्ही विसरून जातो. राष्ट्रविकासाच्या कार्यात सहकार्य देणाऱ्या साहित्याला ' प्रचारात्मक साहित्य ' म्हणून कमी लेखून राष्ट्रीय भावनांपासून आम्ही वंचित होतो. जणू काही राष्ट्रासाठी काही श्रद्धा व निष्ठाच नाही असे धोरण आढळू लागते. साहित्य कलात्मक असावे, हे मला मान्य आहे पण हे

बाजारामध्ये स्वस्त माल विकणाऱ्याचे दुकानही नसावे ! त्या कलात्मक साहित्याचा दर्जा उच्च असायला पाहिजे आणि त्यात रंजकतेबरोबर बोधकताही असायला पाहिजे; इतकेच नव्हे तर राष्ट्रीयत्वाची प्रेरक भावनाही त्यात प्रखरतेने आविष्कृत होणे अत्यावश्यक आहे.

कोणत्याही कार्याच्या सफलतेसाठी मूलतः आध्यात्मिक बैठकीची गरज असते. त्याशिवाय व्यक्तित्वाची मजबूत पायरी निर्माण होत नाही. ती लाभली की आम्ही घसरून पडणार नाही असा आत्मविश्वास निर्माण होतो. भारतीय संस्कृतीचे म्हणा अथवा नीति–नियमांचे म्हणा आध्यात्मिक पिंड हेच जीवन-साफल्याचे पावन मूळ आहे. भावनात्मक व सांस्कृतिक एकता त्या आध्यात्मिक पिंडावरच विशेषरूपाने निर्भरित असते असे गंभीरपणे विचार केल्यावर वाटते. ज्ञान आणि बुद्धीच्या समन्वयाने हा आध्यात्मिक पिंड आविष्कृत केला गेला तर तो, एका प्रबल आत्मशक्तीला जन्म देऊन, जीवनातील प्रत्येक पैलूला प्रकाशमान करण्यास समर्थ ठरतो. प्राचीन काळातील साहित्यकारांनी तर या आत्मशक्तीने आपले व्यक्तित्व तेजस्वी केले आणि आजही साहित्यकारांकडून असे प्रभावी अंग निर्माण करण्याची अपेक्षा राहील. राष्ट्रीय एकता निर्माण करण्याची आणि समाज-विकास घडविण्यासाठी आम्ही आपले कर्तव्य कसे बजावयाला पाहिजे, हे दर्शविण्यासाठी माझा उद्देश मी थोडा स्पष्ट केला. त्या दृष्टीने आपण आपले लक्ष शहराप्रमाणेच ग्रामीण विभागावरही विशेषत्वाने केन्द्रित करायला पाहिजे असे माझे साहित्यकारांना आवाहन आहे. त्यांनी तेथील समस्या समजून घेतल्या पाहिजेत; सुखदुःख, अडचणी व अवस्था यांचा आत्मीयतेने अभ्यास करायला पाहिजे. त्यांनी आपल्या साहित्याद्वारे बंधुत्वाचे नाते जोडून, परस्परांना सहकार्याची भूमिका निर्माण करायला उद्युक्त करायला हवे. दैनंदिन ज्वलंत घटनांच्या बाबतीत जागरूक राहून, मानवतेचा पुरस्कार करण्यास आणि भारतीय संस्कृती आणि नीतिधर्म यांचा हितैषी आविष्कार घडविण्यास प्रयत्नशील असणे अत्यावश्यक आहे. अशा या सम्यक् दृष्टीने जीवनात मंगलत्व निर्माण करणारे आणि कलात्मक पण बोधकतेने राष्ट्रीयत्व आविष्कृत करणारे साहित्य निर्माण होण्यातच आपल्या राष्ट्राचा उच्च व उदात्त दर्जा सिद्ध होऊ शकेल.

□ □ □

---

*विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलनातर्फे प्रकाशित होणाऱ्या, सप्टेंबर १९६३ च्या 'पूर्णा' या हिंदी मासिकात प्रसिद्ध. हिंदी लेखाचा प्रस्तुत लेख अनुवादित आहे.*

सर्ग ३

# महाराष्ट्रातील संतांची वाणी आणि प्रभाव

१. महाराष्ट्रातील काही पुरोगामी संत
२. क्रान्तदर्शी श्री संत चोखामेळा
३. वाहती संतामृतवाणीचे झरे

# १.

## महाराष्ट्रातील काही पुरोगामी संत

सर्व वाङमयात संतवाङमय सर्वश्रेष्ठ आहे. संतांचे आचार, विचार आणि वचने प्रमाणभूत मानली जातात. महाराष्ट्रात जे संत होऊन गेलेत ते सर्व आशावादी आणि मानवी जीवनाचे मूल्य सिद्ध करणारे होते. धर्म आणि रूढी यांचा कीस काढून त्यांनी मानवी धर्माची शिकवणूक एका उच्च पातळीवरून दिली. त्यांचे कार्य केवळ भक्तिमार्गाचे नव्हते तर मनुष्यमात्राच्या कल्याणाचे आणि एकतेच्या सिद्धांताचे होते. कालमानाप्रमाणे रूढी बदलली जाऊन नवीन विचारांचे–नवीन कल्पनांचे अधिराज्य प्रस्थापिले जावे आणि 'एकमेका करूं साहाय्य । अवघे धरूं सुपंथ' अशा हितप्रद धोरणाचा अवलंब केला जावा असा त्यांचा आदेश होता. उदात्त, निर्मळ व प्रभावी स्वरूपाच्या त्यांच्या वाङमय–संपदेच्या कोंदणात त्यांची असामान्य कर्तबगारी समाविष्ट होती. त्यांच्या कामगिरीत इतर समजतात तसे प्रतिगामीत्व नव्हते तर हृदयात परिवर्तन घडवून मनुष्यत्व सिद्ध करणारे होते. आजच्या स्वातंत्र्याच्या काळात राष्ट्रीय, सामाजिक व व्यावहारिक जीवनामध्ये त्यांचे व्यक्तित्व कसे होते, त्यांचे स्थान उठावदार कसे होते आणि त्यांचे विचार कसे मार्गदर्शन करणारे होते याचा साकल्याने जितका अधिक विचार केला जाईल तितका तो फलदायीच ठरेल.

संतांसंबंधी बहुतेकांचा असाच समज आहे की, संत निरुपाधिक, निरंजन, शब्दब्रह्म व परब्रह्म यात गुंतलेले, आपल्याच नादात–तंद्रीत रमलेले, सभोवतालच्या जगाशी संबंध न ठेवणारे आणि आपल्याच उद्धाराची कास धरणारे

प्रतिगामी स्वरूपाचे होते. पण असा समज असणाऱ्यांनी थोडचा दूरगामी आणि व्यापक दृष्टीने विचार केला तर त्यांना असेच म्हणावे लागेल–

काय या संतांचे मानूं उपकार । मज निरंतर जागविती ।।
काय देवा यांसी व्हावे उतराई । सेविता हा पायी जीव थोडा ।।
सहज बोलणे हाचि उपदेश । करूनी सायास शिकविती ।।

वस्तुत: " जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारें ।।" इतके प्रचंड कार्य संतांचे आहे. तेव्हा त्यांना प्रतिगामी समजून स्वत:च्याच उद्धाराप्रीत्यर्थ ते झिजले असा त्यांच्यावर दोषारोप करणे पूर्ण अन्यायकारक होईल. संतांच्या काव्यात सुप्त भावनेचे पडसाद दिसत नाहीत तर जनहितासाठी कळकळ आणि तळमळ व्यक्त झाली आहे. त्यांनी जनसमूहाला अज्ञानांधकारातून बाहेर काढण्याचा कसोशीने प्रयत्न करून, खऱ्या कर्तव्याची तीव्र जाणीव करून दिली आहे. आणि म्हणून, लोकजागृतीचे अस्सल राष्ट्रकार्य करणारे ते क्रांतिकारक संत होते, खरे लोकोपकारकर्ते होते असे साभिमानपूर्वक म्हणणेच भाग पडते.

जाती, धर्म, संस्कृती व भाषा हे राष्ट्राचे मुख्य घटक होत. राष्ट्रात अराजकता माजली की या घटकांवर परिणाम होऊन राष्ट्राचे स्वरूप विरूप होते. अशा वेळी लोकजागृती करून जनतेला कर्तव्याची जाणीव करून देण्यास लोकोत्तर पुरुषांची गरज असते. या पुरुषांत दोन प्रकारचे लोक कार्य करतात. काही राजकारण हेच ध्येय मानून पुढे सरकणारे आणि काही समाजकारण व धर्मकारण हेच ध्येय मानून कार्य करणारे. संत ह्या दुसऱ्या प्रकारात मोडतात. अकराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकापर्यंतच्या प्रदीर्घ कालखंडात संपूर्ण भारत देशात संतांची एकच लाट उसळली. त्यांनी ईशभक्तीचे निमित्त करून परिस्थितीने उफाळलेल्या जनतेला सावरण्याचा व धर्म–संस्कृतीचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला. विशेषत: महाराष्ट्रातील संतांनी विशेष जागरूक राहून, महाराष्ट्राचे ज्या पुरोगामी रीतीने संवर्धन केले ते इतके प्रभावी आणि परिणामकारक झाले की संपूर्ण महाराष्ट्र ह्या संतांचे यावच्चंद्रदिवाकरौ ऋणी राहील. प्रस्तुत ठिकाणी ज्ञानेश्वर, चोखोबा, एकनाथ, तुकाराम आणि रामदास ह्या पाच संतांच्या पुरोगामी कार्याचा संक्षिप्त आढावा कालमानाप्रमाणे घेण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. नामवंत संशोधकांनी आणि साहित्यिकांनी संतांच्या बाबतीत फारच महत्त्वाचे कार्य करून ठेवले आहे. आजही त्यासंबंधी बराच ऊहापोह केला जात आहे. तेव्हा मी काही नवीन सांगणार आहे असे नाही, तर ह्याच संशोधकांच्या आणि साहित्यिकांच्या पावलावर पाऊल ठेवून संतांच्या पुरोगामित्वाची बाजू त्यांच्या काव्याद्वारा एका नराळ्या दृष्टीने मांडणार, एवढेच काय ते. त्यात माझे स्वत:चे काही आहे असे मुळीच नाही.

फार प्राचीन काळी 'रट्ट' नावाचे लोक राज्य करीत होते. ह्या 'रट्ट' शब्दाचे संस्कृत रूपांतर 'राष्ट्र' असे आहे. 'रट्ट' लोकात 'महार' हे लोक अग्रेसर होते. त्यांच्या प्रदेशाला 'महारट्ट' म्हणत असत. त्यावरूनच 'महाराष्ट्र' हे नाव पडले आहे. श्रीसंतज्ञानेश्वरपूर्वकालीन मराठी वाङमय फारच थोडे होते. मुकुंदराज हा मराठीतला आद्य कवी होता. त्यांनी विवेकसिंधु, परमामृत, मूलस्तंभ, पंचीकरण इत्यादी ग्रंथ लिहिले. मुकुंदराज जैत्रपाळाच्या वेळचा असावा असा काही संशोधकांनी तर्क व्यक्त केला आहे. याचा थोडा पुरावा असा देण्यात येतो–

> नृसिंहाचा बल्लाळ । तयाचा कुमार जैत्रपाळ ।
> तेणे करविला गदारोळ । ग्रंथ रचनेचा ।।

असे एक चरण त्यांच्या काव्यात येते. मुकुंदराजानंतर बराच काळ लोटल्यावरही उल्लेखिता येईल असा कवी किंवा ग्रंथकार नमूद करणे कठीण आहे. आजचा संपूर्ण महाराष्ट्र त्या काळी जंगला-पहाडांनी व्याप्त होता. आजची शहरे दिसतात तशी त्या वेळी होती–नव्हती ह्या स्वरूपात असून लोकांची राहणी आणि व्यवहार, संस्कृती आणि भाषा एक, पण ताळमेळ न जमणारी होती. अकराव्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रात नांदत असलेल्या तुरळक राज्यांत, गट, संघ, जाती यांना भलभलता आकार येऊ लागला. याला कारणेही तशीच होती. राज्यकर्त्यांचा गट, मिरासदार ब्राह्मणांचा संघ आणि जळता खालचा थर, असे विषम वातावरण होते. त्याचा भलताच परिणाम होऊन त्याचे रूपांतर यादवीत झाले. छोटे मोठे राजे आपापली राज्ये वाढवून एकमेकांकडे शत्रुत्वाच्या भावनेने पाहू लागले. त्यामुळे त्या त्या राज्यातील जनतेवर अनिष्ट परिणाम घडून जातीयता बोकाळली. वर्ण आणि धर्म यात फरक पडला. मूळचे सर्व हितैषू आचार–विचार बदलू लागले. अर्थात याचा महाराष्ट्राच्या संस्कृतीवर आणि भाषेवर चांगलाच परिणाम झाला. जो तो आपली पोटभाषा व संस्कृती उच्च मानू लागला. समाजाचे वर्गीकरण होऊन एक भाषा व एक धर्म पाळणारे लोकही आपापसात हेवादावा करू लागले. ज्ञानेश्वरपूर्वकालीन ही स्थिती प्रथमतः लक्षात घेणे आवश्यक आहे.

### भागवतधर्म संस्थापक संत ज्ञानेश्वर

दक्षिण हिंदुस्थानात यादव वंशातील राजे देवगिरीला राज्य करीत होते. ह्या वंशातील मूळ पुरुष भिल्लम याने शके ११०९ ते १११४ पर्यंत देवगिरीचे राज्यवैभव उपभोगिले. भिल्लमनंतरचा पाचवा पुरुष रामदेवराय हा होय. याने शके ११९३ ते १२३१ पर्यंत म्हणजे अडतीस वर्षे राज्य केले. हाच राजा ज्ञानेश्वराच्या काळी होता. हा फार चतुर राजा होता. तो विद्या व कला ह्यांचा फार भोक्ता होता म्हणूनच त्यांच्या राज्यात हेमाद्रीसारखा राजकार्यकुशल पुरुष पुढे आला. रामदेवरायच्या अमदानीत धनधान्याने देश संपन्न असल्यामुळे लोकांचे लक्ष ऐहिक

सुखोपभोग घेण्याकडे लागले होते; त्या वेळी धर्म निव्वळ कर्मकांडात उरला होता. प्रमुख दोन वर्णांचे लोक म्हणजे ब्राह्मण आणि क्षत्रिय हे या सुखासीनतेमुळे कर्तव्यच्युत होत चालले होते आणि म्हणूनच पुढील संकटाचे ढग हळूहळू आकाशात जमू लागले होते. ज्ञानेश्वरांच्या समकालीन असलेले नामदेव म्हणतात–

तत्त्व पुसावया गेले वेदज्ञानी । तव भरले त्यापासी विधिनिषेध ।।
तया समाधान नुमजे कोणे काळी । अहंकार बळी झाला तेथे ।।
स्वरूप पुसावया गेले शास्त्रज्ञासी । तव करणे तयापासी भेदाभेद ।।
एक एकाच्या न मिळती मतासी । भ्रांत गर्वराशी भुलले सदा ।।

यावरून त्या वेळी ब्राह्मणवर्ग कोणत्या अवस्थेला आला होता हे सहज कळून येते. त्याप्रमाणे क्षत्रियांनी आपला धर्म सोडल्यामुळे ते बाहुबलाने कर्तव्यहीन झाले होते. वैश्य आणि शूद्र ह्या जातींची अवस्था आधार सुटल्यामुळे शोचनीय झाली होती. त्यामुळे हेही लोक असहकारतेने वागू लागले होते. अशा परिस्थितीत श्रीसंत ज्ञानेश्वर शके ११९७ मध्ये जन्माला आले. तेव्हा त्यांच्या अवलोकनात आले की, लोक खऱ्या मानवधर्मापासून भ्रष्ट होत आहेत. व्रते, उद्यापने यांचा भलभलत्या मार्गाने उपयोग करीत आहेत. तेव्हा ज्ञानेश्वर म्हणतात–

तुम्ही व्रत नेम न करावे । शरीराते न पीडावे ।
दुरी केही न वचावें । तीर्थासि गा ।।
योगादिके साधनें । साकांक्षा आराधनें ।
मंत्रतंत्र विधानें । क्षणी करा ।।

फाजील रूढी आणि अंधश्रद्धाळुपणा सोडून देऊन स्वधर्मावर भर देण्याचे सांगून ते म्हणतात–

कां भ्रताराविना वनिता । उपहति पावे सर्वथा ।
तैशी दशा जिविता । स्वधर्मे वीण ।।
देखे अनुक्रमा आधारे । स्वधर्म जो आधारे ।
तो मोक्षतेने व्यापारे । निश्चित पावे ।।
म्हणोनि स्वधर्मानुष्ठान । ते अखंड यज्ञयाजन ।
जो करी तया बंधन । कांहीच न घडे ।।
देवावतारा न भजावें । हे सर्वथा कांही न करावें ।
तुम्ही स्वधर्म यज्ञी यजावे । अनायासे ।।

स्वधर्म म्हणजे, कर्तव्यकर्म पाळूनच मनुष्य विजयी होतो, त्याचा जन्म सार्थकी लागतो, असा ज्ञानेश्वरांचा करडा आदेश होता. आपली कामेधामे सोडून देऊन केवळ व्रत, यज्ञ, पूजाधर्म केल्याने मनुष्याची उन्नती होत नाही यावर त्यांनी

फार मोठा भर दिला. आप्त बांधव पाहून रणांगणात द्रवीभूत झालेल्या अर्जुनाला उद्देशून ते लोकांना सांगतात–

अर्जुना तुझे चित्त । जरी जाहले द्रवीभूत ।
तरी हे अनुचित । संग्राम–समयीं ।

क्षत्रियाचा पेशा पत्करल्यावर द्रवीभूत होऊन उपयोग नाही. संग्राम-समयी मागे पाऊल घेण्यात पुरुषार्थ नाही असा खणखणीत टोला त्यांनी क्षत्रियांना दिला.

प्रत्येक वर्णाला स्वकर्तव्याची जाणीव करून देताना राष्ट्राच्या अभ्युदयासाठी प्रत्येकाने झिजले पाहिजे आणि प्रसंगी जातिभेद पाळता कामा नये असा इषारा ज्ञानेश्वरांनी दिला.

चहू वर्णासि नामाधिकार । नामी नाही लहान थोर ।
जडमूढ पैलपार । पावती नामे ।।

आध्यात्मिक बाबतीत असा कटाक्ष राखून ते पुढे म्हणतात–

कां खैर चंदन काष्टें । ही विवंचना तंवची घटे ।
जंव न धापती एक घटे । अग्नीमाजी ।।
तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां क्षुद्र अत्यंजादि इया ।
जाती तंवचि वेगळाविल्या । जंव न पवती माते ।।

त्याचप्रमाणे ऐक्य आणि बंधुभावाचे तत्त्व ज्ञानेश्वरांनी लोकांच्या मनात बिंबविले. त्याचप्रमाणे कृत्रिम भेदाभेद विसरून जाण्यासाठी ते सांगतात–

हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण जाहला ।।

ह्या आपुलकीच्या वाणीने त्यांनी चारी वर्गात सद्‌भावना निर्माण केली. श्रीसंत ज्ञानेश्वरांच्या एकूण उपदेशाचा जनतेवर इतका इष्ट परिणाम झाला की लोकांनी त्यांच्या नेतृत्वाखाली भागवत धर्माचे लोण अखिल महाराष्ट्रभर पसरविण्यास सुरुवात केली. त्यामुळे निरनिराळ्या समाजांत नवचैतन्य निर्माण झाले. दुष्ट भावनांना बराच आळा बसून जनता एकमेकांसाठी पुढे येऊ लागली. महाराष्ट्राचा एवढा मोठा जनसमूह पूर्णपणे जागृत करून सत्प्रवृत्तीच्या मार्गावर त्याला आणून सोडणारे ज्ञानेश्वर पुरोगामी नव्हते असे म्हणण्यास कोणाची छाती धजेल?

त्याचप्रमाणे वरच्या थरापासून खालच्या थरापर्यंतच्या सर्व लोकांनी आपल्या धर्मातील तत्त्वज्ञान उमगावे म्हणून संस्कृतसारख्या दैवी वाणीत जे ग्रंथ होते ते त्यांनी–

मूळ ग्रंथींचिया संस्कृता । वरी मऱ्हाटी पहाता ।
अभिप्राय मानलिया चित्ता । कवण भूमि हे न योजवे ।।

बहुसंख्य मराठीभाषी लोकांच्यासाठी ' मराठी ' चा उपयोग झाल्यानेच सर्वसामान्य जनतेचा उत्कर्ष होईल व तिला आपले हित–अहित समजू शकेल इतकी दूरगामी दृष्टी राखून ज्ञानेश्वरांनी संस्कृताचेऐवजी मराठीचा उपयोग करून महाराष्ट्राचा आणि मराठी भाषेचा जाज्वल्य अभिमान व्यक्त केला आहे. इये मऱ्हाठीचिये नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळ करी ।। हे ज्ञानेश्वरांच्या लोकहिताचे फार मोठे प्रतीक आहे. ' माझा मऱ्हाठाचि बोल निके । अमृतातेही पैजा जिंके ' ह्या खड्या वाणीत त्यांनी महाराष्ट्र भारून टाकला. मराठ्यांची संस्कृती ज्यात साठविली आहे असा ' भावार्थ दीपिका ' हा जुन्या वाङमयात पहिला अप्रतिम ग्रंथ आहे. ज्ञानेश्वर ब्राह्मणांच्या कुळात जन्माला आले खरे पण त्यांनी ब्राह्मणांची तरफदारी केली नाही किंवा वर्गभेदाची छाननी केली नाही, तर उलट महाराष्ट्रातील संपूर्ण जनतेला एकाच सुपंथावर आणून सोडून, सर्वांना ज्ञानप्रकाश लाभला पाहिजे मग ब्राह्मण असो की अंत्यज असो. वेदवैदिक ज्ञानाचा अधिकार विशिष्ट वर्गांनाच असल्याचे पाहून ज्ञानेश्वरांना भारीच खेद वाटला. आपली कामगिरी विवक्षित क्षेत्रापुरतीच मर्यादित नसून प्रत्येक मनुष्यमात्रासाठी आहे अशा थोर वृत्तीने बहुजनसमाजाला ज्ञानलाभ व्हावा म्हणून गीतेला (ज्ञानेश्वरीला) त्यांनी जन्म दिला. ज्ञानेश्वर म्हणतात–

वेदु संपन्न होय ठायीं । परी ऐसा कृपणु आन नाही ।
जे कानी लागला तिहीं । वर्णाच्याची ।।

येरा भव व्यथा ठेलिया । स्त्री शूद्रादिक प्राणियां ।
अनवसरू मांडूनिया । राहिला आहे ।।

तरी मज पाहतां तें मागिल उणें । फेडावया गीतापणें ।
वेदु वेठला भलतेणे । सेव्य हो आवया ।।

त्याप्रमाणे मराठी भाषेतून आध्यात्मिक ज्ञान ज्ञानेश्वरांनी त्याकाळी अज्ञ जनांना दिले, कळत वा नकळत परपंथीयांच्या अत्याचाराला बळी पडू पाहणाऱ्या लोकांना वाचविले. ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या तोंडूनही वेद वदविले याचा अर्थ असमंजसांना समंजस बनविले. हे कार्य काही साधारण नाही.

पण, कालानंतर उच्च वर्णीयांनी ह्या ज्ञानदेवीचा लाभ बहुजनसमाजाला होऊ दिला नाही. ' ज्ञानेश्वरी ' हा आपलाच ठेवा आहे, त्यावर इतरेजनांचा हक्क नाही अशी कोती भावना बाळगून एकप्रकारे उच्चवर्णीयांनी ज्ञानेश्वरासंबंधी बहुजनसमाजाला अंधारात ठेवले. असे जर झाले नसते तर आज महाराष्ट्रातील असंख्य खेड्यापाड्यातील ग्रामीणांच्या हृदयी ज्ञानेश्वर डोलत राहिले असते. ज्ञानेश्वरीची भाषा अवघड होती, ती बहुजनसमाजाला उमगण्यासारखी नाही म्हणून आजच्या पीढीपर्यंत तिचा प्रसार होऊ शकला नाही, असा खुळा युक्तिवाद

काही करतात हे पाहून मोठे नवल वाटते. ब्राह्मण समाजातील रामदास, एकनाथ, मुक्तेश्वर आदींपैकी कोणताही संत घेतला तरी बहुजनसमाज या संतांशी पाहिजे तसा परिचित नाही हे लक्षण काय दर्शविते ? ह्या बहुजनसमाजाच्या मनात ब्राह्मणांविषयी जी अढी आहे तिला कारणीभूत कोण ? खेड्यापाड्यातून प्रवास करताना संत तुकाराम, चोखोबा, कबीर, मीराबाई, नामदेव आदी संतांची भजने किती अभिमानाने गायिली जाताना आढळतात; परंतु ज्ञानेश्वरांची एकही ओवी किंवा रामदासांचा एकही श्लोक कानी पडत नाही ही गोष्ट कोणालाही खटकण्यासारखी नाही काय ? पण आजच्या स्वातंत्र्याच्या काळात इकडे दुर्लक्ष करून भागणार नाही. यासाठी उच्चवर्णीयांनी थोडे तरी प्रायश्चित्त घेतलेच पाहिजे. अगदी सोप्या भाषेत ज्ञानेश्वरासंबंधीच्या माहितीची व ओव्यांची छोटी छोटी पुस्तके खेड्यापाड्यातील खालच्या थरापर्यंत विनामूल्य वाटण्यात आली पाहिजेत. प्रचारकांनी या गोष्टीची दखल घेऊन ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हा भेद ह्या प्रकाराने नष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सभासम्मेलनांतून आपली प्रगाढ विद्वत्ता प्रकट करण्यापेक्षा ह्या वक्त्यांनी खेडी गाठली पाहिजे, असे मी तरी कटाक्षाने म्हणण्यास धजणार !

ज्ञानेश्वरासारख्या महान संतावर झालेला त्या काळचा तीव्र सामाजिक जुलूम लक्षात घेतला, म्हणजे समाजाचे धुरीणत्व लाभलेल्या ब्राह्मणांनी केवढे घोर पातक केले ह्याची जाणीव होऊन हृदय भडकून उठते, सर्व समाजाच्या एकीकरणासाठी आपल्या अल्पवयात त्यांनी सर्व अत्याचार सहन करून, महाराष्ट्राला जे गौरवाचे स्थान प्राप्त करून दिले त्याची उतराई आज तरी होणे अत्यावश्यक आहे. स्नानसंध्या करून आम्ही विद्वान असल्याचा आपल्यापुरताच टेंभा मिरवून घेण्याचा काळ आता गेला. आता तर सद्भावनेने प्रेरित होऊन, सर्व मानवजातीच्या हितास्तव आपली लेखणी आणि वाणी जितकी जास्त खर्ची घालता येईल तितकी घालून समतेचा पुरस्कार करण्यातच महाराष्ट्राचे थोरपण आहे. या बाबतीत लोकांनी जर कसूर केला तर पुढील भवितव्य सांगणे कठीणच !

ज्ञानेश्वरांच्या काळी जैन, बौद्ध, लिंगायत ह्या धर्माप्रमाणे महानुभाव धर्माचा बराच प्रसार झाला होता. महानुभाव पंथाच्या राजघराण्यातच नव्हे तर राणे, राऊत, मानकरी व इतर लोकांत ह्या धर्माने फार मोठी पकड घेतली होती. तसे पाहिले तर महानुभाव वाङमयसुद्धा ज्ञानेश्वरापूर्वी निर्माण झाले होते. त्यातील बरेच शब्द ज्ञानेश्वरीत आढळतात. परंतु महानुभाव वाङमयाने मराठी जनतेला जे मार्गदर्शन करायला पाहिजे होते ते तितकेसे केले नव्हते. वाङमयापेक्षा तोंडी प्रचार मात्र बराच झाला होता. सर्व धर्म व सर्व पंथ यांचा साकल्याने विचार करून ज्ञानेश्वरांनी सर्वांना सोयीचा म्हणून भागवत धर्माचा प्रचार केला. वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान आबाल-वृद्धांना समजावे म्हणून ज्ञानेश्वरीसारखा अतुलनीय

ग्रंथ निर्माण केला. आणि त्याद्वारे ब्राह्मणांपासून शूद्रांपर्यंत आपुलकीचा सांधा जोडण्याचा प्रयत्न केला. एकूण प्रत्येक वर्णाला स्वधर्माची करून दिलेली जाणीव, स्पृश्यास्पृश्य आणि जातिभेदाच्या भूताचे बंड मोडण्यासाठी उभारलेला झेंडा, सर्व जनतेला मानवी गौरव प्राप्त करून देण्याचे त्यांचे व्रत, शैव-वैष्णव वादामधील झगडा मिटवून एकाच प्रभूचे सर्व भक्त म्हणून महाराष्ट्रधर्माची प्राणप्रतिष्ठा राखण्यासाठी भागवत धर्माचा प्रथम घातलेला पाया, संस्कृतभाषेतील उपनिषदांतर्गत वेदान्त व श्रीमत् भगवत्-गीतेतील तत्त्वज्ञान यांचा मराठी भाषेत उदात्त व पोषक समन्वय घडवून महाराष्ट्रभर केलेला प्रसार अशी ज्ञानेश्वरांच्या असामान्य कार्याची प्रभावशाली साखळी आहे. भगवान श्रीकृष्णाने निष्क्रिय झालेल्या अर्जुनाला त्याच्या कर्तव्याची व धर्माची जशी जाणीव करून दिली तशी ज्ञानेश्वरांनी त्या काळी निष्क्रिय झालेल्या व भांबावलेल्या समाजाला स्वोन्नतीचा व कर्तव्य कर्माचा सरळ मार्ग दाखविला.

त्यामुळे लोकांमध्ये ज्ञानेश्वराबद्दलचा आदर द्विगुणित होत गेला. नामदेवाने ज्ञानेश्वरांचे कार्य खूपच उचलून धरले. सेना न्हावी कृतज्ञतेने उद्गार काढतात—

आम्हा सांपडले वर्म । करूं भागवत धर्म ।
काय करूनि तीर्थाटने । मन भरले अवगुणे ।।

संत चोखोबा कळवळून उद्गारतात—

उघडोनी वेदार्थाचा ठेवा । केला तरणोपाय जीवा ।।
ऐसा समर्थ ज्ञानदेव । तया चरणी ठेवा भाव ।।
चोखा म्हणे श्रेष्ठ ज्ञानदेवी ग्रंथ । वाचिता सनाथ जीव होती ।।

याप्रमाणे सर्व संतांनी ज्ञानेश्वरांना मान देऊन, त्यांच्या कार्याचा व भागवत-धर्माचा जिव्हाळ्याने पुरस्कार केला.

श्रीज्ञानराजे केला उपकार । मार्ग हा निर्धार दाखविला
उदार तुम्ही सन्त । मायबाप कृपावन्त । केवढा केला उपकार
काय वानू मी पामर । जडजीवा उद्धार केला ।
मार्ग सुपंथ दाखविला ।।

अशा तऱ्हेची सद्भावना त्या काळी पसरून समाजात नवचैतन्य उत्पन्न झाले आणि व्यवहारात एकप्रकारचा पवित्रपणा आला. आपापला धंदा कनिष्ठ नसून तो प्रामाणिकपणे करणे हे आपले कर्तव्य आहे असे लोकांना वाटू लागले. सावता माळी म्हणतात—'कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।। लसुन मिरची कोथिंबीर । अवघा झाला माझा हरी ।' सेना न्हावी म्हणतात—'आम्ही वारिक वारिक । करूं हजामत बारीक ।। विवेक दर्पन दाऊ । वैराग्य चिमटा हालवूं ।।

उदक शांती डोई घोळूं । अहंकाराची शेंडी पिळूं ।। भावार्थाच्या बगला झाडूं । काम-क्रोधें नखें काढूं ।। '

अशा तऱ्हेने ज्ञानेश्वरांनी आपल्या उज्ज्वल कार्यप्रवाहात संतांना आणून सोडले. परपंथीयांशी भांडत न बसता, सर्व हितकारी भागवत धर्माचा त्यांनी निर्भयतेने उपदेश केला; व महाराष्ट्रात सामाजिक क्रांती घडवून आणली. त्या काळी बिकट झालेली परिस्थिती आटोक्यात आणण्याचा ज्ञानेश्वरांनी बराच प्रयत्न केला पण त्या वेळच्या ब्राह्मण, क्षत्रियांनी त्यांच्या उपदेशाकडे दुर्लक्ष केले असावेसे दिसते. कारण हे वर्ग राजाश्रयाला चिकटून होते आणि बहुजनसमाजासंबंधी त्यांच्या मनात ओढी होती. तसेच वैभवाचा उपभोग घेतल्यामुळे ते निष्क्रिय व निर्वीर्य झाले होते असे आढळते. त्यामुळेच मुसलमानांच्या हल्ल्यापुढे यादवांचा टिकाव न लागून त्यांचे राज्य नामशेष झाले. पण हा राष्ट्रीय अध:पात पाहण्यास ज्ञानेश्वर जगले नाहीत. ज्ञानेश्वरीसारखा तारक ग्रंथ अनुयायांच्या स्वाधीन करून ते शके १२१८ मध्ये समाधिस्थ झाले. म्हणून पुढे महाराष्ट्र स्वराज्यभ्रष्ट झाला तरी त्याची संस्कृती आणि धर्म नाहीसा झाला नाही. ह्याचे सारे श्रेय ह्या सर्व पुरोगामी संतांच्याचकडे जाते हे निर्विवाद आहे.

**बंडखोर संत चोखामेळा**

संत चोखामेळा हे श्रीसंत ज्ञानेश्वर समकालीन व वयाने मोठे होते. परिस्थिती अत्यंत दाहक होती. ब्राह्मण आणि अस्पृश्य हा भेद भयंकर विकोपाला गेला होता. अशा वेळी चोखोबांनी आपला कैवारी केवळ ईश्वरच आहे असे समजून त्यांनी विरोधीवर्गाला कसून तोंड दिले. अस्पृश्यांना योग्य न्याय, वागणूक व स्थान मिळण्याबाबत त्यांनी आपल्या शक्तीचा कस लावला, ते कडक भाषेत म्हणतात—

येथे जो संग आहे दुर्जनांचा । म्हणोनी शीण त्याचा होत आहे ।।
चोखा म्हणे ऐसा पडिलो कांचणी । सोसू हे जाचणी कोठवरी ।।
चहाड चोर जार भ्रष्ट ते साचे । हीनत्व जन्माचे पदरी आहे ।।
येथे ते दु:खाचे डोंगर आठवती । वाटतसे खंती माझ्या मना ।।

यावरून त्या काळी अस्पृश्य समाजाची दुर्दशा, छळ, विवंचना कशी असेल त्याचे भेसूर चित्र सहज लक्षात येते. चोखोबासारख्या धर्मभक्तिपरायण साधूवर जेथे अघोर व अमानुष अत्याचार झाले तेथे बाकीच्या अस्पृश्यांसंबंधी कल्पना न केलेलीच बरी.

समतेच्या आणि माणुसकीच्या पुरस्कारार्थ चोखाबा स्पृश्य समाजाला आळवून सांगतात—

नातरी अंत्यज आणि ब्राह्मण । गंगेमाजी करिता स्नान ।
तरी काय बाटले तिचे जीवन । पवित्रपणे सर्वदा ।।

तुम्हा आम्हा सकल देही । आत्मा एकचि असे पाही ।
तयासि याती वर्णू नाही । आपुले ठायी विचारा ।।

आम्ही किती जुलूम सहन करणार ? अंगाला वस्त्र नाही, पोटाला अन्न नाही, समाजात मान नाही. मनुष्यत्वाने जराही वागविले जात नाही असे सांगून ते ठासून अस्पृश्यांच्या अधिकाराची मागणी करतात–

चोखा म्हणे येथे सर्वा अधिकार ।
उंच नीच अपार तरले नामे ।।

पण त्यांचे ऐकतो कोण ? सर्वच उलटलेले–उलटचा काळजाचे ते, चोखोबाची किंवा त्याच्या जातभाईची कसली पर्वा करतात ! जनतेला कळवळून सांगून थकल्यावर ते सर्वांचा निषेध करतात–

धिक् तो आचार धिक् तो विचार ।
धिक् तो संसार धिक् जन्म ।।
धिक् ब्रह्मज्ञान वाउग्या ह्या गोष्टी ।
दया क्षमा पोटी शांति नाही ।।

संत चोखोबा स्वाभिमानी होते. धर्म, संस्कृती व अब्रू यांची त्यांना चाड होती. ते अस्पृश्यांना म्हणतात–' चावडी चला ना या वेळीं । शिव्या गाळी देऊं नका । कीं जी मायबाप ।। ' चोखोबांनी अत्याचाराचा केवढा प्रतिकार केला होता, समाजाचे केवढे जोरदार पुढारीपण स्वीकारले होते; केवढी सहनशीलता राखून जनतेला सुपथावर येण्यास विनविले होते हे सर्व काही ध्यानी घेतले म्हणजे चोखोबांनी क्रांतीचे केवढे बंड पुकारले होते ते स्पष्ट कळून येते. आणि शेवटी लोक काहीच ऐकत नाही असे पाहून ते देवाला जबाबदार धरतात–

जातीभेदे गांजिलों, त्रासिलों विटाळे ।
सोडवी या वेळी चक्रपाणीं ।।
एका पुढे एक पडती आघात ।
सारितां न सरत काय करूं ? ।।
दुष्ट रुढी नित्य करू पाही घात ।
सोसावे आघात कितीतरी ? ।।

अशा ह्या थोर क्रांतिकारक संताचा गुरुवार, वैशाख वद्य पंचमी, शके १२६० रोजी घात झाला ! पण त्यांनी क्रांतीची जी ठिणगी पेटवून दिली; जो लढा निर्माण केला, न्याय, समता व बन्धुत्व यांचा जो हिरिरीने पुरस्कार केला त्याचीच जागती ज्योत हाती घेऊन आजचे दलित पुढारी निधड्या छातीने रणांगणात उतरले आहेत आणि आपल्या उद्धारार्थ झुंज घेत आहेत.

**प्रगतिशील संत एकनाथ**

इ. स. च्या बाराव्या शतकापासून हिंदु–मुसलमानांच्या झगडयाला खरी सुरुवात झाली. मुसलमानांनी उत्तर हिंदुस्थानात स्वाऱ्या करून आपली दृष्टी दक्षिण हिंदुस्थानाकडे वळविली. काही हिंदुराजांनी मुसलमानांना तोंड देण्याचा प्रयत्न केला परन्तु साथीदारांनी प्रसंगी पळ काढल्यामुळे त्यांना मुसलमानांना शरण जावे लागले. काहींनी खुशाल मांडलिकत्व पत्करून आपले हातपाय पसरले. राजा रामदेवराय व त्याचा मुलगा शंकरदेव हे इ. स. १२९३ साली अल्लाउद्दीनने देवगिरीवर केलेल्या स्वारीच्या वेळी घाबरून गेले होते. हरपाळदेव याचीही तीच स्थिती झाली. मुसलमानांनी दक्षिणेत धुमाकूळ घालून हिंदुराजांना अमानुषपणे ठार केले. हिंदू पळपुटे निघाले. क्षत्रियांनी आपला क्षात्रधर्म सोडला होता. त्यामुळे महाराष्ट्राची किती तरी लूट झाली, देवळे पाडण्यात आली, सर्व कलाकुसरीचा नाश झाला. मुसलमानांची सत्ता सुरू झाली. ते आपला धर्म, भाषा पसरवू लागले. अशा रीतीने महाराष्ट्र परतंत्र झाला. इ. स. १३१८ हे साल तर हिंदूंच्या कमाल दुर्भाग्याचे होते. आपली संस्कृती, धर्म व भाषा नष्ट होऊ नये म्हणून श्रीसंत ज्ञानेश्वरादी संतांचे अनुयायी आपापल्या परीने प्रयत्न करीत होते पण त्यांना कोणी तरी मोठा पुढारी हवा होता. महाराष्ट्राच्या सुदैवाने त्या वेळी संत एकनाथ पुढे आले आणि ते धर्म, भाषा, संस्कृती यावर जे संकट कोसळत होते त्याच्या निराकरणास लागले.

संत नामदेवांच्याच वेळी 'दैत्यांचेनी भारें दाटली अवनी' अशी स्थिती होती. एकनाथाच्या वेळी तर हिंदुराज्य लुप्तप्राय होऊन ही स्थिती अधिकच भयावह झाली होती. एकनाथी भागवताच्या चवथ्या अध्यायात ते म्हणतात–

'ते कर्म निंदिती सकळ । त्यागिती केवळ जाउच म्हणौनि ।'

तसेच–'अपराधेविण ते वितंड । भले त्यांसी करिती दंड'
अशी राजकीय स्थिती होती.

'स्वमुखें ब्राम्हण न करिती अध्ययन । होती भ्रष्ट जाण मद्यपीते' अशी ब्राह्मणांची स्थिती होती.

'दावलं मलकांची पूजति गदा । वर्षातून फकीर होती एकदा । मग डोला होता थंडा । खाती मलीदा हिंदु तुर्कांचे खरकटें ।।' अशी स्थिती एकंदर हिंदूंची होती.

वर वर्णिलेली सर्व स्थिती स्वधर्म–कर्मे सोडल्यामुळे उत्पन्न झाली होती. म्हणून एकनाथांनी ज्ञानेश्वराप्रमाणे पुन्हा एकदा चारही वर्णांची व आश्रमांची कर्तव्ये आणि भागवत धर्माचे स्वरूप लोकांना समजावून सांगितले. आजूबाजूला मुसलमानी आणि फारशी भाषेचा हैदोस सुरू होता; आणि महाराष्ट्रीय पंडित संस्कृत भाषेच्या अभिमानात दंग होते. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला योग्य मार्ग-

दर्शन मिळण्यास काहीच साधन नव्हते. त्यासाठी एकनाथांनी मराठी भाषेचा जोमाने प्रचार सुरू केला. जागोजागी वावदूक पंडितांवर कोरडे ओढून, मराठी भाषेची महती व योग्यता त्यांनी प्रस्थापित केली. त्याचप्रमाणे राजभाषेचा आपल्या भाषेवर काही परिणाम होऊ न देता त्यांनी शुद्ध मराठी भाषेत ग्रंथ लिहिले.

संस्कृत ग्रंथकर्ते ते महाकवी । मां प्राकृती काय उणीवी ? ।
नवी जुनी म्हणावी । कैसेति केवी सुवर्ण–सुमनें ? ।।
कपिलेचें म्हणावें क्षीर । मां इतरांचे ते काय नीर ?
वर्ण स्वादें एकचि मधुर । दिसें साचार सारिखें ।।
संस्कृत वाणी देवें केली । मां प्राकृत काय चोरापासूनी झाली ।
तरी असोत या अभिमान भुली । वृथा बोली काय काज ।।

तसेच–माझी मराठी भाषा चोखडी । परब्रम्हे फळली गाढी ।
संत सज्जन जानती गोडी । त्या लागी जोडी जोडिला ग्रंथ ।।

यावरून एकनाथांनी मराठी जनतेच्या मराठी भाषेसंबंधी केवढे मोलाचे कार्य केले हे उघड होते. त्यांची कामगिरी केवळ ह्या प्रसारावरच अवलंबून होती असे नाही, तर त्यांनी समाजाच्या प्रत्येक थरात शिरून त्यांना कर्तव्यनिष्ठ बनविण्याचा बराच प्रयत्न केला. चातुर्वर्ण्याची त्यांनी सांगितलेली कर्तव्ये लक्षात घेण्यासारखी आहेत. विशेषत: ब्राह्मण आणि क्षत्रिय यासंबंधी त्यांनी दिलेला धडा सर्वांना अनुकरणीय आहे. ब्राह्मण कर्मठ असून कठोर वृत्तीचे आहेत. स्वार्थासाठी ते हपापलेले असतात, पंक्तिप्रपंच करून विषमता निर्माण करतात. ह्या सर्व जाणिवेमुळे एकनाथांनी सांगितले 'ज्याचे पोटी दया द्रवे' तोच खरा ब्राह्मण होय. क्षत्रियांसंबंधी ते म्हणतात–

वेचूनिया निजप्राण । गोब्राम्हणांचे संरक्षण ।
स्वधर्मे प्रजापालन । पृथ्वीरक्षण निरुपद्रवें ।।

ते पुढे क्षत्रियांचे खरे ब्रीद सांगतात–

शस्त्रांचे पाय वाजता माथा । रणांगणी न सरे मागुता ।

असा वीरच खरा क्षत्रिय आहे, असा त्यांनी जोर दिला होता. आणि पुढे भागवतधर्मासंबंधी ते म्हणतात–

जें जें कर्म स्वाभाविक । तें तें ब्रम्हार्पण अहेतुक ।
या नांव भजन निर्दोष । भागवतधर्म या नांव शुद्ध ।।

भक्ती म्हणजे 'सर्वभूती सप्रेम भजन युक्ती' असा त्यांचा दंडक होता. अशाप्रकारे एकनाथांनी गेल्या दीडशे वर्षांची महाराष्ट्राची भयावह परिस्थिती लक्षात घेऊन उच्चवर्णीयांना कर्तव्य–प्रेरित केले.

संत एकनाथ हे खरोखरी उच्च कोटीचे संत होते. त्या वेळी अस्पृश्यता इतकी बोकाळली होती व अंत्यजांचे इतके हाल होत होते की ते पाहून एकनाथांचा पवित्र आत्मा गदगदून गेला. अस्पृश्य हे आपलेच जीव आहेत. ह्या रंजल्या गांजलेल्या जीवांना आधार देऊन त्यांना समतेने वागविले पाहिजे अशा थोर विचारांनी त्यांनी उच्चवर्णीयांच्या आक्षेपाची जराही पर्वा न करता शूद्रांना–अतिशूद्रांना पोटाशी धरले. त्यांनी केवळ उपदेशच केला नाही तर जातीने अस्पृश्यात मिसळून तुम्ही आम्ही एकच हे सिद्ध केले. जेवढी दया, ममता, जिव्हाळा दाखविता येण्यासारखा होता तो त्यांनी रोटीव्यवहार करूनही दाखविला हे आजच्या पंडितांना आणि कर्मठ ब्राह्मणांना नव्याने सांगायला नको. एकनाथांचे तत्त्वज्ञान 'ज्यासि आपंगिता नाही। त्यासि धरी जो हृदयी।' ह्या तुकोबारायाच्या उक्तीप्रमाणे भूतदयेने भरलेले होते. ते स्वतः ब्राह्मण असल्यामुळे त्यांनी शांतीचा मार्ग स्वीकारला खरा पण क्षत्रियांनीही प्रसंग गुदरला असताना शांतच राहावे असे कुठेच सांगितले नाही. उलट महालक्ष्मीच्या प्रार्थनेत ते म्हणतात–

दुर्योधन हा लक्ष्मी तुझा रेडा। शेवटी आहुति घेसी तयाची।
बया दार उघड। घेऊनि दहा अवतार॥
करसी दुष्टांचा संहार। आकार सारूनि निराकार।
काय बैसलीस बया। म्लेंछे गांजिले देव भक्ता।
महिमा उच्छेदिला सर्वथा। न चले जप तप तत्त्वता।
एकरूप सर्व झाले बया। बया दार उघड, दार उघड।

यावरून यावनी सत्तेचा अंमल त्या वेळी कसा असेल व लोक कसे जर्जर झाले असतील हे कळून येते.

तत्कालीन समाजाचे एकनाथ हे लोकहितसाधक संत होते. त्यांची तेजस्वी कामगिरी महाराष्ट्राला कदापि विसरता येणे शक्य नाही.

भयंकर तीव्र अशा यावनी सत्तेसंबंधी रामदासांच्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास–

अती तीव्र शासन यावनी। अब्रम्हण्य झाली कितीक अवनी।
वर्ण चतुष्टय नारीनर। सर्व धर्मपराङमुख॥

एकीकडे मत्सर, असूया, वैर, अहंकार इ. दुर्गुणांनी हिंदुसमाज नासल्यासारखा झाला होता आणि दुसरीकडे धर्म, संस्कृती व भाषा यावर संकटाचे जाळे पसरले होते. मुसलमान तो आपला मग त्याने कोणताही गुन्हा केला तरी माफ आणि हिंदू निरपराधी असला तरी हाल–हाल करून त्याला ठार करावा अशी यावनी नीती उफाळली होती. मंदिरातील देवतांप्रमाणे गृहदेवताही सुरक्षित नव्हत्या अशा आणीबाणीच्या काळी श्रीसंत तुकाराम महाराजांचा महाराष्ट्रात उदय झाला.

**लोकप्रतिनिधी संत तुकाराम**

सतराव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात फार मोठी राज्यक्रांती झाली. ह्या राज्यक्रांतीबरोबर सामाजिक आणि धार्मिक क्रांतीचीही लाट उसळली. ह्या क्रांतीच्या अग्रभागी श्रीसंत तुकारामाचे स्थान होते. या क्रांतीचा परिणाम म्हणजे मराठी वाङ्मय, सामाजिक स्वतंत्रता, स्वावलंबन व सहिष्णुता यांची झालेली वृद्धी. ही जी चळवळ झाली ती काही कोण्या जाती, पंथ, गटामुळे नव्हे तर ती लोकसमुदायाने केली होती. ह्याचे म्होरके संत तुकाराम होते संपूर्ण खेडीच्या खेडी तुकोबारायाच्या पाठीशी होती. आपली जनता पाहून ते म्हणतात–

अवघे जन मज जाले लोकपाळ ।
सोईरे सकळ प्राणसखें ।।

इतके बळ कमविल्यानंतरही ते निःस्पृही राहिले. विठोबाची मूर्ती आणि भक्तिमार्गाचा अवलंब करून त्यांनी घरोघरी जागृतीच्या मशाली पेटविल्या. धर्म, श्रद्धा आणि मुक्ती यांचा जनतेला पाठ देऊन आणि त्यांच्या अंतर्बाह्य परिस्थितीत परिवर्तन घडवून ' दया क्षमा शांति । तेथे देवाची वसति ' याचे मर्म पटवून दिले.

निरांजनी आम्ही बांधियले घर ।
निराकारी निरंतर राहिलों आम्ही ।
निराभासी पूर्ण जालों आम्ही ।

असा निर्विकार व निरिच्छ स्वरूपाचा बाणा त्यांनी ज्या लोकसमुदायात कार्य केले तेथे राखला. कोणी कितीही आमिष दाखविले तरी बळी न पडता, ते रोखठोक उत्तर देत असत–

आता हेंचि तुम्हा सांगणे कौतुक ।
भिक्षे ऐसें सुख नाहीं नाहीं ।।

आजच्या पुढाऱ्यांनाही लाजवील असा आदर्श तुकारामांनी ठेवला होता. जनतेशी पूर्ण समरस झाल्याशिवाय, त्यांच्या सुखदुःखाची जातीने दखल घेतल्याशिवाय, त्यांच्या हितास्तव सदैव तत्पर असल्याशिवाय आपण जनसेवक होऊ शकत नाही, आपल्या ध्येयाची पूर्ती करू शकत नाही, आपले मनुष्यत्वही सिद्ध करू शकत नाही, असे संत तुकारामाचे निग्रहाचे सांगणे होते.

तुकारामांना सोंगढोंग नको होते. कसलाही दिखाऊपणा नको होता. ओढून ताणून केलेली भक्ती किंवा अंधश्रद्धा नको होती. ह्या सर्व गोष्टींचा ते तळतळाटाने धिक्कार करीत.

शेंदुरे माखियेला धोंडा । करिती पूजा पोरें रांडा ।। अंधश्रद्धाळू लोकांचा ते असा निषेध करीत. अहंकार बाळगणाऱ्या विद्वानाला उद्देशून ते म्हणतात–

काय करोनि पठण । केली अहंता जतन ।।
अल्प असे ज्ञान । अंगी ताठा अभिमान ।।
लटिकेचि केले वेदपारायण । जरी नाही स्फुंदन प्रेम कथे ।।
तुका म्हणे अरे वाचाळ हो ऐका । अनुभवेवीण नका वाव घेऊं ।।

दुष्टवर्तन करणाऱ्यावर ते सणसणीत टीका करतात आणि अशा लोकांपासून जनतेने सावध राहण्याचा इशारा देतात–

दुष्टाचे चित्त न भिन्ने अंतरी । जरी जन्मभरी उपदेशिला ।।
पालथे घागरी घातले जीवन । न धरीच जाण तेंहि त्याला ।।
जन्मा येऊनि तेणें पतनचि साधिलें । तमोगुण व्यापिले जरा नरा ।।
जळो जळो हे त्याचें ज्यालेपण । कासया हे आले संवसारा ।।
दुर्जनाची गंधी विष्टेचिया परी । देखोनिया दुरी व्हावे तया ।।
ऐका हो तुम्ही हे मात सज्जन । करूं संघष्टन नये बोलों ।।

त्याचप्रमाणे तुकारामांनी द्रव्यलोभी, विषयलोलुपी, मद्यपी, ढोंगी इत्यादी जनांची चांगलीच खरडपट्टी काढली. ते कडक वाणीत म्हणतात–

आंगी लावूनिया राख । डोळे झाकुनी करिती पाप ।।
दाविती वैराग्याची कळा । भोगिती विषयाचा सोहळा ।।
तुका म्हणे सांगो किती । जळो तयांची संगति ।।
परद्रव्य परनारी । अभिलासूनि नाक धरी ।।
जळो तयाचा आचार । व्यर्थ भार वाहे खर ।।
ऐसे संत झाले कलीं । तोंडी तमाखूची नळी ।।
स्नान संध्या बुडविली । पुढे भांग ओढवली ।।
भांग भुर्का हे साधन । पची पडे मद्यपान ।।
तुका म्हणे अवघे सोंग । तेथे कैसा पांडुरंग ।।

याप्रमाणे रीतभात, व्यवहार, परस्पर संबंध, विधिकर्म, आचार–विचार ह्या सर्व गोष्टींचा बारकाईने विचार करून त्यांनी समाजाला वठणीवर आणले. समाजाला संस्कृतीपासून भ्रष्ट होऊ न देण्याचे ज्यांचे कर्तव्य ते ब्राह्मण असे ते म्हणत. ' वेदाचे पाठक सेविताती मद्य, असा जोरदार टोला हाणून सोडिले, आचार ! द्विज झाले चहाडखोर । दावला पीर स्मरताती ।।, अशी त्यांनी खरमरीत टीका केली. हे लोकच जर असे भ्रष्ट होऊ लागले तर मग ' वैश्य शूद्रादिका काय प्रश्न ? ' असा सवाल करून तुकारामांनी तत्कालीन नीतिभ्रष्ट समाजाच्या डोळ्यांत अंजन घातले. साफ नीती आणि न्याय्य वर्तन आचरल्यानेच आपण आपल्या धर्माचे व संस्कृतीचे रक्षण करण्यास समर्थ राहू, असा त्यांनी कळकळीने उपदेश केला.

जातिभेद व पंक्तिप्रपंच या बाबतीत त्यांना मोठी चीड होती. उंचनीच कांही नेणे हा भगवंत। तिष्टे भाव भक्त देखोनिया ॥' ह्या समतेचा त्यांनी पुरस्कार केला.

नाही वर्णधर्म याती । नामी अवघीचि तरतीं ।।
तुका म्हणे नाही जातीसवे काम ।
ज्याचे मुखीं नाम तोचि धन्य ।।
ब्राम्हण क्षत्रिय वैश्य शूद्र, चांडाळा आहे अधिकार ।
बाळें नारीनर आदि करोनि वेडा हा ।।

सर्व जातींच्या संघटनेचे मर्म या अभंगांतून स्पष्ट होते. विटाळ हा शब्दच माणुसकीला बाधक आहे असे सांगून ते स्वतःसंबंधी म्हणतात–

माझिया गोतें हें वसलें सकळ ।
न देखिजे मूळ विटाळाचें ।।

आणि ते जनतेला सांगतात–

न चळे हा मंत्र न म्हणे याती कुळ । न लगे काळ वेळ विचारावी ।।

समाजघटनेचे यंत्र सुव्यवस्थित चालण्यासाठी जातिभेद वा वर्णभेद नसावेत, सर्वांनी सुसंघटित राहून राष्ट्राला रक्षावे असा त्यांचा आदेश होता. त्या काळच्या समाजाच्या एकंदर परिस्थितीचा ते असा देखावा निर्माण करतात–

बहुत पाप झालें उचंबळ । उत्तम न म्हणती चांडाळ ।।
अभक्ष भक्षिती विटाळ । कोणी न धरी कोणाचा ।।
कैसें झाले नष्ट वर्तमान । एकादशीस खाती अन्न ।।
विडे घेवोनी ब्राम्हण । अविंदवाणी वहताती ।।
कामिनी विटंबिल्या कुळवंती । वदनें दासीची चुंबिती ।।
सोवळ्याची स्फीती । जगीं मिरविती पवित्रता ।।
मद्यपानाची सुराणी । नवनीता न पुसे कोणी ।।
खेळविती व्यभिचारिणी । दैन्यवाणी पतिव्रता ।।

आणि ते पुढे वर्णन करतात–

अधिकें धान्यें दिवसेंदिवसे । गाई म्हैसी चेवल्या गोरसें
नगरें दिसती उध्वसें । पिकली बहुवसे पाखांडे ।।

अशा प्रकारचे अनेक प्रहार करून तुकारामांनी विस्कटलेली व बहकलेली घडी नीट बसविली. संत तुकाराम हे जहाल टीकाकार संत होते. आपल्या टीकेच्या अस्त्रानेच त्यांनी महाराष्ट्राचे नाव दैदीप्यमान केले. तसे ते मनाचे फारच हळवे

२८५७
२२९८९
निबंध



होते. दीनदुबळ्यांच्या रक्षणार्थ त्यांनी देशाला हाक दिली. 'जे कां रंजले गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले।' अशी शिकवणूक त्यांनी दिली. ते कोणतीही गोष्ट आत्मसंशोधन केल्याशिवाय करीत नसत. तत्त्व आणि व्यवहार यांची सुंदर सांगड घालून त्यांनी महाराष्ट्राचे विशेषत्व सिद्ध केले आहे.

समाजातील कोणत्याही यशासंबंधाने त्यांना आस्था होती आणि म्हणूनच तर ते सर्वांना आंजारून गोंजारून आणि केव्हा केव्हा तिखटपणे समजावीत असत. ते म्हणत–

> उपकारासाठी बोलों हे उपाय। येणेविण काय चाड आम्हां ।।
> बुडता हे जन न देखवे डोळा। येतो कळवळा म्हणवुनि ।।
> तुका म्हणे माझे देखतिल डोळे। भोग देत वेळे येईल कळो ।।

तुकारामांनी आध्यात्मिक सृष्टीतील गूढ गोष्टीचे रहस्य स्पष्ट करून दाखविले. त्यामुळे ते समाजाचे एक आदर्श अध्यापक झाले आणि त्यांचा सर्व मानवप्राण्यांशी संबंध जडला. त्यांनी आपल्या कृतीपर वाङमयाने महाराष्ट्राचे संपूर्णतः शुद्धीकरण केले आणि जगाच्या इतिहासात महाराष्ट्राचा दर्जा प्रभावी आणि आदरणीय तथा अनुकरणीय केला.

योगपक्ष व भक्तिपक्ष यांची महाराष्ट्रात भारीच सज्जता होती. तुकारामांनी या दोन्ही पक्षांना कर्मवाद शिकवून तात्त्विक व्यवहाराची जाणीव करून दिली. प्रेम, सत्य आणि अहिंसा या तिन्ही मार्गांचा अवलंब करून राष्ट्र बलशाली कसे होईल याचेही पाठ, कोणाची भीडमूर्वत न बाळगता दिले. त्याबरोबरच आर्य-धर्माचाही त्यांनी पुरस्कार केला. राष्ट्रावर घाला असताना आणि धर्म–संस्कृती संकटात सापडली असताना क्षत्रियांनी यांच्या संरक्षणार्थ प्राणाहुती द्यावी व आपापला धर्मबाणा राखावा असा जळजळीत उपदेश केला.

लवाजमा पाठवून छत्रपती शिवाजींनी तुकारामांना बोलावणे पाठविले तेव्हा ते म्हणतात–

> दिवट्या छत्री घोडे। हे तों बऱ्यात न पडे ।।
> मान दंभ चेष्टा। हे तो शूकराची विष्टा ।।

त्यांना राजाश्रय नको होता. कोणाची मालमत्ता नको होती. कोणाच्या छत्राखाली राहणे ते इष्ट मानीत नव्हते. ते शिवाजींना लिहितात–

> तेथे काम करणें कवणाची आस। वाया होत नाश आयुष्याचा ।।
> राजगृहा यावे मानाचिये आसे। तेथे काय वसे समाधान ।।
> रायाचिये घरी भाग्यवंता मान। इतरा सामान्या मान नाही ।।
> देखोनिया वस्त्रे भूषनाचे जन। तात्काळ मरण येते मज ।।
> ऐकोनिया मनाला उदासता जनी। तरी आम्हा हरि अपेक्षीना ।।

राजाश्रय वा राजाधिकार काय असतो ते तुकारामांनी सांगून खरे लोककार्य जनतेतच राहून करावयास पाहिजे असे निक्षून सांगितले. महाराष्ट्राची दैना आणि लोकांची दुःखे लक्षात घेऊन ते स्वराज्यसंस्थापक शिवाजींना लोकहितास्तव मार्गदर्शन करतात—

आता एक योगे साधावा हा नीट ।
भल्याचा तो वीट मानूं नये ॥
निंदक दुर्जन संग्रही असती ।
त्यांची युक्ति चित्ती आणूं नका ॥
परीक्षावे कोण राज्याचे रक्षक ।
विवेकाविवेक पाहोनियां ॥
सांगणें न लागे सर्वज्ञ तूं राजा ।
अनाथांच्या काजा साह्य व्हावें ॥

अशा रीतीने त्यांनी शिवाजीला लोककल्याण साधण्याची आणि योग्य राज्यकारभार सांभाळून नेहमी जागरूक राहण्याची शिकवणूक दिली. छत्रपती शिवाजींनी जेव्हा प्रत्यक्ष त्यांच्या भेटीला येऊन त्यांचे शिष्यत्व पत्करण्याची मनीषा व्यक्त केली तेव्हा त्यांनी शिवाजीची कडक शब्दांत हजेरी घेतली आणि त्यांना क्षात्रतेजाचा महिमा सांगितला. ते म्हणतात—

तुझी चाड नाही आम्हा छत्रपति ।
आम्ही छत्रपति त्रैलोक्याचे ॥
चारी दिशीं आम्हा भिक्षेचा अधिकार ।
न मिळे भाकर भक्षावया ॥
आता पडूं नको आमुचिया काजा ।
पवित्र तूं राजा रामभक्त ॥

शिवाजींना वैराग्यापासून परावृत्त करताना स्वामी रामदासांच्याकडे बोट दाखवून प्रामाणिक सल्ला देतात—

राया छत्रपति ऐकावें वचन । रामदासी ध्यान लावा वेगीं ॥
रामदासस्वामी सोयरा सज्जन । त्यासि तूं नमन अर्पी बापा ॥

याचा अर्थ असा की, शिवाजींनी संतांच्या नादी न लागता आपला क्षात्रधर्मच पाळावा. त्यांनी राजकारणपटू स्वामी रामदासांकडून राजकारण खेळावे आणि स्वराज्याचे स्वप्न पूर्ण करून लोकांना सुख—शांती मिळवून द्यावी. संत तुकारामाचे हे कार्य कसे दूरदर्शीपणाचे होते ह्याची यावरून सहज कल्पना येते.

संत तुकाराम हे लोकप्रतिनिधी होते. जनहितासाठी जे जे उपाय करणे शक्य होते ते त्यांनी मोठ्या कौशल्याने केले. ' संत म्हणजे देवभक्ती करणाराच असा नाही. आपले आचार–विचार शुद्ध ठेवून लोककल्याण साधणारा, सन्मार्ग दाखविणारा, स्वतःचे वाईट झाले तरी चालेल पण दुसऱ्याचे भले चिंतणारा आजच्याही काळात असे संत नाहीत असे नाही. ' संत ' म्हणून आपली पूर्वीची जी भावना आहे ती आपण निराळ्या अर्थाने घेत नाही एवढेच. त्या काळचा संत म्हणजे आजचा नेता. पण आपण जे काही बाजारबुणगे नेते पाहतो ते नेते नव्हतच, म्हणजे संत नव्हत. त्यादृष्टीने तुकारामादी संत समाजाचे नेते होते. त्यांच्या शिकवणुकीवर जनता तयार होत होती आणि म्हणूनच अधिकारवाणीने तुकाराम जनतेला सांगतात–

ऐका गा हे अवघे जन । शुद्ध मन तें हित ।।
अवघा काळ नये जरी । समयावरी जाणावा ।।
नाही कोणी सवे येती । संचिता या वेगळा ।।
कर्मभूमी ऐसा ठाव । वेवसाय जाणावा ।।
आता उघडी डोळे । दगड आला पोटासी ।।
मनुष्य देह ऐसा निघे । साधील ते साधे सिद्ध ।।

अस्तु संत तुकारामांनी लोकशाहीचा पुरस्कार केला. धर्माचे रक्षण करून संस्कृती उज्ज्वल केली. ' धर्म रक्षावयासाठी । करणे आले आम्हासी ।।' ह्या अभंगात हेच सिद्ध होते. पाशवी यवनी सत्तेत त्यांनी उभा महाराष्ट्र चैतन्यमय केला. जनकार्याचा श्रीसंत ज्ञानेश्वरांनी जो पाया घातला तो श्रीसंत तुकारामांनी पूर्ण केला. त्यांनी जो वारकरी सम्प्रदाय निर्माण केला त्या सर्वांनी संपूर्ण महाराष्ट्र जागविला. संत तुकारामांची जनतेवर एवढी मोठी पकड बसली की आजही खेड्यातील प्रत्येक व्यक्तीच्या हृदयात तुकाराम नाचत आहेत. जनतेला कार्यप्रवण करणारा आणि लोकशाहीचे तळ उचलून धरणारा अद्वितीय लोकनेता श्रीसंत तुकाराम खरोखरी धन्य आहे. आजच्या पुढाऱ्यांना संत तुकारामापासून बोध घेऊन आज स्वातंत्र्याच्या काळात राष्ट्र अधिक उज्ज्वल करता येण्यासारखे आहे.

□ □ □

# २.

## क्रान्तदर्शी श्री संत चोखामेळा

**चोखोबाचा मानवतेला जोहार**

श्री संत चोखामेळा हे क्रान्तदर्शी थोर दलित संत होते. ते बंडखोर प्रवृत्तीचे पण सेवाधर्मी प्रवृतीचे उद्धारक संत होते. त्यांची प्रज्ञाशक्ती असामान्य होती आणि अमृतवाणी पावन होती. दुःखितांचे दुःखविमोचनार्थ आणि अस्पृश्योद्धारार्थ 'देवा'ला व 'धर्मा'ला जबाबदार धरून, त्यांनी मानवतेला 'जोहार' घातला होता.

**उपेक्षित प्रज्ञावंत संत**

पण असा हा आध्यात्मिक तेजस्वी पिंडाचा प्रज्ञावंत व बुद्धिवंत दलित संत अजूनही उपेक्षितच राहिला आहे. समता, न्याय व बन्धुत्व यासाठी प्रखर झुंज घेणारा आणि मानवतेसाठी आर्त हाक देणारा क्रांतिकारक संत चोखोबा दुर्लक्षिला गेला आहे. भगवान बुद्धानंतर प्रज्ञा, शील आणि करुणा यांचा उद्‌घोष करून दलितोद्धाराची हृदयद्रावक ललकारी देणारा संत अंधारातच कोंडला गेला आहे.

**शासनाची संत चोखामेळा समिती**

पण आता, महाराष्ट्र शासनाने आपले लक्ष तिकडे वेधले आहे ही मात्र समाधानाची व प्रसन्नतेची गोष्ट होय. महाराष्ट्र राज्याचे समाजकल्याणमंत्री मा. श्री. अर्जुनरावजी कस्तुरे यांनी दलितोद्धाराच्या एका विशेष जाणिवेने व ध्यासाने प्रेरित होऊन, त्यांनी थोर दलित संत, लोकसेवाव्रतधारी थोर दलित पुरुष, श्रेष्ठ दलित साहित्यिक व संशोधक आता उपेक्षित राहणार नाहीत, अंधारातून ते प्रकाशात यावेत यासाठी आपले स्तुत्य पाऊल पुढे टाकले आहे. त्या संदर्भातच आता महाराष्ट्र शासनाने, संत चोखामेळा

यांच्या कार्यांचे आणि त्यांच्या वाङ्मयाचे संशोधन व्हावे; त्या काळच्या परिस्थितीचा अभ्यास व्हावा; त्यांच्या जन्मस्थळाचे व महापरिनिर्माण स्थळाचे महत्त्व लक्षात घेऊन तेथे त्यांचे प्रेरक व बोधक स्मारक निर्माण व्हावे आणि त्यांच्यासंबंधी अधिकृत चरित्रग्रंथाची निर्मिती व्हावी यासाठी एक योजना आखून, ती कार्यान्वित होण्यासाठी, राज्यस्तरावर एक 'संत चोखामेळा समिती' नुकतीच निर्माण केली आहे, ही बाब निःसंशय स्पृहणीय आहे.

**थोडा पूर्वेतिहास**

सुमारे सातशे वर्षांपूर्वी, दक्षिण भारतात यादववंशातील राजे देवगिरीला राज्य करीत होते. त्या वंशातील मूळ पुरुष भिल्लम. याने शके ११०९ ते १११४ पर्यंत देवगिरीचे राज्यवैभव उपभोगिले. भिल्लमनंतरचा पाचवा पुरुष रामदेवराय हा होय याने शके ११९३ ते १२३१ पर्यंत म्हणजे ३८ वर्षे राज्य केले. हाच राजा नामदेव–चोखोबा–ज्ञानेश्वर या श्रेष्ठ संतांच्या काळी होता. हा फार चतुर राजा होता. तो विद्या व कला यांचा फार भोक्ता होता. म्हणूनच त्याच्या राज्यात हेमाद्रीसारखा राजकार्यकुशल पुरुष पुढे आला. रामदेवरायाच्या अमदानीत धन-धान्याने देश संपन्न असल्यामुळे लोकांचे लक्ष ऐहिक सुखोपभोगात रममाण झाले होते. त्या वेळी धर्म निव्वळ कर्मकांडात गुरफटला होता. प्रामुख्याने दोन वर्णांचे लोक म्हणजे ब्राह्मण आणि क्षत्रीय हे त्या सुखासीनतेमुळे कर्तव्यच्युत व निष्क्रिय होत चालले होते. त्यामुळे संकटाचे ढग हळूहळू आकाशात एकवटू लागले होते. चोखामेळा-ज्ञानेश्वर समकालीन असलेले संत नामदेव उद्‌गारतात–

तत्त्व पुसावया गेले वेदज्ञानी ।
तंव भरले त्यापासी विधिनिषेध ।।

तया समाधान नुमजे कोणे काळी ।
अहंकार बळी झाला तेथे ।।

स्वरूप पुसावया गेले शास्त्रज्ञासी ।
तव करणे तयापासी भेदाभेद ।।

एक एकाच्या न मिळती मतासी ।
भ्रांत गर्वराशी भुलले सदा ।।

यावरून त्या काळी ब्राह्मणवर्ग कोणत्या अवस्थेला आला होता हे सहज कळून येते. तद्वतच क्षत्रियांनी आपला धर्म सोडल्यामुळे ते बाहुबलाने कर्तव्यहीन झाले होते. वैश्य आणि शूद्र या वर्गांची अवस्था आधार सुटल्यामुळे मोठी शोचनीय झाली होती. त्यामुळे या जातीही असहकारितीने वागू लागल्या होत्या. अन्त्यज म्हणा वा अस्पृश्य म्हणा, या जातीवर तर घोर अन्याय व जुलूम होऊन, त्यांचा अनन्वित छळ होत होता. अस्पृश्यतेच्या तीव्र ज्वाळांनी सर्वत्र पेट घेतला होता !

अशा अत्यंत दाहक परिस्थितीत श्रीसंत ज्ञानेश्वर शके ११९० मध्ये जन्माला आले. त्यांच्या अत्यल्प आयुष्यात त्यांना जनता खऱ्या मानवधर्मापासून भ्रष्ट होत असल्याचे आणि सामाजिक नीतिमत्ता ढासळत असल्याचे प्रखरतेने अनुभवास आले. आणि म्हणून त्यांनी, फाजील रूढी आणि अंधश्रद्धाळूपणा सोडून देऊन मानवतावादी धर्मावर भर देण्याचा उपदेश केला. प्रत्येक वर्णाला स्वकर्तव्याची जाणीव करून देताना राष्ट्राच्या अभ्युदयासाठी प्रत्येकाने झिजले पाहिजे आणि जातिभेद पाळता कामा नये असा कडक इषाराही त्यांनी दिला. ते आवर्जून म्हणतात–

चहू वर्णासि नामाधिकार ।
नामी नाही लहान थोर ।।
जडमूढ पैलपार । पावती नामे ।।

कां खैर चंदन काष्टे ।
ही विवंचना तंवची घटे ।
जंव न धापती एक घटे । अग्निमाजी ।।

तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया ।
कां क्षुद्र अन्त्यजादि इया ।
जाती तंवचि वेगळालिल्या ।
जंव न पवती माते ।।

पण अशी ज्ञानेशांनी जाणीव करून दिली असली तरी समकालीन संत चोखामेळा यांचा त्या काळच्या संतांच्या प्रभावळीत झालेला अमानुष छळ विसरता येत नाही. त्यांनी तीव्र प्रहार सहन करूनही आपला मानवतावादी धर्म सोडला नाही. त्यांनी त्याही तप्त अवस्थेत आपल्या प्रकृतिधर्माची उच्च व उदात्त भूमिका राखली. प्रत्यक्ष संत नामदेव-ज्ञानदेव यांनी जराजर्जर करण्यात येणाऱ्या संत चोखोबाप्रती काय धर्म राखला व त्याची कोणती बूज राखली त्यावर काही नमूद न केलेले बरे; पण, संत चोखामेळा यांनी मात्र आपल्या समकालीन संतबांधवांची हृदयपूर्वक सेवा केली आणि आपल्या अमृतवाणीने त्यांचा गौरव केला. संत ज्ञानेश्वरांना 'विद्येची गुरुमाऊली,' मानून, संत चोखोबा कळवळून उद्‌गारतात–

श्री ज्ञानराजे केला उपकार ।
मार्ग हा निर्धार दाखविला ।।

उदार तुम्ही संत । मायबाप कृपावंत ।
केवढा केला उपकार ।।

काय वानू मी पामर । जडजीवा उद्धार केला ।
मार्ग सुपंथ दाखविला ।। ...

उघडोनी वेदार्थाचा ठेवा ।
केला तरणोपाय जीवा ।।
ऐसा समर्थ ज्ञानदेव ।
तया चरणी ठेवा भाव ।।
चोखा म्हणे श्रेष्ठ ज्ञानदेवी ग्रंथ ।
वाचिता सनाथ जीव होती ।।

इतरांनी आपल्यासाठी काय चांगले केले, आपली कोणती बूज राखली हे पाहण्यापेक्षा आपण इतरांसाठी काय चांगले केले व त्यांची कोणती बूज राखली हे पाहणे आणि इतरांच्या कल्याणासाठी झटणे आणि तसेच स्वतःचे जीवन कुस्करले गेले तरी चालेल पण दुसऱ्यांचे जीवन मात्र प्राण पणाला लावून फुलविणे या सिद्धान्ताचाच आविष्कार संत चोखोबांनी प्रत्यक्ष वाणीने व कृतीने घडविला.

**चोखामेळा : जन्म व मृत्यू : स्थळ**

अशा या मानवतावादी क्रांतिकारक संत चोखामेळा यांचा जन्म शिशिर ऋतूत, शके ११९०, पौष मास, मकरसंक्रान्त दिनी, विदर्भाच्या बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात, देऊळगाव–सिंदखेडराजा मार्गे १८ मैल अन्तरावर असलेल्या ' मेहुणा ' या गावी झाला. इ. स. प्रमाणे १४ जानेवारी १२६८ हा संत चोखोबांचा मंगल जन्मदिन आणि त्यांचा मृत्यू सोलापूर जिल्ह्यातील मंगलवेढे येथे शके १२६० वैशाख वद्य पंचमी, वयाच्या ७७ व्या वर्षी झाला. म्हणजे इ. स प्रमाणे १६ मे १३३८ हा त्यांचा पुण्यपावन मृत्युदिन. अर्थात या घटकेला त्यांच्या जन्मदिनाला ७११ वर्षे होतात तर त्यांच्या पुण्यतिथी दिनाला ६४१ वर्षे होतात. संत चोखामेळा शके ११९० मध्ये तर संत ज्ञानेश्वर हे शके ११९७ मध्ये जन्माला आले. म्हणजे संत चोखामेळा संत ज्ञानेश्वरांपेक्षा सात वर्षांनी वडील होते. संत चोखोबांनी संत नामदेवाला आपला गुरू मानला होता तर संत नामदेवांनी संत विसोबा खेचर यांना आपला गुरू मानला होता. परंतु त्या काळच्या सर्व जातीजमातींच्या संतांनी श्री संत ज्ञानेश्वरांना आपली ज्ञानाची गुरुमाऊली मानून त्यांच्याभवती आपल्या प्रभावळीचे एक तेजस्वी भक्तिवलय निर्माण केले होते.

**संत चोखोबाचे संतघराणे**

संत सोयराबाई ही संत चोखामेळा यांची सत्त्वशील धर्मपत्नी; संत कर्ममेळा हा त्यांचा सहिष्णुतावादी गुणी पुत्र; संत निर्मळा ही त्यांची स्त्रीसत्त्वशक्ती राखणारी तेजस्वी प्रकृतीची बहीण; संत बंका हा त्यांचा क्रियाशील प्रवृत्तीचा मेहुणा. या संत बंकांनी संत चोखोबांची गुरुपरंपरा दर्शविली ती अशी : आदिनाथ– मच्छिन्द्रनाथ–गोरक्षनाथ – गहिनीनाथ – निवृत्तिनाथ – ज्ञानदेव–विसोबा खेचर– नामदेव–चोखा. श्रीसंत चोखामेळा यांच्या घराण्यातील सर्व घटक संतांनी आपल्या

आयुष्यात मानवतावादाचा पुरस्कार केला आहे. त्यांची अनेक कवने, अभंग, ओव्या प्रसिद्ध आहेत. पंढरीचा विठोबा अथवा पांडुरंग हे दैवत भक्तियुक्त असले तरी ते केवळ टाळकरी नव्हते. संत चोखामेळाप्रमाणेच त्यांचे संपूर्ण घराणे प्रतिभासंपन्न होते. हे घराणे कुणाची लाचारी पत्करणारे अथवा कुणाला शरण जाऊन भीक मागणारे नव्हते तर स्वयंप्रज्ञेने मानाचे जीवन जगण्याचा प्रयत्न करणारे होते प्रसंगी ते कुणाला भीक घालत असत पण कुणाची कधी भीक स्वीकारत नसत, असा त्यांचा स्वाभिमानी बाणा होता.

**बंडखोर चोखोबाची झुंजार बंडखोरी**

श्रीसंत चोखामेळा हे पंढरीच्या विठोबाचे एकनिष्ठ उपासक जरी होते तरी त्यांचे ते लोककल्याण साधण्याचे एक प्रेरक प्रतीक होते. त्यांनी अस्पृश्यतेचे पालन करणाऱ्या व दलितांचा अनन्वित छळ करणाऱ्या इतर वर्णीयांची आणि जाती–जमातींची कसलीही गय केली नाही, त्यांच्या दुष्ट प्रकृति–प्रवृत्तीला कसून शह देण्यासाठी प्रखर बंडखोरी केली. अस्पृश्यांना योग्य न्याय, वागणूक व उचित मानाचे स्थान प्राप्त व्हावे म्हणून प्रबल झुंज घेतली आणि आपल्या सत्त्व-शक्तीचा कस लावला. ते अगदी कडक व कठोर भाषेत इतरांची हजेरी घेताना उद्गारतात—

येथे तो संग आहे दुर्जनांचा ।
म्हणोनि शीण त्याचा होत आहे ।।
चोखा म्हणे ऐसा पडिलो कांचणी ।
सोसू हे जाचणी कोठवरी ।
चहाड चोर जार भ्रष्ट ते साचे ।
हीनत्व जन्माचे पदरी आहे ।।
येथे ते दु:खाचे डोंगर आठवती ।
वाटतसे खंती माझ्या मना ।।

यावरून त्या काळी अस्पृश्य समाजाची दुर्दशा, छळ, विवंचना कशी असेल त्याचे भेसूर चित्र नजरेसमोर सहजतेने तरळते. चोखोबासारख्या प्रज्ञावंत व मानवधर्म भक्तिपरायण साधुत्वशील संतावर जेथे अत्यंत अघोरी व अमानुष अत्याचार झालेत तेथे अन्य अस्पृश्यांसंबंधी कल्पना न केलेलीच बरी !

**समतेचा आणि माणुसकीचा पुरस्कार**

समतेच्या आणि माणुसकीच्या पुरस्कारार्थ चोखोबा स्पृश्य म्हणवणाऱ्या समाजाला आळवून सांगतात–

ना तरी अन्त्यज आणि ब्राम्हण ।
गंगेमाजी करिती स्नान ।।

तरी काय बाटले तिचे जीवन ।
पवित्रपणे सर्वदा ।।
तुम्हा–आम्हा सकल देही ।
आत्मा एकचि असे पाही ।।
तयासि याती वर्णू नाही ।
आपुल्या ठायी विचारा ।।

आम्ही किती जुलूम सहन करणार? अंगाला वस्त्र नाही; पोटाला अन्न नाही आणि समाजात कसला मान नाही. अपमानित जीवन जगणार ते किती? मनुष्यत्वाने जराही वागविले जात नाही असे ठासून सांगून ते अधिकाराची व न्याय्य हक्काची मागणी करतात–

आमुचा वाटा आम्हाला द्यावा ।
मानवा–मानवा भेद नोहे ।।
चोखा म्हणे येथे सर्वा अधिकार ।
उंच–नीच अपार तरले नामे ।।

जनतेला कळवळून व तळतळून सांगून थकल्यावर ते सर्वांचा कडकडून निषेध करतात–

धिक् तो आचार, धिक् तो विचार ।
धिक् तो संसार, धिक् जन्म ।।
धिक् ब्रम्हज्ञान, वाउग्या ह्या गोष्टी ।
दया, क्षमा, पोटी शांति नाही ।।

संत चोखोबा स्वाभिमानी होते. धर्म, संस्कृती व अब्रू यांची त्यांना चाड होती. ते स्पृश्यांना समजावणीच्या शब्दांत म्हणतात, ‘ चावडी चला ना यावेळी शिवी गाळी देऊ नका । की जी पुढारी मायबाप ।। ’

**समाजक्रान्तीचा पहिला उद्गाता**

संत चोखोबांनी अत्याचाराचा केवढा प्रतिकार केला होता; समाजाचे केवढे थोरले पुढारीपण स्वीकारले होते; केवढी सहनशीलता राखून जनतेला समतेच्या व न्यायाच्या सुपंथावर येण्यास विनविले होते, हे सर्व काही–जाणिवेने व नेणिवेने ध्यानी घेतले म्हणजे चोखोबांनी संतपणातच स्वतःला गुरफटवून न घेता अस्पृश्यतेच्या बेडचा झुंजार वृत्तीने तोडून फेकून देण्यासाठी समाजक्रान्तीचे केवढे मोठे बंड पुकारले होते ते स्वच्छ व स्पष्ट होते.

शेवटी जनता काहीच ऐकत नाही असे अनुभवून ते देवालाच जबाबदार धरतात–

जाति भेदे गांजिलो, त्रासिलो विटाळे ।
सोडवी या वेळी चक्रपाणी ।।
एका पुढे एक पडती आघात ।
सरिता न सरत काय करू ?।।
दुष्ट रुढी नित्य करू पाही घात ।
सोसावे आघात किती तरी ?।।

अशा या थोर क्रान्तदर्शी संत चोखामेळा यांचा मंगळवेढे येथे गवंडी काम करीत असताना अंगावर भिंत कोसळून पडून, गुरुवार वैशाख वद्य पंचमी शके १२६० रोजी वयाच्या सत्तराव्या वर्षी अत्यंत शोचनीय अन्त झाला ! पण त्यांनी समाजक्रान्तीची सातशे वर्षांपूर्वी जी ठिणगी पेटवून दिली, जो प्रखर लढा निर्माण केला आणि न्याय, समता व बन्धुत्व यांचा हिरिरीने जो पुरस्कार केला अगदी नेमक्या त्याच मानवतावादी बौद्धप्रणीत ध्येय-धोरणाचा पुण्यश्लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विश्वव्यापी पुरस्कारच केला नाही तर दलितोद्धारार्थ व राष्ट्रोद्धारार्थ आपले उभे जळजळते आयुष्य खर्ची घातले, तो अतूट उद्धारक धागा आजच्या दलित व बौद्ध बांधव–प्रवर्तकांनी विशेष जाणिवेने लक्षात घेतला पाहिजे.

दि. १६ मे १९७९ हा क्रांतिकारक दलित थोर संत चोखामेळा यांचा पुण्यतिथी दिन, म्हणजे वैशाख वद्य पंचमी क्रान्तदर्शी संत चोखामेळा यांच्या ६४१ व्या पुण्यपावन स्मृतीला माझे शतशः जोहार !

* *

प्रस्तुत लेखाच्याच संदर्भात, एक पदवीधर अध्यात्मवादी पंडिता सौ. जयश्री बोरकर यांनी, '**श्रीसंत चोखोबाची तेजोर्वधित अस्मिता**' या अत्यंत सूचक शीर्षकाखाली एक महत्त्वपूर्ण लेख प्रकाशित केला. तो आजच्या संतसाहित्याच्या अभ्यासकांना निश्चितच विचारार्ह वाटेल. सौ. जयश्री बोरकर आपल्या अभ्यासपूर्ण प्रखर लेखणीने लिहितात :

**श्री संत चोखोबांची तेजोर्वधित अस्मिता**

सुमारे ७०० वर्षांपूर्वी संतश्रेष्ठ चोखामेळा यांचा जन्म बुलढाण्यातील चिखली तालुक्यात असलेल्या मेहुणा या गावी झाला. त्यांची पुण्यपावन जन्मभूमी 'सारस्वती जन्मभू:' म्हणून ख्यातनाम असलेल्या प्रतापी विदर्भातील मेहुणा या पवित्र तीर्थक्षेत्री असली तरी त्यांची नंतरची कर्मभूमी पश्चिम महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्र पंढरपूर आणि मंगळवेढे हे स्थान होते. श्री संत ज्ञानेश्वरांपेक्षा ते सात वर्षांनी मोठे होते. त्या काळी थोर संतांच्या प्रभावळीत समकालीन सर्व संतांनी श्री ज्ञानेश्वरांना बहुमानाने 'ज्ञानाची गुरुमाऊली' मानली असली तरी, दलित

जातीत जन्माला आलेल्या संतश्रेष्ठ चोखोबा यांना मानाचे अग्रस्थान दिले जात असे. विशेष प्रसंगी जो कौल चोखोबा घेत असत तो सर्वसंत एकमुखाने मान्य करीत असत. यातच श्री संत चोखामेळा यांच्या व्यक्तिमत्त्वाचे थोर माहात्म्य सिद्ध होते.

पण, संत चोखोबासारख्या असामान्य बुद्धिमत्तेच्या व स्वयंप्रज्ञेच्या विभूतीचा जो अनन्वित छळ झाला आणि ' महार संत ' म्हणून हृदयाला पिळवटून टाकणारे जे अत्यंत दाहक हाल झालेत त्याला कसली सीमा नाही. त्या वेळी तर अस्पृश्यतेच्या ज्वाळा अत्यंत प्रखरतेने उफाळत होत्या. तरी असीम सहनशीलता राखून मानवतेचा आपला पवित्र धर्म संत चोखोबांनी रतिमात्र ढळू दिला नाही. ते स्वाभिमानी होते. मानवधर्म, संस्कृती व अन्न यांची त्यांना चाड होती. सवर्ण हिन्दू अस्पृश्यांवर घोर जुलूम करीत होते तरी चोखोबा आपल्या जातिबांधवांना सेवाधर्माची जाणीव करून देत असत.

पापांचा घडा भरेल त्यांचा । नरकयातना सहतील ते ।।
माणूस नाही दैत्यांची अवलाद । त्यांचे त्यांना भोगू दे ।।

बंडखोरीचे असे जळजळीत विद्रोही उद्‌गार काढून, ते नंतर कळवळून म्हणायचे :

चावडी चला ना या वेळी शिव्यागाळी देऊ नका ।
राखा माणुसकी, की जी मायबाप ।

शांत चोखोबांनी घोर अत्याचारांचा आणि सवर्ण हिंदूंच्या अमानुष दुष्कृत्यांचा केवढा तीव्र प्रतिकार केला होता, दलित समाजाचे केवढे जोरदार, दमदार व कसदार पुढारीपण स्वीकारले होते, केवढी सहनशीलता राखून जनतेला सत्पथावर येण्यास विनविले होते आणि मानवतावादाचा केवढा पुरस्कार केला होता हे सर्व काही एका विशेष जाणिवेने ध्यानी घेतले म्हणजे प्रज्ञाशक्तीच्या चोखोबांनी त्या अत्यंत भीषण काळी समाजक्रान्तीचे केवढे प्रतापी बंड पुकारले होते हे स्पष्ट होते. दुष्ट सवर्णहिंदू ऐकत नाहीत आणि अत्याचारावर अत्याचार ठायी ठायी बेगुमानपणे करीत आहेत, हे पाहून व स्वत:चा तसा अत्यंत तीव्र अनुभव लक्षात घेऊन ते देवाला जबाबदार धरतात; आणि विव्हळत तळमळून उद्‌गारतात,—

' जातिभेदे गांजिलो त्रासिलो विटाळे ।
सोडवी यावेळी चक्रपाणी ।।
एकापुढे एक पडती आघात सारिता न सरत काय करू ?।।
दुष्ट रुढी नित्य करू पाही घात । सोसावे आघात किती तरी ?।।

मानवतेच्या दृष्टीने, संत चोखोबांचे हे शब्दांगार आजच्या या स्वातंत्र्योत्तरकाळात आत्मलक्षी होऊन विचारात घेतले म्हणजे त्या कालखंडात त्यांनी सवर्ण

हिंदूंशी ज्या जहाल मनोवृत्तीने पराक्रमी झुंज देऊन मानवतेची जी कास धरली होती आणि समाजक्रान्तीची जी अणुशक्तियुक्त ठिणगी पेटवून दिली होती–आणि तद्वतच घोर छळाविरुद्ध जो प्रखर लढा दिला होता; इतकेच नव्हे तर न्याय, समता व बंधुत्व यांचा त्यांनी ज्या हिरिरीने पुरस्कार केला होता त्याचीच जागती–ज्योत आपल्या तळहाती घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गुरुवर्य किसन फागोजी बनसोडप्रभृती दलितवर्गातील थोर ज्ञानवंतांनी, बुद्धिवंतांनी व प्रज्ञावंतांनी परिवृत्तीने तेवत ठेवून, दलितोद्धाराचे व पर्यायाने राष्ट्रोद्धाराचे महान कार्य केले, हे आजच्या दलित आणि बौद्ध पुढाऱ्यांनी, साहित्यकारांनी, संशोधकांनी व भाष्यकारांनी लक्षात घेऊन, दलितांवर व बौद्धबांधवांवर आजही होणाऱ्या तीव्र जुलुमांचा, जातिभेदांचा व विषमतेचा संपूर्ण नायनाट करण्यासाठी, प्रखरतेने झुंज देण्यासाठी आपली प्रतापी, तेजस्वी व प्रभावी पावले वेगाने पुढे टाकली पाहिजेत आणि मानवतेसाठी व आपल्या न्याय्य हक्कांसाठी आपले प्राण पणाला लावले पाहिजे !

सातशे वर्षांपूर्वीच्या त्या कालखंडात दलित घराण्यावर आणि विशेषत: दलित स्त्रीजातीवर निर्घृण व अमानुष अत्याचारांचा डोंब उसळला होता. कोणत्याही दलित स्त्रीला आपल्या सत्त्वाचे रक्षण करणे अशक्यप्राय होते. त्यांच्या अब्रूच्या लुटीला तर कसलाच पारावार नव्हता. स्त्री ही निसर्गाची पवित्र प्रकृती मानली जाते. तिची ती प्रकृती म्हणजेच भारतीय उद्धारक अध्यात्माची अस्सल संस्कृती आहे. त्या संस्कृतीची म्हणजेच स्त्रीसत्त्वाची लूट केली जात होती. याची तीव्र वेदना संतश्रेष्ठ चोखोबांना असह्य होत होती.

स्त्रीसत्वाची जाण । नाही आम्हा लोका ।
पुरुषार्थ उरला तो काय आता ॥

व्यर्थ हे जीणे ।
धिक्कार धिक्कार माऊलीची रक्षा कोण करी ? ॥

अशा आर्त वाणीत संत चोखोबांनी स्त्री–सत्त्वशक्तीची विशेष जाण राखून आणि कळकळीने त्यांचा कैवार घेऊन पुरुष म्हणविणाऱ्यांना त्यांच्या पुरुषार्थाची कडक जाणीव करून दिली होती. आजही या देशामध्ये दलित व बौद्ध स्त्रीवर अत्यंत निंद्य व घृणास्पद अत्याचार होत आहेत, याची जाणीव दलित व बौद्ध बांधवांना नाही असे नाही. पण अशा नीच व दुष्ट प्रचाराला प्रतिबंध घालण्यासाठी आणि स्त्रीसत्त्वरक्षणार्थ आपले शौर्य व तेज प्रकट करणारे पुरुष अजून निद्रितच आहेत. त्यांचा पुरुषार्थ अजूनही जागृत झालेला नाही असे प्रत्ययास येऊन मन दु:खित होते. आणि म्हणूनच, दार्शनिक, साहित्यकार व एक प्रखर अध्यात्मवादी श्री. ना. रा. शेंडे यांनी, आता पुरुषांची तमा न बाळगता व त्यांच्यावर विसंबून

न राहता स्त्रियांनीच स्वत: स्त्रीसत्त्वशक्ती प्रखरतेने जागृत करण्यास समर्थ बनले पाहिजे आणि आपल्या सत्त्वशक्तीने स्वत:च्या सत्त्वरक्षणार्थ व अन्नूच्या संरक्षणार्थ न डगमगता, झुंजार वृत्तीने आपले तेजस्वी पाऊल उमटविण्याचे सामर्थ्य सिद्ध केले पाहिजे. असा आजचा ' गायत्रीमंत्र ' स्त्रीजातीला दिला आहे.

□ □ □

# ३.

## वाहती संतामृतवाणीचे झरे

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं
सृजाम्यहम् ।।
परित्राणाय साधूनां विनाशाय च
दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ।।

( शंखध्वनी, घंटानाद, टाळ–मृदंगाचा गजर होतो– )

**प्रवक्ता :**

भारत हा देव–देवतांचा, ऋषि–महामुनींचा आणि साधु–संतांचा पुण्य-पावन देश. धर्म, नीती, न्याय आणि संस्कृती–बाबत या देशाची अगदी प्राचीन काळापासून उच्च, उदात्त व थोर परंपरा चालत आली आहे. दुष्टांचा संहार आणि दु:खितांचे दु:खविमोचन; दलितोद्धार आणि परोपकार; ज्ञानदान आणि बुद्धि-योगदान; विषमतेचा नाश आणि समतेचा पुरस्कार; जातिभेदांचा धिक्कार आणि ऐक्याचा उद्‌घोष करून, या आपल्या पवित्र व पुण्यशील देशात मानवतेचा व संस्कृतिसंवर्धक भावनात्मक एकतेचा अखंड पुरस्कारच करण्यात आला आहे. याच उदात्त तत्त्वप्रधान आध्यात्मिक बैठकीवरून, आपल्या राष्ट्राच्या साधु-संतांच्या अमृतवाणीचे निर्मळ पावन झरे आजही प्रखर तेजाने वाहत आहेत.

(पहाट झाली आहे. पक्ष्यांचा किलबिलाट होत आहे. देवळात शंखध्वनी व घंटानाद होत आहे. दुरून कुठून तरी मुरलीचे मधुर स्वर कानी पडत आहेत. )

**प्रवक्ता :**

हे विश्वचि माझे घर ।
ऐसी मती जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर ।
आपण जाहला ।।

( आसमंतात ध्वनी उमटतात–

इये मऱ्हाठीचिये नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळ करी )

( श्री संत ज्ञानेश्वर प्रवेश करतात—)

**ज्ञानेश्वर :**

माझा मऱ्हाठाचि बोल निके । अमृतातेही पैंजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ॥

( संत ज्ञानेश्वरांवर पुष्पवृष्टी होत असते— )

वेद संपन्न होय ठायी । परी ऐसा कृपणु आन नाही
जे कानी लागला तिहीं । वर्णाच्याचि ॥
येरा भव व्यथा ठेलिया । स्त्री शूद्रादिक प्राणिया ।
उनवसरू मांडूनिया । राहिला आहे ॥
तरी मज पाहता तें मागिल उणें । फेडावया गीतपणे ।
वेदु वेटला भलतेणे । सेव्य हो आवया ॥
चहू वर्णींसि नामाधिकार । नामी नाही लहान थोर ।
जडमूढ पैलपार। पावती नामे ॥
सूत सूतें गुंतलें । तृण तृणेंचि बांधिले ।
कां आत्मनिम्बा घेतले । बाळके जळी ॥
तयापरी देहाकारें । आपणपेचि दुसरें ॥
देखोनि जीव आविष्करे । आत्मबुद्धि ॥
तैसीं बीजप्रकृतिवशें । अनेकें भूते येके ईशें ।
चेष्टाविजाती तो असे । तुझ्या हृदयी ॥

**प्रवक्ता :**

ज्ञानेश्वरांच्या महतीसंबंधी चोखोबा म्हणतात—
श्री ज्ञानराजे केला उपकार । मार्ग हा निर्धार दाखविला ॥
उदार तुम्ही संत । मायबाप कृपावंत । केवढा केला उपकार ।
काय वानु मी पामर ॥ जडजीवा उद्धार केला ।
मार्ग सुपंथ दाखविला ॥

जातिभेदाने जर्जर होऊन संत चोखोबा तळतळून उद्गारतात...

जातिभेदे गांजिलो, त्रासिलों विटाळे ।
सोडवी यावेळी चक्रपाणी ॥
एकापुढे एक पडती आघात ।
सारिता न सरत काय करू ?
दुष्ट रूढी नित्य । करू पाही घात ।

सोसावे आघात । किती तरी ?
धिक् तो आचार, धिक् तो विचार ।
धिक् तो संसार, धिक् जन्म ।।
धिक् ब्रह्मज्ञान । वाउग्या ह्या गोष्टीं ।
दया क्षमा पोटी । शांति नाही ।।

( संत चोखोबा प्रवेश करतात. )

**संत चोखोबा :**

नातरी अंत्यज आणि ब्राह्मण । गंगेमाजी करिती स्नान ।
तरी काय बाटले तिचे जीवन । पवित्रपणे सर्वदा ।।
तुम्हा आम्हा सकळ देही । आत्मा एकचि असे पाही ।
तयासि याती वर्णू नाही । आपुले ठायी विचारा ।।

**प्रवक्ता :**

ज्ञानेश्वर, नामदेव, चोखोबा आदि संतांनी ज्ञानाची दिव्य ज्योत चेतविली, मनुष्यधर्माची वाट दर्शविली, नीतिमत्तेची प्रेरक शिकवणूक दिली... संत एकनाथांनी याच उद्धारक मार्गाने जाताना दया, क्षमा, शांती आणि परोपकार यांचे प्रत्यक्ष दर्शन घडविले. प्रेमाची आणि सत्याची गंगा निर्माण केली. ते उद्‌गारतात—

प्रेमेवीण श्रुतिस्मृतिज्ञान । प्रेमेवीण ध्यान पूजन ।
प्रेमेवीण श्रवण कीर्तन । वृथा नृपनाथा ।।
सत्यापरते नाही तप । सत्यापरता नाही जप ।
सत्ये पाविजे सद्रूप । सत्यें निष्पाप साधक होती ।।

( संत एकनाथ प्रवेश करतात. )

**संत एकनाथ :**

अन्नवस्त्र दान मान ।
पोटीच्या कळवळचाने जाण ।।
करावें भूतीं प्रियाचरण ।
हा स्वधर्म जाण सर्वांचा ।।
जेणे आपणासी होय दु:ख ।
तें भूतांसी करीना नि:शेख ।।
जेणें आपणासी होय सुख ।
ते आवश्यक करी दीना ।।

(जय पांडुरंग हरी–जय पांडुरंग हरी : ' ज्ञानदेव–तुकाराम ' : जय पांडुरंग हरी : टाळमृदंगाच्या गजरात वारकरी भजनाची लय : आणि मग ' पुंडलिक वर दे हरि विठ्ठल ')

**प्रवक्ता :**

संत तुकाराम हे तर खरे लोकप्रतिनिधी होते. त्यांनी समाजाचे अंतरंग दर्शविले. जातिभेद व विषमता यांचा प्रखर निषेध केला. समाजकल्याणाचे उद्धारक मार्ग दाखविले.

शुद्धबीजा पोटी । फळे रसाळ गोमटी ।।
मुखी अमृताची वाटी । देह वेंचावा कारणी ।।
सर्वांगी निर्मळ । चित्त जैसे गंगाजळ ।।
तुका म्हणे जाती । ताप दर्शनें विश्रांती ।।

(संत तुकाराम प्रवेश करतात.)

**संत तुकाराम :**

जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले ।।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।
नाही वर्णधर्म याती । नामी अवघेचि तरती ।
तुका म्हणे नाही जातीसवे काम । ज्याचे मुखी नाम तोचि धन्य ।।
ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य शूद्र चांडाळा आहे अधिकार ।
बाळे नारीनर आदि करोनी वेश्या ह्या ।।
माझिया गोते हें वरले सकळ । देखिजे मूळ विटाळाचें ।।
जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचारे वेच करी ।।
उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीवखाणी ।।
परउपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी आया ।।
भूतदया गाईपशूचे पालन । तान्हेल्या जीवन वनामाजी ।।
शांति रूपे नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्त्व वडिलाचे ।।
तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ । परम पदबळ वैराग्याचे ।।

(' ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे कळस ' या अभंगाचा टाळमृदंगाने गजर.) प्रवक्ता सांगतो–

आणि म्हणूनच मुक्तेश्वर कळवळून उद्गारतात :

जिहीं आपुल्या सर्व यत्ने ।
पराचे क्लेश परिहरणें ।
श्रमोनी पुढिल्या सुख दावणे ।
तो एक धन्य संसारी ।।

स्वामी रामदासांनीसुद्धा आपल्या प्रखर वाणीने जनजागृती करून कल्याणाचा मार्ग दर्शविला आहे–

अंतरी नाही सावधानता येत्न ठाकेना पुरता ।।
सुखसंतोषाची वार्ता । तेथे कैंची ।।
म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपें जोडावा ।
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळे ।।

(स्वामी रामदास प्रवेश करतात.)

**स्वामी रामदास :**

सावधानता असावी । नीतिमर्यादा राखावी ।
जनास माने ऐसी करावी । क्रियासिद्धी ।।
स्वये आपण कष्टावें । बहुताचे सोसित जावे ।
झिजोन कीर्तीस उरवावे । नाना प्रकारे ।।
यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेवीण दरिद्रता ।
भाग्यासि काय उणे रे । यत्ना वांचूनि राहिले ।।
शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने यत्न होतसे ।
शक्ति–युक्ति जये ठायी । तेथ श्रीमंत धावती ।
वन्ही तो चेतवावारे । चेतवीताचि चेततो ।
केल्याने होत आहे रे । आधि केलेचि पाहिजे ।।
(जय जय रघुवीर समर्थ)

**प्रवक्ता :**

आणि याप्रमाणे जनकल्याणास्तव संतांची अमृतवाणी केवळ महाराष्ट्र-भरच दुमदुमली नाही तर भारताच्या कानाकोपऱ्यातही निनादली.

**प्रवक्ता :**

प्रापंचिक जीवन जगताना, संत तुकारामाप्रमाणे संत कबीरांनी प्रांजळ व्यवहार, दया–धर्म व कर्तव्यनिष्ठा आदींचा एक आदर्श चित्रपटच समाजापुढे उभा करून, मनुष्यमात्राच्या हृदयास्मितेचे तेज प्रकट केले.

**संत कबीर :**

रात गंवाई सोय कर । दिवस गंवाया खाय ।।
हीरा जनम अनमोल था । कौडी बदले जाय ।।
काल करै सो आज कर । आज करै सो अब्ब ।
पल में परलै होयगी । बहुरि करेगा कब्ब ।।
रूखा सूखा खाय कै । ठण्डा पानी पीव ।
देख बिरानी चूपडी । मत ललचावै जीव ।।

ऐसी बानी बोलिए । मन का आपा खोय ।
औरन का सीतल करैं । आपहु सीतल होय ।।
जहां दया तहं धर्म है । जहां लोभ तहं पाप ।
जहां क्रोध तहं काल है । जहां छिमा तहं आप ।।
दया दिल में राखिये । तू क्यों निरदई होय ।
साई के सब जीव हैं । कीरी कुंजर दोय ।।
जूआ चोरी मुखबिरी । व्याज घूस पर-नार ।
जो चाहै दीदार को । एती बस्तु निवार ।।
एके साधे सब सधै, सब साधे सब जाय ।
जो गहि सेवै मूल को, फूलै फलै अघाय ।।
पोथी पढ़ि पढ़ि जग मुआ । पंडित हुआ न कोय ।
ढाई अच्छर प्रेम का । पढै सो पंडित होय ।।
सांच बराबर तप नहीं । झूठ बराबर पाप ।
जाके हिरदय सांच है । ताके हिरदय आप ।।

**प्रवक्ता :**

सुखदायी मधुर वाणी, परस्पर निष्ठा व प्रेम आणि सेवकाची उदात्त भूमिका राखून, जीवन यथार्थ करण्याचे महत्त्व संत तुलसीदासांनी जनतेला परोपरीने पटवून दिले—

**संत तुलसीदास :**

रीस न रसना खोलिये । बरू खोलिय तरवार ।
सुनत मधुर परिणाम हित । बोलिय बचन विचार ।।
तुलसी मीठे बचन तें, सुख उपजत चहूं ओर ।
बसीकरन इक मंत्र है, तजि दे बचन कठोर ।।
स्वामी होना सहज है, दुरलभ होना दास ।
गाडर लाये ऊन को, लागी चरै कपास ।।

**प्रवक्ता :**

प्रभू गिरिधारीच्या ध्यासाने संत मीराबाई एकजीव झाली. षड्रिपूंना त्यजून, तिने आत्मसुखाचा निरामय आनंद प्रकट केला. देह, आत्मा आणि शक्ती सत्कार्यास्तव कामी आणणे म्हणजेच ईशप्राप्ती होय— तेच जीवनाचे खरे सार्थक होय, अशी असीम श्रद्धा तिने व्यक्त केली—

**संत मीराबाई :**

पायो जी मैं तो राम रतन धन पायो
वस्तु अमोलक दी म्हारे सतगुरु, किरपा कर अपनायो

जनम जनम की पूंजी पाई, जग में सभी खोवायो ।
खरचै नहिं कोई चोर न लेवै दिन दिन बढत सवायो ।।
सतकी नाव केवटिया सतगुरु, भवसागर तर आयो ।
मीरा के प्रभु गिरिधर नागर, हरख हरख जस गायो ।।

(भजन झाल्यावर संत मीराबाई हात जोडून प्रार्थना करीत आहे. त्या वेळेला प्रवक्ता निवेदन करतो......)

**प्रवक्ता :**

संताच्या अमृतवाणीने भारताचे पावित्र्य तेजोवर्धित झाले. जीवनात मंगलत्व निर्माण व्हावे आणि 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' अशी भूमिका निर्माण व्हावी म्हणून सर्वांनी राष्ट्राचा माथा उन्नत व उज्ज्वल करण्याचा प्रयत्न केला. संतांच्या या शुद्धाचरणी व पावनमय भूमिकेवरूनच, त्या थोर पोषक परंपरेला अनुसरून आज आपल्या राष्ट्राचे आध्यात्मिक, नैतिक, सांस्कृतिक व सामाजिक जीवन अधिक प्रगत, अधिक उन्नत करणे आपले कर्तव्य आहे; त्यासाठी समाजात व पर्यायाने राष्ट्रात भावनात्मक एकता निर्माण करण्याची नितांत आवश्यकता आहे. आपण सर्व त्या दृष्टीने मानवतेचा पुरस्कार करून, आपले राष्ट्र समृद्धशाली व बलशाली करण्यास झटू या.

साधु–संतांनी आपल्या ओव्या व अभंगांद्वारे आणि कीर्तनादी प्रकाराद्वारे वर्णभेदाचा व जातिपातीचा धिक्कार केला आहे. अस्पृश्यता न पाळता सर्व ईश्वराची लेकरे आहेत, त्यांना समान दर्जा, समान वागणूक प्राप्त व्हावी याचा प्रचारही केला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पुरस्कार करून मानवतेचा, एकतेचा, बंधुत्वाचा आदेश दिला आहे. प्रत्येक वर्णाला स्वकर्तव्याची जाणीव करून देताना राष्ट्राच्या अभ्युदयासाठी प्रत्येकाने झिजले पाहिजे आणि जातिभेद पाळता कामा नये, असा इषाराही ज्ञानेश्वरांनी दिला. जातिभेदाबद्दल ते म्हणतात––

चहूं वर्णासि नामाधिकार । नामी नाही लहानथोर
जडमूढ पैलपार । पावती नामे.

तसेच

कां खैर चंदन काष्टें, ही विवंचना तंवची घटे
जंव नै घावती एक घटे, अग्नीमाजी
तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया, कां शुद्र अंत्यजादि इया
जाती तंवचि वेगळालिल्या, जंव न पवती माते.

आणि 'हे विश्वचि माझें घर' म्हणून ज्ञानेश्वरांनी सर्वांना उन्नतीची एक सरळ वाट दाखविली.

श्री संत चोखामेळा हा तर महार होता. त्याने अस्पृश्यतेविरुद्ध टाहो फोडला. तो देवाला जबाबदार धरून उद्गारतो--

जातिभेदे गांजिलों त्रासिलों विटाळे
सोडवीं या वेळीं चक्रपाणी
एकापुढें एक बसती आघात
सारितां न सरत काय करूं
दुष्ट रूढी नित्य करूं पाही घात
सोसावे आघात कितीतरी ?

अस्पृश्यता पाळणाऱ्या व विटाळ चंडाळाला महत्त्व देणाऱ्या समाजाला उद्देशून तो म्हणतो-

धिक् तो आचार धिक् तो विचार
धिक् तो संसार धिक् जन्म
धिक् ब्रह्मज्ञान वाउग्या ह्या गोष्टी
दया क्षमा पोटी शांति नाही

समानतेच्या आणि माणुसकीच्या पुरस्कारार्थ चोखोबा स्पृश्य समाजाला स्पष्ट शब्दांत जाणीव करून देतात--

ना तरी अंत्यज आणि ब्राम्हण गंगेमाजी करिती स्नान
तरी काय बाटले तिचें जीवन पवित्रपणे सर्वदा
तुम्हा अम्हा सकल देही आत्मा एकची असे पाही
तयासि याती वर्ण नाही आपुले ठायी विचारा

आणि मग चोखोबा रोख ठोक सांगतात--

चोखा म्हणे येथे सर्वा अधिकार
उंच नीच अपार तरले नामे.

अस्पृश्यता निवारण्याच्या बाबतीत तर संत एकनाथ अग्रेसर होते. जातिभेदाच्या ते अगदी विरुद्ध होते. अस्पृश्य हे आपलेच जीव आहेत, ह्या रंजल्या गांजलेल्या जीवांना आधार देऊन त्यांना समानतेने वागविले पाहिजे, अशा थोर विचारांनी त्यांनी उच्च वर्णीयांच्या आक्षेपाची जराही पर्वा न करता शूद्रांना आणि अतिशूद्रांना पोटाशी धरले. त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्याबाबत केवळ उपदेशच केला नाही तर जातीने अस्पृश्यांत मिळून मिसळून तुम्ही आम्ही एकच हे सिद्ध केले. जेवढी दया ममता जिव्हाळा व्यक्त करण्यासारखा होता तो प्रत्यक्ष प्रत्ययास आणून देऊन अस्पृश्यांशी रोटी-व्यवहारही केला. संत एकनाथ म्हणतात—

अन्नवस्त्र दान मान
पोटीच्या कळवळ्याने जाण
करावें भूतीं प्रियाचरण
हा स्वधर्म जाण सर्वांचा

दया, क्षमा आणि शांती यांचे ते आगर होते. आपण कोणाला आपल्या दुःखाचा वाटेकरी होऊ देऊ नये, आपल्याला जे सुख लाभेल ते मात्र दीनदुबळ्या व रंजल्या गांजलेल्याला देऊन सुखी बनविले पाहिजे, असा धडा त्यांनी सर्व जनतेला दिला.

जेणे आपणासी होय दुःख
तें भूतांसी करीना निःशेख
जेणें आपणासी होय सुख
तें आवश्यक करी दीना

एकदा एकनाथांच्या वडिलांचे श्राद्ध होते. स्वयंपाक तयार झाला होता. चारपाच महारांना पक्वान्नांचा सुवास आला. ते आपसात कुजबुजले—"वा! असे सुग्रास अन्न आम्हाला कधी मिळेल का?" हे भाषण एकनाथांनी ऐकले व त्यांचे मन द्रवले. त्यांनी आपली पत्नी गिरिजाबाईस विचारले. गिरिजाबाई आनंदाने म्हणाल्या, अन्न पुष्कळ आहे. महारांना बायकामुलांसकट बोलवा. त्यांना येथेच भोजन वाढू. जनार्दन सर्वाभूती आहे, तर या अतिशूद्रांचीच आज तृप्ती करू या. त्याप्रमाणे एकनाथांनी सर्व महारांना बायका-मुलांसकट जेवायला बोलाविले. त्यांनी श्रद्धा नि श्राद्धानिमित्त ब्राह्मणांसाठी केलेले भोजन अस्पृश्यांना मानाने पानावर बसवून आणि त्यांचा सत्कार करून खाऊ घातले.

तसेच एकदा पैठणच्या राण्या महाराने व त्यांच्या बायकोने एकनाथास जेवायला बोलाविले. हा राण्या महार व त्याची बायको शुद्धाचरणी होती. नाथांनी जेवायला येण्याचे कबूल केले. ब्राह्मण महाराच्या घरी जेवायला जाणार म्हणून इतर ब्राह्मणांनी नाथांना खडसावून हटकले. तेव्हा एकनाथ म्हणाले—

'जेथे शुद्ध मन आहे तेथे देव आहे, ज्याचे आचरण पवित्र आहे तो महार ब्राह्मणांहूनही श्रेष्ठ आहे.'

त्यांचे अनामिकपणाचें ज्ञान
मज तंव न दिसे ओळखण
दिसतो आत्मत्वें परिपूर्ण
सर्वांसमान सारखा
जन्म कर्म वर्णाश्रम जाति
पूर्ण भक्त होती न धरिती

चहूं देहांची अहंकृति
स्वप्नीही न धरिता हरिभक्त

एकनाथ मोठ्या आनंदाने राण्या महाराच्या घरी जेवायला गेले आणि त्या जुन्या काळीही रोटी–व्यवहार करून स्पृश्यास्पृश्य भेद पाळला जाऊ नये याची शिकवणूक दिली.

एकदा भर दुपारचे वेळी एकनाथ महाराज गंगास्नानाला जात होते. तेव्हा आईची चुकामूक होऊन महाराचे एक छोटे मूल उन्हाने तळमळत पडले होते. हे पाहून नाथांचे मन द्रवले. त्यांनी त्या मुलाला कडेवर घेऊन त्याला त्याचे घरी नेऊन दिले. एकनाथांची ममता, दया, केवळ मनुष्यमात्रावरच नव्हती तर प्राणि-मात्रावरही तितकीच होती. काशीची कावड घेऊन एकनाथ रामेश्वराला चालले होते. वाटेत वाळवंटात एक गाढव पाण्यावाचून तडफडत पडले होते. हे पाहून एकनाथांना त्याची दया आली. त्यांनी लगेच कावडीतील पाणी त्याच्या तोंडात घातले. बरेच पाणी पोटात गेल्यावर गाढवाला हुशारी आली व ते टणकन उडी मारून निघून गेले. नाथांच्या संगती असलेले लोक म्हणाले "कावडीतील पाणी गाढवाला पाजले गेल्यामुळे यात्रा फुकट गेली." तेव्हा एकनाथ हसून म्हणाले—

हरी सर्व प्राण्यांत आहे. हा अमुक आणि तमुक असा भेद पाळून वागले तर ज्ञानाचा काय उपयोग ? वेळेवर आपल्या अंगच्या गुणांचा योग्य उपयोग झाला नाही तर त्या गुणांचा काही उपयोग नाही. देहाच्या बाजूने पाहाल तर राजाचा देह व गाढवाचा देह सारखाच, सर्व समान आहे. माझी रामेश्वराची पूजा येथेंच पावली.

अंतःकरणपूर्वक लोकसेवा करून एकनाथांनी खेड्यापाड्यांचा उद्धार केला. खऱ्या मानवी धर्माचे रक्षण केले. गुन्हेगारीपायी कैद भोगताना मरणाला टेकलेला महार घरी आला असताना त्याची सेवा करून त्याला सुधारणे, अस्पृश्यांच्या बरोबर जेवणखाण करणे कितीतरी अपंग व दुष्ट रोग्यांची सेवा करणे, वेश्येचा सन्मान तिच्या घरी जाऊन स्वीकारणे व तिला सन्मार्गास लावणे अशा समाजहिताच्या अनेक गोष्टी करून एकनाथांनी खरा सेवाधर्म शिकविला.

श्री संत एकनाथांप्रमाणेच श्री संत तुकाराम महाराज मोठे कनवाळू परोप-कारी व समाजहितसाधक होते. ते म्हणतात—

जे कां रंजलें गांजलें त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा देव तेथेंचि जाणावा

जातिभेद व पंक्तिप्रपंच याबाबत तर त्यांना मोठी चीड होती. "उंच नीच काही नेणे हा भगवंत, तिष्टे भाव भक्त देखोनिया" असा समतेचा पुरस्कार करून ते सांगतात—

नाही वर्णधर्म याती नामी अवघेचि तरति
तुका म्हणे नाही जातिसवे काम
ज्याचे मुखी नाम तोचि धन्य
ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र चांडाळा आहे अधिकार
बाळे नारीनर आदि करोनी वैश्या ही

श्री संत चोखामेळा यांच्याप्रमाणे दक्षिण भारतातील भक्त नन्दनार, तसेच अमृत सकेनर अन्त्यज होते. तर बंगालचे संत बाऊल, आसामचे संत शंकरदेव, उत्तर-भारताचे संत कबीर, संत दासभक्त सेना, भक्त दादू आणि भक्त नामा या सर्व संतांचा जन्म अगदी खालच्या थरांत झाला होता. या सर्व साधुसंतांनी जातिभेद नष्ट करण्याबद्दल व अस्पृश्यता समूळ काढून टाळण्याबद्दल फार मोठे कार्य केले. त्या सर्व संतांचे म्हणणे असे—

वर्णभेद वा जातिभेद ही ईश्वरनिर्मित गोष्ट नाही. ती मनुष्यनिर्मित गोष्ट असून मानवतेला कलंक फासणारी व देवाचा अपमान करणारी भयंकर गोष्ट आहे. तिचा नायनाट करून समानतेने व एकीने जनहित संर्वधिले पाहिजे. नाहीतर देवाला आपल्या पापाचा जाब द्यावा लागेल.

गुजराती संतश्रेष्ठ श्री नरसी भगत मेहता यांनी कसलाही भेदाभेद न राखता सर्व समाजाला मानवतेचा व समानतेचा दिव्य संदेश दिला आहे. ते स्वत: अस्पृश्याच्या वस्तीत जाऊन रात्ररात्रभर भजन करीत त्यांच्या जीवनाशी तादात्म्य पावत व उपदेश करीत.

‘पक्षापक्षी त्या नाही परमेश्वर, सम दृष्टीने सर्व समान’

जे पक्षापक्ष म्हणजे जातिभेदभाव पाळतात त्यांना परमेश्वर पावत नाही. सर्वजन तर समान आहेत. एक आहेत.

लिंगायत धर्माचे उद्धारक शिवभक्त श्रीबसवेश्वर यांनी जातिभेदाविरुद्ध मोठे अलौकिक कार्य केले आहे. समाजात समता व बंधुत्व निर्माण करून दलितांची, अनाथांची आत्मीयतेने सेवा करणे म्हणजेच ईशसेवा होय, असे प्रतिपादिले आहे. ते उद्गारतात—

जातिभेदाची कल्पनाच शिवू शकत नाही. स्वाभाविकपणे साऱ्या समाजात दोन वर्ग पडू शकतील. चांगले लोक व वाईट लोक. चांगल्या आचाराचे ते चांगले लोक. वाईट आचाराचे ते वाईट लोक. याव्यतिरिक्त दुसऱ्या एखाद्या वर्गाची कल्पना आपण कशी करणार ? दैवयोगाने नीच कुलात जन्मलेले लोक हे खरे चांडाळ नव्हेत तर जे कृतीने चांडाळ तेच जातीने चांडाळ. ज्यांच्या जीवनामध्ये एकही चांगला क्षण आला नाही, ज्यांची सदाचाराशी फसगत झालेली असते

अशांना आपण उच्चवर्णीय कसे म्हणू ? उच्च वर्ण साऱ्या समाजात पृथ्वीवर एकच. चारित्र्याने जो उच्च तो उच्चवर्णीय.

जातिभेद व अस्पृश्यता पाळणाऱ्या लोकांसंबंधी संत कबीर म्हणतात–

एके बूंद, एक मल मूतर
एक चाम एक गुदा
एक ज्योति ते सब उत्पन्न
को ब्राह्मण, को शूद्रा

एका बीजबिंदूने सर्वांची उत्पत्ती झाली आहे. मळमूत्रही सर्वांचे सारखे आहे. कातडी काय किंवा रक्त मांस काय सारखेच आहे. आणि ब्रह्मज्योतीचीच सर्व किरणे आहेत. मग सांगा, कोण ब्राह्मण आणि कोण शूद्र, सर्व एकच आहेत

जब लगि ऊँच नीच करि जाना
ते पसुवा भूले भ्रम नाना

जे अनेक भ्रमांनी–भेदभावांनी ग्रस्त झाले आहेत ते नर नसून नरपशू आहेत.

कौम छत्तीस एक ही जाती
ब्रह्म बीज का सकल पसारा
ऊँच–नीच इस विधि है लेई
कर्म–कुकर्म कहावे सोई

ब्रह्मबीजापासून ही सर्व माया उत्पन्न झाली आहे, सर्वांची तर जात एकच आहे. जो सत्कृत्य करतो तो उच्च आहे व जो दुष्कृत्य करतो तो नीच आहे.

साधुसंतांनी व थोर राष्ट्रपुरुषांनी अस्पृश्यता निवारणाबाबत लोकोत्तर कार्य केले आहे. संतांनी भक्तिमार्ग अवलंबिल्यामुळे अस्पृश्यतेविरुद्ध उघड उघड बंड पुकारले नसले तरी त्यांनी अस्पृश्यतेचे पालन म्हणजे एक भयंकर गुन्हा आहे व देवाजवळ त्याचा जाब द्यावा लागेल याची तीव्र शब्दांत जाणीव मात्र करून दिली आहे.

आजच्या या यांत्रिक युगात तर कमालीची परिवर्तने घडत आहेत. या काळात विषमता, जातिभेद वा वर्णभेद राष्ट्राला अत्यंत घातक आहे. समाज तर उन्नत होणे शक्यच नाही तेव्हा समाज विकसित व उन्नत करावयाचा झाल्यास अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन करणे हे सर्वांचे प्रथम पवित्र कर्तव्य आहे. समाजाला माणुसकीची शिकवण देऊन उद्धारक आचरण स्वीकारणेच समाजपोषक ठरेल. आपल्यासारख्या इतरांनाही भावना आहेत, त्यांनाही जीवन आहे, प्रतिष्ठा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अस्पृश्योद्धारासाठी आता केवळ व्यासपीठावरील भाषा नको किंवा तेवढ्यापुरते तोंडदेखले बोलणे नको, तर अस्पृश्यता निवारणाची सत्कृत्ये

प्रत्यक्षात सिद्ध करून दाखविता आली पाहिजेत. त्याशिवाय समाज उन्नत होणार नाही. समाजसेवेलाही काही अर्थ उरणार नाही. राष्ट्राला संघटनेची, एकतेची आज नितांत आवश्यकता आहे. म्हणून अस्पृश्यता निवारण्याच्या पुण्यप्रद सेवेने आपण प्रबळ संघटना करून प्रगतीची पावले पुढे टाकणेच पुरुषार्थाचे ठरेल.

**अस्पृश्यता निवारणार्थ संतांची वाणी**

अस्पृश्यता पाळली जाऊ लागली ती सुमारे १,५०० वर्षांपासून. परंतु या अत्यंत विषारी रूढीचा सर्व थोर साधु–संतांनी आणि राष्ट्रपुरुषांनी अत्यंत कडक शब्दांत निषेध करून, अस्पृश्यता समूळ नष्ट करण्याचा व धर्माला आणि राष्ट्राला लागलेला कलंक साफ धुऊन काढण्याचा अखिल जनतेला कळकळीचा उपदेश केला.

विशेषत: पेशवाईच्या अन्तानंतर जातिभेद व अस्पृश्यता नष्ट करण्याबद्दल भारतभर फार मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू करण्यात आले. आर्यसमाजाचे संस्थापक पंजाबचे स्वामी दयानंद सरस्वती, बंगालमधील महान सुधारक राजा राममोहन राय, स्वामी केशवचंद्र सेन, महर्षी देवेन्द्रनाथ ठाकुर, स्वामी रामकृष्ण परमहंस व त्यांचे पट्टशिष्य स्वामी विवेकानंद, उत्तरभारतात स्वामी दयानंद, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद, महाराष्ट्रातील महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, लोकमान्य टिळक, समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ कृष्ण गोखले आचार्य विनोबा भावे, राष्ट्रपिता महात्मा गांधी, महर्षी ठक्कर बाप्पा आदी थोर पुढाऱ्यांनी धर्माला लागलेला अस्पृश्यतेचा कलंक नष्ट करण्यासाठी देशव्यापी कसोशीचे प्रयत्न केले.

स्वामी विवेकानंदांनी तर जातिभेद व अस्पृश्यता याबाबत अत्यंत कडक शब्दांत निषेध करून आपले विचार व्यक्त केले. आम्ही हिंदू आहोत पण अस्पृश्यता पाळली पाहिजे या मताचे नाही. हे मत आमच्या हिंदु धर्माचेही नाही. हे एक तर एकप्रकारे पाखंडी मत आहे. जोपर्यंत असे पाखंडी मत, असा भेद आहे तोपर्यंत आमच्या राष्ट्राची उन्नती होणे शक्य नाही. तेव्हा आपण सावध राहा.

लोकमान्य टिळक देशबांधवांना बजावून सांगतात—

अस्पृश्यता देवास मान्य असेल तर मी त्यास देवच मानण्यास तयार नाही. ती तर एक जुनी रूढी आहे त्या रोगाचे आता निर्मूलन झालेच पाहिजे.

अस्पृश्यतेला शास्त्राधार नाही. अस्पृश्यवर्गाचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा आहे. तो सर्व दृष्टींनी सोडविलाच पाहिजे. अस्पृश्यतेचे पूर्णत: निर्मूलन करणे हाच एक त्यावरील उपाय होय.

समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर म्हणतात—

सर्व मानवप्राणी जन्मत: सारख्या योग्यतेचे अधिकारी असून त्यांचे हक्कही एकसारखे असतात. आपण सर्वांनी अस्पृश्यतेचा समूळ नायनाट केला पाहिजे.

ती पाळून आपण भयावह स्थिती निर्माण केली आहे. आपणच या गोष्टीला जबाबदार आहोत. तेव्हा अस्पृश्यतेचा विच्छेद करून अस्पृश्य गणल्या गेलेल्या बांधवांना उन्नत करण्यास झटले पाहिजे.

भारतसेवक समाजाचे ख्यातनाम प्रवर्तक गोपाळ कृष्ण गोखले म्हणतात–

जातिभेद व उच्चनीचपणा देशाला व समाजाला फार बाधक असून आपण आपल्या प्रगतीला वंचित होत आहोत. समानता राखून आपण मानवतेचे पुजारी बनले पाहिजे.

अस्पृश्योद्धाराच्या बाबतीत अत्यंत तेजस्वी व प्रभावी कार्य करणारे लोकोत्तर पुरुष म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी अत्यंत तळमळीने व कळकळीने आपले प्राण पणाला लावले. केवळ स्वतःचे नव्हे तर आपल्या कुटुंबासह त्यांनी जातिभेदाची शृंखला तोडण्याचा हिरिरीने प्रयत्न केला. त्यांनी अस्पृश्यासाठी शाळा काढल्या, विधवा व पतित स्त्रिया आणि अनाथ बालके यांच्या संगोपनासाठी बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले. दुःखी व रंजल्या गांजलेल्या जनतेचे कल्याण साधले. आपल्या ध्येयाच्या प्रचारासाठी वृत्तपत्रे काढली, पुस्तके लिहिली आणि सत्यशोधक समाजाची स्थापना करून जातिभेद नष्ट करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. ते अस्पृश्य समाजात एकजीव झाले. त्यांच्याशी रोटी–व्यवहार केला व त्यांना उन्नत करण्यासाठी अविरत ते झटले. दलितोद्धाराच्या दृष्टीने त्यांनी घडविलेली क्रांती अवर्णनीय आहे. ते उद्गारतात–

आपण सर्व देवांची लेकरे आहोत, महार, मांग, चांभार, भंगी यांचे पूर्वज व आपले पूर्वज एकच आहेत. आपण सर्व एका रक्ताचे आहोत. जातिभेद नाशाला कारण आहे. अस्पृश्यता पाळणारा स्वतः अस्पृश्य आहे. अस्पृश्यतेने आपण आपले सत्त्व, स्वत्व गमाविले आहे. समाज खिळखिळा करून अवनतीचा मार्ग धरला आहे. तेव्हा उठा बंधूंनो ! आता तरी जागे होऊन उठा आणि अस्पृश्यतेला मूठमाती देऊन मनुष्यधर्माचे पालन करा.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रमाणे कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी जातिभेदाविरुद्ध फार मोठी मोहीम सुरू केली होती. अनेक ठिकाणी दौरा करून दलितोद्धाराच्या दृष्टीने परिणामकारक भाषणे दिली, अनेक लेख लिहिले, पुस्तके लिहिली, संस्था प्रस्थापित केल्या आणि अस्सल मानवधर्म कोणता याची जनतेला प्रखर जाणीव करून दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर दलितोद्धाराच्या बाबतीत असामान्य कार्य केले आहे. त्यांनी आपल्या लेखणीने आणि वाणीने सबंध भारत खडबडून जागा केला. अस्पृश्यांना समानतेने वागवून त्यांना राजकीय, सामाजिक व शैक्षणिक हक्क दिले गेलेच पाहिजेत, त्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही असे खडसावून सांगून त्यांनी अस्पृश्यता समूळ नष्ट करण्याबाबत व दलितांच्या न्याय्य हक्का-

बाबत अत्यंत तीव्र असा लढा दिला. फेकून दिलेला भाकरीचा तुकडा आम्हाला नको. आम्हाला तर जगात शासनकर्ता बनले पाहिजे. अशी त्यांनी ललकारी देऊन हिंदूंच्या धोरणार व अन्यायावर कडक टीका केली आहे. ते तळमळून उद्गारतात—

हिन्दुधर्मात असलेली ही विषमता निंदास्पद आहे. कारण विषमतेनुरूप होणाऱ्या परस्परांच्या व्यवहारांचे स्वरूप हिन्दुधर्माच्या शीलाला शोभण्यासारखे नाही. आठ कोटी अस्पृश्यांना गुलामगिरीत डांबणारा, कोटचवधी बहुजनसमाजास अज्ञान, दारिद्रच आणि रूढी यांच्या अंधारात दडपणारा आणि असंख्य स्त्रियांना माणुसकीतून उठविणारा हा हिंदुधर्म नव्हे. या शृंखला आहेत. त्या तोडल्या पाहिजे.

अस्पृश्योद्धारासाठी महात्मा गांधीजींनी तर आपले प्राण पणाला लावून अत्यंत प्रभावी कार्य केले. स्पृश्यास्पृश्यभेद कायमचा नष्ट व्हावा म्हणून त्यांनी हृदयपरिवर्तनावर विशेष भर दिला. अस्पृश्यांना न्याय्य हक्क मिळावेत यांसाठीही त्यांनी प्रयत्न केले. एकदा त्यांची हजामत करणाऱ्या न्हाव्याने हरिजनाची हजामत करण्यास नकार दिला तेव्हा गांधीजींनी त्या न्हाव्याकडून हजामत करणे सोडून दिले. त्यांनी आपल्या साबरमती आश्रमात एका हरिजन बालिकेला ठेवून तिचे संगोपन केले. त्यांनी अस्पृश्योद्धारासाठी अनेक प्रकारच्या प्रभावी चळवळी केल्या. हरिजन नावाचे वृत्तपत्र काढले. देशभर दौरा काढून अस्पृश्यता नष्ट करण्याचा जनतेला हितोपदेश केला. उपोषणे केली, विद्वानांच्या मोठमोठाल्या परिषदा भरवून स्पृश्यास्पृश्य भेद मिटविण्याबद्दल त्यांच्या मतात परिवर्तन घडवून आणले. देशातील अनेक देवळे, धर्मशाळा, दवाखाने, हॉटेले अस्पृश्यांसाठी खुली करायला लावली. ते तळमळीने उद्गारतात—

अस्पृश्यतेला धर्मात थारा नाही. आपल्या स्वार्थासाठी व अहंकारासाठी उच्च म्हणवून घेणाऱ्यांनी दुर्बलांना आपल्या पायाखाली दडपून अस्पृश्यता निर्माण केली. कागदाच्या बनावटी फुलासारखी अस्पृश्यता मनुष्यनिर्मित कृत्रिम आहे. अस्पृश्यता देवाला व धर्माला मान्य नाही. उलट तो धर्माला लागलेला महान कलंक आहे म्हणून अस्पृश्यता पाळणे अधर्म आहे, मोठे पाप आहे, भयंकर मनुष्यद्रोह आहे आणि देवाची सर्वांत मोठी फसवणूक आहे.

जोपर्यंत हिंदू लोक अस्पृश्यांना आपले सख्खे बन्धू समजून त्यांच्याशी समानतेने वागणार नाहीत तोपर्यंत ते खरे हिंदू ठरणार नाहीत, ते अस्पृश्यांचे गुन्हेगार आहेत. अस्पृश्यता नष्ट करण्याचे पवित्र कार्य करूनच ते शुद्ध होतील.

अस्पृश्यता पाळणे अधर्म आहे. मोठे पाप आहे. भयंकर मनुष्यद्रोह आहे आणि देवाची सर्वांत मोठी फसवणूक आहे. सवर्ण हिन्दू अस्पृश्यांचे गुन्हेगार आहेत. अस्पृश्यता नष्ट करण्याचे पवित्र कार्य करूनच ते शुद्ध होतील.

□ □ □

सर्ग ४

# आम्ही आणि आमची आजची व उद्याची दिशा


१. आजचे उपासक, उद्याचे प्रवर्तक

२. एक राष्ट्र, एक जनता

३. ठोठवा म्हणजे उघडेल,
शोधा म्हणजे सापडेल

४. बहुजन समाज आणि
कर्मसिद्धीचा यज्ञ

५. राहुल सांस्कृत्यायन
एक अभ्यास

# १.

## आजचे उपासक उद्याचे प्रवर्तक

**तरुणांपुढील राष्ट्राची बिकट समस्या**

आज आपणासमोर राष्ट्र सामर्थ्यशाली बनवून नैतिक दर्जा राखण्याची फार मोठी बिकट समस्या आहे. ही समस्या उकलण्याचे महत कार्य आजच्या तरुण पिढीवर व विशेषकरून विद्यार्थी आणि उदयोन्मुख साहित्यिकवर्गावर अवलंबून आहे. तेव्हा, त्यांची आजची भूमिका काय व उद्याची काय असावी हे नीट समजून घेणे आपणा सर्वांचे अगत्याचे कर्तव्य आहे. हृदयाची परिपक्वता नसताना केवळ आपण ज्ञाते आहोत म्हणून या कागदावर रेघोट्या ओढणे वा उघड्या मैदानावर कंठशोष करणे म्हणजे स्वत:ची व पर्यायाने देशाची फसवणूक करून घेण्यासारखे आहे.

**उपासकांना निश्चित मुक्काम हवा**

वर उल्लेखिल्याप्रमाणे ज्यांच्यावर राष्ट्राची विशेष जबाबदारी आहे असे आम्ही म्हणतो ते सर्व उपासकांच्या मुक्कामावर आहेत. कोणतीही गोष्ट साध्य करण्याकरिता जे अभ्यास करतात, आराधना करतात ते उपासक. जे अव्यक्त ते व्यक्त करतात व स्वत: शिकून इतरांना धडा देतात ते प्रवर्तक. उपासकांचेच पुढे प्रवर्तकांत परिवर्तन होत असते. उपासकांची भूमिका अति सोज्ज्वळ, जिकिरीची व आत्मप्रत्ययी तीव्र अशी असते; आणि म्हणून मनाचा, वाणीचा आणि आचरणाचा मार्ग त्याला अधिकतर शुद्ध करून अनुभूतीची रेखा अतीव हृद्य तथा अनुकरणीय ठेवणे प्राप्त असते अर्थात प्रवर्तकाच्या भूमिकेत त्याचा " आत्मविश्वास " तेजोमय होऊन कार्याची सिद्धता व ध्येयाची पूर्तता पूर्ण करण्यास तो कामी येतो.

**आत्मविश्वासावरच कार्यसिद्धता**

मनुष्य जेव्हा एखादी गोष्ट कल्पितो व तिचे चित्र रेखाटतो तोपर्यंत त्याची जबाबदारी केवळ स्वप्नाइतकी मर्यादित असते. पण दृश्यस्वरूपात बदल करताना आत्मविश्वासाच्या जबर आधाराशिवाय त्याला काहीही शक्य होत नाही आणि हीच शक्यता प्रथम प्राप्त करून घेण्यास त्याला हरतऱ्हेचे प्रयोग जुळविण्यास सतत खपावे लागते. म्हणजे गोष्टीच्या सिद्धतेच्या पूर्वतयारीची उपासना आरंभावी लागते. मग क्रमशः त्याची धडाडी गतिमान होते. त्यात त्याची जिज्ञासा वाढीला लागून मानवी प्रयत्नांचा थांग त्याला थोडा–थोडा उमगू लागतो नंतर कसली तरी शाश्वती प्राप्त झाल्याचे वाटू लागते. याच मार्गावर गंभीरतेला खोली येऊ लागते व मग मनाची खंबीरता उपासकाची उपासना मान्य करते, हे जेव्हा सिद्ध होऊ लागते तेव्हा " आत्मविश्वास " प्रवर्तकाच्या कार्याला यशस्वी करण्यास समर्थ होतो. येथूनच उपासकाच्या मुक्कामावरील ज्योत आपला प्रकाश दूरवर फैलवू शकते.

**एकलव्याचा आदर्श पाठ**

त्यादृष्टीने, " धन्य कोळियाचा भावार्थ, द्रोणप्रतिमा मूर्तिमंत। तैसीच विद्या प्राप्त होत, भावबळे करूनीया ॥ " ही मुक्तेश्वराची ओवी अभ्यासण्यासारखी आहे. एकलव्याच्या आत्मविश्वास–प्राप्तीचा एक सुंदर नमुना म्हणून उपासकांनी नजरेसमोर ठेवण्याजोगा आहे स्वबलाने पण निर्विकार दृष्टीने उपासना आरंभून त्याने प्राप्त केलेली विद्या, कमावलेला आत्मनिष्ठभाव व संयमपूर्ण निर्मिलेला मनाचा खंबीरपणा कोणाला अनुकरणीय नाही ? त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी, नेपोलियन बोनापार्ट, म. गांधी, सात्रेटीस, वाल्मीकी आदी प्रवर्तक झालेले थोर पुरुष प्रथम उपासकांच्याच मुक्कावरून पुढे आलेले आहेत.

**शुभवर्तमानाची बीजे रोवता यावीत**

सदाचार व सद्भावना या दोन शब्दप्रयोगांची कृती त्या उपासकांच्या मदतीस धावून येते. सद्भावना बाळगून सदाचार पाळणारा या दोन गुणांनाच आपले अस्त्र, आपला ठेवा असे मानतो. त्यावर त्याचा प्रामाणिकपणा व न्यायीपणा उघड होतो. ' A man's true greatness lies in the consciousness of an honest purpose in life, founded on just a steady obedience to the rule which he knows to be right. ' जॉर्ज लाँग यांचे हे म्हणणे उपासकांच्या कसाला लावण्यासारखे आहे. तद्वतच " इतरांना मारण्यापेक्षा मरण्यास सज्ज राहा " हा नारदाचा वाल्या कोळ्याला दिलेला गुरुमंत्रसुद्धा लक्षात घेणे जरूर आहे. सांगावयाचा हेतू हा की, उपासकाला शुभवर्तमान प्रसवता आले पाहिजे. मस्तक विनम्र, वाणी मधुर, कृती सुंदर हीच विशुद्ध बीजे शुभ वर्तमानाची आहेत. म्हणूनच उपासकाला एकलव्याबरोबर धौम्य ऋषीचा शिष्य आरुणीही झाले पाहिजे.

उपासक विद्वान झाला, कार्यकुशल झाला म्हणजे त्याच्या सिद्धतेची पूर्तता झाली असे नाही. तर शत्रू धुमाकूळ माजवीत व अत्याचाराची पावले उमटवीत येऊ लागला तर त्याचा प्रतिकार करण्याची शक्तीही त्याच्या अंगी असली पाहिजे. " मारिता मारिता मरावे । तेणे गतीस पावावे । " किंवा " वन्ही तो चेतवावारे । चेतविताचि चेतितो । " समर्थ रामदासांच्या या खड्यावोल क्षात्रधर्माची दीक्षाही त्याच्या रोमरोमात भिनली असली पाहिजे. मात्र, या सर्वांचा उपयोग उपासकाला प्रसंगानुसार न्यायपूर्ण रीतीने करता यावा.

**उपासकांचे व प्रवर्तकांचे मार्ग**

राष्ट्राला वीरवृत्तीच्या समंजस तरुणांची किती गरज आहे. हे काही सांगायला नको. राष्ट्राच्या समस्यापूर्तीस्तव त्यांना तपस्येच्या कसल्या स्वरूपाची आवश्यकता आहे हे यापूर्वी स्पष्ट केले आहे. विद्यार्थी किंवा उदयोन्मुख साहित्यिक जे बोलेल ते पडताळून ठासीव असेच, जे वाचेल ते चिकित्सापूर्ण ज्ञानवृद्धीचेच, जे लिहील ते अभ्यासपूर्ण, अनुभवपूर्ण विचारांनीच व जो पवित्रा टाकील तो मरणार पण हटणार नाही या निश्चयानेच वागला पाहिजे. तो या गोष्टीत जसजसा सफल होत जाईल तसतसा तो प्रवर्तकाच्या अधिकाधिक सन्निध जाईल. प्रवर्तक नेहमीच गुरुस्थानी असतो. त्याने दिलेला आदेश परिणामी इष्ट असाच ठरतो. बाकी प्रवर्तकाच्या हातून जराही चूक झाली तर त्याच्यावर अवलंबून असणाऱ्यांची अपरिमित हानी होते. म्हणून त्याला प्रत्येक कृती सावधगिरीने आचरावी लागते विजय प्राप्त होवो वा न होवो, पुढून खंजीर खुपसला जात असताही त्याचे पाऊल वेगाने पुढेच पडते. अशा प्रवर्तकाच्या अंगी आत्मविश्वास, दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी, साहस व न्यायीपणा हे गुण प्रामुख्याने समुचित झाले असतात.

**क्रियाशीलवृत्तीने राष्ट्राची इच्छा पूर्ण करावी**

याप्रमाणे उपासकांनी तथा प्रवर्तकांनी आपापली भूमिका समजून घेऊन निष्क्रियतेचा उच्छेद करावा व क्रियाशीलवृत्तीने स्वातंत्र्याची विजयपताका अखंड फडकत ठेवण्यास झटावे. आमचे भारत राष्ट्र उपासकाच्या उपासना–सिद्धीची वाट पाहत आहे. राष्ट्राची इच्छा आपण सर्वांनी पूर्ण केलीच पाहिजे.

□ □ □

# २.

## एक राष्ट्र
## एक जनता

आमचा भारत इन्द्रधनुष्याच्या वेधक आणि प्रेरक सप्तरंगी छटांप्रमाणे एकात्मतेच्या अनेक वैशिष्ट्यांनी अध्यात्म, साहित्य व संस्कृतीच्या उच्च नि उदात्त परंपरांनी विनटला आहे; क्षात्र तेजाने तो तळपला आहे; आणि आपल्या धवल कर्तृत्वाने व दातृत्वशीलतेने वर्धमान झाला आहे. त्यात प्रतिबिम्बित होते ते म्हणजे आम्ही भारतीय आहोत, आमचा आत्मा भारतीय आहे, आमचा पिंड भारतीय आहे– आणि येथेच आमच्या एकात्मतेच्या अमरत्वाचा सुगंध आहे.

आध्यात्मिक अधिष्ठानावरून तेजोवर्धित झालेल्या आणि संस्कृतिसंवर्धक नैतिक मूल्यांनी अंकित असलेल्या भारताचे स्थान काही आगळेच आहे. आध्यात्मिक साधना करीत असलेले हिमालयासारखे विशाल व उत्तुंग पर्वत आणि गंगा, सिंधू, तापी, नर्मदा, कृष्णा, कावेरीसारख्या पवित्र सरिता सौंदर्यसंपन्न, प्रतिभासंपन्न व संस्कृतिसंपन्न अशा भारताच्या उज्ज्वल अस्मिता साक्ष देत, महती गात आहेत आणि जणू निक्षून सांगत आहेत– अध्यात्म, साहित्य, संस्कृतींनी नीतिमत्तेच्या पावन भूमीवर खंबीरतेने उभे असलेले तुम्ही वीरपुत्र आहात. तुमच्या अभेद्य तटाला तडा पाडण्याची कोणाची हिम्मत ? – तुमचे मन, तुमचे हृदय, तुमचे ध्येय एक असल्यावर, कोण धजेल तुमच्या एकतेला धक्का द्यायला ?

भारतात वेगवेगळी राज्ये आहेत. एकाच अभंग शरीराचे जणू ते निरनिराळे अवयव. त्यातील रक्तसत्त्वाच्या धमन्या– नाड्या म्हणजे भारतीयांना नवजीवनाचे, नवचैतन्याचे, नवप्रेरणांचे अमृत देणाऱ्या जीवनदायिनीच. पण अलीकडे काही

राज्यांत जे संघर्षाचे, जे सत्तालालसी वृत्तीचे आणि स्वार्थाचे जे प्रकार घडत आहेत ते लक्षात घेतले म्हणजे भारताच्या स्वातंत्र्याला– त्याच्या एकतेला आणि त्याच्या उदात्त परंपरेला केवढी तडा देणारी दुष्टप्रवृत्ती संचारू लागली आहे याचे सम्यक् दर्शन घडून, तीव्र दुःख होते. भारतीय घटनेनुसार लोकशाहीला अशोभनीय, अवांच्छनीय अशी ही मनोधारणा राष्ट्राला कशी उद्धारक ठरणार ?– ते शल्य, ती व्यथा तीव्रतेने जाणवत आहे.

या देशाच्या सामान्य जनतेने आपले प्राण पणाला लावून, आपल्या रक्ताचे सिंचन करून, देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून दिले, त्या सामान्य जनतेला तथाकथित राजकारणी म्हणवणारे नेते कसा उपसर्ग पोचवीत आहेत– राज्यात केवढा कहर करून सोडत आहेत– कसा रंग उधळीत आहेत हे पाहून मोठे वैषम्य वाटते; आणि भारतीय घटना निष्ठेने राबविली न जाता, लोकशाहीला विकृत रूप देण्याचे कार्य केले जात आहे, असे म्हटले तर ते अत्युक्त ठरू नये.

भारतात फुललेली बहरलेली, हिरवीगार शेती म्हणजे श्रमिक भारतीयांच्या घामातून, एकीच्या माध्यमातून निर्माण झालेली, कष्टाचे मूल्य देणारी कामधेनू. त्यात आपपर भाव नाही, भेद नाही. सर्वांसाठी अन्न–वस्त्र सारखेच. ती भाकरी, ते वस्त्र भारतमातेच्या लेकरांना समान हक्काने समानतेने लाभायलाच हवी. राबतो तो उपाशी, अर्धनग्न आणि त्यांच्या बलावर, त्यांच्या श्रमावर मौज उडवतो तो दुसराच ! खेडे रडते आहे नि शहर हसते आहे. ही विषमतेची दशा काय दर्शविते ?– स्वातंत्र्याचा आनंद ?

गेल्या तेहतीस वर्षांपासून आम्ही स्वतंत्र आहोत. लोकशाही पद्धतीने देशाचा कारभार चालवीत आहोत. त्या अनुषंगाने आमच्या राष्ट्रात शांतता व सुबत्ता नांदावी आणि राष्ट्र पुन्हा कीर्तीच्या, वैभवाच्या शिखरावर जाऊन तळपावे, ती सुवर्णभूमी बनावी हे आमचे स्वातंत्र्योत्तरकाळातले सुखद स्वप्न, तेव्हा आजची परिस्थिती लक्षात घेता आमच्या देशाची एकता, आमची कर्तव्ये व अभ्युदय याचा साकल्याने विचार करणे आणि त्या दिशेने पाऊल टाकणे अत्यावश्यक आहे. आम्हाला निःस्वार्थ बुद्धीने नि धवल कर्तृत्वाने आपला दर्जा उन्नत करायचा आहे आणि स्वतः चारित्र्यसंपन्न बनून, देशाला चारित्र्यसंपन्न व बलशाली करणे हेच आमचे आद्य कर्तव्य आहे.

आमच्या या देशात निरनिराळ्या धर्मांचे, जातींचे, पंथांचे व संप्रदायांचे लोक राहतात. निरनिराळ्या भाषा आहेत, निरनिराळे साहित्य आहे, निरनिराळे रीतिरिवाज आहेत. अर्थातच प्रादेशिक भिन्नता आहे. पण त्या बोलभाषांचा, संस्कृतीचा आणि साहित्याचा समन्वय घडवून परस्पर सद्भाव व एकोपा साधणे आवश्यक आहे. आजच्या परिस्थितीत आपसातील विषमता नष्ट करून, एकमेकाची सुखदुःखे विचारात घेऊन सलोख्याने परस्परांना साहाय्य करायला पाहिजे. त्यासाठी

आम्हाला स्वत:लाच विचार केला पाहिजे. आत्मलक्षी होऊन प्रभावी मार्ग काढला पाहिजे. एकतेच्या दृष्टिकोनातून आपली अस्मिता जागृत करून, चिंतन व मनन करायला हवे आणि लोकशाहीच्या सर्वस्पर्शी हितैषी कृती तत्परतेने व दक्षतेने आचरायला हवी. केवळ घोषणा करून, केवळ फतवे काढून जनतेला दिलासा मिळू शकत नाही. तशी कृती प्रत्यक्ष आचरली जाते काय, समजता येते काय, हा प्रश्न आहे. जनतेचा लोकशाहीवरला, स्वातंत्र्याच्या राजकारणावरला विश्वास लोपू लागला आहे. याची तीव्र जाणीव सत्ताधिकाऱ्यांनी व नेतेगणांनी या महर्गतेच्या दुष्काळी पर्वात जातीने लक्षात घेऊन, स्वातंत्र्याच्या मंगलचरणाची बाजू राखली पाहिजे. शासनाची यंत्रणा कशी राबविली जाते, भ्रष्टाचार कसा केला जातो आणि अधिकारीवर्ग एक काही वेगळे दर्शवून जनतेची कशी पिळवणूक करतो हे राज्यशकट चालविणाऱ्यांना उमगले नाही असे कसे म्हणता येईल ? पण त्याचा परिणाम पर्यायाने राष्ट्रावर व एकतेवर कसा अनिष्ट घडत आहे याकडे प्रामुख्याने लक्ष वेधणे आवश्यक आहे.

भारताची सुव्यवस्था आपल्याच हाती आहे. आपणच सूत्रधार आहोत. मग ती टिकविण्याचा प्रयत्न कटाक्षाने आपल्यालाच करायला हवा. अभंग एकात्म भारताला नवीन दीप्ती प्राप्त करून द्यायला हवी. आपल्या राष्ट्रात अनेक राज्ये आहेत. अर्थातच राज्यकारभारात सुनियंत्रण व सुस्थिरता प्राप्त व्हावी म्हणून या राज्यांची निर्मिती झाली आहे. पण आज आपण काय पाहतो, काय अनुभवतो ? भाषेच्या व जातीच्या नावाखाली काही देशद्रोही लोक सामान्य जनांना चिथावणी देऊन भडकावीत आहेत. जाळपोळ, लुटालूट व हिंसाचार हे कशाचे द्योतक आहे ? राष्ट्रसंपत्तीची नासधूस होते हे कोणत्या सामंजस्याचे लक्षण आहे ? आणि म्हणून सुजाण लोकांनी अशा दुष्ट कारवायांना वेळीच पायबंद घातला पाहिजे. विचारवंतांनी लोकहित ध्यानात घेऊन, शांततामय सहजीवनाचा धडा गिरविला पाहिजे. क्षुल्लकशा स्वार्थी बाबींसाठी निर्माण होणाऱ्या फुटीर व बाधक वृत्तीला प्रोत्साहन न देता, तिला आवर घातला पाहिजे. आपण एकाच देशाचे सुबुद्ध नागरिक आहोत, मग आपापल्या विविध प्रश्नांसाठी संघर्ष निर्माण करणारी जिद्द व हट्ट का ? आणि कशासाठी ? आम्ही सामोपचाराने हे प्रश्न सोडवू शकतो आणि आपसातील भेदभाव विसरून, आम्ही भारतीय एक आहोत, प्रबळ आहोत हे सिद्ध करू शकतो.

आमच्या या विशाल देशात निरनिराळ्या संस्कृतीचे लोक आहेत पण या सर्वांची मिळून आमची भारतीय संस्कृती एक आहे. या उदात्त संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी आपण झटले पाहिजे. स्वहितापेक्षा राष्ट्रहित मोलाचे व महत्त्वाचे आहे. अहं नि सोऽहं समजून घेऊन समाजाची नीतिमत्ता राखली पाहिजे. भारतीय उदात्त अध्यात्माकडे व उच्च संस्कृतीकडे पाश्चात्य राष्ट्रे, भारत हा त्या

प्रभावी क्षेत्रातील अग्रदूत म्हणून, अभिमानाने पाहत आहेत. पण आम्ही मात्र पाश्चात्य संस्कृतीचे व साहित्याचे अंधानुकरण करून आपल्या अस्मितेला वगळीत आहोत आपल्या पोषक व तारक नैतिक मूल्यांना डावलून, यंत्रयुगातील आधुनिकतेच्या नावाखाली विकृत व बाधक मनोवृत्तीचे दर्शन घडवीत आहोत.

आम्ही शांततावादी आहोत आणि शांततेने नांदू इच्छितो. याचा अर्थ असा नव्हे की कोणीही आमच्या या भारतभूवर प्रहार करावा आणि तो आम्ही सहन करावा. नराधमांच्या नरडीचाही घोट घेण्याचे सामर्थ्य आमच्या बाहुबलात आहे. भारताच्या शेजारी राष्ट्रांनाही याची जाणीव नाही, असे नाही. पण असाहाय्य, दुर्बल लोकांवर अत्याचार होत असलेले सहिष्णुवृत्तीच्या भारतीय जनतेला पाहवत नाहीत. शेजाऱ्यांच्या आर्त हाकेला ओ देऊन त्यांना मदत करायला धाव घेणे, हा आमचा शेजारधर्म आहे. पण अनीतीच्या मार्गाने जाणाऱ्यावर, जुलूम करणाऱ्यावर जर आम्ही आमची शक्ती एकवटून प्रहार केला नि धडा शिकविला तर ते सत्कृत्यच आहे. भारतीय जनतेला आपल्या प्रभुत्वाची जाणीव देशाच्या स्वातंत्र्य लढ्याच्या बाबतीत भारताने आपल्या प्रकृतिधर्माप्रमाणे जे उज्ज्वल व प्रभावी कार्य केले आणि मानवतेची जी उंची राखली, हे राष्ट्राच्या असामान्य अस्मितेचे तेजस्वी प्रतीक आहे. आम्हाला क्रौर्य नको, शौर्य हवे भारतीय कुणा शेजाऱ्याची करुण हाक ऐकून त्याला आपल्या घासातून घास देतील, पण दुष्टांना आपल्या शौर्याची, वीरश्रीची चमक दाखवून, आपले तळपते तेजही सिद्ध करतील, एवढे सामर्थ्य आमच्या भारतात निश्चितच आहे.

भारतातील युवक म्हणा वा विद्यार्थी म्हणा, हा स्वातंत्र्याचा, एकतेचा, शांततामय सहजीवनाचा उपासक आहे. त्याच्या पाठीशी आध्यात्मिक अधिष्ठान आहे, एक वेगळी शक्ती आहे उद्यासाठी तो उच्च ध्येय राखून आहे; म्हणजेच आजचा हा भारतीय उपासक उद्याचा प्रवर्तक आहे. पण अलीकडे राजकारणाच्या भूमिकेतून तो संघर्षाची जी प्रक्षोभक भूमिका धारण करीत आहे, हे लक्षण मात्र जाणवणारे आहे. ते प्रेरक नाही, बाधक वाटते काही चळवळ्या फुटीर मनोवृत्तीच्या नेत्यांच्या चिथावणीला त्याने भीक घालता कामा नये. युवकांनी राष्ट्रीय वृत्तीने प्रेरित होऊन, आपली शक्ती देशाची घडण प्रभावी व उपकारक करणाऱ्या सत्कार्यात खर्ची घालायला हवी. आपापल्या हक्कासाठी बंदचे नारे लावणे, सत्याग्रह करणे अथवा वाम मार्गाने जाणे उचित वाटत नाही. न्याय्य हक्कासाठी न्याय्य मार्गाने जाणे वेगळे नि संघर्षाने वातावरण प्रक्षुब्ध करणे वेगळे ! संस्कृती, राष्ट्राभिमान, प्रगती त्याच्या दणकट हातांत आहे. तेव्हा त्यात योग्य–अयोग्य काय याचा सापेक्ष दृष्टीने विचार करायला हवा. राष्ट्रीय संपत्तीचे, साधनांचे जतन व संवर्धन करणे त्याच्या हाती आहे. आज जगातील इतर देशांबरोबरच नव्हे तर त्याच्याही पुढची प्रगतीची मजल त्याला दुर्दम्य आशावादाने गाठायची

आहे. युवकांनी वा विद्यार्थ्यांनी आपल्या चळवळीचा जोर, जोष नि जोम विध्वंसक कार्यात नव्हे तर विधायक कार्यासाठी कामी आणून राष्ट्राची अभंगता राखण्यास व राष्ट्रीय वृत्ती दीप्तिमान करण्यास आपली पावले पुढे टाकावीत !

'गरिबी हटाव' असा नुसता उद्‌घोष करून काही गरिबी जाणार नाही. स्वप्रयत्नानेच, कष्टाने काम करून आपली गरीबी हटवू शकू. राष्ट्राचा आर्थिक पाया त्या देशाच्या स्वावलंबीपणावर निर्भरित असतो. दुसऱ्यावर विसंबून राहून भागणार नाही. आलेल्या परिस्थितीवर तोडगा काढून मार्ग काढता येईल. निराश होऊन निष्पन्न काही होणार नाही. देशातच औद्योगिक प्रतिष्ठान उभारून इतरांपुढे लाचारीने मदतीसाठी हात न पसरता आपल्याला श्रमाची कामे केली पाहिजेत. जे आहे त्यातच समाधान न मानता त्याच्याही पुढील यशाचा टप्पा आपल्याला गाठता आला पाहिजे. आपला देश हरित क्रांतीने, धनधान्याने समृद्ध केला पाहिजे. दुर्दैवाने गेल्या एकदोन वर्षांपासून कुठे अवर्षण तर कुठे अतिवृष्टी यामुळे देशाची अन्नसमस्या बिकट झाली आहे वाढती लोकसंख्या आणि बांगला देशातील निर्वासितांना केली गेलेली सहृदय मदत यामुळेही जनतेला दुर्भिक्ष्याची तीव्र झळ पोचत आहे. पण अशाही अवस्थेत न डगमगता सहनशीलतेने काही काळ कळ सोसणे क्रमप्राप्त आहे. ह्यासाठी शासनाला दोष देणे व धारेला धरणे इष्ट ठरणार नाही. उलट, अवर्षण, दुष्काळ यासारख्या परिस्थितीवर मात करून आपली अवस्था सावरण्याचा दूरदृष्टीने प्रयत्न केला पाहिजे.

बेकारीची समस्या आपल्याच राष्ट्रात आहे; असे नाही. तर इतर राष्ट्रांतही आहे. नुसते शिक्षित होऊन, देशातील युवकांनी निव्वळ नोकरीच्या भरवशावर राहता कामा नये. सुशिक्षित बेकार राहण्यापेक्षा स्वप्रयत्नाने स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा यत्न केला पाहिजे. स्वतःचे व्यवसाय काढले पाहिजेत. सरकारही अशा प्रयत्नांना साहाय्यभूत होत आहे. देशाला स्वयंपूर्ण बनविण्यासाठी आवश्यक वस्तूंची, साधनांची निर्मिती जर आपल्याच देशात झाली तर इतरांवर विसंबून राहण्याचे काही कारण नाही. आपल्या शिक्षणाच्या व ज्ञानाच्या सदुपयोगाने अशी प्रगती आपल्याला घडवून आणता आली पाहिजे.

वैचारिक जागृतीशिवाय देशात सुदृढ लोकशाहीची वृद्धी होऊ शकत नाही. लोकशिक्षणाने वैचारिक जागृती निर्माण करता येईल. खेड्यापाड्यातील, डोंगराळ भागातील, वन्य विभागातील लोकांत समाजशिक्षणाने प्रेम निर्माण करून भावनात्मक एकता साधता येईल. शहर आणि खेड्याचा दुवा जोडता येईल. कसेल त्याची जमीन, शिकेल त्याचे शिक्षण आणि घडवील त्याचा विकास साधता यावा. अध्यात्म्याच्या पार्श्वभूमीवर तशा समाजक्रान्तीची आज गरज आहे.

आणखी एका महत्त्वाच्या प्रश्नाचा परामर्श घेणे मला आवश्यक वाटते. या आपल्या देशात अस्पृश्यतेचा एक प्रबळ प्रश्न भेडसावीत आहे. स्वातंत्र्याच्या या

काळातही दलितांवर, बौद्धांवर घोर अन्याय केला जात आहे. दलित स्त्रियांची अमानुष विटंबना केली जात आहे. विविध छळांनी, जुलुमांनी त्यांना जर्जर केले जात आहे. काही ठिकाणी तर अत्यंत अमानुष, अत्यंत लांछनास्पद, अत्यंत निर्घृण प्रकार घडून, राष्ट्राने मान खाली टाकावी अशा घटना घडत आहेत. अशा जातीयतेने, अस्पृश्यतेने राष्ट्र कदापि उन्नत, कदापि विकसित व कदापि बलशाली बनू शकणार नाही. याची तीव्र जाणीव लक्षात घेऊन राष्ट्राला बलशाली, कल्याणकारी बनविण्यासाठी जातीयतेला झुगारून, अस्पृश्यता समूळ नष्ट करून, मानवतेचा उद्घोष करणे आणि सदाचाराने समाजजीवनात मंगलत्व निर्माण करणे हाच खरा दलितोद्धाराबरोबर राष्ट्रोद्धाराचा पावन मार्ग ठरेल.

प्रादेशिकतेची, भाषावादाची, सत्तासंघर्षाची आणि जातीवादाची व न्यूनगंडाची भावना आमच्यात निर्माण व्हायला नको. धर्माधर्मावरून कसला द्वेष नको. जातिभेदाला जराही थारा नको. उच्च-कनिष्ठतेचा कुठे आभासही नको. फक्त हवा एकच मार्ग, तो म्हणजे भारतीयत्वाचा, राष्ट्रीयत्वाचा. त्या उद्धारक मार्गामुळेच आम्हाला अभिमानाने म्हणता येईल-आम्ही सर्व एक आहोत, अस्सल भारतीय आहोत. भारतभूचे वीर वारसदार आहोत.

□ □ □

# ३.

## ठोठवा म्हणजे उघडेल, शोधा म्हणजे सापडेल

अस्पृश्य हे भारताचे वारसदार व संरक्षक म्हणून जसे सिद्ध आहेत तसेच अनेक शतकांपासून त्यांचे हक्क मारले जाऊन त्यांना दुर्बल व हीन बनविण्यात आले हेही सिद्ध आहे. पण आता त्यांचे दोन्ही वाजवी हक्क प्राप्त होण्याचा काळ आला आहे. कारण अस्पृश्यांच्या न्याय्य बाजू सावरल्याशिवाय देशाचे हित साधणे अशक्य होणार आहे. मग कोणी नाक मुरडो, जळफळाट करून घेवो. अस्पृश्य हे वर उठलेच पाहिजेत.

अस्पृश्यता घालविण्यासाठी आज हवे ते प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी कायदाही जारी झाला आहे. परंतु शेकडा पंच्यांशी अस्पृश्यांना समाधान लाभल्याचे दिसत नाही. त्यांना ज्ञान, पैसा व अधिकार पाहिजेत. त्याशिवाय ते समर्थ होऊ शकत नाहीत, पण हे सर्व त्यांना प्राप्त होणार कसे ? त्यासाठी त्यांनी काय करावे ? अशा वेळी मला डॉ. आंबेडकरांनी इ. स. १९३५ साली एका खाजगी बैठकीत काढलेले उद्‌गार स्मरतात: अस्पृश्य कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर होत असलेल्या जुलुमांच्या, दु:खांचा पाढा वाचून अनेक अडचणी जेव्हा त्यांच्या समोर ठेवून विचारले की, आम्ही आता काय करावे ? तेव्हा डॉक्टरसाहेब उसळून म्हणाले, " ठोठवा म्हणजे उघडेल, शोधा म्हणजे सापडेल." पुढे ते म्हणाले, काही करा, काही शिका, काही मिळवा. मागू नका, प्राप्त करा आणि दुसऱ्यापेक्षा आम्ही काही कमी नाही, असे सिद्ध करा. पुन्हा सांगतो, क्षण वाया जाऊ देऊ नका. ठोठावल्याशिवाय घर उघडले जाणार नाही. शोधल्याशिवाय तुमची वस्तू सापडणार नाही."

अमेरिका, ब्रिटन, जपान, रशिया या बलिष्ठ राष्ट्रांचे, दैना नष्ट करण्याचे प्रयत्न लक्षात घेता आपल्या राष्ट्राला दैना नष्ट करण्याची किती तरी आवश्यकता आहे. दैना राष्ट्राला लागलेली कीड आहे व कीड शक्य तितक्या लवकर निघणे अगत्याचे आहे. त्यातून अस्पृश्यता व दैना ह्या दोन्ही गोष्टी राष्ट्राचे अंग अगदीच लुळे ठेवण्याला कारणीभूत आहेत. परंतु असे विवेचताना 'राष्ट्र आज चक्रव्यूहात सापडल्यासारखे आहे व आपण तडकाफडकी असे करा, तसे करा म्हणून ओरडतो, हे समंजसपणाचे नाही,' असे कोणी म्हणेल. परंतु मी स्पष्ट म्हणतो की, पाकिस्तानचे भलतेच लाड पुरवून राष्ट्राला अधिक धोका निर्माण करावयाचा व पाकिस्तानातील जनतेएवढीच अस्पृश्य ही राष्ट्राच्या हृदयाची जनता असूनही त्यांचे वाजवी हक्क व त्यांची सुधारणा रेंगाळत ठेवावयाची हे कितपत समंजसपणाचे आहे ? आज अस्पृश्यांना सावरून, करता येईल तेवढा उपयोग करून घेणे आवश्यक आहे. माझ्यातरी अल्पदृष्टीने राष्ट्राचे पुढील भयावह भवितव्य लक्षात घेऊन आजच्या आपल्या कल्याणकारी सरकारने अस्पृश्यांच्या प्रश्नाकडे प्रथमत: लक्ष पुरवावे व जी उदारता पाकिस्तानसाठी तेवढीच उदारता आपल्या या तितक्याच संख्येत असलेल्या बांधवांसाठी कामी आणून दान सत्पात्री तरी पाडावे.

सरकार अस्पृश्यांकरिता काय करील काय नाही हा प्रश्न वेगळा. पण अस्पृश्य स्वत: काय कमावतात हा प्रश्न महत्त्वाचा आहे. माझ्या मते अस्पृश्यांनी स्वत: समर्थ झाले पाहिजे. ज्ञान, पैसा व अधिकार मिळविले पाहिजेत. पण यासाठी त्यांनी बंड करावे असे नाही. बंड करणे हे त्यांचे कर्तव्य नाही; बंड मोडणे हे आहे. डॉ. आंबेडकरांचा आदेश त्यांच्यापुढे आहे परंतु मला दु:ख होते ते याचे की केवळ जयघोषातच बरेच अस्पृश्य आपले भान विसरून जातात. 'जयघोष' कमाई प्राप्ती करून हवा. डॉक्टरसाहेब सांगतात एक व केव्हा केव्हा आचरले जाते भलतेच ! डॉ. आंबेडकरांनी काय कमावले व कसे कमावले याचा अभ्यास करून दारिद्र्यातही काही साध्य करता येते असे माझे स्वच्छ सांगणे आहे. म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी परिश्रमाने नशीब ठोठवावे व पैश्यासाठी शोधावे, खूप शोधावे. हे ऐकण्यासाठी, वाचण्यासाठी नाही तर करण्यासाठी आहे.

एका गरीब शेतकऱ्याने मरताना आपल्या आळशी मुलांना सांगितले की, त्याच्या बरडाच्या जमिनीत धन गाडून ठेवले आहे ते शोधा. बापाच्या मरणानंतर मुलांनी मोठ्या आशेने त्या शेताचा कोपरा न् कोपरा खणून खणून मऊ केला. पण शेवटी त्यांची निराशाच झाली परंतु अनायासेच झालेल्या शेताच्या मशागतीमुळे पाऊस आल्यावर थोडे काही पेरताच आयुष्यात लाभले नसेल इतके पीक झाले. तेव्हा कुठे मुलांच्या डोक्यात प्रकाश पडला की वडिलाने धन गाडून ठेवले ते हेच ! आपण धनाचा शोध केलाच नसता तर हे कधी लाभले नसते व आपण उपाशीच मेलो असतो ! हे त्यांना उमगले. म्हणून अस्पृश्यांना मी म्हणतो,

बाबांनो, आजच्या अस्पृश्यता–निवारण्याने तुमचे समाधान होत नाही ? तर तुम्ही स्वतः काही मिळवा. निरनिराळ्या संस्था, निरनिराळे उद्योगधंदे, पलटणीत भरती, हाती येतील ते रोजगार भराभर व्यापून टाकायला पाहिजेत. आम्ही दुबळे आहोत असे अस्पृश्यांनी म्हणूच नये. त्यांनी एकमेकांसाठी एकच जालीम मंत्र उच्चारावा.

'ठोठवा म्हणजे उघडेल,
शोधा म्हणजे सापडेल !'

□ □ □

# ४.

## बहुजन समाज
## आणि
## कर्मसिद्धीचा यज्ञ

आपल्याला ‘ स्वराज्या ’चे सुराज्य घडवायचे आहे; म्हणजे आपल्या अंगी राष्ट्रोन्नतीच्या ज्या काही सद्भावना आहेत त्या सर्वांशाने कृतीत उतरावयाच्या आहेत. अर्थात हा ‘ आचार ’ आपल्या दूरगामी पण परिणामी इष्ट व पोषक विचारांच्या व सत्प्रवृत्तींच्या आधारावर अवलंबून आहे. प्रत्येकाला ‘ गृहशोभेची लालसा आहे. त्यासाठी तो नसतील त्या धडपडी, उठाठेवी करीत असतो. पण ‘ राष्ट्रशोभे ’साठी त्याच्या अंगी शक्ती कसाला लावण्याचा मात्र मागमूसही नसतो. वस्तुतः आज आपणा सर्वांवर राष्ट्रशोभेस्तव, त्या वैभवास्तव, त्याच्या सामर्थ्यास्तव उदात्त घडण घडविण्याची विशेष जबाबदारी आहे. तीवरच आपले सत्त्व व स्वत्व राखून, स्वावलंबी व स्वयंपूर्ण जीवन जगावयाचे आहे. परंतु हे सर्व काही, स्वराज्य प्राप्त झाले म्हणजे मी पूर्ण मोकळा झालो, मला काही कर्तव्ये नाहीत, अशा कृतघ्न कल्पनांवर नाही तर, दुःखद, क्लेशकारी, पीडित जीवन कसे सुखद व समृद्ध घडेल; दीनदुबळा भारतीय माणूस मानाने जगून समर्थ कसा बनेल; माझी सोय तशी दुसऱ्याची सोय आहे की नाही; समता, बन्धुत्व व चैतन्ययुक्त जीवन कसे राखता येईल या सत्प्रवृत्ती व सत्प्रकृतिमय गोष्टींवर निर्धारित आहे. ‘ सुराज्य ’ हे अशाच उदात्त व प्रभावी विचारसरणीच्या वसत्कृत्यांच्या प्रात्यक्षिकतेवर निर्भरित आहे हे विसरून भागायचे नाही.

**कर्मसिद्धीच्या यज्ञाचे मर्म**

आज सर्वांना कर्मसिद्धीचे महत्त्व व मर्म उमगले पाहिजे. मला जीवनात काही विशेष करायचे आहे; सत्कृत्य घडवून तारावयाचे आहे; शक्ती जोडून काही

बलवत्तर असे निर्माण करावयाचे आहे अशा प्रबल प्रेरणेने आपल्या ध्येयाच्या निर्धाराची, आत्मविश्वासाची व चिकाटीची सुरुवात होणे अगत्याचे आहे. कर्माचा प्रारंभच केला नाही तर कोणत्याही पुरुषाला नैष्कर्म्यता प्राप्त होत नाही, पुरुषार्थ लाभत नाही. नैष्कर्म्यता म्हणजे निष्क्रियता नव्हे, तर कर्मसिद्धी अथवा संसिद्धी होय.

न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।

कर्मसिद्धीचे उदाहरण द्यायचे झाले तर दातृत्वशील अशा शूर कर्णाचे देता यईल. कर्मसिद्धीच्या यज्ञाचे दाखले द्यायचे झाले तर महात्मा ज्योतीबा फुले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, पुण्यश्लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या असामान्य कर्तृत्वशील व शक्तिशाली महापुरुषांचे देता येतील. भक्ती, शक्ती व बुद्धी आणि सत्कृती यायोगे त्यांनी समाजजीवन उन्नत केले व राष्ट्र प्रगत केले. त्यांच्या बाहूंत प्रबल शक्ती, नेत्रांत विनयता व सौहार्द, शब्दांत बोध–शोध व प्रेरकता आणि हृदयात जनकल्याणकारी सत्कार्यांची पावन ज्योत सातत्याने तेवत होती. अशा कर्मसिद्धीच्या यज्ञाची आपल्या भारतात नितांत आवश्यकता आहे. नजरेने स्वमरण पाहत असताही दुसऱ्याला अभय देऊन तारणारे कर्ण, दधीचीसारखे स्वार्थत्यागी आणि म. फुले, महर्षी शिंदे व पुण्यश्लोक आंबेडकरांसारखे लोककल्याणकारी वीर महात्मे राष्ट्राला हवे आहेत. स्वराज्याचे सुराज्य कर्मसिद्धीच्या उच्च, उदात्त व तारक धोरणावर निर्भरित असणे कोणताही राष्ट्राभिमानी भारतीय मान्य करील व ध्येयदृष्टीने आपले राष्ट्र समृद्धशाली करण्यास, बलशाली बनविण्यास व त्याचे जतन–संवर्धन आणि रक्षण करण्यास आपली खंबीर पावले पुढेच टाकील !

**समाजजीवनातील प्रज्ञाशक्ती**

'क्रांती' या शब्दमंत्राने मानवाचे हृदयपरिवर्तन होऊन त्याच्या प्रकृति–प्रवृत्तीची व कार्याची दिशा अधिक विशाल, अधिक व्यापक व अधिक तेजस्वी व्हावी. दिनांक १४ जानेवारी हा क्षण भारतीय स्वातंत्र्यातील मकरसंक्रांतीच्या क्रांतीचा राष्ट्रोद्धारक असा पवित्र क्षण ठरला पाहिजे. या संक्रमणाने हिंदभू शुचिर्भूत होऊन तिचा कण न् कण पुलकित व्हावा व तो प्रत्येक व्यक्तीच्या विकासाला कारणीभूत ठरावा. त्याबरोबर या संक्रमणाच्या क्षणाला जागून भारतातील हरेक पुत्राला, स्वामी शिवानन्द सरस्वती यांनी येशू ख्रिस्ताच्या 'आपल्या शत्रूवर आपल्यासारखे प्रेम करा. जो तुम्हाला शिवी देतो त्याला तुम्ही आशीर्वाद द्या. जो तुमचा द्वेष करतो त्याचे तुम्ही भले करा आणि जो तुम्हाला दुःख देतो, अत्याचार करतो, त्याच्यासाठी प्रार्थना करा' या तत्त्वाचा संदेश दिला. पण आजच्या या परिवर्तनाच्या काळात, संघर्षाच्या धुमश्चक्रीत असला तत्त्वसंदेश, सहिष्णुतेच्या दृष्टीने कितीही मोलाचा असला तरी, कितपत पचविता येण्यासारखा आहे याबद्दल साशंकताच आहे. वस्तुतः निर्दिष्ट तत्त्वाचे अनुसरण म्हणजे काही शरणागती नव्हे, तो तर मानवतेचा पुरस्कार आहे. पण त्याबरोबर आक्रमकांचीही जहाल मनोवृत्ती व

घातक प्रकृतीही लक्षात घेणे आवश्यक आहे त्या उलट आजच्या समाजधारणेचा व अन्तरंगाचा सूक्ष्म वेध घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भगवान बुद्धाच्या तत्त्वप्रणालीचा सार विशद करताना निक्षून सांगितले, "दु:खितांचे दु:ख नष्ट करणे, भयग्रस्तांना अभय देणे, दुसऱ्याच्या नेत्रांतील तप्त अश्रू आपल्या सौजन्याने व उदार बुद्धीने पुसून, त्यांना आनंदित करणे, समाजजीवनात समता, बन्धुत्व व मानवता यांचा आविष्कार घडविणे हाच खरा मानवी धर्म होय आणि या मानवतावादी धोरणाच्या पुरस्कारार्थ व अंमलबजावणीस्तव समाजक्रांती घडवून आणणे हे मोठे पवित्र कार्य होय." या दृष्टीने आत्मलक्षी होऊन विचार केल्यास बाबासाहेबांनी प्रतिपादिलेल्या समाजक्रांतीत खऱ्या लोकशाहीची व मानवतेची उच्च व उदात्त मूल्ये कशी सामावलेली आहेत हे स्पष्ट होते; आणि आज अशा मानवी मूल्यास्तव हिरिरीने समाजक्रांती घडवून आणणे म्हणजेच समाजकल्याणकारी व राष्ट्रीय भावनात्मक एकतेचा पुरस्कार करणे होय. त्यानुरोधाने, "इतरांनी आपल्यासाठी काय चांगले केले हे पाहण्यापेक्षा आपण इतरांसाठी चांगले काय करू शकतो हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. स्वत:चे जीवन कुस्करले गेले तरी चालेल, पण इतरांचे जीवन मात्र थोडे तरी फुलविता आले पाहिजे." या माझ्या सिद्धान्तानुसार, मानवतेचा नंदादीप सातत्याने तेवत ठेवणे व जनजागृतीची क्रांती घडवून, समाजाला उन्नत व प्रगत करण्यास समर्थ बनविणेच नव्हे तर समाजजीवनात स्वयंबलाची व स्वयंसत्त्वाची प्रज्ञाशक्ती निर्माण करणे होय. 'चित्तशुद्धी' हा या क्रांतीचा अभिप्रेत अर्थ आहे या शुद्धीत राष्ट्रशुद्धीचे मूळ आहे.

**समाजक्रांतीचे तत्त्व व महत्त्व**

इतर पाश्चात्य राष्ट्रांपेक्षा आपले राष्ट्र भिन्न, वेगळे व आगळे आहे. येथील रीतभात, संस्कृती, नीतिमत्ता व आचारविचार काही विशेष आहेत. धर्ममार्तण्ड पूर्वजांनी या देशात ज्या घातुक रूढी, जे बुरसटलेले आचार व जी किडलेली विचारधारा व चालीरीती रूढ केल्यात त्या आता समाजक्रांती घडवून मुळासकट नष्ट केल्याच पाहिजेत; आणि राष्ट्र व समाजकल्याणाच्या पवित्र दृष्टीने, स्वाभिमानाचा, बाणेदारपणाचा आणि कर्तव्यकृतीचा व वीरवृत्तीचा कित्ता गिरवून, आपण आपले राष्ट्र संवर्धित व बलशाली करण्यास वेगाने पावले पुढे टाकली पाहिजेत. भारतीय नागरिक उच्च ध्येयाचा, पवित्र आचारविचारांचा, प्रामाणिक, सच्छील व न्याय्य दृष्टीचा असण्यात राष्ट्राच्या श्रेष्ठतम नीतिमत्तेचा, अस्सल संस्कृतीचा आणि भावनात्मक एकतेचा खरा व उद्धारक विलास आहे. जॉर्ज लाँग नावाच्या एका विद्वानाने, 'नागरिकाचा श्रेष्ठपणा त्याच्या जीवनातील प्रामाणिकपणाच्या सत्यावर व आत्मविश्वासाने सत्कृती आचरण्यावर अवलंबून आहे,' असे मत व्यक्त केले आहे (A man's true greatness lies in the consciousness of an honest purpose in life, founded on a just estimate

of himself and everything else and study of obedience to the rule which he knows to be right. । डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्गारतात, 'we want human rights, peace and justice in the Nation and for the same we must struggle'. प्रत्येक नागरिक या उक्तीनुसार समर्थ होऊन राष्ट्राचे बळ वर्धमान कसे होईल आणि राष्ट्रात समता व बन्धुत्व प्रस्थापित होऊन, राष्ट्र उन्नत कसे घडेल इकडे आपले लक्ष केन्द्रित करील आणि तशी कृती आचरील तर भारत स्वयंतेजाने इतर राष्ट्रांनाही प्रकाशमान करण्यास निश्चितच समर्थ ठरेल, यात संदेह नाही.

**अभिमानाने राष्ट्रगुणगान करता यावे**

आज आम्हाला वाद नको, संघर्ष नको. समतेचे, न्यायाचे व सदाचाराचे पावन धोरण मात्र अवश्य हवे. तेव्हा वादाची व संघर्षाची जराही बाजू पुढे येऊ न देण्याची कृती आचरून कोण कुठे चुकतो हे न पाहता, राष्ट्रहित कसे साधता येईल हे पाहणे व तशी सत्कृती घडविणेच इष्ट आहे. ' अद्य यावत् दृश्यते वाक्यं, शक्तिश्चात्रास्य यावती । तावत्कार्यं नचोपेक्षा युक्ता वैगुण्यशंकया ।।' म्हणजे, ' ज्या वाक्याचा जितका अर्थ दिसतो व जितकी शक्ती दिसते त्याप्रमाणे वागावे, उगीच त्या वाक्यात काही वैगुण्य म्हणजे कमीपणा राहिला आहे, असे मानून त्याची उपेक्षा करू नये,' हे श्रीमाधवाचार्यांचे मत विचारात घेणे उचित वाटते. भारताचे खरे बीज इतरांना उद्धरून आत्मशांती व राष्ट्रशांती करणे आहे आणि म्हणून, उपेक्षेने कसलाही विचार न करता, कुणाची द्वेषभावनेने अवहेलना न करता, अन्नासाठी तडफडणाऱ्या जनतेला धान्याची कोठारे लुटविणारा दामाजीपंत, जीवांना ममतेने कुरवाळणारा एकनाथ, दलितांचे दुःख निवारून त्यांना मानाचे स्थान प्राप्त करून देणारा म. ज्योतीबा फुले व डॉ. आंबेडकर आणि प्रतापी श्री छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या निधर्मी राज्य व एकछत्री स्वराज्य संस्थापकाची व प्रवर्तकांची नितांत गरज आहे. त्या दृष्टीने कसोशीचे प्रयत्न झाल्यास दारिद्रय नष्ट होऊन, आमच्या राष्ट्राने समृद्धशाली राष्ट्र म्हणून अभिमानाने राष्ट्रगुणगान करता येईल.

**हसणारा तो एकच व रडणारा तो एकच**

पण, भारताला स्वातंत्र्य लाभूनही आपण संघटना, शिस्त, प्रेम व प्रामाणिकपणा कृतीत उतरवू शकलो नाही मग आमचा राष्ट्राभिमान तो कोणता ? उलट, स्वातंत्र्यकाळात जे काही तीव्रतेने अनुभवास येते ते काही वेगळेच ! जिकडे तिकडे अंदाधुंदी, भांडवलदारांची मगरमिठी, सत्तेचे आवळते पाश, काळ्या बाजारांचा सुळसुळाट, अस्पृश्यांचा अनन्वित छळ आणि देशसेवेच्या क्लृप्तीने उपभोगिले जाणारे स्वार्थी जीवन ! स्वातंत्र्यातील हे काही सुराज्य नव्हे. अर्थात त्यासाठी कर्मसिद्धीचा यज्ञ घडवून, राष्ट्रात भावनात्मक एकता, सुबत्ता व सुव्यवस्था निर्माण

करण्यास्तव क्रान्तीतून पोषक व फलदायी उत्क्रांती घडली पाहिजे. म्हणून राष्ट्राचा नकाशा नजरेसमोर असावयास पाहिजे; घडामोडीचे सूक्ष्म निरीक्षण व अध्ययन करून राष्ट्रोन्नतीचे हितैषी मार्ग शोधून काढले पाहिजेत. त्यात एकजात कोण रडतो व एकजात कोण हसतो हे शोधून, हसणारा तो एकच व रडणारा तो एकच अशा समभावी, एकात्मतेचा मार्ग निर्मिला पाहिजे.

**जेथे आग तेथे बाग फुलावी**

अशा वेळी, इतिहासाची काही पूर्व पाने अभ्यासली जावीत. त्या दृष्टीने फ्रेंच राज्यक्रांती व रशियन राज्यक्रांती ही इतिहासाची ज्वलंत पाने आहेत. दोन्ही राज्यक्रांतींच्या वेळेला व उत्क्रांतीच्या सुमाराला तेथील जनतेने एकमुखाने उच्चारलेला, 'तुमची ही क्रांती व उत्क्रांतीचे उत्सव हे रोटीवाल्यांच्या भट्टीत जाळून टाका; आमचे समाधान केवळ पोटभर भाकरी मिळाल्याने होणार आहे !' असा टाहो फोडला. असाच टाहो भारतातील बहुजनसमाज, दलित पीडितवर्ग, शेतकरी व श्रमजीवीवर्गांचा आहे. 'पोटभर भाकरी' या दोन शब्दांतच स्वराज्य व सुराज्य याचा अर्थ सामावलेला आहे. पण आपण आता केवळ टाहो न फोडता, राष्ट्रीय वृत्ती राखून एकात्मतेने, सहजीवनाने व परिश्रमाने समाजक्रांतीतून, पोटभर भाकरी, अंगभर वस्त्र, आटोपशीर निवास आणि समतापूर्ण मानाचे स्थान निर्माण करण्यास झटले पाहिजे. जेथे आग आहे ती विझवून, तेथे आता प्रसन्न बाग फुलविली पाहिजे.

**बहुजनसमाजाचा अभिप्रेत अर्थ**

अशा सत्कृत्यांची खरी समाजक्रांती बहुजनसमाज, दलित, बौद्ध, शेतकरी व श्रमजीवीवर्ग हा आपल्या बाहुबलावर, श्रमावर व सत्प्रवृत्त हृदयावर घडवून आणू शकतो. बहुजनसमाज म्हणजे राष्ट्रात पीडित असलेला, दुरावलेला, अज्ञानात लोळत असलेला, जीवन जगण्याच्या विवंचनेत होरपळत असलेला आणि पर्यायाने राष्ट्रकार्यासाठी निरुपायाने वंचित झालेला अशा समुच्चयात बहुसंख्येने एकवटलेला समाज, जात, पक्ष, धर्म, संप्रदाय यांनी बद्ध झालेला समाज म्हणजे बहुजनसमाज नव्हे. काही तज्ज्ञ आपल्या मतलबी वृत्तीने, तशा अर्थाने बहुजनसमाजाची व्याख्या करून, उगीचसे वैमनस्य निर्माण करताना आढळतात. आमच्या राष्ट्रातील जो वर निर्देशिलेला बहुजनसमाज आम्ही मानतो त्यात सेवेच्या व श्रमाच्या मापाने शेतकरी, मजूर, कामगार, दलित असा अवाढव्य वर्ग मोडतो. ज्यांची स्थिती साधारणपणे खाऊन पिऊन सुखी व ऐषआरामी आहे असा समाज आणि त्याहीपेक्षा आपल्या पैशाने, ज्ञान व सत्तेने इतरेजनांना लगाम घालून आपल्या कह्यात ठेवू पाहणारा समाज बहुजनसमाजात मोडूच शकत नाही. या विशिष्ट समाजात विशिष्ट वर्गाचे लोक प्रामुख्याने मोडत असतील व त्यांना बहुसंख्य बहुजन समाजाच्या पुनरुत्थानाचे शल्यही बोचत असेल, त्यांनी बहुजनसमाजाची आपल्या पकडीची कसलीही

व्याख्या करून, सुधारणेचा अथवा पुढारीपणाचा कसलाही पुळका आणला तरी असला डाव न उमगण्याइतका आजचा बहुजनसमाज भोळा राहिला नाही. तो असमर्थ असेल पण शरणार्थी नाही. तो भिकारी असेल पण फेकून दिलेली भाकरी चाटणारा नाही; तो लाचार असेल पण आपली नीती गमावणारा नाही.

**नियतीची चाहूल लक्षात घ्यावी**

अशा दग्ध बहुजन समाजाची सेवा करण्याचे प्रत्येक धर्मातील, प्रत्येक पक्षातील, प्रत्येक जातीतील समर्थ इसमाचे आद्य कर्तव्य आहे. पण तसे काही घडत नाही; उलट पीडितांचा, दलितांचा छळच होत आहे. परिस्थिती चितारून सत्पथ दाखविणारा ज्ञानेश किंवा एकनाथ; सेवाधर्म स्वीकारून सेवेचे मोल स्पष्ट करणारा चोखोबा किंवा तुकोबा, बहुजनसमाजाची केवळ सोयीची व्याख्या करून कर्तव्यकर्म करीत बसला नाही. आपल्यासारखे इतरांचे आत्मे आहेत, त्यांनाही भावना आहेत पण ते विव्हळत आहेत; त्यांना मानवी धर्माने आंजारून गोंजारून सुखशांती देण्याचे पुण्यकार्य करावे, याचेच नाव ' सेवा ', हाच मनुष्याचा जीवित धर्म याच व्यापक व सत्प्रेरक अर्थाने त्यांनी स्वत: प्रहार सहन करून बहुजनसमाजाची सेवा केली, पूजा केली. त्या काळी आपले राष्ट्र परतंत्र होते, आज स्वतंत्र आहे. बहुजन-समाजाच्या उद्धारास्तव, उन्नतीस्तव ज्या पूर्वजांनी, ज्या पुण्यश्लोकांनी सत्कार्य केले व मानवीधर्म आविष्कृत केला त्या थोरांचे पुण्यस्मरण करून, या स्वातंत्र्योत्तर-काळात राष्ट्रवंचित असलेला, अडाणी व अज्ञानी असलेला, पीडिला जाणारा बहुजनसमाज, होईल त्या उपायाने, करता येईल त्या मार्गाने, घडविता येईल त्या सेवेने समर्थ करून, आपले राष्ट्र अभेद्य, बलशाली व समृद्धशाली घडविले पाहिजे. पण त्याबरोबरच बहुजनसमाजाने आता आपल्या उद्धारास्तव अथवा प्रगतीस्तव परावलंबी न राहता, काळाची चाहूल, नियतीचा भविष्यसंकेत वेळीच लक्षात घेऊन, स्वसामर्थ्याने व स्वयंस्फूर्तीने बलवत्तर झाला पाहिजे.

**बहुजन समाजाचे मूल्यमापन**

साधारणत: बहुजनसमाजाच्या व्याख्येचे मूल्यमापन करण्याचे गमक तसे सोपे आहे. आगगाडीच्या तिसऱ्या डब्यात अथवा चित्रपट किंवा नाटकगृहाच्या तिसऱ्या श्रेणीत बसणारा जो वर्ग तो बहुजनसमाज. जात, धर्म, पक्ष पाहून काही कोणी या वर्गात बसत नाही वा बसविला जात नाही. पण, पहिल्या वर्गात बसणारा संपन्न वर्ग उपहासाने व अहंकाराने उद्गारतो, ' काय तिसरा वर्ग, तिसरी श्रेणी ! After all it is third class. All third class people are there ! ' आणि म्हणूनच या उपहासाचे व अहंकाराचे मर्म लक्षात घेऊन महात्मा गांधीजींनी प्रवासात तिसऱ्या वर्गातील डब्यात बसण्याचे आणि भंगी कॉलनीतच उतरण्याचे का ठरविले ते उलगडते. अशा वेळी मला बहुजनसमाजासंबंधी विश्वकवी रवीन्द्रनाथ टागोर यांनी एका प्रसंगी उच्चारलेले मार्मिक शब्द स्मरतात ते उद्गारतात–

'I can see very few in first rank...but am in dark for the nation !' म्हणजे, 'पहिल्या रांगेत कोण झळकतात ते मी पाहू शकतो ... परंतु मी राष्ट्रात नाही, अंधारात आहेसे वाटते !'

**साहित्यकारांची जबाबदारी**

अशाप्रकारे तृतीय श्रेणीत मोडणाऱ्या, अंधारात तडफडत–चाचपडत असलेल्या, दलित असलेल्या व जर्जर झालेल्या बहुजनसमाजाची सेवा आत्मीयतेने घडावयास हवी. हृदय स्वच्छ ठेवून सेवेची खरी तळमळ व कळकळ पाहिजे. त्या वेळी कोण कुठला, कोण कोणाचा असा भेद नसावा. उद्याचे तेजोमय प्रभावशाली स्वयंपूर्ण राष्ट्र याच बहुजनसमाजाच्या उन्नतीवर अवलंबून आहे, त्याच्याच बाहुबलावर व श्रमावर राष्ट्राचे जतन व संवर्धन आणि रक्षण निर्भरित आहे. प्रत्यक्ष कृतीबरोबर लेखणीनेही त्यांची मने जागृत करून, त्यांना उत्तेजन दिले गेले पाहिजे. आज अनेक प्रकारचे वाङमय प्रसृत होत आहे; पण त्यात बहुजनसमाजाच्या जीवनाचे व कर्तृत्वाचे चित्र मात्र रेखाटलेले नसते. त्यांना आपल्या सामर्थ्याचे प्रतिबिंब, आपल्या वाङमयनिर्मितीच्या शुद्ध व स्वच्छ आरशात न्याहाळता येऊन; 'एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ' अशा स्वरूपात त्यांचा राष्ट्राभिमान प्रज्वलित झाला पाहिजे. अशी सेवारूपी लेखणी कामी आणण्यास कवींनी, पत्रकारांनी व साहित्यकारांनी आणि इतिहासकारांनी अहमहमिकेने पुढे सरसावले पाहिजे. त्यामुळे त्यांना कदाचित सवंग बाजार साधता येणार नाही पण जनमन जिंकून, हृदय मात्र साध्य करता येईल हे खास.

**कर्मसिद्धीचा यज्ञ फलद्रूप व्हावा**

रामराज्य प्रस्थापनेच्या प्रसंगी यज्ञ केला गेला पण तो कर्मसिद्धीचा यज्ञ नव्हता, तर तो राजसत्तेचा होता. त्यात बहुजनसमाजाचे उत्थान होणारे बीज नव्हते, तर केवळ आपल्या प्रभुत्वाचे बिंब होते. त्यात जनसेवेचा उद्धारक प्रवाह नव्हता, तर स्वतःच्या तेजाचा नगारा होता. रामराज्यात जीवनात 'राम' असल्याचे लोकराज्य नव्हते तर ते एका सत्ताधिकाऱ्याचे राज्य होते. आज आम्हाला; राष्ट्रोद्धारक कर्मसिद्धीची नितांत आवश्यकता आहे; त्याग, निष्ठा, प्रेम व सहिष्णुता वृद्धिंगत करून समतेचा व मानवतेचा पुरस्कार हवा आहे. कोणी मला काही देईल म्हणून नव्हे, तर ते माझे आद्य कर्तव्य आहे, 'मी मरेन पण माझा बांधव मी तारीन, मी माझे राष्ट्र तारीन' या स्वाभिमानाने व बाणेदारपणाने तो समाजात तळपला पाहिजे. त्याचप्रमाणे विषमतेच्या व जातिभेदाच्या जाळ्यात गुरफटलेल्या मानवतेची सुटका करून, म्हणजे, विषमतेचे व जातिभेदाचे पोट चिरून, 'मानवतेचा सत्पुरुष' या राष्ट्रात जन्माला आला पाहिजे. त्याबरोबरच अन्नवस्त्राचा, संपत्तीचा व अधिकारांचा समाजातील सर्व थरांना समानतेने व न्यायाने वाटा मिळून, त्यांना जगण्यात 'जीवन' आहे याचा प्रत्यय यावा आणि त्या

प्रत्ययाने त्यांनी आपले राष्ट्र प्रगत, संपन्न व बलवत्तर करण्यास हिरिरीने आपली पावले पुढे टाकण्यास समर्थ बनावे. त्यासाठी आता बहुजनसमाजात कर्मसिद्धीची नितांत गरज आहे. या यज्ञाच्या खडतर कर्तव्यास्तव आम्हाला स्वयंबलाने व स्वयंस्फूर्तीने आपल्या पूर्ण शक्तीचा कस लावला पाहिजे. त्यादृष्टीने आत्मविश्वास, मनोधैर्य व जिद्द (ध्यास) राखून, प्रथमत: 'आपन्नार्तिप्रशमनफला: संपदो ह्युत्तमानाम्' या हितैषी सूत्राने पावले पुढे पडावीत; आणि आता, बहुजनसमाजाने, दलितांनी व बौद्धजनांनी कर्मसिद्धीच्या यज्ञाचे जळते कंकण हाती बांधून विडा उचलावा आणि तो फलद्रूप करून दाखविण्यास त्यांनी स्वयंतेजाने पुढे धाव घ्यावी.

□ □ □

# ५.

## पं. राहुल सांस्कृत्यायन : एक अभ्यास

एकदा नागपुरात एक महत्त्वाचा समारंभ घडून आला. तो म्हणजे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे महापंडित राहुल सांस्कृत्यायन यांचा राष्ट्रभाषा प्रचार समितीने केलेला सन्मान. केवळ एक अपघात म्हणून मी तिथे उपस्थित होतो. खरे म्हटले तर मला एका अर्थी फार आनंद वाटला अन् दुसऱ्या अर्थी वाईटही वाटले. आनंद झाला तो अशासाठी की, जमलेल्या मंडळीत मराठी भाषिकांची संख्या निम्म्याने होती आणि त्यातही जुन्या–नव्या पिढीतले साहित्यभक्त होते. आता त्यांच्यातही कुणी माझ्यासारखाच ' वाट चुकून ' आला होता की काय हे मला माहीत नाही ! (हो, पुष्कळ वेळा अशा समारंभांना उपस्थित असणे हा एक शिष्टाचारच होऊन बसला आहे, त्याला इलाज नाही. असे असले तरी उपस्थित असलेल्या मंडळीचे मला खरोखर अभिनंदन करावेसे वाटते. कारण चार चांगले विचार कानावर आल्यापासून फायदा होण्याची शक्यता अधिक.)

वाईट वाटते ते अशासाठी की आणखी किती तरी श्रोते समारंभास यायला हवे होते, ते आले नाहीत म्हणून. एका अर्थी समितीच्या लहानशा जागेतच हा कार्यक्रम झाला हे ठीक झाले. ' दिवाणखाना श्रोत्यांनी फुलून गेला होता ' असे म्हणण्याची सोय झाली. समजा, विश्वविद्यालयाच्या कॉन्व्होकेशन हॉलमध्ये हा समारंभ झाला असता तर नागपूरकरांची ' शोभा 'च झाली असती ! जमलेल्या मंडळीत जिज्ञासू वृत्तीचे लोक मात्र होते

समारंभाचा एकंदर वेळ लक्षात घेता संचालकांनी परिचयाचे पाल्हाळ

जरा आखडते घेतले असते तर बरे झाले असते. परिचय कुणाकुणाचा करून द्यावयाचा याची संचालकांनाच कल्पना नसावी. हा कंटाळवाणा विधी आटोपल्या-वर काही बोधक प्रश्नोत्तरे झाली.

प्रश्नोत्तरात राष्ट्रभाषा, शिक्षण, भाषाशास्त्र, धर्म, साहित्य या विषयांवर पंडितजींनी चांगलाच प्रकाश टाकला. त्यांनी सांगितलेल्या एकेक 'सत्यकथा' मला तर 'नवलकथा'च वाटल्या. रशियन भाषा ही संस्कृत भाषेला सर्वात जवळची भाषा आहे, असे जेव्हा पंडितजींनी 'तत्त्वमसि' या वचनाचे रशियन भाषेतील परिवचन सांगून सिद्ध करून दाखविले तेव्हा काहींना तर आश्चर्यच वाटले असावे ! ते जेव्हा म्हणाले की, रशियातील प्रत्येक विभागात बोलली जाणारी भाषा हीच त्या विभागाची राष्ट्रभाषा आहे, तेव्हाही तसलाच धक्का बसला असावा ! विभागीय भाषेव्यतिरिक्त रशियन भाषा बहुतेक सर्वांना येते आणि ज्या थोडयांना ती येत नाही त्यावाचून त्यांचे काही अडतही पण नाही असेही त्यांच्या बोलण्यात आले. आमच्या इथे मात्र इतर भाषेची गळचेपी केल्या-खेरीज हिंदी ही राष्ट्रभाषा व्हायची नाही अशी साधार भीती वाटू लागली आहे. पण यात कोणी कोणाला दोष द्यायचा ? आईची अवहेलना तिचा मुलगाच करू लागला तर इतरांना दोष देण्यात अर्थच काय ? द्रव्यार्जनाखेरीज इतर क्षेत्रातली उदासीनता जेव्हा नाहीशी होईल तोच सुदिन म्हणावयाचा.

रशियातील साहित्य आणि तेथील लेखकसंघाविषयीची त्यांनी सांगितलेली माहिती ऐकून मी सर्दच झालो ! खरोखरच, लेखनकलेची जिवंत बीजे असलेल्या प्रत्येकाला रशियात वाव आहे. आमच्या देशात मात्र एखादा प्रकाशक हाताशी असावा किंवा हाताशी पुरेसे भांडवल असावे, किंवा परिचयाचे जाळे पसरविण्याची कला अवगत असावी म्हणजे एक दोन लेख छापून यायला हरकत नाही आणि लेखक म्हणून मिरवायला एवढे भांडवल पुरे. गुळमुळित अभिप्राय हा वस्तुत: लेखकाला मारक पण त्यामुळे फाजील प्रोत्साहन मिळून नकली लेखनकलेची साथ फैलावत आहे. प्रकाशकाला प्रकाशनखर्चाला मदत (म्हणजे जवळ जवळ पूर्ण खर्च) करावी म्हणजे लेखकाचे पुस्तक बाहेर पडलेच म्हणून समजा आणि आपल्या नावावर कसे का होईना, एक पुस्तक लागले म्हणजे स्वर्गाला हात पोच-लेच अशी लेखकाची भावना ! पण याला जबाबदार आमच्या येथील परिस्थिती. आता ती बदलावी कुणी आणि कशी हाच मुख्य प्रश्न आहे ! एखाद्या चित्रपटावर निर्भय रीतीने अभिप्राय द्यावयाचे संपादकाने मनात आणले तर त्याची जाहिरा-तीची रसद तोडण्यात येते. म्हणजे आपोआपच त्याच्या नाड्या आखडतात, आणि जाहिरातीच्या मुखलेपनाने मृदंगातून 'मधुरध्वनी' येणार हे निश्चित ! लेखक-संघामार्फत उदयोन्मुख लेखकाला मिळणाऱ्या सोई–सवलती अगदी हेवा वाटण्या-जोग्या वाटल्या. अर्थात अट एकच की लेखक खरा असावा, नुसता नामधारी नव्हे !

वयाच्या सातव्या वर्षापासून शिक्षणाला सुरुवात करून दहा वर्षांत रशियन तरुण चांगल्या वर्तमानपत्राच्या संपादनाला योग्य होतो हे ऐकून मला नवल वाटले. त्याचप्रमाणे तिथे एम्. ए. पर्यंत युनिव्हर्सिटीची डिग्री नाही ही पण एक अजब गोष्ट वाटली ! ' अहंगंड ' निर्माण होऊ नये म्हणून ही सोय केली की काय कुणास ठाऊक ! आमच्याकडे तर नावाच्या उल्लेखाच्या वेळी (अगदी कृतज्ञतेचे चार शब्द लिहीत नाही) आपल्या नावापुढे डिग्र्यांची बिरुदावळी मिरविणारे महाभाग आहेत ! डॉक्टरेटचा लाभ हीच तिथली पहिली मानाची फीत. तिकडील परीक्षा तीन परीक्षकांकरवी तोंडीच घेतल्या जातात आणि एकूण गुण पाचच. त्यापैकी तीन मिळविले की विद्यार्थी उत्तीर्ण समजतात. श्वसनाइतकेच लष्करी शिक्षण पुरुषाला आवश्यक. सहशिक्षणाची पद्धत अशी की, ४ ते ७ आणि नंतर सतराव्या वर्षापासून पुढे त्याच काळात सहशिक्षण दिले जाते. शेकडा नव्वद मुले तर सरकारी खर्चानेच रशियामधील कुठल्याही ठिकाणी शिक्षण घेऊ शकतात. बाल-वयातच मुलाच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा शोध घेऊन ज्या कलेकडे त्याचा नैसर्गिक ओढा असेल तिकडे जाण्याची सोय आहे. केवळ आजकाल वैद्यकीत चांगला पैसा मिळतो तेव्हा आपण वैद्य व्हावे अथवा आपल्या मुलाला वैद्य करावे असा दुराग्रह धरण्याचे काहीच कारण नाही. सर्वसाधारण मुलगा ठराविक मर्यादेपर्यंत शिकला की त्याने पुढे काय शिकावे हे तो व त्याचे आईबाप ठरवतात. उच्च शिक्षण घेणाऱ्याला त्याची वैभागिक व रशियन याशिवाय आणखी दोन भाषा शिकाव्या लागतात कारण त्यामुळेच इतर देशांतील नवसंशोधन अथवा घडामोडीचा परिचय होऊ शकतो.

' लेखकाला रशियात मतप्रदर्शनाचे स्वातंत्र्य आहे काय ?' या प्रश्नाला राहुलजींनी मजेदार उत्तर दिले. प्रश्नाचा खरा रोख ओळखून ते म्हणाले, ' जी राज्यव्यवस्था शेकडा नव्वद लोकांच्या हितार्थच आखली गेली आहे तिथे राजकीय विरोधाचा प्रश्न उद्‌भवतच नाही; आणि त्यातूनही विरोध प्रकट करावयाचा झाल्यास पोलिसांची मदत घेऊन करावा लागेल. इतर क्षेत्रांतील विरोधकाला मुभा आहेच. वैयक्तिक असे छापखाने मुळी नाहीतच अशी तिकडील व्यवस्था आहे.

तिकडील चर्च आणि धार्मिकतेसंबंधी त्यांनी जेव्हा सांगितले की इंग्लंड-मधील चर्चमधून अधिक गर्दी आढळते तेव्हा ऐकणाऱ्यांना मौज वाटली असावी. परंतु धर्मासंबंधी वेडगळ अशा समजुती मात्र आता तेथे नाहीत, असे ते म्हणाले.

रशियातील चित्रपटांनी रंगभूमीवर आक्रमण केले नाही एवढेच नव्हे तर रशियन नाटयकला दिवसेंदिवस प्रगतीवरच आहे. जिथे एक नाटयगृह होते तिथे आता वीस-वीस नाटयगृहे आढळतात आणि नाटकाचे दर सिनेमाच्या दरापेक्षा पुष्कळ अधिक असूनही महिना–महिना तिकीट आधी काढावे लागते. तिकडील

रंगभूमीशी अथवा चित्रपटसृष्टीशी तुलनाच करता येत नाही. प्रश्न गुणवैशिष्टयाचा असतो. कोणत्याही गोष्टीच्या साध्यासाठी वैचारिक ध्येयाची गरज असते. कोणतीही कृती वास्तवदर्शी असावी आणि ती प्रभावी ठरावी म्हणजे प्रगतीचे मूल्यमापन करता येते.

□ □ □

---

साप्ताहिक, 'सचिव' : २२-१२-१९५०.

सर्ग ५

# आजच्या दलित साहित्यातील काही अन्तःप्रवाह

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साहित्यसाधना.

२. डॉ. आंबेडकरांच्या अमरत्वाचा सुगंध.

३. आजच्या विद्रोही साहित्याचे काही संकेत.

४. गीतामायच्या सावलीत.

# १.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साहित्यसाधना

केवळ मनुष्यजीवनातच नव्हे तर समाजजीवनात आणि राष्ट्रीय जीवनात साहित्याला अनन्यसाधारण स्थान आहे, त्याला विशेष महत्त्व आहे, राष्ट्राचे ते फार मोठे मानधन आहे. साहित्य हे मनुष्यमात्राच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या विविध अंगोपांगांचे स्वच्छ व स्पष्ट दर्शन घडविणारे विशाल व अद्‌भुत दर्पणच होय. समाजाच्या व पर्यायाने राष्ट्राच्या कमी अधिक उंचीचे–दर्जाचे, कमीअधिक प्रतिष्ठेचे, कमीअधिक धर्मकर्तव्याचे, कमीअधिक नीति–संस्कृतीचे, कमीअधिक वीरश्रीचे व कमीअधिक पापपुण्याचे मापन करणारे सर्वस्पर्शी साधन आहे राष्ट्रीय, धार्मिक, नैतिक, सांस्कृतिक, तात्त्विक, शास्त्रीय, सामाजिक व वाङ्मयीन मूल्ये त्या साहित्यदर्पणाद्वारे प्रतीत होतात, प्रतिबिम्बित होतात. त्यावरूनच राष्ट्राची अस्मिता सिद्ध होत असते. आपल्या मौलिक ग्रंथसंपदेने तशी उच्च मूल्ये प्रकर्षाने प्रतीत करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे श्रेष्ठ साहित्यिक होते.

काव्य, नाटच, कथा, कादंबरी आणि विदग्धादी वाङमय म्हणजेच काही साहित्य नव्हे. साहित्यमंदिरातील ते ललितवाङमयाचे एक दालन आहे, केवळ एक कक्षा आहे. शारदेच्या परिसरातील ललितसाहित्य ही एक मनोहारी फुलबाग आहे; तिच्या प्रांगणातील ती सुबक व वेधक रांगोळ्यांची आरास आहे, सुंदर कलकृती आहे; तर साहित्यमंदिरातील ध्येयवादी व विचारप्रवण साहित्य, शारदेचे सर्वश्रेष्ठ लेणे आहे, उंची अलंकार आहे. हे वैचारिक साहित्यच तिच्या पूजारतीतील ज्ञान, बुद्धी व शक्तीची प्रेरक व पावन

ज्योत आहे. डॉ. आंबेडकरांनी आपल्या दीर्घ तपस्येने अशी ज्ञान, बुद्धी व शक्तीची मंगल ज्योत प्रज्वलित केली आहे.

सरस्वती ही ज्ञान, बुद्धीची उपास्य देवता. साहित्य–शास्त्र, कला–संस्कृती, संगीत–नृत्यादीची अधिष्ठात्री. नवरसांनी व सप्तस्वरांनी रंजन व आनंद प्रदान करणे हा एक तिचा स्थायीभाव असला तरी बुद्धियोग व ज्ञानबोध हा तिचा मूळ पिंड. जनकल्याणकारी साहित्यनिर्मितीची ती शक्ती. जीवनात उद्धारक पावले उमटवीत जाणारी ती आदिमाया. चराचर सृष्टीत शुचित्व व मांगल्य प्रस्थापित करणारी ती दिव्य प्रकृती. श्री आणि शारदेच्या साहित्यसाधनेच्या रूपकात्मक प्रकृती व प्रवृत्तीसंबधी श्री ज्ञानेश्वर भाष्य करतात :

आता अवधारा कथा गहन । जे सकळां कौतुका जन्मस्थान ।
की अभिनव उद्यान । विवेक–तरूंचे ।।

ना तरी सर्व सुखाची आदि । जे प्रमेयमहानिधि ।
नाना नवरस सुधाब्धि । परिपूर्ण हे ।।

की परमधाम प्रगट । सर्व विद्यांचे मूळ पीठ ।
शास्त्राजाता वसौट । अशेषांचे ।।

ना तरी सकळ धर्मांचे माहेर । सज्जनांचे जिव्हार ।
लावण्य रत्न भांडार । शारदेचे ।।

तेवींचि आइका आणिक एक । एथूनि शब्दश्री सच्छास्त्रिक ।
आणि महाबोधी कोवळीक । दुणावली ।।

एथ चातुर्य शहाणे झाले । प्रमेय रुचीस आले ।
आणि सौभाग्य पोसले । सुखाचे एथ ।।

का सुक्षेत्री बीज घातले । ते आपुलियापरी विस्तारले ।
तैसे भारती सुखाउले । अर्थ जात ।।

हे सारस्वताचे गोड । तुम्हीचि लाविले झाड ।
तरी अवधानामृते वाड । सिंपौनि कीजे ।।

मग हे रसभावफूली फुलैल । नाना फलभारे भरैल ।
तुमचेनि प्रसादे होईल । उपयोगु जगा ।।

शारदास्तवन करताना स्वामी रामदास, साहित्याची दिशा व मार्ग दर्शवितात–

जे अव्यक्त पुरुषाची व्यक्ती । विस्तारे वाढली इच्छा शक्ती ।
जे कळि–काळाची नियंती । सद्‌गुरुकृपा ।।
जे परमार्थ–मार्गीचा विचार । निवडून दावी सारासार ।
भवसिंधूचा पैल पार । पाववी शब्दबळें ।।

ऐसी बहुवेषे नटली । माया शारदा येकली ।
सिद्धचि अंतरी संचली । चतुर्विधा प्रकारें ।।
तीहि वाचा अंतरी आले । ते वैखरिया प्रगट केले ।
म्हणोन कर्तृत्व जितुके आले । ते शारदागुणे ।।

आणि भगवंताचे अधिष्ठान नमूद करताना ते अंतरीचा भाव स्पष्टपणे व्यक्त करतात–

उपासना म्हणिजे ज्ञान । ज्ञान पाविज निरंजन ।
योगियांचे समाधान । येणे रीती ।।...
सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयांचे ।
परंतु येथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।।

साहित्याच्या अशा या ज्ञानस्वरूपाचे सर्वस्पर्शी महत्त्व विचारात घेतले म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या साहित्यसाधनेची क्रिया आणि प्रक्रिया स्पष्ट होऊन,

' ऋचं वाचं प्रपद्ये । मनो यजुः प्रपद्ये ।
साम प्राणं प्रपद्ये । चक्षुः श्रोत्रं प्रपद्ये । '

ऋग्वेदरूपी वाणीचा, यजुर्वेदरूपी मनाचा आणि सामवेदरूपी प्राणाचा आविष्कार त्यांनी समन्वयात्मक रीतीने घडविला; आणि त्या तीन तत्त्वांचा म्हणजे ज्ञान, कर्म व समत्वबुद्धी, आपल्या साहित्याद्वारे जनकल्याणार्थ पुरस्कृत केली, याचा प्रत्यय येतो.

डॉ. आंबेडकरांचे साहित्य तळ्याच्या पोटी जन्माला आलेले सुंदर कमलपुष्प नाही; ते ज्ञानसागराच्या पोटी जन्माला आलेले मूल्यवान रत्न आहे. कमलपुष्प क्षणभर मनाला भुरळ घालील, क्षणभर सुगंध देईल; मग ते कोणी हुंगून भिरकावून देईल. पण मूल्यवान रत्न आपल्या तेजाने नेत्रांना दिपवील, ते आपला किमती उच्च दर्जा दर्शवील; मग ते कोणीही उद्या कामी यावे म्हणून सदैव आपल्याजवळ दक्षतेने जतन करून ठेवील. प्राचीन काळच्या वेद, उपनिषदे, शास्त्रे आदी साहित्यग्रंथांप्रमाणेच डॉ. आंबेडकरांचे ग्रंथ आधुनिक यंत्रयुगाच्या काळात काही वेगळेच वैशिष्टय राखून जीवनाला दिशा व गती देण्यास समर्थ आहेत. त्यांच्या साहित्यसाधनेत अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र तत्त्वज्ञानशास्त्र, राज्यशास्त्र, दर्शनशास्त्र व धर्मशास्त्र अशी मानव, समाज व राष्ट्र उन्नत करणारी सप्त अंगे अलंकृत झाली आहेत. जीवनसाहित्यातील त्या सप्त अमृतधारा आहेत.

प्राचीन काळी कथा–काव्याच्या कल्पनासृष्टीतून जे जग चित्रित करण्यात आले त्यातून नंतर धर्म, अर्थ, राज्य, समाज, तत्त्वज्ञान, तर्क, सांख्य आदीसंबंधी ग्रंथनिर्मिती झाली व तेच जीवनसाहित्य म्हणून त्या वेळच्या ऋषि–महामुनींनी व

शास्त्रीपंडितांनी पुरस्कृत केले असे आढळून येते. व्यासांचे महाभारत व वाल्मीकीचे रामायण आदी कथा–काव्यांतून विविध प्रकारची भाष्ये केली गेलेली साहित्य-ग्रंथावली उदित झाली व ती विस्तारली गेली. कविकुलगुरू कालिदास यांच्या कथा–काव्याचे जगही असेच कल्पनासृष्टीतून व स्वप्नसृष्टीतून निर्माण झाले आहे. ते ऐतिहासिक व वास्तवदर्शी नाही; पण ज्ञान, बुद्धीला खाद्य पुरवणारे मात्र ते साहित्य आहे. त्यात रंजकता आहे व बोधकताही आहे. डॉ. आंबेडकरांचे साहित्य कथा–काव्याच्या कल्पनासाम्राज्यातून अथवा स्वप्नसृष्टीतून आविष्कृत झालेले नाही; ते तर आधुनिक काळातील प्रत्यक्ष जीवन जगण्याच्या व प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनांच्या आणि प्रसंगांच्या वास्तवतेतून प्रकाशमान झाले आहे. इतिहासाचे ते तर प्रभावी पुरावे आहेत. त्यात दोन घडीची मौज म्हणून रंजनवाद व भोगवाद नाही तर त्यात उच्च जीवनमूल्ये सिद्ध करणारा ध्येयवाद, बुद्धिवाद व प्रखर युक्तिवाद आहे.

या विसाव्या शतकातील आजच्या मध्यकाळाच्या सामान्यत: पावशतकापूर्वी म्हणजे इ. स. १९४० सालापूर्वी जे ललितसाहित्य महाराष्ट्रात निर्माण झाले त्यात काही प्रमाणात मनोरंजन होते, सात्त्विक आनंद होता, बुद्धीला गती मिळू शकत होती. लालित्याच्या कक्षांबरोबर ध्येयनिष्ठेची क्षितिजे दर्शविली जात होती. जीवनातील वास्तवता घटनानुकूल चित्रित केली जात होती. हरिभाऊ आपटे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, ज्योतिबा फुले, लोकहितवादी, मोरोपंत, न. चिं. केळकर, वा. म. जोशी, खाडिलकर, देवल, कोल्हटकर, केशवसुत, सानेगुरुजी, गडकरी प्रभृती कथा–काव्य–नाटचादी क्षेत्रांतील ललितलेखकांनी महाराष्ट्राचा साहित्य व संस्कृतिविषयक दर्जा उच्च राखण्याचा प्रयत्न केला होता. आपल्या प्रारंभीच्या काही काळात प्रा. ना. सी. फडके, श्री. वि. स. खांडेकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. प्र. के. अत्रे, प्रा. अनंत काणेकर प्रभृती ललितसाहित्यकारांनीही साहित्याची ती बूज काही मर्यादेत राखली होती. पण नंतर ललितवाङ्मयाचा दर्जा घसरू लागला. ध्येयवादापेक्षा भोगवादावर ललितलेखक भर देऊ लागले. स्वस्त बाजाराकडे त्यांची पावले वळू लागली. मनोविश्लेषण व प्रतिमा आणि प्रतीके या शब्दांच्या नावाखाली त्यांची लेखणी विकृत रूप धारण करू लागली. हलकेफुलके ललितवाङमय निर्माण होऊ लागले. कालचा उच्च दर्जा आज उरला नाही. आज तर ललितसाहित्य, आमच्या घरी खंडीभर गाई सकाळी उठून काहीच नाही, अशा भासमान नभोमंडळातील मोहक तारांगणाची केवळ शोभा आहे; कल्पनासागरात स्वच्छंदतेने, 'बोल राधा बोल संगम होणार का नाही,' असे उत्तान प्रेमगीत गात जाणारी स्वैर मुक्तछंदी नौका आणि स्वप्नसृष्टीतील मदमस्तीच्या यौवनाने रसरसलेली कामनापूर्तीची अप्सरा आहे. आमचा ललितलेखक पाश्चात्य साहित्यसामग्रीच्या, तेथील विलासी जीवनाच्या व संस्कृतीच्या

पदराआड दडून, आपल्या मोहमयी नेत्रनियंत्रणेत रेशमी हाताने नॉयलॉनसारखे अगदी तलमी, अगदी विरविरीत असे रंगीबेरंगी ललितवाङमयीन वस्त्र निर्माण करून, कलाकृतिविलासिनीचे अंग-प्रत्यंग फुटून व उठून दिसेल अशा ढंगाने ते तिला पेहरवू लागला आणि बाजारातील पानांच्या ठेल्याशेजारी तिचे आकर्षक प्रदर्शन घडवू लागला असे आढळून येत आहे. अर्थातच आधुनिक आभूषणांनी शृंगारलेली, पाश्चात्य संस्कृतीने विनटलेली, स्वैरसंचारी वाङमयललिता तो सात्त्विक आनंद, ते उदात्त रंजन आणि प्रभावी जीवनप्रेरणा देण्यास असमर्थच आहे. ती कलाकामिनी उच्च भारतीयत्व सिद्ध करायला पूर्णत: दुबळी अबला आहे. त्या पवित्र वाग्देवतेला-सरस्वतीला पूर्वीचा उंची भरजरी शालू जरी नसला तरी साधा पण विशुद्ध जोट हवा, अंग प्रत्यंग फुटून दिसणारे व भावना उद्दीपित करून मनात विकृती निर्माण करणारे टॅरेलिन किंवा नॉयलॉनचे विरविरीत पातळ नको. शुचित्व व मांगल्य असलेल्या तिच्या परिसरात मोहक व सुगंधित पुष्पांची टवटवीत बाग हवी, ढंगीबेढंगी व दुर्गंधी सुटू पाहणाऱ्या निर्माल्यवत पुष्पांची ढिगारे नकोत. तिला केवळ विरंगुळ्यापुरते स्वस्त रंजन व स्वस्त आनंद नको तर तिला सात्त्विक आनंदाबरोबर प्रबोधन हवे- उदात्त भावगंध व उच्च ज्ञानगंध हवा, वास्तववादी शाश्वत मूल्ये हवीत.

श्री. शं. द. जावडेकर यांनी ' ललितवाङमयाची अवनती ' संबंधी व्यक्त केलेले विचार मननीय आहेत. ते आपले मत स्वच्छ व स्पष्टपणे नमूद करतात :

" कोणत्याही राष्ट्राच्या किंवा समाजाच्या उद्धारास केवळ स्वाभिमान पुरा पडू शकत नाही. या स्वाभिमानाबरोबरच स्वयंप्रज्ञा व नवनिर्मिती करणारी प्रतिभा राष्ट्रात जागृत असली पाहिजे.

आमचे शिक्षण, आमचे प्राचीन संस्कार व आमचे आधुनिक भांडवल या सर्वांत नवीन भर घालण्याची आज आवश्यकता निर्माण झालेली आहे. असे करीत असता अनेक जुने अभिमान आम्हांस सोडावे लागणार आहेत; अनेक जुन्या कल्पना विवेकाच्या व आधुनिक शास्त्रांच्या अग्निकुंडात झाळून शुद्ध कराव्या लागणार आहेत; आणि मानव-संस्कृतीला नवीन वळण लावण्याची जी थोर महत्त्वाकांक्षा भरतखंडात आजकाल निर्माण झाली आहे तिच्याशी आपणांस समरस व्हावे लागणार आहे.

प्राचीन शास्त्रे व अर्वाचीन शास्त्रे यांपैकी कोणत्याही शास्त्राचे अंधानुकरण करण्याची वृत्ती टाकून देऊन, नवी शास्त्रे निर्माण करण्याची बुद्धी आपल्याला प्रथम धारण करावी लागणार आहे. ब्रिटिश व अमेरिकन लोकांची संस्कृती हाच आदर्श मानण्याची प्रवृत्ती सोडून दिली पाहिजे आणि युरोपीय लोकसत्ता मुमुर्षू का बनली याची कारणे शोधून काढून त्यांचा उच्छेद करण्याचा आपण दृढ निर्धार केला पाहिजे. लो. टिळकांनी भौतिक विद्येहून श्रेष्ठ अशा अध्यात्मविद्येचे पुन-

रुज्जीवन करण्याची आवश्यकता आपणांस पटवून दिली, शिवाजी व रामदास यांची स्मृती आपणांस जागृत केली आणि भगवद्गीतेतील कर्मयोगशास्त्राचे पुनरुज्जीवन केले. तथापि या अध्यात्मविद्येत भर घालून, महाराष्ट्रीय इतिहासाचा संदेश व्यापक बनवून आणि भगवद्गीतेच्या संदेशाचा विस्तार करून, आपले पाऊल पुढे टाकण्याची शक्ती आमच्यामध्ये अद्यापि आलेली नाही. आमच्यापाशी केवळ स्वाभिमान टिकून आहे; पण स्वयंप्रज्ञा व नवोन्मेषशालिनी प्रतिभा यांचा लोप होत आहे. वस्तुत: ही आमच्या असाहाय्यतेची करुण कहाणी आहे. पण तिलाच आम्ही मुत्सद्दीगिरी व थोर बुद्धिमत्ता म्हणून गौरवीत आहोत आणि ज्या आत्मबलाच्या संवर्धनाने आत्मोद्धाराचे सर्व मार्ग सापडणे शक्य असते त्या आत्मबलाची हेटाळणी करण्यात बुद्धिवादाची पराकोटी मानीत आहोत! आत्मबलाच्या अभावी बुद्धिबळ निष्प्रभ व भ्रष्ट बनत असते, हा प्राचीन भारताचा संदेश आम्ही विसरून गेलो आहो. ध्येयवादी, क्रांतिवादी वाङ्मय हवे याची जाणीव आम्हांस होऊ लागली आहे हे सुचिन्ह आहे. पण ध्येये प्रसविण्याचे सामर्थ्य, वैराग्य व अभ्यास यांनी युक्त अशा आत्मनिष्ठ बुद्धीत येऊ शकते. म्हणून केवळ बुद्धिवादी नव्हे, तर बुद्धियोगी बनण्याचे महत्त्व आम्हाला जेव्हा पटेल, तेव्हाच ध्येयजननी व सामर्थ्यशाली बुद्धिमत्ता महाराष्ट्रात निर्माण होईल; आणि ही निर्माण होईल तरच ललितवाङ्मयात दिसून येणारी अवनती थांबेल. क्रांतिवादी व ध्येयवादी वाङ्मय निर्माण करणारा साहित्यिक क्रांतिवादी व ध्येयवादी जीवन व्यतीत करणारा असेल, तरच तसे वाङ्मय निर्माण होईल. संतावाचून संतवाङ्मय निर्माण होत नाही, तसेह क्रांतिकारकावाचून क्रांतिवादी वाङ्मय निर्माण होत नाही. तेव्हा महाराष्ट्रात संत व क्रांतिकारक कसे व केव्हा निर्माण होतील याचे चिंतन करणे आणि त्यासाठी शक्य ते यत्न करणे, हाच खरे प्रभावी, तेजस्वी व अक्षर वाङ्मय निर्माण करण्याचा मार्ग आहे. अर्थात ही संतवृत्ती व क्रांतिकारक वृत्ती नष्ट करण्याचा जे प्रयत्न करीत आहेत, ते महाराष्ट्र–साहित्याचे खरे शत्रू समजले पाहिजेत. अशा अवस्थेत सर्वसामान्य पोटभरू वाङ्मय भरपूर निर्माण होईल; पण क्रांतिकारक ध्येयवादी वाङ्मय निर्माण होण्याची आशा नाही. वाङ्मय ही समाजाच्या बुद्धीची शाब्दिक प्रतिमा असल्याने ही बुद्धी तेजस्वी बनण्यावर वाङ्मयनिर्मिती अवलंबून आहे आणि बुद्धीची ही प्रखर तेजस्विता अभ्यास व वैराग्य या गुणांवर अवलंबून आहे, हे आपण उमजले पाहिजे."

(लोकशिक्षण : मे १९४१, वर्ष ११, अंक ११)

त्याचप्रमाणे प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर यांनी, 'क्रान्तीच्या मूलतत्त्वांचा महाराष्ट्रेतिहासातील अनुक्रम' या लेखात, महाराष्ट्रात घडलेल्या अनेक क्रांतिकारक घटनांची, द्वंद्वांची व संघर्षाची जी सोदाहरण मीमांसा केली आहे आणि स्वातंत्र्यासाठी व समाजोन्नतीसाठी समता आणि बन्धुत्व राखणेच कसे आवश्यक

व हितप्रद आहे; त्याशिवाय तरणोपाय नाही याची प्रखर जाणीवही करून दिली आहे, याचा आत्मलक्षी होऊन विचार करणे साहित्यनिर्मितीच्या दृष्टीने तर अत्यावश्यक आहे हा लेख मोठा विचारप्रवर्तक असून, अभ्यसनीय आहे. प्रा. शेजवलकर म्हणतात :

" राजनीतिशास्त्रज्ञ राज्याची अंतिम सफलता त्याच्या स्वातंत्र्यावर म्हणजे केवळ राज्याच्या नव्हे, तर त्या राज्यातील प्रजेच्या स्वातंत्र्यावर जोखतात. प्रत्येक व्यक्तीला अधिकाधिक स्वातंत्र्य कसे भोगता येईल याचाच विचार प्रामुख्याने सर्व सुधारक करीत असतात. राष्ट्राराष्ट्रात व मानवजातीत अधिकाधिक स्वातंत्र्य शक्य होण्यास समता व बंधुता यांचा उपयोग असल्यानेच त्यांची घोषणाही बरोबर केली जाते.

इतिहासाचे होकायंत्रच स्वातंत्र्य ठरल्याने त्याचे उत्तर-दक्षिण दिग्दर्शक होण्याचा मान समता व बंधुता या जोडीकडे येतो. या दोन गोष्टी ज्या समाजात नाहीत त्यांचे अन्तर्गत स्वातंत्र्य तकलुपी व संशयास्पद समजले पाहिजे, आणि त्याचे बाह्य म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्यही टिकण्यासारखे नसते.

इतिहासावरून हा मुद्दा स्पष्ट होण्यासारखा आहे. ज्या देशात खरे स्वातंत्र्य नांदताना दिसत असेल तेथे बहुधा कमीअधिक प्रमाणात अन्तर्गत समता व बाह्य समाजाविषयी बंधुता वसत असते. ही समता व बंधुता साधण्याचे मार्ग मात्र इतिहासात वेगवेगळे सापडतात, समाजविकासाच्या पायरीवर व त्याच्या बाह्य संबंधांवर हे मार्ग ठरविलेले दिसतात. राज्ययंत्राचे व समाजतंत्राचे स्वरूपही तदनुरोधाने पालटताना दिसते. एखाद्या समाजात तात्त्विक विषमता नांदत असूनही जर तिजबरोबर प्रभावी बंधुता अस्तित्वात असेल, तर सामाजिक असंतोषाचा पारा राजकीय स्वातंत्र्यास बाधण्याइतका वर चढू शकणार नाही. उलट, आजच्या हिंदुस्थानाप्रमाणे कायदेशीर समता अस्तित्वात असूनही बंधुता नसेल तर स्वातंत्र्य संशयात पडल्याविना राहणार नाही. पूर्ण, चिरंजीव, निःसंदिग्ध व प्रभावी स्वातंत्र्य अपेक्षित असेल तर मात्र समता व बंधुता या गोष्टी तितक्याच पूर्ण, शाश्वत व निःसंदिग्ध असाव्या लागतील." (लोकशिक्षण–जून १९४१)

श्री. जावडेकर व प्रा. शेजवलकर यांनी केलेल्या राष्ट्रोद्धारक मीमांसेतील प्रमेये विचारात घेऊन, डॉ. आंबेडकरांच्या साहित्योपासनेचा व साहित्यनिर्मितीचा काटेकोरपणे आलेख काढला तर त्यांची ती उपासना व साहित्यनिर्मिती केवळ कसोटीलाच उतरत नाही तर त्यांचे श्रेष्ठत्व कितीतरी उच्च, कितीतरी फलदायी आहे हे स्पष्ट होते. डॉ. आंबेडकर हे प्रखर बुद्धियोगी, कर्मयोगी, ज्ञानयोगी आणि असामान्य क्रांतिकारक-राष्ट्रयोगीही होते आणि त्या दृष्टीनेच त्यांची साहित्यसाधना केवळ भारतातच गौरविण्यासारखी नाही तर अखिल विश्वातही गौरविण्याइतपत उच्च, उदात्त व प्रभावी होती आणि त्याच उच्चतर साहित्यसाधनेच्या

पवित्र वैठकीवरून, भगवंत बुद्धाच्या उद्धारक अधिष्ठानावरून त्यांचे साहित्य, मानव, समाज व राष्ट्र-उद्धारक आहे. त्यांच्या साहित्यसाधनेचे, ज्ञान-वुद्धीच्या अधिष्ठानाचे पावन गमक शून्यातून ब्रह्म, ब्रह्मातून ज्ञान, ज्ञानातून बुद्धी आणि बुद्धीतून दिव्य ज्योत निर्माण करणे हेच आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजगृह म्हणजे ब्रह्मदेवाचे निवासस्थान, त्यांचे राजगृह म्हणजे सरस्वतीचे मंगल मंदिर, त्यांचे राजगृह म्हणजे भगवान वुद्धाच्या तपोवनातील पवित्र विहार. या राजगृहात अगदी प्राचीन काळापासूनचे ऋषि-महामुनी, साधु-संत, राजे-महाराजे; भारतातीलच नव्हे तर विश्वातील राष्ट्राराष्ट्रांचे धर्माध्यक्ष, पंडित–महापंडित, शंकराचार्य, तत्त्वज्ञ, शास्त्रज्ञ, इतिहासकार, दर्शनकार, भाष्यकार, कोशकार आणि राष्ट्रनेते, राजधुरंधर, समाजसुधारक, क्रांतिकारक व सर्व चित्रकार, शिल्पकार, नृत्यकार, संगीतकार; सर्व संशोधक, सर्व पत्रपंडित आणि सर्व साहित्यकार एकवटलेले होते. प्रत्येकाचे दालन ठरले होते व त्यात त्याची अगदी सुव्यवस्थित बूज राखली गेली होती दर्जानुसार प्रत्येकाचा क्रम ठरलेला होता व तो क्रम मोठा वेधक होता. आपल्या आध्यात्मिक आणि कर्मसिद्धी व साहित्यसिद्धीच्या भरभक्कम पायावर उभारलेल्या राजगृहात पाऊल ठेवताच, भगवान बुद्धाच्या पुतळ्याला आदराने-श्रद्धेने अभिवादन करून डॉ. आंबेडकर आवश्यकतेनुसार प्रत्येक धर्माध्यक्षांशी, महापंडितांशी, राष्ट्रनेत्यांशी, समाजसुधारकांशी, तत्त्ववेत्त्यांशी, शास्त्रज्ञांशी, क्रांतिकारकांशी, संशोधकांशी, साहित्यकारांशी बोलू लागत, चर्चा करू लागत, भाष्य करू लागत. त्यांची तत्त्वे, त्यांची मते, त्यांची प्रमेये, त्यांचे तर्क, त्यांची अनुमाने व त्यांचे सिद्धांत नीट समजून घेत, त्यांचे मनन व चिंतन करीत आणि मग आपली तत्त्वे, आपली मते, आपली प्रमेये, आपले तर्क, आपली अनुमाने व आपले सिद्धांत स्वच्छ व स्पष्ट व्यक्त करीत. मनुष्यमात्रातील जीवनातील जराजर्जर, दुःख, क्लेश, वेदना, व्यथा दर्शवून त्या सर्वांना खडसावून विचारीत, सांगा, जराजर्जर झालेल्या पीडितांसाठी तुम्ही काय केले व करीत आहात; सांगा, क्लेश–वेदना नष्ट करण्यासाठी तुम्ही काय केले व करीत आहात; सांगा, दुःखांना व व्यथांना वाचा फोडून मानवतेसाठी तुम्ही काय केले व करीत आहात, ते सांगा. आम्हीही माणसे आहोत, आम्हालाही भावना आहेत, आमच्याही इच्छा-आकांक्षा आहेत, आम्हालाही जीवन जगायचे आहे व तेही मानाचे आणि प्रतिष्ठेचे जीवन–गरिबीचे पण इभ्रतीचे जीवन-पण त्यासाठी तुम्ही काय केले व करीत आहात–कोणती माणुसकी, कोणती मानवता, कोणती धर्ममाया आचरणात आणीत आहात, ते सांगा. ऋषि-महामुनींनो सांगा, धर्मपंडितांनो सांगा, साधुसंतांनो सांगा, राष्ट्रनेत्यांनो सांगा, समाजसुधारकांनो सांगा, संशोधकांनो-शास्त्रज्ञांनो सांगा, सांगा साहित्यकारांनो सांगा तुम्ही कोणते सत्कार्य, कोणते पुण्यकार्य केले व करीत आहात, ते सांगा. व्यासपीठावरील वाऱ्यावरची

एखादी घोषणा नका सांगू, ग्रंथात दडून बसलेला व वाचा न फुटणारा एखादा स्तंभ नका सांगू, आपल्या विद्वत्तेचे व बुद्धिमत्तेचे प्रदर्शन घडावे म्हणून पाठ करून आलेला श्लोक उच्चारून नका सांगू; आम्हाला या पोकळ, दिखाऊ, निष्प्रभ, निष्क्रिय व वेगडी देखाव्याशी काहीच कर्तव्य नाही; यांनी काही माणुसकी व मानवता आचरणात आहे हे मुळीच सिद्ध होत नाही. आम्हाला तर आजच्या या जीवनात प्रत्यक्ष काय ते हवे आहे; पावन, प्रेरक, उद्धारक, उन्नत व प्रगत असे; समता, बंधुता व मानवता सिद्ध करणारे जीवन हवे आहे; त्यासाठी आमची हाक, ललकारी आहे, त्यासाठी आमचा न्यायाचा झगडा, लढा आहे; त्यासाठी आमची क्रांती आहे; आमची हाक, आमची ललकारी, आमचा लढा, आमची क्रांती त्या समतेच्या, बंधुत्वाच्या व मानवतेच्या ध्येयवादावर अधिष्ठित आहे; उद्धारक जीवनमूल्ये सिद्ध करणाऱ्या उद्दिष्टांवर केन्द्रित झाली आहे. कल्पनेच्या भरारीवर व स्वप्नाच्या तरंगावर काही आमची कथा-कादंबरी, काव्य, नाट्य नाही. आमची कथा आज अगदी जिवंत पण ज्वलंत; आमची कादंबरी आज अगदी जिवंत पण दाहक, आमचे काव्य–नाट्य आज अगदी जिवंत पण पेटलेले आहे, त्यासाठी कोणते दिव्य केले जात आहे ते आम्हाला पाहिजे; त्याची प्रचीती आम्हाला याची देही याची डोळा पाहिजे. डॉ. आंबेडकरांची प्रखर तपस्या होती ती अशा विशाल व भव्य स्वरूपाची. विशुद्ध मनाने, विशुद्ध विचाराने, विशुद्ध देहाने आणि विशुद्ध हृदयाने त्यांनी मानवधर्म, मानवकर्म व साहित्यसाधना प्राप्त केली होती. ज्ञानरूपी ते ब्रह्मदेवच. त्यांच्या चरणाशी श्री, कंठ–माथ्याशी सरस्वती आणि हृदयात बुद्ध बसले होते.

अद्वितीय साहित्यसाधनेचे व महान ग्रंथनिर्मितीचे अत्यंत पवित्र व स्फूर्तिदायी आणि सत्पथदर्शक केन्द्र म्हणजे डॉ. आंबेडकरांचे राजगृह–विश्वातील उच्च व श्रेष्ठ ग्रंथालय. १९३९ साली, एडिंबरो येथील एक विदुषी युरोपियन बाई मिस् ए. एम्. ऑर्कनी भारतात मिशनरी कार्य करीत असताना, एकदा तिने राजगृहाला भेट दिली. त्या श्रेष्ठ ग्रंथालयाचे अन्तर्बाह्य दर्शन घेऊन आणि डॉ आंबेडकरांना भेटून प्रसन्न मुद्रेने प्रांगणात आल्यावर, ती उद्गारली–

O God ! I can't dream, I can't Imagine
I saw a wonderful library and a wonderful man
What a great, what a splendid thing in the world
A noble gift to India :
That is Rajagriha and Dr. Ambedkar;
A highest Temple of knowledge and
a holiest worshiper !

मला वाटते केवळ या उद्‌गारात डॉ. आंबेडकरांच्या साहित्यसाधनेची, व्यक्तित्वाची व धवल कर्तृत्वाची अस्मिता प्रतिबिम्बित झाली आहे. जगाच्या पाठीवर त्यांच्याइतके भरदार व विशाल व्यक्तिगत ग्रंथालय दुसरे कुणाचे नाही. असे अनेक पाश्चात्य प्रवाशांनी राजगृहाला भेट दिल्यावर आपले प्रांजळ मत व्यक्त केले आहे. आपल्या भारतातील विद्याव्यासंगी थोर पुरुष श्रीपाद बाबाजी ठाकूर, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, श्री. श्रीधर भांडारकर, न्यायमूर्ती काशिनाथ तेलंग, विश्वकवी रवीन्द्रनाथ ठाकूर, पं. जवाहरलाल नेहरू, पं. मदन-मोहन मालवीय, डॉ. मुकुंदराव जयकर यांनी फार मोठी व्यक्तिगत ग्रंथालये निर्माण केली होती, यात संदेह नाही. परंतु ही व्यक्तिगत ग्रंथालये धनिकांची होती; आणि राजगृहानंतर त्यांचा क्रम लागेल अशी होती. डॉ. आंबेडकरांचे थोरले ग्रंथालय स्वकष्टार्जित, स्वतः उपाशी राहून पै न् पै जमवून गरिबीतून संपन्न झाले होते. त्यांना एकच हव्यास, एकच छंद, प्रसंग पडला तर उपाशी राहायचे पण हवे ते पुस्तक, हवा तो ग्रंथ संग्रही ठेवायचाच. मग त्याचे सातत्याने वाचन व मनन. विलायतेत शिक्षण घेत असताना एक कप चहा व एक पावाचा तुकडा घेऊन ते रात्रंदिवस विद्या संपादन करीत व जे पैसे उरतील त्यातून काही घ्यायचेच तर ते पुस्तकच. मायदेशी परतताना एकदा त्यांच्या एका मित्राने विचारले, "तुम्ही आपल्या भारतात, आपल्या मायदेशी जात आहात तर इकडील एखादी किमती वस्तू का नाही घेऊन जात ? स्मृती राहील !" त्यावर डॉ. आंबेडकर चटकन उत्तरले, "तुम्ही सुचविता तशी किमती वस्तू घेण्याइतपत माझी मुळीच ऐपत नाही. आणि तशी वस्तू माझ्या कामाचीही नाही. शोभेसाठी तर मला काहीच करायचे नाही. मला आवडणारी व ज्ञान देणारी माझी एकच वस्तू आणि ती म्हणजे ग्रंथ." आणि मग त्यांनी जहाजाकडे अंगुलिनिर्देश केला. जहाज पुस्तकांच्या चळतींनी खचाखच भरलेले पाहून त्यांचा मित्र चकितच झाला ! परतताना सागरावर मध्ये थोडे वादळ उठले. बोट हेलकावे देऊ लागली. त्या वेळी ग्रंथांच्या एका चळतीतील दोनचार ग्रंथ घसरून सागरात पडले तेव्हा डॉ. आंबेडकर अगदी व्यथित होऊन पुटपुटले, "अरेरे ! शरीरातील रक्ताचे चार थेंब कमी झाले !" केवढी ही विद्याभक्ती ! एकदा त्यांनी एके ठिकाणाहून दोनतीन ग्रंथ आणले. वाचून ते त्यांना लगेच परत करायचे होते. पण ते तसे करू शकले नाहीत. ज्यांचे ग्रंथ होते त्यांनी बाबासाहेबांच्या चिटणिसांना तशी नकळत सूचना दिली. चिटणिसांनी भीत भीतच ते ग्रंथ परत करण्याचे बाबासाहेबांना स्मरण करून दिले. तोच ते म्हणाले, "मला चांगले स्मरण आहे. आज परत करीन, उद्या परत करीन म्हणतो पण ते परत करावेसे वाटत नाही. तुम्ही असे करा, त्यांची किंमत ताबडतोब देऊन टाका." १९५४ साली निवडणुकीच्या निमित्ताने ते नागपूरला आले. वर्तमान-पत्र वाचताना त्यांना एक संस्कृत पंडित प्रा. श्री. भा. वर्णेकर यांच्या एका संस्कृत

पुस्तकाची जाहिरात आढळली त्यांनी लगेच एकाला त्यांचा पत्ता काढायला लावून ते पुस्तक तेव्हाच्या तेव्हा विकत घेतले. प्रा. वर्णेकर अभिमानाने सांगतात, भारतात तरी इतक्या तत्परतेने व स्वतः होऊन ग्रंथाकडे झेप घेणारा व्यासंगी वृत्तीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा पुरुष दुर्मिळच !" त्याच प्रसंगी ते मला म्हणाले, 'अरे, मला डॉ. भाऊजी दप्तरी यांची 'धर्मरहस्य' व 'धर्मविवादस्वरूप' ही दोन पुस्तके हवीत. त्यांच्याकडे जा आणि ती त्वरित घेऊन ये. माझी ही पुस्तके मुंबईलाच राहिलीत पण मला आता काम आहे." ती पुस्तके आणून दिल्यावर हावरेपणाने ती चाळत उद्गारले, "भाऊजी दप्तरीसारखा खरे ब्राह्मण्य अंगी मुरलेला विद्वान विरळाच !" ते जेथे प्रवासाला जात तेथे त्यांच्या ग्रंथालयाचे एक आवश्यक दालनही संगती असायचे हे विशेष होय आणि एकदा आपल्या ग्रंथालया-संबंधी मित्रमंडळींशी चर्चा करीत असताना ते उद्गारले, "माझे आर्थिक कितीही नुकसान झाले तरी मला त्याच्याबद्दल काही वाईट वाटायचे नाही. परंतु माझ्या दुर्मिळ व अमूल्य अशा ग्रंथालयाला काही धोका होण्याचा प्रसंग आला तर मला केव्हाही सहन व्हायचे नाही. या पुस्तकांवर माझे प्राणापेक्षा अधिक प्रेम आहे. इतकेच काय परंतु जर माझ्या घरावर जप्ती आली आणि बेलिफाने माझ्या पुस्तकाला हात लावण्याचा प्रयत्न केला तर मी त्याला तिथल्या तिथे ठार करीन !" यावरून डॉ. आंबेडकरांचे ग्रंथांवरील निष्ठेचे व व्यासंगाचे मोल सहज स्पष्ट होते आणि त्यांच्या तेजस्वी साहित्योपासनेचे दर्शनही घडते.

वदनं प्रसादसदनं सदयं हृदयं सुधामुचो वाचः ।
करणं परोपकरणं येषां केषां न ते वंद्याः ।।

तद्वतच,

तुम्हासि आत्मज्ञान दृष्टी । परात्मस्वरूपी भेटि ।।
तयांचे अंतरी हे सृष्टि । तुम्ही हो ।।

आपल्या व्यासंगी वृत्तीने आणि सखोल ज्ञान आत्मसात करणाऱ्या प्रकृतीने डॉ. आंबेडकरांनी राजगृहाच्या द्वारी सोन्याचा पिंपळ निर्माण केला आणि ती सुवर्णपाने ते मुक्तहस्ते दुःखितांच्या, पीडितांच्या, दलितांच्या सुखार्थ उधळीत गेले.

यथापि रुचिरं पुष्फं वण्णवन्तं सगन्धकं ।
एवं सुभासिता वाचा सफला होती कुब्बतो ।।

या धम्मपदातील वचनाप्रमाणे डॉ. आंबेडकर मनोहर, वर्णयुक्त व सुगंधित फुलासारखे, 'आचारयुक्त पुरुषाचे सुभाषित' म्हणून गौरविण्यात आले. ज्ञान–बुद्धी–शक्तीचा तो सुगंध राष्ट्रभर दरवळला. ज्ञानोपासनेचे ते मंगल पुष्प दुःखितांच्या–दलितांच्या चरणी त्यांच्या सेवार्थ अर्पण करण्यात आले. ही ती दिव्य ज्ञानोपासना, साहित्योपासना !

डॉ. आंबेडकर यांची राजगृहातील साहित्यसाधनेची बैठक म्हणजे एका महान तपस्वी पुरुषाची, एका महान योग्याची बैठक. चारी दिशांना व उपदिशांना मौलिक ग्रंथांच्या राशीच्या राशी उभारलेल्या आहेत, पूर्वाभिमुख भगवान बुद्धाची भव्य प्रतिमा दीपांनी लकाकत आहे, मध्ये एक प्रशस्त मेज आहे, त्याला लागून एक झुलती खुर्ची आहे. मंगलमय वातावरणाने बैठक भारून गेली आहे. अवती-भवतीच्या त्या ग्रंथराजीत बाबासाहेब खुर्चीवर स्थानापन्न झाले आहेत. सारे ग्रंथ त्या भव्य मूर्तीकडे दक्षतेने टवकारून पाहत आहेत. बुद्धप्रतिमेवर एक नजर टाकून, ते मग ध्यानमग्न झाले आहेत. एकाग्रतेने वाचन–मनन–चिंतन त्या बैठकीवर केवळ चार वस्तू. बाबासाहेब हे प्रत्यक्ष. ग्रंथ, झरणी आणि कागद. रात्रंदिवस तोच ध्यास तेच ध्यान. मग त्यांची झरणी कागदावर झरू लागे, उमटू लागे, जीवनतत्त्व दर्शवू लागे. सिद्धान्त प्रकट करू लागे. जगाला चकित करून सोडणारे विद्वत्तापूर्ण, बुद्धिपूर्ण, तर्कपूर्ण, अनुमानपूर्ण व सत्त्वपूर्ण ग्रंथ निर्माण होत. जीवनाच्या एका प्रखर तपस्येतून, एका ज्ञानसमाधीतून ते तेजस्वी आकार घेत. एकच शब्दमंत्र ' उद्धार !' दलितांचा उद्धार, समाजाचा उद्धार, राष्ट्राचा उद्धार !

डॉ. आंबेडकरांच्या साहित्याचा आणखी थोडा विचार करताना, वाङमय व साहित्यासंबंधीच्या काही सर्वसामान्य प्रक्रियेसंबंधी थोडी चाचणीही करणे आवश्यक आहे. वाङमयाबद्दल साहित्यसम्राट केळकर म्हणतात–

" प्रत्येक पिढीची अभिरुची व स्मरणशक्ती या दोन चाळण्याच आहेत. या चाळण्यांतून प्रत्येक पिढीत काही लेख सरस्वतीच्या गंगाजळीत पडतात व हे सर्व गाळीव लेख मिळून जो संग्रह होतो त्याचेच नाव वाङमय," असे वाङमयासंबंधी मत दर्शवून, साहित्यसम्राट केळकर, " आत्म्याला सर्व जगाशी एकरूप व्हावे, एकाच क्षणी सर्व जगाचे आकलन व्हावे, अशी महत्त्वाकांक्षा असते व तो अनुभवानंद प्रतिभाच घडवू शकते," असे वाङमयाचे विश्लेषण करतात आणि ' वाङमय खरी सविकल्प समाधी उत्पन्न करू शकते,' असा ते निर्वाळाही देतात; तर १९३६ साली बडोदे येथे भरलेल्या साहित्य सम्मेलनाच्या आपल्या अध्यक्षीय भाषणात आचार्य प्र. के. अत्रे जातिभेद, अस्पृश्यता व विषमता यांचा सडेतोड शब्दांत प्रखर समाचार घेऊन उद्गारतात : प्रगतीच्या दिशेने धावणाऱ्या महाराष्ट्रीय जीवनाशी जे एकजीव होईल तेच जिवंत मराठी वाङमय ! हा प्रगतीचा प्रवाह अधिक जोमाने वाहावा म्हणून जे लेखक आपल्या हृदयातले जीवन त्यांच्यात ओततील तेच खरे वाङमयकार. मानवी जीवनाला पिढ्यान् पिढ्या मुकलेल्या दलितांचा उद्धार करणारे, राखीव हक्कांचा मलिदा हजारो वर्षे खाऊन माजलेल्या वर्णगुरूंच्या मगरुरीचा विध्वंस करणारे, स्त्रियांच्या नैसर्गिक असाहाय्यतेवर उभारलेल्या अन्यायमूलक सामाजिक रूढींना व कायद्यांना जमीनदोस्त करणारे, बहुजन समाजाला नवयुगाच्या ज्ञानाचे व संस्कृतीचे सामर्थ्यवान संदेश पोहोचवून त्यांना हलवून जागे करणारे,

समाजाच्या सुखासाठी अहोरात्र रक्ताचा घाम करून खपणाऱ्या श्रमजीवी वर्गाच्या न्याय्य हक्कांसाठी झगडणारे लेखक हेच खरे महाराष्ट्रीय लेखक. या प्रगतीच्या प्रवाहाशी विसंगत असणारे वाङमय निर्माण करणारे लेखक, त्याला विरोध करण्याचा प्रयत्न करणारे किंवा या प्रवाहाचे पाट भलत्याच मार्गाने फोडून त्यास दुर्बल करू पाहणारे लेखक हे महाराष्ट्रीय संस्कृतीचे, समाजाचे व वाङमयाचे शत्रू म्हणून समजावयाला हरकत नाही."

त्या दृष्टीने, साहित्यसम्राट केळकर व आचार्य अत्रे या दोन विद्वान साहित्यकारांची वाङमयासंबंधीची लक्षणे व साहित्यासंबंधीची दिशा विचारात घेऊन, प्रि. एम्. व्ही. दोंदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वाङमयीन गुणांची व ग्रथांची चिकित्सकपणे मीमांसा करून, त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. प्रि. दोंदे नमूद करतात–

डॉ. आंबेडकरांची जगन्मान्य विद्वत्ता त्यांच्या अनेक भाषणांतून, लेखांतून आणि ग्रंथांतून प्रकट झालेले विचार पुरोगामी आणि वास्तववादी वाङमयात स्थान पटकाविणारे आहेत. आपल्या भाषणांनी, आपल्या वक्तृत्वांनी, आपल्या सडेतोड विचारांनी पुष्कळ बुरसलेल्या विचारवंता (?) ना आंबेडकरांनी गद्गदा हलविलेले आहे. त्यांच्या शेकडो लेखांनी शहामृगासारखे जुनाट जळमटांच्या रेतीत तोंड खूपसून बसलेल्या अहंमन्य पुढाऱ्यांना हादरून टाकले आहे. आपल्या विद्वत्ताप्रचुर ग्रंथांनी पोटभरू लेखकांची लेखणी अथवा बोलघेवड्यांची वाणी बोथट आणि लुळी पाडलेली आहे.

अस्पृश्य समाजाच्या होणाऱ्या परिषदांमध्ये त्यांची झालेली भाषणे अत्यंत मननीय आणि स्फूर्तिदायक आहेत. त्या भाषणांतून हिंदुधर्माच्या सर्व अंगांची अतिशय मार्मिक आणि मर्मभेदी छाननी झाली आहे. त्यांच्या भाषणांनी हजारो वर्षे लाथाळलेला, दारिद्र्यात खितपत पडलेला व धार्मिक आणि सामाजिक छळाने अमानुषपणे ठार मारलेला अस्पृश्य–दलितवर्ग खडबडून जागा झाला आहे. त्यांच्या भाषणांतील सडेतोडपणा, हृदयाला जाऊन भिडेल असा युक्तिवाद आणि दास्यत्वात नेभळचा झालेल्या समाजाला उसळी मारण्यास उद्युक्त करणारा त्यांचा दणकेबाज आवेश यामुळेच अस्पृश्य समाजात क्रांती झालेली आहे."

वाङमय याचा वाच्यार्थ 'यच्चयावत् जे वाचेने वदले गेले ते' असा केल्यास डॉ. आंबेडकरांचे हे वाङमय बहुमोल आहे. प्रि. अत्र्यांच्या भाषणातील कसोटीप्रमाणे, डॉ. आंबेडकर पुरोगामी व वास्तववादी वाङमयकार ठरतात. त्यांची भाषणे व व्याख्याने जशी अनेक आहेत तसे त्यांचे लेखही अनेक आहेत; व ती अनेक प्रमुख वृत्तपत्रांतून व मासिकांतून प्रसिद्ध झाली आहेत. डॉ. आंबेडकरांचा कोणताही लेख घ्या, त्यामध्ये त्यांची गाढ विद्वत्ता दिसून येईल. त्यांची विषयांची मांडणी अतिशय तर्कशुद्ध, प्रत्येक ठिकाणी निरनिराळ्या पौर्वात्य अथवा पाश्चि-

मात्य ग्रंथकारांचे उतारे त्यांच्या लेखांत दिसल्याशिवाय राहत नाहीत.

डॉ. आंबेडकरांचे अनेक मौलिक ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. दलितोन्नती, समाजोन्नती व राष्ट्रोन्नतीच्या दृष्टीने ते ग्रंथ किती व कसे महत्त्वपूर्ण आहेत याचे मार्मिक विवेचन करून प्रि. दोंदे उद्गारतात :

" अशा रीतीने डॉ. आंबेडकरांचा वाङमयसंसार पसरलेला आहे. राजकारण, समाजकारण, अर्थशास्त्र, धर्मशास्त्रवगैरे ज्ञानाच्या महत्त्वाच्या अंगोपांगांवर डॉ. आंबेडकरांचे लिखाण आहे व ते प्रत्येक लिखाण पहिल्या प्रतीचे आहे. डॉ आंबेडकरांचे विचार राजकारणासंबंधी काय, अर्थशास्त्रासंबंधी काय, मौलिक आणि स्वतंत्र आहेत. त्या प्रत्येकावर त्यांच्या विद्वत्तेचे, कर्तृत्वाचे, लढाऊ वृत्तीचे व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिम्ब पडलेले दिसून येते. " ( जनता खास अंक : १९४२, पृष्ठे २६, २७, ५३ व ५४ )

जे उच्चारले जाते, जे ओठांवर तरंगते व ध्वनित होते ते वाङमय व जे टिपले जाते, ग्रथित केले जाते ते साहित्य. मग भावना, विचार, आशय कोणताही का असेना, वाणी म्हणजे वाङमय, लेखणी म्हणजे साहित्य. प्राचीन काळचे साहित्य वाङमय होते. संतसाहित्य वाङमय होते, लोकसाहित्य वाङमय होते. कारण ते वाणीद्वारेच व्यक्त झाले. मग ते टिपले गेले-ग्रथित केले गेले; म्हणून साहित्य झाले. वाङमयाच्या काय किंवा साहित्याच्या काय, प्रक्रिया, लक्षणे, दिशा आणि प्रवाह लक्षात घेतले व त्या दृष्टीने ज्या जाणिवेतून, ज्या वास्तवातून ज्या नियतीच्या चाहुलीतून डॉ. आंबेडकरांचे वाङमय आणि साहित्य निर्माण झाले ते विशेष मोलाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मौलिक ग्रंथांपैकी काहींचा उल्लेख करणे आवश्यक आहे. १९१४ साली कोलंबिया विश्वविद्यालयाच्या एम्. ए. च्या परीक्षेसाठी त्यांनी लिहिलेला पहिलाच ' Ancient Indian Commerce ' हा वाणिज्य विषयावरील प्रबंध उत्कृष्ट आहे. त्यांच्या ग्रंथलेखनकाळातील पहिल्या टप्प्यातच या प्रबंधाने त्यांची कीर्ती सर्वत्र पसरविली. १९१७ साली लिहिलेला ' Caste in India ' हा त्यांचा दुसरा महत्त्वपूर्ण प्रबंध तर बराच गाजला. भारतातील जाती व त्यांची अवस्था दर्शविणारा हा संशोधनात्मक पण सामाजिक रचनादर्शक प्रबंध विचारपरिप्लुत आहे. हा प्रबंध इतका विशेष समजला गेला की तो मे १९१७ च्या Indian Antiquary मध्ये प्रामुख्याने प्रसिद्ध करण्यात आला. इतकेच नव्हे तर त्या प्रबंधाची मौलिकता लक्षात घेऊन The American Journal of Sociology च्या संपादकाने त्यामधील महत्त्वाचा भाग World's Best Literature of the Month या मासिकात उद्धृत केला. हे दोन्ही अभ्यासपूर्ण, ठासीव व भरीव प्रबंध डॉ. आंबेडकरांच्या सामान्यत: वयाच्या पंचविसाव्या वर्षाच्या सुमारास प्रसिद्ध झाले व ते सर्वमान्य झाले. यावरून, त्यांच्या व्यासंगाची व ज्ञानोपासनेची,

जीवनाच्या तारुण्य प्रारंभकाळातील महत्ता स्पष्ट होते. १९२६ साली 'Caste and Conversion' व 'Small Holdings in India' हे दोन बुद्धिप्रवण मीमांसा करणारे ग्रंथ प्रसिद्ध झाले. 'Caste and Conversion' हा प्रबंध तर तेलुगू समाचारमध्ये प्रसिद्ध झाला. हिंदुधर्म हा मिशनरी धर्म आहे काय याची सोदाहरण चिकित्सा करण्यात आली आहे तर 'Small Holdings in India' या ग्रंथात जीवनविषयक प्रमेयांची छाननी करण्यात आली आहे. १९२३ साली रुपयांच्या प्रश्नासंबंधी 'Problem of the Rupee' आणि १९२४ साली अर्थशास्त्रासंबंधी 'The Evolution of Provincial Finance in British India' असे दोन जागतिक कीर्ती प्राप्त करून देणारे ग्रंथ लंडनमध्ये प्रसिद्ध झाले. लंडन युनिव्हर्सिटीतील त्या वेळचे अर्थशास्त्रज्ञ प्रा. एड्वीन कॅनन् यांनी 'Problem of the Rupee' या ग्रंथाला प्रस्तावना लिहून मुक्तकंठाने स्तुती केली आहे. Gold Ratio बद्दलचे डॉ. आंबेडकरांनी केलेले विवेचन अतिशय माहितीपूर्ण असून, अर्थप्रश्नाबाबतीत त्यांनी एक नवीन दिशा दर्शविली आहे व ती मोठी उपयुक्त आहे, असा अभिप्राय देऊन, ते आपल्या प्रस्तावनेत म्हणतात, "आंबेडकरांचे म्हणणे बरोबर आहे. त्यांचा युक्तिवाद अभिनव व विचारोत्पादक आहे. त्यांची विषयप्रतिपादन शक्ती फारच दांडगी आहे. लिहिताना त्यांचे हृदय पिळून निघाले असावे, असे मला वाटते." तर 'The Evolution of Provincial Finance in India' या ग्रंथाला कोलंबिया युनिव्हर्सिटीतील अर्थशास्त्रज्ञ प्रा. सेलिग्मन यांची महत्त्वपूर्ण प्रस्तावना असून, ते नमूद करतात, "प्राव्हिन्सियल फायनान्स हा ग्रंथ अपूर्व आहे. त्याचा उपयोग मुख्यत: हिंदुस्थानला असला तरी इतर देशांनाही उपयुक्त अशी माहिती त्यात आहे. असा दणकेबाज प्रयत्न कुणी केल्याचे मला वाटत नाही. प्रा. सेलिग्मनच्याच शब्दांत सांगायचे तर ते असे : "The Problem discussed by Mr. Ambedkar in his excellent dissertation is one that is arousing growing unrest in all parts of the world The value of Mr. Ambedkar's contribution to this discussion is in the objective recitation of the facts and the impartial analysis of the interesting development that has taken place in his native country The lesson are applicable to other countries as well; no where to my knowledge has such a detailed study of the underlying Principles been made." या ग्रंथात Provincial Finance, its origin, its development, its, mechanism; Provincial finance under the Government of India Act 1919 वगैरे महत्त्वाचे विषय आहेत. Budget संबंधाची सशास्त्र माहिती तर अत्यंत उपयोगी आहे. Central Assembly मधील अंदाजपत्रका ( Budget ) वरील चर्चेमध्ये बाबा-

साहेबांच्या या मौलिक ग्रंथाचा विशेषत्वाने उल्लेख होत असतो. एकदा तर मुंबईला फायनान्शियल कमिटी बसली असता, डॉ आंबेडकरांना साक्ष द्यावयाला निमंत्रित करण्यात आले ते आले तेव्हा त्यांना प्रत्येक सभासदाच्या हातात, त्यांच्या Provincial Finance या ग्रंथाची प्रत असल्याचे आढळून आले. त्यावरून त्या ग्रंथाचे मूल्य सहज कळून येते.

भारतात खळबळ उडवून देणारा डॉ. आंबेडकरांचा एक विचारप्रवर्तक ग्रंथ 'Annihilation of caste' हा होय. तो लाहोरच्या जातपाततोडक मंडळाचे अध्यक्षीय भाषण म्हणून बाबासाहेबांनी प्रसिद्ध केला आहे. परंतु तेथील स्वागत मंडळाने बाबासाहेबांना काही भाग गाळण्यास व काही भाग बदलण्यास सांगितले. पण त्यांनी साफ नाकारले. या ग्रंथात बाबासाहेबांचा हिंदुधर्म ग्रंथांचा व्यासंग केवढा दांडगा आहे हे दिसून येते. त्या ग्रंथासंबंधी महात्मा गांधीजींनी, "The text cited by him are not authentic" असा आक्षेप घेणारी टीका केली. त्या टीकेला डॉ. आंबेडकरांनी सडेतोड उत्तर दिले– "I confess I am no authority on this matter. But I should like to state the texts cited by me are all taken from the writing of the late Mr. Tilak who was a recognized authority on the sanskrit language and on the Hindu Shastras."

डॉ. आंबेडकरांनी आपल्या या 'Annihilation of caste' ग्रंथात हिंदुधर्म ग्रंथ व शास्त्र यांची अगदी चिकित्सेने मीमांसा करून जे विशेष सिद्धान्त दर्शविले ते मोठे अभ्यसनीय आहेत. काही सिद्धान्त असे–

(1) That caste has ruined the Hindus; (2) That the reorganization of the Hindu Society on the basis of chaturvarna is impossible because the Varna Vyavastha is like a leaky pot or like a man running at the nose. It has an inherent tendency to degenerate into a caste system unless there is a legal sanction behind it which can be enforced against every one transquessing his Varna; (3) That the reorganization of the Hindu Society on the basis of chaturvarna is harmful because the effect of the varna vyavastha is to degrade the mases by denying them opportunity to acquire knowledge and to emasculate them by denying them the right to be armed; (4) That the Hindu Society must be reorganized on a religious basis which would recognize the principles of Liberty, equality and Fraternity; (5) That in order to achieve this object the sense of

religious Sanctity behind caste and Varna must be distroyed; (6) That the Sancity of caste and Varna can be destroyed only by discarding the divine authority of the Shastras.

हे सिद्धान्त, ही तत्त्वे दूरदृष्टिकोनाने नीट लक्षात घेतली म्हणजे डॉ. आंबेडकरांनी हिंदुसंघटना कशी व्हावी, हिंदुधर्माची समतेचा व बंधुत्वाचा पुरस्कार करणारी पुनर्घटना कशा रीतीने घडविण्यात यावी आणि राष्ट्रबळ कसे वाढवावे हेच राष्ट्रीय वृत्तीने आपल्या ग्रंथात आविष्कृत केले आहे. आपल्या ग्रंथाच्या शेवटच्या भागात प्रकर्षाने व प्रामुख्याने ते दर्शवितात–

" Hindu Society seems to me to stand in need of a moral regeneration which it is dangerous to postpone. And the question is : Who can determine and control this moral regeneration? Obviously only those who have undergone an intellectual regeneration and those who|honest enough to have the courage of their convictions born of intellectual emancipation."आणि नंतर शेवटी ते भर देऊन म्हणतात : " I shall he satisfied if I make the Hindus realize that they are the sick men of India and that their sickness is causing danger to the health and happines of other Indians." या प्रखर उद्गारांत, सवर्ण हिंदू पाळत असलेली जातीयता, अस्पृश्यता व विषमता ही समाजाला व राष्ट्राला कशी घातक आहे याची तीव्र जाणीव करून देण्यात आली असून डॉ. आंबेडकरांनी ती पूर्णत: नष्ट करण्यातच राष्ट्रकल्याण आहे हे सिद्ध केले आहे.

डॉ. आंबेडकरांचा 'Federation versus Freedom' हा ग्रंथ तर राजकीय प्रमेये व सिद्धान्त दर्शवून, राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी काय करणे उचित आहे याचे अत्यंत सूत्रबद्ध व विचारप्रेरक विवेचन करणारा आहे. त्या काळी रुजू घातलेल्या फेडरेशनला त्यांनी कसून विरोध दर्शविला आणि विलायतेत, फेडरेशनची कल्पना हिंदी स्वातंत्र्याला अत्यंत घातक आहे हे त्यांनी टाहो फोडून सांगितले. राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी व कल्याणासाठी पुढाऱ्यांना केवढा त्याग करावा लागतो व कशी दु:खे भोगावी लागतात याचे हृदयस्पर्शी वर्णन करून, डॉ. आंबेडकर आपल्या 'Federation Versus Freedom' या ग्रंथात उद्गारतात, " खरे क्लेश, खरी दु:खे लोकमान्य टिळकांनी भोगली, त्यांच्या तुरुंगवासाची तुलना इतर पुढाऱ्यांच्या तुरुंगवासाबरोबर करणे योग्य नाही. त्यांच्या तुरुंगवासाच्या भयाण देखाव्याने डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रुधारांऐवजी रक्ताचे थेंब गळू लागतात !" देशासाठी कराव्या लागणाऱ्या अत्यंत कष्टप्रद जीवनाची बाबासाहेबांनी मोठी करुण पण राष्ट्राभिमानी प्रतिमा मूर्तिमंत उभी केली आहे. माझा भारत स्वतंत्र कसा होईल

म्हणून त्या वेळच्या भरतखंडातील घटनांचा हंसक्षीर न्यायाने परामर्श घेऊन, राजकारणाची दरेक घटना पिंजून पिंजून त्यांनी भाकित वर्तविले आहे. त्या वेळी त्यांनी ब्रिटिश सत्तेची मुळीच पर्वा न करता राष्ट्रस्वातंत्र्याची ललकारी दिली. ब्रिटिशांच्या रोषाचा व डॉ. आंबेडकरांच्या आपल्या राष्ट्रकैवाराचा प्रखर पवित्रा लक्षात घेतला म्हणजे–

एका केवलमेव साधनविधौ सेनाशतेभ्योऽधिका ।
नन्दोन्मूलनदृष्टवीर्यमहिमा बुद्धिस्तु मा गान्मम ।।

या चाणक्याच्या उक्तीचे स्मरण होते आणि बाबासाहेबांच्या देशभक्तीचा अभिमान वाटतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आणखी एक अद्वितीय ग्रंथ म्हणजे 'Thoughts on Pakistan.' या ग्रंथावरून बाबासाहेबांच्या प्रगाढ विद्वत्तेचा, राजकीय मुत्सद्देगिरीचा आणि ध्येयधोरणाचा पुन्हा प्रत्यय येतो. पाकिस्तान ही कल्पना काय आहे, त्याच्या मुळाशी काय आहे, त्या कल्पनेचा विचार कसा व्हावा, त्याला तोंड कसे देण्यात यावे या सर्व महत्त्वाच्या बाबींचे अत्यंत मार्मिक विवेचन या ग्रंथात करण्यात आले आहे. Muslim case for Pakistan, Hindu case against Pakistan; What, if not Pakistan, Pakistan and the Malaise अशा विविध मुद्यांवर पाकिस्तानच्या कल्पनेची डॉ. आंबेडकरांनी सोदाहरण छाननी केली आहे. या ग्रंथाचा 'The Book' या शब्दांत काही राजधुरंधरांनी गौरव केला आहे. या ग्रंथातील 'Weakening of the Defences' हे प्रकरण तर विशेषच महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे social stagnation या ज्वलंत प्रकरणात तर मुसलमान समाज व विशेषत: मि. जीना यांची कोणी घेतली नसेल इतकी कडक हजेरी बाबासाहेबांनी घेऊन, मुस्लिमधार्जिणी स्वार्थी व दुष्ट मनोवृत्तीची भंबेरी उडविली आहे. National Frustration हा त्या ग्रंथाचा भाग राष्ट्रीयत्व कसे असावे या दृष्टीने तर मननीय आहे. डॉ. आंबेडकर स्पष्टपणे आपल्या या ग्रंथासंबंधी म्हणतात, हा ग्रंथ निर्माण करण्यात माझा हेतू पाकिस्तानबद्दलच्या प्रश्नाचा सांगोपांग विचार आणि अभ्यास व्हावा एवढाच आहे : "It is true I have not given any finding. But I may state that it was never my intention to give a finding. My object was to draw the pleadings and to state the issues."

विरोधकांकडून जेव्हा डॉ. आंबेडकरांवर टीकेची झोड उठायची तेव्हा ते बेरड व झुंजार वृत्तीने उद्गारायचे : समाजोन्नतीसाठी व माझ्या राष्ट्राच्या कल्याणासाठी मला प्राण पणाला लावून झुंज घेतलीच पाहिजे. त्यातच माझा मोठा आनंद आहे : "The Battles to me a matter full of joy."

आणि मग शेक्सपिअरच्या एका वचनाची अभावितपणे आठवण होते :

He was a scholar, and a ripe and good one;
Exceeding wise, fair–spoken, and persuading;
Lofty and sour to them that loved him not,
But to those men that sought him sweet as summer.

अन् बर्नस्च्या शब्दांत सांगायचे तर–

" The social, friendly, honest man, whatever he be,
' Tis he fulfils great Nature's plan, And none but he"

डॉ. आंबेडकरांच्या निर्दिष्ट महत्त्वपूर्ण ग्रंथांशिवाय, ' What the Hindus have done to us. ' ' Mr. Gandhi, Ranade and Jinha ', ' A way to solve deadlock ', ' What Congress and Gandhi have done to untouchables ', ' Who were Shudras ?' असे सरस ग्रंथ निर्माण करून बाबासाहेबांनी, राष्ट्रात फार मोठी राजकीय, सामाजिक आणि धार्मिक क्रांती घडवून आणली आहे. अस्पृश्यता, जातिभेद व विषमता यांच्याविरुद्ध आणि समता, बंधुता आणि मानवता यांच्या पुरस्कारार्थ आपली संपूर्ण विद्वत्ता, आपली संपूर्ण बुद्धिमत्ता आणि आपले संपूर्ण कर्तृत्व कामी आणून, आपली असीम राष्ट्रभक्ती, असीम समाजसेवा, उच्च साहित्यिक दर्जा आणि उदात्त अंतःकरणाची विशालता प्रकट केली आहे. अशा वेळी, विश्वकवी रवीन्द्रनाथ टागोर यांनी राष्ट्रासंबंधी केलेली प्रार्थना कानात गुंजू लागते :

Where the mind is without fear and the head
is held high;
Where knowledge is free;
Where the world has not been broken up into
fragments by narrow domestic walls;
Where words come out from the depth of truth;
Where tireless striving stretches its arms to wards
perfectation;
Where the clear stream of reason has not lost
its way into the dreary desert sand of dead habit;
Where the mind is led forword by thee into
ever–widening thought and action–
Into that heaven of freedom, my father, let
my country awake.

त्या दृष्टीने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतातील स्थान अत्यंत उच्च व उदात्त आहे. नवराष्ट्रनिर्मितीची लोकशाहीप्रणीत, मानवतावादी व देशोद्धारक राज्यघटना निर्माण करून तर बाबासाहेबांनी राष्ट्रमंदिरावर सुवर्ण कळस चढविला. सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय; तसेच विचार अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांची स्वाधीनता; आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तित्वाची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता सुनिश्चित करणारी बन्धुता संवर्धित करण्यासाठी त्यांनी विशाल, व्यापक व फलदायी दृष्टिकोनाने राज्यघटनेची शिल्पकृती निर्माण केली. इतर राष्ट्रांनाही समान हक्क, समान संधी, समान न्याय यांचा हितैषी लोकशाहीचा धडा शिकविणारी स्वतंत्र भारताची राज्यघटना म्हणजे राष्ट्राला प्राप्त झालेले वरदानच होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शेवटला अत्यंत श्रेष्ठ व अत्यंत थोर शेषग्रंथ म्हणजे ' The Buddha and his Dhamma ' हा होय. मानवतेचा दिव्य संदेश देऊन विश्वकल्याण साधणारा तो अत्यंत पवित्र ग्रंथ आहे. आधुनिक वेद–श्रुती–स्मृती व संहिता यांचे सम्यक दर्शन घडवून, मानवोन्नतीच्या सर्व अंगोपांगांच्या अमृतप्रवाहांनी निर्माण झालेला, तो अत्यंत पवित्र धर्मग्रंथ म्हणजे, विशाल पावन गंगाच !–तो सर्वश्रेष्ठ ग्रंथ म्हणजे मानवी जीवनातील प्रत्यक्ष सिद्धार्थच !

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रदीर्घ साहित्योपासनेचा सारनाथ आणि साहित्यिक दर्जा व उंचीचा कैलास कसा अगदी डौलाने खंबीर उभा आहे !

□ □ □

# २.

## डॉ. आंबेडकरांच्या अमरत्वाचा सुगंध

यवतमाळ जिल्ह्यातील पुसदनिवासी एक अभिवक्ते, काव्यतीर्थ श्री. ज. त्र्यं. पल्लेवार, 'जयेश' यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्यासंबंधीची अस्मिता दर्शविणारी संस्कृत-श्लोक-बद्ध 'भीममंजरी' सादर करून, कल्याणप्रद कार्याचा एक मंगल व पावन प्रवाह, समाजाच्या सांस्कृतिक जीवनात गतिमान केला, ही निःसंशय स्पृहणीय कृती होय.

'भीममंजरी' तेजस्वी व प्रभावी आहे; ती प्रेरक व बोधक आहे आणि ती मनोद्रव्यवाहिनी व शुभवर्तमानदर्शकही आहे.

पण, 'भीममंजरी' सारख्या भव्य, विशाल व पवित्र सरितेबाबत मजसारख्या खेड्याच्या काठी असलेल्या शुष्क ओहळाने सांगावे, काही दर्शवावे याचे दृढभाजक काही मला उमगले नाही. एरवी शुष्क व ओंगळ असलेला हा ओहळ, हा ओढा वर्षाऋतूतील पर्जन्यवृष्टीने भरकन भरतो, चटकन फुगतो आणि सरितेकडे वेगाने धाव घेतो, तेव्हा त्याला त्या विशालकाय सरितेचे-तिच्या भव्यतेचे व पवित्रतेचे जे सम्यक दर्शन घडते आणि मग तो थिजून जातो, त्याला आपली पात्रता व शक्ती कळून तो खजील होतो तसे काहीसे, प्रस्तुत पुस्तकाला प्रास्ताविक झिलई देताना, माझ्या बाबतीत झाले आहे.

वस्तुतः थोर विभूतीसंबंधी, व्युत्पन्न पंडितासंबंधी, असामान्य विद्वानासंबंधी आणि उत्तुंग प्रज्ञावंतासंबंधी, त्याच प्रभावळीतील विद्वानाने अधिकारवाणीने बोलायचे, प्रज्ञाशक्तीने भाष्य करायचे अथवा तपस्येने लिहायचे असते. पण तशी योग्य निवड न करता, 'भीममंजरी'च्या

जनकाने माझ्यासारख्या अडाणी खेडुताची, काही पूर्वपरिचय नसताही, जी निवड केली ते मला कोडेच आहे. लोकसभेसाठी काय वा विधानसभेसाठी काय उभ्या असणाऱ्या उमेदवाराला मत देण्याचा अधिकार वयाच्या एकवीस वर्षावरील भारतीय नागरिकाला आहे. मग तो नागरी असो वा ग्रामीण असो, तो शिक्षित असो वा अशिक्षित असो, तो श्रीमंत असो वा गरीब असो अथवा तो कोणत्याही जाती-जमातीचा असो. त्या दृष्टीने मापन करून कदाचित पुस्तककर्त्या बुद्धिवंताने, प्रस्तावनेच्या निमित्ताने माझे मत नोंदविण्याची संधी मला दिली असावी !

१८ मे १९७२. ग्रीष्म ऋतूतील ११४ तापमान असलेला तो दिवस. अगदी भर दुपारी अत्यंत प्रखर उष्णतेच्या झळा सोशीत कृष्णकांती असलेल्या मध्यम बांध्याच्या वयस्क गृहस्थाने द्वारावरील नीलरंगांकित पडदा हळूच बाजूला सारून, माझ्या अभ्यासिकेत प्रवेश केला. कुणास ठाऊक पण अनोळखी असलेल्या त्या व्यक्तीला पाहून, प्रथमदर्शनीच मला प्रसन्नता वाटली. शेजारच्या कोचावर, मुद्रेवरील घाम टिपत, ती व्यक्ती स्थानापन्न होतानाच तिने आपल्या मृदू बोलीत आपला परिचय दिला. ती व्यक्ती कृष्णकांती होती पण ती धवल प्रकृतीची होती, तिचा बांधा मध्यम होता पण तिला वाङमयीन उंची होती आणि ती वयस्क होती पण तिची व्यासंगी वृत्ती दमदार होती. सोज्ज्वळ व उदात्त भावनांच्या रेशमी पापुद्र्यांनी आच्छादित असलेली सरस्वती-हृदयाची ती मूर्ती म्हणजेच काव्यतीर्थ श्री. ज. व्यं. पल्लेवार. त्यांनी 'भीममंजरीचे' सुंदर हस्तलिखित माझ्या पुढ्यात ठेवून, तत्संबंधी थोडी पूर्वपीठिका निवेदिली. आणि मग, त्यातील तांबड्या शाईत नोंदलेले काही निवडक संस्कृत श्लोक मोठ्या तन्मयतेने त्यांनी वाचून दाखविले; त्याबरोबर, त्यांनी मनोज्ञ भाष्यही केले, बुद्धिखाद्याची तीन घटिकेची ती पर्वणी मला मोठी आल्हादकारी वाटली. श्री. पल्लेवारकृत 'भीम मंजरी' अकरा शीर्षकांखाली एकशे बासष्ट संस्कृत श्लोकांनी बद्ध असून, त्यांचे इंग्रजी, हिंदी व मराठीत भाषांतर दिले असल्याने वाचकवृंदाला सुलभतेने रसग्रहण करता येते. हे एकशे बासष्ट संस्कृत श्लोक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर या पुण्य-श्लोकाच्या महतीचे-त्यांच्या असामान्य विद्वत्ता व अद्वितीय कर्तृत्व यांचे मुक्तकंठाने गुणगान करणारी पवित्र स्तोत्रेच होत. सद्भावाच्या व निष्ठेच्या जलसिंचनाने ही स्तोत्रपुष्पे टवटवीत व मोहक असून, नेत्रपल्लवींना ती सुखवीत हृदयाला कसला तरी मानवोत्कर्षाचा संकेत देतात आणि आपल्या अक्षर व अक्षय सुगंधाने सहजतेने चित्त हरण करून, आत्मोन्नतीची प्रेरणा देण्यास समर्थ ठरतात.

अध्यात्मावगुंठित 'भीममंजरी'तील उत्कटतेने ओथंबलेल्या स्तोत्र-पुष्पांच्या सुगंधाने मन अगदी भारावून गेले; आणि कवी पल्लेवार 'जयेश' यांनी मोठ्या भक्तिभावाने आळविलेल्या प्रथम गुच्छातील प्रारंभीचे नमन श्लोक ओठावर इतके

तरंग लागले की आवरता आवरेना. भावतरंगावर तरंगणारे ते नमन श्लोक कानात नुसते गुंजत नाहीत तर हृदयातील पापुद्र्यांनाही ते नमवितात–

गीर्वाणगिरया पूतं । शापादप्युत्थितं ऋषिम्
विमलांगं त्रिमुक्ताङ्कं । भीमरावं नमाम्यहम्

आणि–

विख्यातं विधिपंडितं घटनया श्लाघ्यं त्रिलोके गतम्
प्रख्यातं सकपाळजं सकललोकलोभनीयं भृशम्
भीमाख्यं दलितेश्वरं दलगुरुं लोकोत्तरं मानवम्
वन्देऽहं दलिताग्रिमं दलपतिं भीमासुतं पावनम्

तद्वतच–

भीमो शास्त्रपटु: सदा विजयते भीमं दलेशं भजे
भीमेनाभिहतं सनातनमतं भीमाय तस्मै नम:
भीमान्नास्ति मुनीश्वरं गुरुवरं भीमस्य दासोस्म्यहम्
भीमे भावलय: सदा भवतु मे हे भीम मामुद्धर

या केवळ तीन नमन श्लोकांत कवी जयेशाने ज्या श्रद्धेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसंबंधी जे उदात्त भाव प्रवाहित केले आहेत आणि जी तेजस्वी व्यक्तिरेखा आलंकृत केली आहे तिची थोरवी काही आगळीच !

वदनं प्रसादसदनं सदयं हृदयं सुधामुचो वाच: ।
करणं परोपकरणं येषां केषां न ते वंद्या: ।।

या वचनानुसार बाबासाहेबांच्या प्रज्ञास्मितेपुढे कोणाचाही माथा विनम्र होईल. मर्यादशील पुरुषोत्तमाची जी सुलक्षणे आहेत आणि त्याच्या सदाचारयुक्त धर्माची जी उंची आहे व व्यक्तित्वाची जी प्रखर प्रभा आहे त्या निकषावर–

यथापि रुचिरं पुप्फं वण्णवन्तं सगन्धकं ।
एवं सुभासिता वाचा सफला होती कुब्बतो ।।

या धम्मपदातील वचनाप्रमाणे डॉ. आंबेडकर मनोहर, वर्णयुक्त व सुगंधित फुलासारखे 'आचारयुक्त पुरुषाचे सुभाषित' म्हणून दीप्तिमान आहेत; ती प्रभावी अभिव्यक्ती आविष्कृत करताना, कवी पल्लेवारांनी ज्या आंतरिक जाणिवेने 'भीममंजरी' रूप, रस व गंध यांनी घडविली आहे, ती केवळ हृदय पुलकितच करीत नाही तर मनोबलही वृद्धिगत करते.

'भीममंजरी'च्या सप्तम् गुच्छातील स्वर्ण जयंती पर्वात जे पंधरा स्तोत्र विशेषत्वाने नमूद केले आहेत, ते बाबासाहेबांच्या उच्चतम व श्रेष्ठतम व्यक्तिमत्त्वाची तेजस्वी ज्योत अन्तर्यामी प्रज्वलित करतात. त्या उत्तम स्तोत्रांपैकी,

जनकाने माझ्यासारख्या अडाणी खेडुताची, काही पूर्वपरिचय नसताही, जी निवड केली ते मला कोडेच आहे. लोकसभेसाठी काय वा विधानसभेसाठी काय उभ्या असणाऱ्या उमेदवाराला मत देण्याचा अधिकार वयाच्या एकवीस वर्षावरील भारतीय नागरिकाला आहे. मग तो नागरी असो वा ग्रामीण असो, तो शिक्षित असो वा अशिक्षित असो, तो श्रीमंत असो वा गरीब असो अथवा तो कोणत्याही जाती-जमातीचा असो. त्या दृष्टीने मापन करून कदाचित पुस्तककर्त्या बुद्धिवंताने, प्रस्तावनेच्या निमित्ताने माझे मत नोंदविण्याची संधी मला दिली असावी !

१८ मे १९७२. ग्रीष्म ऋतूतील ११४ तापमान असलेला तो दिवस. अगदी भर दुपारी अत्यंत प्रखर उष्णतेच्या झळा सोशीत कृष्णकांती असलेल्या मध्यम बांध्याच्या वयस्क गृहस्थाने द्वारावरील नीलरंगांकित पडदा हळूच बाजूला सारून, माझ्या अभ्यासिकेत प्रवेश केला. कुणास ठाऊक पण अनोळखी असलेल्या त्या व्यक्तीला पाहून, प्रथमदर्शनीच मला प्रसन्नता वाटली. शेजारच्या कोचावर, मुद्रेवरील घाम टिपत, ती व्यक्ती स्थानापन्न होतानाच तिने आपल्या मृदू बोलीत आपला परिचय दिला. ती व्यक्ती कृष्णकांती होती पण ती धवल प्रकृतीची होती, तिचा बांधा मध्यम होता पण तिला वाङमयीन उंची होती आणि ती वयस्क होती पण तिची व्यासंगी वृत्ती दमदार होती. सोज्ज्वळ व उदात्त भावनांच्या रेशमी पापुद्र्यांनी आच्छादित असलेली सरस्वती-हृदयाची ती मूर्ती म्हणजेच काव्यतीर्थ श्री. ज. व्यं. पल्लेवार. त्यांनी 'भीममंजरीचे' सुंदर हस्तलिखित माझ्या पुढ्यात ठेवून, तत्संबंधी थोडी पूर्वपीठिका निवेदिली. आणि मग, त्यातील तांबड्या शाईत नोंदलेले काही निवडक संस्कृत श्लोक मोठ्या तन्मयतेने त्यांनी वाचून दाखविले; त्याबरोबर, त्यांनी मनोज्ञ भाष्यही केले, बुद्धिखाद्याची तीन घटिकेची ती पर्वणी मला मोठी आल्हादकारी वाटली. श्री. पल्लेवारकृत 'भीम मंजरी' अकरा शीर्षकांखाली एकशे बासष्ट संस्कृत श्लोकांनी बद्ध असून, त्यांचे इंग्रजी, हिंदी व मराठीत भाषांतर दिले असल्याने वाचकवृंदाला सुलभतेने रसग्रहण करता येते. हे एकशे बासष्ट संस्कृत श्लोक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर या पुण्य-श्लोकाच्या महतीचे-त्यांच्या असामान्य विद्वत्ता व अद्वितीय कर्तृत्व यांचे मुक्तकंठाने गुणगान करणारी पवित्र स्तोत्रेच होत. सद्भावाच्या व निष्ठेच्या जलसिंचनाने ही स्तोत्रपुष्पे टवटवीत व मोहक असून, नेत्रपल्लवींना ती सुखवीत हृदयाला कसला तरी मानवोत्कर्षाचा संकेत देतात आणि आपल्या अक्षर व अक्षय सुगंधाने सहजतेने चित्त हरण करून, आत्मोन्नतीची प्रेरणा देण्यास समर्थ ठरतात.

अध्यात्मावगुंठित 'भीममंजरी'तील उत्कटतेने ओथंबलेल्या स्तोत्र-पुष्पांच्या सुगंधाने मन अगदी भारावून गेले; आणि कवी पल्लेवार 'जयेश' यांनी मोठ्या भक्तिभावाने आळविलेल्या प्रथम गुच्छातील प्रारंभीचे नमन श्लोक ओठावर इतके

तरंग लागले की आवरता आवरेना. भावतरंगावर तरंगणारे ते नमन श्लोक कानात नुसते गुंजत नाहीत तर हृदयातील पापुद्र्यांनाही ते नमवितात–

गीर्वाणगिरया पूतं । शापादप्युत्थितं ऋषिम्
विमलांगं त्रिमुक्ताङ्कं । भीमरावं नमाम्यहम्

आणि–

विख्यातं विधिपंडितं घटनया श्लाघ्यं त्रिलोके गतम्
प्रख्यातं सकपाळजं सकललोकलोभनीयं भृशम्
भीमाख्यं दलितेश्वरं दलगुरुं लोकोत्तरं मानवम्
वन्देऽहं दलिताग्रिमं दलपतिं भीमासुतं पावनम्

तद्वतच–

भीमो शास्त्रपटु: सदा विजयते भीमं दलेशं भजे
भीमेनाभिहतं सनातनमतं भीमाय तस्मै नम:
भीमान्नास्ति मुनीश्वरं गुरुवरं भीमस्य दासोस्म्यहम्
भीमे भावलयः सदा भवतु मे हे भीम मामुद्धर

या केवळ तीन नमन श्लोकांत कवी जयेशाने ज्या श्रद्धेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसंबंधी जे उदात्त भाव प्रवाहित केले आहेत आणि जी तेजस्वी व्यक्तिरेखा आलंकृत केली आहे तिची थोरवी काही आगळीच !

वदनं प्रसादसदनं सदयं हृदयं सुधामुचो वाचः ।
करणं परोपकरणं येषां केषां न ते वंद्याः ।।

या वचनानुसार बाबासाहेबांच्या प्रज्ञास्मितेपुढे कोणाचाही माथा विनम्र होईल. मर्यादशील पुरुषोत्तमाची जी सुलक्षणे आहेत आणि त्याच्या सदाचारयुक्त धर्माची जी उंची आहे व व्यक्तित्वाची जी प्रखर प्रभा आहे त्या निकषावर–

यथापि रुचिरं पुप्फं वण्णवन्तं सगन्धकं ।
एवं सुभासिता वाचा सफला होती कुब्बतो ।।

या धम्मपदातील वचनाप्रमाणे डॉ. आंबेडकर मनोहर, वर्णयुक्त व सुगंधित फुलासारखे 'आचारयुक्त पुरुषाचे सुभाषित' म्हणून दीप्तिमान आहेत; ती प्रभावी अभिव्यक्ती आविष्कृत करताना, कवी पल्लेवारांनी ज्या आंतरिक जाणिवेने 'भीममंजरी' रूप, रस व गंध यांनी घडविली आहे, ती केवळ हृदय पुलकितच करीत नाही तर मनोबलही वृद्धिगत करते.

'भीममंजरी'च्या सप्तम् गुच्छातील स्वर्ण जयंती पर्वात जे पंधरा स्तोत्र विशेषत्वाने नमूद केले आहेत, ते बाबासाहेबांच्या उच्चतम व श्रेष्ठतम व्यक्तिमत्त्वाची तेजस्वी ज्योत अन्तर्यामी प्रज्वलित करतात. त्या उत्तम स्तोत्रांपैकी,

डॉ. आंबेडकरांची विद्वत्ता, व्यक्तिमत्त्व, सेवाव्रतपालन, संघटनचातुर्य, कार्यमग्नता, शौर्यशाली व बलशाली नेतृत्व आदी गुणसमुच्चयाने पूर्णत: मंडित असून, ते भारताचे आधारस्तंभ बनले, असे भावदर्शक एक स्तोत्र :

विद्वत्ता व्यक्तिमत्त्वं च । सेवाधर्मस्य पावनम्
संघटनस्य चातुर्यं । कार्यं चापि चिरंतनम्
सामर्थ्यमयनेतृत्वं । आदिगुणसमुच्चयात्
भारतस्याभवत्भीम: । आधारस्तंभमेव तु

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रज्ञाशक्तीचे आणि ज्ञानशक्तीचे, त्यांच्या कार्यशक्तीचे आणि सेवाशक्तीचे व त्यांच्या राष्ट्रशक्तीचे आणि धर्मशक्तीचे दिव्यत्व काही आगळेच होते. काही प्रसंगी तर त्यांची स्थितप्रज्ञता तळपती राहत होती. श्री संत ज्ञानेश्वरांच्या शब्दांत–

ऐसा आपण चि केवल, होउनि असे निश्चल;
तेयाची प्रज्ञा अचल, निर्भ्रांत मानी
देखैं अखंडित प्रसन्नता, आधि जेथ चित्ता;
तेथ रिगणे नाही समस्तां, संसार दु:खां.

त्याच स्थितप्रज्ञेच्या पोटी, 'बुद्धिर्नाम निश्चयात्मिकान्त:करणवृत्ति: ।' जेथे अटळ निश्चय असतो, त्या अन्त:करणाच्या वृत्तीलाच बुद्धी असे म्हणतात आणि 'एतेषां प्रकाशात्मकत्वात् सात्त्विकांशकार्यत्वम् ।' बुद्धी, मन व ज्ञानेन्द्रिये ही जीवनात प्रकाश निर्माण करणारी असल्यामुळे ती सात्त्विकांशांची कार्ये करीत असतात, हा जो उच्च व उदात्त भाव सामावलेला आहे, त्याने बाबासाहेबांचे व्यक्तित्वरांजण काठोकाठ भरले होते.

ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषत: ।
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ।।

जीवनात जे काही आहे ते स्वयंभू ज्ञानात आहे. सत्कृती, सत्क्रिया व सत्कर्म यांच्या प्रकर्षाने पावन प्रकृती निर्माण होते. स्वयंभू क्रिया सुरू होताच ज्ञेयकारी ज्ञानाची प्रकृती साकार बनू लागते. आणि मग, ज्ञाता–ज्ञेय–ज्ञान आत्मज्ञानात एकजीव होतात. तेव्हा त्या आत्मज्ञानाच्या शक्तीने जीवन तेजोमय होत असते. बाबासाहेबांचे स्वयंभू व स्वयं प्रकाशित जीवन, अगदी असेच आत्मतेजाने, आत्मज्ञानाने आणि आत्मबलाने, लखलखत होते; व त्या लकाकीवर त्यांची अमृतमय प्रकृती डोलत होती.

सूत सूतें गुंतले । तृण तृणेंचि बांधिले ।।
का आत्मबिंबा घेतले । बाळके जळीं ।।

तया परी देहाकारें । आपणपेंचि दुसरे ॥
देखोनि जीव आविष्कारे । आत्मबुद्धि ॥

अशा आत्मबुद्धीच्या चैतन्यमय प्रकृतीने त्यांनी दुःखितांचे दुःख हरण करून, समाजजीवनात आणि राष्ट्राच्या प्रपंचात उद्धारक प्राण घातला. ' जिही आपल्या सर्व यत्ने । पराचे क्लेश परिहरणे । श्रमोनि पुढिल्या सुख दावणे । तो एक धन्य संसारी ॥ ' मुक्तेश्वरांच्या या वचनकसोटीवरही बाबासाहेबांनी मात केली होती आणि ध्येयसिद्धीस्तव, ' उपासना म्हणिजे ज्ञान । ज्ञाने पाविजे निरंजन । योगियांचे समाधान । येणे रीती ॥ " या स्वामी रामदासांच्या उक्तीपलीकडेही आपली पावले टाकली होती. अशा व्यापक व भव्यतादर्शक दृष्टिशलाकांच्या वलयातून ' भीममंजरी 'त बाबासाहेबांच्या प्रकृती व प्रवृत्ती, ध्येयधारणा व कार्य-सिद्धी यांचे जे सम्यक दर्शन घडविण्यात आले आहे, ते निश्चितच चैतन्यपूर्ण आणि मानवहितैषी आहे.

' भीम मंजरी 'तील स्तोत्र–मंत्रांनी भारावलेल्या अवस्थेत असतानाच, २८ मे १९७२ हा बौद्धपौर्णिमेचा मंगल दिन उजाडला. या शुभ दिनी माझी तृतीय कन्या चि. क्षमा हिचा तिन्ही सांजेला विवाह–मुहूर्त होता. तो विवाह शुद्ध बौद्ध पद्धतीने घडावा अशी माझी मनीषा. हा पवित्र लग्नविधी भदंत आनंद कौसल्यायन यांच्यासारख्या बौद्धधर्मगुरूंच्या हस्ते व्हावा आणि तो आदर्शवत ठरावा अशी माझी आंतरिक इच्छा. कारण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म चक्र प्रवर्तन केल्यानंतर, बौद्धजनात ज्या बौद्धपद्धतीने विवाह संपन्न होऊ लागले ते अवलोकून माझे मन विषण्ण झाले होते. बौद्ध आचारसंहिता नीट उमगून घेतली नसल्याने आणि त्यातून बौद्धपद्धतीच्या विवाहविधि–पद्धतीची रीती सूत्रबद्धतेने कशी पाळावी याची पुरती कल्पना नसल्याने, जे काही मनमाने प्रकार दृष्टोत्पत्तीस येऊ लागले त्यापासून बोध घेऊन, बुद्धप्रणीत व आंबेडकर पुरस्कृत अशा निसर्गमंगलत्वाच्या शूचितापूर्ण बौद्ध-विवाह–विधि–पद्धतीचा एक नमुना प्रदर्शित करावा या सद्भावनेने मी कळवळून भदंत आनंद कौसल्यायन यांना हाक दिली. पण त्यांनी, " मेरे पास समय नहीं है, और ना कोई दूसरा भिक्कू है । आप और कोई दूसरा भिक्कू ढूंडो । " या त्यांच्या प्रतिष्ठेला शोभणाऱ्या स्वच्छ उत्तरातील नकारात; खंत वाटण्याऐवजी, मला एक वेगळीच प्रेरणा लाभली ही काही कमी समाधानाची बाब नव्हती ! या प्रसंगी एका घटनेचे प्रकर्षाने स्मरण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्म चक्र प्रवर्तन केले. तत्पूर्वी आणि नंतर त्यांच्याशी ' बौद्ध अध्यात्म साहित्य आणि संस्कृती 'बाबत जी सर्वस्पर्शी व सर्वहितैषी चर्चा झाली होती त्याचा एक बोधक आलेख नजरेपुढे तरळला. त्या अन्तर्गत मी एक उदात्त स्वप्न आकारून ठेवले होते. ' बौद्धधर्मप्रणीत आचारसंहितेला व तत्त्वज्ञानाला धरून, विद्यासंपन्न व चारित्र्यसंपन्न बौद्धपंडित सदाचार, सत्प्रवृत्ती आणि सद्भावना

यांच्या आविष्कारार्थ धीरोदात्ततेने व दमदारपणाने समाजजीवनात आपली तेजस्वी पावले उमटवितील; बौद्ध–अध्यात्म पीठावरून ते, आपल्या प्रज्ञेच्या व ज्ञानाच्या छत्राखाली, बौद्धधर्म आचारसंहितेने युक्त असे सेवामय प्रकृतीचे आणि सदाचारी वृत्तीचे व अध्ययनशील मनोधारणेचे आणि निष्कलंक चारित्र्याचे अनेक भिक्कू घडवितील; आणि मग, बौद्ध पंडित काय व महास्थवीर काय, बौद्ध गुरू काय व भन्ते काय आणि भिक्कू काय व श्रमणेर काय हे सर्व भारताच्या शहराशहरांतूनच नव्हे तर खेड्यापाड्यातून निःस्वार्थ, निःस्पृह, निगर्वी व निर्विकार सेवाबुद्धीने संचार करून, समतेचा-एकात्मतेचा-बन्धुत्वाचा व मानवतेचा दिव्य संदेश देत, ते विशेषतः दलित व बौद्धजनात तरी, क्षात्रतेजाबरोबर बौद्ध अध्यात्म, साहित्य आणि संस्कृती संवर्धित करतील आणि भारतभर सत्कृत्यांच्या मंगल व पावन बौद्ध ज्योती निर्माण करण्यास समर्थ ठरतील ', असे ते माझे स्वप्न होते.

पण सध्या तरी माझ्या त्या स्वप्नाला तडा गेली, ते भंगले ! माझी व्यथा ही की, बौद्ध धर्म चक्र प्रवर्तनाला आज तब्बल सोळा वर्षांचा कालावधी लोटून गेल्यावरही बौद्धपिंड उद्धाराच्या व्यापकतेने आविष्कृत झाला नाही आणि ना बौद्ध आध्यात्मिक पिंड उदात्ततेने तेजोवर्धित झाला; ना बौद्ध संस्कृती विशालतेने आलंकृत झाली आणि ना बौद्ध साहित्याची कक्षा प्रचार व प्रसाराच्या दृष्टीने सालंकृत होऊन विस्तारली; दुःख हे की बौद्धधर्मचक्रप्रवर्तनानंतर जे जेमतेम भदंत वा भिक्कू झळकले त्यांपैकी काही प्रदेश, भाषा व मूळ जातीच्या अभिनिवेषाने मिरवू लागले; तर, ज्या काही भिक्कूंनी दीक्षा घेतली त्यांपैकी काहींना तर कसले ज्ञानच नाही, कसली प्रज्ञाच नाही; उलट, हे महाभाग नाममात्र काषाय वस्त्रे परिधान करून एका वेगळ्या ढंगात व एका वेगळ्या धुंदीत ऐटीने वावरू लागले. खंत ही की, ज्या असंख्य दलितांनी अभिमानपूर्वक व प्रतिज्ञापूर्वक बौद्धधर्माची दीक्षा घेतली, त्या बौद्धजनात आता जाती–पोटजातीचा वाद उफाळून आला; प्रत्येक पोटजात आपले वेगळे अस्तित्व व वेगळे वैशिष्ट्य दर्शवायला लागली; त्याचा परिणाम, लग्नादी संबंधांवर तर झालाच, पण शिवाय, आपापल्या भल्याचेच गट निर्माण होऊ लागले नाहीत तर त्याचे पर्यवसान वेगवेगळे राजकीय पक्ष निर्माण होऊन आपसातच संघर्षाची लाट उसळू लागली आणि एकसंघतेला व एकात्मतेला तीव्र तडा जाऊन, मतमतांतरांच्या तीक्ष्ण फेकांनी बौद्धसमाजजीवनात वैफल्याबरोबर गटगटांची शकलें पडू लागली; आणि विषाद हा की, आता धर्म व अध्यात्माच्या अमृतकुंडात राजकारणाचे कढते पाणी सळसळून उकळू लागले !

निर्दिष्ट व्यथेच्या कथेतील मर्म, बौद्धधर्मावर असीम श्रद्धा आणि बौद्धधर्मचक्रप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर नितांत निष्ठा राखणाऱ्या बौद्धजनांनी, केवळ उमगूनच न घेता, सध्याच्या दाहक, आत्मघाती व अधोगतीप्रत नेणाऱ्या परिस्थितीचे, सावधगिरी राखून एकात्मतेने असे वेगाने परिवर्तन घडवून आणण्यास

हिरिरीने झटावे की ज्यामुळे बौद्ध धर्म, अध्यात्म, साहित्य आणि संस्कृती उदात्ततेने आविष्कृत होईल व बौद्धजनांची संघशक्ती वृद्धिंगत होऊन, त्यांचा मानवतावादी पिंड तेज:पुंज बनेल ! – बौद्ध आचारसंहिता व संस्कृतीच्या पालनाने त्यांचे सांस्कृतिक व नैतिक जीवन फुलेल आणि सुगंध दरवळू लागेल !

त्या दृष्टीनेच, मी माझ्या कन्येचा विवाहविधी, आध्यात्मिक बैठकीवरून, बौद्धपद्धतीने संपन्न करायचे ठरविले होते. त्या मंगलविधीच्या पौरोहित्यास भदंत आनंद कौसल्यायन यांचा, कोणत्या का कारणाने असे ना, नकार मिळाला हे बरेच झाले. त्याऐवजी निसर्गसंकेतानुसार आन्तरिक प्रेरणेने बौद्ध भिक्कू झालेले सुमेध आम्हाला लाभले हे विशेष. भदन्त सुमेध यांनी, १० डिसेंबर १९५४ रोजी, भगवान बुद्धाच्या ज्ञानप्राप्तीच्या तपस्येने पुनीत झालेल्या बुद्धगया येथे, ब्रह्मदेशाचे प्रज्ञावंत महास्थवीर उत्तमा यांच्या शुभहस्ते बौद्धदीक्षा घेतली होती. ते जेव्हा एका बौद्धधर्मकार्यास्तव औरंगाबादला गेले होते तेव्हा मिलिंद महाविद्यालयात त्यांची आणि बाबासाहेबांची भेट झाली होती. डॉ. आंबेडकरांना बौद्ध धर्मचक्रप्रवर्तन करायचे असल्यामुळे ते कोण्या बौद्ध पंडिताच्या नेतृत्वाखाली करावे, असा प्रश्न उपस्थित झाला. त्या महत्त्वपूर्ण चर्चेत उत्तरप्रदेशाच्या देवरिया जिल्ह्यातील कुशीनगरचे ज्येष्ठ व श्रेष्ठ बौद्ध पंडित आणि थोर प्रज्ञावंत महास्थवीर चन्द्रमणी यांना निमंत्रित करण्याचे निश्चित झाले. महास्थवीर चन्द्रमणी यांना पाचारण करण्याची मोलाची कामगिरी भिक्कू सुमेध यांनी स्वीकारावी, अशी विनंती बाबासाहेबांनी केली आणि ती सहर्ष पाळून, सुमेधजींनी आपली जबाबदारी आत्मीयतेने पूर्ण केली. या घटनेला ऐतिहासिकदृष्ट्या विशेष महत्त्व असल्याने ती येथे नमूद करणे आवश्यक आहे. त्याच भदंत सुमेध यांनी माझ्या संकल्पित योजनेनुसार, माझ्या कन्येचा विवाहविधी, बौद्धशास्त्राबरहुकूम, बौद्धपद्धतीने यथोचित पार पाडला आणि बौद्धपद्धतीचा आदर्शवत मंगल विवाहविधी कसा असावा याचे एक चैतन्यपूर्ण प्रतीक दर्शविले. या घटनेलाही साहित्य आणि संस्कृती या दृष्टीने महत्त्व असल्यामुळे, त्याचा साभिमानाने उल्लेख केला पाहिजे कन्येच्या लग्नसोहळ्याला बौद्ध, दलित आणि विशेषत: ब्राह्मण, ब्राह्मणेतर, मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, पंजाबी, गुजराथी, लिंगायत वाणी, जैन, महानुभाव आदी विविध जातिजमातीचे विविध धर्म-पंथ व संप्रदायाचे स्त्री-पुरुष प्रामुख्याने उपस्थित होते. बौद्धपद्धतीचे लग्न काही कुणाला नवीन नव्हते पण बौद्धशास्त्रपद्धतीनुसार एका नावीन्यपूर्ण रीतीने निर्दिष्ट विवाहविधी होणार असल्याचे कळले असल्यामुळे एक प्रकारची कुतूहलता निर्माण झाली होती. बौद्धसंस्कृतिदर्शक असा तो एक माझा अल्पसा प्रयोग होता. यथासांग बौद्धविधी आटोपला. पौरोहित्य करणाऱ्या भिक्कूने शेवटी 'साधु–साऽधु–साऽधु' असा त्रिवार उच्चार केला आणि उपस्थितांनी सप्तरंग मिश्रित पुष्पाक्षता वधूवरांवर उधळत असतानाच शहनाईचे (सनईचे)

शास्त्रोक्त अत्यंत मधुर स्वर निनादले. त्यात टाळचांचा ध्वनी आणि जयघोषाचे सूर शास्त्रोक्त स्वरांना स्पर्शून गेले. तोच ' भीममंजरी 'तील दहाव्या गुच्छांकित धर्मपरिवर्तनासंबंधीचा जयघोष करणारा श्लोक माझ्या मनश्चक्षूंपुढे तरंगला—

' जयभीम ' निनादति अंत्यजे । ' जयबुद्ध ' निनादति मंदिरे
' जयधम्म ' निनादति मंडले । ' जयनाद ' निनादति अंबरे

या श्लोकातील—या स्तोत्रातील ' जयभीम,' ' जयबुद्ध,' ' जयधम्म ' व ' जयनाद ' हे चार जयघोषाचे शब्द, मंत्रमुग्ध करणाऱ्या सनईच्या ध्वनिलहरीवर तरंगून, लग्नपीठावरील अशोकचक्रांकित वर्तुळातील भगवान बुद्ध व पुण्यश्लोक डॉ. आंबेडकर यांच्या भव्य प्रतिमांभवती सारखे गुंजत आहेत, असे वाटले व त्या प्रतिमातील आकाराची वलये कसला तरी संकेत देत, त्या ध्वनीसह मजकडे वेगाने झेप घेऊन, मला त्या वलयात वेष्टून टाकीत आहेत असे जाणवल्यामुळे माझी मूळची अस्वस्थ प्रकृती अधिक अस्वस्थ झाली— त्या प्रसन्न वातावरणातही मन अगदी बेचैन झाले. शरीर कंपित झाले. घर्मबिंदूंनी मुद्रा डबडबली, ओठ सुकले, कंठ शुष्क झाला. हे कोण्या एका मुस्लिम युवतीच्या लक्षात येऊन तिने धाव घेऊन पाण्याचा घोट दिला. पण तप्त हृदय शीतल झाले नाही. कोण्या एका ब्राह्मण-तरुणीने माथ्यावर मानाचा टिळा लावला. पण माथ्याचे गतिचक्र स्थिर व शांत झाले नाही. कोण्या एका बौद्ध कन्येने अत्तर लावून, गुलाब पाण्याचा शिडकाव केला. पण प्रसन्नता लाभू शकली नाही. एका बालकाने दुडदुडा धावत येऊन एक पेढा मुठीत कोंबला. पण घामाने मुठीतच विरघळला. त्याची गोडी चाखता आली नाही. त्या अस्वस्थ, बेचैन अवस्थेतच, निसर्गस्तवन करीत मी माझ्या कन्येला निरोप दिला आणि मग, त्या बौद्धपौर्णिमेच्या मध्यरात्री घरी परतलो तरी कंपित शरीर शांत झाले नाही; बेचैन मन विसावले नाही. हृदयात कसले तरी शल्य बोचत होते, कसली तरी व्यथा कण्हत होती, कसले तरी दु:ख सलत होते. असे का ते काही कळत नव्हते, काही उमगत नव्हते. अंगणातच कसाबसा बसून, आभाळा-तील पूर्ण चन्द्रबिम्बाकडे, त्याभवतीच्या तेजस्वी ताऱ्यांकडे कितीतरी वेळ टक लावून होतो. एक प्रकारची ती तंद्री होती. तिसऱ्या प्रहरी एक लखलखता तारा नीलांबरावर एक शुभ्र रेखा ओढीत दूर कुठे तरी गळून पडला ! मी एकदम चमकलो. त्या शुभ्र तेजस्वी रेखेत बाबासाहेबांची ध्यानमग्न भव्य मूर्ती पूर्णा-कारात काही संकेत देत असल्याचे मला वाटले. मी एकदा त्यांच्या ध्यानमग्न असलेल्या मूर्तीचे जे शब्दचित्र रेखाटले होते ते जसेच्या तसे मनश्चक्षूंपुढे उभे राहिले :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुण्य स्मरण होताच एक अत्यंत गंभीर, प्रशांत, भव्य व तेज:पुंज मूर्ती नजरेपुढे उभी राहते. असामान्य विद्वत्तेची साक्ष देणारा

त्यांचा लकाकणारा विशाल माथा, तत्त्वसंकेत देणारे त्यांचे तेजस्वी टपोरे डोळे, कुशाग्र–तरळ बुद्धीची प्रभावी चमक दाखविणारी त्यांची धारदार नासिका, कार्य-कठोर–न्यायनिष्ठुर व ध्येयनिष्ठापूर्ण असलेली त्यांची अत्यंत करारी प्रशस्त मुद्रा, सद्‌गुणांच्या रत्नांनी शिगोशीग भरलेले हृदय, कितीही पाशवी प्रहार झाले तरी ते सहन करीत जाऊन, झुंजार वृत्तीने नेटाने लढा देणारी त्यांची विस्तीर्ण निधडी छाती आणि तुफानी वादळातही रतिमात्र न डगमगता खंबीरतेने उभी असलेली व दुर्धर प्रसंगांनाही आव्हान देणारी धिप्पाड शरीरयष्टी मनश्चक्षूंसमोर प्रकट होते आणि त्या दिव्य मूर्तीला वंदन करण्यासाठी माथा अभावितपणे विनम्र होतो. राष्ट्रकर्तव्याची तीव्र जाणीव करून देऊन, सद्भावनांची प्रेरणा देत ती तेज:पुंज धीर गंभीर मूर्ती लगेच एक वेगळे दैदीप्यमान रूप धारण करते, आध्यात्मिक तेजाने ती लखलखू लागते. डोके गुळगुळीत आहे व सारे ब्रह्मांड तेथे एकवटून ते आगळ्या आध्यात्मिक शक्तीने लकाकत आहे. नवचैतन्याने प्रकाशमान झालेल्या त्या मूर्तीने विश्वशांतीची काषाय वस्त्रे परिधान केली आहेत. संजीवनी विद्येने भरलेले कमंडलू तिच्या एका हातात असून, सत्पथदर्शक काही तिच्या दुसऱ्या हातात आहे. नव्या रूपाने व नव्या तेजाने अस्तित्वात येणाऱ्या विश्वोद्धारक धर्माच्या अत्युच्च सिंहासनावर आरूढ होण्यासाठी तिची पावले पुढे पडत आहेत आणि तिच्या मुखातून सारे आसमंत भारून टाकणारे गंभीर मंत्र उच्चारले जात आहेत. ‘नमो तस्स भगवतो अरहतो सम्मा संबुद्धस्स।’ असे त्रिवार उच्चारून– ‘बुद्धं सरणं गच्छामि। धम्मं सरणं गच्छामि। संघं सरणं गच्छामि।’ या त्रिशरणांचाही त्रिवार उच्चार करून, ती मूर्ती बौद्धधर्मसिंहासनावर विराजमान होते. आसनबद्ध होताना तिने आता आपले दोन्ही पाय दुमटून दोन्ही चरण मांड्यांना टेकले आहेत. परस्पर दोन्ही दिशांना ते दोन्ही तळ समानतेने एका जीवरेषेत, निरामय भावयुक्त झाले आहेत. तिने डाव्या हाताची तर्जनी व करांगळी बाह्यस्वरूपदर्शनासाठी मोकळी ठेवून उरलेली तीन बोटे सत्त्वरूप प्रधान आन्तर्भाव निदर्शनास्तव हृदयाला टेकली आहेत. तिने आपल्या उजव्या हाताची प्रथमा व उत्तरा अशी जीवोद्धारक रूप दर्शविणारी बोटे मोकळी ठेवून हृदयाच्या अग्रभागी, तर्जनी व अंगठ्याची टोके पूर्णावस्थेचे प्रतीकदर्शक म्हणून जुळविले आहेत आणि त्याला डाव्या हाताची करांगळी दक्षिण भागी व तर्जनी उत्तरभागी स्पर्शती राखली आहे. षड्‌रिपूंपासून व ऐहिक लालसेपासून मुक्त असा जीवात्मा आणि अन्तरात्मा यांच्या अनुबन्धाची सीमा व्यक्त केली आहे. त्या मूर्तीची मुद्रा अगदी निर्विकार असून, सत्य–अहिंसा–दया–प्रेम व शांती हे सात्त्विक पंचभाव त्या मुद्रेवर विलसत आहेत. तिचे नेत्रपल्लव मिटले आहेत व अन्तर्मुख होऊन जनकल्याणाच्या दिव्यज्ञानप्राप्तीस्तव ती ध्यान-मग्न झाली आहे. होय, भगवान बुद्धाच्या रूपात प्रवर्तित झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्या मूर्तीचे ते मंगल रूप आणि ध्यान पाहून, दोन्ही कर सहजतेने

जुळतात आणि ' यथाप्राप्त होई ते दिव्य ज्ञान । अगा काय वर्णू ते रूप, ध्यान ।। ' असे अक्षरवाङमयीन शब्द ओठावर तरंगतात !"

अशा आशयाचा उदात्त आविष्कार ' भीममंजरी 'तील पाचव्या व सहाव्या ' व्यक्तिदर्शनम् ' आणि ' जीवनकार्यम् ' या दोन गुच्छांत विशेषत्वाने घडविण्यात आला आहे. बाबासाहेबांच्या उच्च व्यक्तिमत्त्वाबाबत ' व्यक्तिदर्शनम् ' गुच्छात जे बारा श्लोक आणि ' जीवनकार्यम् ' गुच्छात जे अठरा श्लोक ग्रथित झाले आहेत त्यातील प्रत्येक चरणातील प्रत्येक शब्दात बाबासाहेबांच्या असामान्य व्यक्तित्वाचा अमृतरस पाझरत आहे; त्यांच्या प्रभावी व पावन कर्तृत्वाचा सुगंध दरवळत आहे; आणि त्यांच्या सेवामय प्रकृतीचे तेज लकाकत आहे. त्यांची मुद्रा, पोषाख, भाषण, निवड, जन्म, यश, हृदय, हास्य, बोलणे, जीभ, पाठान्तर, लिखाण, अभ्यास, प्रतिष्ठा, विचार, प्रवास, प्रार्थना, पाय, तेज, संग्रह, चाल, जीवन आदी सर्वच काही गोड आहे, मधुर आहे, हे दर्शविणाऱ्या तीन श्लोकांपैकी एक असा :

भ्रमणं मधुरं भजनं मधुरम् । चरणं मधुरं चयनं मधुरम् ।।
चलितं मधुरं चरितं मधुरम् । दलिताधिपतेरखिलं मधुरम् ।।

ह्या दलिताधिपतीची एकूण अस्मिता केवढी व्यापक व केवढी उत्तुंग हे दर्शविताना कवी अभिमानाने उद्‌गारतो—

पारावारस्य गांभीर्यं । नगस्योदात्तता तथा ।
तेजस्विता च सूर्यस्य । खस्यागम्यत्वमस्ति च ।।

म्हणजे त्यामध्ये समुद्राची गंभीरता, पर्वताची उदात्तता, सूर्याची तेजस्विता आणि आकाशाची उच्चता होती इतकेच नव्हे तर, युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल व सहदेव या पाच पांडवांमध्ये जे जे गुण होते ते ते एक समयावच्छेदे करून डॉ. आंबेडकरांमध्ये प्रकर्षाने एकवटले होते—

वर्गीय लक्ष्मप्रतिरोधनार्थम् । युद्धे स्थिरत्वेन युधिष्ठिरस्त्वम् ।
बलिष्ठकायेन हि भीमसेनः । धुरंधरत्वेन किलार्जुनो वै ।।
विद्वत्तया त्वं नकुलो द्वितीयः । वाग्–खड्ग युद्धे निपुणेन चापि ।
श्रीसहदेवः समरे रिपुघ्नः । तवास्ति पिंडे खलु पांडवत्वम् ।।

म्हणजे युधिष्ठिरातील स्थिरता, भीमासारखी बलवत्ता, अर्जुनासारखी धुरंधरता, नकुलासारखी विद्वत्ता आणि सहदेवासारखी खड्‌गनिपुणता अंगी बाणली असल्याने डॉ. आंबेडकर हे पांडवप्रतापतुल्य दलितोद्धारक वीर पुरुष होते, असा वीरश्रीयुक्त भाव उपरिनिर्दिष्ट श्लोकात अन्तर्भूत आहे. त्याप्रमाणेच बाबासाहेब दलितांचे उद्धारक व सुधारक, स्वभावाने शांत व दयाळू, जीवनात शिस्तबद्ध असून, ते दलितांचे वरदाते आहेत; ते शूरवीर असून त्यांनी शूद्रवर्गीयांची मने जिंकली. ते

सुसंस्कृत व विद्वान असून, त्यांनी विधिशास्त्र व धर्मशास्त्राचे श्रेष्ठ पंडित म्हणून लौकिक प्राप्त केला. असे हे अधिकारी पुरुष वंदनीय होत या भावार्थाच्या उच्च श्लोकाने पाचवे गुच्छ अधिक भरदार झाले आहे.

उद्धारकोऽसि दलितस्य, सुधारकोऽसि
शान्तोऽसि सुनियमितोऽसि दयान्वितोऽसि
वीरोऽसि वर्णवरदोऽसि दलेश्वरोऽसि
शूरोऽसि शूद्रजनमानसमोहजोऽसि
संस्कारितोऽसि विधिपंडितशेखरोऽसि
वेत्ताऽसि धर्मवचनस्य तु वंदनीय:

पण या श्लोकाला जोडून असलेला दोन ओळींचा चरण अर्थाचा अनर्थ करणारा वाटतो.

त्वय्यस्ति भीम ! सकलं परमेकमूनम्
शूद्रे कुले किल तवास्ति हि जन्म नूनम्

म्हणजे ' हे भीमा ! आपल्याजवळ सर्व काही आहे पण एक उणीव मात्र आहे, ती ही की, आपला जन्म शूद्र कुळातला आहे.' याचा भावार्थ असा होईल की डॉ. आंबेडकर सर्व बाबतीत श्रेष्ठ आहेत पण त्यांचा शूद्र कुळात जन्म झाला असल्याने श्रेष्ठत्व व थोरत्व असूनही नसल्यासारखे आहे–सारे व्यर्थ आहे. वस्तुतः कवीच्या मनात असा काही अनर्थकारी अर्थ निघेल असे काही नसावे. परंतु तसा अर्थ वा भाव प्रतीत होत असल्याने, हे चरण तीव्रतेने जाणवते !

त्याचप्रमाणे, नवव्या गुच्छात 'हा हंत अस्पृश्यता' या शीर्षकाखाली दर्शविलेले काही श्लोक वर्णभेद व जातिभेद दर्शविणारे असले तरी पार्श्वभूमी पुरती विशद न केल्या गेल्यामुळे अगदी ठिसूळ, रसहीन व पूर्णतः भावहीन वाटतात. अशा श्लोकांची 'भीममंजरी'त भर टाकण्याची आवश्यकताच नव्हती. त्यामुळे अनाठायीचा कवीसंबंधी गैरसमज निर्माण होण्याची, माझ्या तरी दृष्टीने, शक्यता आहे. नमुन्यादाखल पुढील श्लोक पाहा–

बुधाग्रवासी न च विप्रजन्मा
सुवस्त्रधारी न च दर्शनीय:
सुशास्त्रवेत्ता न च धर्मगन्ता
महान् बलिष्ठो न च भीमसेन:

'विद्वानात श्रेष्ठ आहे, पण जन्माने ब्राह्मण नाही सुंदर पोषाख आहे, पण दर्शनीय नाही. शास्त्रवेत्ता आहे, पण धर्मगुरू नाही. महान बलवान आहे, पण भीमसेन नाही; अशा अर्थाच्या लोकांनी डॉ आंबेडकरांच्या अस्मितेला झळ पोचणारी आहे.

कवीचे म्हणणे तसे नसेल, इतर शिष्टांचे असेल, पण त्याने कोणता सद्भाव साध्य होणार ? ' भीममंजरी ' रूपी दुधाच्या पेल्यात निर्दिष्ट श्लोकरूपी मिठाचे खडे टाकून, दूध नासविणेच ठरेल ! तद्वतच ' भीममंजरी 'कारांनी दहाव्या गुच्छातील ' धर्मपरिवर्तनम् ' पर्वात–

बुद्धं शरणं गच्छामि
धर्मं शरणं गच्छामि
संघं शरणं गच्छामि
भीमं शरणं गच्छामि

हा जो मंत्रश्लोक देण्यात आला आहे तो योग्य वाटत नाही. त्यातील ' शरणं ' या शब्दाऐवजी ' सरणं ' हा शब्द हवा. ' शरणं 'चा अर्थ शरण जाणे असा घेण्यात आला आहे. तो बरोबर नाही. ' शरणं ' नव्हे ' सरणं 'चा अर्थ अनुसरणे असा आहे. भगवान बुद्धाला शरणागती मुळीच मान्य नव्हती. ' शरणा 'त गुलामगिरी, लाचारी येते. ती पूर्णतः नष्ट करून, समतेचा व मानवतेचा बुद्धाने पुरस्कार केला. मग जी गोष्ट त्यांना अभिप्रेत नव्हती ती तशी दर्शविणे उचितच नाही, हे कटाक्षाने लक्षात घेतले पाहिजे. तसेच, बुद्धाने स्वतःला, त्यांच्या धर्माला आणि त्यांच्या संघाला शरण येण्याबद्दल कुठे काहीच सुचविले नव्हते. तेथे स्वेच्छेने अनुसरण करण्याचा प्रश्न आहे. ' बुद्धं ' म्हणजे बुद्धप्रणीत बुद्धी, ' धम्मं ' म्हणजे बुद्धप्रणीत धम्मपद, ' संघं ' म्हणजे बुद्धप्रणीत संघशक्ती; आणि आता ' भीमं ' म्हणजे भीमाची अस्मिता. तसेच, त्रिसरणात ' धर्मं ' नाही ' धम्मं ' असा शब्द हवा. आणि ' submit ' ऐवजी ' adopt ' शब्द अधिक उचित. अकराव्या गुच्छातील ' महानिर्वाणम् ' या शेवटल्या पर्वात, बाबासाहेबांच्या महानिर्वाणाबाबत, ' यद्यस्ति भीमः परलोकवर्ती ' या चरणात ' परलोकवर्ती ' (To the next world) असा शब्द वापरला आहे. बौद्धधर्मसंकेतानुसार ' परलोक ' मानला गेला नाही. त्यात, ' महानिर्वाण ' किंवा ' महानिर्वाणपद ' आध्यात्मिकदृष्टीने, विशेष संकेत दर्शविणारे म्हणून योजिले आहेत. त्याचा संबंध निसर्गात विलीन होणाऱ्या अज्ञात सृष्टीतील एका वेगळ्या केन्द्रबिन्दूशी निगडित आहे; आणि तो अव्यक्त रूपाचा शेवटला मार्ग असतो, जो निसर्गातील चैतन्याशी जोडला जातो. म्हणजेच, निसर्गनिर्मित मानव दृश्य जगातून अगदी अन्ताला त्याच निसर्गाच्या अदृश्य जगाच्या एका प्रबल घटकाशी एकरूप होतो, तेच महानिर्वाणपद होय. त्याचप्रमाणे, या पर्वातील एका श्लोकात, ' कल्याणकारी भदन्त भीम यांची विशाल काया काळाने ग्रासली असली तरी कीर्तिरूपाने त्यांची काया कायम आहे,' अशा अर्थाचा जो भाव प्रदर्शित करण्यात आला आहे, तोही समर्पक वाटत नाही. ' कीर्तिकायेन शोषितः ' हे शब्दप्रयोग वापरले आहेत. काया म्हणजे देह, शरीरयष्टी. ती अमर नसते, नश्वर

असते. मानवाचा मृत्यू झाला तर त्याला जमिनीत पुरतात. कायेची–देहाची– शरीराची माती होते; किंवा त्याला अग्निसंस्कार देतात, त्याची राख होते. मग कीर्तिरूपाने 'काया कायम' कशी राहील ? कीर्ती उरते ती त्या मानवाच्या कर्तृत्वाची, त्याच्या सत्कृत्यांची, त्याच्या व्यक्तित्वाची. दर्शविलेले असे काही दोष मला दिल्या गेलेल्या 'भीममंजरी' या हस्तलिखितात आढळतात. निर्दिष्ट दोष मुद्रित पुस्तकात नसले तर त्यावरील टीका उरत नाही, हेही प्रस्तुत ठिकाणी नमूद करीत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन आणि कार्यासंबंधी जेव्हा काही भाष्य केले जाते अथवा काही लिहिले जाते तेव्हा, त्यांच्या आध्यात्मिक प्रकृतीबाबत व तत्संबंधीच्या सिद्धांन्ताबाबत आत्मलक्षी होऊन विचार करणे अपरिहार्य ठरते. त्यांच्या आध्यात्मिक बैठकीविषयी आणि तदन्तर्गत प्रकृतिधर्माविषयी कुठे काही विशेष नमूद झाल्याचे आढळत नाही. वस्तुत: बाबासाहेबांचा पिंडच मुळी आध्यात्मिक होता. सर्व धर्मांतील वेदशास्त्रांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. संत कबीरांच्या आध्यात्मिक भूमिकेशी व तत्त्वज्ञानाशी तर ते तादात्म्य पावले होते आणि धम्मपदाशी एकजीव झाले होते. अध्यात्मविषयक एका चर्चेच्या वेळी ते अगदी गंभीरतेने उद्‌गारले होते–

" देहाला अविचल राखून, चित्तशुद्धीने आणि एकाग्रतेने ज्ञानोपासना करणे म्हणजेच अध्यात्म होय. पवित्र हृदयाने कोणत्याही एखाद्या संकल्पित गोष्टीवर आपण आपले लक्ष केन्द्रित केले तर अचेतन गोष्ट चैतन्यमय होते व चैतन्यमय होणारी ती गोष्ट जीवनाला आकार आणून द्यायला समर्थ ठरते. त्या ज्ञानोपासनेच्या आध्यात्मिक बैठकीची जाणीव मला प्रथम संत कबीराने करून दिली आणि मग भगवान बुद्धाने मला वाट दर्शविली." बाबासाहेबांचे सकपाळ घराणे कबीरपंथी होते. त्यांचे वडील तर त्या पंथाचे एकनिष्ठ उपासक होते, घरचे सगळेच वातावरण कबीराच्या तत्त्वानुसार सेवाव्रताने चैतन्यपूर्ण झाले होते.

रस गगन गुफा में अजर झरै ।
बिना बाजा झनकर उठै जहँ समुझि परै जब ध्यान धरै ।।
बिना ताज जहँ कमल फुलाने, तेहि चढि हंसा केलि करै ।
बिन चंदा उजियारी दरसै, चहँ तहँ सा नजर परै ।।
दसवे द्वारे ताले लागी, अलख पुरख जाको ध्यान धरै ।
काल कराल निकट नहि आवै, काम क्रोध मद लोभ जरै ।।
जुगन जुगन की तृषा वुझानी, करम भरम अघ व्याधि टरै ।
कहे कबीर सुनो भाई साधो, अमर होय, कबहूँ न मरै ।।

अशा या आध्यात्मिक तत्त्ववाणीचा आंबेडकरी घराण्यावर मोठा प्रभाव

पडला होता. स्वाभाविकच डॉ. आंबेडकरांच्या प्रारंभीच्या जीवनाला परातत्त्व स्पर्शी दीप्ती लाभली आणि अध्यात्म समजून व उमगून घेण्याच्या दृष्टीने त्यांनी नंतर सर्व धर्मांचा व शास्त्रांचा सखोल अभ्यास केला. त्यात मनुष्यमात्राचा उद्धार करणाऱ्या बौद्ध सिद्धान्तांनी व कल्याणप्रद तत्त्वबोधांनी, त्यांच्या हृदयात आत्मतेज निर्माण केले. आत्मशक्तीचा मूळ झरा त्यांना गवसला.

यतो यतो सम्मसति खन्दानं उदयब्बयं ।
लभति पीतिपामोज्जं अमतं तं विजानतं ॥

मनुष्य जसजसा रूप, वेदना, संज्ञा, संस्कार व विज्ञान या पाच स्कन्धांच्या उत्पत्तीचा आणि प्रक्रियेचा विचार करतो व जीवनात प्रकाश निर्माण करण्याची ज्ञानसाधना करतो, तसतसे त्याला दिव्य ज्ञानाचे अमृत प्राप्त होत असते. आणि—

पटिसन्थारवुत्तस्स आचारकुसलो सिया ।
ततो पामोज्ज बहुलो दुक्खस्सन्तं करिस्सति ॥

जो सेवा व सत्कार्य धर्मी असून, सदाचारी आहे तो ज्ञानानुभावे आपल्या व इतरांच्या दुःखांचा अन्त करण्यास समर्थ ठरतो. धम्मपदातील अशा उच्च व उदात्त तत्त्वांनी डॉ. आंबेडकरांचा आध्यात्मिक पिंड तेजस्वी झाला.

त्या दृष्टीने, 'भीममंजरी'त बाबासाहेबांच्या सेवाश्रम प्रकृतीच्या मूळ घराण्याचा जो भावपूर्ण व गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला आहे तो विशेष वाटतो. भवानी कुलदेवतेच्या कृपाछत्राखाली आणि नाथपंथी व कबीरपंथी तत्त्वप्रणालीच्या वलयात बाबासाहेबांच्या बालपणापासूनच, त्यांच्यावर आध्यात्मिक संस्कार कसे झाले असतील याची सहज कल्पना येते. त्याबाबत कवीने, त्यांच्या मूळ घराण्याचे मोठे मनोज्ञ दर्शन घडविले आहे. निसर्गसुंदर परिसरातील रत्नागिरी जिल्ह्याच्या अंबावडे गावाचा एका जाणिवेने उल्लेख करून कवी दर्शवितात—

तत्रैव च सुविख्यातः । सकपाळस्य वंशजः ।
नाथपंथानुयायी वै । कबीरपंथीकोऽभवत् ॥
सकपाळ कुलस्यास्ति । 'भवानी' कुलदेवता ।
शिबिका धारणे मानः । यस्याऽस्य स्थितः कुले ॥
सकपाळ कुले ख्याते । 'महार' इति संज्ञते ।
अस्पृश्यजातिवैशिष्टचे । महारत्नस्य संभवः ॥

आणि मग—

चतुर्दशात्मजो भीमः । रत्नमिव चतुर्दशम्
कल्पते अमृतत्वाय । दलितानां विकासने

सागराच्या उदरातून चौदावे रत्न म्हणून अमृत जसे बाहेर आले तद्वतच मातेच्या उदरातून चौदावे रत्न म्हणून अवतीर्ण झाले, तेच भीम दलितांच्या विकासासाठी अमृत ठरले.

'भीममंजरी 'तील आठव्या गुच्छाच्या विचारवाटिकेत कवीने जी सुभाषिते दिली आहेत ती मोठी सूचक व बोधकही आहेत. त्यातील काही निवडक सुभाषिते नमूद करण्याचा मोह अनावर होतो.

संघशक्तिप्रभावेन, संघो विजयते सदा ।
विकलितप्रवृत्या हि, संघटनं च क्षीयते ।।

संघशक्तीच्या बळावरच संघटना विजयी होते; पण, विस्कळित वृत्तीमुळे ती विनाश पावते.

लघुर्भवति विस्तारो, मानवजीवनस्य वै ।
बहुर्भवति विस्तारो, विचारवलयस्य हि ।।

मनुष्याच्या जीवनाची मर्यादा जसजशी कमी होते तसतशी विचारशक्ती वृद्धिगत होते.

कार्यफलस्य हेत्वर्थं, अवश्यं कार्यकर्तृणाम् ।
विचारं प्रथमं कर्तुं, संचारस्तदनंतरम् ।।

कार्य सफल करावयाचे असेल तर कार्यकर्त्याने प्रथम विचार करूनच त्याचा प्रारंभ करावा.

न परकृपयोद्धारः, भवति दलितात्मनः ।
उद्धरेदात्मनात्मानं, मूलतत्त्वमिदम् खलु ।।

इतरांच्या कृपेने दलितांचा विकास घडू शकत नाही. आपला उद्धार आपणच केला पाहिजे, हेच मूळ तत्त्व आहे.

कर्माणि न हि सिद्धयन्ति । प्रजल्पनेन केवलम् ।
कार्येनैव हि सिद्धयन्ति । कर्माणि नात्र संशयः ।।

केवळ वाचाळतेने कार्य सफल होत नाही. त्याची सफलता कृतीनेच होत असते, यात संदेह नाही.

प्रथमो स्वाभिमानोऽस्ति । द्वितीयं स्वावलंबनम् ।
आत्मोद्धारस्तृतीयोऽस्ति । त्रिसूत्रीयं हि मंत्रिता ।।

प्रथम स्वाभिमान, दुसरे स्वावलंबन आणि तिसरा आत्मोद्धार ही ती त्रिसूत्री आहे.

शुद्धाचार–विचारेण । शुद्धोच्चारेण सर्वदा ।
अस्पृश्यानां समाजेषु । नित्यं भवति जागृतिः ।।

शुद्ध आचार–विचार व शुद्ध उच्चारण यांमुळेच अस्पृश्य समाजात सदा जागृतीचे कार्य होऊ शकते.

दलितानां कलंकस्य । मार्जनाय कृतः श्रमः ।
संतानां स्मारकार्थं तु । मंदिरस्थापनाद् वरम् ।।

संतांच्या स्मारकांसाठी देवळांची उभारणी करण्यापेक्षा, अस्पृश्यतेचा कलंक पुसण्यासाठी झटणे अधिक श्रेयस्कर.

अशा सुभाषितांनी ' भीममंजरी ' चे गुच्छ अधिक रंगदार, भरदार आणि डौलदार झाले आहेत.

श्री. ज. व्यं. पल्लेवार हे वैश्य समाजातील एका अत्यंत गरीब, निष्कांचन पण सेवाधर्मी अशा प्रतिष्ठित कुटुंबात–कर्तव्यपरायणशील उच्च घराण्यात, पुसद येथे १ सप्टेंबर १९०४ रोजी, जन्माला आले. अगदी बाळपणी, त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाल्याने, त्यांच्या थोरल्या भावांनी त्यांचे संगोपन केले. त्यांचे बी. ए. पर्यंतचे शिक्षण इंदोरला आणि एम्. ए., एलएल्. बी. पर्यन्तचे शिक्षण नागपूरला झाले व काव्यतीर्थाची उपाधीही त्यांनी प्राप्त केली. तरल बुद्धिमत्ता व व्यासंगी वृत्तीच्या भांडवलावर, ते प्रगतीचा एकेक टप्पा उमेदीने गाठत गेले; आणि एक नामांकित वकील म्हणूनच नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात मानाची पदे भूषवून त्यांनी कीर्ती संपादन केली. योगसाधना व साहित्यसाधना हे दोन पैलू त्यांच्या सेवामय प्रकृतिधर्माशी रेखांकित असून, वयाचे ६८ वे वर्ष उलटत येत असताही अभ्यासू वृत्तीने साहित्यबावडीत दुर्दम्य उत्साहाने खोलवर झेप घेण्याची त्यांची प्रकृती स्पृहणीय आहे.

श्री. पल्लेवार ' जयेश ' यांनी आपल्या वृद्धापकाळातील उत्तर आयुष्यात, भारतातील चौदा थोर व्यक्तींबाबत ' भारत रत्नमंजरी ' नामक एका ग्रंथमालेची योजना आखली असून, आपल्या संकल्पित योजनेनुसार आतापर्यंत ' मोहनमंजरी ', ' राजेन्द्रमंजरी ', ' राधाकृष्णमंजरी ', ' शास्त्रीमंजरी ', ' इंदिरामंजरी ', ' गिरी-मंजरी ' त्यांनी तयार केल्या असून, ' जवाहरमंजरी ' तयार केली जात आहे. इतकेच नव्हे तर, इंग्रजीतील उत्तमोत्तम कवितांचा भावानुवाद संस्कृतमध्ये घडविणारा ' आँग्लगीतामृतमंजुषा ' हा ग्रंथही ते तयार करीत आहेत. त्यावरून, कवी पल्लेवारांचा वाङ्मयीन पल्ला केवढा दमदार व व्यापक आहे हे स्पष्ट होते. ' भारत रत्नमंजरी ' मालेतील ' षष्ठं रत्नम् ' म्हणून, पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कार्याच्या, त्यांच्या विद्वत्तेच्या व बुद्धिमत्तेच्या आणि त्यांच्या शौर्यशाली व गौरवशाली प्रज्ञेच्या अस्मितेचे ' सम्यग्दर्शन ' घडविणारी ' भीममंजरी ' अलंकृत झाली असून, कवी पल्लेवार ' जयेश ' यांनी तिची घडण विशेष जाणिवेच्या शिल्पकाराच्या भूमिकेतून घडविली आहे आणि त्यातून बाबा-

साहेबांच्या प्रज्ञाशक्तीचे, सेवाधर्माचे व मानवोद्धाराचे मनोज्ञ स्रोत झिरपत आहेत. त्यांनी, बाबासाहेबांच्या मूळ घराण्यापासून तो त्यांच्या महानिर्वाणापर्यंतचा संस्कृत श्लोकबद्ध इतिहास अकरा दर्शनांत एका अभिनवतेने प्रदर्शित करून एक मोलाची कामगिरी बजावली आहे. त्यातील प्रत्येक श्लोक जनतेच्या ओठावर सारखा तरंगत राहावा आणि तो घराघरात गुंजत राहून वातावरण प्रसन्नतेने सदैव थयथयत राहावे, असा कस व रस त्यात आहे. श्लोकांचा प्रत्येक गुच्छ एका आगळ्या वैशिष्टयाने विनटलेला असून, त्याचा मानवतावादी व सद्भावप्रेरक मधुर सुगंध अमरत्वाने दरवळत राहील, यात संदेह नाही.

वट पौर्णिमा :
२६ जून १९७२
श्री शेषाश्रम,
गणेशपूर, भंडारा

□ □ □

# ३.

## आजच्या विद्रोही साहित्याचे काही संकेत

जीवनसाहित्य हे एक स्वच्छ बिलोरी दर्पण आहे. पण ते साहित्य समाजजीवनातील शीतल, तप्त, दुःखद अथवा विषम प्रवाहांचे सम्यक दर्शन घडवून, समाज आणि राष्ट्र यांच्या प्रगतीच्या दिशा व कक्षा दीप्तिमान करणारे आणि खालचा थर उन्नत करून कसलाही भेद, कसलीही विषमता किंवा कसलाही पंक्तिप्रपंच न राखता, दुःख वा क्लेश निवारण्याचा संकेत दर्शविणारे आणि आत्मीयतेने मानवतेचा आविष्कार घडविणारे असेल तरच ते अभिजात साहित्य. ते जीवनाच्या बिलोरी दर्पणात स्वच्छ व स्पष्ट प्रतिबिम्बित झाले पाहिजे. त्यात मानव्य आणि कारुण्य यांचा गुणात्मक आलेख प्रवर्तित झाला पाहिजे; तेजोवर्धित झाला पाहिजे.

**दलितांचे उद्धारक साहित्य**

विशेषतः समाजातील दुःखांना केवळ वाचा फोडूनच नव्हे तर दुःखाची वेदनामय जखम समरसतेने भरून काढून जीवनात प्रसन्नता निर्माण करणारे आणि मानवतावादाची मूल्ये वृद्धिंगत करणारे साहित्य असेल तेव्हाच त्याचा उच्च व उदात्त दर्जा सिद्ध होऊ शकेल. त्या प्रेरक दृष्टिपथातील दिशेने दलितांचे साहित्य हे 'उद्धारक साहित्य' म्हणून निर्देशित करावे लागेल, असा प्रत्यय तळाच्या जळजळत्या थरातून पेट घेऊन उठलेल्या काही प्रतिभासंपन्न दलितांच्या शब्दमंत्रांद्वारे प्रकर्षाने येत आहे आणि म्हणून दलितांचे साहित्य इतर कोणत्याही वेगडी व मिरासदारी मृगजली साहित्यापेक्षा निःसंशय गुणवत्तेने प्रभावी ठरावे आणि समाजजीवनसागराच्या मंथनातून, पेटत्या तळहातावर साहित्यामृतकलश घेऊन येणारी स्वयंसिद्ध व्यक्ती,

क्रान्तदर्शी कवी वा साहित्यिक ठरू शकेल. त्या संदर्भात, प्रा. यशवंत मनोहर यांच्या 'उत्थान गुंफा' आणि श्री. वामन निंबाळकर यांच्या 'गावकुसाबाहेरील कविता' या दोन उत्कृष्ट काव्यसंग्रहांचा विशेषत्वाने उल्लेख करता येईल.

**मानवतेसाठी संघर्षाचा मार्ग**

'उत्थान गुंफा' या उत्कट भावसूचक शीर्षकाच्या काव्यसंग्रहात दलितोद्धाराच्या सद्भावदर्शक पण अत्यंत ज्वलंत भावनांची सकस बीजे अंकुरित झाल्याचे विचारप्रेरक चित्रण हृदय हेलावून सोडते; तर 'गावकुसाबाहेरील कविता' काल आणि आजमधील अंतर प्रखरतेने दर्शवून मनाला एक आगळी गती देण्याची क्षमता राखते. दलित, काल-कुठे-कसा उभा होता; कोणत्या निर्घृण अत्याचारांनी तो रक्तबंबाळ झाला होता; दारिद्र्यात होरपळत असताना सवर्ण म्हणविणाऱ्या दुष्टांनी त्याचे जीवन कसे उद्ध्वस्त करून टाकले; त्याला घोर अपमानित करून त्याच्या अब्रूचे कसे धिंडवडे काढले आणि तो माणूस माणूसच नाही अशी त्याची क्रूरतेने भेसूर अवस्था कशी निर्माण केली याची अत्यंत हृदयद्रावक बोलकी चित्रे त्या दोन्ही प्रतापी काव्यसंग्रहांत भावांगारयुक्त शब्दांनी चित्रित करण्यात आली आहेत; आणि कालचा तो दलित आज कुठे कसा ताठ उभा आहे व कोणत्या दिशेने आपले दणकट पाऊल कसे उमटवीत आहे; ज्ञान, बुद्धी आणि शक्ती या त्रिगुणांनी संपन्न बनण्याचा जिद्दीने प्रयत्न करून, स्वयंबळाने मानाचे जीवन जगण्यासाठी आणि आपल्या न्याय्य हक्कासाठी प्रखर झुंज घेत कसा पुढे सरसावत आहे; मानवतेसाठी संघर्षाचा मार्ग नेटाने व जोमाने आक्रमून आपले तेजस्वी अस्तित्व कसे सिद्ध करीत आहे, या सर्व क्रिया–प्रक्रियांचा एक जळजळता आलेख त्या दोन्ही काव्यसंग्रहांत प्रतीत झाला आहे.

**अटळ स्फोटक बीजे**

प्रा. यशवंत मनोहर उत्थान गुंफेच्या प्रशस्त प्रांगणात एका शौर्यतेजाने ताठ उभे राहून योद्ध्याच्या खणखणीत वाणीत, कुणाची कसली पर्वा न करता उद्गारतात–

आडव्या तिडव्या ग्रीष्म रेषांचे गणित
जमेल तोवर घेईन मीच
माझे दुःख वाहून नेईन मीच

आणि मग ते क्षणभर नेत्र मिटतात; आत्मलक्षी होऊन विचार करतात अन् मग अन्तरीच्या वेदना वेगाने उफाळून येऊन ते तळतळून म्हणतात–

जन्म व्याकूळ
एकेक संवेदन. एकेक याद ज्वालामुखी होऊन उरी
उकळणारी

इथून विजा ओकतील ओठ
अटळ आता इथून स्फोट

आणि मग कवी तप्त भावनांच्या एका उत्तुंग शिखरावर चढून दश दिशा दृष्टि-पथात आणतो अन् काही क्षण दूरवरच्या शून्यात सामावून,

‘ माझ्या डोळ्यांत फुले, मार्क्स आणि गळ्यात आंबेडकर होता
मस्तकावरच्या तटतटत्या शिरात बुद्ध आणि चार्वाक होता ’

असे दर्शवीत कवी जळजळत्या शब्दांत ललकारी देत शब्दाणुबॉम्ब सर्वशक्तीनिशी भिरकावतात–

अस्पृश्यता निर्माण करणाऱ्या पाखंडांनो !
तुम्हाला घेरून माझी सुरुंगाची फौज खडी आहे
मी म्हटले– आता मी थांबणार नाही
अध्यात्माला फक्तच मी तुरुंगात डांबणार नाही
मी म्हटले– आता मी थकणार नाही
आणि वणवा लागलेले हात आता सागरात फेकणार नाही
युगांच्यापासून मी फाटलो आहे
आज मी अपरंपार पेटलो आहे
मला पाहून आता तुमचा सर्वकर्ता–करविता परमात्माही
माझ्या संतप्त पायांवर डोके ठेवून मला क्षमा मागणार आहे
माझा नारा इन्किलाब मी आता आभाळ मुठीत घेणार आहे
आंबेडकरांच्या ओठावर उगवलेला मी प्रलयकारी सूर्य आहे

**विशाल नेत्रांतील स्फुल्लिंग**

समाजजीवनाचे चित्र कोणी कसे भेसूर केले आणि आपल्या स्वार्थापायी पददलितांना कशा निर्दयतेने तुडविण्यात आले याचा सूक्ष्म शोध व वेध घेत कवीचे अन्तर्मन पेट घेऊन उठते, त्याच्या विशाल नेत्रांतून स्फुल्लिंग उठू लागतात आणि तो आपला दणकट मूठ आवळलेला हात उंचावून आव्हान देत म्हणतो, नव्हे गरजतो–

देवाच्या गळ्याचा घेईन मी घोट
चितारीन पाठ खेटराने
जाळा ते अध्यात्म भांडवली एक्का
चुलीमध्ये फेका कर्मयोग
नागड्यांनी साऱ्या मशालूनी यावे
युद्धात ओढावे माजोऱ्याशी

आणि मग प्रखरतेने जाणीव करून देतात–

पाखंडयांनो ! आता । नका मारू थापा
आम्ही झालो गुंफा । उत्थानाच्या

दलितांच्या व्यथा, त्यांचे तीव्र दुःख साधे पेट घेत नाही तर ते भडकत्या ज्वाळांनी पृथ्वी आणि अन्तराळ व्यापून टाकते. त्यांचा स्नायू न् स्नायू नुसता लवलवत नाही तर विजेचा प्रवाह निर्माण करतो. त्यांच्या धमनी–धमनीतील रक्त केवळ सळसळत नाही तर ते कुणाच्या तरी नरडीचा घोट घेऊ पाहण्यास वेगाने धाव घेऊ लागते. त्यात क्रौर्य असे काही नाही पण मानवतेसाठी त्यांचे शौर्य मात्र अतुलनीय आहे. त्यात जल्लोष नाही पण त्यांच्या दणकट हाती जोष आणि जोम उफाळून येत आहे. त्यांच्या ओंजळीत आता लाचारीची कटोरी नाही पण समाज-क्रान्तीची ज्योत मात्र तेंजाने तळपत आहे. त्या दलितांच्या अनेक यातनांच्या गर्भातून आता नृसिंहरूपी महा काळपुरुष जन्म घेऊ पाहत आहे, असे दलितांच्या दुःखांचा ज्वलंत इतिहास एका वेगळ्या जाणिवेने, आत्मलक्षी होऊन अभ्यासिला तर वाटू लागते. त्याचेच वेगवान चैतन्यमय प्रवाह दलितांच्या आजच्या साहित्या-तून सळसळत असताना आढळतात.

**क्रान्तदर्शी कविता**

त्याच संदर्भात, कवी प्रा. यशवन्त मनोहर कसली भीडमुर्वत न बाळगता वस्तुस्थिती स्पष्ट करताना तळतळून म्हणतात–

ज्यांनी सत्याचा जन्म उजेडात येऊ दिला नाही
सैतान असली ते आहेत
ज्यांच्या शोषक कल्पनांनी भीषण गावकुस घडविले
कपटी चांडाळ तें आहेत
ज्यांनी माणुसपण इथे शब्दातच सडविले

आणि मग मुठी आवळतच ते गरजतात–

त्या हरामखोर परंपरांवर मी विध्वंसाचा नांगर धरतो
तें सर्व देव–दैववादी माझे वैरी आहेत
ज्यांनी अस्पृश्यता अभंग केली, तिची मधुर ओवी केली
तें शब्दप्रामाण्यवादी सगुण–निर्गुण वैरी आहेत माझे
ज्यांनी मला आजवर मुक्त होऊ दिले नाही

आणि स्त्रियांची व त्यांच्या सत्त्वाची अत्यंत क्रूरतेने दुष्कृत्य करणाऱ्यांची कडक हजेरी घेत ते जहाल चित्र दर्शवितात आणि खडा सवाल करतात–

कुठल्या संस्कृतीचा गजर मांडला होता त्यांची स्तने कापणाऱ्या हातांनी

सूर्यही शरमेने काळवंडून जावा
पाहून त्यांच्या स्त्रीत्वाची अघोर विटंबना
आणि निरपराध देहांचा तडफडाट
कुणाला बोल लावून त्यांनी जीव सोडले आपले
कोण होता त्यांचा त्राता
होते देव ? होते मानव ? होते कुठले वाद, होते कुणी अध्यात्म ?
होती कुठली तत्त्वज्ञाने
कोण आले त्यांना वाचवायला ?

आणि मग कवी स्वच्छच दर्शवितो–

तुमच्या पूजनीय अशा सांस्कृतिक विकृतीची
शपथ घेऊन सांगतो
तत्त्वज्ञानाचे हवाले देऊन माणसांना खाणाऱ्या तुमच्या जगात
मला नितांत चुकल्यासारखे वाटते

अन् हळहळत स्वतःच सार्थ शब्दांत पुटपुटतो–

आता स्वतःच्याच श्वासांवर मी क्रूर सूड घेतो
मेंदूमधल्या स्मशानात काळातून तुम्हातून
स्वतःला वजा करून घेतो

आणि नंतर शून्यात नजर रोखून, विव्हळत तो एक पराक्रमी रूप धारण करीत, आव्हान देतो–

जळतात नित्य दिवस माझे
जळतात माझ्या रात्री
येणाऱ्या प्रत्येकच पहाटेचे कान फुंकणाऱ्या
आर्प काळोखाच्या अर्धांगिनी ऋचा
प्रज्ञावंत पायाखाली आता मी तुडवीत जाईन
येताना उत्तरे घेऊन आलो होतो जाताना प्रश्न घेऊन निघून जाईन
जाताना मुक्याने जाणार नाही या पसाऱ्याला शाप देऊन जाईन

माणुसकीसाठी, दुःखितांचे तप्त अश्रू आत्मीयतेने पुसण्यासाठी, पददलितांचा उद्धार करण्यासाठी, स्त्रीसत्त्वरक्षणार्थ धाव घेण्यासाठी आणि न्यायासाठी अतुलनीय झुंज घेणारी आणि वास्तवता दर्शवून, दीनदुबळ्यांच्या हृदयात क्रान्तीची ज्योत प्रज्वलित करणारी प्रा. यशवन्त मनोहर यांची ' विद्रोही कविता विद्रोही वाटत नाही ' तर विद्रोहाच्या प्रकृतिबंधाकडील सत्यशोधनातून मानवतेची बूज राखणारी ' क्रान्तदर्शी कविता ' वाटते. ' विद्रोह ' हा शब्दप्रयोग केवळ संघर्षासाठी ' संघर्ष '

असा एकांगी व सीमित अर्थी ठरू नये तर व्यापकतेने उद्धारार्थी ठरावा आणि तो दलित साहित्यिक त्याच सर्वस्पर्शतेने वापरत असतील, असे मला वाटते.

**मानवतेच्या आविष्कारार्थ विद्रोह**

कवी प्रा. यशवन्त मनोहर यांच्या क्रांतिकारक 'उत्थान गुंफे' प्रमाणेच— अगदी त्याच वाटेवरून कवी श्री. वामन निंबाळकर यांची 'गावकुसाबाहेरील कविता' हाती पेटती मशाल घेऊन जोमाने आपली पावले झपाझप पुढे टाकत गेली आहे. मृत्यूलाच आव्हान दिल्यावर कोणाला कसले भयच वाटत नाही; उलट मृत्यूलाही जिंकून, भूवरीच स्वर्गलोक उतरविण्याची किमया—शक्ती राखणारी प्रज्ञा 'अजिक्य योद्धा' म्हणूनच अमरत्वाचा सुगंध दरळविणारी एक प्रबळ आत्म-शक्ती मनुष्यमात्राच्या उद्धारक तपस्येत वास करीत असते. मनोहरांच्या यशवंती काव्यात काय अथवा निंबाळकरांच्या वामनी काव्यात काय क्रांतीची जी स्फोटक बीजे रुजलेली आढळतात, त्यातील स्फोटकता विद्रोहाचे उग्ररूप धारण करून, मानवतेचा आविष्कार घडविण्याचे सामर्थ्य राखते, असे त्यातील अनेक उज्ज्वळ प्रतिमा आणि प्रेरक प्रतीकांच्या सम्यक दर्शनाने प्रत्ययास येते.

श्री. वामन निंबाळकर गावकुसाबाहेर जन्मलेल्या दलितांच्या दुःखांचा, त्यांच्यावरील घोर जुलुमांनी होणाऱ्या यातनांचा आणि त्यांच्या हृदय पिळवटून काढणाऱ्या दारुण कहाणीचा इतिहास स्पष्ट करताना इतरेजनांना ठणकावून बजावतात—

> आम्ही वेशीबाहेर जन्मलो
> त्याची खंत तुम्ही केली नाही

पण आता—

> मनूच्या वारसदारांनो !
> गावकुसाच्या बाजूला चार, सहा झोपडयात
> जळताहेत आमची असंख्य कलेवरे
> ज्यांना तुम्ही जाळले, तुमच्या नादान विचारांनी...
> रस्त्यावर उघडी—नग्न फिरली आमची लाज
> टाहो फोडोनही कुणीच ऐकला नाही आमचा आवाज
> एवढी बेचिराख केली आमची मने,
> ज्याला नाही अंत
> मनूच्या वारसदारांनो ! पण लक्षात ठेवा—
> ह्याच मेंदूतून बाहेर पडतील असंख्य ठिणग्या अस्तित्व कवचासाठी

आणि मग ते निधडया छातीने गगनभेदी आरोळी ठोकून उद्गारतात—

> आज होणार आहे क्रांती
> आमच्यातील प्रचंड शक्तीने पेट घेतला आहे

त्याचा होणार आहे स्फोट...
उद्याचा इतिहास आमचा आहे
आणि इतिहास लिहिणाराही,–
माणूस म्हणून उभे राहण्यासाठी

**विद्रूपतादर्शक आरसा फोडा**

कवी एवढ्यावरच स्वस्थ बसत नाही; एवढ्यावरच त्याचे सजल नेत्र झापड घेत नाहीत; एवढ्यावरच त्याचे स्फुरणारे बाहू विसावत नाहीत आणि हृदयाची वेगाने होणारी स्पंदने स्थिरावत नाहीत. उलट तो पराक्रमी झेप घेऊन, आपल्या दलित बांधवांना प्रखरतेने जाणीव करून देतो––

फोडायचा आहे तुला तुझ्या समोरील आरसा
किती विद्रूप दिसते तुझे रूप त्यात
डोळ्यात आलेल्या आसवांचे रक्त होऊ दे
पुढे पसरणारे हात गळून पडू देत आणि
आकाशाला कवेत घेऊन करकचून टाक
गुडघ्यात वाकणारे पाय
पाठीवरचे ओझे भिरकावून दे गगनात
भिरकावून दे विद्रूप शरीरावरची जीर्ण चिंधी
तुझी झेप आकाशभर हवी
वेगवेडा हो अन् घे दाही दिशांचा शोध
मग तेथे आढळेल तुला तुझे सुंदर प्रतिबिंब
मात्र फोडायचा आहे तुला तुझ्या समोरील आरसा

**आता निखाऱ्याचा हात**

स्त्रीजातीवर होणाऱ्या निर्घृण अत्याचारांनी कवीची मूळचीच वेदना अधिक तीव्र होते. सत्त्वशीलतेचा तो पूजक असतो. दलित स्त्रीच्या अब्रूवर आणि तिच्या सत्त्वावर बेगुमानपणे अत्यंत दुष्ट प्रहार होत असल्याचे पाहून तो तळतळून उभा होतो आणि शब्दाग्निबाणाने, ' यापुढील माझा हात जळत्या निखाऱ्याचा ' असे स्पष्ट दर्शवून, स्वच्छ ललकारी देतो––

कोठवर फेडाल नेसू
माझ्या आयाबहिणींचे,
आता तर तुमच्या अब्रूचे धिंडवडे
तुम्ही पाहणार तुमच्याच डोळ्यांनी
कारण तुमच्या संस्कृतीच्या चिंध्या
सडल्या, गळून पडायला लागल्या

म्हणून तुमच्या इज्जतीचे उघडे, नागडे
प्रदर्शन उद्या होणार आहे.

'माझ्या दु:खाची जात वेगळी आहे' असे कवी प्रकट करीत असताना, त्याचे हृदय भरून येते; आणि दलितांच्या दारिद्र्याचे व त्यांच्यावर होणाऱ्या अमानुष प्रहाराचे करुण चित्र आपल्या साश्रू नयनांत सामावून तो उद्‌गारतो,

गावाकुसाबाहेरील डोळ्यांत न मावणारी
फाटलेली अनंत हृदये
कानाचे पडदे फाडणारे मायाबहिणींचे
आक्रोश मी जपून ठेवलेत
आणि त्या चिमण्या बाळांच्या किंकाळ्या
चिरत गेलेले बापांचे चेहरे,
सारे मी जपून ठेवले आहे हृदयात.

आणि नंतर, तो दुर्दम्य आशावादाने, पहाटेचे शुभदायी स्वप्न दर्शवितो. तो सर्व दु:खितांना व दलितांना आर्त हाक देतो--

या गावाकुसाबाहेरचा हा काळोख मावळणाराहे
उजाडल्यावर आमच्या ओठातील प्रकाशगीताचे
स्वर, दाही दिशांना धुंद करणार आहेत
अरे सारे एकत्रित या
हातात हात घालून प्रकाशाचे गीत गा
तो दुरून दिसणारा प्रकाशकिरणच
उद्याचा सूर्य होणार आहे.
त्यासाठी एकत्रित या, तुमचे एकमेकात गुंफलेले हात
हा अंधाराचा पर्वत फेकून देऊ शकतील
मला पहाटेची स्वप्ने पडू लागली आहेत.

**आधुनिक जीवनविषयक प्रमेय**

कवी पहाटेची जी स्वप्ने पाहतो आणि प्रत्यक्षात तो जे काही अनुभवतो त्यावरून दलितोद्धाराची उद्या प्रवर्तित होणारी दीप्ती आणि स्वयंप्रेरणेने व स्वयंबलाने सुदृढ शरीरयष्टीचा व सुदृढ मनाचा उभा होणारा दलित आकारला जाऊन, त्याची कारुण्यातून निर्माण झालेली शौर्यगाथा यशोगान करीत डौलाने पुढे जाण्यास उद्युक्त होते. आणि 'शव'ही एका आगळ्या चैतन्याने 'धाव' घेत आपल्या असामान्य प्रज्ञाशक्तीचा प्रत्यक्षात 'एक उद्धारक मंत्र' कृतितंत्रासहित निर्माण करण्याचे सामर्थ्य राखू शकेल, एवढी झेप दलित कवीच्या विद्रोही काव्यातील

पंक्तीपंक्तीतून व ओळीओळीतून प्रतीत होते आणि 'शब्द अंगाररूप धारण करीत, जुनाटांची होळी करून नव्या तेजस्वी प्रतिमा व प्रतीके दर्शवीत, आधुनिक जीवनविषयक प्रमेय मांडताना आपल्या प्रभावाचे दर्शन घडवितो.

**बुद्धिवादी नव्हे, बुद्धियोगी बैठक**

उभयता कविद्वयांच्या काव्यांचा आणि त्यांतील इंगितांचा आत्मलक्षी होऊन विचार केला तर त्यांची स्वयंप्रज्ञा व नवोन्मेषशालिनी प्रदीप्त प्रतिभा प्रकर्षाने प्रत्ययास येते. आत्मबलाच्या अभावी बुद्धिबल व विद्याग्रहणशक्ती निष्प्रभ व भ्रष्ट बनत असते. बुद्धिवादी असणे वेगळे व बुद्धियोगी असणे वेगळे. म्हणून केवळ बुद्धिवादी वाङ्मयनिर्मिती अभ्रकयुक्त तर बुद्धियोगीची साहित्यसाधना आणि निर्मिती ही सुवर्णयुक्त असते हा फरक बुद्धिवादी साहित्यकारांनी विशेष जाणिवेने लक्षात घेतला पाहिजे. त्या दृष्टीने दलितांचे जे साहित्य आज निर्माण होत आहे, त्याच्या दिशा व कक्षा काहीशा जाणवणाऱ्या असल्या तरी त्याच्या सत्यनिष्ठेची बैठक मात्र बुद्धियोगी आहे आणि ध्येयवादाने प्रेरित झालेल्या क्रांतिवादिपथावरून त्याची प्रखर व प्रभावी पावले उमटत आहेत.

**प्रखर झुंज घेण्याची प्रक्रिया**

सामान्यत: गेल्या एका तपापासून दलितांच्या विविध साहित्याने आपले एक वेगळे व आगळे भावविश्व निर्माण केल्याचे आढळून येते. 'दलित-साहित्य' वा 'विद्रोही साहित्य' या शब्दप्रयोगाने ते संबोधिले जाते. 'दलित साहित्य' हा शब्दप्रयोग तत्त्वत: मान्य होण्यासारखा मला वाटत नाही. त्यातील सूचक गर्भितार्थ मात्र मी समजू शकतो. पण कोणतेही साहित्य 'दलित' ठरू शकत नाही. दलितनिर्मित साहित्यच ते! त्यात 'विद्रोही साहित्य' या शब्दप्रयोगाने परिणामकारकतेच्या दृष्टीने आपला प्रभाव आविष्कृत करण्याचा प्रयत्न केल्याचे प्रत्ययास येते. दलितांचे अथवा दु:खितांचे ज्वलंत प्रश्न विशेषत्वाने लक्षात घेऊन, ते सोडविण्यासाठी प्रखर झुंज घेण्याची जी प्रक्रिया आहे ती त्या शब्दप्रयोगात अंतर्भूत आहे. त्या संदर्भात संत चोखामेळा, महात्मा ज्योतिबा फुले, गुरुवर्य किसन फागोजी बनसोड यांनी कालमानाप्रमाणे व परिस्थित्यनुरूप 'विद्रोही साहित्या'ची वाट निर्माण केली, असे प्रकर्षाने दर्शविता येईल. पण त्या अत्यंत प्रखर वाटेवरून जाताना पुण्यश्लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे अग्रेसरत्व प्राप्त केले आणि दलितांचे ज्वलंत प्रश्न ज्या झुंजार वृत्तीने व असामान्य कर्तृत्वाच्या आणि बुद्धिमत्तेच्या प्रज्ञाशक्तीने सोडवून, जी व्याप्ती व दीप्ती निर्माण केली त्या प्रेरणेतूनच आजचे दलितांचे विद्रोही साहित्य आविष्कृतच नव्हे तर सालंकृतही होत असल्याचा प्रत्यय येतो. त्या बंडखोरी साहित्याच्या पोटी जन कल्याणाची सद्भावना सामावलेली असते, हे दृष्टिआड करता येत नाही.

**ध्येयवादाच्या प्रेरणाशक्तीवर सामाजिक क्रान्ती**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरप्रणीत प्रखर ध्येयवादाच्या प्रेरणाशक्तीवर दलितांचे साहित्य निर्भरित असल्याचा अनुभव येतो. त्यात सामाजिक व साहित्यिक क्रांतीचा सत्त्वस्रोत आहे; तो जहाल आहे पण उद्धारक आहे हेही विशेषत्वाने ध्यानी घ्यावे लागेल. आज ध्येयवादाच्या प्रेरणाबलावर भर दिल्यावाचून सामाजिक क्रान्ती होऊ शकत नाही, असा आपला एक सिद्धान्त तत्त्वज्ञ प्रा. सिडने हूक यांनी दर्शविला आहे. त्यानुरोधाने, प्रा. शं. द. जावडेकर या एका विद्वानाने ' मराठी वृत्तवाङ्मय व ललितवाङ्मय यांची अवनती ' या विषयाचा सखोल परामर्श घेताना ' क्रान्तिवादी व ध्येयवादी वाङ्मय निर्माण करणारा साहित्यिक क्रांतिवादी व ध्येयवादी जीवन व्यतीत करणारा असेल, तरच तसे वाङ्मय निर्माण होईल, संतावाचून संतवाङ्मय निर्माण होत नाही, तसेच क्रान्तिकारकावाचून क्रान्तिवादी वाङ्मय निर्माण होत नाही. तेव्हा महाराष्ट्रात संत व क्रान्तिकारक कसे व केव्हा निर्माण होतील याचे चिंतन करणे आणि त्यासाठी शक्य ते यत्न करणे, हाच खरे प्रभावी, तेजस्वी व अक्षर वाङ्मय निर्माण करण्याचा मार्ग आहे ' असे सूचित केले आहे. प्रस्तुत सिद्धान्त काही प्रमाणात मान्य केला तरी वैचारिक शब्दांच्या गोंधळातून अंगीकारलेल्या सामाजिक वा वाङ्मयीन क्रान्तीचे ईप्सित साध्य होऊ शकत नाही. कारण ते एकांगी व सीमित स्वरूपाचेच क्रान्तिदर्शन आहे, क्रान्तीची दृश्यानुभवी ती व्यापक प्रक्रिया निर्माण करीत नाही. दलितांचे साहित्य, आज क्रान्तीची दृश्यानुभवी व्यापक प्रक्रिया निर्माण करण्याचा एकच ध्यास घेऊन पुढे सरसावत आहे, एवढे मात्र खरे !

**मराठी मुलुखव्याप्तीचे विद्रोही साहित्य**

वस्तुत: अलीकडे दलित व बौद्धवर्गात विशेष जाणीव राखणारे अभ्यासू वृत्तीचे विद्वान आणि बुद्धिमान लेखक, कवी व भाष्यकार मोठ्या प्रमाणात प्रगत होत आहेत आणि आपल्या तेजस्वी लेखणीने व प्रभावी वाणीने विविध भावनांचे आणि प्रेरक विचारांचे एक तेजोवलय निर्माण करण्याचा, ते एका जिद्दीने प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या त्या साहित्यक्षेत्रात मी अनभिज्ञ खेडूत असल्याने, त्यांचे निर्माण होणारे साहित्य पेट घेऊन उठणारे, विकृत वा विद्रोही अथवा एकांगी किंवा सीमित आहे की काय आणि ते आज समाजपोषक आहे की विघातक आहे अथवा ते अल्पजीवी आहे की अभिजात साहित्यात मोडणारे आहे याचे विश्लेषण करण्याची इतर साहित्यिकांची अपेक्षा असली तरी मी त्याबाबत असमर्थ आहे. तशी माझी प्रज्ञा नाही. मला कसला अधिकार नाही; पण दलितांच्या साहित्याची गेल्या दोन तपांपूर्वी जिथे काही चिन्हे नव्हती तिथे आज स्वयंबलाने व स्वयंप्रज्ञेने झुंज घेणारे त्यांचे साहित्य, मराठी मुलूख जोषाने व जोमाने व्यापून टाकीत आहे. मग ते विद्रोही म्हणा, संघर्षमय म्हणा वा पोटतिडकीने पेट घेऊन उठणारे म्हणा,

निर्माण होत आहे, ही अभिमानास्पद गोष्ट आहे. पण आजचे हे प्रेरक व बोधक विद्रोही साहित्य उद्या विकृतिदर्शक ठरू नये. उत्थानाचे प्रबोधन करताना क्रौर्य नव्हे तर शौर्यच आविष्कृत होईल अशी दखल घेणे मात्र आवश्यक आहे.

**दलितांच्या साहित्याचे स्वतंत्र बौद्धपीठ**

दलितांच्या साहित्यिक प्रक्रियेला निर्वाणपद गाठलेल्या डॉ. म. ना. वानखेडे या विद्वान पुरुषाने १९६९ साली, प्रा. गंगाधर पानतावणे यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध होणाऱ्या 'अस्मितादर्श'च्या एका दिवाळी अंकात एक प्रदीर्घ विचारप्रेरक लेख लिहून, वाचा फोडली होती; आणि तेव्हापासून, 'दलित साहित्य' या नामाभिधानाचे एक स्वतंत्र बौद्धपीठ निर्माण झाले. दलितांच्या याच बौद्धपीठावरून, अलीकडे दलितांचे व बौद्धांचे विविध प्रकारचे जे चैतन्यदायी साहित्य प्रसृत होत आहे, ते मराठीच्या दशदिशा व्यापून टाकीत असल्याचा सुगंध ग्रामीण विभागात वास्तव्य करीत असलेल्या माझ्यासारख्या वृद्धापर्यंत घोंगावत आहे. १९६९ सालापासून दलितांच्या विद्रोही साहित्याचे जे ध्वजप्रांगण उभारले गेले तेथे दुःखितांच्या तप्त भावनांच्या उद्रेकातून अनेक लेखक व कवी संघर्षाची धगधगती मशाल हाती घेऊन खंबीरपणे उभे ठाकले. दोन तपांपूर्वीचे अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, चां. भ. खैरमोडे, नामदेव व्हटकर, बी. सी. कांबळे, दादासाहेब रूपवतेप्रभृती लेखक व भाष्यकार वगळता, दलितांच्या बौद्धपीठावर जी नवीन बुद्धिमान पिढी विराजमान झाली, त्यात काही जुन्यांनीही आपला समावेश करून घेतला आणि दलितांचे साहित्य आकारास आणण्यास व ते प्रभावी ठरण्यास, आपल्या लेखणीचे तेज दर्शवीत आहेत. त्या दृष्टीने प्रा. गंगाधर पानतावणे, प्रा. यशवन्त मनोहर, प्रा. केशव मेश्राम, श्री. वामन निंबाळकर, नामदेव ढसाळ, राजा ढाले, दया पवार प्रभृतींनी दलितांच्या साहित्यक्षेत्रात एक नवचैतन्य निर्माण केले आहे; आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सृजनशील व सर्जनशील उच्च साहित्याच्या व प्रखर सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनसंग्रामाच्या प्रेरणेतून, आपल्या तेजस्वी नवकाव्याच्या शिखरावरून सामाजिकच नव्हे तर साहित्यिक व सांस्कृतिक अन्तराळाच्या पोकळीतून, आजच्या बहुरंगी आणि बहुढंगी असलेल्या मिरासदारीच्या समाजाला जोराचा धक्का देत, दलितांची अस्मिता तेजोवर्धित करण्याचा कसोशीचा प्रयत्न त्यांनी केला असल्याचे आढळून येते. अगदी त्याच ध्येयप्रवण वलयात मराठी मुलुखातील अनेक दलित व बौद्ध लेखक–लेखिका सहभागी होऊन इतरेजनांच्या पोषाखी साहित्याला व तथाकथित संस्कृतीला हादरा देऊन, आपले वेगळे अस्तित्व सिद्ध करण्यास कटिबद्ध झाले आहेत. त्यात बाबूराव बागल, प्रा. रावसाहेब कसबे, योगीराज वाघमारे, प्रा. दत्ता भगत, रणजित मेश्राम, वसंत मून, प्रा. मा. फ. गांजरे, सौ. हिरा बनसोड, प्रा. म. भि. चिटणीस, डॉ. डी. टी. माने, पी. टी. बोराळे, डॉ. वि. स. कर्डक, श्रीमती सुगंधा शेंडे, शंकरराव सुरडकर,

ना. ब. जाधव, डॉ. वा. ना. मेश्राम, भाऊ पंचभाई, ताराचंद खांडेकर, रत्नाकर गणवीर, यादवराव गांगुर्डे, अप्पा रणपिसे, प्रा. भाऊ लोखंडे, निशिकान्त शेंडे, हिं. गो. बनसोड, प्रा. प्रभाकर पोहरे, टी. पी. अडसूळ, प्रा. प्र. ई सोनकांबळे, जनार्दन वाघमारे, माधव कोंडिलवार, प्रा. जे. सी. खैरनाथ, डॉ. जे. आर. कांबळे, प्रा. दि. मा. खैरकर, सौ. सुशीला मून, वा. रा. गाणार, वामन होदाळ, कमलाकर डहाट, प्रा. मधुकर डोंगरे, सौ. सुरेखा भगत, प्रा. कला तिरपुडे, सुधाकर गायधने, सौ. जयश्री बोरकर, बी. व्ही. जोंधळे, धर्मराज निमसरकर, बन्धुमाधव, भगवान भटकर, अर्जुन डांगळे, अविनाश डोळस, जगदीश सुखदेवे, प्रा. संभाजी कदम, भ. म. परसवाळे, सौ. अर्चना शेंडे, प्रा. दत्ता भगत, रमेश निकोसे, अरुण कांबळे, नीलकान्त चव्हाणप्रभृती साहित्यिक एका प्रगत दृष्टीने पददलितांचा साहित्य-सौरभ सर्वत्र दरवळवीत आहेत. सामान्यतः आजची ही जी दलित पिढी आपले एक वेगळे वैशिष्टच दर्शविणाऱ्या साहित्य–क्षितिजावर मान ताठ करीत उभे राहून, आपल्या वाङमयीन गुणवत्तेने दलितांची जी भावसृष्टी शृंगारीत आहे, ते केवळ कौतुकास्पदच नाही तर स्पृहणीयही आहे.

**शौर्यतेजाचा व कर्तृत्वांचा नवा इतिहास**

दलितांचे साहित्य म्हणजे काय ? विद्रोही साहित्य ते कोणते व त्याची दिशा ती कोणती ? त्या प्रखर प्रवाहांनी ध्येयसिद्धीचा पल्ला तो कोणता गाठला जाणार ? या प्रश्नांनी माझी संभ्रमावस्था झाली होती. त्या आधुनिक विद्रोही साहित्याच्या काही तप्त शलाका मनाला चटकाही देत असत. त्यामुळे एक वेगळीच खंत मला जाणवत होती. पण १८ फेब्रुवारी १९७९ रोजी कै. गुरुवर्य किसन फागोजी बनसोड यांच्या जन्मशताब्दीच्या मंगल पर्वदिनी दलित कवींच्या एका भव्य दरबारात उपस्थित राहण्याचा मला योग आला. प्रा. यशवन्त मनोहर यांच्या अध्यक्षतेखाली एक थोरले कविसम्मेलन भरले होते. त्या प्रसंगी दलितांच्या दलितोद्धारक विद्रोही काव्याने मी अक्षरश: चकित झालो ! दलितांच्या काव्य-सागरातील अथांग खोली आणि उच्च भावप्रेरित विचारांच्या उत्तुंग शिखराची उंची माझ्या मनाला एक परिवर्तनशील संकेत देऊन गेली ! आणि मग, २३ जुलै १९७९ रोजी मी मुंबईच्या प्रवासाला निघालो असताना कवी श्री. वामन निंबाळकर यांनी धाव घेऊन, आपली ‘ गावकुसाबाहेरील कविता ’ आणि कवी प्रा. यशवन्त मनोहर यांची ‘ उत्थान गुंफा ’ हे दोन काव्यसंग्रह मला आणून दिले. आगगाडी भरवेगाने धाव घेत होती आणि त्या वेगाबरोबर चैतन्ययुक्त अशा त्या दोन्ही काव्यसंग्रहांचे पारायण मी संपूर्ण रात्र जागून केले. त्या वेळी दलितांच्या दु:खांना वाचा फोडून, त्यांना गावकुसाबाहेरील वेदनांतून मुक्त करण्यास आणि त्यांचे उत्थान करण्यास सरसावलेल्या तेजस्वी व प्रभावी लेखणीने काही दूरगामी संकेतांचे दर्शन घडविले. प्रा. यशवन्त मनोहर व श्री. वामन निंबाळकर यांच्यासारखी

कसदार व दमदार आजची तरुण दलित पिढी, आपल्या साहित्यिक गुणवैशिष्टयांनी अस्पृश्यतेने बरबटलेला व सैतानी वृत्तीने सडलेला जुनाट व पिसाट इतिहास भस्म करून, दलितांच्या उत्थानाचा, त्यांच्या शौर्यतेजाचा व कर्तृत्वशीलतेचा नवा प्रेरक व बोधक इतिहास आता निर्माण करण्यास निधडचा छातीने पुढे सरसावली आहे; अस्पृश्यतेचे पालन करणाऱ्या तथाकथित कर्मठांचा भुताटकीने थैमान घालणारा ठिसूळ किल्ला पूर्णत: नेस्तनाबूत करून, त्या जागी आता दलितांचा व बौद्धांचा भव्य आणि अभेद्य किल्ला आपल्या वीर वृत्तीने व दणकट हातांनी उभारण्यास सुसज्ज झाला आहे, याचा सूचक संकेत ‘ उत्थान गुंफा ’ आणि ‘ गावकुसाबाहेरील कविता ’ या दोन उत्कृष्ट काव्यसंग्रहांनी दर्शविला, मला मोठी प्रसन्नता वाटते.

□ □ □

# ४.

## ' गीतामाय 'च्या सावलीत

माझे एक स्नेही प्रा. देविदास सोटे यांच्या ' गीतामाय 'ची एके सायंकाळी अभावितपणे भेट झाली. तिच्या प्रखर आत्मतेजाने माझ्या काही सुप्त कल्पना चैतन्यमय झाल्या. सुदर्शनचक्रधारी श्रीकृष्ण धनुर्धारी अर्जुन याला स्वकर्तव्याची व रणक्षेत्रावरील युद्धनीतीची जी जाणीव ज्या ग्रामीण बोलीत ठासीवपणे करून देते आणि आवर्त-अनावर्त, वृत-अनावृत, ज्ञेय-अज्ञेय, व्यक्त-अव्यक्त व तत्त्व-परातत्त्व यांच्या जीवनविषयक, अभिलेखातून पुरुषार्थरेखा दृष्टपटलावर अंकितच करीत नाही तर तिचे तेज ग्रामीणांची मने तेजाळण्यात निश्चितच प्रभावी ठरते.

वस्तुतः भगवद्‌गीता संस्कृतप्रचुर शब्दालंकारांनी विनटलेली आहे. तीवर प्राचीन नि अर्वाचीन पंडितांनी व अनेक धर्ममार्तंडांनी आणि विलक्षण टीकाकारांनी व बुद्धिवंत भाष्यकारांनी आपल्या प्रतापी लेखणीने व अमोघ वाणीने अनेक रंगी उंची प्रावर्णे व मौलिक रत्ने चढवून, तिची महत्ता गायिली आहे. तिच्या अस्मितेची नांदी विश्वभर फिरवून, जगाला चकित करून सोडले आहे. उदात्त भावनांच्या व अत्युच्च विचारांच्या रसधारांनी तिचे अंग-प्रत्यंग केवळ तेजःपुंजच झाले नाही तर कर्मयोगाच्या अधिष्ठानावरील तिचा देह आणि आत्मा पावन झाला आहे, उद्धारक झाला आहे. पण एवढा थोरवीसंपन्न धर्मग्रंथ व त्यावरील विचारपरिप्लुत भाष्य खेड्यापाड्यात बसलेल्या भारतीय जनतेच्या आत्म्यापर्यंत अद्यापिही पोहचू शकले नाही, तो धर्मग्रंथ नगरीतील विशिष्ट क्षेत्राच्या मोजक्या बुद्धिवाद्यांपुरताच विशिष्ट मर्यादेतच बंदिस्त राहिला. याची खंत म्हणा वा

जाणीव म्हणा झाली म्हणूनच की काय प्रा. सोटे यांनी भगवद्गीता ग्रामीण बोलीत सादर केली असावी. संस्कृतमध्ये असलेली गीता अनेक पंडितांनी मराठी अन्वयार्थ देऊन–शब्दार्थ–टीपा देऊन ती समाजापुढे ठेवली तरी, तिने ग्रामीणांची मने आकर्षून घ्यायला खेड्याकडे धाव घेतली नाही आणि कोणी ग्रामीणांनी अर्थ वाचण्याचा प्रयत्न केला तरी भगवंताची संस्कृतमय असलेली क्लिष्ट ओवी न समजू शकल्यामुळे समाधानी रसग्रहण करणे त्याला शक्य होऊ शकले नाही आणि म्हणून गीतेतील संस्कृत ओव्या ग्रामीणांच्याच भाषेत म्हणा अथवा बोलीत म्हणा काहीशा स्वैरपणे अर्थात भावार्थाला जराही झळ पोचणार नाही याची दखल घेऊन, प्रा. सोटे यांनी "गीतामाय" प्रकाशात आणली ही बाब निःसंशय प्रसन्न-कारी व उपकारी वाटते. ग्रामीणांच्या दृष्टीने तरी सरस्वतीच्या मंदिरात तिच्या अवतरण्याने मौलिक भर पडून एक मोठी उणीव भरून निघाली, यात संदेह नाही.

प्रा. सोटे हे ग्रामीण हाडाचे कवी आहेत. आपल्या विनोदी पण मर्मभेदी कवनांनी त्यांनी उभा मराठी मुलूख पादाक्रान्त केला आहे. त्यांच्या काव्यात जोष आणि जोम आहे. त्यांच्या काही अस्मानी–सुलतानी काव्यांत व्यंजना आणि काहीशी उपहासगर्भता असल्याचे त्यांच्या काव्याच्या टीकाकारांना कदाचित जाणवत असेल. परंतु आजच्या समाजजीवनात जे व्यंग्य, जो ढोंगीपणा, जी विषमता, जो भ्रष्टाचार आणि अहंकार त्यांच्या प्रत्ययास येतो त्यातून त्यांचे विनोदी काव्य जन्मास येते आणि काव्यपिता जे पाहतो व अनुभवतो त्याचे मूर्ति-मंत चित्र तो उभे करतो आणि रंजकतेबरोबर बोध देण्याइतपत त्याची काव्य-प्रकृती सेवारूप धारण करते. त्याच्या कवितांचा घाट, थाट आणि डौल काही आगळाच ! त्याचे हास्यपाते तीक्ष्ण असले तरी, ते कोणाला घायाळ करीत नाही. त्याच्या ग्रामीण शब्दांच्या फेकी काहीशा चवताळून जात असल्या तरी त्या कोणाला अपमानित करीत नाहीत आतापर्यन्त सादर केलेल्या प्रा. सोटे यांच्या काव्यापेक्षा, 'गीतामाय' अगदी भिन्न आहे. पूर्वीच्या त्यांच्या काव्याच्या प्रकृती व प्रवृत्ति–धर्माहून 'गीतामाय' च्या प्रकृती व प्रवृत्तीची घडण उच्च व उदात्त आहे. ती अध्यात्माच्या अंकावर डौलाने विराजमान झाली आहे. तिचे अंतरंग तेजस्वी व प्रभावी आहे. ती भगवद्गीतेचे प्रतिरूप असल्याने ग्रामीण जनमनावर सहजतेने व सुलभतेने आपला सद्भावप्रेरक पगडा बसविण्यास शक्तिमान आहे. पण, अशा या अध्यात्मावरील 'गीतामाय' ला माझ्यासारख्या अध्यात्माच्या क्षेत्रात अनभिज्ञ असलेल्या निरक्षर खेडुताने प्रस्तावना लिहावी, हे मात्र योग्य वाटत नसल्यामुळे स्वतःची पात्रता लक्षात घेऊन, ती न लिहिण्याचे मी मनाशी ठरविले परंतु प्रा. सोटे यांची निष्ठा व इच्छा जाणून 'गीतामाय' च्या सावलीत तिची काही मंगल पाने चाळण्याचा यत्न मात्र करू लागलो. तेव्हा प्रत्यक्ष संस्कृतस्वामिनी भगवद्गीता नजरेपुढे तरळू लागली. मग हळूच आचार्य विनोबाजी भावे यांची 'गीताई' हृदय

पुलकित करणारे मधुर गीत गाऊ लागली आणि नंतर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची 'ग्रामगीता' माझ्याशी ग्रामीणांविषयी बोलू लागली—काही सांगू लागली. त्या वेळी त्या तंद्रीत अध्यात्माची काही वलये अंतःकरणात उठत असतानाच नकळत माझा डोळा लागला, आणि एक स्वप्न घर करू लागले :

एक अत्यंत रम्य नि विलोभनीय नगरी आहे. त्या नगरीच्या मध्यभागी एक भव्य प्रशस्त व चेतोहारी प्रासाद आहे. त्या प्रासादाच्या पुढ्यात एक गगनवेध घेणारे कारंजे आहे. त्यातून सप्तरंगी धारा—तुषार उंचच्या उंच वेगाने उडत आहेत. प्रासादाच्या एका सिंहासनावर पाप—पुण्य, जन्ममरण, सदाचार—दुराचार यांची दक्षतेने नोंद घेणारा चित्रविचित्र पोषाखधारी चित्रगुप्त पाय ताणून बसला आहे. त्याची अत्यंत तीक्ष्ण व भेदक नजर इकडे तिकडे भिरभिरत आहे. त्या प्रासादाच्या पूर्वेच्या कडेला एक सुंदर मंदिर आहे. त्या ज्ञानमंदिरात एका उंच मखमली बैठकीवर भगवद्गीतेचा ग्रंथ आहे. मंदिराच्या अंगणात कमळ, गुलाब, चाफा यांची पुष्पे फुललेली आहेत. तर पश्चिम कडेला एक छोटीशी पर्णकुटी आहे. तिच्या चिमुकल्या ओसरीत एका तुटक्या पाटावर 'गीतामाय' पहुडली आहे. छोट्या अंगणात मोगरा, जाई—जुईची फुले यांचा शिडकाव झाला आहे. त्यांच्या मधोमध असलेल्या कारंजाच्या एका दिशेने एक जलप्रवाह गंभीरतेने वाहत आहे; तर दुसऱ्या दिशेने दुसरा जलप्रवाह झुळझुळपणे वाहत आहे. मंदिराच्या उत्तरेला असलेल्या एका विशाल वृक्षाच्या छायेखाली ज्ञानी स्त्री—पुरुष भगवद्गीतेचे पारायण करीत आहेत, तर पर्णकुटीच्या दक्षिणेला असलेल्या एका ठेंगू बांधाच्या वृक्षाखाली प्रासादातील सामान्य अनुचर व परिचर मोठ्या कौतुकाने 'गीतामाय' समजून घेण्याचा कसोशीचा यत्न करीत आहेत. त्याच प्रसन्न वातावरणात काही अत्यंत लावण्यमयी अप्सरा कारंज्याभवती फेरे घालून 'हरे कृष्ण—हरे राम 'चा जयघोष करीत, पुढे जाऊनच चित्रगुप्तावर आपल्या फुलपात्रातील मोहक व सुगंधित पुष्पे उधळीत आहेत, इतक्यात मी तेथे गेलो आहे. मजवर नजर जाताच चित्रगुप्त आपल्या कठोर वाणीने विचारतात, 'कोण रे तू ? आणि इथे येण्याचे धाडस कसे केले ?' त्या अत्यंत करड्या वाणीने मी भयभीत झालो. दरदरून घाम सुटला. देह कंपित झाला. तरी हात जोडून विनम्रतेने म्हटले, 'महाराज, मी भंडारा जिल्ह्यातील गणेशपूर खेड्याचा एक अडाणी माणूस आहे. भगवद्गीतेच्या अध्ययनासाठी इथे धाव घेतली. कृपा करावी महाराज,' त्यावर ते खेकसूनच उत्तरले, 'जा त्या पर्णकुटीकडे 'गीतामाय 'ची भेट घे' तोच घरात कुठेतरी खणकन् झाले आणि माझी निद्रा भंगली. जागे होऊन पाहतो तो प्रा. सोटे यांची 'गीतामाय' माझ्या हृदयाला बिलगून होती.

'गीतामाय' ला प्रस्तावना लिहिण्याची माझी कसलीही प्रज्ञा नसतानासुद्धा, निर्दिष्ट स्वप्नातील दृष्टान्ताने 'गीतामाय' चे स्वरूप माझ्या कुवतीनुसार दर्श-

विण्याचे धाष्टर्य मला करावे लागले. वस्तुत: स्वप्नातील घटनाच इतकी बोलकी ठरावी की त्या पार्श्वभूमीवर शब्दब्रह्म उभारण्याचे प्रयोजन नाही. ' गीतामाय ' ज्या स्वरूपात निर्माण झाली आहे आणि जे शब्दातीत अंकित झाले आहेत. त्यावरून भगवद्गीता एका वेगळ्या रूपाने ग्रामीणांसाठी अवतरली एवढे नमूद केले की पुरे.

प्रा. सोटे यांनी गीतेच्या अठराही अध्यायांचा काहीसा स्वैर व सोयीचा अनुवाद केला आहे. त्या अध्यायांतील ग्रामीण भाषेत केवळ काही वऱ्हाडी बोलीतीलच शब्द नाहीत तर काही काही ओव्यांत नागपुरी–चन्द्रपुरी विभागातील बोलीतील शब्द अन्तर्भूत झालेले आढळून येतात. त्यात, ' लढाईचा टेम झाला ', ' तोंड जाय सोकून ', ' नाही जल्म ', ' आगुदर नाचते न इघ्न ', ' सारी अलादीच माह्याहुनी ', ' नाही तकलीब ', ' तरासे लोकाले ', ' अभायात ', ' साली मही ', ' पसाच्या सगत ', असे शब्दप्रयोग ग्रथित झाले आहेत. पण अशा ग्रामीण बोलभाषेतील शब्द वापरताना, संदर्भाला वा भावार्थाला धक्का लागणार नाही याची दखल कवीने घेतली आहे. अनेक ओव्यांत कवीला काही क्लिष्ट व संस्कृतमय शब्दांना प्रतिशब्द आठवला नाही म्हणा किंवा ग्रामीण शब्दप्रयोगाचा अनर्थ होऊ नये म्हणून म्हणा ', ' वेदी ओंकार ', ' बुद्धिवाद्यात बुद्धी ', ' दिव्य विभूती ' ' ब्रह्मयोग ', ' सांख्ययोग ', ' आत्म्यामधी ब्रह्मलीन ', ' भाविक इंद्रिय ', ' कर्म ब्रह्म ', ' आत्मा चिरंतन ', ' ब्रह्मयंती घरे ', असे शब्द राखले आहेत, त्याचा अर्थबोध सहजतेने ग्रामीणांना कितपत होईल अशी शंका असली तरी भावार्थ उमगू शकेल असे वाटते. तथापि तशा शब्दप्रयोगावर बोलभाषेत का होईना शब्दार्थ व संदर्भ टीपा दिल्या गेल्या असत्या तर अधिक उपयुक्त झाले असते. कवी प्रा. सोटे यांनी गीतेतील संस्कृत ओव्यांचा जो सुलभ व सरळ अनुवाद केला त्यांपैकी दोन-चार मूळ संस्कृत ओव्या दर्शवीत आहे. त्यांचा अनुवादही जाणिवेने लक्षात घेण्यासारखा आहे.

अध्याय : ४ श्लोक ७–८

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।

——नाहीसा ह्या होते धर्म ज्या ज्या समयी अर्जुना
अधर्म माजते लोकी तेव्हा घेतो जल्म पुन्हा
राखन्यासी साधू, संत नाहीसे करन्या पापी
धर्म पुन्हा स्थापालेगा युगे–युगे मी प्रगटी

अष्टमोध्याय : ३

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ।।
--थे थोर नास ना पावे आत्मभाव अध्यात्म ते ।
सारी सुष्टी घडविते जान बेकार कर्म ते ।।

अध्याय : १३ : १९-२०-२१

प्रकृतिं पुरुषं चैव विद्धयनादी उभावपि ।
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ।।
कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ।।
पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङक्ते प्रकृतिजान्गुणान् ।
कारणं गुणसंङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु ।।
--शरीर, पुरुस मूळ आहे असं हे गा जान
राग, द्वेस गा, हंकार उपजे देहापासून
देहाचे इंद्रिये सारे, त्याचे काम देहाकडे
सुखदुखाचे कारन, सांगते मानसाकडे
शरीरी मानुस येता शरीर गुन मांगतो
ये संबंध गुनाले ज्या बरा, बुरा जल्म घेतो

अध्याय : १४-१४

यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत्
तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ।।
-बळ वाढे तगमगून अशाने गुन्हे वाढते
विसर, मोह मानसाले धरून गा पछाडते

प्रस्तुत ठिकाणी गीतेतील या ज्या दोन चार ओव्या नमुन्यादाखल प्रा. सोटे यांच्या बोलभाषेतील अनुवादासह नमूद केल्या, त्यातील कस, शुद्ध व स्वच्छ भावार्थ प्रतीत करण्यास समर्थ तर ठरतोच पण कवीने मोठ्या तन्मयतेने केलेला अभ्यास आणि त्यांचे बोलभाषेतील कसबही स्पष्ट होते. संस्कृतचा शुद्ध मराठी अनुवाद वा भाषांतर करणे जेथे कठीण तेथे ग्रामीण म्हणा अथवा बोलभाषा म्हणा वापरून अनुवाद करणे आणि संस्कृतच्या रूपाला, रसाला, गंधाला व अर्थाला कसली झळ पोचू न देणे त्याहूनही कठीणच. पण कवी प्रा. सोटे यांनी आपल्या व्यासंगी वृत्तीने व संशोधनात्मक दृष्टीने बोलभाषा जाणिवेने आत्मसात करून, संपूर्ण गीतेचा बोलभाषेत जो अनुवाद केला आहे, तो निःसंशय स्पृहणीय आहे.

गीतामायच्या सावलीत विसावा घेत आत्मलक्षी होऊन विचार करताना भगवद्गीतेतील काही आदर्शांचे प्रश्न नजरेपुढे उभे राहतात. गीतेत कर्मयोग, भक्तियोग, ब्रह्मयोग, सांख्ययोग व ज्ञानयोग यांपैकी कोणता योग विशेष मानावा याबद्दल मनात संभ्रम निर्माण होतो. लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' या आपल्या मौलिक ग्रंथात कर्मयोगावर कटाक्षाने भर दिला असून, इतर योगांच्या आध्यात्मिक वाटा, कर्मयोग केन्द्रस्थानी मानून, त्याच्याशी सूत्रबद्धतेने जोडल्या आहेत. 'गीतारहस्य किंवा कर्मयोगशास्त्र' या लोकमान्य टिळकांच्या ग्रंथातील 'गीता व बौद्धग्रंथ' हे प्रकरण तर विशेष महत्त्वाचे आहे. त्यात गांभीर्याने आदर्शवादाची मीमांसा करण्यात आली असून, त्यानुरोधाने अलीकडे जी चर्चा केली जाते ती मात्र बरीच सैल व खेदजनक असल्याचे आढळून येते. रामायणातील काय अथवा महाभारतातील काय आदर्शवादातही वैफल्य असल्याचे दर्शविण्यात येते. त्या दृष्टीने 'लोकशिक्षणाच्या सन १९४१ च्या अंकात श्री. स. ज. भागवत यांचा अवतीर्ण झालेला 'व्यासांचा आक्रोश' हा लेख मोठा विचारप्रवर्तक आहे. या लेखाच्या प्रारंभी 'महाभारतातील' 'ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति माम् । धर्मादर्थश्च कामश्च स धर्मः किं न सेव्यते ॥' हा श्लोक उद्धृत करून श्री. भागवत म्हणतात–

"भारतीय संस्कृतीतील रामायण व महाभारत या प्रमुख आर्यकाव्यांत जीवनाचे दोन आदर्श दाखविले आहेत. व्यक्तिशः आदर्श मानव चित्रित करण्यासाठी रामायणात वाल्मीकीची प्रतिभा खर्ची पडलेली आहे. आणि महाभारतात आपले बुद्धि-वर्चस्व वेचून व्यासांनी जीवनाचा सामाजिक आदर्श उभा केला आहे. वस्तुतः या दोन्ही आदर्शांचा परस्पर दृढ संबंध आहे. कारण, आदर्शवत समाजाच्या निर्मितीसाठी जरी असामान्य व्यक्तीची आवश्यकता असली तरी आदर्श समाजात आदर्श मानवही निर्माण होणे शक्य आहे. त्यामुळे समाजाचे सर्व व्यवहार आदर्श जीवन निर्माण करण्याच्या दृष्टीने कसे चालवावे याची म्हणजे आदर्शाच्या व्यावहारिक साधनेची मुख्य गरज आहे··· पण सामाजिक इतिहास पाहिला असता समाजात ही न्यायनिष्ठा अद्यापि दृढपणे रुजलेली दिसून येत नाही. त्यामुळे व्यासांसारख्या ज्ञानी व 'सर्वभूतहिते रतः' अशा थोर पुरुषांना दुःखाचा आक्रोश करावा लागलेला आहे."

इतकेच नव्हे तर, भगवद्गीतेच्या आदर्शवादाच्या विफलतेसंबंधीसुद्धा काही आधुनिक विद्वान टीकाकार आपली मते प्रदर्शित करताना आढळतात. भगवान श्रीकृष्णाने भारतीय महायुद्धाच्या प्रसंगी प्रत्यक्ष रणांगणावर वीर अर्जुनाला धर्मोपदेश केला पण त्याला पुरावा काय व तो ग्रथित कसा झाला आणि मग पुढे त्या उपदेशानुसार आदर्शवत असे काय घडले, अशी पृच्छा करून, भगवान श्रीकृष्णाच्या हयातीतच यादवी माजून यादवकुलाचा नाश कसा झाला, हे कशाचे द्योतक आहे,

असा खोचक प्रश्नही केला जातो. आजच्या अणुशक्ती युगात विचक्षण व व्युत्पन्न संशोधकांच्या बुद्धीला हादरा देणारी संशोधने प्रत्ययास येत आहेत. दहा तोंडी दुष्ट समजला जाणारा रामायणातील रावण "महात्मा रावण" म्हणून प्रसिद्धी पावू लागला आहे, तर भर राजसभेत सत्त्वशील द्रौपदीची विटंबना करणारा आणि छद्मछल करणारा दुरात्मा दुर्योधन आता सदाचारी सुयोधन म्हणून मान वर काढीत आहे. यावरून बुद्धिजीवी समाज कोणत्या मुक्कामावर आहे आणि कोणत्या दिशेने धाव घेत आहे याची कल्पना येईल. तो आता भाविक, अंधश्रद्धाळू आणि प्रतिगामी विचारसरणीचा राहिला नाही तर झपाट्याने होणाऱ्या विज्ञानाच्या प्रगतीबरोबर त्याची ज्ञानबुद्धी व तर्कशक्तीही गरुडभरारी घेऊ पाहत आहे. आदर्शवादाच्या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो, तो म्हणजे, गीतेची छाया बौद्ध-धर्मग्रंथावर आणि भागवत धर्माची छाया महायान पंथावर पडली अशी अत्युक्त विधाने केली जातात. त्यासंबंधी आदर्शवादातील संघर्षवाद की संघर्षवादातील आदर्शवाद बाजूला सारला तर महाभारत बुद्धानंतरचे आहे, छाया पडायचीच झाली तर ती महाभारत आदी ग्रंथ व पंथ यावर पडू शकेल. महाभारतान्तर्गत गीतेचा खरा आविष्कार श्रीसंत ज्ञानेश्वरांनी केला आणि त्यांनी भागवत धर्माचा पुरस्कारही केला हे निर्विवाद आहे. तेव्हा ऐतिहासिक कालमान लक्षात घेता, भागवत धर्माचा त्यापूर्वीच्या महायान पंथावर प्रभाव पडणे शक्यच नाही. उलट बौद्ध धर्म, ग्रंथ व त्यांचे अनुसरण करणारे महायान आदी पंथ यांचाच प्रभाव बौद्धधर्माची भारत व भारताबाहेरील व्याप्ती आणि बौद्ध धर्म ग्रंथ पालन यामुळे इतर धर्म, पंथ व ग्रंथ यांवर पडणेच अधिक शक्य आहे. युक्तिवादाने व बुद्धि-वादाने आपल्या मताचे व सिद्धांताचे समर्थन करणे वेगळे आणि युक्तियोग व बुद्धियोग राखून सत्याची प्रांजळ भूमिका आविष्कृत करणे वेगळे. आणि म्हणून संघर्षवादात आदर्शवाद दर्शविणे किंवा आदर्शवादात संघर्षवाद निर्माण करणे मानवाला हितप्रद ठरणारे नाही.

अशाच आदर्शवादाच्या अनुषंगाने प्रा. रा. श्री. जोग, यांनी कालिदासपूर्व बौद्धकाव्य या आपल्या एका लेखात जी मीमांसा केली आहे ती विचारप्रवण असली तरी बुद्धिप्रवण वाटत नाही. बुद्ध अनुयायी महायान पंथाचा सूत्रधार अश्वघोष (बुद्धघोष)हा इ. स. च्या पहिल्या शतकात विशेष कीर्तिमान झाला. त्याने अनेक उत्तमोत्तम काव्यरचना केली. 'सौन्दरनंद' आणि 'बुद्धचरित' ही त्याची दोन महा-काव्ये तर रामायण व महाभारताच्या तोडीची आहेत. पाली आणि संस्कृत या दोन भाषांवर त्याचे इतके प्रभुत्व होते की, त्याचा संस्कृतवाङमयावर प्रभावी प्रकाश पडला असे आढळून येते. तसाच तो मोठा कल्पक व रसज्ञही होता. त्याच्या या दोन महाकाव्यांवर टीका करताना प्रा. जोग म्हणतात : "अश्वघोषाने आपल्या या काव्यातील काही कल्पना रामायणातून घेतल्या असे दिसते. सिद्धार्थ वनातून परत

न आल्यामुळे छंदकाने केलेला शोक रामाशिवाय परत आलेल्या सुमंताचे स्मरण करून देतो. अंतःपुरातील झोपलेल्या स्त्रियांच्या वर्णनाने रामायणातील रावणाच्या अंतःपुराचे वर्णन आठवते. यशोधरेने सिद्धार्थाच्या वनवासातील जीवनासंबंधी केलेला शोक सीतेने रामासंबंधी त्याचकरिता केलेल्या विलापाची आठवण करून देईल. सारांश, बुद्धचरित्रातील घटनांचे वर्णन रामचरित्रातील घटनांच्या धर्तीवर करण्याचा लेखकाचा प्रयत्न दिसतो. असे करताना वाल्मीकीचा साधेपणा मात्र न स्वीकारता त्यावर काव्यपद्धतीचा थोडाबहुत संस्कार करूनच त्याने ते केले. यास्तव हे काव्य स्वरूपतः रामायणापेक्षा भिन्न वाटते." प्रा. जोग यांची ही वाङमयीन टीका समजण्यासारखी आहे. पण एकाला एक कल्पना सुचली वा घटना दर्शविता आली तशीच ती दुसऱ्याला दर्शविता येणार नाही, असे नाही. म्हणूनच वाल्मीकींच्या काही कल्पनांचे व घटनांचे अनुकरण व्यासांनी केले असे म्हणणे सयुक्तिक ठरणार नाही. कोणत्याही वादाने मानवाच्या जीवनविषयक आदर्शाला तडा जाणार नाही याची दखल घेऊन, लोकहितैषी आदर्श अलंकृत करणेच श्रेयस्कर. गीतेतील कर्मयोगासंबंधीचा आदर्शवाद त्यादृष्टीने, आजच्या प्रगत समाजाला उपयुक्त करावा, असा कोणीही सुबुद्ध मानव म्हणेल.

गीतेतील अध्यात्म आणि जीवनसाफल्य यांचा आजच्या परिवर्तनाच्या काळात विचार करताना काही प्रमेये उभी राहतात. ध्येयधारणा आणि कर्तव्यकर्म यात बरीच तफावत आढळून मन विषण्ण होते. तत्त्व आणि व्यवहार, सिद्धांत आणि आचार व योगसाधन आणि कर्मसिद्धी यांतील अंतर कृतिशून्यतेने इतके प्रखर वाटते की जीवन 'जीवन' वाटत नाही. अध्यात्म म्हणजे लोककल्याणकारी प्रकृती. पवित्र मनाला ग्वाही ठेवून सत्कृत्ये करण्यानेच मनुष्यत्व सिद्ध होते आणि जीवन सार्थकी लागण्याचे खरे समाधान प्राप्त होते. अशा पवित्र प्रकृतिधर्मावरच भारताचा आध्यात्मिक मूळ पिंड तेजोवर्धित झाला आहे, त्यावर भारतीय उच्च व उदात्त संस्कृती जोपासली गेली, आविष्कृत झाली आहे. पण अलीकडे या अणुयुगात, लोककल्याणकारी अध्यात्म आणि संस्कृती बरीच काळवंडली आहे. आम्ही आमच्या मूळच्या तेजस्वी प्रकृतिधर्मापासून व संस्कृतिसंवर्धक प्रवृत्तीपासून ढळलो आहोत. त्यामुळे राष्ट्राची शक्ती खचली व उच्च नैतिक दर्जाही ढासळला आहे आणि म्हणून बदलत्या परिस्थितीची आणि राज्यपिपासू परकीयांच्या आक्रमणाची चाहूल वेळीच लक्षात घेऊन, आपण भारतीयांनी एकात्मतेने वीरवृत्तीची प्रखर व प्रभावी घडण निर्माण केली पाहिजे आणि आपल्या अमोघ शक्तीने आपण भारताचे प्रभुत्व पावनत्व जगाच्या प्रत्ययास आणून दिले पाहिजे, अध्यात्म, विज्ञान, साहित्य व संस्कृती या चतुःसूत्रीवर भारताचा मूळ पिंड पुन्हा तेजाने तळपला पाहिजे. गीता तो संकेत आजही विशेष जाणिवेने दर्शवीत आहे.

अध्यात्माच्या तळाशी जायचे तर, अदिती शक्ती उमगून घेतली पाहिजे.

जीवनाची जी अंगभूत प्रमुख तत्त्वे आहेत ती जाणून घेणे आवश्यक आहे. गीता काय किंवा तत्सम इतर धर्मग्रंथ काय, त्यातील सिद्धांतांचा व कर्तव्यकर्मातील बोधकारी प्रसादचिन्हांचा त्याशिवाय प्रत्यय येणार नाही.

अदितिर् द्यौरदितिरन्तरिक्षम्: अदितिर् माता स पिता स पुत्रः
विश्वे देवा अदिति: पंचजना अदितिर् जातमदितिर् जनित्वम्.
(ऋग्वेद १–९–१०)

दिव्य तेजाने प्रकाशित करणारी प्रतिभा (द्यौ:), चैतन्याची आंतरिक स्मृती (अन्तरिक्षम्), लहान मोठ्या सर्वांसाठी उदार समान-वृत्ती (माता), जगसंरक्षणासाठी व्यक्त केले जाणारे प्रेम (पिता), सर्व जगाला सुखी बनविणारी पवित्रता (पुत्र), विश्वसंग्रहाची शक्ती (विश्वे देवा:), पाच वर्णांच्या मानववंशासाठी प्रकट होणारी सहानुभती (पंचजना:), भूतकाळचे अनादि स्मरण (जातम्) आणि भविष्यकाळासाठी असलेली (आशा) (जनित्वम्), हे सर्व अदितीमध्ये एकत्रित झाले आहे. असे वर्णन राहुगण-पुत्र गौतमाने केले आहे. त्या प्रबल अदिती शक्तीची जीवनातील महत्ता सूक्ष्मतेने जाणूनच ऋषिमहामुनींनी आध्यात्मिक बैठकीवरून साधना केली आणि कल्याणकारी आत्मबल व आत्मतेज प्राप्त केले. अशाच आध्यात्मिक बैठकीवरील साधनेने गौतमाने-बुद्धाने-सिद्धार्थाने आत्मबल व आत्मतेजाबरोबर दिव्य ज्ञान प्राप्त करून, मानवोद्धार केला– विश्वकल्याण साधले. त्याच संदर्भात गीतेतील ही ओवी विचारार्थ घेणे कल्याणप्रद ठरेल–

ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रियः
युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचन:
(गीता अध्याय ६ : ८)

शास्त्रज्ञान व अनुभवज्ञान झाल्याने ज्याचा अंतरात्मा तृप्त आहे, जो विकाररहित विजितेन्द्रिय आहे, जसे मातीचे ढेकूळ, दगड व कांचन यांना समान लेखणारा योगी हा निसर्गाशी, प्रबल पवित्र प्रकृतीशी युक्त होऊन, सिद्धावस्थेस पोचतो. त्या दृष्टीने मनुष्याचा आध्यात्मिक पिंड दीप्तिमान झाला पाहिजे. अध्यात्मशास्त्रात सिद्धांत, साधना व पूर्व सत्क्रियाकर्म या त्रयींनी परमार्थ साध्य आहे. ध्यानमार्ग, सांख्यमार्ग व कार्यमार्ग या त्रयींनी आत्मदर्शनाचा लाभ घडतो. पण अत्यंत खेदाची व उद्वेगजनक गोष्ट म्हणजे धर्माच्या नावाखाली अवडंबर माजवून, जे स्वत:ला ज्ञानी व धर्ममार्तण्ड समजतात आणि जे स्वत:ला उच्च वर्णीय मानून आपल्याला प्रतिष्ठित समजतात, त्यांनी विषमतेचे व भेदभावाचे जे प्रकार आरंभिले ते, एकात्मतेला व सद्भावनेला आग लावण्याचे सत्कार्य करीत आहेत. सत्कार्य म्हणा अथवा पुण्यकार्य म्हणा आम्ही करीत आहोत अशा भ्रमाने वागून, आपण स्वर्गात जाणार या कल्पनेने पवित्र धर्माचा दुरुपयोग करीत आहेत,

ते स्वर्गवाटेने जात नसून, अव्यक्तपणे नरकाची वाटचाल करीत आहेत, असे म्हटले तर दोषार्ह वा अत्युक्त ठरू नये. त्यांना कल्याणकारी, सर्व मानवउद्धारक अध्यात्म कळलाच नाही, त्यांना आध्यात्मिक पिंड लाभलाच नाही. अध्यात्मातील योग-साधनेचे मर्म त्यांना उमगलेच नाही. मानवतावादी सिद्धान्ताची व परातत्त्वस्पर्शाची अस्मिता त्यांना समजलीच नाही. केवळ वेदपठन करून, केवळ पूजाअर्चा करून, केवळ होमविधी करून, केवळ धडधड मंत्रोच्चार करून काही अध्यात्म लाभत नाही– मानवतेची उंची गाठता येत नाही– कल्याणाची वाट गवसत नाही आणि म्हणूनच कर्मयोगाचे, सांख्ययोगाचे, ज्ञानयोगाचे व भक्तियोगाचे माहात्म्य लोकमान्य टिळकांनी पोटतिडिकीने विशद केले. ब्रह्मलाभातील मर्म दर्शविताना श्रीसंत ज्ञानेश्वर उद्गारतात–

परि दैव जैसे कवतिके । कहि चि सरौनि दैन्य न देखे
कां विवेका नालेखे । भ्रांतिते ।।...
ना तरि अंधकाराची वानी जैसा सूर्य नेणे स्वप्नी
अमृत नाइके आपुले कानी मृत्युकथा...
म्हणौनि सर्वत्र सदा सम । ते आपण चि अद्वय ब्रह्म
हे संपूर्णता जाणै वर्म । समद्रष्टचांचे.

" भाग्याला दैन्याची, विवेकाला भ्रमाची, सूर्याला अंधकाराच्या स्वरूपाची; अमृताला मृत्यूची आणि चन्द्राला संतापाची जशी कल्पना नसते तशी खऱ्या माणसाला बुद्धिवंताला आणि ज्ञानी पुरुषाला भेदभावाची कल्पनाच नसते. कोण नीच आणि कोण श्रेष्ठ, कोण गरीब आणि कोण श्रीमंत, कोण कुठल्या कुळातला आणि धर्मातला असा भेद मनुष्याला ठेवावा लागत नाही, जो तसा भेद ठेवतो, विषमता राखतो तो माणूसच नव्हे. म्हणून अहंकार, भेद, विषमता कोणी राखू नये, तशी कल्पनाच येता कामा नये. तेव्हा समता, समदृष्टी आणि सद्भाव राखल्यानेच मनुष्य ' मनुष्य ' ठरतो, त्याला ब्रह्मलाभ होतो. म्हणून यातील मर्म समजून घेऊन जीवनात सदाचार राखला पाहिजे." श्रीसंत ज्ञानेशांनी ब्रह्मलाभातील हे जे इंगित दर्शविले ते प्रज्ञावंतांनी व विचारवंतांनी, धर्मपंडितांनी व लोकसेवकांनी नीट उमगून घेऊन, उद्धारार्थ आपली पावले पुढे टाकली पाहिजे.

अध्यात्माच्या प्रक्रियेत देह, आत्मा व निसर्ग यांचे जे अन्योन्य संबंध आहेत आणि जे वाणी, ज्ञान आणि प्रज्ञा परतत्त्वस्पर्शू सिद्ध होऊन, जीवनातील अंतिम शांतिसाधना प्राप्त करतात, ते केवळ लोकोत्तर पुरुषच नव्हेत तर ब्रह्मात्म व बुद्धात्मरूपी पुरुष होत. ते ज्ञान-विज्ञानाव्यतिरिक्त निसर्गालाही अंकित करण्यास समर्थ ठरतात.

यच्छेद् वाङ्मनसी प्राज्ञः तद् यच्छेज्ज्ञानमात्मनि ।
ज्ञानमात्मनि महति नियच्छेत् तद् यच्छेच्छान्त आत्मनि ।।

( कठ. उप. ३–१३ )

वाणीचा मनात, मनाचा ज्ञानात्म्यात, ज्ञानाचा महदात्म्यात व मग या महात्म्याचा शांत आत्म्यात प्रवेश झाल्यावर, तो परमशुद्ध आणि आत्मशक्तिपूर्ण बनून, त्याचे जीवन फलद्रूप करणारी अंतिम अध्यात्मसाधना पूर्ण होते.

विदर्भाचे एक नामवंत लोककवी प्रा. देविदास सोटे यांची 'गीतामाय' अगदी साधी सरळ आहे. पण तिचा पिंड आध्यात्मिक आहे. ती नटून थटून शहरात स्वैर-पणे संचार करायला जन्मास आली नाही तर सोज्ज्वलतेने व शालीनतेने वागून ग्रामीणांच्या आध्यात्मिक, नैतिक व सांस्कृतिक जीवनात नवचैतन्य निर्माण कर-ण्यास खेड्यासाठी जन्मली आहे. तिची प्रकृती उत्तान नाही तर खेड्यांना उन्नत करण्यास शक्तिमान ठरेल, अशी उदात्त आहे. भोगवादी जीवनासाठी झेप घेणारी तिची प्रवृत्ती नाही तर ग्रामीणांच्या उद्धारार्थ ती झटणारी आहे. प्रा. सोटे यांनी सेवाभावाने 'गीतामाय' निर्माण करून एक मोठे सत्कार्य केले आहे. ती खेड्या-तील माय आहे. त्या मायेच्या सावलीत विसावा घेऊन ग्रामीण जनता ज्ञानवंत व प्रज्ञावंत बनेल, अशी आशा आहे. 'गीतामाय'ची ओवी न् ओवी खेड्यापाड्या-तील प्रत्येक घराघरातून व दालनादालनातून संचार करो व सदा गुंजत राहो आणि तिच्या प्रभावाने खेड्यातील घर न् घर चैतन्यमय होवो आणि ग्रामीण विभागात आध्यात्मिक क्रांती घडवून आणण्यास ती समर्थ बनो, हीच माझी सदिच्छा.

वैशाख पौर्णिमा :<br>
२८ मे १९७२<br>
श्री शेषाश्रम,<br>
गणेशपूर, भंडारा

□ □ □

# सर्ग ६

१. साहित्याच्या
श्रेष्ठ व्यासपीठावरील
एक अध्यक्षीय भाषण

# १.

## साहित्याच्या श्रेष्ठ व्यासपीठावरील एक अध्यक्षीय भाषण

मान्यवर साहित्यिक वृन्द आणि श्रद्धेय बन्धु-भगिनींनो,

विदर्भ साहित्य संघाच्या या उच्च व्यासपीठावरून सम्मेलनाध्यक्ष म्हणून मी एक छोटा खेडूत लेखक आपणा सर्वांना शिवकालीन पद्धतीचा मानाचा मुजरा करीत आहे. गेल्या दहा वर्षांत विदर्भ साहित्य संघाची जी अल्पस्वरूप सेवा मी केली त्याची केवळ रीतसर 'पावती'च मला गेल्या वर्षी वि. सा. संघाचा अध्यक्ष बनवून दिली गेली इतकेच नव्हे तर आता सम्मेलनाध्यक्ष बनवून सरस्वतीच्या 'बहुमानाचा प्रसाद'ही देऊन माझा गौरव केला गेला ! हा मी माझा गौरव मानीत नाही तर तो केवळ विदर्भाचाच नव्हे तर अखिल मराठी मुलुखातील बहुजन समाजाचा--ज्यांनी मराठी संस्कृती, मराठी रीतभात आणि मानवता यांची बूज राखली--त्या माझ्या सुसंस्कृत खेडूत बांधवांचा गौरव होय. त्यांना माझे शतशः प्रणाम !

वस्तुतः सम्मेलनाच्या अध्यक्षपदासाठी थोर संशोधक व साहित्यिक डॉ. ग. त्र्यं. देशपांडे आणि ख्यातनाम टीकाकार व कवी श्री. वा. ना. देशपांडे यांचीही नावे सुचविली गेली होती. या दोन पंडितांपैकी एकाने तरी हे मानाचे स्थान भूषवावे अशी माझी सदिच्छा होती. मी तसा प्रयत्नही केला. पण त्या दोघाही सुहृदांनी उलट माझ्याच नावावर भर देऊन आपली नावे परत घेतली आणि मजवरील आपला जिव्हाळा व्यक्त केला ! नियतीच्या उद्यानातील सरस्वतीच्या मंदिरात सुंदर व सुगंधित कमल किंवा गुलाब पुष्पांनाच स्थान नसून कोरांटी किंवा गुल्हारीसारख्या रानफुलांनाही तेवढेच

उच्च मानाचे स्थान आहे, याचा मला प्रकर्षाने प्रत्यय येऊन, एकतेच्या निरामय स्वत्व व सत्त्व अशा आत्म्याच्या ज्योतीचे दर्शन घडले ! आणि खेड्यातील अगदी सामान्य दगडाला भक्तिभावाने, निष्ठेने नि श्रद्धेने शेंदूर फासला तर त्या दगडालाही देवत्वाचे रूप कसे प्राप्त होते याची प्रचीतीही आली ! अर्थात हा कल्याणकारी दुवा साधणारा शारदेचा निष्ठावन्त पुजारी वंदनीय आहे. त्या दृष्टीने थोर साहित्यिक व पत्रपंडित आणि माझे हितचिंतक श्री. ग. त्र्यं. उर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांचा अभिमानाने व कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे माझे कर्तव्य आहे. त्यांच्याप्रमाणेच सद्भावनेचे अमृतघट मजवर रिचवणारे श्रेष्ठ साहित्यिक श्री. पु. य. देशपांडे, डॉ. वि. भि कोलते, सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्रीमान बाबासाहेब खापर्डे, डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, श्री. आ. रा देशपांडे, डॉ. य. खु. देशपांडे, महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी, श्री. बाळासाहेब ढवळे, प्रा. भ. श्री. पंडित, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. वा. कृ. चोरघडे, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. या. मु. पाठक आणि माझ्या पाठीशी उभे राहून मला आशीर्वाद देणारे वि. सा. संघाचे विश्वस्त लोकनायक डॉ. बापूजी अणे व न्यायमूर्ती श्री. के. तु. मंगळमूर्ती आदी हितचिंतकांना प्रणाम न करताच मी पुढे पाऊल टाकले तर वैदर्भीय रीत मी पाळली नाही–शारदेच्या दरबारात प्रवेश कसा करावा याच्या संकेताची मला जाणीव नाही असे ठरेल ! आणि म्हणून सर्वांना विनम्र प्रणाम करून आशीर्वादाची अपेक्षा करीत आहे.

विदर्भ साहित्य संघाच्या सेवेसाठी, उत्कर्षासाठी आपला देह अविरत झिजविणाऱ्या माझ्या दोन थोर सहकाऱ्यांचे स्मरण मला होत आहे ! ज्येष्ठ व श्रेष्ठ संशोधक कै. हरिभाऊ नेने आणि नामवंत नाटककार कै. नानासाहेब जोग, त्यांना मी मनोभावे श्रद्धांजली अर्पण करीत आहे !

**सुधारणांचे तीर्थक्षेत्र सावरगाव**

विदर्भ साहित्य संघाची अधिवेशने केवळ शहरापुरतीच मर्यादित न ठेवता, ती खेड्यापाड्यातही भरावीत आणि त्याद्वारे शहर व खेडी यांचे हितसंबंध दृढ होऊन एकात्मतेची भावना निर्माण व्हावी, या व्यापक दृष्टिकोनाने १९५३ साली वि. सा. संघाचे अधिवेशन राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज यांच्या अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज–मोझरी येथे, १९५५ साली अठरावे अधिवेशन भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथे, गेल्या वर्षी एकवीसवे अधिवेशन चांदा जिल्ह्यातील तळोधी येथे आणि या वर्षी हे बावीसवे अधिवेशन बुलडाणा जिल्ह्यातील सावरगाव–डुकरे या २०४ घरांच्या १,१३० लोकसंख्या असलेल्या छोट्याशा गावी भरत आहे. गाव छोटे आहे पण त्याची कीर्ती सारखी दुमदुमत आहे ! विदर्भाला ललामभूत असलेले आघाडीवरील हे गाव सुधारणांचे तीर्थक्षेत्र म्हणून भारतातील थोर नेत्यांनी आणि साहित्यिकांनी त्याची एकमुखाने केलेली प्रशंसा खेड्यापाड्यांत रामराज्य

निर्माण होण्याचे महात्मा गांधीजींचे स्वप्न काही प्रमाणात साकार करून दाखविणारे हे आदर्श गाव, जेथे अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटन करून मानवतेचे यथार्थ दर्शन घडते; जेथे 'एकमेका साह्य करूं अवघे धरूं सुपंथ' असा सद्भाव उत्कटतेने प्रतीत होतो; जेथे उच्च सांस्कृतिक, शैक्षणिक व नैतिक दर्जा प्रस्थापित होतो; जेथे मराठी उदात्त मन कल्याणप्रद गोष्टींकडे सारखे झेप घेते आणि जेथे शुचित्व नि मांगल्य थयथयते अशा या तीर्थक्षेत्री विदर्भ साहित्य संघाचे अधिवेशन भरावे व त्याचा मी अध्यक्ष होण्याचा सुयोग मला प्राप्त व्हावा हे माझे केवढे भाग्य ! अर्थात या तीर्थक्षेत्रातील मानवतेला, 'घालीन लोटांगण । वंदिन चरण । डोळयानं पाहीन रूप तुझे ॥' या शब्दांत माझा आत्मा केव्हाही साद घालील ! आणि तो महाराष्ट्रातील जनतेला आवाहन करील, बांधवांनो, उठा सत्वरि । सांस्कृतिक जीवन उच्च करा । साहित्याच्या धवलधारेने । एकात्मतेची कास धरा ॥

**विदर्भाची अस्मिता व वैदर्भीय रीती**

सावरगाव येथील साहित्याच्या या व्यासपीठावर मी उभा असताना विदर्भाच्या अस्मितेचे काही आगळेच असे मंगलमय, उदात्त व सद्‌भावप्रेरक चित्र माझ्या नजरेपुढे तरळत आहे. प्रभू रामचन्द्र आणि भगवान श्रीकृष्ण व महात्मा गौतम बुद्ध आणि श्री चक्रधरस्वामी यांच्या पदरजाने पुनीत झालेली ही विदर्भाची भूमी, रुक्मिणी व दमयंतीसारख्या देवतांचे हे माहेरघर, लोपामुद्रा व इंदुमती तसेच वैदर्भी रीती विशेषत्वाने कीर्तिमान झाली आहे. या पुण्य स्त्रिया काय किंवा अगस्त्य, जमदग्नी, मार्कंडेय इत्यादी पुण्य पुरुष काय विदर्भाचेच. ऐतिहासिक काळाच्या दृष्टीने पाहिले तरी श्रीनृसिंह सरस्वती स्वामी, जनार्दन स्वामी, श्री चोखोबासारखे साधुसंत; मराठीचे आद्य कवी मुकुंदराय व एकनाथ; अमृतराय, देवनाथ, दयाळनाथ, गोसावीनंदन, विठ्ठल, अनंत, शिवदिन केसरी, शिवकल्याण, मोरेश्वर, उत्तम श्लोक, गुलाबराय यांसारखे पद्यकार, भवभूतीसारखे श्रेष्ठ संस्कृत पंडित, कवी नाटककार, भारवीसारखे महाकवी, भोजासारखे राजकवी, हेमाद्री वोपदेव यांसारखे निबंधकार आणि भट्ट भास्कर, त्रिविक्रम यांसारखे ज्योतिषी विदर्भातच झाले. कविकुलगुरू कालिदास यांचे केवळ वास्तव्य विदर्भात झाले नाही तर उत्कृष्ट काव्यरचनाही येथेच झाली. महानुभाव पंथाचे आद्य मराठी वाङमय विदर्भातच जन्मास आले. वारकरी पंथ काय किंवा नाथ संप्रदाय काय येथेच मूळ धरून त्यांचे स्वरूप व्यापक झाले. श्रीसंत ज्ञानेश्वर, श्रीसंत तुकोबा, श्रीसंत नामदेव, श्रीसंत चोखोबा, स्वामी रामदास यांच्यासारख्या साधुसंतांची जनकल्याणकारी वाणी दुमदुमली व अजूनही दुमदुमत आहे ती विशेषेकरून विदर्भातच. खेड्यापाड्यात विठोबाची पंढरी निर्माण झाली आणि तिने धर्म आणि संस्कृतीचे जतन व संवर्धन केले. राजशेखराने या विदर्भ भूमीस 'सारस्वती

जन्मभू: ' म्हणून तिचे माहात्म्य विशद केले आहे. मराठी वाङमयाची व संस्कृतीची उज्ज्वल परंपरा अगदी पुरातन काळापासून या विदर्भात चालत आली आहे. या मानवतावादी वैदर्भी रीतीने मराठी मन केवळ अंकुरित केले नाही तर त्याला सत्पथ दर्शवून त्याचेवर मानवधर्माचे उत्तम संस्कार घडविले आहेत. विदर्भाची ही महत्ता आहे, थोरवी आहे ! विदर्भाच्या अस्मितेचे आणखी एकदोन विशेष आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोळ विदर्भातीलच आहे. ज्या सावरगावी हे सम्मेलन भरत आहे तेथून जवळच असलेल्या सिंदखेड राजा हे जिजामातेचे माहेर आहे तर येथूनच सुमारे चार मैल अंतरावर मेहुणा हे गाव श्रीसंत चोखोबाचे जन्मस्थान आहे. लष्करी निशाणाला चोळी बांधून आपल्या पराक्रमाने शिवाजी महाराजास कुंठित करून त्यांच्याकडून धर्मकन्या म्हणवून घेतलेली रायबागीण विदर्भातच झाली. नागपूरचे शौर्यशाली राजे भोसले घराणे तर इतिहासप्रसिद्धच आहे. याशिवाय राजकारण व समाजकारण यांचे पुण्य याच विदर्भाच्या पदरी पडले आहे ! लोकमान्य टिळकांच्या स्वातंत्र्यप्राप्तीची प्रेरणा या भूमीत झाली असून, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आचार्य विनोबाजी भावे यांच्यासारख्या महान नेत्यांची ही भूमी कर्मभूमी–तपोभूमी ठरली आहे. भारताला जे स्वातंत्र्य प्राप्त झाले त्याची ललकारी या पावनभूमीवरूनच दिली गेली आहे ! एका आगळ्या कारणानेही ही भूमी श्रेष्ठ आहे. ते कारण म्हणजे काळी माती. माणिक–मोती उगविणारी काळी माती ! वऱ्हाड हा सोन्याचा तुकडा म्हणून ख्यातनाम आहेच. या विदर्भाची दानतसुद्धा उच्च नि श्रेष्ठ आहे. इतरांनी आपल्यासाठी चांगले काय केले हे पाहण्यापेक्षा इतरांसाठी आपण काय चांगले करू शकतो हे पाहून तसा प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य अशी उदात्त परोपकारी व सहिष्णुवर्धी वैदर्भी रीती तळपत आहे !

**प्रेमे प्रेम बळावे, द्वेषाने अधिक वाढतो द्वेष**

विदर्भाच्या अस्मितेसंबंधी कै. साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर यांनी यवतमाळ येथील विदर्भ साहित्य संघाच्या अधिवेशनप्रसंगी दि. १७ जानेवारी १९२६ रोजी जे विद्वत्तापूर्ण अध्यक्षीय भाषण दिले ते आजच्या या परिवर्तनाच्या काळात-विशेषत: नवीन महाराष्ट्र उदयास येऊ घातला आहे अशा वेळी-विचारात घेणे आवश्यक आहे. विदर्भाच्या अस्मितेबद्दल मी थोडचा विस्ताराने सांगितले त्याचा हेतूसुद्धा पर्यायाने महाराष्ट्राची अस्मिता अधिक तेजाने, अधिक प्रभावाने मराठी मनावर बिंबवावी हा आहे त्याला एक महत्त्वाचे कारण आहे. अलीकडे विदर्भ आणि पुणे-मुंबई अशा दोन विभागांत रीती, व्यवहार आणि वागणूक याबाबत नको ती कटुता, नको तो द्वेष प्रत्ययास येत आहे ही खेदाची गोष्ट आहे. आम्ही जेव्हा मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी मन एक आहे, असे अभिमानाने म्हणतो तेव्हा कोण कुठला श्रेष्ठ व कोण कुठला कनिष्ठ असा भेद पाळणे अनुचित

होय. विद्वत्ता, श्रेष्ठत्व केवळ आमच्याच अंगी आहे, दुसरे मात्र मागासलेले, कमी प्रतीचे आहेत असा जाणून बुजून अहंमन्य भाव राखून तसा व्यवहार करणे माझ्या तरी दृष्टीने तशा विचारसरणीच्या व्यक्तींना खासच पोषक नाही; असा द्वेषभाव महाराष्ट्राला निश्चित घातक ठरेल ! त्या दृष्टीने मला विदर्भाची अस्मिता, वैदर्भीय रीती, विदर्भाचा मर्दाऊपणा, विदर्भाची दानत याचे दर्शन घडविणे भाग पडले. विदर्भाने महाराष्ट्राला कधी परका मानला, मानणार नाही कारण महाराष्ट्र आमचा आहे. त्याची संस्कृती अधिकाधिक उज्ज्वल, तेजोवर्धित करणे हे आमचे कर्तव्य आहे. साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर उद्गारतात, "सह्याद्रिखालचे कोकण व घाटमाथा हा प्रांत आम्हाला वडिलांची जन्मभूमी असा वाटतो, तर गोदाकाठच्या जुन्या महाराष्ट्राचा प्रांत हा आम्हाला आजोबाच्या घरासारखा किंवा आजोळासारखा वाटतो. विदर्भ हे आपल्या प्रांताचे इतिहासप्रसिद्ध व पुरातन नाम जुन्या विदर्भाच्या नावाइतकेच नव्या महाराष्ट्राचे नावही आपणांस प्रिय वाटेल यात संदेह नाही. वऱ्हाडाला मी आजोळ किंवा आजोबांचे घर म्हटले ते तोंडदेखले नसून सर्वस्वी यथार्थ आहे. महाराष्ट्रीय लोक ज्या आर्यकुलात समाविष्ट आहेत ते उत्तर हिंदुस्थानातून विंध्याद्री उजवा घालून प्रथम जुन्या महाराष्ट्राच्या विस्तीर्ण मैदानावर उतरले, त्या वेळी गोदावरीच्या दक्षिणतीराला दंडक नावाचे अरण्यच निम्मेशिम्मे होते व हे अरण्य पुढे नाहीसे होऊन विदर्भाकडील आर्यवसती इकडे फैलावली हे इतिहासच सांगतो. विदर्भ हेच पहिले महाराष्ट्र." मग विदर्भाची थोरवी विशद करताना तात्यासाहेब म्हणतात, "पौराणिक कथा सोडून दिल्या तरी प्रत्यक्ष ऐतिहासिक काळात महाराष्ट्रीय इतिहासाच्या व वाङमयाच्या धाग्या-दोऱ्यांचे मूळ जुन्या विदर्भ देशात म्हणजे हल्लीच्या वऱ्हाडातच सापडते ही गोष्ट तर निर्णयात्मकच ठरते. विदर्भ किंवा वऱ्हाड याची परंपरा इतकी उज्ज्वल आहे की कोणाही इतर प्रांताने त्याचे कौतुकच करावे." तात्यासाहेब केळकरांचे हे प्रांजळ मत लक्षात घेतले म्हणजे विदर्भ-महाराष्ट्र असा भेद न उरता तो एक आहे, अभंग आहे हेच सिद्ध होते. विदर्भ महाराष्ट्राचे हृदय आहे. या हृदयावर प्रहार होणे म्हणजे महाराष्ट्र शरीर निष्प्राण होणे आहे ! म्हणून मला नव्या होऊ घातलेल्या महाराष्ट्राचे स्वागत करताना म्हणावयाचे आहे– कळवळून सुचवायचे आहे–

प्रेमे प्रेम बळावे, द्वेषाने अधिक वाढतो द्वेष ।
प्रेमे उदया आले, द्वेषाने ओस पाडिले देश ।।

म्हणूनच मुंबई, कोकण, ठाणे, नाशिक आदी विभागाच्या दौऱ्यावर असताना जेव्हा चर्चा करण्याचा, भाषण देण्याचा प्रसंग आला तेव्हा तेव्हा महाराष्ट्रासंबंधी विदर्भाची सद्भावना व्यक्त करून मी आवर्जून सांगितले, "विदर्भ काय किंवा पुणे-मुंबई, मराठवाडा, कोकणपट्टी, सातारा-सोलापूर-कोल्हापूर विभाग काय एकाच

शरीराचे हे अवयव आहेत. ते अवयव विकसित करणे, सुदृढ करणे व परस्परांचे हितसंबंध अधिकाधिक दृढ करून, महाराष्ट्र संपन्न, बलशाली करण्यास आपण सर्वांनी झटणे आणि त्याच्या उज्ज्वल संस्कृतीचा आदर्श निर्माण करणे आपले कर्तव्य आहे."

**विदर्भात भाषा, उत्खनन व संशोधनाचे खाते हवे**

आज हे अधिवेशन संपूर्ण मराठी प्रदेशाचे निखालस एकभाषी राज्य स्थापन होण्याच्या संधिकालात भरत असून त्या राज्याचे कळकळीचे प्रवर्तक, निष्ठावन्त समाजसुधारक, राजधुरंधर आणि जसे आजचे तसे उद्याचे मुख्य मंत्री मा. यशवन्तराव चव्हाण यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन होण्याचा सुयोग आलेला आहे, ही घटना मी मोठी औचित्यपूर्ण व अर्थपूर्ण समजतो. विदर्भातील मराठी भाषेला आजपर्यंत द्विभाषी राज्यात राहावे लागले. शुद्ध मराठी भाषी राज्यात राहण्याची ही पहिलीच संधी तिला लाभत आहे. ही संधी विदर्भातील मराठी भाषेच्या मराठी कार्यकर्त्यांनी चालविलेल्या सर्व साहित्यिक व सांस्कृतिक संस्थांच्या उत्कर्षाला पोषक होईल, अशी मला उमेद वाटते. मराठीच्या ज्या बोलभाषा विदर्भात प्रचलित आहेत, त्यांच्या शास्त्रशुद्ध पद्धतशीर संशोधनाकडे आणि व्यासंगाकडे आतापर्यंत लक्ष देण्यात आले नाही. त्याचप्रमाणे विदर्भात जी प्राचीन अनेक उद्‌ध्वस्त नगरे आणि इतर सांस्कृतिक केन्द्रे सर्वत्र पसरलेली आहेत, त्यांचेही उत्खनन व संशोधन आजपर्यंत आस्थेने होऊ शकले नाही. त्याचा परिणाम असा झालेला आहे की, विदर्भाची ऐतिहासिक संस्कृती, साहित्य आणि बोलभाषा ही तिन्हीही उपेक्षित स्थितीत पडून राहिलेली आहेत. नव्या मराठी राज्याचे नेते आणि त्या राज्यातील ज्ञानसंवर्धनाची खाती विदर्भातील मराठी भाषा, ऐतिहासिक वास्तूंचे उत्खनन आणि इतिहाससंशोधनाचे कार्य यांच्याकडे अगत्याने लक्ष पुरवितील, असा मला विश्वास वाटतो. यासाठी नव्या मराठी राज्यात विदर्भासाठी जर स्वतंत्र खाते उघडण्यात आले, तर ते सर्वच दृष्टींनी उपकारी व इष्ट होईल. तसेच जुन्या मध्यप्रदेशात जसे ‘ मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद ’ होती व तिने उच्च दर्जाच्या साहित्याला श्रेष्ठ पुरस्कार देऊन साहित्यिकांची बूज राखली-त्यांना प्रोत्साहित केले तशीच शासन साहित्य परिषद नवीन मराठी राज्यात तरी त्वरित निर्माण केली जाईल व राज्यातील सर्व प्रदेशांना ती लागू करून समप्रमाणात साहित्यिकांना उत्तेजन देईल, अशी दृढाशा आहे.

**वाङमय लोकाभिमुख असावे : ते खेड्यातील हृदयापर्यंत पोचावे**

एका खेड्यात भरलेल्या साहित्याच्या व्यासपीठावरून मी बोलत आहे याची मला जाणीव आहे. ती जाणीव लक्षात घेऊन आज मला ‘ साहित्य ’ व ‘ वाङमय ’ या दोन शब्दांवर विशेष भर द्यायचा आहे. भारताचा आत्मा खेड्यापाड्यात बसला आहे. त्या खेड्यापाड्यांच्या सांस्कृतिक, शैक्षणिक व नैतिक उन्नतीच्या

दृष्टीने कोणते साहित्य अथवा वाङमय किती लोकांच्या उद्धारार्थ फलदायी झाले आहे याचा विचार होणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने विचार करू जाता, महाराष्ट्रातील बहुजनसमाजाच्या कल्याणार्थ जर कोणते वाङमय कामी येत असेल तर ते संतवाङमय व लोकवाङमयच होय. तसे पाहिले तर आज नामवंत गणलेल्या साहित्यिकांचे साहित्यभांडार काही कमी नाही. पण त्या साहित्याचा उपयोग केवळ विशिष्ट वर्गाच्या जीवनासाठी अगदी मर्यादित स्वरूपातच झालेला आढळून येईल. म्हणजे हे वाङमय अत्यल्प शहरवासीय लोकांसाठी, त्यातूनही छाट करून ०.५० प्रमाणात उपयोगी ठरले असावे; परंतु बहुसंख्य खेड्यातील कोटयवधी लोकांच्या ते जराही उपयोगी पडलेले नाही, अशी वस्तुस्थिती आहे. विद्वानांचे साहित्य शहरवासीय मूठभर लोकांपुरतेच मर्यादित राहिल्याने बहुजन–कल्याणाचे पुण्यकार्य करण्यास ते तोकडे पडले आहे. बहुजनसमाजाच्या दृष्टीने असे वाङमय नष्ट झाले काय, जळाले काय सारखेच ! एका विद्वानाने संस्कृतप्रचुर म्हणा, भारदस्त भाषेत म्हणा, एक मोठा ग्रंथ निर्माण केला. खेड्यांतील जीवनावर त्याचा प्रखर प्रकाश पडावा हा तो ग्रंथनिर्मितीचा हेतू. पण तो ग्रंथ खेड्यापाड्यांतील किती लोकांच्या हाती पडला. शहरातील एका श्रेष्ठ वाचनालयात तो ग्रंथ धूळ खात पडला– सतत चारपाच वर्षे त्या ग्रंथाला एकही वाचक जेथे मिळू शकला नाही तर मग खेड्यातील वाचकाबद्दल न बोललेलेच बरे ! राष्ट्राच्या साहित्यभांडारात एका ग्रंथाने भार वाढला एवढेच त्या ग्रंथकाराने समाधान मानावयाचे ! आपल्या भारतात ज्यांचे जीवन हे मुळी जीवनच ठरत नाही, अशा अफाट प्रमाणात वास करणाऱ्या म्हणजे ज्यांच्या कष्टावर, श्रमावर, घामावर जे पोशाखी शहरवासीय लोक जगतात, अशा श्रमजीवी, शेतकरी, मजूर, दलित आदी वर्गांच्या उन्नतीस्तव कोणते व किती साहित्य निर्माण झाले व त्याचा या बहुजनसमाजाला किती उपयोग झाला ? त्याचे जर उत्तर असेल–'काही नाही, तर या साहित्याचे आमच्या खेड्यापाड्यांच्या दृष्टीने मूल्यमापन शून्यवतच ठरते ! वस्तुतः अव्यक्त ते व्यक्त करणे व स्वतः शिकून इतरांना धडा देणे हे कार्य प्रत्येक सुशिक्षिताचे आहे. प्रत्येक व्यक्ती सुशिक्षित झाली पाहिजे, सुसंस्कृत झाली पाहिजे; तिने आपल्या सुखदुःखाचे समालोचन स्वतःच केले पाहिजे व ज्या दृष्टीने राष्ट्राचा दर्जा वाढेल अशी कृती आचरली पाहिजे, अशा सद्‌हेतूने प्रेरित होऊन रंजक पण बोधप्रद वाङमयनिर्मिती सुबोध भाषेत व्हावी आणि त्याची पोच खेड्यापाड्यांतील हृदयाला जाऊन भिडेल– तेथील जनतेला आपल्या जीवनाचे प्रतिबिंब न्याहाळता येऊन, त्या वाङमयाद्वारे जनता आपली सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक सुधारणा घडविण्यास समर्थ ठरेल, याची दखल लेखकाने व प्रकाशकाने, साहित्यसंस्थांनी व शासनाने जागरूकतेने घ्यावयास पाहिजे. ग्रामीण जनतेसाठी जे वाङमय निर्माण करावयाचे ते त्या जनतेला आपले आहे– आपल्या कल्याणाचे आहे असे वाटावयास हवे. पण

असे वाङमय खेड्यापाड्यातील जीवनाशी पूर्ण समरस होऊन तळमळीने व कळकळीने निर्माण झाले तरच ते लोकाभिमुख होईल, हितप्रद ठरेल.

**लोकभाषा, लोकसाहित्य व लोककला**

ग्रामीण जीवनात लोकभाषा, लोकसाहित्य व लोककला यांना संस्कृति-संवर्धनाच्या, अस्सल रीतीभातीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. खेड्या-पाड्यांतील जनमनाची पकड घेण्यासाठी– तेथील लोकांना सहज व सुलभ रीतीने समजेल व उमगेल अशी भाषा– अशी बोली महाराष्ट्रातील साधुसंतांनी वापरली. त्यांनी जनतेचा आत्मा नीट हेरला– तिच्या प्रकृती व प्रवृत्तीचा नीट कानोसा घेतला– तिच्या अवस्थेचे नीट निदान केले आणि मग आपली वाणी व लेखणी त्यांनी बहुजनहिताय उपयोगात आणून तिला उन्नतीचे पथदर्शन घडविले. आपल्या महाराष्ट्रात लोकभाषेची उंची, तिची उत्तुंग भरारी आणि तिचा लखलखणारा उंची साज विशेष आहे. म्हणून साहित्यिकांनी आपल्या या ठासीव व प्रभावी लोकभाषेकडे उपेक्षित नजरेने न पाहता तिचा यथायोग्य वापर करून मराठी भाषा संपन्न केली पाहिजे. लोकसाहित्य तर मराठी संस्कृतीचे– आचारधर्माचे उदात्त प्रतीक आहे; आणि लोककला ग्रामीणांच्या सुखदु:खांना वाचा फोडून, त्यांच्या रखरखीत जीवनात विरंगुळा निर्माण करून त्यांना स्फूर्ती देणारे अमोघ साधन आहे. ' सारजा माझे बाई, कर दळण कांडण । तुझा येईल भरतार, कर आसूनं पूजन ।' अशा अत्यंत मधुर, रसाळ, संस्कृतिनिदर्शक जनपद ओव्या पहाटेच्या रम्य वातावरणात जात्याच्या घरघरीबरोबर संपूर्ण गाव भारून टाकतात; तर डफाची थाप, तुणतुण्याचा निनाद, ढोलकीचे ठेके आणि टाळांचा गजर कधी भक्तिमार्गाचा महिमा गातात तर कधी वीर रसाचे पोवाडे गाऊन देश व धर्म-रक्षणार्थ जनजागृती करतात आणि म्हणून साहित्यिकांनी लोकभाषा, लोकसाहित्य व लोककला यांच्या अभिवृद्धीसाठी प्रयत्नशील असले पाहिजे. आजच्या मुंबई राज्य सरकारने इकडे विशेषत्वाने लक्ष पुरविले आहे ही अधिक समाधानाची गोष्ट आहे– उद्याच्या नव्या महाराष्ट्रातही या तिन्ही गोष्टींकडे सरकार कटाक्षाने लक्ष देईल, असा विश्वास वाटतो.

**संतांचे लोकोत्तर कार्य अंगी बाणवा**

सर्व वाङमयात संतवाङमय सर्वश्रेष्ठ आहे. संतांचे आचार, विचार आणि वचने प्रमाणभूत मानली जातात. महाराष्ट्रात जे संत होऊन गेलेत ते सर्व आशा-वादी आणि मानवी जीवनाचे मूल्य सिद्ध करणारे होते. धर्म आणि रूढी यांचे मंथन करून त्यांनी मानवी धर्माची शिकवणूक एका उच्च व उदात्त पातळीवरून दिली. त्यांचे कार्य केवळ भक्तिमार्गाचे नव्हते तर मनुष्यमात्राच्या कल्याणाचे आणि भावनात्मक एकतेच्या सिद्धांताचे होते. कालमानाप्रमाणे रूढी बदलली जाऊन नवीन विचारांचे– नवीन कल्पनांचे अधिराज्य प्रस्थापिले जावे आणि ' एकमेका

साह्य करूं, अवघे धरूं सुपंथ ' अशा हितप्रद धोरणाचा अवलंब केला जावा असा त्यांचा आदेश होता. उदात्त, निर्मळ व प्रभावी स्वरूपाच्या त्यांच्या वाङ्मयसंपदेच्या कोंदणात त्यांची असामान्य कर्तबगारी समाविष्ट होती. त्यांच्या कामगिरीत काही टीकाकार समजतात तसे प्रतिगामित्व नव्हते तर हृदयात परिवर्तन घडवून आणून मनुष्यत्व सिद्ध करणारे पुरोगामित्व होते. तसेच संतांसंबंधी बहुतेकांचा असाच समज आहे की संत निरुपाधिक, निरंजन, शब्दब्रह्म व परब्रह्म यात गुंतलेले, आपल्याच तंद्रीत रमलेले, सभोवतालच्या जगाशी संबंध न ठेवणारे आणि आपल्याच उद्धाराची कास धरणारे होते. पण असा समज असणाऱ्यांनी थोडचा दूरगामी आणि व्यापक दृष्टीने विचार केला तर त्यांना असेच म्हणावे लागेल--

काय या संतांचे मानूं उपकार । मज निरंतर जागविती ।।
काय देवा यांसी व्हावे उतराई । सेविता हा पायी जीव थोडा ।।
सहज बोलणे हाचि उपदेश । करूनी सायास शिकविती ।।

म्हणून मला म्हणायचे आहे, ' जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारे ।। ' इतके लोकोत्तर कार्य संतांचे आहे. तेव्हा त्यांना प्रतिगामी समजून ते स्वत:च्याच उद्धाराप्रीत्यर्थ झिजले असा आक्षेप घेणे अन्यायकारक आहे. वस्तुत: संतांनी जनसमूहाला अज्ञानांधकारातून बाहेर काढण्याचा कसोशीने प्रयत्न करून, त्याला खऱ्या कर्तव्याची तीव्र जाणीव करून दिली आहे; आणि म्हणून लोकजागृतीचे अस्सल राष्ट्रकार्य करणारे ते क्रांतिकारक संत होते. अशा या क्रांतिकारक संतांत भागवत्धर्म प्रस्थापक संत ज्ञानेश्वर, बंडखोर संत चोखामेळा, प्रगतिशील संत एकनाथ, लोकप्रतिनिधी संत तुकाराम, राजकारणपटु स्वामी रामदास आदी थोर संतांचा अभिमानपूर्वक उल्लेख करता येईल. काही टीकाकार पंडित संतांची प्रथम, द्वितीय, तृतीय अशा श्रेणी ठरविण्याचा प्रयत्न करतात ही खेदाची गोष्ट आहे; तसेच त्यांचा जातवार दर्जा ठरविणे अनिष्ट व अशोभनीय आहे. सर्व संत मग ते कोणत्याही जातीचे वा संप्रदायाचे असोत एक होते, श्रेष्ठ होते. टीकाकारांनी आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन, जनतेचा बुद्धिभेद करून मांडणे इष्ट नाही. उलट, सर्व संतांचा उच्च आदर्श जनतेसमोर ठेवायला हवा; आणि त्या दृष्टीनेच संत वाङ्मयाचे संशोधन झाले पाहिजे. धर्म, भाषा आणि संस्कृती यांवर जेव्हा जेव्हा आपत्ती आली तेव्हा तेव्हा त्यांनी या सर्वांचे रक्षण करून महाराष्ट्राला सावरले. ते कर्मयोगी होते. रंजल्यागांजलेल्यांचे ते कैवारी होते. त्यांची भागवतधर्मीय कामगिरी म्हणजे समाज इमारतीचा पाया दृढ करणारी, संस्कृतितटाला पडू पाहणारी खिंडारे बुजविणारी, मोलमजुरी करून व शेतजमीन नांगरून श्रमाचे मोल ठरविणारी आणि माणुसकीच्या मर्यादा विशद करणारी होती. त्यांनी वाद करून धर्मच्छल आरंभिला नव्हता तर भेद, कलह, फूट, विषमता नष्ट करून ऐक्य व बन्धुत्व

निर्माण करण्याचे उच्चतम कार्य अंगीकारले होते. त्यांनी महाराष्ट्र ही पावन-भूमी बनविली होती. त्या संतांची अमृतवाणी खेड्यापाड्यातील जनतेच्या जिभेवर सातत्याने तरंगत आहे– ग्रामीण आसमंत दुमदुमवीत आहे. पण या संतांचे यथार्थ दर्शन ज्या साहित्याद्वारे घडायला पाहिजे तसे बोधप्रद साहित्याचे दालन पुरते उघडले गेले नाही. काही संतांबाबत जाडी ग्रंथरचना झाली ही अभिमानाची गोष्ट आहे; पण काही संत अजूनही उपेक्षिले गेले आहेत. श्री संत चोखामेळा, संत सावतामाळी, गोरा कुंभार, संत सेना न्हावी यांच्यासारख्या संतांच्या वाङमयाचे जे संशोधन व्हायला पाहिजे व त्याच्या पुस्तिका का होईना, ग्रामीण विभागाच्या घरा-घरात विखुरल्या गेल्या पाहिजेत असे प्रयत्न झालेले नाहीत, ते कार्य दक्षतेने व अवश्य व्हावे, अशी साहित्यिकांना विनंती आहे.

**लोकसाहित्याच्या चिरंतन मूल्यांचे दर्शन घडवा**

लोकसाहित्य हे जनतेचे व पर्यायाने देशाचे खरे मानधन आहे ! खेड्यापाड्यातील जीवनसंस्कृतीची-रीतिरिवाजाची उत्कट, उदात्त व भावप्रेरक नानाविध चित्रे या लोकसाहित्यात चित्रित केली गेली असून, त्यात आमच्या खेडुत बन्धुभगिनींचा आत्मा सामावलेला आहे. संतवाङमयाइतकेच हे लोकसाहित्य श्रेष्ठ व मोलाचे आहे. ते अलिखित अक्षर वाङमय आहे. स्वयंस्फूर्तीने निर्माण होणारी ती अमर लोकवाणी असून, कृषीवल जीवनातून पाझरणारे निर्मळ निर्झर त्यात आहेत. त्यात ग्रामीण हृदयाचे उत्स्फूर्त व उत्कट बोल आहेत. अशा या मानधनाचे जितके अधिक संशोधन होईल ते करून, त्याचे जतन व संवर्धन होणे आज अगत्याचे आहे. ग्रामीणांच्या हृदयसागरातून उगम पावलेली व त्यांच्या जिव्हेवरून तरंगत पवनाला जाऊन भिडणारी ही हितप्रद लोकसाहित्य-गंगा असून, तीत खेडुतांच्या सुखदुःखाचे, आचारविचारांचे, कर्तव्यधर्माचे आणि रीतिरिवाजाचे अनेक मनोज्ञ प्रवाह झुळझुळत आहेत. त्यांच्या सोज्ज्वळ, ऋजुतम भावभावनांची अनेक मूल्यवान रत्ने तिच्या पोटी दडलेली आहेत. त्याची अस्मिता काही आगळीच आहे ! इतिहाससंशोधक ज्या श्रमाने इतिहासाचे संशोधन करतो, पुरातन वास्तूंच्या उत्खननाने गतकाळाच्या वैभवाचे महत्त्व जनतेच्या निदर्शनास आणून देतो, अगदी तसेच या लोकसाहित्याचे श्रमपूर्वक संशोधन करून त्याच्या चिरंतन मूल्यांचे आजच्या आधुनिक जनतेला दर्शन घडविले पाहिजे. लोकगीते, लोककथा, पोवाडे, लावण्या, भारूड आदींनी लोकसाहित्याची दालने समृद्ध आहेत. ती सर्व भाषासौंदर्य, भावसौंदर्य व विचारसौंदर्य यांनी विनटलेली आहेत. त्यांत खेडूत जनतेची असीम कल्पकता, सूक्ष्म निरीक्षणशक्ती व परिस्थितीची तीव्रतर जाणीव प्रतीत झाली आहे. या जिवंत वाङमयप्रकारात ज्या रम्य उपमा, जे बोधप्रद दृष्टान्त आणि मार्मिक संकेत दर्शविले आहेत व ज्या करुण, वीर, शांत इत्यादी रसांचा आविष्कार केला आहे, त्याबद्दल कोणीही आमच्या खेडूत बन्धुभगिनींचे

मुक्तकंठाने कौतुकच करील ! अनुभव हेच त्यांचे खरे ज्ञान, निसर्ग हेच त्यांचे मोठे वैभव ! या लोकसाहित्याच्या क्षेत्रात नाही म्हणायला अलीकडे थोडे फार संशोधन झाले आहे. त्या दृष्टीने साने गुरुजी, मालतीबाई दांडेकर, कमलाबाई देशपांडे, पां. श्रा. गोरे, डॉ. ना. गो. नांदापूरकर, दुर्गा भागवत, वा. कृ. चोरघडे, सरोजिनी बाबर, वा. वि. जोशी प्रभृतींचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. पण माझी या साहित्याच्या संशोधकांना विनंती आहे की, ज्या ज्या बोलीत लोकसाहित्याचे विविध प्रकार आहेत ते जसेच्या तसे दिले गेले पाहिजेत. त्यावर कोणताही शहरी संस्कार होता कामा नये. बनावटी रचना करून या साहित्याच्या संशोधकांनी ते डागळू देऊ नये. त्यांत आपल्या पदरची भर घालून 'पाहा हे लोकसाहित्य' असा आव आणण्याचा प्रयत्न करू नये. लोकसाहित्य म्हणजे ग्रामीणांच्या जीवनाचे, संस्कृतीचे स्वच्छ प्रतिबिम्ब उमटविणारा आरसाच होय. या आरशाद्वारे खेडुतांविषयीचे सम्यक ज्ञान सहज होऊ शकेल. अलीकडे हे लोकसाहित्य, जुन्या पिढीतील व्यक्ती जसजशा नामशेष होत जातात तसतसे ते लोपले जात आहे ! शिवाय, शहरी वातावरण खेड्यापाड्यापर्यंत पोचले जात असल्याने या धनाकडे दुर्लक्ष होऊन ते विरत जात आहे ! तेव्हा या साहित्याच्या संशोधनाबाबत, जागरूकतेने पुढे पाऊल टाकायला हवे. ग्रामीणांच्या पूर्वेतिहासाचे दर्शन या लोकसाहित्यात प्रकर्षाने घडेल इतके ते अमाप आहे. या सर्वांचा सखोल अभ्यास करून कोणाही संशोधकाला त्यावर मोलाचे ग्रंथ निर्माण करता येऊन, त्याच्या निर्मितीने आजच्या आधुनिक काळात योग्य ते मार्गदर्शन घडविता येईल; आणि त्यायोगे शहर व खेडे यांचा परस्पर हितसंबंध जोडता येण्यास खचितच मदत होईल.

**अलिखित वाङमय हेच खरे लोकसाहित्य**

'लोकसाहित्य-वर की शाप ?' या विषयावरील आपल्या एका भाषणात प्रा. ना. सी. फडके यांनी मोठे प्रक्षोभक विचार व्यक्त केले. ते म्हणतात, " राजकारणात वेळोवेळी जशा निरनिराळ्या घोषणा केल्या जातात तशाच त्या साहित्यातही केल्या जातात. आज लोकसाहित्याची नवी घोषणा सवंगपणे पुढे आली आहे. परंतु आज ही घोषणा केली जात असताना तिची कल्पना स्वच्छ असावयास हवी. लोकांचे, लोकांसाठी व लोकांनी निर्माण केलेले साहित्य ते लोकसाहित्य असे प्रतिपादन करीत असताना जी आग्रही भूमिका घेतली जाते, त्यातील धोके जर ओळखले नाहीत तर घात होईल. कलेच्या प्रांतात जेव्हा भलभलते लाड वाढतात तेव्हा तिचे स्वरूप हीन होते. लोकांकडे सम्मुख झाल्यावर आपण खाली जाणार आहोत की त्यांना वर आणणार आहोत हाच विचार करण्याचा प्रश्न आहे. कलेच्या उच्च आणि अभिजात पातळीवर लोकांना आणले तरच लोकसाहित्य हा वर ठरेल. मात्र कलेची अभिजात पातळी सोडली, तर तेच लोकसाहित्य शाप ठरेल " ज्या भूमिकेवरून प्रा. फडके यांनी लोकसाहित्याचे विश्लेषण केले ती

भूमिका लक्षात घेतली म्हणजे ती किती ठिसूळ आहे याची कल्पना येते. कारण लोकसाहित्याचा अभिप्रेत असलेला 'अलिखित वाङमय' हा जो अर्थ तोच नेमका त्यांनी डावलला असल्याने, त्यांनी आपल्या सोयीसाठी 'अभिजात कले'च्या अवगुंठनाखाली विवेचिला आहे. मुद्दाम म्हणून साहित्यिकांनी 'लोकसाहित्य' निर्माण करणे हे वेगळे व कसल्याही आधुनिक साधनांचा वापर न करता स्वयंस्फूर्तीने खेड्तांच्या जिव्हेवर वाङमय तरळणे हे वेगळे ! लोकसाहित्याचे मूळ नीट न समजून घेतल्याने व परंपरागत चालत आलेल्या अलिखित अक्षर वाङमयाचा अभ्यास न केल्याने फडक्यांनी 'लोकसाहित्य-वर की शाप ?' असा उगाच प्रश्न निर्माण करून व्यंगपूर्ण अर्थाने लोकसाहित्याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला ! – आणि आपल्या नेहमीच्या प्रवृत्तीनुसार लोकसाहित्य लेखकांना व सरकारला दूषणही त्यांनी दिले ! त्यांनी खरोखरीच 'अलिखित वाङमया'चे म्हणजे ज्याला खऱ्या अर्थाने 'लोकसाहित्य' म्हणतात त्याचे संशोधन करावे आणि मग त्यासंबंधी आपली भूमिका स्पष्ट करून, लोकसाहित्याच्या त्या निकषावर, 'लोकांचे, लोकांसाठी व लोकांनी निर्माण केलेले साहित्य' याची अवश्य मीमांसा करावी, अशी माझी त्यांना विनंती आहे.

**संस्कृतिपोषक वातावरण निर्माण करा**

आजकालच्या पिढीला एक वेगळ्याच प्रकारचे अनिष्ट वळण लागल्याचे आढळून येते ! पूर्वी मराठी संस्कृतीला जे पोषक वातावरण निर्माण केले जात असे त्याला अलीकडे विकृत स्वरूप प्राप्त होत आहे. हे स्वरूप गेल्या पाव शतकापासून बळावत चालले आहे. पूर्वी प्रातःकाळी उठणे, स्नानादी विधी आटोपून थोरांच्या वचनांचे पठन, मनन, चिंतन करणे, सडासारवण होऊन मंगल वातावरण निर्माण होणे, प्रत्येक गोष्ट ठाकठिकीने–व्यवस्थित करून कष्टाची कामे करणे आदी कितीतरी गोष्टी यंत्रवत होत असत; पण आज केव्हा तरी झोपणे–उठणे, हाततोंड न धुताच खाणे–पिणे, थोरांच्या वचनांच्या पठनाऐवजी शृंगारिक व बीभत्स सिनेमा गाणी गात सुटणे, पाश्चात्य पद्धतीचा भपकेबाज पोषाख करून मिरविणे आदी गोष्टींना बराच ऊत आला आहे. या सर्वांचा अर्थातच आपल्या संस्कृतीवर अनिष्ट परिणाम झाला आहे. त्याची झळ लहानसहान बालकबालिकांनाही लागली असून, ते नसल्या मार्गाचा अवलंब करीत आहेत. तीच गोष्ट लैंगिक व भोगवादी ललित वाङमयाची ! वैचारिक वाङमयाचे अध्ययन सुटले आणि रंजनाच्या व कलेच्या नावाखाली निकृष्ट दर्जाच्या वाङमयाला आजचे वाचक बळी पडू लागले आहेत. या सर्व गोष्टींची झळ आता खेड्यापाड्यांनाही ग्रासू पाहत आहे ! या सर्व बाबींचा या परिवर्तनाच्या काळात आत्मलक्षी होऊन विचार करणे व संस्कृतिपोषक वातावरण निर्माण करण्याचा आणि उच्च दर्जाचे साहित्य जनतेला सादर करण्याचा कसोशीचा प्रयत्न झाला पाहिजे.

**साहित्यातील शाश्वत मूल्यांची दिशा**

जीवनात साहित्याला महत्त्वाचे स्थान आहे. साहित्य वगळले तर जीवनाला अर्थ उरणार नाही. त्यातील रस नष्ट होईल आणि त्याचे रूप बेढब बनेल. शब्दब्रह्मानेच जीवनाला विशिष्ट आकार आला आहे. शब्दशास्त्र त्यातूनच निर्माण झाले आहे आणि त्याने विश्वाचे दर्शन घडविले आहे. अर्थात नियतीच्या प्रक्रियेत ज्या विविध घटना घडतात व त्याचे दृश्य स्वरूपात जे नानाविध आविष्कार होतात त्या समुच्चयाला 'साहित्य' ही संज्ञा प्राप्त झाली आहे. पण या साहित्याने जीवनातील निरामय आनंद, मंगलमय सौंदर्य आणि उदात्त भाव निर्माण केला तरच त्याचे शाश्वत मूल्य सिद्ध होते. 'कला' ही त्या विश्वस्पर्शी प्रक्रियेतूनच आकाराला आली आहे आणि म्हणून ती तशी बन्धमुक्त आहे; पण ती काही स्वैर नाही. जीवन, नीती आणि कला यांचे तसे अन्योन्यसंबंध आहेत. नीतीने कला बांधली जात नसली तरी तिची अवहेलना करून ती भरारीही मारू शकत नाही. कारण त्याचा परिणाम जीवनावर होत असतो. आणि म्हणून साहित्यनिर्मिती जीवनाच्या सर्व कक्षा, संबंधित परिस्थिती व समाजावर होणारे परिणाम लक्षात घेऊन होणे आवश्यक असते. मनुष्यमात्राच्या सुखदुःखात साहित्य–कला अप्सरेच्या भूमिकेत वावरते आणि जीवनात आनंदरस निर्माण करण्याचा प्रयत्न करते. निर्माण होणाऱ्या तशा वाङमयालाच ललितवाङमय म्हणतात. पण हे ललित वाङमय ध्येयवादी का भोगवादी; बोधवादी का छंदवादी आणि विचारवादी का सौंदर्यवादी असे दोन प्रवाह दोन दिशा दर्शवून जीवनात त्याचे विशेष स्थान काय, याची पृच्छा करायला लागले तर साहित्यिकांना कोणत्या वाटेने जावे याचा संभ्रम निर्माण होतो. त्या वेळी मानवाच्या आनंदाबरोबर कल्याणाचेही कार्य करणारे ललितवाङमय हेच त्या दोन्ही प्रवाहांना, दिशांना एका बिन्दूपाशी आणू शकते. ख्यालीखुशालीचे, थाटामाटाचे व स्वच्छंद आचारविचार व विहाराचे भोगवादी वाङमय जीवनाचे चिरंतनमूल्य प्रस्थापित करू शकत नाही; ते ध्येयवादानेच उच्च व प्रभावी होऊ शकते. पण हा ध्येयवाद व्यक्तिनिष्ठ नसावा, आत्मनिष्ठेच्या प्रज्ञेतून समाजनिष्ठेवर आधारित असावा व त्याला आनंद व सौंदर्य याची रसपूर्ण, भावपूर्ण, गंधपूर्ण व रूपपूर्ण जोड असावी. त्याशिवाय त्याचे ईप्सित फलदायी होणार नाही. म्हणून ललितवाङमय शब्दमंत्रांनी विश्वदर्शन घडविणारे वास्तववादी असावे पण मोहिनी टाकून अमंगलतेकडे नेणारे नसावे. ते सौंदर्यवादी असावे पण विचारवादाने मतप्रचार करणारे नसावे. ते बोधवादी असावे पण निरनिराळ्या छंदवादात गुरफटून टाकणारे नसावे. याचा अर्थ असा की, साहित्याचा आत्मा प्रकाशमान असावा व तो इतरांना प्रकाश दाखवून 'आनंद' देणारा व नियतीच्या प्रक्रियेतील घटना वास्तवतेबरोबर स्पष्ट करणारा असावा.

**साहित्यात उत्कट जीवनदर्शनाची नितांत आवश्यकता**

साहित्यातील जीवनदर्शनासंबंधी थोड्या व्यापक दृष्टीने विचार केला तर त्याच्या मूल्याची कल्पना येऊन पंचवीस वर्षांपूर्वी आपण कोणत्या मुक्कामावर होतो व आज आपला मुक्काम कुठे हे स्पष्ट होते. हरिभाऊ आपटे, वामन मल्हार जोशी, साने गुरुजीसारख्या साहित्यिकांनी साहित्याचा जो दर्जा व मूल्ये सिद्ध केली– आपल्या भरीव वाङमयाद्वारे जं जीवनदर्शन घडविले, तो दर्जा व ती मूल्ये आजकालच्या साहित्याने निर्माण केली आहेत का, असा प्रश्न उपस्थित होऊन मन खिन्न होते. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, पु. य. देशपांडेप्रभृती प्रतिभासंपन्न साहित्यिकांनी काही काळ तो दर्जा व ती मूल्ये सिद्ध केली खरी; पण त्यांना जी स्थिरता व परिणामकारकता पाहिजे ती मात्र बहुतांशी डळमळली ! काहीशा भोगवादाकडे झुकून फडके व माडखोलकर यांनी समाजाला हादरा दिला– त्यातून माडखोलकरांनी वेळीच स्वतःला सावरून घेतले, पण फडके मात्र ‘ मागणी तसा पुरवठा ’ म्हणून केवळ आपल्या नावाच्या बळावर ‘ बाजारू वाङमय ’ खपवू लागले ! खांडेकरांनी आपला ध्येयवादी दृष्टिकोन मात्र बदलला नाही पण ललित वाङमयात ध्येयवाद किती मर्यादित स्वरूपात असावा याचे पुरते निदान न केल्याने ते काहीसे रेंगाळले ! पु. य. देशपांडे यांनी मात्र मध्ये काही काळ जाऊ देऊन आपली आध्यात्मिक बैठक निर्माण केली. पण काहीही असले तरी या साहित्यिकांनी आपल्या एका भर उमेदीच्या काळात साहित्याच्या मूल्यांची बूज राखली हे मात्र खरे ! त्याचप्रमाणे प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, प्रा. अनंत काणेकर, प्रा वा. कृ. चोरघडे, श्री. प्रभाकर पाध्ये, श्री. गो. रा. दोडकेप्रभृती कथाकार व निबंधकारांनी साहित्याचे दालन समृद्ध केले; त्याचा विशिष्ट दर्जाही प्रस्थापित केला; पण अलीकडे त्यांची गती बरीच मंदावली आहे. कवी केशवसुता-नंतर अनिल (आ. रा. देशपांडे), बा. सी. मर्ढेकर, कुसुमाग्रज (वा. वि. शिरवाडकर), आनंदराव टेकाडे, ना. के. बेहरे, यशवंत, गिरीश (कानेटकर), वा. ना. देशपांडे, भ. श्री. पंडित, ना. घ. देशपांडे, प्रा. या. मु. पाठकप्रभृती कवींनी काव्यप्रांत संपन्न केला. माधव ज्युलियनचे स्थान काही वेगळे आहे. केशवसुत व माधव ज्युलियन यांनी जे अर्थपूर्ण भावविश्व निर्माण केले त्याची मूल्ये उच्च आहेत. राम गणेश गडकरी यांचाही दर्जा तितकाच श्रेष्ठ आहे. कवी अनिलांनी मात्र काव्याची एक नवीन प्रभावी वाट निर्माण केली. शरच्चन्द्र मुक्तिबोध, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर, पु. शि. रेगे, द. चिं. सोमणप्रभृती कवी नवकाव्याची अर्थात मुक्तछंदप्रणीत वाट डौलाने चालत आहेत. पण केव्हा केव्हा त्यांचा डौल डगमगत असतो असेही आढळून येते ! मर्ढेकरी वाटेने जाणाऱ्या त्यांच्या शिष्यांनी तर अलीकडे ‘ नवकाव्य ’ म्हणून कहर केला आहे ! अण्णासाहेब किर्लोस्कर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, गोविंद बल्लाळ, कृ. प्र. खाडिलकर, देवल,

राम गणेश गडकरी, मामासाहेब वरेरकर, वीर वामनराव जोशी, ना. रा. बामणगावकर, प्र. के. अत्रे, अनंत काणेकरप्रभृती नाटककारांनी मराठी रंगभूमी सजविली आहे, संवर्धिली आहे. पण पंचवीस वर्षांपूर्वी मराठी साहित्याची कथा, कादंबरी, काव्य, नाटक आदी जी दालने समृद्ध झाली होती, त्यांना जो दर्जा प्राप्त झाला होता तो अलीकडील काळात मात्र बराच ढासळला आहे ! पूर्वीची हरिभाऊ आपटयांच्या काळातील तो उच्च प्रभावळ आज उरली नाही. साहित्यातील जीवन-दर्शन व मूल्ये त्या प्रकर्षाने आढळत नाहीत. साहित्यातील शाश्वत मूल्ये ठरणारे जीवनदर्शन घडावे असे आज तीव्रतेने वाटू लागले आहे. त्या दृष्टीने साहित्यातील जीवनदर्शनासंबंधी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार मननीय वाटतात. ते म्हणतात, " मानव ज्या वेळी पृथ्वीवर अवतीर्ण झाला त्या वेळी तो स्वतःबरोबर वाङमयज्योती घेऊन आला. विश्वाची प्रतिभात्मक जाणीव या ज्योतीत साठविलेली होती. विश्वाची सर्जनशक्ती व मानवाची कर्तृत्वशक्ती ही जवळजवळ एकरूप आहे. मानवाला कर्तृत्वाशिवाय भोक्तृत्व नाही. त्याला विश्वाची निर्मिती करण्याची शक्ती प्राप्त झाली आहे. त्याची ही शक्ती देशकालबद्ध असते. त्या शक्तीने मानव सुंदर व कलात्मक वाङमय निर्माण करतो. आपल्या भोवतालच्या परिस्थितीशी सतत संघर्ष करीत मानव्य हे जे सतत देवत्वाशी व नियतीशी झगडत आले आहे त्यातून निर्माण झालेली मूल्ये, हे साहित्याचे मूल्यविश्व होय; व हेच मूल्यविश्व म्हणजेच पर्यायाने संपूर्ण मानवाचे दर्शन हेच साहित्यातील जीवनदर्शन होय." आजच्या या बदलत्या काळात– विज्ञानयुगाच्या काळात तर्कतीर्थांनी ज्या व्यापक अर्थाने साहित्यातील जीवनमूल्यासंबंधी विचार व्यक्त केले त्यांचा अवश्य विचार व्हायला पाहिजे.

**साहित्यातील विकृतीला आळा घातला पाहिजे**

साहित्य हे पूर्वी एका विशिष्ट वळणाचे– एका विशिष्ट आकारबंधांनी बांधलेले पण प्रभावी असे. त्यातील समाजदर्शन उठून दिसे. पण अलीकडे साहित्याचे नवनवीन प्रयोग सुरू झाले. नवकथा, नवकाव्य, नवनाट्य हे ते विशेष प्रकार होत. परंतु या नवनवीनतेच्या नावाखाली आज इतका एकांगीपणा, अतिरेकीपणा व विकृतपणा निर्माण झाला की साहित्यविषयक मूलतत्त्वे– एखाद्याला मूळाक्षरे शिकवावीत त्याप्रमाणे– पुन्हा शिकविण्याची गरज आहे असे वाटू लागते. आजच्या नवकवींचे भरमसाट ' नवकाव्य ' पाहिले म्हणजे किती खालची पातळी गाठली गेली आहे, याचा प्रत्यय येतो. ज्याला जीवनानुभूती नाही, व्यासंग नाही, कसली वैचारिक बैठक नाही तो कवी छाती फुगवून जी भरारी मारतो ती पाहिली म्हणजे कविता किंवा काव्य कशाला म्हणावे हेच कळत नाही. एका पदवीधर कवीचे काव्य वाचल्यावर, ते कोणत्या छंदात वा वृत्तात आहे असे मी विचारले तेव्हा तो हातवारे करीत उत्तरला, " नवकाव्याला छंद किंवा वृत्त कसले ?

शब्दांची जुळणी आहे बस्स !" त्याला सहज छंद-वृत्ताची माहिती विचारली तेव्हा त्याला काहीच उत्तर देता येईना ! बरे, आशयाबद्दल विचारले तर तो, 'प्रतिभा' व 'प्रतीके' हे दोन पाठ केलेले शब्द उच्चारून, स्वतःच्या कवितेचा अर्थ सांगायला असमर्थ ठरला ! तीच गोष्ट नवकथेची. मनोविश्लेषण-मनोविश्लेषण म्हणून कथा कोणत्याही साच्यात व धाटणीत मांडली की झाली नवकथा ! आणि नवनाट्य- त्या नाटककाराच्या हावभावानेच सिद्ध होते ! आजच्या साहित्याला असे विकृत स्वरूप प्राप्त झाले आहे, तेव्हा त्याचा दर्जा किंवा मूल्य काय ठरणार ? आणि त्याचा समाजावर परिणाम तो कोणता होणार ? तेव्हा साहित्यात येत असलेल्या विकृतीला आता आळा घातला पाहिजे व नवोदित लेखकांना उत्तेजन देताना 'अनुभूती' प्राप्त करण्याची व 'व्यासंगी वृत्ती' राखण्याची जाणीवही दिली पाहिजे.

**काही नामवंत साहित्यिकांचे कार्य**

आजच्या साहित्यप्रांगणातील खंदे कथाकार म्हणून श्री. पु. भा. भावे आघाडीवर असून ते आपल्या लेखणीने महाराष्ट्र हलवून सोडवीत आहेत. तसेच अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, शांताराम ( के. ज. पुरोहित), व्यंकटेश माडगूळकर हे विशेषत्वाने तळपत आहेत. पण गंगाधर गाडगीळांसारख्या नामवंतांच्या लेखणीतून बाहेर पडणाऱ्या बऱ्याच लघुकथा खालची पातळी गाठून विकृतमार्ग आक्रमित असल्याचे आढळून येते. वास्तवता, मनोविश्लेषण व समाजधारणा याबाबत त्यांचा दृष्टिकोन मोठा विचित्र वाटतो ! नाट्याच्या क्षेत्रात कै. नानासाहेब जोग व श्री. वा. वा. भोळे यांनी काही वेगळे स्थान प्राप्त केले; तर श्री. पु. ल. देशपांडे, श्री. वि. वा. शिरवाडकर, श्री. मो. ग. रांगणेकर, श्री. ह. वि. देसाई, श्री. विजय तेंडुलकर, श्री. वसंत कानेटकर, श्री. बाळ कोल्हटकर, सौ. मुक्ताबाई दीक्षित, श्री. पु. व्यं. दारव्हेकर, सौ. सुमतिबाई धनवटेप्रभृती नाटककार मराठी रंगभूमीला एक आगळेच स्वरूप देऊन बहार आणीत आहेत. नाट्यसमीक्षणाच्या व रंगभूमीच्या अभ्यासाच्या बाबतीत श्री. वसंतराव देसाई, कै. चिंतामणराव कोल्हटकर, श्री. द. रा. गोमकाळे, डॉ. रा. शं. वाळिंबे यांसारख्या समीक्षकांनी भरीव कार्य केले आहे. मध्यंतरीच्या काळात मराठी रंगभूमीला अवकळा आली होती. पण आता ती नव्या तेजाने तळपून भव्य आकारास येत आहे. आपल्या राज्यसरकारनेही तिकडे विशेष लक्ष पुरवून नाट्यसंस्थांना, कलाकारांना व नाटककारांना उत्तेजन देण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. सौ. मालतीबाई बेडेकर, र. वा. दिघे, श्री. ना. पेंडसे, शरच्चन्द्र टोंगो, शं. बा. शास्त्री, गो. नी. दांडेकर यांनी बजावलेली कामगिरी विशेष आहे. प्रादेशिक स्वरूपाच्या कादंबऱ्या निर्माण करून श्री. ना. पेंडसे व गो. नी. दांडेकर हे खरोखरीच साहित्याची मोठी सेवा करीत आहेत. उपेक्षित भागाकडे दक्षतेने लक्ष पुरवून तेथील जीवनाचे यथार्थ दर्शन

जितके अधिक घडविता येईल तितके घडविणं आज आवश्यक आहे. कोकणपट्टा, मराठवाडा, ठाणे–चांदा–भंडारा आदी विभागांकडे साहित्यिकांनी अगत्य करून लक्ष पुरविले पाहिजे व तेथील श्रमजीवी, दलित, आदिवासी लोकांच्या रखरखीत जीवनावर प्रकाश टाकणारे वाङ्मय निर्माण केले पाहिजे. एका दुसऱ्या दृष्टीने नाथमाधव व वि. वा. हडप या लेखकांचा मला विशेष उल्लेख करावासा वाटतो. त्यांनी मराठे व पेशवे यांच्या काळातील जीवनदर्शनाचे व वस्तुस्थितीचे मोठे मार्मिक चित्र रेखाटून, ज्या ऐतिहासिक कादंबऱ्या निर्माण केल्या आहेत त्या निःसंशय उच्च दर्जाच्या आहेत. आजही अशा प्रकारच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची व कथांची नितांत आवश्यकता आहे.

**विद्वज्जनांच्या उच्च साहित्याचा आदर्श राखा**

विदर्भाच्या पुरातन काळापासून चालत आलेल्या इतिहास, ज्योतिषशास्त्र, धर्मशास्त्र, टीकाशास्त्र, साहित्यशास्त्र आदी विविध क्षेत्रांची उज्ज्वल परंपरा कै. विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी, कै. यादव माधव काळे, कै. पं. घुलेशास्त्री, कै. हरिभाऊ नेने, कै. नी. ब. भवाळकर, कै. नारायणराव अळेकर, लोकनायक डॉ. बापूजी अणे, महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. य. खु. देशपांडे, श्री. बा. ग. खापर्डे, डॉ. शं. दा. पेंडसे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते, श्री. पु. य. देशपांडे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. बा. ना. देशपांडे, डॉ. वा. ना. पंडित यांसारख्या विद्वानांनी चालवून साहित्याची मौलिक सेवा केली आहे. त्याच प्रभावळीत श्री. दे. गो. लांडगे, डॉ. अ. ना. देशपांडे, श्री. श्री. भा. वर्णेकर, प्रा. पां. कृ. सावळा-पूरकर, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, श्री. राजुरकर, श्री. शं. गो. चट्टे यांच्यासारख्या विचक्षणांचे कार्यही विशेष आहे. प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांनी अलीकडे भारतीय साहित्यशास्त्रावरील उच्च प्रतीचा ग्रंथ लिहून आपली प्रगाढ विद्वत्ता सिद्ध केली आहे. नागपूर विद्यापीठाने या ग्रंथाबद्दल त्यांना डॉक्टरेट (डी. लिट्.) ही पदवी दिली आहे. आणि मराठीतील सांप्रतचा अखिल भारतीय प्रतिष्ठेला उतरणारा असा सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणून साहित्य अकादमीने पाच हजाराचे श्रेष्ठ पारितोषिकही देऊन डॉ. देशपांडे यांचा गौरव केला, ही वैदर्भीयांना विशेष अभिमानाची गोष्ट आहे. पं. बाळशास्त्री हरदास यांची धर्मशास्त्रावरील कामगिरी मोलाची आहे; आजच्या पिढीला नीतिमत्ता व संस्कृती या दृष्टीने निर्माण झालेले त्यांचे ग्रंथ मार्गदर्शनपर वाटतात.

त्याचप्रमाणे विदर्भात आज नव्या दमाचे तरुण संशोधक, टीकाकार, कथा-कादंबरीकार, नाटककार व कवी पुढे सरसावत आहेत. त्या दृष्टीने प्रा. सुरेश डोळके, प्रा. माणिक के. बैतुले, श्री. पां. ब. गाडगीळ, श्री. केशव केळकर, श्री. वसंतराव वरखेडकर, श्री. तु. ना. काटकर, श्री. पु. व्यं. दारव्हेकर, श्री. वसंतराव

वऱ्हाडपांडे, प्रा. द. भि. कुळकर्णी, प्रा. राम शेवाळकर, प्रा. प्रभाकर ऊर्ध्वरेषे, प्रा. पद्माकर डावरे, प्रा. मधुकर आष्टीकर, श्री. शंकरराव कुळकर्णी, सौ. इंदुमती शेवडे, सौ. सुमतिबाई धनवटे, सौ. उषाताई लिमये, सौ. प्रमिला भागवत, सौ. शांताबाई दंडिगे, सौ. इंदुमती गंधे, श्री. बाळ गंगाधर देव, श्री. म. त्र्यं. देव, श्री. सुनील सुभेदार, श्री. गोपाळराव गिरडकर, श्री. बाबा मोहोड, श्री. उद्धव शेळके, प्रा. राम डोके आणि श्री. ल. वा. पडोळे, श्री. श्री. वि. गंधे, श्री. ग्रेस, श्री. म. ना. सरपटवार, श्री. मधुकर वाबगावकर, श्री. गंगाधर पानतावणे, श्री. वसु भगत, श्री. मा. गो. जामदार, श्री. दिनकर देशपांडे, श्री. आकाशानंद, श्री. मनोहर तल्हार, श्री. देवराव उदापुरे, श्री. वा. ना. निगम आदी संशोधक, टीकाकार व साहित्यिक मित्रमंडळींचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

आजच्या तरुण संशोधकांनी व साहित्यिकांनी केवळ ललितवाङ्मयावरच भर न देता, विद्वज्जनांनी जी उज्ज्वल परंपरा निर्माण केली आहे व वैचारिक प्रतिष्ठा प्राप्त करणारे जे मौलिक साहित्य निर्माण करून जो आदर्श पुढे ठेवला आहे त्याचे अनुकरण करून मराठी साहित्याचे स्थान उच्च व उदात्त राखण्याचा प्रयत्न कसोशीने करायला हवा.

**स्त्रिया व बालके यांचेसाठी उत्कृष्ट वाङ्मय हवे**

आज मला आणखी एका गोष्टीवर विशेष भर द्यावयाचा आहे आणि तो म्हणजे आधुनिक स्त्री-जीवनावर, त्यांच्या भाव-भावनावर प्रकाश टाकून आजच्या स्थितीचे वास्तवपूर्ण दर्शन घडेल व त्यांना आपल्या संस्कृतीचे संवर्धन करता येईल अशी वाङ्मयनिर्मिती होणे, हा होय. त्याचप्रमाणे बालमनावर उत्तम संस्कार घडून त्यांना पुढे आपले जीवन नीट न्याहाळता येणारे, त्यांना आपण स्वतंत्र देशाचे समंजस नागरिक होणार आहोत याची जाणीव होणारे साहित्य निर्माण व्हावे व ते त्यांना सुलभतेने वाचायला मिळावे, अशी दखल घेणे आज आवश्यक आहे. अलीकडे मनात विकृती निर्माण होईल, त्यांच्या प्रकृती व प्रवृत्तीवर अनिष्ट परिणाम घडेल असे वाङ्मय घडत आहे. पालकांनी इकडे आता कटाक्षाने ध्यान देऊन आपल्या मुलाबाळांच्या हाती बालमनाला उत्कृष्ट वळण लागणारे साहित्यच देण्याचा प्रयत्न करावा आणि लेखकांनी त्या दृष्टीनेच मनोरंजनपर पण बोधप्रद बाल साहित्य निर्माण करावे, अशी विनंती आहे.

**विविध बोली अभ्यासून मराठी भाषा समृद्ध करा**

आपल्या महाराष्ट्रात वऱ्हाडी, नागपुरी, कोंकणी, पुणेरी, चन्द्रपुरी, गोंडी, कोरकू, हळबी अशा अनेक विविध बोली आहेत. त्या बोलीत विविध वाक्प्रचार आहेत, म्हणी आहेत, गाणी आहेत, कथा आहेत. त्या सर्वांचे संशोधन करून, मराठी भाषा अधिक समृद्ध व संपन्न करण्यासाठी त्यांचा समन्वय घडविण्याचा प्रयत्न करायला हवा. एकमेकांच्या बोलीला किंवा वाक्प्रचाराला हिणविण्यापेक्षा

सौहार्दाने मराठी भाषेला अधिक उन्नत व प्रभावी कसे करता येईल याचा विचार केला पाहिजे. परकीय शब्दांची भेसळ आपल्याला चालते पण आपल्याशी मिळत्या असणाऱ्या शब्दांचा मात्र आपण अव्हेर करतो. विविध बोलीतील काही शब्द खटकणारे किंवा जाणवणारे राहू शकतील, पण पुढे सरावाने त्यांची दीप्ती आढळून आल्याशिवाय राहणार नाही. म्हणून मराठीला संबंधित अशा सर्व बोलींचा समन्वय घडविण्याचे कार्य साहित्यिकांनी करावे असे विनम्रपणे सुचवितो.

**वास्तववादी शुद्धलेखन व लिपीत सुधारणा हवी**

ज्या बहुजनसमाजाच्या दृष्टीने साहित्याच्या अंतरंगासंबंधी मी बोललो, त्याच बहुजनसमाजाच्या दृष्टीने साहित्याच्या बहिरंगासंबंधी म्हणजे लेखनपद्धतीसंबंधी बोलणे मी आवश्यक समजतो. देवनागरी लिपी ही हळूहळू अखिल भारतीय लिपी होऊ पाहत आहे व भारतीय एकतेच्या दृष्टीने हे सर्वस्वी योग्यही आहे. मराठी साहित्य याच लिपीत लिहिले जाते ही खरोखर मोठी भाग्याची गोष्ट आहे. देवनागरी लिपी ही जगातील एक शास्त्रशुद्ध लिपी आहे. वास्तवता हा तिचा फार मोठा गुण आहे. परंतु सध्याच्या मराठी लेखनपद्धतीत लिपीवर नको तिथे अनुस्वारांना बसवून तिला एक प्रकारची विकृती आणली आहे. ऱ्हस्वदीर्घासंबंधीही मराठी लेखनपद्धतीत बरीच अवास्तवता आढळते. याचा परिणाम असा झाला आहे की शिकल्यासवरलेल्या पदवीधरांनादेखील मराठी शुद्धलेखन साधत नाही. विश्वविद्यालयातसुद्धा शुद्धलेखनाकडे दुर्लक्ष करून विद्यार्थ्यांना गुण द्यावे लागतात. मातृभाषा म्हणून ज्या मराठीचा आपण अभिमान बाळगतो व जिच्या नावावर वेगळ्या मराठी घटकराज्याची मागणी करतो, ती मराठी भाषा सुशिक्षितांनादेखील शुद्ध लिहिता येऊ नये ही अत्यंत शोचनीय अवस्था आहे. परंतु यात सुशिक्षितांचा जितका दोष आहे, तितकाच किंवा त्याहूनही अधिक लेखनपद्धतीतील अवास्तवतेचा दोष आहे. या अवास्तववादी लेखनपद्धतीमुळे अन्य भाषिकांना मराठी भाषा शिकायला अतिशय कठीण वाटते. मराठी मन समजून घेण्याला त्यांना या लिपीचीदेखील अडचण होत असावी.

या सर्व दृष्टींनी मराठीलेखनपद्धतीत वास्तववादी दृष्टीने सुधारणा व्हावयास पाहिजे. १९५३ साली विदर्भ साहित्य संघाने नेमलेल्या प्रा. डॉ. वि. भि. कोलते, प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. डॉ. मा. गो. देशमुख व कै. प्रा. ह. ना. नेने या विद्वानांच्या समितीने सुचविलेले नियम या दृष्टीने प्रशंसनीय आहेत. विदर्भ साहित्य संघाने व नागपूर विद्यापीठाने ह्या नियमांना मान्यताही दिली आहे. तसेच मराठवाडा विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठ यांच्या अभ्यासमंडळाने या नियमांची शिफारस केली आहे, असे कळते. अशा रीतीने ह्या नियमांना हळूहळू अधिकाधिक मान्यता मिळत आहे. परंतु जुन्याचा वृथा अभिमान धरणारे काही विद्वान या प्रगतिपर प्रवाहाला रोखू पाहत आहेत. आपल्या प्रतिष्ठेचा उपयोग करून भाषेला

डबक्याचे स्वरूप ते देऊ पाहत आहेत. त्यांनी आपला दुराग्रह सोडून भाषेचा जिवंत प्रवाह वाहता ठेवावा ही त्यांना माझी नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाने व नागपूर विद्यापीठाने मान्य केलेले नियम वास्तववादी दृष्टीने वर्तमान काळाची गरज भागविण्यास पुरसे आहेत, असे मला वाटते. परंतु देवनागरी लिपीला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी भिन्न भाषिक त्या लिपीचा सुलभतेने उपयोग करून एकमेकांची भाषा शिकू शकतील, अशी तिची घडण ठेवावी लागेल. या दृष्टीने शब्दांचे वेगवेगळे उच्चार व मुख्य लकबी लिपीतून स्पष्ट होणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ– च वर्गीय अक्षरांचा मराठीत दोन पद्धतीने उच्चार होतो : एक संस्कृतातल्याप्रमाणे तालव्य व दुसरा काहीसा दन्त्य. तसेच 'पुण्यात' हा शब्द 'पुणे, गावात आणि 'पापविरोधी जे पुण्य त्यात' या अर्थी वेगवेगळा उच्चारला जातो पण लेखनपद्धती मात्र सारखीच आहे. तसेच कित्येक अनुस्वारांचे उच्चार पूर्णानुनासिकासारखे नसून अर्धानुनासिकाचे किंवा केवळ विशेष लकबीचे असतात. यांच्या उच्चाराचे वेगळेपण लिपीतूनही स्पष्ट व्हावयास पाहिजे. पडलं, गेलं, पाहिलं इत्यादी शब्दांतील अन्त्य अक्षराचा जोर देऊन होणारा उच्चारसद्धा अनुस्वाराने केला जातो. पण हा अनुस्वारांचा दुरुपयोग आहे. हे सर्व उच्चारभेद लिपीतून व्यक्त करण्यासाठी नवीन चिन्हे शोधून काढण्याची किंवा अक्षरांना त्या त्या वेळी विशिष्ट वळण देण्याची अखिल भारतीय पद्धती शोधून काढण्याची आवश्यकता आहे. अक्षरावर अर्धचन्द्र देणे किंवा अक्षराखाली टिंब देणे या चिन्हांचा ह्या दृष्टीने उपयोग करून घेता येईल.

लेखनपद्धतीप्रमाणेच लिंगविचारही अखिल भारतीय नव्हे जागतिक–पातळीवरून व्हावयास पाहिजे, असे मला वाटते. कपाट म्हटले की नपुंसकलिंगी आणि आलमारी म्हटली की स्त्रीलिंगी हे केवळ अशास्त्रीय होय. सगळ्या निर्जीव वस्तूंना नपुंसकलिंगी मानावे व सजीव प्राण्यांचा लिंगभेद वास्तवतेवर आधारावा या दृष्टीने भाषेची प्रगती होणे इष्ट होईल. परंतु हा फार दूरचा विचार आहे, म्हणून त्याचा केवळ सूत्रपात करून ठेवतो.

**अज्ञात जगाचे शास्त्रीय संशोधन व्हावे**

आपल्याला दिसणाऱ्या या दृश्य जगाव्यतिरिक्त अदृश्य जगही आहे. त्या जगाकडे पाश्चात्य संशोधकांचे लक्ष वेधले गेले आहे पण आपल्याकडे तसे लक्ष वेधले गेले नाही. त्या अज्ञात जगाकडे मी आपणा सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो. हे अज्ञात जग मोठे प्रभावी असून, नकळत त्याचे दृश्य जगावर विशेष परिणाम घडत असतात. प्राचीन काळी ऋषि–महामुनी आपल्या तपोबळावर जगाला जिंकणारी सिद्धि–साधना प्राप्त करून घेत असत याची आपल्याला माहिती आहे. तंत्र–मंत्र किंवा सिद्धि–साधना हा एक संशोधनाचा महत्त्वाचा विषय आहे असे मला वाटते.

त्यासंबंधीच्या अज्ञात जगाशी आपला प्रत्यक्ष संबंध न आल्याने तिकडे दुर्लक्ष होणे स्वाभाविक आहे. त्या अज्ञात जगातील शक्ती प्राप्त करून घेण्याचे सामर्थ्य जर कोणाला लाभले तर तो दृश्य जगातील प्रसंगाच्या वेळी त्या शक्तीचा सदुपयोग करून घेऊ शकतो. भूत पिशाच्च्यांचे एक वेगळे जग आहे व ते जग दृश्य जगाला बाधक आहे असे आपण समजतो. माझ्या दृष्टीने ते बाधक नसून पोषक करून घेता येण्यासारखे आहे अशी माझी धारणा आहे. या जगात भूत–पिशाच्च असे काही नाही. मनुष्य मृत्यू पावल्यानंतर, त्याचे जे आयुष्य उरते ते पूर्ण होईपर्यंत अज्ञात जगात शिलकेत असते; आणि ते पूर्ण होईपर्यंत मृतात्मा अदृश्यरूपाने भटकत असतो. ज्याला आपण मृतात्मा म्हणतो तो वस्तुतः मृतात्मा नसतो. त्याचे ते पवित्र मनोद्रव्य असते. मनुष्याचा मृत देह पंचतत्त्वांत विलीन झाल्यावर हे मनोद्रव्य मात्र त्याची मर्यादा संपेपर्यंत इच्छित गोष्टीसाठी वावरत असते. या मनोद्रव्यात कोणतेही कार्य करून घेण्याची प्रबल शक्ती असते. ही शक्ती आत्मसात करून घेण्याचा दृश्य जगातील व्यक्तीने प्रयत्न केला व तिला तसे साध्य झाले तर विज्ञान शास्त्रातील संशोधनाप्रमाणे त्याही संशोधनाला मोठे महत्त्व प्राप्त होण्यासारखे आहे. हे कार्य अर्थात धाडसाचे आहे. ते संशोधकाच्या आध्यात्मिक शक्तीवर अवलंबून आहे. अलीकडे सिद्धि–साधनेच्या नावावर जे चमत्कार करून कीर्ती व पैसा प्राप्त करण्याचा काही व्यक्ती प्रयत्न करतात; त्यापैकी हे संशोधन नाही. मंत्रतंत्रावर चमत्काराचे प्रदर्शन मांडणारे खरे सिद्धि–साधक नव्हेत. पण हा प्रश्न वेगळा आहे. मला अज्ञात जगाच्या शक्तीबाबत व त्यावरून फलदायी होणाऱ्या गोष्टींबाबत, आध्यात्मिक बैठकीच्या संशोधकांनी शास्त्रीय संशोधन करण्याचा प्रयत्न करावा एवढेच सध्या सुचवायचे आहे.

**मानवांच्या कल्याणार्थ ‘ सांस्कृतिक व्यासपीठ ’ निर्माण करा**

माझ्या एका श्रेष्ठ साहित्यकार मित्राने, ‘ तुम्ही खेड्यातील साहित्यसम्मेलनाच्या व्यासपीठावरून कोणता संदेश द्याल, ’ अशी पृच्छा केली होती. मी वयाने, ज्ञानाने, अनुभवाने व बुद्धिमत्तेने अगदी कनिष्ठ आहे. मी एक खेडूत लेखक आहे, हे सांगितलेच आहे. मग या श्रेष्ठ साहित्याच्या व्यासपीठावरून संदेश देण्याची माझी पात्रता तरी कुठे आहे ? गेल्या पंधरा वीस वर्षांपूर्वी खेड्यापाड्यात शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य करण्याचा मी सामान्यतः एक तप अल्पसा प्रयत्न केला होता. ग्रामीण जीवन जगणाऱ्यांची अवस्था व दर्जा याची तीव्र जाणीव मला झाली. आणि त्याच वेळी समाजाला उन्नत करण्यासाठी सांस्कृतिक व्यासपीठाची नितांत आवश्यकता आहे, याची कल्पना मला येऊन, त्या दिशेने काही पावले पुढे टाकण्याचा मी प्रयत्न केला. नीती, संस्कृती, कला–साहित्य व शिक्षण यांवर मी विशेष भर दिला होता. पण हे कार्य विद्वानांनी सभासम्मेलनाच्या प्रसंगी केवळ शब्दांनी व्यक्त करून होणारे नाही, त्यासाठी भरीव योजना आखून, त्या

कार्यान्वित केल्यानेच होणार आहे याची जाणीव झाली पाहिजे व तसे प्रत्यक्ष प्रयत्नही व्हायला पाहिजेत. माझ्यासारख्या अडाणी व निर्धन व्यक्तीने आणि तेही कोणाचा कसला आधार, वा कसली साथ नसताना ती जबाबदारी निभविण्याचा, त्या ब्रिटिश अमदानीत प्रयत्न करणे काही सोपे काम नव्हते. परंतु एकदा मनावर घेतल्यावर मागे पाऊल घेणे हेही मला–माझ्या प्रकृतीला–मानवणारे नव्हते. म्हणून 'सांस्कृतिक व्यासपीठा'ची कल्पना मी शक्यतेप्रमाणे अमलात आणण्याचा प्रयत्न केला. १९४३–४४ सालच्या 'तरुण भारत' दैनिकात मी दोन लेख लिहिले. 'मराठी वाङमय खेड्यापर्यंत कसे पोचेल ?' हा एक, व 'ग्रामीण सुधारणा कशी घडविता येईल ?' हा दुसरा. या दोन्ही लेखांत सांस्कृतिक व्यासपीठाच्या दृष्टीने विवेचन करून एक सात कलमी योजना मी जाहीर केली होती. या योजनेबाबत त्या वेळी महात्मा गांधीजी यांच्याशी चर्चा करण्याचाही योग आला होता. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशीसुद्धा मी चर्चा केली होती. माझे एक ज्येष्ठ हितचिंतक श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांना माझ्या या योजनेची केवळ कल्पनाच होती असे नाही तर त्यांनी माझे कार्यही जातीने पाहिले होते व मला उत्तेजनही दिले होते. आजचे समाजकल्याण मंत्री श्री. बाळासाहेब तिरपुडे हे तर त्या काळी काही वर्षे मला सहकार्य देत होते. १९४८ साली गोंदिया येथील विदर्भ साहित्य संघाच्या अधिवेशनप्रसंगी, 'मराठी वाङमयापासून माझ्या अपेक्षा' या विषयावरील परिसंवादात भाग घेताना मी माझ्या सांस्कृतिक व्यासपीठाच्या कल्पनेचा पुरस्कार केला होता. हे सर्व काही नमूद करण्याचे कारण सांस्कृतिक व्यासपीठाची माझी जुनी कल्पना स्पष्ट व्हावी हे आहे. जुनी या अर्थाने की ती ब्रिटिश सत्तेच्या काळी केली गेली होती आणि नवीन या अर्थाने की ती मध्येच खंडित झाल्यावर, आज या स्वातंत्र्याच्या काळात नवे रूप घेऊन आजच्या या व्यासपीठावर येत आहे.

पण त्याबरोबर मला एक गोष्ट स्पष्टपणे नमूद केली पाहिजे ती ही की, १५ नोव्हेंबर १९५९ रोजी अकोला येथे विदर्भ साहित्य संघाच्या शाखांच्या प्रतिनिधींचे जे सम्मेलन भरले होते, त्या प्रसंगी ख्यातनाम साहित्यिक व तत्त्वचिंतक श्री. पु. य. देशपांडे यांनी 'सांस्कृतिक व्यासपीठाची नवीन कल्पना दर्शवून' तिचे मोठ्या कळकळीने व तळमळीने समर्थन केले. या कल्पनेसंबंधी मी काही विवेचन करण्यापेक्षा, श्री. देशपांडे यांनी डिसेंबर १९५९ च्या 'युगवाणी'च्या अंकात या सांस्कृतिक व्यासपीठासंबंधी महत्त्वपूर्ण विचार एक स्फुट लिहून व्यक्त केले आहेत, तेच येथे संक्षेपाने निर्देशित करतो. ते म्हणतात, "चैतन्यशक्तीचे मंत्र–तंत्र आत्मसात करण्यास एक प्रकारचे वातावरण आवश्यक असते. हे असे वातावरण निर्माण करण्याचे कार्यच आज सर्वश्रेष्ठ महत्त्वाचे झाले आहे. हे वातावरण निर्माण करण्यासाठी आज भारतात एका नव्या विशाल व स्वतंत्र अशा सांस्कृतिक व्यास-

पीठाची आवश्यकता आहे. राजकारण, अर्थकारण व समाजकारण इत्यादी सर्व कारणांवर आपला प्रकाश व प्रभाव पाडू शकेल असे हे सांस्कृतिक व्यासपीठ असले पाहिजे. हे प्रतिभेचे कार्य असल्यामुळे साहित्य, कला व संस्कृती यांची जोपासना करणाऱ्या सर्व साहित्यिक संस्थांनी असे हे नवे सांस्कृतिक व्यासपीठ आकारास आणण्यासाठी आता कंबर कसली पाहिजे. ही केवळ संकटात सापडलेल्या भारताची तात्पुरती गरज नसून ती एक जागतिक आवश्यकता आहे. सर्व देशात अशी नवी सांस्कृतिक व्यासपीठे आकारास आली पाहिजेत आणि या सर्व देशादेशांतील व्यासपीठांच्या सहकार्याने एक जागतिक व्यासपीठ आकारास आले पाहिजे. असे झाले तरच परमाणुस्फोटकांच्या प्रलयकारी महायुद्धापासून व मानवी संस्कृतीच्या सर्वनाशापासून आधुनिक जग आपले संरक्षण करू शकेल." श्री. बाबासाहेब देशपांडे यांच्या या शब्दांनीच, माझी पूर्वीची कल्पना जमेल धरून, विदर्भ साहित्य संघाच्या या साहित्याच्या व्यासपीठावरून मी अत्यंत आवश्यक असलेले 'सांस्कृतिक व्यासपीठ' निर्माण करण्याचा पुरस्कार मनःपूर्वक करीत आहे. 'सांस्कृतिक व्यासपीठा'चा पुरस्कार करताना माझे संपूर्ण लक्ष खेड्यापाड्यावर केन्द्रित झाले आहे. कारण खेडीच भारताचा 'आत्मा' आहे. या आत्म्याच्या म्हणजेच मानवाच्या मानव्याच्या कल्याणाचा प्रश्न या सांस्कृतिक व्यासपीठाच्या कल्पनेत सामावला आहे. संस्कृती, कला, साहित्य आणि शिक्षण यांवर भर देऊन मी या सांस्कृतिक व्यासपीठाद्वारे भारतातील प्रत्येक खेडे न् खेडे विकसित व उन्नत होऊन, केवळ सुशिक्षित, सुसंस्कृत, कलासंपन्न न होता, उदात्त जीवनमूल्ये प्रस्थापित करणारे; नीतिमत्तेने व मानवतेने उदात्त सांस्कृतिक मूल्ये सिद्ध करणारे व आपला प्रदेश आणि पर्यायाने आपला देश बलशाली, वैभवसंपन्न व जगदुद्धारक शक्ती निर्माण करणारे आदर्श बनावे, अशी प्रबळ आशा, अशी प्रबळ सदिच्छा मी व्यक्त करीत आहे. सांस्कृतिक व्यासपीठ आकारास आणण्यासाठी विदर्भ साहित्य संघ विदर्भापुरते का होईना अवश्य प्रयत्नशील राहील; आणि त्याचे लोण खेड्यापाड्यापर्यंत पोचेल याची दखलही घेईल याबद्दल मला शंका नाही. इतर साहित्यविषयक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थांनी आणि शासनानेही या सांस्कृतिक व्यासपीठाचा हिरिरीने पुरस्कार करून जनकल्याण अवश्य साधावे, अशी माझी सर्वांना कळकळीची हाक आहे, विनंती आहे !

सज्जनहो, आतापर्यंत आपण सुहृदांनी माझ्यासारख्या छोट्या खेडूत लेखकाचे अगदी साध्या–माझ्या मराठी माय बोलीत दिले गेलेले साधेच भाषण शांतपणे ऐकून घेऊन मजवर जो जिव्हाळा व्यक्त केला त्याबद्दल मी आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. या सम्मेलनाच्या स्वागत मंडळाने तर मजवर अनंत उपकार करून ठेवले आहेत. त्यांचा मी कायमचा ऋणी आहे. आपणा सर्वांचा आशीर्वाद मागून, पुन्हा एकदा मी एवढाच भाव व्यक्त करीन–

खेड्यापाड्याकडे चिंचोळ्या वाटेने जाणारा मी अगदी सामान्य पांथस्थ ! पण या वाटेवर अत्यंत जिव्हाळ्याने आपण सर्व हितचिंतकांनी मजवर सद्भावपुष्पवृष्टी करून माझे स्वागत केले. आपणा सर्व हृदयवंतांची मनोभावे सेवा करण्याचे सामर्थ्य निसर्गदेवता मला प्रदान करो ! जय हिंद !

□ □ □

---

विदर्भ साहित्य सम्मेलन : बावीसवे अधिवेशन, शनिवार दि. १३ व रविवार दि. १४ फेब्रुवारी १९६० रोजी, सावरगाव डुकरे, ता. चिखली, जि. बुलढाणा येथे दिलेले अध्यक्षीय भाषण.

सर्ग ७

# मी
# आणि
# माझे लेखन

# ७.

## मी आणि माझे लेखन

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी म्हणजे १९२२–२३ साली माझ्या लेखनाला खरा आरंभ झाला. त्या काळी अस्पृश्यतेच्या तीव्र ज्वाला उफाळत होत्या. सवर्ण हिंदू अस्पृश्य म्हणून गणलेल्यांच्या सावलीचाही विटाळ मानीत होते आणि अत्यंत क्रूरतेने त्यांचा अनन्वित छळ करीत होते. अशा जहाल कालखंडातील मी निरक्षर महार बालक. भंडारा जिल्हा शहराला जोडून असलेल्या गणेशपूर या गावी ७ नोव्हेंबर १९०८ रोजी जन्माला आलेला. मी एक छोटा अध्यात्मवादी खेडूत लेखक. माझे नागवंशीय दलित उपाध्याय घराणे. श्रीशेषभक्त. माझा मूळ पिंड आध्यात्मिक ब्राह्मण्याचा. चतुर्थीच्या दिनी तिन्ही सांजेला मी भंडाऱ्याला जात असताना, वाटेत एका अज्ञात योगी पुरुषाचे दर्शन घडले, त्याने मला अनुग्रहीत केले. त्याला झालेल्या दृष्टान्तानुसार तो माझ्याच शोधात होता. एका निसर्गसाधनेसाठी त्याला माझी गरज होती. त्यासाठी त्याने माझ्याकडून एक दिव्य साधना करवून घेतली. ती सफल झाली. तो प्रसन्न झाला. त्याने मला प्रथम अत्यंत दुष्कर पण लोक-कल्याणकारी श्रीशेष साधनेचे मर्म पटवून दिले. त्यासाठी लागणाऱ्या आध्यात्मिक बैठकीची कल्पना दिली. त्यानंतर त्याने निसर्गमाहात्म्य सांगितले. गणितशास्त्रा-नुसार निसर्गाच्या पर्यावरणातील सत्त्वपूर्ण चैतन्य लहरींची व जनकल्याणार्थ त्या आत्मसात करणाऱ्या तपस्येची जाणीव करून दिली. अध्यात्मशक्ती व अतीन्द्रिय-शक्ती यातील फरक दर्शविला, आणि पवित्र मनोद्रव्याच्या प्रभावाची कल्पनाही दिली. घातकी अघोरी सिद्धिसाधनेपासून व तत्सम तंत्रमंत्रांपासून पूर्णतः अलिप्त

राहण्याचा कडक इशारा दिला आणि पवित्र मनाला साक्षीला ठेवून, एका आध्यात्मिक बैठकीवरून मानवोद्धारक निसर्गआराधना करण्याची शपथ करवून घेतली. त्या अलौकिक ज्ञानी, दिव्य योगी-पुरुषाचा केवळ अकरा दिवसांचा अलभ्य सहवास मला घडला आणि अकराव्या दिवशी मध्यरात्री, माझ्या गणेशपूर गावापासून सुमारे चार कि. मी. अंतरावर, बाणगंगेच्या म्हणजे वैनगंगेच्या तीरी वसलेल्या कोरंबी गावच्या सुरम्य छोट्या टेकडीवरील दुर्गामंदिरात मी निद्रिस्थ असताना, तो महापुरुष अदृश्य झाला ! त्यानंतर त्याची माझ्याशी कधीच भेटगाठ झाली नाही. पण, नंतर एका बौद्ध पौर्णिमेच्या दिवसापासून, निसर्गशक्तीचा वेध घेण्याचा मला ध्यास लागला. निसर्गाचे मला वेड लागले. बेगुमानपणे ठिक ठिकाणच्या निसर्गपरिसरात मी भ्रमण करीत असे आणि गावी परत येऊन श्रीशेष मंदिरापुढील एका साध्या दगडावर ध्यानस्थ होत असे. तब्बल दोन तपे म्हणजे २४ वर्षेपर्यंत माझी निसर्गसाधनेची तपस्या होती. याच तपस्येतून माझ्या आध्यात्मिक, साहित्यिक व सांस्कृतिक जीवनाला एक वेगळा आकार आला आणि अनुभवानुसार अध्यात्म, साहित्य व संस्कृतीसंबंधी काही सिद्धान्तांचा आणि घटनांचा मी माझ्या विविध साहित्यात आविष्कार घडविला.

* *

बाल्यावस्थेत असतानाच आणखी एक अपूर्व योग मला लाभला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांशी माझा अकल्पित हितसंबंध आला. आम्ही दोघे समवयस्क. मी दहाबारा वर्षांचा आणि ते जवळपास त्याच वयाचे. बालपणी आम्ही दोघेही विदेही अवस्थेत रानावनात भ्रमण करणारे. मी निसर्गवेडापायी घरून पळून गेलो होतो; रामटेकला. एका तिन्ही सांजेच्या वेळी रामसागर तळयाच्या काठी त्यांची माझी भेट झाली ती योगायोगानेच. माझ्या अंगावर सर्पांचे वेटोळे फेकून त्यांनी मला भेडसावण्याचा प्रयत्न केला. त्यातून आमची निसर्गसाधनेची गट्टी जमली. माणिकचा तुकड्या झाला होता तो. लोक त्याला वेडा समजत. दगड मारून, शेलक्या शिव्या देऊन त्याचा छळ करीत. माझीही तीच दुर्दशा. पण आम्ही दोघेही वेडे निसर्गाच्या रंगात रंगलो होतो. निसर्गसत्त्वशक्तीचा एकच ध्यास. काही काळ नागार्जुनाच्या परिसरातील गुहेत आणि मग रामटेक तहसिलीतील देवलापारच्या अरण्यात निसर्गसाधना केली. राष्ट्रसंतांची ब्रह्मसाधना तर माझी श्रीशेषसाधना होती. चमत्काराचे ढोंगी प्रदर्शन आम्हाला मान्य नव्हते. लोककल्याणाची अध्यात्मशक्तीच तारक. एक आगळी प्रेरणा लाभली.

निसर्ग आणि मी व मी आणि निसर्ग, जणू एकजीव झालो ! नियती नेईल तिकडे माझी पावले वळू लागली. निसर्गवेधाच्या भावनालहरीतच मी वयाच्या चवदाव्या वर्षी गृहत्याग केला आणि नकळत कोकणपट्टीच्या व गोव्याच्या निसर्ग-

रम्य टापूत भटकू लागलो. मडगावला मी कसा पोचलो हे कळले नाही. दोनचार दिवसांचा उपाशी होतो मी. शरीरावर विजार नि झबले फाटले होते. एका दगडी चट्टाणावर रडत बसलो होतो. योगायोगाने संध्यासमयी एक हृदयवंत पुरुष माझ्याजवळ आला. त्याने माझी ममतेने विचारपूस केली. रडतच मी माझी करुण कहाणी सांगितली. मी महार असल्याचेही सांगितले. त्याचे हृदय द्रवले. त्याने मला कुरवाळून आपल्या घरी नेले. ते दयाळू व कृपाळू पुरुष म्हणजे थोर ध्येयवादी कादंबरीकार श्री. वामन मल्हार जोशी हे होत. त्याच वेळी कर्मधर्मसंयोगाने, श्री. जोशी यांच्याकडे पाहुणे म्हणून येणाऱ्या साहित्यसम्राट श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या भेटीचा अपूर्व लाभ मला घडला.

श्री. तात्यासाहेब केळकरांनी ओसरीत प्रवेश केला तेव्हा मी एका कोपऱ्यात अंग चोरून दडून बसलो होतो. स्फुंदत होतो. केळकरांचे लक्ष गेले. त्यांनी विचारले, 'वामनराव, कोपऱ्यात दडून कोण स्फुंदत आहे?' श्री. जोशी उत्तरले, 'भडारा–नागपूरकडून भटकत आलेला एक महार बालक आहे. दुर्दैवी आहे बिचारा.' केळकर 'महार-महार' असे पुटपुटतच मजजवळ आले. शेजारी गोल मोठ्या पायलीचा टेबल-लँप तेवत होता. त्या प्रकाशात केळकरांनी प्रथम माझा माथा नीट न्याहाळला आणि मग आपल्या हाती माझा तळहात घेऊन हस्तरेषा पाहत ते गंभीरतेने उद्गारले, 'वामनराव, हा बालक दुर्दैवी नाही, सुदैवी आणि सुलक्षणीही आहे. तो महार नाही ब्राह्मण आहे. ब्राह्मण्य असलेला अध्यात्मपिंडाचा तो आहे. ब्राह्मण असून ब्राह्मण्य नसेल तर तो ब्राह्मणच नव्हे आणि अस्पृश्य, महार म्हणून कोणी गणला गेला असेल ना पण त्याच्यात ब्राह्मण्य असेल तर तो अस्पृश्य नव्हे-महार नव्हे बरं!' ते क्षणभर थबकले. एक उसासा टाकला आणि मग पुन्हा माथ्यावरील व तळहातावरील रेषा निरखून पाहत ते उद्गारले, 'याच्या भाग्यात लक्ष्मी नाही पण सरस्वती मात्र कशी थयथयत आहे! आपल्या तेजस्वी प्रतिभेने तो गडावर गड जिंकून कीर्तिमान होईल. त्याने उच्चारलेला शब्द 'मंत्र' ठरेल. जीवनात बाका प्रसंग आला आणि तो जर्जर झाला तर लक्ष्मीही त्याला अचानक साथ देईल. या बालकच्या रूपाने प्रत्यक्ष सरस्वतीच तुमच्या घरी आली आहे वामनराव! मोठा अपूर्व योग आहे हा! त्याचे स्वागत करा.' आणि मग, माझी आंघोळ घालून व माझ्या हस्ते देव्हाऱ्यात पूजा मांडून माझे कशा आत्मीयतेने स्वागत करण्यात आले आणि मला मध्यभागी पाटावर बसवून उभयता दोन्ही हृदयवंत साहित्यपंडितांनी कसा सुग्रास भरविला याचे वर्णन मला करता येत नाही. माझ्या प्रारंभीच्या जीवनातील उत्कट मानवतेचे ते चित्र माझ्या हृदयपटलावर कायमचे कोरले गेले! या अकल्पित घटनेतूनच ब्राह्मण आणि महार यांचा दुवा साधण्याची व आपल्या लेखणीने व वाणीने मानवतेचा पुरस्कार करण्याची प्रेरणा मला लाभली. हे मला प्रांजळपणे कबूल केले पाहिजे.

सुमारे तीन चार महिनेपर्यंत मी पूर्ण गोवा, कोकणपट्टी आणि मराठवाडा टापूत भ्रमण करीत करीत परत गावी आलो आणि माझ्या श्रीशेष मंदिरापुढील त्याच दगडावर ध्यानमग्न झालो. त्याच वेळी मी तीन गोष्टींचा मन:पूर्वक निर्धार केला. स्वयंभू, स्वयंप्रज्ञ व स्वयंतेज राखायचे. कितीही गरिबी असली, परिस्थितीचे कितीही दाहक चटके बसत असले तरीही कसलीही लाचारी न पत्करता, परप्रकाशित न राहता, स्वयंप्रकाशाने स्वाभिमानाचे जीवन जगायचे आणि कुणाकडून कसलीही अपेक्षा न बाळगता, निरपेक्षतेने, नि:स्पृहतेने जेवढे शक्य तेवढे जनकल्याण साधण्याचा प्रयत्न करायचा. जे काही करायचे ते माझ्या दलित व दु:खी बांधवांसाठी. जे काही साधायचे ते जर्जर व संकटग्रस्त असलेल्या स्त्रिया आणि बालकांच्या प्रसन्नतेसाठी. या माझ्या लहानपणाच्या संकल्पानुसार १९२८ साली मी माझ्या गावी प्रथम 'ग्रामसुधार मंडळ,' १९४३ साली 'दलित सेवाश्रम' आणि नंतर 'ज्योति सेवादल' स्थापन करून सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीने संपूर्ण भंडारा जिल्हा उन्नत करण्याचा अल्पसा यत्न केला. त्या संस्थांच्या अन्तर्गत मोफत वाचनालय, रात्रीची शाळा, औषधालयही काढून व त्याच्या शाखा प्रमुख खेडोपाडी उघडून थोडी जनसेवा रुजू करू लागलो. त्याचप्रमाणे नागपूर येथे १९३९ साली, 'साहित्य चर्चा मंडळा'ची स्थापना करून, वाङ्मयीन कार्याद्वारे बहुजन समाजात जागृती निर्माण करण्याचा असा प्रयत्न केला. तसाच १९४३ साली 'वाङ्मय प्रसारक मंडळ' निर्माण करून विशेषत: दलितवर्गात साहित्यविषयक गोडी निर्माण करण्याची व दलितांनी हाती लेखणी घेऊन पुढे सरसावण्याची शक्य ती दखल घेतली. १९२२ ते १९४७ या स्वातंत्र्यापूर्वीच्या पंचवीस वर्षे म्हणजे पाव शतकाच्या कालखंडात मी माझ्या आध्यात्मिक बैठकीवरून सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यविषयक कार्याचे छोटे अध्याय निर्माण करू शकलो, याचे थोडे समाधान वाटते.

निर्दिष्ट १९२२ ते १९४७ या कालखंडातील माझ्या किशोर आणि तारुण्याच्या प्रथम जीवनपर्वातील काही घटनांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. १९२८ साली जेव्हा मी ग्रामसुधार मंडळ निर्माण केले त्या सुमारास भंडारा जिल्ह्यात बिडीमजुरांचा एक मोठा संप घडविण्यात आला. या जिल्ह्यात सर्वात मोठा धंदा म्हणजे बिडी वळणे. सुमारे ८०–९० टक्के बिडीमजूर म्हणजे दलित बांधवच. हजारी तीन–चार आणे काय ती मजुरी. त्यात पट्टीछाट, कट्टाछाट, लट्टी (धागा) छाट, तमाखूछाट व्हायची. स्त्री आणि पुरुष दोन्ही बिडीमजूरच. त्या छाटीतून अत्यल्प मजुरी काय ती हाती पडायची. त्याशिवाय धर्मदाय फंड म्हणून कापला जायचा तो वेगळाच. दलित मजूरबांधवांची अत्यंत हलाखीची, अत्यंत दयनीय अवस्था. त्यातून फार मोठा संप घडलेला. सर्वत्र उपासमार होऊ लागली. भांडवलदार बिडी कारखानदार एका बाजूला तर त्या काळचे गोंदियाचे श्री. कालीचरण, नंदा गवळी, भंडाऱ्याचे श्री. पांडुरंगजी चहांदे (देशकर) आणि नागपूरचे श्री.

हेमचन्द्र खांडेकर व श्री. गं. म. ठवरे हे मजूरनेते एका बाजूला. कर्मवीर श्री. गं. म. ठवरे सोडले तर बाकीचे नेते या ना त्या कारणाच्या निमित्ताने मालकवर्गाशी हातमिळवणी करू लागले. पण श्री. ठवरे आपल्या मागण्या पूर्ण झाल्याशिवाय मागे हटायचे नाही, या जिद्दीने पेट घेऊन उठले. भांडवलदारांशी संगनमत करणाऱ्या नेत्यांविरुद्ध मजुरांनी जोरदार उठाव केला. आपसातच संघर्ष निर्माण होऊन परिस्थिती फार नाजूक व भयंकर रूप घेऊन उठली. तेव्हा दलित स्त्री पुरुष मजुरांची आर्त हाक मला आली आणि तत्परतेने ओ देणे माझे कर्तव्य ठरले. भंडारा जिल्ह्यातील जांभोरा-पालोरा या गावी मजुरांची एक जंगी परिषद भरली होती. त्या परिषदेत विरोधी पक्षाने श्री. ठवरे यांना घायाळ केले होते. पण पुढे नेटाने पुढाकार घेऊन, ती परिषद यशस्वी करून मागण्या मंजूर कराव्या लागल्या. हे श्रेय मला लहानपणीच लाभले ते काही कमी नाही. या यशाचा भंडारा जिल्ह्यावर फार मोठा प्रभाव पडला. त्या प्रभावामुळे त्या वेळचे गोंदियाचे एक मोठे कारखानदार व नेते श्री. चतुर्भुजभाई जसानी यांनी मला भेटायला निमंत्रित केले. पण त्यांचा मजवर वचक पडू शकला नाही. उलट, स्त्री व पुरुष मजूर बिडी कारखान्यात एकत्र बिड्या वळायला बसत, त्यामुळे एक प्रकारचा अनाचार व कधी कधी अनैतिकताही घडे, हे लक्षात घेऊन, स्त्री पुरुष अलग अलग बसविण्यात यावे आणि शक्यतोवर स्त्रियांना त्यांच्या घरीच बिडी वळण्याची परवानगी असावी हे एक व दुसरे म्हणजे धर्मदाय फंडाची जी रकम मजुरीमधून काटली जाते त्या रकमेचा विनियोग मजुरांच्या आपत्प्रसंगी व्हावा, या दोन्ही बाबी मान्य झाल्या. त्यांपैकी एक अमलात आली पण दुसरी मागणी मात्र रेंगाळत राहिली. बिडी-मजुरांनी मी त्यांचा नेता व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. पण नेतागिरी हा काही माझा मार्ग नाही, तसा माझा पिंडही नाही असे स्पष्ट सांगून मी मोकळा झालो. परंतु जेव्हा माझ्या दलित बांधवांवर बिकट प्रसंग गुदरेल तेव्हा तेव्हा माझ्या मर्यादेनुसार अवश्य साथ देण्याचे अभिवचन मी दिले होते व प्रसंगी मी ते काही काळ निभविले.

* *

माझे शालेय शिक्षण जिथे जेमतेम तिथे विद्यालयीन शिक्षणाचा कसला गंध नाही. त्या काळी माझ्या गावी मिशनरी लोकांचे मोठे प्रस्थ होते. माझे वडील रामचन्द्र मिशनरीमध्येच नोकरीला होते. त्यामुळे आमचा आँग्ल मिशनरी व्यक्तीशी घनिष्ठ संबंध आला होता. तुळशी नावाची माझी एक देखणी बहीण होती. ती तरल बुद्धीची. तिला अध्यापिकेच्या प्रशिक्षणासाठी अमरावतीला १९२० साली पाठविण्यात आले. मी आणि माझी मातोश्री नागाबाई आम्ही दोघेही तिच्या बरोबर अमरावतीला गेलो होतो. ख्रिस्ती धर्मोपदेशक यार्दो यांच्या एका चाळीत,

अमरावती कॅम्प–चपराशीपुरा येथे राहत होतो. दुसरे धर्मोपदेशक श्री. प्रेमलाल मकासरे हे त्या चाळीच्या दुसऱ्या भागात राहत होते. ते दोघेही धर्मोपदेशक मोठे प्रेमळ होते. माझे वय थोडे वाढले होते. तेथील मिश्नरी शाळेत माझे नाव दाखल करण्यात आले. तीन वर्षे मी प्राथमिक शिक्षण घेतले. मराठी चवथ्या इयत्तेत मी प्रवेश केला. पण एक दुर्दैवी घटना घडली. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बन्सीलाल नावाचे वयस्क गृहस्थ होते. त्यांना वेड लागले होते. त्या वेडातच त्यांनी सायंकाळी मला शाळेत नेले. दारे-खिडक्या बंद केल्या. माझ्यापुढे शाळेचा सर्व रेकार्ड गोळा केला. मला एका टेबलाला बांधून ठेवले. आणि खदखदा हासत त्याने कागदपत्रांना आग लावली. ज्वाळा उफाळू लागल्या. मी मोठमोठ्याने किंचाळू लागलो, आरोळ्या ठोकू लागलो. बन्सीलाल फिदफिदा हासत त्या ज्वालाभवती फेर धरून नाचत होते. मी मूर्च्छित झालो. आजूबाजूचे लोक धावून आले. त्या वेळी अर्धी शाळा जळून खाक झाली होती. बन्सीलाल त्या जळत्या राखेत मरून पडला होता. पण सुदैवाने कसलीही झळ न पोचता मी जिवंत राहिलो ! १९२० साली लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला. त्या वेळी मी अमरावतीला होतो. ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, व तो मी मिळविणारच’ या घोषणा होत होत्या आणि ठिकठिकाणी परदेशी कापडांची होळी केली जात होती त्या वेळी इतरांबरोबर मीही त्या वावटळीत नारे देत होतो. मला गोऱ्या सोल्जरांनी चांगला चोप दिला होता. ‘देश के लिये मरेंगे, मरेंगे’ असे म्हणतच मी बेशुद्ध झालो होतो. माझ्या बहिणीचे प्रशिक्षण संपले आणि आम्ही आपल्या गावी परत आलो. विदर्भात त्या काळी माझी बहीण ही पहिलीच सुशिक्षित स्त्री. तिला भंडाऱ्याच्या मिशन शाळेत अध्यापिकेची नोकरी मिळाली. पण एके सायंकाळी ती घरी परतलीच नाही. आम्ही दोन दिवस तिचा शोध काढला. परंतु ती गवसली नाही. नंतर कळले की तिला मिश्नरी लोकांनी परस्पर गिरजाघरात नेऊन बाप्तिस्मा दिला आणि मिश्नरी ऑर्फन गृहात ठेवले. तीनचार दिवसांनी ती घरी भेटायला आली तेव्हा, ‘तू बाटली आहेस, चालती हो’ असे म्हणून आम्ही तिला हाकलून दिले. तिला मोठा हादरा बसला. ती फार आजारी झाली. तिला म्यूर मेमोरियल हॉस्पिटल, नागपूर येथे त्वरित नेण्यात आले. तेथे माझ्या बहिणीला मृत्यूने ओढून घेतले !

माझ्या बहिणीच्या मृत्यूने, भंडाऱ्याच्या मिश्नरी लोकांना खूपच धक्का बसला. त्या वेळी मिस् ग्रेगरी व मिस टल्लो या मिश्नरी प्रमुख होत्या. त्यांनी आमची क्षमायाचना केली. त्या दोघीही वयस्क आँग्ल अधिकाऱ्यांनी मजवर मोठा लोभ व्यक्त केला. मला त्या जीव की प्राण मानत. त्याच वेळी अमरावतीचे धर्मोपदेशक श्री. मकासरे भंडाऱ्याला आमच्या गावी बदलून आले. मी पुन्हा शिक्षण घ्यावे असा आग्रह धरून, माझे पुढे वयाचे नुकसान होऊ नये म्हणून तिथीप्रमाणे

असलेली माझी ७ नोव्हेंबर १९०८ ही जन्म तारीख, बदलवून, ६ वर्षांनी ती वाढविली आणि ७ नोव्हेंबर १९१४ ही तारीख नमूद करून गावच्या मिश्नरी शाळेत माझे नाव परत दाखल केले. मी मराठी चवथी इयत्ता उत्तीर्ण झालो व मग काही दिवस भंडाऱ्याच्या म्युनिसिपल मिड्ल स्कूलमध्ये शिक्षणाला राहिलो खरा, पण निसर्ग मला हाक देतो आहे असे समजून, मी परप्रान्ती पळून गेलो. काही दिवसांनी परत आल्यावर, खाजगीरीत्या त्या वेळच्या हायस्कूल एन्ट्रन्स परीक्षेला बसलो. उत्तीर्ण झालो. मग १९३० मध्ये माझे वय वाढले होते तरी भंडाऱ्याच्या मनरो हायस्कूल (आजचे लाल बहादूर शास्त्री हायस्कूल) मध्ये, संस्कृत विषय घेऊन दाखल झालो. पण तिथेही मन रमेना. निसर्ग सारखा हाक देत आहे असे वाटे. शार्दूलविक्रीडित वृत्तात मी 'गिरिबाला' नावाची एक कविता लिहिली होती. मधल्या सुट्टीत काही वर्गबंधूंच्या आग्रहाखातर त्या कवितेचा शेवटचा श्लोक मी फळ्यावर लिहून काढला. तोच घंटा झाली. श्री. भांगे गुरुजींचा संस्कृतचा पाठ होता. ते हुशार पण मोठे तापट होते. वर्गात शिरताच त्यांची नजर फळ्यावर गेली. जधि ती गातसे गाणी मधुर तो नाद ये कर्णी ! मनीषा पूर्ण ती होई लोचने भिडता माझी ' ही ओळ वाचून ते संतप्त झाले आणि मला रुळाने मूर्च्छित होईपर्यंत झोडपून काढले. सर्वत्र गलबला झाला, धावपळ सुरू झाली. श्री. वाय्. बी. रानडे हे अत्यंत कडक शिस्तीचे विद्वान गृहस्थ मुख्याध्यापक होते. त्यांनी धाव घेतली. मला शुद्धीवर आणले. निसर्गदेवतेच्या गुणवर्णनावर असलेली माझी कविता त्यांनी सर्व शिक्षकांसमोर वाचून दाखविली. माझ्या कवित्वाच्या गुणाबद्दल प्रशंसा करून त्यांनी भांगे गुरुजींची कडक हजेरी घेतली. पण मग मी हायस्कूलला जो रामराम ठोकला तो कायमचाच ! त्याच १९३०–३१ च्या सुमारास, एडिंबरोहून मिश्नरी झीलने आलेल्या मिस्. ए. एम्. ऑर्कनी या अत्यंत रेखीव बांध्याच्या अगदी सुंदर व सुविद्य आँग्ल तरुणीने माझ्या आध्यात्मिक व साहित्यिक जीवनात प्रवेश केला. ती एडिंबरोच्या एका धनाढ्य व्यापाऱ्याची एकुलती एक कन्या होती. ती केम्ब्रीज युनिव्हर्सिटीची प्रथम श्रेणीत एम. ए. झालेली आध्यात्मिक प्रकृतीची व सेवामय वृत्तीची उच्च सेविका होती. मिश्नरी कार्यासाठी ती प्रथमच आमच्या भंडारा येथील गणेशपूर गावी आली होती. मिस् टल्लो यांनी आपल्या बंगलीत मला खास निमंत्रित करून मिस् ऑर्कनीचा विशेष परिचय करून दिला होता. लवकरच आम्हा उभयतांची मैत्री वृद्धिंगत होत गेली. आमिष दाखवून अथवा बळजबरी करून धर्मान्तर होणे तिला मान्य नव्हते. निरपेक्षतेने गोरगरिबांची मनापासून सेवा करण्यात ती धन्यता मानत होती. माझी आध्यात्मिक भूमिका आणि निसर्गाकडे धाव घेण्याची प्रवृत्ती तिने नीट हेरली होती. कुठे तरी स्थायिक होऊन कोणती तरी मी नोकरी करावी ही तिची इच्छा. तिने शब्द खर्चून शिक्षण विभागाचे सर्कल इन्स्पेक्टर मि. ए. एस्. स्टॅले यांच्यामार्फत मला नागपूरच्या

नॉर्मल स्कूलमध्ये भरती केले. मी नागपूरला गेलो पण ती भंडाऱ्याला बेचैन राहू लागली. आणि म्हणून तिने नागपूरहून सेवाकार्य करण्याचे ठरविले. सिव्हिल लाइन्समधील सेन्ट उर्सुला गर्ल्स हायस्कूलच्या मागील भागात एका प्रशस्त बंगल्यात ती राहू लागली. मला तुटकी पडकी इंग्रजी येत होती तर तिला तुटकी पडकी मराठी येत होती. आम्ही दोघांनी ठरवले, तिने मला इंग्रजी शिकवावे आणि मी तिला मराठी शिकवावी. मग तसे घडले. तिने मला अनेक इंग्रजी पुस्तके वाचायला दिली व त्यावर ती भाष्यही करून माझी इंग्रजी पक्की करून घ्यायची. तीन तीन महिन्यांचा सोल्जर्स पास देऊन, इंग्रजी बोलपट पुन:पुन्हा पाहायला भाग पाडायची त्यामुळे मला महाविद्यालयात इंग्रजीचे जे ज्ञान झाले नसते ते तिने मला कष्ट घेऊन प्राप्त करून दिले. माझ्या ऐन तारुण्याच्या उमेदीच्या काळात आर्कनीची मला जिवाभावाची उत्तम साथ लाभली.

* *

माझ्या जीवनात मी कोणाला गुरू मानला नाही. पण ज्ञात्याकडून जे ज्ञान मला हवे ते प्राप्त करून घेण्यासाठी मात्र मी धाव घेत असे. आपले वेदाध्ययन नाही याचे शल्य मला बोचत होते. माझे एक घरोब्याचे हितचिंतक श्री. दि. ब. पंडितांना व त्यांच्या धर्मपरायण मातोश्रींना माझी व्यथा सांगितली. त्यांनी विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी यांची भेट करून दिली. मला सर्व वेद व शास्त्रे शिकविण्याचे त्यांनी मान्य केले. मला मोठा हर्ष झाला. त्यांच्या कडक नियमाप्रमाणे, मी रोज प्रात:काली वेदाध्ययनासाठी त्यांच्याकडे नियमितपणे जायचा. तब्बल सहा वर्षे मी डॉ. भाऊजी दप्तरी यांची ज्ञानलालसेने शागिर्दी केली; तर दर सायंकाळी मध्यरात्र उलटून जाईपर्यंत मिस् आर्कनीकडे आँग्ल विद्येच्या प्राप्तीसाठी जायचा. विद्याव्यासंगाची माझी वृत्ती तेजोवर्धित होत गेली. मी कालमानाप्रमाणे, नवप्रेरणा देणारे नवीन पद्धतीचे बायबल निर्माण करावे, अशी तीव्र इच्छा निर्माण करून, ऑर्कनीने हट्टच धरला. तिची इच्छा अमान्य करता येईना. वेद, धम्मचक्र आणि जुन्या नव्या कराराचे बायबल यांच्या समन्वयाने, मानव धर्मपोषक असे सिद्धान्तासह आकृतिबन्ध नवे बायबल निर्माण करण्याच्या प्रयत्नाला मी लागलो. सतत तीन वर्षे मी रात्रंदिवस खपू लागलो. संदर्भासाठी अनेक धर्मग्रंथ पालथे घातले. काही ख्रिस्ती पंथांच्या पद्धतीची व रीतींची साकल्याने माहिती मिळविली. प्रॉटेस्टंट, रोमन कॅथलिक, मेथाडिस्ट आदी चर्चेसमध्ये जाऊ लागलो. ऑर्कनी माझ्या सोबतीला असायचीच. वस्तुस्थिती लक्षात न घेता, आम्हा उभयतांची जोडी इतडे तिकडे हिंडताना पाहून नागपुरातील काही व्यक्तींनी आम्हा दोघांना न द्यायचा तो भडक रंग देण्याचा प्रयत्न केला. ऑर्कनीच्या प्रेमाखातर मी बाप्तिस्मा घेऊन ख्रिश्चन होणार आणि तिच्याशी कौटुंबिक संबंध दृढ करणार,

अशा अफवाही प्रस्तुत करायला कमी करण्यात आले नाही. वस्तुतः १९३० च्या शारदा बिलाच्या भयाने भंडाऱ्याचे एक ठेकेदार श्री. सीतारामजी गडकरी यांची कन्या यमुना हिच्याशी माझे लग्न झाले होते. माझ्या धर्मपत्नीला माझे ऑर्कनीशी कोणत्या कारणासाठी कसे हितसंबंध आहेत याची पुरती जाणीव होती. ऑर्कनी नेहमी माझ्या घरी यायची. माझ्या सूचनेप्रमाणे कधी कधी नऊ वारी साडी नेसून, कपाळी कुंकवाचा टिळाही लावायची. मधुर भाषेत मराठी बोलायची. बायबल निर्माण करण्याच्या दृष्टीने, केव्हा केव्हा तर मला ऑर्कनीच्या बंगल्यातच रात्र-रात्रभर राहणे भाग पडे. परंतु माझ्या धर्मपत्नीने आम्हा दोघांसंबंधी कधी शंका घेतली नाही. १९३७–४० मध्ये मी सुमारे हजार पृष्ठांचा छापील नवा बायबल-ग्रंथ होईल एवढी रचना केली. हा ग्रंथ आर्कनीला अप्रतिम वाटला. तिच्या आनंदाला पारावार उरला नाही. त्या वेळी ऑल इंडिया बर्मा ॲन्ड सिलोन मिशनरी संघाचे डॉ. एच. जे. हॉज हे जनरल सेक्रेटरी होते. त्यांना व हिस्लॉप कॉलेजचे विद्वान प्राचार्य रेव्ह. गार्डनर यांना तर निर्दिष्ट नवे बायबल अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण वाटले. मला इंग्लंडला पाठविण्यात यावे व तेथेच त्या नवीन बायबलचे प्रकाशन घडावे, असे ठरविण्यात आले. सर्व खर्च ऑर्कनीने करण्याचे सहर्ष मान्यही केले होते. ग्रंथ डॉ. हॉज यांच्या स्वाधीन करण्यात आला होता. अखेरचा निर्णय घेण्यापूर्वी डॉ. हॉज यांनी मिस् ऑर्कनी व काही धर्मोपदेशक यांना एके सायंकाळी आपल्या बंगल्यात निमंत्रित केले होते. अर्थात मलाही पाचारण करण्यात आले होते. पण मी व ऑर्कनी तिथे जाण्यापूर्वी काय शिजले होते याची कल्पना नव्हती. आधी मला बाप्तिस्मा देऊन ख्रिश्चन करावे व मग इंग्लंडला पाठविण्याचा विचार व्हावा, हा एक घाट होता बैठकीच्या प्रसंगी पूर्वीच भरून ठेवलेले एक टंकलिखित प्रपत्र माझ्या स्वाक्षरीसाठी मला देण्यात आले. त्यावर ओझरती नजर टाकताच सर्व प्रकार चटकन माझ्या ध्यानी आला. माझ्या अंगाची लाही झाली. ऑर्कनीला त्या फसव्या प्रकाराची कसलीही जाणीव नव्हती. डॉ. हॉज यांचा चिरूट पेटविणारा एक लाईटर माझ्या हाताजवळ होता. त्याचा उपयोग मी डोळ्याचे पाते लवते न लवते करून, माझ्या तीन वर्षांच्या कष्टप्रद तपस्येचा कायमचा अंत केला ! त्या वेळी मजवर कोणता भयंकर प्रसंग गुदरला, याचे वर्णन न केलेलेच बरे. ऑर्कनीला मनस्वी दुःख झाले ! तिने माझी बाजू घेऊन सर्वांशी झुंज घेतली. मला संकटमुक्त केले. आणि तिने एडिंबरोला परत जाईपर्यंत मला पूर्वीप्रमाणेच साथ दिली. ती एक देवताच होती.

माझ्या पूर्व आयुष्यात ख्रिश्चन मिशनरी लोकांशी व विशेषतः मिस् ऑर्कनीच्या सान्निध्यामुळे ज्या इंग्रज अधिकाऱ्यांशी निकटचा संबंध आला, त्यामुळे प्रसंगानुसार दलित बांधवांचे काही ज्वलंत प्रश्न सोडविण्याचे भाग्य मला लाभले. दलित मुला-मुलींच्या शिक्षणाला उत्तेजन, गरिबांना शक्य ते आर्थिक साहाय्य आणि अन्याया-

साठी न्यायदान, दलितांच्या नोकरीसाठी शिफारशी आदी काही गोष्टी काही प्रमाणात घडविता आल्या. माझ्या गावापुरतेच सांगायचे झाले तर त्या अस्पृश्यतेच्या जहाल काळी, स्त्री-पुरुषांसह संपूर्ण दलित केवळ साक्षरच नव्हे तर सुशिक्षित करण्यात आला. याचे सर्व श्रेय अर्थातच ख्रिश्चन मिश्नरीलाच द्यावे लागेल. १९३१–३२ मध्ये मी जेव्हा नॉर्मल स्कूलच्या शिक्षणासाठी प्रवेश केला तेव्हा तेथील विषमतेच्या व भेदाभेद या प्रथेने माझ्या स्वाभिमानाला जबर धक्का बसला. नॉर्मल स्कूलच्या एका भागाला वर्ग भरत तर दुसऱ्या एका भागाला मेसची व्यवस्था होती आणि विद्यार्थ्यांच्या निवासाचीही सोय होती. इतर जातीचे विद्यार्थी वेगवेगळ्या खोल्यांत सरमिसळ ठेवले जात. परंतु अस्पृश्य, ख्रिश्चन व मुसलमान असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मात्र क्रमांक आठची खोलीच कायम केली गेली होती. आणि दुसरे म्हणजे जेवणाच्या वेळी एका लांबोळ्या मोठ्या खोलीत स्पृश्य विद्यार्थीच जेवणाला बसत व त्यांची ताटवाटी नोकर घासून धुऊन देत असत. अस्पृश्यांच्या बाबतीत मात्र तशी सोय नव्हती. त्यांना एका व्हरांड्यात जेवायला बसावे लागे, त्यांना दुरून वाढले जाई आणि ताटवाटी स्वतःलाच धुऊन काढावी लागे. हा कटू अनुभव मला येताच मी जेवणावर बहिष्कार टाकला व उपोषण सुरू केले, त्यासाठी अवहेलनाही सहन करावी लागली आणि शाळेच्या पटावरून माझे नावही काढून टाकण्याची मला धमकी देण्यात आली. त्या वेळी एक संशोधक श्री. दामोदर केशव ओक हे नॉर्मल स्कूलचे सुपरिटेंडेन्ट होते. 'तुझ्या एकट्याची स्वतंत्र सोय करू पण उपोषण सोड,' असे मला सुचविण्यात आले, पण ते मला मान्य नव्हते. ही शाळा सरकारी आहे व नोकरवर्गही सरकारी आहे. तेव्हा इतर विद्यार्थ्यांप्रमाणे समान वागणूक आणि समान न्याय आम्हाला मिळालाच पाहिजे, अशी मागणी मी केली होती. शेवटी ही खबर मिस् ऑर्कनीला कळताच, शिक्षणाधिकारी मि. स्टॅले यांना घेऊन ती नॉर्मल स्कूलमध्ये आली. स्टॅले यांनी एक कडक धोरण स्वीकारले आणि माझी मागणी अविलंब मान्य करून, समान व्यवस्थेचे व समान वागणुकीचे तेव्हाच्या तेव्हा आदेश दिले. अस्पृश्यता पाळणाऱ्या सवर्ण हिंदूंच्या वृत्तीला शह देण्याचा ब्रिटिश राजवटीतील तो एक माझा छोटा विजयच ठरला !

१९३२–३४ मध्ये नॉर्मल स्कूलमध्ये शिकत असताना 'अधिकार,' 'सीमारेषा', चैत्रातील पालवी' व 'तांबडे डाग' अशी आध्यात्मिक स्वरूपाची आणि 'जाळ्यातील जीव' व 'गळफास' अशी नाट्यावरची पुस्तके मी लिहिली. सुपरिटेंडेंट श्री. ओक यांच्या निदर्शनास ती पुस्तके आल्यावर, त्यांनी आपली मोठी खाजगी लायब्ररी मला मोकळी करून दिली होती. त्यामुळे संपूर्ण प्राचीन मराठी साहित्याच्या अभ्यासाचा मला लाभ झाला. उपोषणामुळे व मी एक अध्यात्मवादी लेखक असल्याची जाणीव झाल्यामुळे माझा वचक बसला होता. त्या वेळी श्री. ओक यांच्यावर अचानक एक दुर्धर प्रसंग ओढवला. एके रात्री, त्यांच्या थोरल्या पुत्राच्या

धर्मपत्नीने आगगाडीखाली आत्महत्त्या केली. मोठी गंभीर परिस्थिती निर्माण झाली. श्री. ओकांच्या साथीला राहायला कोणीही पुढे येईना. तेव्हा मिस् ऑर्कनीच्या साहाय्याने पुढाकार घेऊन, श्री. दा. के. ओक यांना त्या आपत्तीतून मी मुक्त केले. त्याच सुमाराला, श्री. अनंता ओक या नावाच्याच दुसऱ्या एका पदवीधराने ' स्वच्छंद ' नावाचे एक पाक्षिक सुरू केले होते. मी आणि दोन तरुण ब्राह्मणकन्या यांची ' स्वच्छंदा 'ला साथ होती. सायंकाळी धंतोलीवरील ' स्वच्छंद ' कार्यालयात आम्ही जात होतो. श्री. अनंता ओक हे उत्तम वक्ते व नाटककारही होते. ' बायकी कावा ' हे त्यांचे नाटक प्रसिद्धही झाले होते. त्यामुळे त्यांचा–आमचा संबंध अधिकच वाढला होता. पण त्या वेळच्या नॉर्मल स्कूलच्या श्री. वैद्य व श्री. जोशी या नावाच्या अध्यापकांना मी ब्राह्मणकन्येबरोबर वावरतो याचे शल्य बोचू लागले. त्यांनी मला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. सुपरिंटेंडेन्ट ओकांकडेही त्यांनी तक्रार नोंदविली. माझ्या आणि त्या दोन तरुणींच्या इभ्रतीचा तो ज्वलंत प्रश्न होता. माझा आत्मा खवळला. मी ' स्वच्छंद 'चे संपादक ओक आणि त्या दोघी ब्राह्मण-कन्या यांना सुपरिंटेंडेन्टच्या बंगल्यावर घेऊन आलो. श्री. वैद्य व श्री. जोशी यांना व इतर कानाफुसी करणाऱ्या अध्यापकांनाही पाचारण करण्यात आले होते. एक प्रकारचा दरबारच भरला होता. त्या प्रसंगी त्या ब्राह्मणकन्यांनी आपली व माझी बाजू निर्भीडपणे मांडून, आम्ही इभ्रतीचा उलट दावा करू असे जेव्हा वैद्य व जोशी यांना खडसावून सांगितले तेव्हा सर्वच सर्द झाले. इतकेच नव्हे तर, श्री. वैद्य गुरुजींच्या कन्येचा काही गुंडांनी गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता, शेंडे यांनी त्या मुलीचे कसे रक्षण केले हे सांगताच सर्व लज्जित झाले !

त्याच सुमारास विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी, ' महाराष्ट्रा 'चे संपादक श्री. दादासाहेब ओगले, धर्मवीर डॉ. बा. शि. मुंजे, क्रांतिदूत डॉ. चोळकर, तपस्वी हरिभाऊ मोहनी, श्री. हरिप्रसाद वर्मा, समाजसुधारक श्री. नारायणराव माचवे, श्री. दि. ब. ( भाऊ ) पंडित या मान्यवर व्यक्तींशी जसा निकटचा संबंध आला; अगदी तसेच माझ्या सुदैवाने, गुरुवर्य किसन फागोजी बन्सोड, श्री. ग. आ. उपाख्य नानासाहेब गवई, कर्मवीर श्री. गं. म. ठवरे व श्री. हेमचन्द्र खांडेकरप्रभृती दलित-नेत्यांशी अगदी जिव्हाळ्याचे हितसंबंध निर्माण झाले. १९३२–३३ मध्ये श्री. नारायणराव माचवे यांनी दलितोद्धाराच्या दृष्टीने माझ्याशी संपर्क राखून, सरस्वत्युत्सव मंडळाची स्थापना केली होती व या मंडळाद्वारे ते ठिकठिकाणी कार्यक्रम घडवीत असत. तद्वतच गणेशोत्सवाच्या प्रसंगी विविध प्रकारचे मेळावेही ते भरवीत असत. मी त्यांच्या उपक्रमात विशेषत्वाने सहकार्य देत होतो. कारण श्री. माचवे हे ब्राह्मण व अस्पृश्य एकत्रित कसे येतील व अस्पृश्यतानिवारणाचा हेतू कसा सफल होईल या सेवामय भूमिकेतूनच आपल्या कार्यक्रमांचे आयोजन

करीत असत, नागपूर रेल्वेस्टेशनजवळ जेथे आजही संत्रा–मार्केट आहे तेथे त्या काळी, दारिद्र्यामुळे पोटाचा थोडा तरी प्रश्न सुटावा म्हणून, अनेक तरुण महार-स्त्रिया मुसलमानांबरोबर रात्र रात्रभर संत्र्यांचे पेटारे भरण्यासाठी खपत असत. त्या वेळी महारस्त्रियांच्या बाबतीत होणारा अनाचार नेत्रांनी पाहवला जात नव्हता. माझे दुःख तर पेट घेऊन उठले होते. तसेच दुसरे असे की, इकडून तिकडून येणाऱ्या दलित स्त्रियांना फूस घालून काही मुसलमान आपल्या घरात दाबून ठेवीत, हे शल्य मला बेचैन करीत होते. अशा माझ्या दलित स्त्री-भगिनींना मुसलमानांच्या तावडीतून कसे सोडविता येईल हीच चिंता मला ग्रासत होती. माझी ही तीव्र व्यथा जाणून ऑर्कनी व प्रा. गार्डनर यांनी या ना त्या प्रकारे मदत करण्याचे मान्य केले तर माझी ती व्यथा जाणिवेने लक्षात घेऊन, डॉ. बा. शि. मुंजे व श्री. हरिप्रसाद वर्मा आणि श्री. गं. म. ठवरे व गुरुवर्य बन्सोड यांनी हर उपायाने मुसलमानांना शह देऊन, दलित स्त्रियांना त्यांच्या पकडीतून–त्यांच्या तावडीतून मुक्त करण्याचा चंग बांधला. कधी मला तर कधी श्री. वर्मा यांना विविध वेषही धारण करावे लागत होते व काही बिकट प्रसंगी तर स्त्रीवेषही धारण करावा लागत असे. हा ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी आम्हाला कोणत्या दिव्यातून कसे जावे लागले याचा प्रखर इतिहास वेगळाच आहे ! या व अशाच घटनांच्या आधारा-वर १६ डिसेंबर १९४६ च्या ‘ इन्कलाब ’ या साप्ताहिकात ‘ दलितांची दुःखे ’ हा माझा लेख प्रसिद्ध झाला आहे.

* *

१९३४ साली माझे नॉर्मल स्कूलचे प्रशिक्षण संपल्यावर, त्या वेळच्या सिव्हिल म्युनिसिपालटीचे अध्यक्ष अॅड. श्री. सी. बी. पारेख यांच्या कृपेने दलित मजुरांच्या फार मोठी वस्ती असलेल्या इंदोरा येथील कम्पलसरी प्राथमिक शाळेत शिक्षकाची नोकरी मिळाली. २५ रु. मासिक वेतन काय ते होते. नागपूर नगरीतील ही एकुलती एक काय ती कम्पलसरी शाळा. मला माझ्या अत्यंत गरीब अशा श्रमिकांच्या लहान बाल–बालिकांच्या शिक्षणाची सेवा करण्याची नामी संधी प्राप्त झाली, याचा मला मोठा आनंद झाला. इंदोरा, मॉडेल टाऊन, बेझन–बाग, लष्करी बाग, पाचपावली या श्रमिकांच्या विभागातील वस्तीत फिरून दलित बाल–बालिकांनी शिक्षण घेतलेच पाहिजे, त्याशिवाय आर्थिक, सामाजिक, सांस्कृ-तिक व शैक्षणिक उन्नती घडणार नाही, याची जाणीव मला करून देता आली. या बाबतीत माझे चुलत बन्धू श्री. लक्ष्मणराव शेंडे आणि श्री. राघवेन्द्रराव बोरकर, श्री. मारोतराव गजभिये, श्री. दामोदरराव खापर्डे, श्री. रामाजी डोंगरेप्रभृती दलित कार्यकर्त्यांनी मला चांगली साथ दिली. त्या काळी त्या संपूर्ण दलित टापूत एक नवचैतन्यच निर्माण झाले. दलितोन्नतीची त्या वेळची शिक्षण–प्रचाराची

मोहीम, नंतर मोठी फलदायीच ठरली. इंदोरा येथील कम्पलसरी प्राथमिक शाळेत मी अल्प काळच शिक्षक म्हणून राहिलो. ज्या दलित विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा घेण्याची मजवर जबाबदारी राही, त्यांपैकी एकाही विद्यार्थ्याला मी नापास करीत नसे. कुणाला नापास करून, त्याला निराश करण्याचे माझ्या जीवावर येई. म्हणून नाममात्र परीक्षा घेण्याचे नाटक करून, मी शंभर टक्के निकाल जाहीर करी. पण तसे केल्यावर जे विद्यार्थी मला कच्चे वाटायचे त्यांची एक वेगळी जंत्री करून, त्यांचा स्वतंत्र वर्ग मात्र घेऊन त्या विद्यार्थ्यांना हुशार विद्यार्थ्यांच्या रांगेत बसता येईल, अशी दखलही मी घेई. दलित मजुरांच्या वस्तीत फिरत असताना; त्यांच्या अवस्थेचा, त्यांच्या राहणी व जीवनमानाचा आणि त्यांच्या प्रकृती व प्रवृत्तिधर्माचा माझा एक विशेष अभ्यास झाला, एक नवी दृष्टी मला त्या अभ्यासातून लाभली. आणि मग एके दिवशी एका आध्यात्मिक लहरीतच मी माझ्या अध्यापकपदाचा तडकाफडकी राजीनामा देऊन मुक्त झालो !

१९३५ साली मी पुन्हा पुण्या – मुंबईकडे पळून गेलो. आळंदी, देहू, संगमेश्वर, तुळजापूर, आंबेजोगाई, नाशिक, महाबळेश्वर आदी स्थळी भ्रमण करून, परत मुंबईला येऊन अनवाणे भटकू लागलो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कीर्ती कानी सारखी दुमदुमत होती. कोणत्याही परिस्थितीत त्या महापुरुषाचे दर्शन घेण्याचे मनाने ठरविले. दादरमधील त्यांच्या राजगृहाकडे माझी पावले अनाहूतपणेच वळली. बाबांचे जे दर्शन घडले ते काही औरच ! काषाय वस्त्रे परिधान केली आहेत. गुळगुळीत असलेला विशाल माथा तेजाने लकाकत आहे. पायी खडावा आहेत व एका हाती कमण्डलू व दुसऱ्या हाती काठी आहे. अशी ती धीरगंभीर, असामान्य व्यक्तिमत्त्वाने लकाकणारी भव्य मूर्ती ! त्यांच्या पुढ्यात भगवान बुद्धाचा संकेतदायी अर्ध पुतळा, प्रगाढ विद्वत्तेने व बुद्धिमत्तेने मंडित झालेला तो अद्वितीय पुरुष. लोककल्याणकारी आध्यात्मिक पिंडाची ती एक पावन देवताच ! त्या दिव्य दर्शनाने माझा माथा विनम्र झाला. बाबासाहेबांशी झालेली ती माझी पहिली ओझरती भेट. त्या दर्शनाने मला एक वेगळीच प्रेरणा मिळाली मुंबईत पाय नेतील तिकडे मी भटकू लागलो. दूर, दूर कुठे तरी गिरिकंदरात निघून जावे आणि कुठल्या तरी अज्ञात स्थळी ध्यानस्थ होऊन राहावे अशी प्रबळ इच्छा झाली. जवळ एक पैसा नाही आणि या परक्या ठिकाणी कोणी ओळखीचा नाही. काय करावे, या विचारात मन गरगरू लागले. त्या विमनस्क स्थितीतच शिवाजीपार्कच्या एका बाकावर मी मटकन् बसलो. शेजारी कुणी स्त्री बसली आहे याचे भानही मला उरले नव्हते. मी बाकावर बसलो आणि ती तरुण स्त्री उठून चालू लागली. त्या घाईत ती तरुणी मूल्यवान वस्तू असलेली एक बॅग विसरली. ती थोड्या दूर अंतरावर गेली असेल नसेल तोच माझे लक्ष त्या बॅगकडे गेले. ती बॅग घेऊन मी त्या तरुणीच्या दिशेने धाव घेतली. ती पार्कजवळील आपल्या

मोटारीत बसत होती. इतक्यात मी तिथे पोचून तिची बॅग तिच्या स्वाधीन केली. ती सद्गदित झाली. तिने ममत्वाने माझी विचारपूस केली. मी कोण आणि माझी अवस्था व इच्छा काय ती मी सांगितली. तिला काय वाटले कुणास ठाऊक, तिने मला आपल्या सोबत नेले. माझी मोठी बूज राखली. आम्ही समवयस्क होतो. ती एक सुंदर गुर्जर कन्या होती. श्रीमंत होती. सुबोधिनी तिचे नाव. तिने मला आपला भाऊ मानला आणि मग, माझ्या इच्छेप्रमाणे संपूर्ण भारताचा दौरा करण्याची माझी दक्षतेने उत्तम सोय केली.

१९३६ सालच्या प्रारंभी मी प्रथम बोलापूरला गेलो. विश्वकवी रवीन्द्रनाथ ठाकूर ( टागोर ) यांची भेट घेतली. एक आठवडा त्यांच्या सहवासात राहिलो. प्रेरक व बोधक असे मोठे बुद्धिखाद्य मला लाभले. शांतिनिकेतनच्या परिसरात तर मी रमून गेलो होतो. माझी मानस बहीण सुबोधिनीही मजबरोबर होती. तिथून आम्ही दार्जिलिंगला गेलो. तेथे चहाच्या मळ्यांचा एक मोठा व्यापारी हफीज महमद होता. तो व्यापारनिमित्ताने सुबोधिनीच्या घराण्याशी संबंधित होता. त्याच्याकडे आमचा मुक्काम होता. सुबोधिनीला तातडीचे मुंबईला बोलावणे आले. माझ्या पुढील संपूर्ण प्रवासाची सोय करून ती मुंबईला निघून गेली. त्याच्या दुसऱ्या दिवशी एका सायंकाळी मी सहज फिरायला निघालो. मोठे आल्हाददायी वातावरण होते. मी अगदी नवखा असल्यामुळे वाटा माहीत नव्हत्या. सूर्य मावळला आणि मी भलत्याच धोक्याच्या वाटेला लागलो. मागाहून घोड्यावर स्वार झालेली ब्रम्ही सोनेरी टोळी आली. मला अलगद उचलण्यात आले. एका दूरच्या घोर अरण्यातील त्यांच्या एका संकेतस्थळी मला नेऊन, त्या टोळीने वेलींनी तयार केलेल्या जाळ्यात बंदिस्त केले. एका पहारेकऱ्याला तेथे ठेवून ती टोळी भर वेगाने निघून गेली. त्या घट्ट काळोखात मला काहीच दिसत नव्हते. एका उंच फांदीवरील जाळ्यात मी लटकत आहे एवढेच काय ते मला कळत होते. काही वेळाने ती सोनेरी टोळी परत आली. त्या टोळीने एका अत्यंत देखण्या युवतीला विवस्त्र अवस्थेत माझ्याच जाळ्यात कोंबून दिले आणि पुन्हा पहारेकऱ्याला काही सूचना देऊन ती टोळी निघून गेली. मणिपूरच्या एका धनाढ्याची ती एक सुशिक्षित कन्या होती. अंशुमाला तिचे नाव. माझी मराठी हिंदी भाषा तिला व तिची मणिपुरी ब्राम्ही भाषा मला कळत नव्हती. त्या एका जाळ्यात आम्ही दोघे अगदी बिलगून पडून होतो. तिला इंग्रजी मात्र येत होती. त्यामुळे तिने आपली करुण कथा सांगितली. उदईक आपण दोघेही बळी जाणार याची तीव्र जाणीव तिने मला करून दिली. आम्ही सुटकेच्या उपायाचा विचार करू लागलो. जगण्याची आम्हाला कसलीच आशा उरली नव्हती. पण सुदैवाने तिच्या कमरेला एक काटेदोरा होता व त्याला दातखोरणीचे एक छोटे पाते लटकले होते. त्या पात्याला माझा स्पर्श झाला. मी अंशुमालेला उपाय सुचविला. ती फार चतुर

व धैर्यशील होती आणि घोड्यावर स्वार होण्याची कलाही तिला अवगत होती. माझ्या सूचनेप्रमाणे तिने त्या पात्याने वेलींचे जाळे शिताफीने कापून काढले. घाई-घाईने ती एक नि:श्वास टाकीत फांदीवर चढली आणि मला जाळ्यातून ओढून घेतले. आम्ही दोघे चुपचाप खाली उतरलो. दरवान अफूचे सेवन करून झाडाच्या बुंध्याशी घोरत पडला होता. ती संधी साधून, तिने त्याचाच घोडा मोकळा केला. स्वत: स्वार होऊन मलाही बसवून घेतले. आणि मग मागचा पुढचा विचार न करता, गवसेल त्या रस्त्याने व दिशेने अंशुमालेने घोडा भरधाव सोडला. नियतीने आम्हा उभयतांना त्या प्राणघातक बंदिवासातून मुक्त केले ! एक प्रकारच्या अद्भुतरम्य परीकथेप्रमाणे माझ्या जीवनात, अनेक विचित्र, अनेक विस्मयजनक घटना योगायोगाने घडत गेल्या; अनेक दुर्धर प्रसंगांतून, चक्रव्यूहातून मला जावे लागले. अशा अनेक रहस्यमय, गूढात्मक घटनांचे पण वस्तुस्थितिदर्शक अनुभूतीचे प्रतिबिम्ब माझ्या साहित्यात उमटले आहे.

आसाम, नागालँड, ब्रह्मदेश, मणिपूर, शिलाँग आणि मग हिमालयाच्या पायथ्याच्या संपूर्ण निसर्गसुंदर प्रदेशात, निसर्ग–शक्तीचा व अतीन्द्रिय शक्तीचा वेध घेत घेत, सारखे भ्रमण केले. सारनाथ, गया, प्रयाग, हरिद्वार, बद्रिकेश्वर, जमुनोत्री, कांचनगंगा, तेजपूर, कोहिमा, ब्रह्मकुंड (चिनी सरहद्द) आदी तीर्थक्षेत्री जाऊन आणि गिरिकंदरातील अनेक योगी व साधुसंत यांच्या भेटीगाठी घेऊन अध्यात्माचा, उदात्ततेचा, निसर्गाचा, चैतन्य लहरीतील प्रभावाचा आणि लोककल्याणकारी आत्मशक्तीचा कुठे काही थांग लागतो का, कुठे काही सत्त्व शक्ती गवसते का याचा प्रत्यय घेण्याचा, काही शिकण्याचा व काही संशोधनही करण्याचा प्रयत्न केला. मग गुलबर्ग, श्रीनगर, काबूल–कंदाहारपर्यंत जाऊन, परतताना अमृतसर, अबू, द्वारका आणि नंतर जगन्नाथपुरी, तिरुपल्ली, पाँदेचरी, श्रवणबेळगोळ ते रामेश्वर आदी स्थळांनाही भेट देऊन आलो. पण माझे आत्मशक्तीचे, आत्मतेजप्राप्तीचे ईप्सित काही सफल झाले नाही. अनेक तीर्थस्थानी अंधश्रद्धेचा व अनाचारी धार्मिकतेचाच अनुभव आला. अनेक ठिकाणी पैसा व कीर्तीसाठी हपापलेल्या व स्त्री–लंपटात गुरफटणाऱ्या, कुठे जटाधारी तर कुठे चटमुंडनकारी ढोंगी साधुसंतांचा व योगी म्हणवून घेणाऱ्यांचा घृणास्पद प्रत्यय आला. जवळपास सर्वत्र आपण कुणी विशेष आत्मशक्तीचे पुरुष आहोत याचे प्रदर्शन मांडणाऱ्या व अघोरी सिद्धि-साधनेने चमत्कारांचा बाजार मांडून, जनतेला फसविणाऱ्यांचाच जल्लोष व कल्लोळ आढळला. निरपेक्षतेने जनकल्याण साधणाऱ्या तेजस्वी आत्मशक्तिधारी खऱ्या आध्यात्मिक पिंडाचे मला तरी कुठे दर्शन घडले नाही. माझ्या त्या संशोधनात्मक स्वरूपाच्या आध्यात्मिक प्रवासात, धार्मिकता आणि आध्यात्मिकता या दोन भिन्न बाबी असून, धार्मिकतेत स्वकल्याणाचे आकुंचित भावदर्शन तर आध्यात्मिकतेत जनकल्याणकारी प्रज्ञाशक्तीचे दिव्य दर्शन असते, या

विशेष फरकाची मात्र मला तीव्रतेने जाणीव झाली. त्याचप्रमाणे, दलित कोणत्याही परिस्थितीत, स्वयंप्रज्ञेने तेजस्वी लेखणी आणि प्रभावी वाणी कमविणार नाही तोपर्यंत त्याला इतरांपेक्षा आपण काही कमी नाही, उलट उच्चच आहोत असा उन्नत व प्रगत जीवनाचा टप्पा गाठता येणार नाही, याचीही कल्पना आली.

भारताचा प्रवास करून परतल्यावर, दोन महत्त्वपूर्ण ग्रंथनिर्मितीवर मी माझे लक्ष केन्द्रित केले. आधुनिक स्वरूपाचे बायबल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसंबंधी एक जाडा चरित्र ग्रंथ. सुमारे १,००० पृष्ठांच्या नव्या बायबलची कशी विल्हेवाट लागली हे मी दर्शविलेच आहे. १९३७–३९ या काळातील ते दोन ग्रंथ ठिकठिकाणी फिरून बाबासाहेबांसंबंधीची माहिती मी गोळा केली. त्या वेळच्या सिव्हिल म्युनिसिपालिटीचे शिक्षणाधिकारी श्री. सीताराम विठ्ठल डहाट यांनी बाबासाहेबांसंबंधीची बरीच जुनी वृत्तपत्रे मला दिली. मिस ऑर्कनीने तिन्ही राऊंड टेबल कॉन्फरन्सेसची माहिती उपलब्ध करून दिली. त्या वेळी विद्यार्थीदशेत असताना माजी मंत्री श्री. बाळासाहेब तिरपुडे हे माझ्याकडे शिक्षणाला होते. त्यांचे चांगले सहकार्य लाभले. ग्रंथनिर्मितीला जीवाचा आटापिटा करून प्रारंभ केला. पण केवळ वृत्तपत्रांवर व दिल्या गेलेल्या माहितीवर चरित्रग्रंथ ठाशीव व विश्वासार्ह ठरेल असे मला वाटले नाही. बाबासाहेबांची प्रत्यक्ष भेट घ्यावी आणि सर्वस्पर्शी विश्वसनीय माहिती प्राप्त करावी, असे ठरवून मी मुंबईला गेलो. बाबासाहेबांनी प्रथम माझी दाद लागू दिली नाही. परंतु मग माझी नीट पारख करून घेऊन, राजगृहात प्रवेश दिला. तब्बल सहा महिने मी तेथे शागिर्दी केली. राजगृहातील त्यांच्या सहा महिनेपर्यंतच्या सान्निध्यात, बाबासाहेबांच्या आध्यात्मिक, साहित्यिक व सांस्कृतिक अस्सल पिंडाचे तेजस्वी दर्शन मला घडले. त्यांच्या प्रगाढ विद्वत्तेचे व बुद्धिमत्तेचे आणि सामाजिक व राजकीय चळवळीतील विविध दीप्तिमान पैलूंचे सम्यक् ज्ञान मला झाले. तेथून एक वेगळी प्रेरणा, एक वेगळी दृष्टी घेऊन मी परत आलो; आणि मग बायबलप्रमाणेच हजार पृष्ठांहूनही मोठा ग्रंथ होईल एवढी चरित्रग्रंथाची निर्मिती केली. पण माझ्या दुर्दैवाने, याही महत्त्वपूर्ण ग्रंथाबाबत मोठे अवलक्षण घडले. मी काँग्रेसचा असून, बाबासाहेबांचा विरोधक आहे अशा गैरसमजुतीने, काही गुंडांनी दारूच्या नशेत एका मध्यरात्री माझ्या घरी प्रत्येक केला आणि चरित्रग्रंथाला लाथेने तुडविले; इतकेच नव्हे तर माझा घातही करण्याचा प्रयत्न केला ! माझ्या देहावर होणाऱ्या प्रहाराचे मला दु:ख नाही पण अत्यंत कष्ट घेऊन निर्माण केला गेलेला चरित्रग्रंथ पायाखाली तुडविला गेल्याचे तीव्र दु:ख मला झाले ! त्या घटनेचे वर्णन मला करता येत नाही. अर्थात त्या दु:खावेगातच बायबलप्रमाणेच काळिजाचा तुकडा असलेल्या त्या चरित्रग्रंथाची नको ती विल्हेवाट मी लावली ! माझ्या जीवनात या दोन्ही ग्रंथनिर्मितीच्या

अंतिम घटनेची जेव्हा स्मृती उभी राहते तेव्हा हृदयाला तीव्र वेदना होतात आणि माझा मीच अपराधी ठरतो. बाबासाहेबांना ही घटना जेव्हा मी निवेदिली तेव्हा ते गंभीरतेने उद्गारले, ‘ अरे, तू कशाला इतका दुःखी होतोस ! आपल्या लोकांना ज्या दिवशी लेखणीचे महत्त्व कळेल, तो दिवस मोठा भाग्याचा ठरेल ! ’

मी माझ्या जीवनात साहित्ययज्ञच करीत आलो. लहानपणापासून जे जे विविध प्रकारचे साहित्य निर्माण केले त्यापैकी बहुतांशी मी कधी जलदेवतेला तर कधी अग्निदेवतेला अत्यादरे सर्मपित करीत आलो आहे. गेल्या ५० वर्षांत, सामान्यतः २० कादंबऱ्या, ८ नाटके, ६५ लघुकथा, १५० कविता, १ धर्मग्रंथ, १ चरित्रग्रंथ आणि अनेक वैचारिक लेख हुताशनीला अर्पण केले आहेत. होळी हा माझा मोठा आवडता सण. वर्षभरात जे मी लिही व जे अप्रकाशित राही ते मी न चुकता, फाल्गुन पौर्णिमेला अगदी मध्यरात्री हुताशनीला विधिपूर्वक सादर करी. इतकेच नव्हे तर, १५ मार्च १९७६ रोजी झालेल्या होळीला—त्या फाल्गुन पौर्णिमेच्या हुताशनीला जे जें माझ्या संग्रही माझे लिखाण संचित होते, ते सर्वच्या सर्व प्रसन्नतेने अर्पण केले ! मला त्याचे कसलेही दुःख नाही. महाराष्ट्रातील अनेक विचारवंतांनी, माझ्या या अखंड साहित्य—यज्ञासंबंधी हळहळही व्यक्त केली आहे. वर्षभरातील लिखाण फाल्गुन पौर्णिमेला हुताशनीच्या जळजळत्या पदरी टाकायचे; मग पुढील वर्षाकरिता कोणत्या प्रकारच्या साहित्याची निर्मिती करायची याचा आत्मलक्षी होऊन विचार करायचा आणि त्या पंधरा दिवसानंतर येणाऱ्या वर्ष प्रतिपदेपासून चैत्राच्या चेतोहारी नवपल्लवीबरोबर म्हणजे गुढीपाडव्यापासून नवचैतन्य अंगी संचारायचे. परत नव्या उत्साहाने, नव्या दमाने व जोमाने साहित्यनिर्मितीची वाटचाल करायची, असे माझे धोरण अमलात आले आहे.

अध्यात्मसाधना, साहित्यसाधना आणि समाजसाधना ही माझ्या रखरखीत जीवनातील तीन प्रमुख अंगे. अगदी बालपणापासून ती तिन्ही अंगे, दारिद्र्यावस्थेत होरपळत असताही, आविष्कृत करण्याचा मी अत्यल्प प्रयत्न केला आहे. आध्यात्मिक बैठकीवरून, निसर्गातील सत्त्वपूर्ण चैतन्यलहरीचा वेध घेण्याच्या प्रयत्नाव्यतिरिक्त, लहानपणीच संतसाहित्याचा व लोकसाहित्याचा मला मोठा छंद होता. त्या दोन्ही प्रकारच्या साहित्याचा सखोल अभ्यास, चिंतन आणि संशोधन जिथे जिथे मी भटकत असे तिथे तिथे करून त्या वाङमयासंबंधीचे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा मी प्रयत्न करी. त्या दोन्ही साहित्यासंबंधीचे माझे अनेक लेख प्रसिद्धही झाले आहेत. संत ज्ञानेश्वर, संत चोखोबा, संत एकनाथ, संत तुकाराम व संत रामदास यांवर तर मी विशेष लेख लिहिले असून, १९५०–५१ च्या ‘ सुषमा ’ मासिकात ते प्रसिद्ध झाले आहेत. पूर्व मध्यप्रदेश शासनाने तत्संबंधीच्या माझ्या काही पुस्तिकाही प्रसिद्ध केल्या आहेत. लोकसाहित्याच्या अभ्यासावर व संशोधनावर मी विशेष भर दिला होता. अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या पण भारताचे

खरे वारसदार, हक्कदार असलेल्या लोकांच्या जीवनाचे, रीतिभातीचे, संस्कृतीचे व सेवाधर्माचे जेवढे हृदयंगम तेवढेच हृदयस्पर्शी प्रतिबिम्ब अगदी स्वच्छपणे लोकसाहित्यात उमटले आहे. अलिखित पण अक्षरवाङमयात मोडणारे दलितांचे ते, लोकसाहित्य म्हणजे त्यांच्या आध्यात्मिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा एक तेजस्वी व प्रखर इतिहासच होय. आणि म्हणून, त्या साहित्याच्या शोधार्थ, संकलनार्थ व संशोधनार्थ जेवढे कसून प्रयास मला घेता आले, जेवढा मारा मला सहन करता आला, जेवढे हाल मला भोगावे लागले ते सारे मी केले. त्यावरील विविध प्रकारचे अनेक लेख १९४४ ते १९५४ च्या काळात 'तरुण भारत,' 'पूजा,' 'सुषमा,' शासकीय 'प्रकाश' आदी नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले. 'लोक साहित्यसंपदा' या नावाचा ३५० पृष्ठांचा एक ग्रंथ मी निर्माण केला. त्या ग्रंथाला पूर्व मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेने सर्वोत्कृष्ट म्हणून एक हजाराचा पुरस्कार देऊन गौरविले. १९६४ साली विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होताना, तो ग्रंथ मी विदर्भ साहित्य संघाला भेट म्हणून दिला व तो त्याच वर्षी विदर्भ साहित्य संघाने प्रकाशितही केला. पूर्व मध्यप्रदेश शासनाने माझ्या साहित्यसेवेचा जसा गौरव केला तसाच, १९५९ व १९६० साली मुंबई द्विभाषिक राज्यशासनाने व १९६१ साली महाराष्ट्र राज्य शासनाने माझ्या साहित्यिक व सांस्कृतिक कार्यांच्या सेवेबद्दल त्या प्रत्येक वर्षी २,५०० रु. चा श्रेष्ठ पुरस्कार देऊन मला सम्मानित केले.

स्मशानभूमी, उद्यान, तळे किंवा नदीचे पात्र आणि वाचनालय ही माझी आवडीची स्थळे. जिथे कुठे मी जात असे तिथे आधी या स्थळांचा शोध घेत असे. रात्र रात्र मी तिथे घालवीत असे. नदीच्या पात्रातील एखाद्या दगडावर किंवा तळ्याच्या एखाद्या दगडावर किंवा तळ्याच्या काठावर अथवा स्मशानभूमीच्या एखाद्या ढिगाऱ्यावर उभे राहून व मनाशी एखादा विषय कल्पून, स्वगतच भाषण देत असे. माझे श्रोते म्हणजे माती, दगड, आजूबाजूचे डोंगर, वृक्ष, आकाश, तारे असायचे. हातवारे करून स्वच्छंदतेने भाष्य करायचा. माझ्याजवळील एका पोतडीत कागदांची पुंगळी, दौत, होल्डर सदैव असायचे. स्वतःच भाष्य करून जशी मी वाणी कमवीत होतो तसेच कोणत्याही विषयावर लिहीत जाऊन लेखणीही कमवीत होतो. वयाच्या चवदाव्या वर्षी कवित्वाने माझ्या साहित्यांगाला खरा प्रारंभ झाला. एकदा गावोगावी भटकत असताना, एका देवालयाजवळ गेलो. कोणता तरी सण होता. देवालयात स्त्रियांची गर्दी होती. मी देवळाच्या पहिल्याच पायरीजवळ थबकलो. नटून थटून आलेल्या स्त्रिया व अनेकांची देवाजवळ विविध प्रकारची मागणी. देवळातील देवाजवळ स्वार्थी सौदा चालला होता. भेदाभेदभावही पाळला जात होता. एक दलित, अत्यंत गरीब स्त्री तिथे आली. तिने पायरी ओलांडण्याचा प्रयत्न केला आणि मग जो अत्यंत हृदयद्रावक प्रकार घडला तो पाहून माझे मन

विव्हळले. अपमानितच नव्हे तर जबर घायाळ होऊन, त्याच पायरीवर कायमची प्रभुचरणी लीन झालेली ती स्त्री पाहून, मनात अनेक भावऊर्मी उफाळून आल्या आणि त्याच पायरीवर स्फुंदत बसून, १३ एप्रिल १९३० रोजी संध्यासमयी, समाजातील विषमता दर्शविणारी आणि न्याय व समतेचा पुरस्कार करणारी, दिंडी वृत्ताची 'पूजा 'ही कविता मी जन्माला घातली; ती पुढे १४ एप्रिल १९४९ च्या 'सिद्धार्थ' विशेषांकात प्रसिद्ध झाली. ज्या वेळी मी गरिबीचे व घोर अन्यायाचे चित्र पाहू लागलो तेव्हा, १७ जानेवारी १९३१ ला 'माझा वाटा ?' ही कविता निर्माण करून, समाजाला न्याय्य हक्काची मागणी करू लागलो. स्त्रियांची अव-हेलना करून संस्कृतीला झळ पोचू लागली तेव्हा २ मे १९४२ रोजी 'पेटला पदर!'; २० नोव्हेंबर १९४८ रोजी 'अपहृत भगिनीस–'; ५ मार्च १९३६ रोजी 'हे रुदन कोणाचे ?' अशा प्रकारच्या कविता निर्माण झाल्या. ज्या वेळी दाहक परिस्थितीने जीवनात माझा कोंडमारा होऊ लागला तेव्हा माझ्या दलित बांधवांची अशीच दाहक चटके सहन करणारी अवस्था आहे हे लक्षात घेऊन, ६ एप्रिल १९४१ रोजी 'दैवा उगाच छळसि मला' ही कविता काय किंवा उच्च-वर्णीय म्हणवणारे जेव्हा युक्तिवाद व बुद्धिवाद घालून आपल्या पांडित्याचे प्रदर्शन करू लागले तेव्हा ११ सप्टेंबर १९४८ रोजी 'रक्त शब्द दुधारी तलवार,' आणि २० मार्च १९४९ रोजी 'कशाला उपस्थित करता जडवाद ?' अशा कविता उग्र-तेने पुढे आल्या. त्या सर्व कविता विविध नियतकालिकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. माझे साहित्य केवळ कल्पनेच्या भरारीवर व उथळ विचारसरणीवर निर्माण झाले नाही; तर ते उपजतच आहे आणि आध्यात्मिक बैठकीवरील प्रदीर्घ तपस्येतून जन्माला आले आहे. निग्रही व्यासंग व प्रखर अनुभूतीशिवाय माझ्या साहित्याची जडणघडण झाली नाही; हृदयाला स्पर्शून जाणाऱ्या, मनाला हेलावून सोडणाऱ्या विशेष कारणाशिवाय वा प्रसंगाशिवाय माझ्या साहित्याची उत्पत्ती झाली नाही. भंडारा शहरानजीकच्या माझ्या गणेशपूर गावापासून ४ कि. मी. अंतरावर अस-लेल्या कोरंबी नामक गावालगतच्या एका छोटया सुंदर टेकडीवर दुर्गामातेचे एक छोटेसे प्राचीन मंदिर आहे. माझ्या गावाशेजारून विशाल पात्र असलेली वैनगंगा (बाणगंगा) कोरंबी मार्गे वाहत गेली आहे. १९३२ साली वैनगंगेला महापूर आला. त्या वेळी मी गावी होतो व सायंकाळी पूर पाहायला गेलो. तेथून कोरंबी येथील दुर्गामातेच्या टेकडीकडे माझे लक्ष गेले. लहानपणी त्याच टेकडीवर निसर्ग-साधनेचा पाठ मी घेतला होता. माझे लक्ष तिकडे जाताच जणू दुर्गामाता त्या टेकडीवर उभी आहे व मला अंगुलिनिर्देश करून आपल्याकडे बोलावत आहे असा भास झाला. माझा गाव काय किंवा कोरंबी गावचा टापू काय, महापुराने वेढला होता. मी जिथे उभा होतो तिथे त्या सायंकाळी नाव वल्हवीत एक नावाडी आला. कोरंबीच्या टेकडीवर मला होडीतून घेऊन जाण्याची विनंती मी केली. त्याला

तिकडेच जायचे असल्याने त्याने माझी विनंती मान्य केली. काही दूर अंतरावर गेल्यावर मध्येच निर्माण झालेल्या पाण्याच्या चक्री-भवरात नाव (होडी) गरगरा फिरू लागली. ती उलटली. आम्ही दोघेही त्या महापुरात गटांगळचा खाऊ लागलो, वाहावत जाऊ लागलो. पण पुढे नावाडी दुर्दैवाने मरण पावला. आणि त्या दुर्धर प्रसंगातून सुदैवाने मी बचावलो. ऑगस्ट १९४३ साली अगदी तसाच महापूर आला. तीच सायंकाळ, तेच दृश्य आणि योगायोगाने पूर्वीसारखाच प्रसंग. दुर्गामाता मला बोलावत आहे, हाच भास. तसाच नावाडी येतो व मला महापुरातून दुर्गा-मंदिराकडे घेऊन जातो. काळाकभिन्न अंधार पडला आहे. पाऊस धो धो पडत आहे. महापूर वाढतच आहे. पण या दुसऱ्या खेपेला मात्र नावाड्याने मला सुखरूप दुर्गामातेच्या टेकडीच्या पायथ्याशी आणून सोडले. त्या महापुराने वेढलेल्या, भयंकर अंधाऱ्या रात्री चाचपडत, ठेचाळत उंचच्या उंच एकशे एक पायऱ्या ओलांडत कसाबसा गडावर पोचलो. ओलाचिंब झालो होतो व संपूर्ण शरीर थरथरत होते. त्या वेळी हृदयात अनेक भावतरंग उसळले. मंदिरात चाचपडत असताना काही कोळसे हाती लागले. त्या कोळशाच्या तुकड्यांनीच, त्या अंधारात जे भाव व विचार माझ्या पवित्र मनाला स्पर्शून गेले ते मंदिराच्या भिंतीवर शब्दांकित केले. 'दुर्गादर्शन !' हे ते प्रदीर्घ खण्डकाव्य. त्या १९४३ च्या खण्डकाव्यात विषमतेवर, भेदभावावर, अन्यायावर, पाखंडीपणावर अस्पृश्यतेच्या पालनावर अत्यंत कडक कोरडे ओढले आहेत. आणि न्याय, समता, बंधुत्व यांचे महत्त्व दर्शवून, मानवतेचा आवर्जून पुरस्कार केला आहे. तेथे अंधश्रद्धाळू दांभिक धार्मिकतेचा धिक्कार केला आहे आणि मानवोद्धारक अध्यात्माची तुतारी फुंकली आहे. हे खण्डकाव्य नंतर, १२ ऑक्टोबर १९४८ मध्ये 'जागृती' साप्ताहिकात (पूर्व भाग); नोव्हेंबर १९४९ च्या 'युगवाणी' दिवाळी अंकात (मध्यभाग) आणि नोव्हेंबर १९४८ च्या 'पूजा' मासिकात (उत्तर भाग) प्रसिद्ध झाले आहे. आणि मग, १९ एप्रिल १९५६ रोजी, 'दुर्गादर्शन आणि काही कविता' असा माझा कवितासंग्रह, 'नाग-पूर प्रकाशन' तर्फे श्री. दि. मा. धुमाळ यांनी प्रकाशित केला आहे. या कविता-संग्रहाला नामवंत कवी कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांची मोठी सूचक प्रस्तावना (४–४–१९५६) आणि डॉ. शं. दा. पेंडसे व प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे या विद्वानांचा पुरस्कार आहे. माझ्या अनेक कविता 'नारायण गणेशपूरकर' व 'श्री शेष' या टोपण नावानेही प्रसिद्ध झाल्या आहेत

* *

काव्यनिर्मितीप्रमाणेच माझ्या कथा-कादंबऱ्यांच्या निर्मितीला अनुभूतिपूर्ण प्रसंगाची पार्श्वभूमी आहे. ३ ऑक्टोबर १९३८ साली 'शृंगारलेले प्रेत !' या शीर्षकाची पहिली कादंबरी मी निर्माण केली. कला आणि नीतीच्या मध्य कणावर

त्या कादंबरीची घडण घडविली होती. एका ध्येयवादी हृदयवंत नेत्याची ती जीवनकथा होती. अस्पृश्यतेला झुगारून, गरिबी दूर करू पाहणाऱ्या आणि दलितोद्धारार्थ प्राण पणाला लावणाऱ्या नायकाभोवती एक उत्कट सेवाभावाचे वलय मी रेखांकित केले होते. त्या १९३०–३५ च्या काळात कला आणि नीतीसंबंधीच्या संघर्षाला ऊत आला होता. ध्येयवाद आणि भोगवाद याची झुंज सुरू होती. 'कलेसाठी कला' असा टाहो प्रा ना. सी. फडके यांनी फोडला होता तर नीतीला उचलून धरून कलेला नीतीचे बंधन असले पाहिजे, ती स्वैरसंचारी नसावी याचा पुरस्कार श्री. वि. स. खांडेकर यांनी केला होता. एक भोगवादी साहित्यकार तर दुसरा ध्येयवादी साहित्यकार. १९३०-३२ साली, त्याच वादाच्या निमित्ताने श्री. वि. स. खांडेकर नागपूरला आले त्याच वेळी माझा त्यांचा प्रथम परिचय घडला होता. आणि मग लगेच प्रा. ना. सी. फडके हेही नागपूरला आले होते. त्यांच्याशीही माझी ओळख झाली. या ना त्या कारणाने पुढे या दोन्ही विख्यात साहित्यिकांशी घनिष्ठ संबंध आला. त्या वेळी कला आणि नीतीसंबंधी जी चर्चा मी करी व जे अनुभव मला येत, त्याचा आविष्कार 'शृंगारलेले प्रेत' या कादंबरीत मी केला. कथानकाच्या विस्तारामुळे त्या कादंबरीचे दोन भाग मी पाडले होते. पण पुढे माझी होळी आली. ती कादंबरी मी हुताशनीला अर्पण केली ! त्याच वेळी अस्पृश्यांवर होणाऱ्या घोर जुलुमांचे, त्यांच्या अनन्वित छळांचे व होणाऱ्या बेगुमान अन्यायांचे एक भेसूर चित्र माझ्या नजरेपुढे तरळू लागले. अस्पृश्यांसाठी अत्यंत दाहक परिस्थितीची काजळी रात्र निर्माण झाली आहे या तीव्र जाणिवेने मी फार अस्वस्थ झालो. माझ्यापुढे दोन जिवंत स्त्री–पात्रे उभी राहिली. कोकणातील एम्. बी. बी. एस्. झालेली चित्रा सरंजामे. तिच्यावर ओढवलेल्या दुर्धर प्रसंगातून मी तिला संकटमुक्त केले होते. ती अध्यात्मवादी होती व माझ्या आध्यात्मिक बैठकीशी संबंधितही होती. अस्पृश्यता नष्ट व्हावी व ब्राह्मण आणि महार एक व्हावेत, असे तिला मनापासून वाटत होते. दुसरी बहुजन समाजातील सरू पाटील ही होती. तिच्या अब्रूवर घाला आला असताना एक आँग्ल विदुषी मिस् आर्कनीच्या साहाय्याने मी तिचे रक्षण केले होते. एक कल्पना मला स्पर्शून गेली आणि ब्राह्मण, ब्राह्मणेतर व दलित एका व्यासपीठावर कसे येतील आणि समाजजीवनात भावनात्मक एकता कशी निर्माण होईल या विचाराने प्रेरित होऊन, 'काजळी रात्र !' ही कादंबरी मी निर्माण केली. या कादंबरीच्या निर्मितीसाठी आंभोरा हे तीर्थक्षेत्र मी निवडले. पाच नद्यांच्या मनोहारी संगमाजवळ, आंभोरा तीर्थस्थानी असलेल्या मराठीचे आद्यकवी मुकुंदराज यांच्या सभामंडपी १३ दिवसांचे कडक उपोषण करून, १३ रात्रींची १३ प्रकरणे मी लिहिली. प्रातःकाळी संध्यादी विधी आटोपून दिवसभर विश्रांती घ्यायची आणि सूर्यास्त होताच प्रकरण लिहायला घेऊन सूर्योदय होईपर्यंत प्रकरण पूर्ण करायचे.

ही कादंबरी नंतर १९५०–५१ साली नागपूरहून प्रसिद्ध होणाऱ्या श्री. कुंडलराय मोहेकर यांच्या 'सुषमा' मासिकात क्रमशः प्रसिद्ध झाली. आणि सोलापूरच्या 'सुरस ग्रंथ माले' तर्फे श्री. हिरालालजी व्होरा यांनी ती कादंबरी पुस्तकरूपाने १३ मे १९५६ रोजी, अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर प्रकाशित केली. या कादंबरीला ख्यातनाम साहित्यिक श्री. वि. स. खांडेकर यांची मोठी बोधक व प्रेरक प्रस्तावना लाभली आहे. ही कादंबरी प्रसिद्ध होताच पहिली प्रत मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रत्यक्ष भेट म्हणून दिली तेव्हा ती वाचून ते गहिवरून उद्गारले, 'एका उदात्त हेतूने निर्माण झालेली तुझी कादंबरी स्पृहणीय आहे. मला मोठा आनंद वाटतो. विशेषतः मी बौद्धधर्मचक्रप्रवर्तन करण्यापूर्वीच, वादळी वातावरणात नायक–नायिकेच्या ओंजळीत भगवान बुद्धाची पवित्र मूर्ती देऊन, तू जो मानवतेचा संकेत दर्शविलास, हे वाचून तर मला अभिमान वाटला. ते मंगल पान आपल्या इतिहासात खचितच तळपेल !

* *

दलितोद्धाराच्या संदर्भात मी वाङमय निर्माण करीत असताना १९३४–३५ साली माझे लक्ष डोंगरा–पहाडांच्या गिरिकंदराच्या वन्य विभागातील पूर्णतः उपेक्षित व अविकसित आदिवासी लोकांच्या ज्वलंत जीवनाकडे केन्द्रित झाले. लोकसाहित्याच्या संशोधनासाठी भटकत भटकत मी छत्तीसगढ विभागातील बालाघाट, गढमंडला, बस्तरचे पठार व अन्य टापूतही प्रवेश केला. भिल्ल, कोरकू, बैरागी व माडिया या आदिवासी लोकांशी संपर्क साधण्याचा कसोशीचा प्रयत्न केला. चन्द्रपूर जिल्ह्यातील सिरोंचा विभागातील माडिया व बालाघाट जिल्ह्यातील बैह्यर तालुक्यातील बैगा जमातींचा परामर्श घेऊन व हाल सहन करून मी जेव्हा बस्तरच्या पठारावरील भिल्ल व कोरकू या जमातीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला तेव्हा प्राणावर बेतेल असा बिकट प्रसंग माझ्यावर गुदरला. मला भिल्लांनी पकडले व बळी देण्याचेही त्यांच्या रिवाजानुसार ठरविले. तिकडे त्या काळी नरबळी देण्याची अत्यंत घातुक प्रथा होती व त्याबाबतीत मी पूर्णतः अनभिज्ञ होतो. पण, ऐन प्रसंगी दैवाने दिलेल्या एका कौलामुळे मी मुक्त झालो. या तप्त अनुभवातूनच 'डोंगरमाथ्यावरील दिवा' ही कथा निर्माण झाली आणि त्या सूत्रातूनच नंतर आदिवासी लोकांच्या जीवन–संस्कृतीच्या आणि प्राणघातक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर 'तांबडा दगड !' ही कादंबरी मी निर्माण केली. स्वातंत्र्यापूर्वी व व स्वातंत्र्यानंतर असा एक धागा त्या कथासूत्रात जोडण्याचा प्रयत्न केला. १९५७ साली, महाराष्ट्राच्या दिवाळी अंकासाठी मी कथा लिहावी अशी सूचना महाराष्ट्राचे संपादक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी केली. पण मजकडून कथा प्राप्त न झाल्याने त्यांनी स्वतः सायंकाळी विदर्भ साहित्य संघात माझी भेट

घेतली. मी कथा तर नाही पण एक कादंबरी मात्र लिहून देऊ शकतो असे म्हटल्यावर, ते क्षणभर स्तब्ध झाले व मग म्हणाले, 'दिवाळी अंक प्रसिद्ध व्हायला केवळ ४८ तास उरले आहेत. तुम्ही कादंबरी लिहिणार केव्हा आणि... ' ते पुन्हा स्तब्ध झाले. मी म्हणालो, 'तुम्ही चिंता करू नका. केवळ बारा तासांचा अवधी मला द्या.' ते म्हणाले, 'कसे शक्य आहे?' मी म्हणालो अशक्य ते काय आहे? अशक्य तेही मी शक्य करून दाखवीन. आपली तयारी काय आहे ती पाहा.' तिला एका पैजेचे स्वरूप आले. श्री. ढवळे निघून गेले. वि. सा. संघाच्या अध्यक्षांच्या दालनात रात्री ९ वाजता मी बैठक मारली. दरवान श्री. गुणवंता याला चहाचा एक कप संपला की लगेच दुसरा ठेवीत जा अशी कडक सूचना देऊन मी माझ्या सवयीनुसार दारे खिडक्या बंद केल्या आणि हाती लेखणी धरली. माझे एक टाकी लिखाण असते व त्यात रतिमात्र खाडखोड मला रुचत नसते. एकदा लिहले ते लिहिले. एखादा स्वल्पविरामही मी कुणाला बदलवू देत नाही. आणि तसे कोणी केले तर संतप्त होऊन मी ते तेव्हाच भस्म करून टाकतो! रात्री ९ वा. १० मि. नी जी लेखणी मी धरली ती रात्रीच्या तिसऱ्या प्रहरी, ३ वा. २० मि. नी एक कप चहाचे—अमृताचे—घोट घेऊन, खाली ठेवली. सुमारे २०० पृष्ठांची दारुण व करुण चित्र असलेली 'तांबडा दगड!' ही कादंबरी मी लिहिली; आणि अवघ्या सहा तासांत पूर्ण केलेल्या त्या कादंबरीचे हस्तलिखित तेव्हाच्या तेव्हा श्री. ढवळे यांना नेऊन देण्यास गुणवंताला रवाना केले. संपादक श्री. ढवळे चकितच झाले! ती संपूर्ण कादंबरी १९५७ च्या महाराष्ट्राच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. आणि मग लगेच नागपूर प्रकाशनाचे श्री. धुमाळ यांनी ती अविलंब पुस्तकरूपानेही प्रकाशित केली. श्री. मामासाहेब वरेरकरांची या कादंबरीला मार्मिक प्रस्तावना (१९–१०–१९५८) आहे. विदर्भ साहित्य संघात, प्रा. ना. सी. फडके यांच्या हस्ते कादंबरीचे प्रकाशन झाले आहे.

* *

१९३८ सालापासून डॉ. आंबेडकर यांच्याशी आलेला निकटचा संबंध नंतर वृद्धिंगतच होत गेला. जेव्हा केव्हा योग येई तेव्हा मी त्यांना भेटत असे. कधी कधी श्री. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर तर कधी विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी हे मजबरोबर असत. मी मुंबईला गेलो की त्यांना हटकून भेटायचा आणि बाबासाहेब नागपूरकडे आले की मला भेटायला पाचारण करायचे. आमच्या भेटीत राजकारण हा विषय नसायचा, तर 'अध्यात्म, साहित्य आणि संस्कृती' हाच विशेष विषय असायचा. बाबासाहेब त्या विषयावर तासन्तास विद्वत्ताप्रचुर अस्खलित भाष्य करायचे. त्यामुळे माझ्या ज्ञानाला अधिक उजाळा

मिळे. माझ्या आध्यात्मिक व साहित्यिक विचारांना अधिक प्रेरणा लाभे. माझे ते भाग्य होते. अशाच एका चर्चेच्या वेळी ते मला म्हणाले, ' अध्यात्म, साहित्य आणि संस्कृती ' या विषयावर तू एक प्रवंध लिहावास, ' अशी माझी इच्छा आहे.' मी लगेच होकार दिला. असा प्रबंध लिहिणार असल्यासंबंधीची कल्पना चित्रा सरंजामेप्रमाणेच नंतर माझ्या आध्यात्मिक बैठकीत आत्मीयतेने संबंधित असलेल्या सुविद्य व सत्त्वशील अशा सुलभा थत्ते या माझ्या मानसकन्येला दिली होती. तिने वारंवार तो प्रबंध लिहिण्याची मला जाणीव करून दिली. परंतु या ना त्या कारणाने तो प्रश्न लांबणीवर पडला. शेवटी, तशा वैचारिक प्रबंधाचा प्रचार व प्रसार व्यापकतेने होणार नाही असा मुद्दा मी उपस्थित करताच, सुलभाने मी एक कादंबरी लिहावी व बाबासाहेबांनी सुचविलेल्या विषयाचा आविष्कार त्या कादंबरीत घडवावा यावर विशेष भर दिला, कादंबरीचे नाव ' विलासिनी ' ठेवावे हेही तिनेच सुचविले, ते मी मान्य केले. आणि मग १९६४ साली, आजचे स्त्री–जीवन व सत्त्व आणि अध्यात्म व संस्कृती यांचा सद्भावपूर्ण आविष्कार घडवून पर्यायाने भोगवाद, ध्येयवाद, साम्यवाद, समाजवाद; अज्ञेयवाद; अध्यात्म व विज्ञानवाद; आणि तसेच प्रेम आणि सौंदर्य; जीवन आणि मृत्यू; मधुराभक्ती आणि प्रेरणाशक्ती; अध्यात्मशक्ती, अतीन्द्रियशक्ती; योगसाधना आणि निसर्गसाधना आदी जीवनातील विविध पैलूंचे सम्यक दर्शन घडविणारी आणि प्रकृतिबंधच नव्हे तर आशयबन्धाच्या शिखरापलीकडीलही अन्तर्मनाच्या उंचीवर अधिष्ठित असणारी ' विलासिनी ' कादंबरी निर्माण केली. एका आध्यात्मिक बैठकीवरून, मानसशास्त्र व समाजशास्त्र यांचा सबळ आधार घेऊन, जीवनमूल्यांचा आविष्कार करताना एका बाजूला भोगवादी उत्तान शृंगार तर दुसऱ्या बाजूला ध्येयवादी अध्यात्म व संस्कृती अशा दोन प्रभावी जीवनचित्रांचा अध्यात्मदर्श समन्वय घडविण्याचा मी प्रयत्न केला; अव्यक्त रूपाने का होईना मानवतावादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान आणि भगवान बुद्धाचे जीवनसिद्धान्त आविष्कृतही करण्याचा यत्न केला आहे. माझ्या ६० वर्षांच्या प्रखर जीवनातील अनुभूतीचा संपूर्ण सार त्या कादंबरीत सामावला आहे. ' विलासिनी ' ही कादंबरी सुशिक्षित स्त्रियांच्या परिसरात निर्माण करण्याचा माझा मानस लक्षात घेऊन, नागपूरच्या उत्तर अंबाझरी मार्गावरील दलित वसतिगृहाचे एक सुंदर दालन, वसतिगृहाचे चालक श्री. खेमराज हिरेखण व श्रीमती सुगंधा शेंडे यांनी खुले करून दिले होते आणि मला हवा असलेला भगवान बुद्धाचा सुबक अर्धपुतळा, डॉ. आंबेडकरांची सुन्दर प्रतिमा, एक भव्य बिलोरी आरसा, एक वेधक गुलदस्ता आदी साहित्यांनी दालन सुसज्ज केले होते. उच्च शिक्षण घेणाऱ्या कु. मीरा बालपांडेनी माझ्या लिखाणाच्या वेळी जसे उत्तम सहकार्य दिले तसेच, वसतिगृहाच्या प्रतिचालिका कु. सुमन व शकून जैन या दोन शालीन बहिणींनी माझ्या चहामृताच्या सेवेत कसले अंतर पडू दिले नव्हते.

काही विशेष घटना वा प्रसंग चित्रित करण्यापूर्वी मी उच्च श्रेणीत शिकणाऱ्या निवडक तरुणींची बैठक घेई, संकल्पित घटनेवर व प्रसंगावर चर्चा करी आणि त्या वेळी त्यांच्या मुद्रेवर जे कमी अधिक भावतरंग उठत ते निरखून त्यांच्या मनाचा काहीसा वेधही घेण्याचा यत्न करी; आणि भगवान बुद्धाच्या पुतळ्याला व डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन करून व जळत्या मेणबत्तीच्या पवित्र ज्योतीला साक्षीला ठेवून, निर्विकार मनाने मी लेखणी हाती घेत असे. ३५२ पृष्ठांची ती कादंबरी ४९ दिवसांत मी लिहिली. १४ जानेवारी १९७४ रोजी त्यावेळचे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू व विदर्भ साहित्य संघाचे पूर्व अध्यक्ष डॉ. वि. भि. कोलते यांच्या हस्ते वि. सा. संघाच्या गडकरी दालनात विलासिनीचे प्रकाशन झाले. त्या प्रसंगी डॉ. द. भि. कुळकर्णी व श्री. शंकरराव सुरडकर यांची कादंबरीवर विवेचनात्मक प्रभावी भाषणे झाली; तर राजाराम सीताराम दीक्षित ह्या विदर्भातील श्रेष्ठ वाचनालयातर्फे कादंबरीवर घडविण्यात आलेल्या परिसंवादात श्री. आ. रा. देशपांडे (कवि अनिल) प्रा. वसंत वऱ्हाडपांडे, प्रा. डॉ. सौ. शकुंतलाबाई खोत, श्री. ह. मा. उपाध्ये प्रभृतींनी कादंबरीची मार्मिक मीमांसा केली. नागपूरच्या ‘ विजय प्रकाशन ’चे संचालक श्री. जगदीशचन्द्र उपाध्याय व सौ. जयश्री उपाध्याय यांनी ती कादंबरी सहर्ष प्रसिद्ध केली. त्या कादंबरीमुळे आधुनिक समाजजीवनात एक मोठे वादळ उठले, पण त्यामुळे माझे ईप्सित साध्य झाल्याचे आणि ‘ विलासिनी ’ने अनेक विचारवंतांच्या घराघरात प्रवेश करून अध्यात्म, साहित्य व ‘ संस्कृती ’ची जी महत्ता दर्शविली व मानवतावादी अध्यात्माचा जो पुरस्कार केला त्याचे समाधान मात्र मला लाभले !

* *

अध्यात्मवादी ‘ विलासिनी ’ ही कादंबरी प्रकाशित होताच डॉ. वि. भि. कोलते, प्रा. डॉ. द. भि. कुळकर्णी, श्री. मु. प. भिशीकर, श्री. ह. मा. उपाध्ये प्रभृती हितचिंतकांनी अतीन्द्रिय विश्वाचा परामर्श घेणारी एखादी कादंबरी मी लिहावी असे पुनःपुन्हा सुचविले आणि तशी कादंबरी मी लिहावीच असा आग्रह ‘ विजय प्रकाशन ’च्या प्रकाशिका सौ. जयश्री व संचालक श्री. जगदीशचन्द्र उपाध्याय यांनी धरला. अनेकांची तशी सदिच्छा लक्षात घेऊन अध्यात्मशक्ती व अतीन्द्रियशक्ती यांचा प्रभाव दर्शविणारी ‘ अन्शुजा ’ नावाची १५० पृष्ठांची एक कादंबरी मी घडविली. या कामी माझ्या आध्यात्मिक बैठकीवरील दुसरी मानसकन्या सौ. संगीता चुटे हिने मोलाचे सहकार्य दिले. १९७४ सालीच बर्डीवरील कु. ताराबाई प्रधान व त्यांचे बंधू श्री. प्रतापराव प्रधान यांच्या ‘ अवधूत भवना ’तील एका प्रशस्त दालनात ती कादंबरी निर्माण झाली. कथानकाच्या काही खास भूमिकेसाठी भंडारा जिल्ह्यातील वनश्रीने नटलेल्या नवेगावबांध व नागझिरा आणि

शेषाश्रम या तीन स्थळांचा वापर मला करावा लागला. ‘ अन्शुजा ’ म्हणजे पर्यावरणात अव्यक्त रूपाने वास करणारी मनोद्रव्यरूपी एक प्रबल अतीन्द्रियशक्ती. या कादंबरीने अतीन्द्रिय विश्वासंबंधी विचार करण्याची एक नवीन दिशा दर्शविली आहे. या कादंबरीसाठी आठ पृष्ठांची एक छोटी प्रस्तावना मला लिहायची होती पण एका बैठकीत छापील ८० पृष्ठे होतील एवढी प्रस्तावना लिहिण्यात आली. ‘ विजय प्रकाशन ’चे श्री. उपाध्याय यांना मोठा पेच पडला आणि त्यांनी व त्यांची धर्मपत्नी सौ. जयश्री उपाध्याय यांनी ‘ अतीन्द्रिय विश्वातील मंत्रच्छाया ’ या नावाचे स्वतंत्रपुस्तक प्रसिद्ध केले. एक महत्त्वपूर्ण शोधप्रबंध म्हणून हे पुस्तक व ‘ अन्शुजा ’ ही कादंबरी बरीच गाजली.

* *

वस्तुस्थितिदर्शक माझ्या कादंबऱ्यांप्रमाणेच, प्रत्ययकारी घटना दर्शविणाऱ्या माझ्या अनेक लघुकथांनी जनमताची पकड घेऊन मान्यता प्राप्त केली आहे. जखमा आणि मलमपट्टी, व्यथा आणि दिलासा, छळ आणि चुचकार या समन्वयात माझ्या कथांचे चक्रसूत्र गुंफले आहे. समाजजीवनातील विविध घटना अनुभवताना आणि प्रत्यक्ष नीट न्याहाळताना, हृदयाचे जे स्पंदन झाले आणि मनाला जी जाणीव झाली, त्यांचे वास्तवदर्शी चित्रण मी माझ्या कथांत केले आहे. माझ्या किशोर वयात त्या कथांना मी जन्म दिला होता. त्यांना जलसमाधी देऊनही, ज्या अनेक कथा १९४० ते १९६० या कालखंडात निर्माण होऊन प्रसिद्ध झाल्या त्यांतील अगदी निवडक कथांचे दोन भाग मी पाडले. एक भाग ‘ सावली ’ या कथासंग्रहाचा. हा संग्रह १९५६ साली ‘ नागपूर प्रकाशन ’ तर्फे प्रकाशित झाला; तर दुसरा भाग ‘ डोंगरमाथ्यावरील दिवा ’ या कथासंग्रहाचा. हा संग्रह १९६० साली अमरावतीच्या ‘ नाग–विदर्भ ’ प्रकाशनतर्फे प्रसिद्ध झाला. ‘ सावली ’ या कथासंग्रहाला श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची प्रदीर्घ मार्मिक प्रस्तावना लाभली आहे ( २४–१–५६ ). तेथील काही व्यक्तिगत विधानांचा खरपूस समाचार डॉ. वि. भि. कोलते यांनी नागपूर आकाशवाणीवरून पुस्तक परीक्षण करताना घेतला आहे. या कथासंग्रहावर प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध, श्री. गो. रा. दोडके, श्री. बा. ग. खापर्डे, श्री. पु. य. देशपांडे व श्री. पां. ब. गाडगीळप्रभृती नामवंतांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. काही कथांचा प्रसिद्धीसह कालनिर्देश करावयाचा झाला तर सावली : वाग्विलासिनी जानेवारी १९४०; भिक्याची कर्मकहानी : पूजा सप्टेंबर १९४८; भाग्यवान, सुषमा जानेवारी १९४९; भय्या प्रहार : सिद्धार्थ, एप्रिल १९४९; उपसर्ग, समाधान आक्टोबर १९४९; कजलीचे धन : युगवाणी सप्टेंबर १९५०, हाक : जयकुमार दीपावली अंक १९५०, अमृत कृषी : समाधान विशेषांक १९५०; शेवट, युगवाणी

दिवाळी अंक १९५०; संकल्प : तरुण भारत १९५०; आणि त्या एके रात्री : भरारी, डिसेंबर १९५०; टॉस : सुषमा, वर्षा अंक, १९५१; अंगठी गळून पडली, सुषमा, दिवाळी अंक १९५१; जाणीव : सुषमा, जानेवारी १९५२; राणी : मधुवन, एप्रिल १९५२, उकल : सुषमा, मे १९५२, काका, तुमचं ठीक आहे ना ? सुषमा, ऑगस्ट १९५२ प्रकृतीची भूल : युगवाणी, ऑक्टोबर--नोव्हेंबर १९६०, देवदूताचे वरदान : युगवाणी, मे १९६०, वार्ड नं. २३, बेड नं. २७ : युगवाणी, १९५९; अवघाची संसार : सर्वोदय, ३० मार्च १९६१; संजयची करुणा : युगवाणी, नोव्हेंबर १९६१ आणि देवा! माझा आवाद ठेव, मरी आईला केला नवस, भाव तेथे देव, प्रफुल्लदत्त : सुराज्य; सुषमा, १९६० व अर्चना सिंहगर्जना, दिवाळी अंक १९७४ असा ओझरता उल्लेख करता येईल. १९४९ ते १९५२ पर्यंतच्या कथा अध्यात्मपंडिता, श्रीमती ताराबाई बुटी यांच्या सीताबर्डीवरील वाड्यात जन्माला आल्या आहेत, तर काही बर्डीवरीलच चाफेकर दुग्धमंदिरात आणि बाकीच्या तेलंगखेडी व गोरेवाडा येथील उद्यानांत आकाराला आल्या आहेत. ' डोंगरमाथ्यावरील दिवा ', ' संकल्प ' आणि ' वार्डनंबर २३, बेड नंबर २७ या माझ्या तीनच कथा जरी नीट विचारात घेतल्या तरी मला कोणत्या वा कशा दुर्धर व चमत्कारिक प्रसंगांतून जावे लागले याची विशेष जाणीव होऊ शकेल.

* *

मला माझ्या पूर्व आयुष्यातच एकांगी लेखक राहू नये, सर्वस्पर्शी लेखक बनावे आणि साहित्याच्या विशाल क्षेत्रात, इतरांपेक्षा आपण रतिमात्र कमी नाही उलट काकणभर श्रेष्ठच आहोत, असा उच्च दर्जा सिद्ध करता यावा या जाणिवेने, माझ्या लेखणीने आणि वाणीने कथा, कादंबरी, काव्य, नाटच, चरित्र, लघुनिबंध, संत-वाङमय, लोकसाहित्य, टीकावाङमय, समीक्षणे, प्रहसने, अध्यात्म, अतीन्द्रिय विश्व आदी सर्व दालनांतून अगदी मुक्तपणे स्वैरसंचार केला आहे आणि दलित जर्जरावस्थेतही, अत्यंत दाहक व प्रतिकूल परिस्थितीतही मानाचे श्रेष्ठ स्थान प्राप्त करण्यास पूर्णत: समर्थ आहे, हे सिद्धही केले आहे. केवळ नाग–विदर्भातील विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी, न्यायमूर्ती सर डॉ. भवानीशंकर नियोगी, नरकेसरी बॅरि. मोरुभाऊ अभ्यंकर, धर्मवीर डॉ. बा. शि. मुंजे, आचार्य दादा धर्माधिकारी, न्यायमूर्ती श्री. वा. रा. पुराणिक, न्यायमूर्ती श्री. के तु. मंगळमूर्ती, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. पंजाबराव देशमुख, दे. भ. मा. ज. कानेटकर, माजी शिक्षणमंत्री श्री. बा. ग. खापर्डे व कवी अण्णासाहेब खापर्डे, श्री. वा. ना. देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, श्री. आ. रा. देशपांडे ( कवी अनिल ), प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, महामहोपाध्याय श्री. बाळशास्त्री हरदास, श्री. दादासाहेब ओगले, डॉ. वा. ना. पंडित, संशोधक

श्री. नी. ब. उपाख्य बापूसाहेब भवाळकर, श्री. नारायणराव माचवे, क्रांतिकारक डॉ. पांडुरंगपंत खानखोजे व डॉ. चोळकर, तपस्वी श्री. हरिभाऊ नेने, दे. भ. हरिभाऊ मोहनी व द. कृ. व पु. कृ. मोहनी, डॉ. मा. गो. देशमुख, पं. पाळेकर-शास्त्री ( अप्रबुद्ध ), संशोधक श्री. अळेकरशास्त्री, श्री. दि. ब. पंडित, डॉ. तु. ज. केदार, डॉ. शं. दा. पेंडसे, डॉ ना. भा. खरे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, प्रा. भ. श्री. पंडित, नि प्रा. या. मु. पाठक, श्री. अनंतराव शेवडे, प्रा. वा. कृ. चोरघडे, श्री. पु. भा. भावे, प्रा. शरच्चन्द्र मुक्तिबोध, श्री. नाना जोग, संशोधक प्रा. दा. के. ओक, कवी श्री. नाना हूड, कवी श्री ना. के. बेहरे, कवी श्री. आनंदराव टेकाडे, श्रीमती ताराबाई बुटी, डॉ. अ. ना. देशपांडे आणि श्रीमंत दादासाहेब धनवटे, श्री. बाबूराव देशमुख, श्रीमंत प्रतापसिंग भोसले, श्रीमंत दामूपंत देशमुख, श्रीमंत पु. बा. काळे व श्रीमती अनसूयाबाई काळे व श्रीमंत पूर्णचन्द्रराव बुटी, श्रीमती सुमतिदेवी धनवटे, डॉ शंकरराव कठाळे, डॉ. श्री. ल. काशीकर व श्रीमती शुभगाताई काशीकर अशा जुन्या पिढीतील अनेक नामवंत नेत्यांशी, नामवंत संशोधक व साहित्यपंडितांशी आणि हृदयवंत धनिकांशी माझ्यासारख्या छोटया दलित लेखकाशी अत्यंत जिव्हाळयाचे व निकटचेच संबंध आले नाहीत तर पुणे, मुंबई, कोकण व मराठवाडा वा पश्चिम महाराष्ट्रातील अनेक थोर नेत्यांशी, थोर संशोधक, साहित्यकार व पत्रकार यांच्याशीही आत्मीयतेचे संबंध वृद्धिगत झाले. त्या दृष्टीने: महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, साहित्य सम्राट श्री. न. चिं. केळकर, वेदमूर्ती पं. सातवळेकर, श्री. वामन मल्हार जोशी, प्रा. श्री. म. माटे, श्री. न. वि. उपाख्य काकासाहेब गाडगीळ, प्रा. ना. सी. फडके, श्री. वि. स. खांडेकर, श्री. शंकरराव शेंडे, प्राचार्य अश्वत्थामा गजेन्द्रगडकर, सरन्यायाधीश श्री. प्र. ब. गजेन्द्रगडकर, श्री. धनंजयराव गाडगीळ, प्रा. अनंत काणेकर, श्री. भा. वि. उपाख्य मामा वरेरकर, आचार्य प्र. के. अत्रे, प्रा. वि. ह. कुळकर्णी, श्री. ह. रा. महाजनी, प्रबोधनकार श्री. ठाकरे, स्वातंत्र्यवीर सावरकर, श्री. ल. ब. भोपटकर, श्री. श्रीपाद शंकर नवरे, श्री. प्रभाकर पाध्ये, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री. दि. के. बेडेकर, प्रा. रा. श्री. जोग, प्रा. श्री. के. क्षीरसागर, डॉ. कु. सरोजिनी बाबर, प्रा. भगवंतराव देशमुख, संशोधक श्री. पोहनेरकर, श्री. ना. गो. चाफेकर, श्री. ग. दि. माडगूळकर, श्री. वि. वा. शिरवाडकर ( कुसुमाग्रज ), श्री. सोपान चौधरी-प्रभृती नामवंत साहित्यिक व संशोधक यांच्याशी आणि श्री. शंकरराव मोरे; केशवराव जेधे, श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. शंकरराव देव, श्री. बाळासाहेब देसाई, डॉ. कुर्तकोटी, डॉ. त्र्यं. र. नरवणेप्रभृती श्रेष्ठ नेत्यांशीही माझे हितसंबंध निगडित झाले. त्या सर्व मान्यवरांनी माझ्या साहित्यसेवेचा व समाजसेवेचा केवळ गौरवच केला नाही तर प्रसंगी मला साथ देऊन उत्तेजनही दिले आहे. याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला पाहिजे. त्यामुळे संपूर्ण मराठी मुलुखात माझ्या लेख-

णीला व वाणीला निव्वळ वावच मिळाला नाही तर, त्या हितसंबंधामुळे त्या दाहक काळी, दलितांचे काही ज्वलंत प्रश्न सोडविण्याचेही भाग्य मला लाभले आहे.

* *

मी महार आहे हे स्पष्ट सांगूनही अनेक कर्मठ पण विद्वान ब्राह्मणांचाही मजवर विश्वास बसत नसे. इतकेच नव्हे तर, श्री. भाऊसाहेब माडखोलकर, आचार्य दादा धर्माधिकारी, श्री. ए. श्री. पटवर्धन, प्रा. श्री. म. माटे, आचार्य अत्रे, श्री हरिभाऊ नेने, श्री. मोहनीबन्धू आदी अगदी निकटचे ज्येष्ठ स्नेहीही माझ्या जातीवर विश्वास ठेवीत नसत. उच्च प्रतीच्या अनेक ब्राह्मणकुटुंबांत माझा सर्रास प्रवेश राही आणि त्यांच्या घराण्यातील पूजा-अर्चेपासून तो मरण-तोरणापर्यंत माझ्याच हस्ते विधी घडविला जाई. मी महार असलो तरी मला जातिवंत ब्राह्मण समजून माझे मानाचे स्थान राखले जात असे व आजही तीच उच्च वागणूक मला लाभत आहे. पण असे काही असले तरी, जिथे कुठे मला माझ्या दलितबांधवांप्रती कर्मठपणा आडवा येत असल्याचा, वा अस्पृश्यता पाळली जात असल्याचा अथवा विषमतेची वागणूक दिली जात असल्याचा सुगावा लागे तेव्हा मी तळतळून उठायचा आणि कठोर झुंज घेऊन, न्यायाचा व समतेचा हितसंबंधित धागा, कसूर न करता जोडण्याचा आटोकाट प्रयत्न करायचा. माझ्या अशा या कामी, अनेक सुशिक्षित व सुशील ब्राह्मण–ब्राह्मणेतर तरुण–तरुणींनी मोलाची साथ दिली आहे. माझ्या साहित्यनिर्मितीच्या कार्यात काय किंवा समाजसेवेच्या कार्यात काय अथवा आध्यात्मिक साधनेत काय, त्यांचे अभिमानास्पद सहकार्य लाभले आहे. माझ्या साहित्यात काहींचा मी गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. काही सुविद्य व देखण्या तरुणी कामाच्या निमित्ताने वेळी अवेळी मजबरोबर अगदी उघड उघड राहत हे पाहून काहींच्या पोटात दुखू लागे. ईर्षेने कधी ते बावचळतही. पण जिथे पवित्र मन साक्षीला असे तेथे दुष्टांचा माझ्यावर कसलाही प्रहार चालतच नसे, उलट त्यांना लज्जित व्हावे लागे. आजही माझ्या धर्माच्या काही ब्राह्मणकन्या आहेत, काही मानस बहिणीही आहेत. नित्याप्रमाणे गेल्या ९ ऑगस्ट १९७६ रोजी, रक्षाबंधनाच्या मंगल दिनी सौ. सुशीलाताई मोघे यांनी माझ्या मनगटी आपली सत्त्वाची राखी बांधली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ब्राह्मण-घराण्याशी असलेले माझे उत्कट नाते माहीत होते. १९५४ साली श्री. हरिभाऊ नेने हे विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष तर मी सरचिटणीस होतो. एके सकाळी मी त्यांच्याबरोबर श्री. भाऊसाहेब माडखोलकरांना भेटण्यासाठी धंतोलीत गेलो. भाऊसाहेब वाटेतच भेटले, मजकडे पाहत ते उद्‌गारले, अरे ! आज तुमच्याबरोबर कोणी ब्राह्मण गौळण नाही ! हरिभाऊंना खेद वाटला. ते म्हणाले, 'भाऊसाहेब तुमचा हा रोष बरा नाही.' त्यावर भाऊसाहेब काहीसे नरमून म्हणाले, 'अहो हरिभाऊ काही वर्तुळांत

शेंडे यांना ब्राह्मण गौळणींचा कृष्ण समजतात.' तेव्हा हरिभाऊ उत्तरले, कोणी ईर्षालू कशीही निंदा करोत ! तुमच्याबद्दलही काही ना काही बोलले जाते. शेंडे यांची सत्त्वशीलता तुम्हा-आम्हाला तर माहीत आहे ना ! अहो, भगवान कृष्णाने अनेक गौळणींच्या अब्रूचे रक्षण करून, त्यांना संकटमुक्त केले तसेच आपल्या या शेंडे यांनी आपले प्राण पणाला लावून, अनेक ब्राह्मणकन्यांचे रक्षण केले, अनेकांना संकटमुक्त केले आणि ब्राह्मण घराण्यांची इभ्रत राखली, याची जाणीव तुम्हालाही आहे. ब्राह्मणवर्ग शेंड्यांच्या त्या ऋणातून मुक्त होऊ शकणार नाही, भाऊसाहेब !' १९४८ साली, म. गांधी वधानंतर, जी भयंकर वावटळ उठली, जी भयानक जाळपोळ सुरू झाली आणि ब्राह्मणवर्गावर जी अस्मानी-सुलतानी आपत्ती कोसळली तेव्हा अनेक ब्राह्मणकुटुंबांच्या आणि विशेषत: स्त्रियांच्या रक्षणार्थ मी धाव घेतली होती. मिळेल तिथे निर्भय आसरा व दिलासा देण्याचा कसोशीचा प्रयत्न मी केला होता. प्रत्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर आपल्या कुटुंबासह त्या दुर्धर आपत्तीत सापडले होते, तेव्हा प्राण धोक्यात घालून मी त्यांच्या परामर्शास्तव धाव घेतली होती आणि त्यांना अभय व दिलासा दिला होता. त्यानंतरही त्यांच्या कुटुंबियांवर काय अथवा अनेक उच्च ब्राह्मणघराण्यांवर काय, जे अन्य भयप्रद प्रसंग गुदरले तेव्हाही, त्यांची आर्त हाक लक्षात घेऊन, माझ्या अध्यात्मशक्तीनुसार त्यांना संकटमुक्त केले होते आणि महाराची शक्ती, इमान व सेवाधर्म प्रत्ययास आणून दिला होता. ब्राह्मणवर्गातीलच नव्हे तर ब्राह्मणेतर अनेक घराण्यांच्याही कल्याणार्थ मी माझी आत्मशक्ती खर्ची घातली आहे. कोणाला शब्द दिला तर तो इमानाने पाळणे हा माझा प्रकृतिधर्म. उपकारबुद्धीने नव्हे तर कर्तव्यबुद्धीने मानवतेची काही पावले मी माझ्या दाहक जीवनात उमटविण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. १९५४ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर मुक्कामी असताना, एका चर्चेच्या प्रसंगी मी त्यांच्या पक्षात सामील होण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा, 'तो तुझा मार्ग नव्हे, कोणताही छापवादी तू असता कामा नये. ब्राह्मणांशी असलेले तुझे नाते मला माहीत आहे. तुझ्या अध्यात्मशक्तीचा प्रतापही मला कळला आहे,' असे म्हणून ते उद्‌गारले, 'तुला कोणी महार समजत नाही, ब्राह्मणच समजतात. ऐकून बरे वाटले. तू अलिप्त राहतोस. एका दृष्टीने बरे करतोस. महार आणि ब्राह्मण यांचा दुवा सांधणारा तुझ्यासारखा कुणी दमदार अन् कर्तृत्ववान पुरुष प्रसंगी मध्यस्थीसाठी हवाच. तू मोठा साहित्यकारही झाला आहेस. एखाद्या मोठ्या साहित्यसंस्थेचा अध्यक्ष बनून गड जिंकशील तर आपल्या जातीजमातीच्या दृष्टीने इतिहासाचे कधी निर्माण न झालेले एक सुवर्णपान निर्माण होईल. मला समाधान वाटेल !' पुढे मी १९५९ साली विदर्भ साहित्य संघाचा अध्यक्ष झालो. 'साहित्याचा उच्च व प्रभावी गड' मी जिंकला. पण ते सुवर्णपान पाहण्यापूर्वीच मात्र बाबासाहेबांनी महानिर्वाणपद गाठले !

❋ ❋

मराठी वाङमय खेड्यापर्यंत पोचण्याची आणि ग्रामसुधारणा घडविण्याची मला मोठी रुखरुख होती. त्यासाठी १९४४ साली मी नागपूरला सर्वस्पर्शी अशी 'साहित्य चर्चा मंडळा'ची स्थापना केली. परिस्थितीचे सूक्ष्मावलोकन करून, शहर आणि खेडे यांचा दुवा सांधण्याचा व तो दुवा अस्पृश्यता निवारणाच्या कामी आणण्याचा प्रयत्न मी करू लागलो. त्यासाठी 'तरुण-भारता'च्या ८ मार्च १९४४ च्या अंकात 'मराठी वाङमय खेड्यापर्यंत कसे पोचेल ?' व ७ जून १९४५ च्या अंकात 'खेड्याची सुधारणा कशी घडविता येईल ?' असे माझे दोन वैचारिक लेख प्रसिद्ध झालेत. त्यात ग्रामसुधारणांची एक सात कलमी योजनाही विशद केली होती. त्याची दखल नंतर म. गांधीजींनी घेतल्याचे मला कळले. मोठ्या प्रमाणावर सभा–सम्मेलने घडविणे, वक्तृत्वस्पर्धा, निबंधस्पर्धा, वादविवाद, परिसंवाद, जानपद गीतगायन आदी विविध कार्यक्रम सूत्रबद्धतेने आयोजित करून, तसे विशेष कार्यक्रम नवी वस्ती, इंदोरा, गड्डीगोदाम, पाचपावली, लष्करीबाग, नवानकाशा आदी दलित श्रमिकांच्या टापूत घडविले जात आणि काही ग्रामीण विभागांतही तशी योजना अमलात आणली जाई. श्री. रा. ठ. इंगळे, श्रीमती जाईबाई चौधरी, श्री. ना. खं. तिरपुडे, श्री. स. म. मेश्राम, श्री. भाऊराव बोरकर, श्री. ना. गो. उके, सौ. ताराबाई मेश्राम एका बाजूने निष्ठेने राबत होते तर दुसऱ्या बाजूने, विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी, न्यायमूर्ती श्री. वा. रा. पुराणिक, डॉ. वि. भि. कोलते, श्री. भाऊसाहेब माडखोलकर, राजे प्रतापसिंगराव भोसले, प्रा. भ. श्री. पंडित, श्रीमती शांताबाई माडखोलकर, श्रीमती प्रा. अनसूयाबाई काळे, श्री. मा. ज. कानेटकर, श्री. हरिभाऊ मोहनी, सौ. कुसुमावती देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुखप्रभृतींची जिव्हाळ्याची साथ लाभत होती. २४ मार्च १९४५ च्या 'तरुण भारता'च्या अंकात 'साहित्य चर्चा मंडळाचे कार्य', या शीर्षकाखाली माझा एक विस्तृत पण बोलका लेखही प्रसिद्ध झाला होता. इतकेच नव्हे तर, आपली संस्कृती व समाजाची नीतिमत्ता यांचा परिपोष घडविणारा 'व्यक्तिविकास' हा महत्त्वपूर्ण लेख मी लिहिला आणि तो मे १९४५ च्या 'पुरुषार्थ' मासिकात प्रसिद्ध झाला.

* *

१९४६ साली बेळगाव येथे भरलेल्या साहित्य सम्मेलनाच्या व्यासपीठावरून श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची घोषणा केली. आणि मग ते स्वप्न साकार व्हावे म्हणून एक मोठी चळवळ निर्माण झाली. या चळवळीमुळे संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला तर त्यात अस्पृश्यांचे विशेष स्थान असावे म्हणून त्या चळवळीत मी हिरिरीने भाग घेतला. नागपूर प्रांताचा मी संघटक–प्रतिनिधी होतो. विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्राचा दौरा करून, मी माझे एक वेगळे अस्तित्व दर्शविले. त्याच वर्षी मुंबई येथे श्री. शंकरराव देव यांच्या

अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना करण्यात आली. त्या वेळी एक प्रतिनिधी म्हणून मी उपस्थित होतो. परिषदेत मंजूर करून घेण्यासाठी एक महत्त्वपूर्ण प्रस्ताव तयार करावयाचा होता. मुंबई म. सा. संघाच्या कार्यालयात एक सभा आयोजित करण्यात आली होती. प्रस्ताव तयार करण्यासाठी चार भाग पाडण्यात आले. एक खोली ब्राह्मणांसाठी, दुसरी ब्राह्मणेतरांसाठी, तिसरी अस्पृश्यांसाठी आणि चवथी वन्य जमातीसाठी. मी संतप्त झालो. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करून, त्यात एकात्मतेची, एक संस्कृती व एक भाषा यांच्या अभिवृद्धीची चाड बाळगणाऱ्या पुढाऱ्यांनी जातीय स्वरूपात पंक्तिप्रपंच जर आताच वर्गीकरणाच्या खोल्या पाडून केला तर संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाल्यावर हे महाभाग कोणते दिव्य करतील याचा नेम नाही. म्हणून, कडक निषेध दर्शवीत मी बहिर्गमन केले. मी माझ्या दौऱ्याच्या वेळी, संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नासंबंधी आणि विशेषत: विदर्भाचा प्रश्न व आर्थिक, राजकीय आणि सामाजिक बाबतीत अस्पृश्यांचा प्रश्न याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. मुकुंदराव जयकर, डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्यासारख्या श्रेष्ठ नेत्यांशी चर्चा केली होती. त्याचप्रमाणे, दलित, ब्राह्मणेतर व वन्य जमातींच्या घटकांना मराठी प्रदेशाच्या एकीकरणाकडे वळविण्याचा आणि त्यांची एकमुखी प्रबल संघटना निर्माण करण्याचाही प्रयत्न केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री. ग. आ. गवई, श्री. गं. म. ठवरे, श्री. हेमचन्द्र खांडेकरप्रभृतींच्या राजकारणाचे जे वेगवेगळे तप्त प्रवाह होते ते, संयुक्त महाराष्ट्राच्या निमित्ताने एकत्रित कसे होतील व दलितांची प्रचंड आणि प्रबळ शक्ती कशी एकवटेल याची दूरदृष्टीने दखल घेतली होती. मराठी प्रदेशाच्या एकीकरणाच्या दृष्टीने आचार्य प्र. के. अत्रे, श्री. मामा वरेरकर, श्री. न. वि. गाडगीळ, श्री. दा. वि. गोखले, श्री. ह. रा. महाजनी, श्री. आनंदराव वाघमारे, श्री. श्री. शं. नवरे, डॉ. पंजाबराव देशमुख व लोकनायक बापूजी अणे आणि ब्रिजलाल बियाणीप्रभृती संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीशी संबंध असलेल्या नेत्यांशी संपर्क साधून, त्या प्रश्नाला बळकटी आणण्याचाही प्रयत्न मी केला होता. अकोला करार व नागपूर करार याबाबतसुद्धा मी माझी वेगळी भूमिका राखली होती. पण मग माझे वर्चस्व सहन न होऊन, ऐन प्रसंगी मला कसे डावलण्यात आले याचा काळा इतिहास वेगळाच आहे. पण काही झाले असले तरी, मी माझ्या दलित बांधवांच्या प्रश्नांसंबंधी घंटानिनाद करू शकलो हे समाधानही काही कमी नाही. २९ जुलै १९४६ च्या ‘तरुणभारत’च्या अंकात ‘संयुक्त महाराष्ट्रात अस्पृश्यांचे स्थान काय ?’ हा माझा माहितीपूर्ण व विचारप्रेरक प्रदीर्घ लेख प्रसिद्ध झाला होता आणि त्या लेखाने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या नेत्यांना एक जबर धक्का दिला होता हेही तितकेच खरे आहे.

* *

१९४६ साली ' दलितांची दु:खे ' हा एक जळजळीत लेख मी लिहिला आणि तो नागपूर येथून प्रसिद्ध होणाऱ्या १६ डिसेंबर १९४६ च्या ' इन्किलाब ' या साप्ताहिकात प्रसिद्ध झाला. त्या दु:खावेगात असतानाच मी ' दलितांना उद्देशून–' ही छोटी पुस्तिका लिहिली आणि ती ' पूजा प्रकाशन 'चे चालक डॉ. ल. वा. पडोळे यांनी १९४७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित केली. जेवढे दोष स्वत:कडे घेऊन व कमालीचा कमीपणा पत्करून मी माझ्या दलितबांधवांच्या शौर्याची, त्यांच्या सेवाधर्माची आणि कर्तृत्वाची जेवढी प्रशंसा करता येईल तेवढी मी त्या पुस्तिकेत केली आणि आता दलितांनी सुविद्य व सुसंस्कृत होऊन, त्यांनी प्रखर लेखणी आणि प्रभावी वाणी कमविली पाहिजे आणि आपला ज्वलंत इतिहास निर्माण केला पाहिजे, ते पट्टीचे साहित्यकार, पट्टीचे संशोधक व पत्रकार, पट्टीचे भाष्यकार आणि अजिंक्य योद्धेही व्हावेत, असा संकेत त्या पुस्तिकेत मी आवर्जून दर्शविला आहे. बाबासाहेबांच्या त्या ५५ व्या वाढदिवसाच्या निमित्तानेच, ' युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर ' हा महत्त्वपूर्ण प्रदीर्घ लेख लिहिला. या लेखाचे विशेष महत्त्व व मोल लक्षात घेऊन ' विकास ' साप्ताहिकाने, बाबासाहेब जयंति–विशेषांक म्हणून १४ एप्रिल १९४७ रोजी प्रसिद्ध केला. या विशेषांकाने अशी वेगाची धाव घेतली की, त्याच्या पुन:पुन्हा हजारो प्रती निघून त्यांनी मराठी मुलुख अंकित केला ! डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसंबंधीच्या चरित्रग्रंथाची १९३९ साली अत्यंत शोचनीय विल्हेवाट लागली, त्याचे तीव्र दु:ख मला होते. आणि म्हणून १९४७–६१ च्या कालखंडात बाबासाहेबांच्या जीवन आणि कार्याबद्दलच्या अस्मितेचे विविध पैलू दर्शविणारे मी सहा लेख प्रसिद्ध केले. युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर या लेखाव्यतिरिक्त ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्ति आणि कार्य (आकाशवाणी, १४ एप्रिल १९६१), डॉ. आंबेडकरांचे सामाजिक तत्त्वज्ञान : (आकाशवाणी : १५ एप्रिल १९६२), डॉ. आंबेडकर : नवराष्ट्रनिर्मितीचा सिद्धार्थ : (अरुण, आंबेडकर जयंती विशेषांक : २५ एप्रिल १९४९), राष्ट्रपुरुष डॉ. आंबेडकर : राष्ट्रीयत्वात दिव्यत्व (पूजा, डिसेंबर १९४७), डॉ. आंबेडकर : साहित्यिक आणि साहित्यसाधना (वि. सा. संघातील भाषण : २ मे १९५४) आणि डॉ. आंबेडकर : अध्यात्म आणि मानवता (आकाशवाणी : ३० एप्रिल १९६१) असे ते अभ्यासपूर्ण सहा लेख होत. हे सर्वही लेख माझ्या १९६४ साली प्रकाशित झालेल्या, ' दलितांचे जग : वेदना आणि शिष्टाई ' या लेखसंग्रहात समाविष्ट झाले आहेत. तसेच अस्पृश्यांनी कमीपणाचे न्यूनगंड न राखता, आपल्या कर्तृत्वाने दलितोद्धार करण्याला झटावे आणि राष्ट्ररक्षणार्थ व संवर्धनार्थ आपले शौर्यतेज प्रकट करावे असे दर्शविणारा माझा एक लेख, ' आता अस्पृश्यांनी क्षत्रिय झाले पाहिजे ' हा, ' तरुण भारता 'च्या १४ व १७ एप्रिल १९४८ च्या दोन अंकांत प्रसिद्ध झाला आहे. तद्वतच

दलितांची महत्ता दर्शविणारे ‘दलितोद्धारात राष्ट्रोन्नतीचे बीजतेज’ (जागृती : १२ ऑक्टोबर १९४८) आणि ‘दलित कलावंत : कलासृष्टीचा परमेश्वर’ (जागृती : १९ ऑक्टोबर १९४८) हे दोन लेख, व ‘एका अस्पृश्य तरुणीचे मला सात प्रश्न’ (इन्किलाब : १० मे १९४८) हा लेखही माझ्या लेखसंग्रहात अन्तर्भूत झाला आहे. वऱ्हाडच्या एका दलित तरुणीचा माझ्यासंबंधी कुणीतरी गैरसमज करून दिला होता त्यामुळे ती मला खडसावून वारंवार पत्रे पाठवीत असे. पण मी माझ्या सवयीनुसार कधीच कुणाच्या पत्राला उत्तर देण्याच्या भरीस पडत नसे. पण त्या दमदार तरुणीने, तुम्ही भ्याड आहात, नामर्द आहात अशा उपमर्दकारक शब्दांची लाखोली वाहून, दुसऱ्या एका लांबलचक पत्रात तुमची जात-धर्म व पक्ष कोणता, तुम्ही खादी का वापरता, तुम्हाला चहाचे कमालीचे व्यसन का ? तुम्हाला ब्राह्मणांचे चाहते व महारांचे द्वेष्टे का समजतात ? तुम्ही आपल्या लिखाणाची होळी का करता ? दलित समाजापासून तुम्ही अलिप्त का राहता ? आणि दलित स्त्रिया व विद्यार्थी-विद्यार्थिनींकडून तुमच्या अपेक्षा कोणत्या ? अशा तऱ्हेचे तिने मला प्रश्न विचारले होते. तेव्हा या पत्रावर अन्तर्मुख होऊन विचार केल्यावर, त्या माऊलीला एकटीला प्रश्नांची उत्तरे देऊन काय उपयोग ?—त्यापेक्षा जाहीर उत्तर देणेच श्रेयस्कर असे ठरवून, तिच्या महत्त्वाच्या सात प्रश्नांची उत्तरे मी लिहून काढली. प्रश्नोत्तरांचा तो लेख, १० मे १९४८ च्या ‘इन्किलाब’ या साप्ताहिक अंकात प्रसिद्ध झाला. त्या तरुणीच्या धाडसी पत्रलेखनामुळे माझी मला तपासणी करण्याची संधी लाभली, हे उचितच झाल्याचे मला वाटले.

* *

महात्मा गांधीजींनी अस्पृश्यांसाठी ‘हरिजन’ शब्द वापरला. ‘हरिजन’ साप्ताहिक सुरू केले. ‘हरिजन सेवक संघाची’ स्थापना केली. पण हरिजन म्हटल्याने अस्पृश्यतेचा भाव काही लोपला नाही. ‘हरिजन’ या शब्दोच्चाराने महार, मांग, चांभार, भंगी असेच समजले जाऊ लागले. तो शब्द गौरवाचा नाही, टिंगलीचा व अपमानाचाच असल्याचा अनुभव येऊ लागला. त्यात सुधारणेची व्याप्ती व दीप्ती नाही; उलट, अस्पृश्यांत शल्याची भावना निर्माण झाली. अस्पृश्यच म्हणा पण हरिजन म्हणून मन दुखवू नका, अशी अवस्था येऊ लागली. ‘हरिजन सेवक संघा’ तर्फे अस्पृश्य विद्यार्थ्यांना नाममात्र शिष्यवृत्ती देण्याचा प्रयत्न झाला. त्याबाबतही कटू प्रत्यय येऊ लागला. सरकार दरबारीही हरिजन शब्दाचा वापर होऊ लागला. परंतु ‘हरिजन’ हा शब्द ‘शब्द’च ठरला. शासकीय ‘शेड्युल्ड लिस्ट’ मध्ये तो शब्द नियमानुसार अन्तर्भूत नसल्याने ‘हरिजन’ या नावाने अस्पृश्यांना मिळणाऱ्या सोयी-सवलती मिळेनाशा झाल्या. म. गांधीजींनी

एका सद्भावनेने तो शब्द रूढ करण्याचा प्रयत्न केला पण प्रत्यक्ष अनुभवास तो शब्द अस्पृश्यांना तीव्रतेने जाणवू लागला. मी महात्मा गांधींजींशी व तपस्वी ठक्कर बाप्पांशी भेट घेऊन चर्चा केली. आणि मग मी 'महार'च बरा असे मला वाटून, मी 'महाराष्ट्र घरचा महार पुजारी' हा लेख लिहिला. तो ९ ऑक्टोबर १९४७ च्या 'सिद्धार्थ' साप्ताहिक-अंकात प्रसिद्ध झाला.

त्याशिवाय, माझे विविध विषयांवर, प्रसंगानुसार जे अनेक लेख प्रसिद्ध झाले त्यांपैकी काहींचा निर्देश असा : 'उद्योगाची महती' ( विकास : ११ डिसेंबर १९४५ ): 'आता थोडे राबू या' (विकास : ३१ डिसेंबर १९४५): अस्पृश्यांची एक ऐतिहासिक कहाणी'; (विकास : १६-९-१९४६); 'पोटभर भाकरीचा अर्थ : ( पूजा : फेब्रुवारी १९४८ ); 'आजचे उपासक, उद्याचे प्रवर्तक' (पूजा : जुलै १९४८); 'स्वातंत्र्याचे अढळपद': (सप्टेंबर, १९४८ : पूजा); 'ठोठवा म्हणजे उघडेल, शोधा म्हणजे सापडेल': 'बहुजन समाज आणि रामराज्य': (पूजा : १९४८); 'राष्ट्रसिद्धीचा यज्ञ': (सुराज्य : १५ ऑगस्ट १९४९ ); 'सेवा आणि आत्मदान': ( विकास : ऑक्टोबर १९४९ ); 'महाराष्ट्रातील काही पुरोगामी संत : ज्ञानेश्वर, चोखोबा, एकनाथ, तुकाराम व रामदास' : (सुषमा : मार्च, एप्रिल मे व जून १९५० आणि मार्च १९५१); 'आजचे समाजजीवन : संस्कृती आणि व्यक्तिविकास': (तरुण भारत, पुणे, दिवाळी अंक १९६१); 'राष्ट्रीय एकतेसाठी साहित्यिकांची जबाबदारी': (पूर्णा सप्टेंबर १९६३) : 'क्रौर्य नको, शौर्य हवे': (जागृती : गणराज्य दिन विशेषांक: १९७१); 'भगवान बुद्धाची नीतितत्त्वे': (नागपूर आकाशवाणी : ३० एप्रिल १९६१); 'अस्पृश्यता निवारण' (नागपूर आकाशवाणी : ३०-१०-१९६१); 'संतांचे कार्य': (नागपूर आकाशवाणी : २५-२-१९६१); 'आमुचा एकात्म भारत': (नागपूर आकाशवाणी : ५-१२-१९७०); 'एक राष्ट्र, एक जनता': (नागपूर आकाशवाणी : ८-४-१९७२) इत्यादी.

माझी लेखणी चरित्रात्मक लेख, व्यक्तिचित्रण व चरित्रग्रंथनिर्मितीकडेही त्याच वेगाने वळली होती. १९४४ ते १९५२ या आठ वर्षांच्या काळात, सीताबर्डीवरील मुख्य मार्गावर असलेल्या महाजन चाळीतील श्री. व. गो. उपाख्य राजाभाऊ गर्गे या सुहृदाच्या 'वीणा प्रकाशन'च्या कार्यालयात माझी बैठक असायची. नागपुरातील सर्व साहित्यिकांचा तेथे अड्डा असायचा. तो अड्डा 'वीणा मंडळ' म्हणून प्रसिद्ध होता. एके दिवशी इडली-दोशावर ताव मारीत एक टुम निघाली; अड्ड्यात सामील होणाऱ्या साहित्यिकांचे हुबेहुब व्यक्तिदर्शन घडावे असे लेख लिहिले जावेत असे ठरले. शब्दांच्या फैरी झडत. पण कोणी पुढे येईना. मी आव्हान स्वीकारले व मग अक्षरश: पूर्ण करूनही दाखविले.

* *

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असलेल्या ' युगवाणी ' मासिकात व्यक्तिचित्रणाचे माझे लिखाण क्रमशः प्रसिद्ध झाले. राजाभाऊ ( पां. वा. गाडगीळ ), ऑक्टोबर १९४९; शांताराम (प्रा. के. ज. पुरोहित). डिसेंबर १९४९; गो. रा. दोडके, जानेवारी १९४९; पु. भा. भावे, मे १९५०; शरच्चन्द्र मुक्तिबोध, जून १९५०; भ. श्री. पंडित ऑक्टोबर १९५०; आणि मग भाऊसाहेब माडखोलकर, ' सुषमा ', मे १९५१; नी. ब. भवाळकर, ' सुषमा ', ऑक्टोबर १९५२; ह. ना नेने, युगवाणी, डिसेंबर १९५४; भाऊराव बोरकर, 'तरुण भारत', १० फेब्रुवारी १९५५ या शिवाय, विश्वकवी रवीन्द्रनाथ टागोर, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, गुरुवर्य किसन फागोजी बंसोड, महात्मा ज्योतिबा फुले, साने गुरुजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, रामकृष्ण परमहंस, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. पांडुरंगपंत खानखोजे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, महात्मा गांधी, दादाभाई नौरोजी, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर, संत चोखोबा, संत तुकाराम असे किती तरी चरित्रात्मक लेख व पुस्तिका प्रसिद्ध झाल्या आहेत.

* *

१९४८ ते १९५० मध्ये मी पूर्व मध्यप्रदेशाच्या समाज शिक्षण विभागात आणि मग १९५४ ते १९६१ पर्यंत समाज कल्याणखात्यात शासकीय नोकरीवर, लेखक म्हणून होतो. त्या वेळी शासनातर्फे ' प्रकाश ' पाक्षिक व मग ' दीपक ' प्रकाशित होत असे. हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषेत, त्या दोन्ही पाक्षिकांत माझे अनेक लेख, अनेक कथा व विविध विषयावर अनेक पुस्तिका प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या काळी प्रसिद्ध होणाऱ्या शासनातर्फेच्या साहित्याच्या एकेक लाख प्रती प्रसिद्ध होत असत व त्यांचे असंख्य खेड्यापाड्यात दक्षतेने वितरणही होत असे. खेड्यापाड्यापर्यंत वाङमय पोचण्याचे माझे ईप्सित सफल झाले होते. शासनातर्फे प्रकाशित होणाऱ्या माझ्या काही साहित्याचा उल्लेख करावयाचा झाला तर ' ग्रामीण गीतांतील सौंदर्य ' (प्रकाश : १६ आक्टोबर १९४८; ) ' महादेवाची गाणी ' : प्रकाश : १ नोव्हेंबर १९४८), ' जानपद गीतांतील मौलिकता ' (प्रकाश : १ डिसेंबर १९४८), ' समाजाची नीतिमत्ता ' भाग १ व २ (प्रकाश : १५ ऑगस्ट व १ सप्टेंबर १९४९) ' सेवा आणि आत्मदान ' (प्रकाश : १६ ऑक्टोबर १९४९), ' कार्यकर्त्यांच्या मर्यादा ' (प्रकाश १ डिसेंबर १९४९) आणि समाजसुधारक ( महात्मा गांधी, ठकर बाप्पा, सानेगुरुजी, महर्षी कर्वे ), गळसरी (गरिबीवर नाटिका), वरदान (पंचवार्षिक योजनेवर नाटिका), समाजशिक्षण गीते (ग्रामोन्नतीच्या दृष्टीने गीत-संग्रह), उन्नतीचे मार्ग (प्रहसन), अस्पृश्यता निवारण ( नाटिका ), प्रश्न आणि उत्तरे ( जीवनपोषक संवादिका ), संत तुकारामाची शिकवण ( धर्मपर ), संत एकनाथ ( चरित्रात्मक ), अस्पृश्यता

निवारणासाठी थोरांची वचने अशा सुलभ भाषेतील पुस्तिका काय आणि ' दीपक ' पाक्षिकात प्रसिद्ध झालेल्या, ' धुळीतला हिरा ', ' मोती ', ' सेवेची गंगा ', ' दिनूची कामधेनू ', ' मैनाबाईची समाधी ', ' भाव तिथे देव ', ' गोधळीतला लाल ' अशा छोटचा गोष्टी काय आणि तसेच, ज्ञानेश्वर, सुभाषचंद्र बोस, साने गुरुजी, महात्मा ज्योतिबा फुले यांच्यासंबंधी परिचयात्मक लेख व ' भगवान बुद्धाचा संदेश ' काय, माझ्या प्रसिद्ध झालेल्या लिखाणाने, त्या काळच्या अठ्ठावीस जिल्हयांचा ग्रामीण विभाग, दलितोद्धाराच्या व भावनात्मक एकतेच्या दृष्टीने, जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे.

* *

एका दृष्टीने मी मोठा भाग्यवानही ठरलो आहे. माझ्या जीवनाच्या पूर्व व मध्य कालखंडात युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणेच, गुरुवर्य किसन फागोजी बन्सोड, श्री. ग. आ. गवई व श्री. गं. म. ठवरे या तीन थोर विदर्भ-नेत्यांशी माझा अत्यंत घनिष्ठ संबंध आला. या तिन्ही नेत्यांचा या ना त्या दलितोद्धाराच्या कारणाने १९३०-३२ मध्ये माझा संबंध आला. त्यांच्यापेक्षा मी अगदीच छोटा. पण ते पुढारी मला जीव की प्राण समजत. मी त्यांच्याकडे जाण्यापेक्षा ते मजकडे येत. कुठे एखादा कूट किंवा संघर्षमय प्रश्न उद्भवला तर ते माझ्यासारख्या अडाणी छोटचा तरुणाचा सल्ला घेत व माझा निर्णय प्रमाण मानीत, एवढा विश्वास मजवर ठेवीत. त्या काळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एका बाजूला तर श्री. गवई व श्री. ठवरे दुसऱ्या बाजूला आणि गुरुवर्य बन्सोड हे तिसऱ्या बाजूला. दलितोद्धाराच्या बाबतीत त्या थोरांचे तीन मार्ग व तीन दिशा म्हणजे एक प्रभावी त्रिकोण होता. त्या सर्वांचे ध्येय एक होते पण कार्यप्रणालीचे मार्ग मात्र भिन्न आणि ज्वलंत होते. मी केवळ एक निरीक्षक होतो. राजकीय, सामाजिक व धार्मिक स्वरूपाच्या या संघर्षमय वातावरणाचा बोधक व प्रेरक इतिहास अजून ग्रंथित झाला नाही. दलितोद्धाराच्या चळवळींचा तसा स्वतंत्र इतिहास निर्माण होणे अत्यावश्यक आहे. वस्तुतः गुरुवर्य बन्सोड हे दलितवर्गातील पहिले समाजसुधारक, पहिले संशोधक, पहिले पत्रकार व पहिले मुद्रक. दलितोद्धाराचे ते मराठी मुलुखातील पहिले द्रष्टे पुरुष. त्यांनी अत्यंत दारिद्र्यावस्थेत दलितोद्धाराची पार्श्वभूमी निर्माण करून, जी मुहूर्तमेढ रोवली, त्यासंबंधीचा सलग इतिहास त्यांच्या चरित्रग्रंथाच्या निर्मितीने समाजापुढे यायला पाहिजे. मी १९५८-५९ साली मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये रुग्णशय्येवर असताना, त्यांच्यासंबंधीचा परिचयात्मक एक प्रदीर्घ लेख लिहिला होता. त्यांचे सुपुत्र श्री. शामराव बन्सोड यांनी गुरुवर्यांच्या कवनाचा ' प्रदीप ' या नावाचा एक संग्रह प्रसिद्ध केला. त्यात माझा परिचयात्मक लेख समाविष्ट झाला आहे. १९६३ साली श्री. ग. आ. गवई या विदर्भ-

नेत्याचा पंच्याहत्तरावा वाढदिवस आला. त्यांचा हीरकमहोत्सव घडविण्यासाठी एक उच्च प्रतीची समितीही स्थापन झाली पण ती कोलमडली. श्री. नानासाहेब गवई यांची फसवणूकच झाली. त्यांनी ती करुण कहाणी मला सांगितली. मला दुःख झाले आणि मग, हव्या त्या खस्ता सहन करून व श्रम घेऊन, 'श्री. ग. आ. गवई व्यक्ती आणि कार्य' हा दोनशेपन्नास पृष्ठांचा चरित्रग्रंथ मी लिहिला व तो प्रसिद्धही झाला. कर्मवीर श्री. गं. म. ठवरे यांचा तर १९३० सालापासून अगदी घरोब्याचा संबंध. त्यांच्या रखरखीत जीवनाची व उदात्त कार्याची मला पुरती जाणीव होती. त्यांना अभिमानास्पद एक विशेष छंद होता. जगात कुठे काय हालचाली आहेत आणि दलितांप्रती कुठे काय घडत आहे याचा उत्तम रेकॉर्ड अगदी सुव्यवस्थितपणे त्यांनी राखला होता. त्यांच्या निधनानंतर, त्या उच्च प्रतीच्या संग्रहालयाची नासधूस झाली. त्यांच्यावर काही लिहावे म्हणून मी जेव्हा पाहणी केली तेव्हा त्या दप्तर-खान्याच्या दशेने मी फार व्यथित झालो. कर्मवीर ठवरे यांची जी मला प्रत्यक्ष माहिती होती व जे काही अल्पशी कागदपत्रे मला गवसली त्यावर एक चरित्रग्रंथ निर्माण करण्याचा मी संकल्प केला. या चरित्रग्रंथाच्या निर्मितीसाठी मला फारच कष्ट घ्यावे लागले. सौ. सुशीलाताई मोघे या माझ्या मावस बहिणीने व श्री. बंडोपंत मोघे यांनी आपले नॉर्मलस्कूल येथील क्वार्टर माझ्या लिखाणासाठी सहर्ष मोकळे करून दिले. एवढेच नव्हे तर माझ्या त्या लिखाणकार्यात त्या उभयता पति-पत्नीने रात्रंदिवस खपून मला मोलाचे सहकार्य दिले आहे. त्याचप्रमाणे, त्या महत्त्वाच्या कामी माझी सुविद्य मानस कन्या कु. सुलभा थत्ते हिनेही जीवापाड श्रम घेतले आहेत. चरित्रग्रंथनिर्मितीचे हे कार्य सतत तीन वर्षे चालले आणि मग, पाचशे पृष्ठांचा 'श्री ठवरे : चरित्र आणि चारित्र्य' हा जाडा ग्रंथ १९६८ साली निर्माण झाला आणि तो श्री. बाळासाहेब तिरपुडे व युगांतर शिक्षण संस्थेतर्फे त्याच वर्षी प्रसिद्ध झाला. या चरित्रग्रंथाला श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांची अत्यंत मार्मिक प्रस्तावना (२० ऑगस्ट १९६८) जोडली आहे. कै. ठवरे यांच्या चरित्राच्या निमित्ताने गेल्या एका शतकाच्या दलितोद्धाराच्या चळवळींचा संक्षिप्त इतिहासही मी सापेक्ष व निर्लेप दृष्टीने दर्शविला आहे आणि तसेच विदर्भातील, दलितोद्धारा-साठी झटणाऱ्या पक्षोपपक्षातील सत्तेचाळीस दलित नेत्यांसंबंधी 'हू इज् हू' सारखी माहितीही दिली आहे. कर्मवीर ठवरे व नानासाहेब गवई यांच्यासंबंधीच्या चरित्र-ग्रंथाद्वारे केवळ विदर्भातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील दलितोद्धाराच्या विविध चळवळींच्या इतिहासाचा एक विचारप्रेरक बोधपट अभ्यासकांपुढे तरळू शकेल. माझी लेखणी त्या चरित्रग्रंथनिर्मितीवरच विसावली नाही तर, सीताबर्डीवरील कु. ताराबाई प्रधान यांच्या 'अवधूत भवना'च्या एका प्रशस्त व सुंदर उद्याना-जवळील दालनात १९७३–१९७५ या दोन वर्षांत रात्रंदिवस अविश्रांत खपून, माजी मंत्री व महाराष्ट्राचे एक प्रबल नेते श्री. ना. खं. उपाख्य 'बाळासाहेब

तिरपुडे : व्यक्ति व कर्तव्य ' या नावाचा जाडा चरित्रग्रंथ १९७५ साली मी निर्माण केला. त्याच सुमारास ' अस्पृश्यता आणि तिचे मूळ ' या प्रबंधावर प्रा. तु. वि. गेडाम यांना नागपूर विद्यापीठातर्फे डॉक्टरेट ही उपाधी प्राप्त झाली. त्या प्रबंधाचे महत्त्व लक्षात घेऊन, ' संशोधक प्रा. डॉ. तु. वि. गेडाम ' असा एक छोटा चरित्रग्रंथही मी निर्माण केला व तो प्रकाशितही झाला. माझ्यासारख्या जर्जरावस्थेतील एका छोटचा खेडूत लेखकाने समाजजीवनात साहित्याची जी काही छोटी-मोठी शिखरे स्वयंतेने उभारली, त्याचे साकल्याने अगदी संक्षिप्त दर्शन घडविण्याचा यत्न मी केला आहे.

* *

माझ्या आध्यात्मिक व साहित्यिक साधनेच्या दुसऱ्या जीवन-पर्वाला भारताला लाभलेल्या स्वातंत्र्यापासून म्हणजे १९४७ पासून प्रारंभ झाला, तो ' पूजा ' या वाङमयीन नियतकालिकाच्या शुभारंभाने. वस्तुतः १९४१–४२ मध्ये एखादे नियतकालिक काढण्याची माझी फार आकांक्षा होती. पण त्या वेळच्या ब्रिटिश राजवटीत मंजुरी मिळाली नाही आणि म्हणून, ' वाङमयप्रसारक मंडळा 'ची स्थापना करून, ' अंकुर ' नावाचे भरदार हस्तलिखित मासिकच सुरू केले. त्या वेळी नामवंत साहित्यिकांचे मोठे सहकार्य लाभले. पण नंतर मुद्रित मासिक काढण्याचा माझा संकल्प १९४६–४७ मध्ये तडीस गेला. त्या काळी विदर्भात एकही मासिक नव्हते. ' पूजा ' मासिकाचा मी मुख्य संपादक होतो. श्री. भाऊसाहेब माडखोलकर हे मार्गदर्शक तर डॉ. अ. ना. देशपांडे हे साहाय्यक संपादक व डॉ. ल. बा. पडोळे हे व्यवस्थापक होते. या ' पूजा ' नियतकालिकाचे कार्यालय धंतोली येथे होते व सुप्रसिद्ध ' नारायण मुद्रणालया 'त ते मुद्रित केले जात होते. महाराष्ट्रातील ख्यातनाम साहित्यिक व संशोधक त्या मासिकात होते. उच्च प्रतीचे भरदार व डौलदार मासिक म्हणून ' पूजे 'ने अल्पावधीतच कीर्ती संपादली होती. १९४८ साली न व्हायचा तो आघात झाला आणि मग निरुपायाने ' पूजे 'ची सांगता करावी लागली, तरी सुद्धा पत्रसृष्टीत सजलेले, रुजलेले माझे पाऊल मी मागे पडू दिले नाही. त्यानंतर लगेच म्हणजे १९४८ साली डिसेंबरमध्ये शासकीय ' प्रकाश ' पाक्षिकाच्या संपादकमंडळात लेखक म्हणून प्रवेश केला. १९५० पर्यंत ' प्रकाश ' पाक्षिकासाठी लेखनकार्य करीत असतानाच १९४९–५० मध्ये ' जागृती ' साप्ताहिकाचा संयोजक व कार्यकारी संपादक; १९५०–५१ मध्ये ' तरुण भारत ' दैनिकाचा सहसंपादक, १९५१–५२ मध्ये ' अशोक ' साप्ताहिकाचा कार्यकारी संपादक आणि त्याशिवाय ' महाराष्ट्र ', ' इन्किलाब ', ' निःस्पृह ', ' सुराज्य ', ' आरोग्य दीप ', ' राष्ट्रदूत ' आदी वृत्तपत्रांना व नियतकालिकांना संपादकीय सहकार्य दिले आहे. पत्रसृष्टीत एका तपाचा माझा वाटा मी राखला आहे.

१४ आक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म चक्र-प्रवर्तन केल्यावर लाखो दलितांनी बौद्धधर्माचा स्वीकार केला. पण मग सवर्ण हिंदू व नवदीक्षित बौद्ध यांच्यात कमालीची तेढ निर्माण झाली. त्याची झळ विशेषत: ग्रामीण विभागात तीव्रतेने पोचली. दलित बौद्धांवर ठिकठिकाणी अत्याचार घडू लागले. एक नवीनच समस्या निर्माण झाली. त्याचे उग्र रूप लक्षात घेऊन, १९६२ मध्ये भारत सेवक समाजातर्फे अर्थशास्त्रज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि श्री. दि. के. बेडेकरप्रभृतींनी ' नवबौद्धांची समस्या ' या ज्वलंत विषयावर पुणे येथे त्या वेळचे भारताचे सरन्यायाधीश श्री प्र. ब. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक परिसंवाद घडवून आणला. मलाही निमंत्रित करण्यात आले होते. अनेक धर्मपंडितांची, साहित्यपंडितांची व श्रेष्ठ विचारवंतांची पांडित्यपूर्ण भाष्ये झाली. मी त्या वेळी एकनिष्ठ श्रोत्याचे काम केले, भाग घेतला नाही नंतर एक मसुदा तयार करण्यात आला. पण विशेष दर्शवून मी त्यावर स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे खळबळ माजली. माझा हरकतीचा महत्त्वपूर्ण मुद्दा जाणिवेने लक्षात घेऊन विषया-वर भाष्य केले. पांडित्याचे प्रदर्शन करण्यापेक्षा परिस्थित्यनुरूप समस्येवर आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक तोडगा काय तो मी सुचविला आणि मग तसा मसुदा बदलविण्यात आल्यावर मी स्वाक्षरी केली.

राजकीय बाब सोडली तर नवबौद्धांच्या काही प्रश्नांबाबत ज्या ज्या वेळी मला हाक येई त्या वेळी योग्य ती दखल घेऊन मी माझे कर्तव्य बजाविले आहे. १९६४ साली सांगली येथे महाराष्ट्र बौद्धसाहित्य परिषदेचे भव्य सम्मेलन भरले होते. मी अध्यक्ष होतो व श्री. वि. स. खांडेकर हे उद्घाटक होते. त्या प्रसंगी मी माझ्या अध्यक्षीय भाषणात दाहक परिस्थितीचा परामर्श घेऊन बौद्धजीवन, आचारसंहिता व बौद्ध साहित्याची सर्वस्पर्शी उदात्त महत्ता दर्शविली होती आणि ' बौद्धपीठाची विशेष घोषणा केली होती. ' प्रज्ञे 'त ' पुण्यश्लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकर ' हा लेखही लिहिला होता.

* *

माझ्या गेल्या साठ वर्षांच्या तप्त जीवनात, पूर्वी मी एकटा होतो आणि आजच्या उत्तरकाळातही मी एकटाच आहे. ५०–६० वर्षापूर्वीचा तो काळ दलितां-साठी केवढा उग्र, केवढा भीषण ! त्या अत्यंत प्रतिकूल काळात मी खेडूत महार, ना कसले शिक्षण, ना कसले धन आणि ना कसला आधार. मी आणि माझ्या पवित्र मनासवे असलेली माझ्या अध्यात्माची केवळ एक लकेर ! नियती नेईल तिकडे माझी पावले वळलेली. नाही म्हणायला माझ्या साथीला तीन प्रभावी अस्त्रे : काळी शाल, सहलकाठी आणि तपकिरीची डबी; आणि होती तीन जीवन–अस्त्रे : कागद, झरणी आणि चहा ( अमृत ). पहिल्या तीन प्रभावी अस्त्रांनी मला प्रबल-

नैतिक अधिष्ठान प्रदान केले आणि दुसऱ्या तीन जीवन अस्त्रांनी माझ्या जीवनाला तेजस्वी आकार देऊन; अध्यात्माच्या व साहित्याच्या दुर्गम शिखरावर चढत जाण्याचे व उन्नत होण्याचे सामर्थ्य दिले. तपस्या, कठोर तपस्या ! अनुभूती, प्रखर अनुभूती; आणि व्यासंग, व्रतपूर्ण व्यासंग ! नीट नांगरून, वखरून व भरपूर खत–पाणी देऊन आयत्या कसदार जमिनीत पीक उभविणे वेगळे आणि खडकाळ जमिनीला निढळाचा घाम गाळीत स्वकष्टाने पिकायोग्य करून भरदार पीक उभवून दाखविणे वेगळे ! माझे आध्यात्मिक जीवनसाहित्य खडकाळ परिस्थितीच्या जमिनीतून प्रगत झाले आहे. त्यासाठी मला कुणाच्या प्रशस्तिपत्राची अथवा कुणासाठी काही केले म्हणून पावती देण्याची मुळीच गरज नाही !

* *

१९३२ ते १९४७ या पंधरा वर्षांच्या काळात मी नियमितपणे विदर्भात श्रेष्ठ असलेल्या सीताबर्डीवरील ‘ राजाराम सीताराम दीक्षित ’ या वाचनालयात जात असे. मासिक चव्वणी वर्गणी देण्याचीही माझी ऐपत नसल्याने, सकाळी व सायंकाळी मोफत वाचनालय विभागाचा मी लाभ घेत असे आणि रात्रीला, वाचनालयाच्याच एका खोलीत राहणाऱ्या लक्ष्मणसिंग पहारेकऱ्याशी मैत्री जुळवून, रात्ररात्रभर ग्रंथवाचन करीत असे, टाचणें घेत असे व सातत्याने मनन करीत असे. त्या काळी त्या वाचनालयाचा एकही दलित वाचक नव्हता; मी एकटाच काय तो चोर पावलांचा वाचक होतो. कधी काळी आपण या ब्राह्मणांकित श्रेष्ठ वाचनालय संस्थेचे अध्यक्ष बनू असे माझ्या स्वप्नातही नव्हते. १९४७ साली, ऑक्टोबर महिन्याच्या एका सायंकाळी वाचन करून मी जात असताना, पटांगणातील मोडक्या बाकावर असलेल्या एका कर्मठ शिष्टांच्या एका वृद्ध दुढ्ढाचार्याने मजकडे पाहून उपहासाने म्हटले, ‘ हा महार वाचनालयाची निवडणूक लढविणार आहे म्हणे ’ : मी खवळून म्हटले, ‘ चॅलेन्ज ’ देता का ? दुसरा एक फिदीफिदी हसत म्हणाला, ‘ अरे, चॅलेन्ज समज ना ! ’ मी त्वेषाने आव्हान स्वीकारले. माझा वाचनालयातील एकही मतदारवाचकाशी संबंध नव्हता. वाटेत माझे एक स्नेही श्री. स. वि. लिमये यांची भेट झाली. मी त्यांना घटना सांगितली. ते मला घेऊन तडक वाचनालयात गेले. वर्षभराची माझी वर्गणी भरली. स्वतःच नामनिर्देश-पत्रिका भरून माझी स्वाक्षरी घेतली. संपूर्ण ब्राह्मणाची ती संस्था. माझ्यासारख्या अनोळखी, दलिताला कोण मत देणार ही शंका. मी आणि श्री. लिमयें मिळून एक युक्ती शोधून काढली. त्या रात्रीच दहाबारा स्त्रियांकडे गेलो. मी त्यावेळी ‘ पूजा ’ मासिकाचा संपादक असल्यामुळे एक वेगळे आकर्षण होते. माझी एक अभिनव योजना त्या तरुणींना चहाचा घोट घेत घेत समजावून सांगितली. प्रत्येक तरुणीने निळी साडी, निळ्या बांगड्या आणि नीलमणी कर्णलोलक

वापरून, मतदानाच्या वेळी येणाऱ्या मतदाराला नीलरंगी विनंती-पत्र वाटायचे ! सर्वांनी सहर्ष मान्य केले. ' वीणा मंडळा 'च्या माझ्या साहित्यिक मित्रांनीही साथ देण्याची कबुली दिली. निवडणुकीच्या वेळी एक वेगळा रंग, एक वेगळा ढंग ! नियोजित अभिनव धोरणाप्रमाणे सारे घडून आले. एक वेगळे चैतन्यमय वातावरण निर्माण झाले. निवडणूक संपली. मतमोजणी झाली. आणि सर्वात अधिक मते मिळून मी निवडून आलो. न्यायमूर्ती श्री. वा. रा. पुराणिक हे त्या संस्थेचे अध्यक्ष असताही त्यांच्यापेक्षा कितीतरी पटीने मला अधिक मते लाभली होती. विरोधकांची दातखिळी बसली. ब्राह्मणांची श्रेष्ठ संस्था जिंकण्याचा तो माझा पहिला उच्चांक होता. न्यायमूर्ती श्री. पुराणिकांनी मला अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली पण मी ती मान्य न करता, पुराणिकांनीच अध्यक्षपद ग्रहण करण्याची उलट विनंती केली. मी मात्र पहिल्या खेपेला, चिटणीस झालो. आणि मग दर निवडणुकीला उच्चांक गाठत राहून त्या श्रेष्ठ वाचनालयाचा १९४७–१९५० पर्यंत चिटणीस, १९५०–५१ मध्ये उपाध्यक्ष आणि मग १९५१–५२ साली अध्यक्ष बनलो. त्यामुळे मला विद्याव्यासंगाचे व लेखनकार्याचे एक मोठे व्यापक व प्रभावी क्षेत्र प्राप्त झाले.

त्यानंतर मी साहित्यिक व सांस्कृतिक संस्थांचे गड जिंकतच गेलो. न्यायमूर्ती श्री. के. तु. मंगळमूर्ती अध्यक्ष असलेले ' नाटचनिकुंज मंडळ ' : १९५१–५३ मध्ये चिटणीस, त्याच काळी ' ब्राह्मण सारस्वत मंडळा 'चा अध्यक्ष, १९४८–५६ मध्ये ' स्नेहसंवर्धक मंडळा 'चा अध्यक्ष, युगान्तर ' शिक्षण संस्था ' : १९५३–५८ मध्ये कोषाध्यक्ष, ' नागपूर युनिव्हर्सिटी कोर्ट ' : १९५७–६३ पर्यंत सभासद : ' नागपूर पत्रकार संघ ' १९५०–६२ पर्यंत चिटणीस, ' महाराष्ट्र हिंदी राष्ट्रभाषा सभा ' १९५८–६१ पर्यंत सभासद, ' नवभारती बहुउद्देशीय समाज सेवा संस्था ': १९५८–६६ पर्यंत सभासद, ' मराठी साहित्य महामंडळ ' : १९६१–६५ पर्यंत सभासद, त्याव्यतिरिक्त १९६१–६५ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या टागोर जन्म शताब्दी महोत्सव समितीचा आणि त्याच वर्षी तमाशा महोत्सव समितीचा सभासद, व १९६१–६३ मध्ये शासकीय ' लोकसाहित्य समिती 'चा सभासद अशा विविध संस्थांत राहून भाषा, साहित्य, कला व संस्कृतिसंवर्धनाचे समाजपोषक कार्य मला करता आले. त्यामुळेही माझ्या लेखणीला आणि वाणीला विस्तृत क्षेत्र लाभून, माझ्या लेखनाला गती तर मिळालीच पण ते तेजोवर्धितही झाले.

* *

इतरांपेक्षा आपण रतिमात्र कमी नाही, असा माझा स्वाभिमान आहे. न्यूनगंड तर मला मुळीच मान्य नाही. लीनतेने वागणे मी समजू शकतो पण कमीपणाने वागणे व लाचारी दर्शविणे मला उचित वाटत नाही. अंगी कसले

कर्तृत्व नसताना वा पुरते ज्ञान व अनुभव नसताना बुद्धिवाद आणि युक्तिवाद मला खपत नाही. मी मोठा संतापी आहे. कुणावर अन्याय झाला वा कुणाचा अपमान झाला अथवा कुणाला हीन लेखण्यात आले तर मी फसफसून फणाच काढतो. जमदग्नीचा अवतारच धारण करतो. त्या वेळी मजजवळ दयामाया नसते; एक तर 'मी कुणास' शब्द देत नाही आणि दिला तर तो मी पराकाष्ठेने पाळतो. पण कोणी मला शब्द देऊन, हे ना ते कारण दर्शवीत तो पाळला नाही तर मी त्याची कसलीही गय करीत नाही, असे अनेक दोष माझ्यात आहेत. आपल्या धवल कर्तृत्वाने, निःस्वार्थ तरल बुद्धिमत्तेने आणि शालीनतेने आपल्याला इतरांची मने जिंकता आली पाहिजेत. मी माझ्या जीवनात या दिशेने निर्धारपूर्वक वाटचाल केली आहे. त्या वेळी यशापयशाची, जयपराजयाची आणि पाप–पुण्याचीही पर्वा केली नाही. पवित्र मनाला साक्षीला ठेवून मी माझे पाऊल पुढे टाकले आहे. १९४८ साली, डॉ. वि. भि. कोलते यांच्या अध्यक्षतेखाली गोंदिया येथे विदर्भ साहित्य संघाचे अधिवेशन संपन्न झाले होते. बिहारचे त्या वेळचे विद्वान राज्यपाल लोकनायक बापुजी अणे हे त्या सम्मेलनाच्या उद्‌घाटनासाठी आले होते. 'मराठी वाङ्मयापासून माझी अपेक्षा' या विषयावर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. श्री. पु. ल. देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख व दे. भ. श्री. मा. ज. कानेटकर असे पट्टीचे विद्वान त्या विषयावर भाष्य करणार होते. चवथा विद्वान साहित्यिक वेळेवर अनुपस्थित होता. कसल्या तरी नशेत कुठेतरी तो लोळत पडला होता. ती उणीव भरून काढावी म्हणून, अध्यक्षांनी ऐन वेळेवर, माझी कसली तयारी नसताना त्या विषयावर भाष्य करण्याची विनंती केली. आधीच्या वक्त्यांची विद्वत्ताप्रचुर भाषणे झाल्यावर, शेवटी माझे मोठे कडवट व जहाल भाष्य झाले. मी माझ्या आवेशात म्हटले, 'मराठी वाङमयाने आजपर्यंत काहीच साध्य केले नाही.' मोजके विद्वान भक्तीचा फेर धरून घुटमळत आहेत; त्याचा प्रवाह खेड्या-पाड्यापर्यंत पोचलाच नाही आणि त्याने ग्रामीण जनतेला जागृत करून, त्यांचे दाहक जीवन फुलविले नाही. विद्वानांनी शहराच्या एखाद दुसऱ्या सभेत मोजक्याच श्रोतृवृन्दापुढे विद्वत्तापूर्ण भाष्य करून, स्वतःचीच पाठ थोपटून घ्यावी, एवढेच काय ते ! मराठी वाङमय निश्चित समृद्ध आहे पण त्याचा पावन प्रवाह खेड्या-पाड्याच्या उद्धारार्थ, ग्रामीण विभागात अखंडपणे वाहत असला पाहिजे, अजूनही संत ज्ञानेश्वराला कडीकुलपे लावून, उच्चवर्णीयांनी आपलेच धन समजून, तिजो-रीत कोंडून ठेवला आहे. सर्वसामान्य जनतेपुढे तो येऊच शकला नाही, हे लक्षण काही शुभ नाही आणि म्हणून संतांची, विद्वानांची व साहित्यिकांची लेखणी आणि वाणी खेड्यापाड्यापर्यंत पोचून दुमदुमली पाहिजे. या माझ्या साहित्याच्या व्यास-पीठावरील पहिल्याच छोट्या पण प्रभावी भाषणाने, विदर्भ साहित्य संघाच्या

दालनात मानाचा प्रवेश करून दिला. अनेक नामवंत साहित्यिकांचा, पत्रकारांचा, संशोधकांचा, भाष्यकारांचा व कलावंतांचा माझा खास गोतावळा निर्माण झाला आणि मग, १९५० साली मी विदर्भ साहित्य संघाची निवडणूक एका जिद्दीने लढविली व राजाराम वाचनालयासारखाच उच्चांक गाठून मी निवडून आलो आणि त्याच वर्षी साहित्य संस्थेचा चिटणीसही झालो. १९५०–५३ चिटणीस, १९५३–५४ सरचिटणीस, १९५४–५८ उपाध्यक्ष; आणि मग १९५९–६२ मध्ये अध्यक्ष व नंतर १९६४ पर्यंत कार्याध्यक्ष राहिलो. १९४९–५० मध्ये श्री. भाऊसाहेब माडखोलकर हे वि. सा. संघाचे अध्यक्ष होते. त्यांनी वि. सा. संघाचे जे दप्तर अमरावती येथे होते ते नागपूरला आणले. नागपूर येथे विदर्भ साहित्य संघासाठी शासनाकडून एखादी प्रशस्त जागा मिळवावी आणि साहित्यसंसारासाठी मालकीची वास्तू उभारावी, असा संकल्प करण्यात आला व मग श्री. भाऊसाहेब माडखोलकर, श्री. ए. श्री. पटवर्धन, आचार्य दादा धर्माधिकारी, श्री. पु. य. देशपांडेप्रभृती नामवंत प्रयत्नाला लागले. अर्थात मी त्यांच्याबरोबर होतो. वि. सा. संघासाठी जागा मिळविण्यापासून तो तीवर भव्य व डौलदार वास्तू आणि नंतर धनवटे रंगमंदिर उभारण्यापर्यंतच नव्हे तर साहित्याची विविध दालने समृद्ध करीपर्यंत मी रात्रंदिवस त्या एकाच ध्यासाने सारखा राबत गेलो. धनिकांकडून धनदान मिळविण्यापासून तो शासकीय अनुदान प्राप्त करून घेण्यापर्यंत मी माझ्या रक्ताचा कणन् कण कामी आणला आहे. मी माझ्या त्या कारकिर्दीत, वि. सा. संघाचे स्वत: अधिकाधिक सभासद बनवून व 'युगवाणी' या मुखपत्राचा विशेष दर्जा वाढवून आणि त्याचा विस्तृत प्रसार व प्रचार करून, मी माझी दरवर्षी एक वेगळीच खास शक्ती व प्रज्ञा प्राप्त केली होती. त्या बळावर मी स्वत: मागे राहून अनेक साहित्यिकांच्या गळचात अध्यक्षीय माळा घालीत आलो. १९५४ साली श्री. हरिभाऊ नेने यांच्या अकाली निधनानंतर, ब्रिटिश राजवटीतील माजी विद्वान शिक्षणमंत्री श्री. बाबासाहेब (बा. ग.) खापर्डे हे काही दिवसांसाठी अध्यक्ष झाले. मग १९५५ साली वि. सा. संघाचे विश्वस्त न्यायमूर्ती मंगळमूर्ती, लोकनायक बापुजी अणे, श्री. भाऊसाहेब माडखोलकर, श्री. पु. य. देशपांडे, प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, श्री. नाना जोग प्रभृतींनी एकमुखी निर्णय घेऊन, मला अध्यक्ष बनविण्याचे निश्चित केले. माझी त्यांनी नामनिर्देशपत्रिकाही भरली पण श्री. बाबासाहेब खापर्डे यांना पुन्हा अध्यक्ष बनण्याची प्रबल इच्छा झाली. त्या बाबतीत त्यांनी वि. सा. सं. च्या श्रेष्ठींशी बोलणे केले पण त्या सर्वांनी आपला मजसंबंधीचा एकमुखी निर्णय सांगून सर्व काही शेंडचाच्या मर्जीवरच काय ते अवलंबून असल्याचे सांगितल्यावर, दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे श्री. बाबासाहेब खापर्डे माझ्या झोपडीत येऊन, जेव्हा त्यांच्यासारख्या अत्यंत विद्वान व बुद्धिमान पुरुषाने गहिवरून ओंजळ पुढे केली तेव्हा माझे हृदय हेलावले आणि मग

त्यांच्यासाठी मी माझी उमेदवारी परत घेतली. मला माझ्या कर्तृत्वाचा व शक्तीचा गर्व होता पण मोह मात्र मी कधीच राखला नाही, कसली अपेक्षा वा कसली अभिलाषा मी बाळगली नाही. १६ डिसेंबर १९५८ रोजी धनवटे रंगमंदिरात मला हृदयविकाराचा झटका आला आणि मग मी मेडिकल कॉलेज–हॉस्पिटलमध्ये रुग्णशय्येवर होतो. माझ्यात कसले त्राण नव्हते, मृत्यू केव्हा कशी झडप घालील याचा काही नेम नव्हता. अशा वेळी परत न्यायमूर्ती मंगळमूर्ती, श्री. भाऊसाहेब माडखोलकर, श्री. पु. य. देशपांडे, प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. बाळासाहेब ढवळे प्रभृतींनी हॉस्पिटलमध्ये माझी भेट घेऊन, अध्यक्षाची निवडणूक लढविण्याची मला परोपरीने विनंती केली. पण मी खेद व्यक्त केला आणि ती विनंती अमान्य केली. पण मग लगेच रात्रीला मला हादरा बसेल अशी एक खबर कानी आली. एक महार काय विदर्भ साहित्य संघासारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ संस्थेचा आता अध्यक्ष होणार ? एका साहित्यवर्तुळातील ती खबर होती. माझा आत्मा तळतळला ! इतक्यात निर्दिष्ट साहित्यिक मंडळी पुन्हा आली. त्या जर्जरावस्थेत एक प्रकारे मृत्युशय्येवर असतानाच मी भीषण प्रतिज्ञा केली. नाही, आता मुळीच माघार घेणार नाही. मी मरायला टेकलो असलो तरी विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्ष-पदाची निवडणूक मृत्युशय्येवरूनही मी लढविणारच आणि गड जिंकून एक महार निश्चितच विदर्भ साहित्य संघाचा अध्यक्ष होणारच. कदाचित इतक्यात माझा मृत्यू झाला तरीही अव्यक्त रूपाने वास करणारे माझे प्रबळ मनोद्रव्य वि. सा. संघाच्या वास्तूच्या कणाकणात सामावून माझ्या अध्यक्षपदाचे स्थान मंडित कर-णार, या माझ्या भीषण ललकारीने सर्वांचे धाबे दणाणले. माझी हुकमी शक्ती सर्वांना माहीत होती. माझ्या ज्वलंत शब्दांची व त्याच्या परिणामाची सर्वांना चांगली जाणीव होती. सर्वांना थरकाप सुटला. वि. स. संघाचे एकदा अध्यक्ष राहिलेले डॉ. वि. भि. कोलते व प्रा. भ. श्री. पंडित यांनी पुन्हा उमेदवारीच्या नामनिर्देश–पत्रिका भरल्या होत्या. त्यांनी आपली उमेदवारी परत घेतली आणि मग मी माझ्या कार्यकारी मंडळाच्या पूर्ण संचासह, विदर्भ साहित्य संघाचा अविरोध अध्यक्ष म्हणून निवडून आलो आणि एका महाराचे, साहित्याच्या विशाल क्षेत्रात, तब्बल पंधरा वर्षे कसे प्रभावी अधिराज्य असते, हेही सप्रमाण सिद्ध करून दाखविले. पण पुढे माझा तो प्रभाव व ते वर्चस्व सहन न होऊन, काही फाटक्या, किंचित लेखन व किंचित काव्य करणाऱ्या साहित्यिकांनी, कब्जीकलुषी डाव टाकला. काही थोर साहित्यिकांच्या नेत्यांच्या सल्ल्यानुसार, ज्यांनी, मी नकार देत असताही माझी वचन–बद्धतेने नामनिर्देश–पत्रिका पुन्हा भरली, त्यांनीच रातोरात दुष्टावा खेळून मला पराभूत करण्याचा क्षुद्र प्रयत्न केला आणि विदर्भ साहित्य संघाच्या अस्मितेला काळिमा फासला व मग त्यांना वि. सा. संघातून बदनाम होऊन पळ काढावा लागला. त्या दुष्कृत्यामुळे त्यांनी मला खाली खेचण्याचा

वापरून, मतदानाच्या वेळी येणाऱ्या मतदाराला नीलरंगी विनंती-पत्र वाटायचे ! सर्वांनी सहर्ष मान्य केले. ' वीणा मंडळा 'च्या माझ्या साहित्यिक मित्रांनीही साथ देण्याची कबुली दिली. निवडणुकीच्या वेळी एक वेगळा रंग, एक वेगळा ढंग ! नियोजित अभिनव धोरणाप्रमाणे सारे घडून आले. एक वेगळे चैतन्यमय वातावरण निर्माण झाले. निवडणूक संपली. मतमोजणी झाली. आणि सर्वात अधिक मते मिळून मी निवडून आलो. न्यायमूर्ती श्री. वा. रा. पुराणिक हे त्या संस्थेचे अध्यक्ष असताही त्यांच्यापेक्षा कितीतरी पटीने मला अधिक मते लाभली होती. विरोधकांची दातखिळी बसली. ब्राह्मणांची श्रेष्ठ संस्था जिंकण्याचा तो माझा पहिला उच्चांक होता. न्यायमूर्ती श्री. पुराणिकांनी मला अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली पण मी ती मान्य न करता, पुराणिकांनीच अध्यक्षपद ग्रहण करण्याची उलट विनंती केली. मी मात्र पहिल्या खेपेला, चिटणीस झालो. आणि मग दर निवडणुकीला उच्चांक गाठत राहून त्या श्रेष्ठ वाचनालयाचा १९४७–१९५० पर्यंत चिटणीस, १९५०–५१ मध्ये उपाध्यक्ष आणि मग १९५१–५२ साली अध्यक्ष बनलो. त्यामुळे मला विद्याव्यासंगाचे व लेखनकार्याचे एक मोठे व्यापक व प्रभावी क्षेत्र प्राप्त झाले.

त्यानंतर मी साहित्यिक व सांस्कृतिक संस्थांचे गड जिंकतच गेलो. न्यायमूर्ती श्री. के. तु. मंगळमूर्ती अध्यक्ष असलेले ' नाटचनिकुंज मंडळ ' : १९५१–५३ मध्ये चिटणीस, त्याच काळी ' ब्राह्मण सारस्वत मंडळा 'चा अध्यक्ष, १९४८–५६ मध्ये ' स्नेहसंवर्धक मंडळा 'चा अध्यक्ष, युगान्तर ' शिक्षण संस्था ' : १९५३–५८ मध्ये कोषाध्यक्ष, ' नागपूर युनिव्हर्सिटी कोर्ट ' : १९५७–६३ पर्यंत सभासद : ' नागपूर पत्रकार संघ ' १९५०–६२ पर्यंत चिटणीस, ' महाराष्ट्र हिंदी राष्ट्रभाषा सभा ' १९५८–६१ पर्यंत सभासद, ' नवभारती बहुउद्देशीय समाज सेवा संस्था ': १९५८–६६ पर्यंत सभासद, ' मराठी साहित्य महामंडळ ' : १९६१–६५ पर्यंत सभासद, त्याव्यतिरिक्त १९६१–६५ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या टागोर जन्म शताब्दी महोत्सव समितीचा आणि त्याच वर्षी तमाशा महोत्सव समितीचा सभासद, व १९६१–६३ मध्ये शासकीय ' लोकसाहित्य समिती 'चा सभासद अशा विविध संस्थांत राहून भाषा, साहित्य, कला व संस्कृतिसंवर्धनाचे समाजपोषक कार्य मला करता आले. त्यामुळेही माझ्या लेखणीला आणि वाणीला विस्तृत क्षेत्र लाभून, माझ्या लेखनाला गती तर मिळालीच पण ते तेजोवर्धितही झाले.

* *

इतरांपेक्षा आपण रतिमात्र कमी नाही, असा माझा स्वाभिमान आहे. न्यूनगंड तर मला मुळीच मान्य नाही. लीनतेने वागणे मी समजू शकतो पण कमीपणाने वागणे व लाचारी दर्शविणे मला उचित वाटत नाही. अंगी कसले

कर्तृत्व नसताना वा पुरते ज्ञान व अनुभव नसताना बुद्धिवाद आणि युक्तिवाद मला खपत नाही. मी मोठा संतापी आहे. कुणावर अन्याय झाला वा कुणाचा अपमान झाला अथवा कुणाला हीन लेखण्यात आले तर मी फसफसून फणाच काढतो. जमदग्नीचा अवतारच धारण करतो. त्या वेळी मजजवळ दयामाया नसते; एक तर 'मी कुणास' शब्द देत नाही आणि दिला तर तो मी पराकाष्ठेने पाळतो. पण कोणी मला शब्द देऊन, हे ना ते कारण दर्शवीत तो पाळला नाही तर मी त्याची कसलीही गय करीत नाही, असे अनेक दोष माझ्यात आहेत. आपल्या धवल कर्तृत्वाने, नि:स्वार्थ तरल बुद्धिमत्तेने आणि शालीनतेने आपल्याला इतरांची मने जिंकता आली पाहिजेत. मी माझ्या जीवनात या दिशेने निर्धारपूर्वक वाटचाल केली आहे. त्या वेळी यशापयशाची, जयपराजयाची आणि पाप–पुण्याचीही पर्वा केली नाही. पवित्र मनाला साक्षीला ठेवून मी माझे पाऊल पुढे टाकले आहे. १९४८ साली, डॉ. वि. भि. कोलते यांच्या अध्यक्षतेखाली गोंदिया येथे विदर्भ साहित्य संघाचे अधिवेशन संपन्न झाले होते. बिहारचे त्या वेळचे विद्वान राज्यपाल लोकनायक बापुजी अणे हे त्या सम्मेलनाच्या उद्घाटनासाठी आले होते. 'मराठी वाङमयापासून माझी अपेक्षा' या विषयावर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. श्री. पु. ल. देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख व दे. भ. श्री. मा. ज. कानेटकर असे पट्टीचे विद्वान त्या विषयावर भाष्य करणार होते. चवथा विद्वान साहित्यिक वेळेवर अनुपस्थित होता. कसल्या तरी नशेत कुठेतरी तो लोळत पडला होता. ती उणीव भरून काढावी म्हणून, अध्यक्षांनी ऐन वेळेवर, माझी कसली तयारी नसताना त्या विषयावर भाष्य करण्याची विनंती केली. आधीच्या वक्त्यांची विद्वत्ताप्रचुर भाषणे झाल्यावर, शेवटी माझे मोठे कडवट व जहाल भाष्य झाले. मी माझ्या आवेशात म्हटले, 'मराठी वाङमयाने आजपर्यंत काहीच साध्य केले नाही.' मोजके विद्वान भक्तीचा फेर धरून घुटमळत आहेत; त्याचा प्रवाह खेड्या-पाड्यापर्यंत पोचलाच नाही आणि त्याने ग्रामीण जनतेला जागृत करून, त्यांचे दाहक जीवन फुलविले नाही. विद्वानांनी शहराच्या एखाद दुसऱ्या सभेत मोजक्याच श्रोतृवृन्दापुढे विद्वत्तापूर्ण भाष्य करून, स्वत:चीच पाठ थोपटून घ्यावी, एवढेच काय ते! मराठी वाङमय निश्चित समृद्ध आहे पण त्याचा पावन प्रवाह खेड्या-पाड्याच्या उद्धारार्थ, ग्रामीण विभागात अखंडपणे वाहत असला पाहिजे, अजूनही संत ज्ञानेश्वराला कडीकुलपे लावून, उच्चवर्णीयांनी आपलेच धन समजून, तिजो-रीत कोंडून ठेवला आहे. सर्वसामान्य जनतेपुढे तो येऊच शकला नाही, हे लक्षण काही शुभ नाही आणि म्हणून संतांची, विद्वानांची व साहित्यिकांची लेखणी आणि वाणी खेड्यापाड्यापर्यंत पोचून दुमदुमली पाहिजे. या माझ्या साहित्याच्या व्यास-पीठावरील पहिल्याच छोट्या पण प्रभावी भाषणाने, विदर्भ साहित्य संघाच्या

प्रयत्न केला खरा पण बाजू त्यांच्यावरच उलटली आणि माझ्या व्यक्तित्वाचे व साहित्यसाधनेचे तेज मात्र अधिकच वृद्धिगत झाले.

प्रा. डॉ. तु. वि. गेडाम, प्रा. डॉ. मधुकर आष्टीकर, प्रा. डॉ. द. भि. कुळकर्णी, प्रा. डॉ. सौ. वसुधा धामणकर आणि प्रा. पु. ह. (मदन) धनकर या पाच विद्वानांनी माझ्या गेल्या ५०–६० वर्षांतील अध्यात्मसाधना, साहित्यसाधना व समाजसाधना या संबंधीच्या प्रदीर्घ तपस्येचे सम्यक दर्शन घडविणारा जो जाडा चरित्रग्रंथ निर्माण केला तोच मी काही अधिक सांगण्यापेक्षा आपल्याला काही सांगेल. आपल्याशी काही बोलेल आणि काही सुचवू शकेल.

⁂ ⁂

माझ्या उत्तरआयुष्यातील पर्वात आता उरला आहे केवळ माझा श्री शेषाश्रम. तेथे केवळ तेवत आहे एक श्रीशेष ज्योत व तेथे घिरटचा घालत आहे माझा केवळ एक शब्द ! आध्यात्मिक बैठकीवर आणि सांस्कृतिक व्यासपीठाच्या कल्पनेवर अधिष्ठित असलेला हा श्री शेषाश्रम. २८ जुलै १९६० रोजी नागपंचमीच्या शुभदिनी त्याची प्रतिष्ठापना झाली आणि संपूर्ण महाराष्ट्रात त्याने अल्पावधीतच चैतन्यमय व लोककल्याणकारी अशी पवित्र, पावन आणि वैशिष्टचपूर्ण कीर्ती संपादन केली. गेल्या वीस वर्षांपासून तेथे दर नागपंचमीला भव्य स्वरूपाचा आध्यात्मिक व सांस्कृतिक सोहळा संपन्न होत आला आहे. भाविकांचा नाही, बुद्धिवंतांचा. त्या सांस्कृतिक सम्मेलनाने शहर व खेडे यांचा दुवा जोडण्याचा प्रयत्न होतो. मानवतेचा पुरस्कार केला जातो, अनेक नामवंत साहित्यिक येतात, पत्रकार येतात, विचारवंत येतात आणि ग्रामीण जनताही येते. विविध विषयांवर चर्चा घडते. काही तरी प्रेरणा मिळते व लोककल्याणार्थ प्रवाहित होते. भगवान बुद्धाला— सिद्धार्थाला ज्या ' शेषा 'मुळे जे दिव्य ज्ञान प्राप्त झाले व मानवोद्धाराची जी गंगा निर्माण झाली, त्याचा या आधुनिक काळातील एक अगदीच छोटा पावन प्रवाह !

जीवनात मी काय कमविले आणि काय गमविले याचे गणित नाही. जिथे काही कमविलेच नाही तिथे ' शेष ' वा ' शिल्लक ' काहीच नाही. तरीसुद्धा महाराष्ट्रातील अनेक विद्वानांनी, साहित्यपंडितांनी, पत्रपंडितांनी आणि थोर नेत्यांनी माझ्यासारख्या खेड्यातील एका दगडावर स्तुतिसुमनांचा, सुगंधित भावात्तराचा वर्षाव केला ! मी १९५९ साली विदर्भ साहित्य संघाचा अध्यक्ष झाल्यावर, १९६० साली, महाराष्ट्रात दलितोद्धारासाठी ख्यातनाम असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील सावरगाव-डुकरे या गावी, १३ व १४ फेब्रुवारी १९६० रोजी विदर्भ साहित्य संघाचे बावीसवे साहित्य सम्मेलन फार मोठ्या स्वरूपात संपन्न झाले. त्या साहित्य सम्मेलनाचा मी अध्यक्ष व त्या वेळच्या द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असलेले श्री. यशवंतराव चव्हाण हे उद्घाटक. त्या वेळी माझ्या अध्यक्षीय भाषणात,

' मानवांच्या कल्याणार्थ सांस्कृतिक व्यासपीठ निर्माण करा ' अशी घोषणा केली होती आणि ' अज्ञात जगाचे शास्त्रीय संशोधन व्हावे ', ' साहित्यातील उदात्त व शाश्वत मूल्ये आविष्कृत व्हावीत ', ' लोकसाहित्याचे जतन व संवर्धन व्हावे ', ' वाङ्मय लोकाभिमुख असावे व ते खेड्यातील हृदयापर्यंत पोचावे ' आदी महत्त्व-पूर्ण बाबींचा मी उद्घोष केला होता. सम्मेलनाचे उद्घाटन करताना त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. चव्हाण यांनी, ' श्री संत चोखोबानंतर म्हणजे सुमारे ७०० वर्षांनंतर साहित्याचे श्रेष्ठ व्यासपीठ भूषविणारे श्री. शेंडे हे खालच्या थरातील पहिले साहित्याध्यक्ष होत, याचा मला अभिमान वाटतो '; असा गौरवपूर्ण उल्लेख केला. विद्वद्रत्न डॉ. के. ल. उपाख्य भाऊजी दप्तरी यांनी, ' आपल्या शक्तीने चकित करून सोडणारे श्री. शेंडे म्हणजे एक आध्यात्मिक शास्त्रच होय '; ' साहित्य-सम्राट ' श्री. न. चिं. केळकर यांनी, ' आपल्या ब्रह्मशक्तीने इतरांचा उद्धार करणारा '; वेदमूर्ती पं. सातवळेकर यांनी, लोककल्याणासाठी धाव घेणारी काही विशेष आध्यात्मिक प्रकृती व शक्ती '; डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, ' महार आणि ब्राह्मण यांचा दुवा साधणारा दमदार व कर्तृत्ववान साहित्यकार '; आचार्य सोनोपंत दांडेकर यांनी, ' आध्यात्मिक बैठकीवरील अधिष्ठानाचा व अमृतवाणीचा प्रभाव टाकणारा साहित्यिक ', पं. पाळेकर शास्त्री ' अप्रबुद्ध ' यांनी, ' आत्मतेजाचे ब्राह्मण्य राखणारा पुरुष '; श्री. वि. स. खांडेकर यांनी, ' साहित्याच्या सर्व क्षेत्रांत स्वैर संचार करणारा प्रतिभासंपन्न साहित्यिक '; श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी, ' स्वतंत्र वृत्तीचा व स्वयंप्रज्ञेचा साहित्यिक आणि महाराष्ट्रातील एक आध्यात्मिक पुरुष '; श्री. शंकराचार्य यांनी, श्री शेषसाधनेचा ऋषी '; प्रा. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांनी, ' आत्मतेज प्रकट करणारा एक प्रज्ञावंत '; प्रा. वि. स. मोहगावकर यांनी, ' आध्यात्मिक शक्तीचा एक प्रबल सत्पुरुष '; श्री. मामा वरेरकर यांनी ' अभिजात साहित्यनिर्मितीचा स्वयंप्रज्ञ व चतुरस्र लेखक '; डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी, ' अध्यात्मशक्ती व अतींद्रिय शक्ती यांचा लोककल्याणार्थ शोध व वेध घेणारा आत्मशक्तीचा एक पुरुष ' असे प्रशंसोद्गार काढले आहेत आणि १ डिसेंबर १९७५ रोजी महाराष्ट्राचे भूतपूर्व मंत्री श्री. बाळासाहेब तिरपुडे यांच्या अध्यक्षतेखाली माझा जो ६६ वा वाढदिवस साजरा झाला आणि त्याचप्रसंगी पाच विद्वानांनी संपादिलेल्या माझ्यासंबंधीच्या ' श्री. ना. रा. शेंडे; व्यक्ती आणि साधना ' या चरित्रग्रंथाचे तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते जे प्रकाशन झाले त्या वेळी न्यायमूर्ती डॉ. भवानीशंकर नियोगी यांनी माझा 'खरा बौद्धब्राह्मण' या विशेष उपाधीने गौरव केला आणि तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्या उपाधीला सप्रमाण पुष्टी देऊन, ' सरस्वतीचा एक तेजस्वी कण्ठमणी ' म्हणून सन्मान केला. प्रस्तुत प्रशंसोद्गार, आत्मस्तुतीसाठी किंवा दर्पोक्ती म्हणून दर्शविली नाहीत तर थोरांचा मजप्रती नितांत जिव्हाळा कसा होता तो प्रतीत करून, त्या

हृदयवंतांसंबंधी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नमूद केले आहेत.

अध्यात्म, साहित्य आणि संस्कृतीसंबंधी माझे काही संकेत आहेत, काही सिद्धांत आहेत. माझ्या अनुभूतीतून व्यक्त झालेल्या त्या संकेतांचा व सिद्धांतांचा मी माझ्या जीवनसाहित्यात आविष्कार करण्याचा प्रयत्न केला आहे. काही संकेत व काही सिद्धांत असे :

* *

– इतरांनी आपल्यासाठी काय चांगले केले हे पाहण्यापेक्षा आपण इतरांसाठी काय चांगले करू शकतो हे पाहणे महत्त्वाचे. स्वतःचे जीवन कुस्करले गेले तरी चालेल पण दुसऱ्याचे जीवन थोडे जरी फुलविता आले तर ते मोठे भाग्याचे !

– जोपर्यंत अंतर्मनाची ज्योत तेवत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने ज्ञानदर्शन घडत नाही, जोपर्यंत खऱ्या अर्थाने ज्ञानदर्शन घडत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने बुद्धी प्रगल्भ होत नाही आणि जोपर्यंत खऱ्या अर्थाने बुद्धी प्रगल्भ होत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने जीवनाला आकार येत नाही आणि जोपर्यंत खऱ्या अर्थाने जीवनाला आकार येत नाही तोपर्यंत व्यक्तित्वाची दीप्ती तळपत नाही.

– जोपर्यंत तेजस्वी लेखणी आणि प्रभावी वाणी कमाविली जात नाही तोपर्यंत विद्वत्ता आणि बुद्धिमत्ता सिद्ध करता येत नाही आणि त्याशिवाय प्रज्ञाशक्ती प्राप्त होत नाही. प्रज्ञाशक्तीनेच धवल कर्तृत्वाचे तेज प्रकट होत असते.

– आजचा उपासक उद्याचा प्रवर्तक बनला पाहिजे. उपासकाची भूमिका तपस्येची–साधनेची असावी, त्याशिवाय त्याला प्रवर्तकाची महत्ता प्राप्त होणार नाही.

– मनुष्याचे पवित्र मनच त्याची शक्ती आहे. त्या पवित्र मनाला विचार आणि पाऊल पुढे टाक, तुझा मार्ग तुला सापडेल.

– आपल्या सत्कृत्यांनी जीवनात मंगलत्व निर्माण करण्यातच तेजस्वी व्यक्तिमत्त्व सिद्ध होते, त्यातच खरा पुरुषार्थ आहे.

– आपल्या पवित्र मनाला साक्षीला ठेवून कोणतीही गोष्ट सद्भावनेने केली तर डगमगण्याचे काही कारण नाही.

– दारिद्र्यातच जीवन कसाला लागणारी बीजे रुजली असतात. सहनशीलतेने आणि परिश्रमाने ती अंकुरित होतात. कर्तव्याचा विशाल वृक्ष निर्माण होतो.

– श्रीमंतीच्या तोऱ्यात, सत्तेच्या गुर्मीत आणि विद्वत्तेच्या अहंकारात अधःपतनाची वाट निर्माण होत असते.

– सदाचाराच्या किल्लीने मोक्षाची द्वारे उघडली जातात आणि पुण्याच्या राशी पायावर लोळण घालतात.

– देवाच्या चरणी चार फुले वाहण्यापेक्षा जिव्हाळ्याच्या चार शब्दांनी,

दु:खितांचे सांत्वन करा म्हणजे देवाच्या चरणीच फुले वाहिल्याचे पुण्य पदरी पडेल.

– आध्यात्मिक बैठकीशिवाय सांस्कृतिक जीवन उन्नत होत नाही आणि सांस्कृतिक जीवनाच्या उदात्ततेशिवाय व्यक्तित्वाची उंची सतेज व प्रभावी ठरणार नाही.

– अध्यात्म म्हणजे लोककल्याणकारी प्रकृती. अध्यात्माच्या तपोबलाने निसर्गशक्ती प्राप्त केल्याशिवाय आत्मबल प्राप्त होऊ शकत नाही.

– अध्यात्माची उंची मनाच्या व बुद्धीच्या अलीकडील नव्हे तर पलीकडील एक प्रबल शक्ती आहे. अध्यात्मशक्ती व अतीन्द्रियशक्तीच्या सत्त्वाने लोककल्याण साधता यावे.

– स्त्री हीच संस्कृती, तीच नीती, नीतीला सत्त्वशक्तीचा आधार लागतो. पैशाने आणि सत्तेने स्त्रीत्व लाभत नसते.

– नियतीच्या मनात दुसऱ्या क्षणाला काय घडवून आणायचे असेल हे कोणालाच सांगता येत नाही. म्हणून एव्हानाच नियतीची चाहूल लक्षात घेऊन, जपून पावले पुढे टाका.

※ ※

आत्मलक्षी होऊन मी जेव्हा स्वत:संबंधी विचार करतो तेव्हा माझा 'मी' कोणीच उरत नाही. २५ मे १९७५ रोजी बौद्धपौर्णिमा होती. त्या मंगल दिनी तिन्ही सांजेला तीन विद्यासंपन्न युवती मला भेटायला माझ्या श्रीशेषाश्रमात आल्या. तिघींना तीन संदेश हवे होते. ज्ञान, बुद्धी आणि प्रज्ञाशक्तीसंबंधी. त्यांनी परोपरीने विनंती केल्यावर, मी श्रीशेष देव्हाऱ्यापुढे चार वस्तू ठेवल्या. कागद–पेन्सिल, आम्रफल, रुपया–खारीक आणि विषाची एक कुपी. कोणतीही एकेक वस्तू उचलायला मी सुचविले. एकीने कागद–पेन्सिल, दुसरीने आम्रफल, आणि तिसरीने रुपया-खारीक घेतली. विषारी कुपीला मात्र कोणी स्पर्श केला नाही. संकेतदर्शक तिन्हीही वस्तूंचे महत्त्व विशद करून, मी जरा रोषाने विचारले,

'विषाची कुपी कोण घेणार ?'

या प्रश्नाने त्या युवतीचा थरकाप झाला. कसलेच उत्तर मिळाले नाही. त्या विषारी कुपीकडे अंगुलिनिर्देश करीत मी म्हटले–

'जीवनात सर्वांना स्वकल्याणाचेच सर्व काही हवे. दु:खितांचे दु:ख–क्लेश नष्ट करण्यास; अन्याय, छळ, विषमता, अत्याचार दूर करण्यास करावा लागणारा नि:स्पृह त्याग; सोसावा लागणारा कस; सिद्ध करावी लागणारी माणुसकी कोणालाही नको. एका आध्यात्मिक पवित्र बैठकीवरून, अन्तर्मनाची ज्योत प्रज्वलित करून, लोककल्याणार्थ प्राशन करावे लागणारे हलाहल पचविण्याचे सामर्थ्य जोपर्यंत मनुष्यमात्राच्या ठायी येणार नाही तोपर्यंत ज्ञान, बुद्धी आणि

प्रज्ञाशक्ती आविष्कृत होणार नाही. वस्तुतः विषाची कुपी कल्याणकारी सत्कृत्याचे पावन प्रतीक आहे ! पण सेवाव्रताच्या त्या विषाच्या कुपीला सहसा कुणी स्पर्श करीत नाही. ती विषाची नव्हे अमृतमय कुपी मलाच पचविली पाहिजे–

'त्या जहरी कुपीचा आजही मी धनी आहे !'

आणि त्या सुविद्य ब्राह्मणकन्यांना माझा संदेश : 'जोपर्यंत अन्तर्मनीची ज्योत प्रज्वलित होत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने ज्ञानदर्शन घडत नाही; आणि जोपर्यंत खऱ्या अर्थाने ज्ञानदर्शन घडत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने बुद्धी प्रगल्भ होत नाही; आणि जोपर्यंत खऱ्या अर्थाने बुद्धी प्रगल्भ होत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने जीवनाला आकार येत नाही; आणि जोपर्यंत खऱ्या अर्थाने जीवनाला आकार येत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने व्यक्तित्व तळपत नाही.'

१ डिसेंबर १९७५ रोजी, माझ्या ६६ व्या वाढदिवसाच्या सत्कार–समारंभ प्रसंगी उत्तर देताना प्रांजळपणे आत्मभाव व्यक्त केला.

मी माणूस नाही.

माझी साठी उलटली असली तरी माणुसकीची–मनुष्यत्वाची कोणतीच लक्षणे माझ्यात नाहीत.

मी माझ्या आयुष्यात कोणाचे कसलेच कल्याण साधू शकलो नाही. म्हणून मी समाजाचा अपराधी आहे. विश्वासपात्र नसलेला एक गुन्हेगार आहे.

माझी पात्रता, माझी योग्यता आणि माझी शक्ती मी जाणून आहे. माझ्या मर्यादा मी उमगून आहे.

मी कुठे व कसा उभा आहे आणि कोणत्या दिशेला किती वेगाने मला जायचे याची मला पूर्ण कल्पना आहे.

मी साहित्यकार नाही आणि अध्यामवादीही नाही. जी आढळते ती केवळ बगडी झिलई आहे. खरोखरीच मी एक कोरा कागद आहे.

आणि–

अजूनही शून्यातच आहे !

* *

आज मी ७२ वर्षांचा आहे; पण 'मी कोण'? हे माझे मला अजूनही उमगले नाही. प्रश्नचिन्हात माझे मनोद्रव्य दडले आहे. कोऽहं नी सोऽहं या चक्रगतीत मी गुरफटलेलो आहे. अध्यात्म-साधना आणि साहित्य–साधना या दोन्हींच्या संगमावरील मी एक रेखा असू शकेन पण जी रेखा उद्धारक नसेल माणूस या शब्दसंज्ञेने मी कदाचित जगत असेन पण माणुसकीच्या मर्यादेचे पालन मजकडून घडत नसेल. मी जसा दिसतो तसा नाही; मी जसा वदतो तसा उरत नाही आणि जसा चालतो तसा आढळत नाही, असा अनेकांचा आक्षेप राहू शकेल. त्या

आक्षेपाचे खंडन करण्याची माझी प्रज्ञाच नाही. माझे विविध रंग आणि ढंग आहेत आणि अनेकांना ते अनेक रूपांत बहुधा आढळतही असतील; पण, मी आहे तिथेच उभा आहे. ' अदिती 'ची मला जाण नसेल आणि ' चिद्‌विलासा 'चा मला कसला स्पर्श झाला नसेल; आणि म्हणून, मी जेथे उभा आहे, स्थिर आहे, तेथे माझे कृतिशून्य लेखनही अचेतनावस्थेत नेत्र मिटून उभे असू शकेल; पण, माझ्या पेट घेऊन उठलेल्या जीवनाची राख कसली चेतना देणारी नसेल असे मात्र नाही. जडत्वातील जीवात्मा सूक्ष्म रूपाने अंगार निर्माण करण्याचे सामर्थ्य राखू शकणार नाही आणि तेज व वायू गतिशील करू शकणार नाही, असेही ठामपणे प्रतिपादन करता येणार नाही. माझ्या तब्बल ५० वर्षांच्या प्रदीर्घ लेखनकालखंडात पूर्वेचा उगवता किरण आणि पश्चिमेचा मावळता किरण अन्तर्मनाने हृत्पटली टिपण्याचा यत्न केला असला तरी अंधार आणि उजेड याचे स्वप्न त्याने आकारले नसावे. पर्यावरणातील एखादी सत्त्वशक्तीची चैतन्यलहर अंकित करून, अध्यात्माच्या बैठकीवर साहित्याचे एक कोरे पान त्याने ठेवले नसेल, असे मात्र म्हणता येणार नाही.

म्हणून, शून्यातील जीवनस्वप्न सुप्तावस्थेतच विरल होत गेले आहे. ते जागृत नाही म्हणजेच सचेतनाने ते उज्ज्वल झाले नाही या जाणिवेने शून्यातील ध्वनी त्याला ऐकायला येत नसेल !

१९७५ साली, प्रा. डॉ. मधुकर आष्टीकर, प्रा. डॉ. द. भि. कुळकर्णी, प्रा. डॉ. तु. वि. गेडाम, प्रा. डॉ. सौ. वसुधा धामणकर, आणि प्रा. पु. ह. धनकर या पाच पंडितांनी ' श्री. ना. रा. शेंडे : व्यक्ती आणि साधना ' हा ४५० पृष्ठांचा चरित्रग्रंथ संपादित करून तो प्रकाशित केला तेव्हाच माझ्या ५० वर्षांतील लेखन-कार्याच्या पूर्णविरामाचे ते द्योतक ठरायला हवे होते पण तसे घडले नाही. मजसंबंधीच्या चरित्रग्रंथाने एक कोलांटी काय ती घेतली आणि मग आध्यात्मिक बैठकीवरून सांस्कृतिक व्यासपीठाचा आविष्कार करू पाहणाऱ्या माझ्या गणेशपूर गावातील श्रीशेषाश्रमाकडे त्याच वर्षी माझी पावले वळली. माझ्या जीवन-नाटकातील त्या शेवटल्या टप्प्यात ' नायक ' कसला खलनायकच म्हणून माझी भूमिका वठू लागली. मी आश्रमात प्रवेश केला तेव्हा एक लखोटा हाती पडला. औरंगाबादहून प्रसिद्ध होणाऱ्या ' अस्मितादर्श ' या नियतकालिकाचे संपादक प्रा. गंगाधर पानतावणे यांचा दिवाळी अंकासाठी ' मी आणि माझे लेखन ' या विषयावर विस्तृत लेख पाठविण्याबाबत मागणी करणारा तो लखोटा. आणि मग माझ्या अर्धशतकातील लेखनकार्याचा एक आलेख नजरेपुढे तरळला. माझ्या लिखाणाची दिशा, कक्षा, गती आणि ईप्सित केन्द्र यांचे एक वलय आकारले गेले आणि मग मी तो प्रदीर्घ लेख माझ्या नित्याच्या परिपाठानुसार श्रीशेषाश्रमाच्या सभामंडपी बसून एकाच बैठकीत लिहून काढला; अगदी संक्षिप्त योजना

आखूनही तो साठसत्तर पृष्ठांची एक पुस्तिकाच होईल एवढा विस्तृत झाला. आणि तो एकाच वेळी, १९७६ च्या 'अस्मितादर्श' व 'महासागर'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला. 'मी आणि माझे लेखन' हा विषयच आत्मपर भावदर्शनाचे एक अंग असल्याने आत्मस्तुतीची जोखीम मी लक्षात घेतली आणि वस्तुस्थितीचा प्रांजळपणा राखण्याचा मी प्रयत्न केला. आत्मलक्षी होऊन, पवित्र हृदयाच्या साक्षीने मी माझे लेखन दिग्दर्शित करीत आलो आहे; अर्थातच आध्यात्मिक बैठकी-शिवाय त्याचा आदी अन्त होत नाही. स्वच्छ व शुभ्र कागदावर रेघोटी ओढण्यापूर्वी हृदयाच्या बिलोरी आरशात वास्तवतेच्या चित्राचे प्रतिबिम्ब उमटवूनच, अन्तर्मुखातून ते बहिर्मुखी व्हावे; आणि मग, ती कागदावरील रेघोटी लेखणीच्या एका टोकाने आविष्कृत करता आली पाहिजे. विशिष्ट आकारासह त्या लेखनाचा घाट, थाट व डौल सूक्ष्मातून अनंताकडे जाणाऱ्या समाजजीवनाच्या वाटेने, स्वतःचा तोल जाऊ न देता, त्याची वाटचाल निर्विकार व निरहंकारी असावी, त्याने आपल्या मर्यादेचे उल्लंघन करता कामा नये आणि आत्मप्रौढीचे प्रदर्शनही मांडू नये; त्याशिवाय तेजस्वी लेखणीच्या साक्षात्काराचे वास्तवदर्शन घडू शकणार नाही. प्रतिभेची प्रभा आणि कल्पनाशक्तीची दीप्ती, लेखकाच्या हृदयसौंदर्याच्या विलासातून आणि उदात्त मनाच्या चिंतनातून, आविष्कृतच नव्हे तर अलंकृतही झाली पाहिजे. या माझ्या लेखणीने पन्नाशी ओलांडली आहे.

१९७६ पासून मी माझ्या श्रीशेषाश्रमात जर्जरावस्थेत वास्तव्याला आहे. मी देहाने खूप थकलो आहे; हृदयविकार नि कमी रक्तदाब यांनी माझे मर्त्य शरीर खंगले आहे पण पवित्र मन मात्र भंगले नाही आणि माझ्या लेखणीनेही अंतिम विसाव्यासाठी उशीवर आपली मान टेकली नाही. माझ्या पाठीचा कणा वाकला आहे पण लेखणीचा कणा अजून ताठ आहे. मी कण्हतो आहे पण ती कसल्या तरी चैतन्याने हसत आहे. ती माझ्या हृदयाला बिलगून ऊब देत आहे आणि म्हणूनच तिच्या चैतन्ययुक्त आधारावर मी आजच्या या बहात्तरीतही दिमाखाचे बोल ध्वनित करण्याचे मनोधैर्य राखत आहे. प्रखर अनुभूती आणि सखोल व्यासंग राखून माझ्या सत्त्वशील लेखणीने, जबर माराने जखमी होऊनही मला साहित्याच्या रणांगणात 'अजिक्य योद्धा' म्हणून किताब बहाल करण्याची किमया केली आहे !

माझ्या या उत्तर–आयुष्याच्या अखेरीला गणेशपूर गावातील आध्यात्मिक प्रकृतीच्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींचा अगदी निकटचा हितसंबंध प्रस्थापित झाला. श्री. शिवशंकर सोनकुसरे आणि श्री. रामकृष्ण सोनकुसरे हे ते सुहृद बन्धुद्वय. तसे ते अत्यंत तलमी कोसा–कापडाचे व्यवसायी, मोठे व्यापारी पण कोशाचा अत्यंत नाजुक व अत्यंत सुबक धागा निर्माण करताना, त्यांनी आपल्या आध्या-त्मिक प्रकृतीचा एक रेशमी धागा माझ्या श्रीशेषाश्रमाच्या आध्यात्मिक बैठकीला

बांधला आणि त्याबरोबरच वाङमयीन अभिरुचीची पोषक वृत्तीही दर्शविली. एक श्रीशेष ज्योत त्या बन्धुद्वयांनी आत्मीयतेने प्रज्वलित केली आणि मग 'श्रीशेष प्रकाशन' नावाची एक संस्था १९७७ मध्ये निर्माण केली. ग्रामीण विभागात निर्माण झालेली ही पहिलीच प्रकाशनसंस्था असावी. श्री. शिवशंकर सोनकुसरे हे या संस्थेचे संचालक तर श्री. रामकृष्ण सोनकुसरे हे दमदार प्रकृतीचे प्रकाशक. त्यांनी मला दोन कादंबऱ्यांची मागणी केली आणि निर्धारित अवधी दिला. त्या अल्पावधीत दोन स्वतंत्र कादंबऱ्यांची निर्मिती करणे दुष्प्राय होते तरी प्रकाशकाची जिव्हाळ्याची व तळमळीची हाक लक्षात घेऊन, मी शब्द दिला.

* *

त्याच सुमारास एका अत्यंत शालीन पण देखण्या तरुणीची मला आर्त हाक आली. तिच्या अब्रूवर सुविद्य गुंडांनी कसा घाला आणला याची अगदी हृदयभेदक कहाणी तिने अश्रू ढाळत मला निवेदिली. त्या अत्यंत करुण सत्य घटनेने माझे हृदय पिळवटून निघाले. आता जगण्यात अर्थ नाही. आत्महत्या हाच एक मार्ग असल्याचे तिने निर्धारपूर्वक दर्शविले. मी तिला दिलासा दिला. आणि आत्महत्येपासून तिला परावृत्त करण्याचा आध्यात्मिक बैठकीवरून प्रयत्न केला. बलात्काराचे ते निर्घृण चित्र मला सारखे बोचू लागले. त्या वेळी मी सोनकुसरे बन्धूंसह चाप्याला जायला निघालो होतो. गाडी भर वेगाने जात होती पण त्या तरुणीचे अमानुषतेने कलंकित झालेले चित्र माझ्या नजरेपुढे सारखे तरळू लागले. मोठे तीव्र शल्य होते ते. स्त्रीचे शरीर एकदा अपवित्र झाले की तिला मूळचे पावित्र्य पुन्हा कधीच प्राप्त होऊ शकत नाही; एकदा स्त्रीत्व डागळले की पुन्हा ते मंगलत्वाने मंडित होत नाही; एकदा स्त्रीसत्त्वाची लूट झाली की पुन्हा ते विशुद्ध सत्त्व लाभू शकत नाही. धावत्या गाडीत माझ्या विचारांचा व भावनांचा वेग सैरावैरा धाव घेत होता. मनात उलट सुलट कल्पनांचे भावतरंग उठू लागले. आणि त्यातच माझ्या 'गायत्री' या कादंबरीची रूपरेषा तयार झाली. पण वास्तवतेचा नीट थांग लावून घेतल्याशिवाय कादंबरीची वास्तवदर्शी घडण घडविणे मला शक्य नव्हते. केवळ कल्पनेच्या भरारीवर मला बेगड कादंबरी निर्माण करायची नव्हती. तसा माझा कल्पित पिंडच नाही. माझ्या आध्यात्मिक पिंडाला वास्तवताच हवी असते, वस्तुस्थितीचे दर्शन त्याला हवे असते. त्याशिवाय माझी लेखणी पुढे सरकत नाही, तिला तेज प्राप्त होत नाही.

त्या विचारतंद्रीतच मी चाप्याला गेलो खरा पण मन अगदी उद्विग्न नि अस्वस्थ होते. माझी मन:शांती ढळली होती. माझी व्यथा मी प्रकाशक सोनकुसरे बंधूंना दर्शविली आणि मग चाप्याचे एक हृदयवंत सेठ लखनलाल यांना सोबतीला घेऊन, त्यांनी मला बिलासपूर जिल्ह्यातील ब्रह्मावर्त या

वृषभतीर्थ क्षेत्री नेले. त्या रम्य स्थळी ' गायत्री 'च्या कथानकाची जुळवाजुळव करण्याचा प्रयत्न केला. पण समाधान मात्र झाले नाही. दोन दिवसांनी मी परतलो आणि गायत्रीसंबंधीच्या घटनास्थळांना भेटी देऊन माहिती उपलब्ध करून घेण्याचा प्रत्यक्ष यत्न केला.

विशेषत: नागपूर, रामटेक व नगरधनमधील वस्तुस्थिती मी जाणून घेतली. गणेशपूरचे श्री. शिवशंकर सोनकुसरे व रामटेकचे श्री. गुलाबराव लारोकर हे माझ्या साथीला होते. जिथून कथानकाचे चक्र प्रवर्तित झाले त्या नगरधनला मी विशेष केन्द्रस्थान मानून, कथानकाची वास्तवदर्शी घडण निर्माण केली आणि आत्महत्येपासून परावृत्त झालेली ' गायत्री ' निसर्गाच्या एका सत्त्वशक्तीवर एक तेजस्विनी म्हणून उभी राहिली. आणि मग, रामटेकच्या रामगिरीवरील कवि-कुलगुरू कालिदासांच्या भव्य स्मारकस्थळी ' गायत्री 'ही कादंबरी ' श्रीशेष प्रकाशन ' तर्फे प्रकाशात आली. त्या हृद्य प्रसंगी डॉ. आशा सावदेकर, डॉ. सौ. शकुंतला खोत, श्री. प्रभूदेसाई, श्री. श्रीकृष्ण चांडकप्रभृती विचारवंत साहित्यिकांनी ' गायत्री ' या प्रभावी कादंबरीने, स्त्रीजातीला आजपर्यंत न लाभलेला गायत्री मंत्र, आता या आधुनिक काळात प्राप्त झालेला एक वरदानच होय; स्त्रीसत्त्व जागृत करणारी कादंबरी म्हणजे एक प्रबल शक्तीच होय' अशा प्रेरक शब्दांत ' गायत्रीचा 'चा हृदयपूर्वक गौरव केला.

' स्त्री, निसर्गाचे प्राकृतिक खेळणे आहे काय ?' असा एक प्रश्न उपस्थित करून, ' स्त्री ही निसर्गाची प्रबल सत्त्वशक्ती आहे; ती सुप्तावस्थेत आहे, आणि म्हणून आता ती सत्त्वशक्ती प्रखरतेने जागृत झाली पाहिजे, ' असा एक संकेत मी दि. ३ ऑक्टोबर १९३८ रोजी पूर्णत: निर्माण केलेल्या माझ्या पहिल्याच ' शृंगारलेलं प्रेत !' या सामाजिक कादंबरीत प्रकर्षाने दर्शविला होता. तो विजया-दशमीचा शुभ दिन होता. त्या दिवशी साहित्यपंडित श्री. ग. त्र्यं. उपाख्य भाऊसाहेब माडखोलकर यांच्या उपस्थितीत, नागपूरच्या ताजबाग येथे ' स्त्रीसत्त्व-शक्ती ' वर मी भाष्यही केले होते. ' शृंगारलेलं प्रेत !' ही माझी प्रथम कादंबरी मी अविलंब प्रसिद्ध करावी, ते काम आम्ही स्वत: करतो, असे श्री. भाऊसाहेब माडखोलकर व सौ. शांताबाई माडखोलकर यांनी आग्रह धरला आणि त्या वेळचे प्रसिद्ध ' वीणा प्रकाशन 'चे विद्वान प्रकाशक श्री. ब. गो. उपाख्य राजाभाऊ गर्गे यांनी ती कादंबरी आम्ही आपल्या प्रकाशनातर्फे प्रकाशित करतो, अशी इच्छा दर्शविली होती पण मी नकार दिला. मी माझ्या उत्तरआयुष्यात मृत्यूची सावली येऊ घातली असताना प्रसिद्ध करीन, कसल्याही प्रसिद्धीची मला घाई नाही, त्या कादंबरीच्या प्रकाशनाला एका आध्यात्मिक संधीची मी निश्चितच वाट पाहीन व ती संधी माझ्या तर्कानुसार, माझ्या मृत्यूपूर्वी कदाचित लाभू शकेल, असे उत्तर मी हितचिंतकांना दिले होते, याचे आज अभावितपणेच स्मरण होत आहे.

‘ शृंगारलेलं प्रेत ! ’ ही कादंबरी आता ‘ श्रीशेष प्रकाशन ’ तर्फे माझ्या या उत्तर आयुष्याच्या शेवटी प्रकाशित होत आहे, याचे समाधान मला वाटते.

* *

१९७८ हे वर्ष माझ्या साहित्यलेखनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले. ‘गायत्री’ या कादंबरीबरोबरच ‘ काजळी रात्र ! ’ आणि ‘ तांबडा दगड ! ’ या माझ्या दोन कादंबऱ्यांची द्वितीय आवृत्ती प्रसिद्ध झाली. ‘ श्रीशेषप्रकाशन ’ ने ‘ काजळी रात्र ! ’ या कादंबरीची द्वितीय आवृत्ती काढून, ‘ गायत्री ’ या कादंबरीबरोबर रामगिरी-वरील कविकुलगुरू कालिदास यांच्या स्मारकस्थळीच प्रकाशित केली. आणि, नागपूरच्या ‘ सुनील प्रकाशन ’चे श्री. सुनील टांकसाळे व श्री. अनिल टांकसाळे या तरुण बन्धुद्वयांनी ‘ तांबडा दगड ’ या कादंबरीची द्वितीय आवृत्ती त्याच सुमारास प्रसिद्ध केली. त्या पाठोपाठ ‘ दलितांचे जग : वेदना आणि शिष्टाई ’ या माझ्या गाजलेल्या निबंधसंग्रहाची दुसरी आवृत्तीही ‘ सुनील प्रकाशन ’ने प्रकाशित केली.

या वृद्धापकाळात माझे चिंतन व लेखन अव्याहत चालूच आहे. आध्यात्मिक बैठकीवरून समाजप्रबोधनाचे माझे कार्य तारुण्याच्या त्याच पूर्वीच्या जोषाने व जोमाने चालूच आहे. ‘ विश्रांती ’ वा ‘ विसावा ’ मला अजून तरी घेता आला नाही. तो लाभायचाच झाला तर माझे मनोद्रव्य निसर्गात विलीन झाल्यावरच लाभू शकेल. प्रकृतीने खंगत जात असताही—जराजर्जर होऊन धापा टाकीत असतानाही अथवा आजाराने खाटेवर तळमळत पडलो असतानादेखील माझ्या चिंतनात व लेखनात मी कसला खंड पडू दिला नाही. या वयाच्या ७२ व्या वर्षीही दिवसाच्या चोवीस तासांपैकी केवळ दीड ते दोन तास आणि तेही पहाटे ४ ते ६ या प्रहरात मी माझा देह गोधळीवर लवंडून घेतो. एवढेच काय ते. पण हेही एका घटकेचे पहुडणे रोजच मला लाभत नाही. रोजच रात्रीचे जागरण होत असते. पण त्या जागरणात सृष्टी नि समष्टी सुप्त असते. तेथे मला जागृतावस्थेला चैतन्याची ऊब द्यावी लागते. माझ्या वयाचा एकेक दिवस जसा वाढत जातो तसतसा माझ्या आयुष्याचा एकेक दिवस कमी कमी होत जातो. तो वाढदिवस नसतो ढळता दिवस असतो. आयुष्याचा एकेक क्षण जसजसा घटतो तसतसे माझ्या जीवनायुष्याची क्षती होत जाते, याची मला बालपणापासूनच जाणीव आहे. तो एकेक क्षण मला वाया दवडू द्यायचा नसतो. तो चैतन्ययुक्त व्हावा आणि त्या चैतन्यातून निरामय आनंदाचा उपभोग घेता यावा; तो आनंद स्वतः घ्यावा व दुसऱ्यालाही तो उपलब्ध होऊ शकेल, असा ध्यास राखावा, असे माझे धोरण आजही चालूच आहे. स्वतः समर्थ व्हावे व दुसऱ्यालाही समर्थ करण्याची प्रज्ञाशक्ती अंगी बाणावी, हे जीवन-सूत्र मी राखण्याचा आयुष्यात प्रयत्न केला आहे. ज्ञेय आणि श्रेय यांच्या दिशेने

मनाला धाव घ्यायला लावत असताना जीवनात समाजकल्याणाची श्रुती आणि स्मृती सचेतनकारी करणे व उद्धारक वाटेने तिला दूरवरचा प्रभावी पल्ला गाठता यावा आणि त्या फलश्रुतींत मानवता आविष्कृत व्हावी, अशा धारणेने माझ्या लेखनाची आध्यात्मिक बैठक असते.

मुंबईच्या महाराष्ट्र बौद्धसाहित्य परिषदेशी माझा गेल्या १५–२० वर्षांपासूनचा निकटचा हितसंबंध. १९६५ मध्ये सांगली येथे भरलेल्या महाराष्ट्र बौद्धसाहित्य परिषदेच्या सम्मेलनाचा मी अध्यक्षही झालो होतो. तसे एक साहित्य-सम्मेलन भंडारा येथे 'श्रीशेषाश्रमा'तर्फे भरविण्यात यावे अशी महाराष्ट्र बौद्ध-साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांची मला खास विनंती होती. त्या परिषदेचे अध्यक्ष श्री. टी. पी. उपाख्य भाऊसाहेब अडसूळ, चिटणीस श्री. विश्वासराव भोसले, श्री. अप्पासाहेब रणपिसेप्रभृतींनी गळ घातली आणि मी अलीकडील दलितांतील व बौद्धजनांतील विचारांचे व भावनांचे सैरावैरा धावणारे प्रवाह आणि त्यांच्या साहित्यक्षेत्रातील परस्पर विरोधी गटांचे तुटक धोरण लक्षात घेऊन, त्या विभक्त घटकांना एकत्रित आणावे आणि दलितांच्या व बौद्धांच्या साहित्याची एकाच प्रबल बौद्धपीठावरून उंची वाढावी आणि एकात्मतेच्या त्या प्रबल साहित्यशक्तीने आपली उद्धारक पावले उमटवीत आपला उच्च व उदात्त दर्जा प्रस्थापित करावा या सद्भावनेने मी 'श्रीशेषाश्रमा'तर्फे महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेचे १६ वे आणि श्रीशेषाश्रमाचे १८ वे असे संयुक्त साहित्य सम्मेलन भरण्यास सहर्ष मान्यता दिली. १९७८ सालचे हे संयुक्त साहित्य सम्मेलन राज्यस्तरावर घडवून, त्याची नांदी संपूर्ण महाराष्ट्रभर दुमदुमत राहावी असा कसोशीचा प्रयत्न केला. पण, एका बाजूने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अभिजात साहित्यापासून व प्रखर कर्तृत्वापासून प्रेरणा घेऊन 'दलित साहित्या'चा उद्घोष करणाऱ्या व दुसऱ्या बाजूने बाबा-साहेब आंबेडकरांच्या नावाचे फार मोठे भांडवल करून, आतून साम्यवादाची काहीशा राजकीय झिलईतून संघर्षात्मक भूमिका रेटणाऱ्या काही दलित साहित्याचा पुरस्कार करू पाहणाऱ्यांनी बौद्धसाहित्य सम्मेलन उधळून लावण्याचा अश्लाघ्य प्रयत्न तर केलाच पण माझ्या निवासस्थानी आजारी अवस्थेत असताही विकृत मनोवृत्तीने पेट घेऊन माझा घात करण्याचा दुष्ट प्रयत्नही केला; पण त्यांचा तो षड्यंत्री प्रयत्न माझ्या आध्यात्मिक शक्तीने पूर्णतः असफल झाला आणि मी भरविलेले साहित्य सम्मेलन त्याच थाटाने संपन्न झाले. ज्यांच्या कल्याणासाठी आणि प्रगतीसाठी मी संयुक्त साहित्य सम्मेलन भरवून, दलित व बौद्ध साहित्य-कारांची व पर्यायाने समाजाची जी उच्च प्रतिष्ठा राखण्याचा तळमळीने आणि कळकळीने कसोशीचा प्रयत्न केला त्यातीलच काहींनी एक प्रकारचा कट रचून माझा घात करण्याची जी वृत्ती प्रत्यक्षात अनुभवास आणून दिली, त्या घातकी मनोवृत्तीचे मी स्वागतच केले आणि साहित्य सम्मेलन यशस्वी होताच, 'मी आता

मुक्त झालो आहे. आता कोणी कुठेही माझा अवश्य घात करावा. त्यासाठी मी सज्ज आहे,' असे वृत्तपत्रातून जाहीरही केले.

⁂ ⁂

एखादी गोष्ट मी पवित्र मनाने व सद्हेतूने करीत असेन आणि समाजजीवनात सत्कृत्याची एक तरी मंगल ज्योत निर्माण व्हावी म्हणून प्रयत्नशील असेन व इतरांचे कोणत्याही परिस्थितीत शुभ चिंतनच करीत असेन तर मग मजवर कितीही कठोर प्रहार झाला, माझी कितीही नालस्ती करण्यात आली अथवा कितीही अपमान व छळ करण्यात आला तरी मला डगमगण्याचे, निराश होण्याचे, भयग्रस्त होण्याचे काहीच कारण नाही. उलट, तशा घातकी मनोवृत्ती अनुभवताना माझे मनोधैर्य अधिक प्रबल होते, एका वेगळ्या जाणिवेने नवचैतन्य अधिक तेजस्वी बनते, आणि दुर्दम्य उत्साहाने व निर्धाराने माझे पाऊल वेगाने पुढेच पडते, माझी वाणी गतिमान होऊन प्रखर होते आणि माझ्या लेखणीला तेजस्वी धार प्राप्त होते. अत्यंत दाहक परिस्थितीच्या व दुःखाच्या काळोखातही माझे पवित्र मन पूर्वेकडेच धाव घेत तेजस्वी किरण ओंजळीत घेण्यासाठी उद्युक्त होते; आणि हृदय, विषाचा घोट पचवून, अमृताचा कलश प्राप्त करण्यासाठी पर्यावरणात प्रसन्नतेने भ्रमण करीत असते; आणि ते आपल्या सत्त्वशक्तीने गवसेल ते अमृत संचित करून, मृतांना म्हणा वा प्रेतांना म्हणा, त्या अमृतसिंचनाने सजीव करण्याचा ध्यास घेते. हेच माझ्या रखरखीत जीवनातील आन्तरिक सुख व आनंद देणारे मोलाचे धन !

१२ फेब्रुवारी १९७९ हा एक थोर दलित नेते कै. गुरुवर्य किसन फागोजी बनसोड यांचा जन्मशताब्दी दिन होता. गुरुवर्य बनसोड यांच्या दलितोद्धारक विविध कार्यांचा व त्यांच्या असामान्य व्यक्तित्वाचा, त्या जन्मशताब्दी दिनी यथोचित गौरव व्हावा म्हणून मी महाराष्ट्र शासनाकडे शंख फुंकला. परंतु, महाराष्ट्र शासनाने तिकडे दुर्लक्ष केले. दलित आपल्या कर्तृत्वाने व विद्वत्तेने कितीही थोर बनला तरी तो उपेक्षितच राहावा, असा अनुभव मला आला. मी तत्कालीन समाजकल्याणमंत्री श्री. अर्जुनराव कस्तुरे यांना त्या प्रश्नाबाबत विशेषत्वाने जाणीव करून दिली. गुरुवर्य बनसोड यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांच्यासंबंधीचा एक चरित्रग्रंथ निर्माण व्हावा, अशी विनंती केली. ती त्यांनी सहर्ष मान्य करून, तसा चरित्रग्रंथ निर्माण करण्याची, त्यांनी व राज्यमंत्री श्रीमती शांती नाईक यांनी, मजवरच जबाबदारी सोपविली आणि ग्रंथनिर्मितीचा संपूर्ण खर्च महाराष्ट्र शासन वहन करील, असेही समाजकल्याणमंत्र्यांनी जाहीर केले. जन्मशताब्दी दिनाला अवधी फारच थोडा असल्याने, मी माझ्या सहकाऱ्यांबरोबर रात्रंदिवस खपून तिळसंक्रान्तीच्या शुभ दिनी 'कै. गुरुवर्य किसन फागोजी बनसोड' हा सुमारे पावणे तीनशे पृष्ठांचा चरित्रग्रंथ निर्माण केला. त्यासाठी सुमारे साडे

सात हजारांचे कर्ज काढून, खर्च केला. त्याची संपूर्ण कल्पनाही मी मंत्रीमहोदयांना वारंवार दिली. खर्चाची भरपाई केली जाईल व महाराष्ट्र शासन तो चरित्रग्रंथ प्रसिद्ध करील, असे मला त्यांनी पुन: पुन्हा भरघोस आश्वासन दिले. त्या चरित्र-ग्रंथाच्या टंकलिखित प्रतीचे गुरुवर्य बनसोड यांच्या जन्मशताब्दीच्या दिनी म्हणजे १२ फेब्रुवारी १९७९ रोजी भंडारा येथील शताब्दी महोत्सवाच्या कार्यक्रमप्रसंगी तत्कालीन समाजकल्याणमंत्री श्री. अर्जुनरावजी कस्तुरे यांच्याच हस्ते उद्घाटनही झाले. त्यांची प्रस्तुत प्रश्नाबाबत कितीही तळमळ असली तरी मी पुण्या–मुंबईच्या अनेक वाऱ्या करून व अधिकारीवर्गाची मनधरणी करूनही, तो प्रश्न अजूनही रेंगाळत राहिला. तरीसुद्धा, 'गुरुवर्य किसन फागोजी बनसोड' चरित्रग्रंथ महाराष्ट्र शासनाच्या स्वाधीन आहे. आज ना उद्या तो निश्चित प्रकाशित होईल, असा विश्वास वाटतो.

* *

'गुरुवर्य किसन फागोजी बनसोड' या चरित्रग्रंथाप्रमाणेच, खऱ्या अर्थाने दलितोद्धारासाठी ज्याची आर्ष व आर्त वाणी लखलखली अशा ७०० वर्षांपूर्वीच्या संतश्रेष्ठ चोखामेळा या विद्रोही साहित्याच्या जनकासंबंधी संशोधनात्मक चरित्रग्रंथ निर्माण व्हावा असा मी ध्यास घेतला. गेल्या ४० वर्षांपासून संत चोखामेळा यांच्याबद्दल मी अनेक ठिकाणी भ्रमण करून, त्यांच्या वाङ्मयाचे व कार्याचे सूक्ष्मतेने संशोधन करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. श्रीसंत चोखामेळा यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात असलेल्या मेहुणा या गावी शिशिर ऋतू, पौष मास, मकरसंक्रान्त दिनी ब्रह्ममुहूर्तावर, शके ११९० म्हणजे १४ जानेवारी १२६८ रोजी झाला आणि मृत्यू मंगळवेढा येथे शके १२६० वैशाख वद्य पंचमीला त्यांच्या वयाच्या ७० व्या वर्षी म्हणजे इ. स. १६ मे १३३८ रोजी झाला. सुमारे ३० वर्षांपूर्वी संतचोखोबासंबंधी श्री. कुंडलराय मोहेकर यांच्या मासिकाच्या मे १९५० च्या अंकात माझा एक लेखही प्रसिद्ध झाला होता. आणि नंतर, १६ मे १९७९ रोजी, संत चोखामेळा यांच्या ६४१ व्या पुण्यतिथिदिनानिमित्त, 'नागपूर पत्रिका,' 'महासागर,' 'तरुण भारत' या दैनिकांत 'कान्तदर्शी संत चोखामेळा' शीर्षकाचा एक संशोधनात्मक लेखही प्रसिद्ध झाला आहे. महाराष्ट्र शासनाने उपेक्षित असलेल्या या संतश्रेष्ठ चोखामेळा यांचे प्रेरक व बोधक असे भव्य स्मारक उभारावे आणि त्यांच्यासंबंधी अधिकृत असा एक चरित्रग्रंथही निर्माण करावा, अशी हाक मी दिली. त्या संदर्भात माजी समाजकल्याण मंत्री अर्जुनराव उपाख्य दादासाहेब कस्तुरे यांनी तळमळीने पुढाकार घेतला आणि मग महाराष्ट्र शासनाने समाजकल्याण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १९७९ मध्ये एक 'संत चोखामेळा समिती' निर्माण केली. या समितीचा मी आमंत्रक होतो. वर्षभर या समितीने संत

चोखामेळा यांच्यासंबंधीच्या परिसरात भ्रमण केले, ठिकठिकाणी बैठकी घेतल्या, आणि मग संत चोखामेळा स्मारकासंबंधीची आपली एक पाच कलमी भरीव योजना शासनाला सादर केली.

संत चोखामेळा समितीच्या शिफारशींनुसार, १६ व १७ मे १९७९ रोजी म्हणजे चोखोबांच्या ६४१ व्या पुण्यतिथी दिनी आणि नंतर १४ जानेवारी १९८० या त्यांच्या ७१२ व्या जयंती दिनी, महाराष्ट्र शासनातर्फे प्रथमतःच मेहुणा या संत चोखामेळा यांच्या जन्मस्थळी बोधक व प्रेरक असा भव्य सोहळा संपन्न झाला, याची मला मोठी प्रसन्नता वाटते.

* *

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या किशोर वयात, आम्ही दोघेही विदेही अवस्थेत रामटेकच्या रानावनात निसर्गसाधनेसाठी भ्रमण करीत असताना जे हित-संबंध दृढ झाले होते ते लक्षात घेऊन की काय, राष्ट्रसंतांच्या १० व्या पुण्यतिथी दिनी, म्हणजे १० ऑक्टोबर १९७८ रोजी, गुरुकुंज–मोझरी येथे सुमारे दीड-दोन लाखांचा जो मेळावा भरला होता, त्या भव्य समारंभप्रसंगी गुरुदेव सेवा मंडळाच्या चालकांनी–'श्री. ना. रा. शेंडे हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या आध्यात्मिक जीवनावर चरित्रात्मक एक कादंबरी निर्माण करतील; तशी आम्ही त्यांना विनंती करतो' अशी अचानक घोषणा केली. मी मोठ्या धर्मसंकटात पडलो. बाल्यावस्थेतून किशोर वयात पदार्पण करीत असताना तुकड्यादासांनी म्हणजे राष्ट्रसंतांनी निसर्गाच्या चैतन्यलहरींनी आपल्या कठोर तपस्येने 'ब्रह्म-साधना' केली होती. त्या कामी रामटेक तहसिलीतील देवलापारच्या अरण्यात आम्ही दोघांनी जी निसर्गसाधना करण्याचा प्रयत्न केला होता त्याबाबत कुठेही कसलीही वाच्यता करायची नाही आणि त्या वेळचा आपला संबंधसुद्धा दर्शवायचा नाही, अशी प्रतिज्ञा निसर्गाच्या एका संकेतानुसार, आम्ही केली होती. त्या तपस्ये-नंतर 'तुकड्या' लोकसेवेच्या संत–सत्पथाकडे निर्धाराने वळले तर मी मात्र प्रापं-चिक जीवनात गुरफटला गेलो. दोघांत महद्-अंतर होते. तुकड्या आपल्या धवल व प्रभावी कर्तृत्वाने 'तुकड्यादास' व मग जागतिक कीर्तीचे 'राष्ट्रसंत' म्हणून लौकिकास चढले; आणि मी 'गावठी लेखक' म्हणूनच रेंगाळत राहिलो ! पण जेव्हा राष्ट्रसंतांच्या १० व्या पुण्यतिथी दिनी, 'मी राष्ट्रसंतांच्या आध्यात्मिक जीवनावर चरित्रात्मक कादंबरी निर्माण करावी,' अशी घोषणा करण्यात आली तेव्हा मी चकितच झालो.'

वस्तुतः त्यापूर्वी 'श्रीगुरुदेव सेवा मंडळा'चे एक हितचिंतक श्री. वामनराव गावंडे यांनी मी महाराजांवर कादंबरी लिहावी म्हणून माझ्याशी प्रत्यक्ष बोलणे केले होते, पत्राद्वारेही तशी वारंवार विनंती केली होती. आणि मग, श्री. वामन-

राव गावंडे व ' श्रीगुरुदेव वाङमय मंडळा 'चे अध्यक्ष श्री. जी. डी. निकम दादा या दोघाही सुहृदांनी माझी श्रीशेषाश्रमात भेट घेऊन, राष्ट्रसंतांच्या जीवनावर कादंबरी लिहिण्याची आग्रहपूर्वक विनंती केली. त्या वेळी मी त्यांना राष्ट्रसंतांच्या जीवन व कार्याशी ज्यांचा निकटचा संबंध आला अशा काही मान्यवर साहित्यिकांना विनंती करण्यास परोपरीने सुचविले; पण, त्या दोघांनीही माझ्या नावावरच विशेष भर दिला. मी माझ्या वृद्धापकाळातील जर्जरावस्था व अडचणी दर्शविल्या तेव्हा त्या दोघांनीही आम्ही सर्व सुव्यवस्था राखू, तुमच्या अडीअडचणींची तत्परतेने दखल घेऊ, शब्दांकनाची (डिक्टेशन), टंकलेखनाची व अन्य प्रकारच्या मदतीची दक्षतेने जातीने दखल घेऊ, साहित्य उपलब्ध करण्यासाठी प्रवासाची व संशोधनात्मक कार्याची सर्व सोय आम्ही करू, ' चरित्रात्मक कादंबरीसाठी एक लाख रुपयाचा खर्च आला तरी आम्ही तो खर्च अवश्य करू ' असे अभिवचन, त्या दोघाही राष्ट्रसंतांच्या एकनिष्ठ भक्तांनी मला पुन:पुन्हा दिले होते. श्री. ना. रा. शेंडे यांनीच राष्ट्रसंतांच्या जीवनावर चरित्रात्मक कादंबरी लिहावी, असा निर्णय श्रीगुरुदेव सेवा महामंडळाच्या केन्द्रीय कार्यकारिणीने घेतला असल्याचेही त्यांनी मला कळवळून सांगितले होते. त्या माझ्या दोघाही हितचिंतकांच्या आश्वासनावर माझ्यासारख्या भाबड्या खेडूत लेखकाने विश्वास राखला होता म्हणून मी त्यांच्याकडून नेहमीच्या विश्वासाने जगणाऱ्या लेखकाने कसलाही लेखी करार केला नव्हता. ही माझी फार मोठी ' भूल ' झाली. आणि मग जेव्हा राष्ट्रसंतांच्या १० व्या पुण्यतिथी दिनी ग्रंथनिर्मितीबाबत घोषणा करण्यात आली तेव्हा श्री. जी. डी. निकम व त्यांच्या काही सहकाऱ्यांनी मी तशी जाहीर संमती द्यावी, म्हणून मला विनविले. राष्ट्रसंतांचे पुण्यतिथिदिनाचे व त्यांच्याशी माझे पूर्वीचे जे विशेष दृढ हितसंबंध होते तें लक्षात घेऊन मी माझी तशी संमती दिली पण ती देताना मी माझ्या अडचणींसह काही अटीही पुन्हा दर्शविल्या होत्या. परंतु जी संमती मी महाराजांच्या पुण्यतिथीच्या दीड दोन लाखांच्या जनसमूहाच्या सभेत दिली ती अर्थातच माझी दुसरी भूल झाली. पण मी त्या जाहीर सभेत ' शब्द ' दिल्याप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या आध्यात्मिक जीवनावर चरित्रात्मक कादंबरी निर्माण करण्यास अविलंब प्रारंभ केला. मी माझे महत्त्वाचे लिखाण बाजूला सारले. राष्ट्रसंतांच्या चरित्रनिर्मितीचा सानंदे केवळ एकच ध्यास मी घेतला. ' राष्ट्रसंतांच्या लोककल्याणकारी व राष्ट्रसेवार्थ कामी आलेल्या प्रखर व पावन आध्यात्मिक पिंडाचे तेजस्वी दर्शन घडावे,' यासाठी मी माझे पवित्र मन, हृदय आणि लेखणी अव्याहत राबवू लागलो. त्यासाठी अनेकांनाही राबवून घेऊ लागलो. पण अभिवचन दिल्याप्रमाणे, पुढे कोणी कसलीच दखल घेतली नाही.

श्री. जी. डी. निकमदादा यांनी नाही म्हणायला कळकळीने काही प्रमाणात आस्था दाखविली, नाही असे नाही. वस्तुत: श्री. जी. डी. निकम या एका सहृदय

व्यक्तीची ती जबाबदारी नव्हती. तुमच्या श्री गुरुदेव सेवा मंडळाची जर आर्थिक स्थिती शोचनीय आहे व आपण कसलीही मदत करायला असमर्थ आहात तर, ग्रंथनिर्मितीचे कार्य खंडित करावे, असे मी त्यांना वारंवार सांगत होतो. ' पण तो आमचा प्रश्न आहे तशी चिंता तुम्ही बाळगू नका ' असे मला सांगण्यात येई. ' श्री गुरुदेव सेवा मंडळा 'चे हृदयवंत उपाध्यक्ष मा. श्री. दीनदयालजी गुप्त यांनाही भेटून लेखनकार्य थांबविण्यास विनंती केली. पण त्या सर्वांनी ' तुम्ही चिंता बाळगू नका, ग्रंथनिर्मितीचे कार्य चालू ठेवा; आम्ही सर्व तरतूद करतो, ' अशी अभिवचने पुन्हा देऊनही, राष्ट्रसंतांसंबंधी आवश्यक ती कागदपत्रे आणि इतर माहितीसुद्धा उपलब्ध करून द्यायला कोणीही पुढे सरसावले नाही. इतकेच नव्हे तर, मी स्वतःच कर्जबाजारी होऊन, राष्ट्रसंतांसंबंधी माहिती गोळा करायला, संशोधन करायला स्वतःच ठिकठिकाणी प्रवास केला. राष्ट्रसंतांच्या हितसंबंधित व्यक्तींना मी स्वतःच प्रत्यक्ष भेटून रात्ररात्रभर जागरण करीत टाचणे घेतली. तब्बल दीड वर्ष मी एकसारखा खपत गेलो. ' श्रीशेष प्रकाशन ' संस्थेचे संचालक व प्रकाशक श्री. शिवशंकर सोनकुसरे व श्री. रामकृष्ण सोनकुसरे या बन्धुद्वयांनी राष्ट्रसंतांसंबंधीच्या ग्रंथनिर्मितीबद्दल मात्र काहीशी कळकळ दाखविली. प्रसंगी त्या दोघाही बन्धूंनी थोडी मदतही केली. पण त्यालाही काही मर्यादा होती.

ग्रंथनिर्मितीच्या कार्याला सोनकुसरे बंधूंच्या काहीशा मदतीव्यतिरिक्त, निष्ठेने व तन्मयतेने खरी मदत लाभली ती व्यासंगी वृत्तीची व आध्यात्मिक प्रकृतीची पदवीधर लेखिका सौ. जयश्री बोरकर यांची आणि कोथुर्णा या खेड्यावरून १३ कि. मि. अंतरावरून पायी चालत येत असलेल्या श्री. जगदीश सुखदेवे या एका कष्टाळू लेखकाची. राष्ट्रसंतांच्या ग्रंथलेखनाचे अत्यंत जिकिरीचे व कष्टाचे शब्दांकन करीत होती ती सौ. जयश्री बोरकर, व दिलेला मजकूर तत्परतेने नकलून देण्याची दखल घेत होते ते श्री. जगदीश सुखदेवे : सुविद्य लेखिका सौ. जयश्री बोरकर ही केवळ लेखनिकेचे म्हणजे शब्दांकनाचे ( डिक्टेशन घेण्याचे ) च कार्य करीत नव्हती तर अनेक इंग्रजी संस्कृत व मराठी ग्रंथांचे वाचन करून, आवश्यक ते टाचण करीत होती. भाषेवर तिचे प्रभुत्व होते. त्यामुळे तिची आणि तिचे पती, एक सत्प्रवृत्त विचारवंत श्री. प्रेमानंद बोरकर यांची मला फार मोलाची साथ लाभली. त्याशिवाय, माझी धर्मपत्नी सौ. यमुना शेंडे, पुत्र श्री. निशिकान्त शेंडे व श्री. अविनाश शेंडे आणि स्नुषा सौ. अर्चना शेंडे व सौ. सुनीता शेंडे आणि कन्या कु. देवयानी शेंडे या माझ्या कुटुंबातील सर्व व्यक्ती राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवरील निष्ठेने, त्यांच्यासंबंधीच्या ग्रंथनिर्मितीसाठी साहाय्यभूत झाल्या. पण श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या एकनिष्ठ समजल्या जाणाऱ्या, श्री. निकम दादा या एका व्यक्तीशिवाय, कुणालाही, ' चेव ' आला नाही. मी आर्थिक, शारीरिक व मानसिक झीज सहन करून, राष्ट्रसंतांच्या

ग्रंथनिर्मितीचे दीड वर्ष लेखनकार्य केले, याचा आणखी विस्तृत पाढा तो काय वाचायचा ! या ग्रंथनिर्मितीपायी मी सुमारे दहा हजारांचा कर्जबाजारी मात्र झालो आणि माझ्या मृत्यूच्या वेळी मी अनेकांचा ऋणी राहीन आणि माझे मुळातच दयनीय अवस्थेत असलेले कुटुंब ऋणातच राहील, एवढे मला अत्यंत दु:खाने नमूद करावे लागते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची पुण्यतिथी व जयंतीच्या समारंभ सोहळचात त्यांच्या नावावर जोष आणि जल्लोष करणाऱ्यांची आणि राष्ट्रसंतांचे एकनिष्ठ सेवक म्हणविणाऱ्यांची प्रकृती व प्रवृत्ती कशी आहे याची मला चांगली प्रचीती आली. असली आणि नकली याची प्रत्यक्षात जाणीव झाली. ' राजे हो, तुमचा खेळ होतो पण माझा जीव जातो !' असे आर्ततेने उद्‌गार काढण्याची आणि ' निसर्गाच्या अन्तराळात अव्यक्त रूपाने वास करणाऱ्या राष्ट्रसंतांच्या प्रबल मनोद्रव्याला (आत्म्याला) त्यांच्या नावावर होणारा सारा खेळ पाहून काय जाणवत असेल, ' हे तळतळून सांगण्याची पाळी ', अनुभूतीने मला आली.

राष्ट्रसंतांच्या ११ व्या पुण्यतिथीला मी पुन्हा गुरुकुंज-मोझरीला गेलो. स्वयं-बळाने जे लिखाण केले ते घेऊन गेलो. ' श्रीगुरुदेव सेवा मंडळा 'च्या अनेक मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या स्वत: भेटीगाठी घेतल्या. संपूर्ण रात्र खर्च करून चरित्रात्मक कादंबरीचे जेवढे लिखाण झाले ते दर्शवून महत्त्वाचे काही टप्पे त्यांना वाचूनही दाखविले. सर्वांनी एकमुखाने प्रशंसा केली. पण मी जेव्हा माझ्या अडचणी सांगू लागलो तेव्हा मात्र सर्वांनी मौन धारण केले. त्या प्रसंगी मी माझ्या जाहीर सभेच्या भाषणात, गेल्या वर्षी कोणती व कशी घोषणा करण्यात आली होती आणि मग कोणते व कसे वर्तन राखले गेले यांची, स्वच्छ व स्पष्ट जाणीव, त्या एकदीड लाखाच्या सभेत आर्ततेने करून दिली पण माझा करुण हृदयध्वनी शून्यातच विरल विरल होत गेला ! काहींना शोभेचे पुतळे व भाविकतेची केवळ मंदिरे हवीत; त्यासाठी अनेक धनिकांना गाठून व दिखाऊ सत्कारसमारंभ घडवून, लाख लाख रुपयांचे दान पदरात पाडून घेण्याचा मला प्रत्यक्षात अनुभव आला. वस्तुत: राष्ट्रसंतांना अंधश्रद्धाळूपणाची पूजा-अर्चा आणि शोभेचे पुतळे जेथे नको होते तेथे सेवेपेक्षा भक्तीचे प्रदर्शन मांडताना पाहून फार खेद वाटला. त्यांना राष्ट्रसंतांनी मानवतेसाठी, खेड्यापाड्यातील दीनदुबळ्या लोकांच्या उद्धारासाठी, धार्मिकतेने नव्हे तर आध्यात्मिकतेने, नि:स्वार्थ सेवा रुजू करण्यासाठी जे अत्यंत पवित्र कार्य केले व जे उद्धारक आत्मतेज प्रकट केले, त्याचा त्या निष्ठावंत भक्तांना राष्ट्रसंतांचा इतिहास मात्र नको, असे आढळून आले. राष्ट्र-संतांना मानाचे जीवन जगणारा ' खरा माणूस ' उभा करायचा होता, पुतळा नाही; त्यांना ' मानवतेसाठी हृदयमंदिरे ' उभारायची होती, सीमेंट काँक्रिटची शोभामंदिरे नाहीत; त्यांना हृदयसौंदर्य व उत्कट भावसौंदर्य हवे होते, केवळ

टाळमृदंगाचा अंधश्रद्धाळू गजर नको होता. ते गरिबांचे पूजक होते, धनिकांचे नाही. त्यांची ब्रह्मसाधनेची प्रदीर्घ तपस्या, मानवोद्धारासाठी व पर्यायाने राष्ट्रकल्याणासाठी कामी आणणारी, प्रबल सत्त्वशक्तिधारी होती. आणि म्हणूनच मी अगदी निर्जन व जर्जर अवस्थेत असताही, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या उद्धारक अशा आत्मतेजाची अस्मिता दर्शविण्यासाठी त्यांच्या आध्यात्मिक प्रखर जीवनावर कादंबरी लिहिण्याचे मान्य केले होते.

पण, काही असले तरी श्री गुरुदेव सेवा मंडळास मी 'दिलेला शब्द' राष्ट्रसंतांचे पुण्यस्मरण करीत पाळणे हे माझे पवित्र कर्तव्य होते. दिलेल्या वचनानुसार, कोणत्याही दुर्धर व विकट अवस्थेत माझा प्रकृतिधर्म मला कटाक्षाने निष्कलंक राखला पाहिजे, तो मी पाळला. इतरांच्या प्रकृतिधर्माबद्दल ज्यांचे त्यांनी आपल्या पवित्र हृदयाला साक्षीला ठेवून आणि आत्मलक्षी होऊन काय तो स्वतःच निर्वाळा घ्यावा. राष्ट्रसंतांचे अन्तराळातील सुगंधित व सत्त्वशक्तीचे मनोद्रव्य अव्यक्तरूपाने काय निरखायचे ते सूक्ष्मतेने निरखत असेल !

गेल्या ७ डिसेंबर १९७९ ते ७ मार्च १९८० या तब्बल सव्वा वर्षाच्या कालखंडात मी चिद्‌विलासी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रखर आध्यात्मिक जीवनावर व तेजस्वी कर्तृत्वावर सुमारे ५०० पृष्ठांच्या वर मुद्रित कादंबरीमय चरित्रग्रंथ होईल, एवढे लिखाण जतन करून ठेवले आहे. दरवर्षी चुकून शिलकेत राहिलेल्या माझ्या अप्रकाशित साहित्याचा यज्ञ मी बालपणापासून करीत आलो आहे आणि तो 'साहित्ययज्ञ' हुताशनीच्या मंगल दिनी, कुणाची कसलीही पर्वा न करता, थाटाने साजरा करीत असतो, माझ्या अशा या हुताशनीला अर्पण करण्यात येणाऱ्या साहित्ययज्ञाची महाराष्ट्राला जाणीव असावी. पण यंदा, माझी खरी हुताशनी पूजा, मी नाशिक तीर्थक्षेत्रात, महाराष्ट्र बौद्धसाहित्य परिषदेच्या १८ व्या अधिवेशनाचे उद्‌घाटन करायला गेलो असताना, तशीच राहून गेली, याचे मला मोठे वैषम्य वाटते ! नाही तर...कुणास ठाऊक काय घडले असते ! राष्ट्रसंतांवरील चारित्रात्मक कादंबरीचा हुताशनीच्या पूजेसाठी मी यज्ञ मांडू नये, इतक्यात कसली घाई करू नये म्हणून की काय नियतीने एका विशेष जाणिवेने तशी दखल घेतली असावी ! नियतीला माझी भूमिका माहीत आहे, माझ्या जीवाची तगमग तिला उमगते; तशी ती फार सतर्क आहे; आणि माझ्याशी एवढे जवळीकचे तिचे नाते असताही माझ्या या ७२ वर्षी तिने मला नकळत गुंगारा द्यावा, याची मला हळहळ वाटते ! पण या सर्व बाबतीत इतरांना दोष देण्यापेक्षा माझा मीच दोषी आहे, हे मला कबूल केले पाहिजे.

* *

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर चारित्रात्मक कादंबरी मी निर्माण करीत

असतानाच, चालू १९८० च्या प्रारंभीच भंडारा जिल्ह्यातील गणेशपूर गावी प्रस्थापित झालेल्या ' श्रीशेष प्रकाशन 'चे संचालक श्री. शिवशंकर सोनकुसरे व प्रकाशक श्री. रामकृष्ण सोनकुसरे या बन्धुद्वयांनी मजकडून पाच पुस्तकांची मागणी केली. मी पुन्हा धर्मसंकटात पडलो. कारण ' श्रीशेष प्रकाशन 'शी माझा घनिष्ठ हितसंबंध; आणि उभयता सोनकुसरे बन्धूंचा मजवर असीम जिव्हाळा. माझी प्रकृती ढासळलेली व त्यात कमालीची निर्धनावस्था. पण तरीसुद्धा, ' श्रीशेष प्रकाशन 'च्या सुहृद–प्रकाशकाच्या संकल्पित भरीव योजनेला मला मान्यता द्यावी लागली. माझा थोरला पुत्र चि. निशिकान्त शेंडे याची दुसरी कादंबरी '– आणि तिला जाग आली ' आणि गेल्या तीन तपांत म्हणजे ३६ वर्षांत माझे जे फुटकळ स्वरूपात लिखाण प्रसिद्ध झाले होते त्यातील निवडक वैचारिक लेखांचा ' विचार प्रबोधिनी ' हा एक भरदार संग्रह; काही निवडक सुरस कथांचा ' प्रतिध्वनी ' हा संग्रह; माझ्या अल्पशा कार्यासह जे विविध प्रकारचे लेखन मी गेल्या ६० वर्षांत केले त्याचा एक ओझरता आलेख दर्शविणारा ' मी आणि माझे लेखन ' हा एक प्रबंध आणि ३ ऑक्टोबर १९३८ साली विजया दशमीच्या सुमुहूर्तावर, गेल्या ४२ वर्षांपूर्वी निर्माण केलेली पण मुद्दाम राखून ठेवलेली एक हृदयस्पर्शी सामाजिक कादंबरी ' शृंगारलेलं प्रेत !' अशी पाच पुस्तके अहोरात्र जागून व माझ्याच वाङमयाचे मी संशोधन व संकलन करून ' श्रीशेष प्रकाशन 'ला दिली. चि. निशिकान्त शेंडे याची '–आणि तिला जाग आली ' ही कादंबरी मुद्रित झाली; आणि माझी इतर चार पुस्तके, ३० एप्रिल १९८० रोजी वैशाखी पौर्णिमेला प्रकाशित होतील, अशा विशेष जाणिवेने दखल घेतली जात आहे; नागपूरच्या सुप्रसिद्ध नाग मुद्रणालयात काहींचे मुद्रण होतच आहे. अत्यंत वेधक व बोधक अशा मुखपृष्ठांची तीनचार रंगी असलेली चित्रे पुण्याच्या जोशी आर्टस्‌कडून केवळ काढून घेतली नाहीत तर ती छापूनही झाली आहेत.

त्याशिवाय नागपूरच्या ' राधेय प्रकाशन 'चे प्रकाशक श्री. राम येरकुंटवार हे माझ्या ' काजळी रात्र !' या कादंबरीचा हिंदी अनुवाद प्रकाशित करीत आहेत. डॉ. सौ. करुणा उमरे यांनी तो हिंदी अनुवाद केला आहे. हिंदी भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे. माझ्या लेखनविषयक जीवनाचा हा अखेरचा टप्पा, कदाचित नियती, चित्रगुप्ताला आदेश देऊन, तो निसर्गांकित करीतही असेल ! आणि म्हणूनच की काय अलीकडे ऐन मध्यरात्री एक गंभीर ध्वनी अव्यक्त रूपाने कानी घोंगावून जातो, ' तुला यायचे आहे, सावध राहा नि वाट पाहा !'

माझे बालपणापासूनचे संपूर्ण ७२ वर्षांचे जीवन अध्यात्मशक्ती आणि अतीन्द्रिय शक्ती यांच्याशी निगडित झाले आहे. या प्रदीर्घ आयुष्यात अन्तराळातील सुष्ट व दुष्ट चैतन्यलहरींचा मी वेध व शोध घेण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. लोककल्याण साधणाऱ्या एका प्रबल सत्त्वशक्तीला अंकित करण्याचे, प्राण पणाला

लावून, धाडस केले आहे. भूत–पिशाच्च योनी वा तंत्रमंत्र यावर माझा विश्वास नाही. सत्त्वशक्तीचे अध्यात्म त्या मार्गाने कधीच जात नाही. पर्यावरणातील ज्या विविध प्रकारच्या चैतन्यलहरी वेगवेगळ्या दिशेने व गतीने भ्रमण करीत असतात आणि त्यांचा पृथ्वीतलावरील प्राणिमात्राचे मनोद्रव्य श्वासाच्या बाहेर पडणाऱ्या वलयांशी, जिथे ज्या प्रमाणात संबंध येतो तेव्हा तिथे त्या अन्तराळातील ज्या स्वरूपाची व ज्या प्रभावाची चैतन्यलहर जशी स्पर्शून जाईल तसा कधी दुष्ट वा सुष्ट परिणाम घडत असतो. निसर्गसत्त्वशक्ती अंकित करणारी व्यक्ती आपल्या आध्यात्मिक भूमिकेवरून जेव्हा आपल्या तपस्येने तशा सत्त्वशक्तीची चैतन्यलहर आत्मसात करते तेव्हा ती व्यक्ती एक प्रबळ आत्मशक्तिधारी बनून, जीवनात त्या सत्त्वशक्तीद्वारे अलौकिक कार्य करण्यास–हवे ते लोककल्याण साधण्यास समर्थ बनते. आध्यात्मिकशक्ती व अतीन्द्रिय शक्ती याबाबत मी माझ्या यापूर्वीच्या विविध साहित्यात काही विशेष चमत्कारिक पण अगदी सत्य घटना दर्शवून, त्याची महती मीमांसिली आहे.

माझ्या श्रीशेष साधनेच्या तपोभूमीवर, माझा श्रीशेषाश्रम, प्रबल अध्यात्मशक्ती व अतीन्द्रियशक्ती यांच्या अव्यक्त अशा चैतन्यलहरींशी संपर्क राखून, लोककल्याणाच्या तत्त्वावर उभा आहे. तो माझ्यापुरता सीमित आहे, चमत्कारांचे प्रदर्शन मांडून, कीर्ती व द्रव्य प्राप्त करणारा तो श्रीशेषाश्रम अथवा मी नाही. आमचा तो स्वस्त, सवंग व स्वार्थी मार्गच नाही. माझी दुबळी शक्ती व सीमित कार्यमर्यादा मी नीट जाणून आहे. माझ्या या उत्तरआयुष्यातील शेवटल्या पर्वात, नियती कोणत्या दिशेने व कोणत्या गतीने आणि रीतीने, माझ्या ढळत्या वयाचा मागोवा घेत, माझे मनोद्रव्य निसर्गात विलीन करण्यास कशी सरसावत आहे, याची मला काहीशी कल्पना नाही, असे नाही आणि म्हणूनच आताशा मध्यरात्रीच्या सुमारास अव्यक्तपणे जो ध्वनी, ‘ तुला यायचे आहे, सावध राहा आणि वाट पाहा ’ असा संकेत देतो, त्यातील मर्मही मी जाणून आहे आणि सतर्कही आहे.

* *

गेल्या तीन महिन्यांपूर्वी म्हणजे ६ डिसेंबर १९७९ रोजी, तिन्ही सांजेच्या वेळेला, एका अध्यात्मप्रकृतीच्या सत्त्वशील तरुणीच्या पतीला निवासस्थळाच्या अंगणात अचानक कालवश होण्याचा एक संकेत एका अध्यात्मशक्तीच्या पुरुषाला झाला होता, म्हणून की काय, ते आपल्या आत्मशक्तीने हेरून त्या तरुणीने महर्षी बाबू अरविंद घोष यांच्या ‘ सावित्री ’ या महाकाव्याचा सत्यवानाला जीवदान प्राप्त झाल्याचा अध्याय वाचून, तो संदर्भासह उमगून घेतला होता. सावित्रीच्या सत्त्वशक्तीच्या प्रभावाचे मर्म तिने हेरले होते आणि लगेच, त्या दिवशीच्या अगदी संध्यासमयी कसली तरी भयानक हाक ऐकायला आली आणि तिचा पती कोल-

ग्रंथनिर्मितीचे दीड वर्ष लेखनकार्य केले, याचा आणखी विस्तृत पाढा तो काय वाचायचा ! या ग्रंथनिर्मितीपायी मी सुमारे दहा हजारांचा कर्जबाजारी मात्र झालो आणि माझ्या मृत्यूच्या वेळी मी अनेकांचा ऋणी राहीन आणि माझे मुळातच दयनीय अवस्थेत असलेले कुटुंब ऋणातच राहील, एवढे मला अत्यंत दु:खाने नमूद करावे लागते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची पुण्यतिथी व जयंतीच्या समारंभ सोहळ्यात त्यांच्या नावावर जोष आणि जल्लोष करणाऱ्यांची आणि राष्ट्रसंतांचे एकनिष्ठ सेवक म्हणविणाऱ्यांची प्रकृती व प्रवृत्ती कशी आहे याची मला चांगली प्रचीती आली. असली आणि नकली याची प्रत्यक्षात जाणीव झाली. ' राजे हो, तुमचा खेळ होतो पण माझा जीव जातो ! ' असे आर्ततेने उद्‌गार काढण्याची आणि ' निसर्गाच्या अन्तराळात अव्यक्त रूपाने वास करणाऱ्या राष्ट्रसंतांच्या प्रबल मनोद्रव्याला (आत्म्याला) त्यांच्या नावावर होणारा सारा खेळ पाहून काय जाणवत असेल, ' हे तळतळून सांगण्याची पाळी ', अनुभूतीने मला आली.

राष्ट्रसंतांच्या ११ व्या पुण्यतिथीला मी पुन्हा गुरुकुंज-मोझरीला गेलो. स्वयं-बळाने जे लिखाण केले ते घेऊन गेलो. ' श्रीगुरुदेव सेवा मंडळा 'च्या अनेक मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या स्वत: भेटीगाठी घेतल्या. संपूर्ण रात्र खर्च करून चरित्रात्मक कादंबरीचे जेवढे लिखाण झाले ते दर्शवून महत्त्वाचे काही टप्पे त्यांना वाचूनही दाखविले. सर्वांनी एकमुखाने प्रशंसा केली. पण मी जेव्हा माझ्या अडचणी सांगू लागलो तेव्हा मात्र सर्वांनी मौन धारण केले. त्या प्रसंगी मी माझ्या जाहीर सभेच्या भाषणात, गेल्या वर्षी कोणती व कशी घोषणा करण्यात आली होती आणि मग कोणते व कसे वर्तन राखले गेले यांची, स्वच्छ व स्पष्ट जाणीव, त्या एकदीड लाखाच्या सभेत आर्ततेने करून दिली पण माझा करुण हृदयध्वनी शून्यातच विरल विरल होत गेला ! काहींना शोभेचे पुतळे व भाविकतेची केवळ मंदिरे हवीत; त्यासाठी अनेक धनिकांना गाठून व दिखाऊ सत्कारसमारंभ घडवून, लाख लाख रुपयांचे दान पदरात पाडून घेण्याचा मला प्रत्यक्षात अनुभव आला. वस्तुत: राष्ट्रसंतांना अंधश्रद्धाळूपणाची पूजा–अर्चा आणि शोभेचे पुतळे जेथे नको होते तेथे सेवेपेक्षा भक्तीचे प्रदर्शन मांडताना पाहून फार खेद वाटला. त्यांना राष्ट्रसंतांनी मानवतेसाठी, खेड्यापाड्यातील दीनदुबळ्या लोकांच्या उद्धारासाठी, धार्मिकतेने नव्हे तर आध्यात्मिकतेने, नि:स्वार्थ सेवा रुजू करण्यासाठी जे अत्यंत पवित्र कार्य केले व जे उद्धारक आत्मतेज प्रकट केले, त्याचा त्या निष्ठावंत भक्तांना राष्ट्रसंतांचा इतिहास मात्र नको, असे आढळून आले. राष्ट्र-संतांना मानाचे जीवन जगणारा ' खरा माणूस ' उभा करायचा होता, पुतळा नाही; त्यांना ' मानवतेसाठी हृदयमंदिरे ' उभारायची होती, सीमेंट काँक्रिटची शोभामंदिरे नाहीत; त्यांना हृदयसौंदर्य व उत्कट भावसौंदर्य हवे होते, केवळ

टाळमृदंगाचा अंधश्रद्धाळू गजर नको होता. ते गरिबांचे पूजक होते, धनिकांचे नाही. त्यांची ब्रह्मसाधनेची प्रदीर्घ तपस्या, मानवोद्धारासाठी व पर्यायाने राष्ट्रकल्याणासाठी कामी आणणारी, प्रबल सत्त्वशक्तिधारी होती. आणि म्हणूनच मी अगदी निर्जन व जर्जर अवस्थेत असताही, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या उद्धारक अशा आत्मतेजाची अस्मिता दर्शविण्यासाठी त्यांच्या आध्यात्मिक प्रखर जीवनावर कादंबरी लिहिण्याचे मान्य केले होते.

पण, काही असले तरी श्री गुरुदेव सेवा मंडळास मी 'दिलेला शब्द' राष्ट्रसंतांचे पुण्यस्मरण करीत पाळणे हे माझे पवित्र कर्तव्य होते. दिलेल्या वचनानुसार, कोणत्याही दुर्धर व विकट अवस्थेत माझा प्रकृतिधर्म मला कटाक्षाने निष्कलंक राखला पाहिजे, तो मी पाळला. इतरांच्या प्रकृतिधर्माबद्दल ज्यांचे त्यांनी आपल्या पवित्र हृदयाला साक्षीला ठेवून आणि आत्मलक्षी होऊन काय तो स्वतःच निर्वाळा घ्यावा. राष्ट्रसंतांचे अन्तराळातील सुगंधित व सत्त्वशक्तीचे मनोद्रव्य अव्यक्तरूपाने काय निरखायचे ते सूक्ष्मतेने निरखत असेल !

गेल्या ७ डिसेंबर १९७९ ते ७ मार्च १९८० या तब्बल सव्वा वर्षाच्या कालखंडात मी चिद्‌विलासी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रखर आध्यात्मिक जीवनावर व तेजस्वी कर्तृत्वावर सुमारे ५०० पृष्ठांच्या वर मुद्रित कादंबरीमय चरित्रग्रंथ होईल, एवढे लिखाण जतन करून ठेवले आहे. दरवर्षी चुकून शिलकेत राहिलेल्या माझ्या अप्रकाशित साहित्याचा यज्ञ मी बालपणापासून करीत आलो आहे आणि तो 'साहित्ययज्ञ' हुताशनीच्या मंगल दिनी, कुणाची कसलीही पर्वा न करता, थाटाने साजरा करीत असतो, माझ्या अशा या हुताशनीला अर्पण करण्यात येणाऱ्या साहित्ययज्ञाची महाराष्ट्राला जाणीव असावी. पण यंदा, माझी खरी हुताशनी पूजा, मी नाशिक तीर्थक्षेत्रात, महाराष्ट्र बौद्धसाहित्य परिषदेच्या १८ व्या अधिवेशनाचे उद्‌घाटन करायला गेलो असताना, तशीच राहून गेली, याचे मला मोठे वैषम्य वाटते ! नाही तर...कुणास ठाऊक काय घडले असते ! राष्ट्रसंतांवरील चारित्रात्मक कादंबरीचा हुताशनीच्या पूजेसाठी मी यज्ञ मांडू नये, इतक्यात कसली घाई करू नये म्हणून की काय नियतीने एका विशेष जाणिवेने तशी दखल घेतली असावी ! नियतीला माझी भूमिका माहीत आहे, माझ्या जीवाची तगमग तिला उमगते; तशी ती फार सतर्क आहे; आणि माझ्याशी एवढे जवळीकचे तिचे नाते असताही माझ्या या ७२ वर्षी तिने मला नकळत गुंगारा द्यावा, याची मला हळहळ वाटते ! पण या सर्व बाबतीत इतरांना दोष देण्यापेक्षा माझा मीच दोषी आहे, हे मला कबूल केले पाहिजे.

* *

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर चारित्रात्मक कादंबरी मी निर्माण करीत

मडणार...तोच त्या केवळ तीन मिनिटांच्या अवधीत एक आगळीच चैतन्यलहर हळूच स्पर्शून गेली आणि एका सत्त्वशक्तीच्या सत्पुरुषाला त्याच क्षणी जवर ठेच लागून त्याचा उजव्या पावलाचा अंगठा चेंदून रक्तबंबाळ झाला आणि त्याने त्या सत्त्वशील तरुणीच्या आध्यात्मिक लहरीला, डोळ्याचे पाते लवते न लवते तोच, नेत्रांकित करून, सत्यवानासारखीच तिच्या पतीला जीवदान प्राप्त होण्याची एक आगळीच किमया केली. अध्यात्मशक्ती व अतीन्द्रिय शक्ती यांच्या परस्पर संयोगाने जी अत्यंत प्रभावी सत्त्वशक्तीची एक चैतन्यलहर निर्माण झाली तिने, आधुनिक सावित्रीच्या पतीला उदंड आयुर्मानाचे वरदान देण्याचे एक पवित्र कार्य केले पण त्याबरोबरच नियतीने त्या बदलात सत्त्वशक्तीच्या पुरुषाचे १७ महिन्यांच्या अवधीत निसर्गात विलीन होण्याचे, त्याच्याकडून अव्यक्तपणेच अभिवचनही घेतले. ही घटना जेवढी भेसूर व भयानक आहे तेवढीच ती मनुष्यमात्राच्या जीवनाला बोधक व प्रेरकही आहे. याच सत्त्वशक्तीने एकाला जीवदानाचे वरदान लाभलेल्या पण दुसऱ्या एकाला त्याऐवजी निसर्गात विलीन होण्याचा संकेत झालेल्या हृदयस्पर्शी घटनेवर मी, ' अय्, तूने यह क्या किया ?' या शीर्षकाचे एक छोटेसे खण्ड काव्य निर्माण केले आणि ते त्याच अध्यात्मवादी सत्त्वशील व्यक्तीला ' भेट ' म्हणून दिले.

माझ्या उत्तर आयुष्यातील अखेरच्या पर्वातील आणखी एक छोटीशी घटना. १६ फेब्रुवारी १९८० रोजी खग्रास सूर्यग्रहण होते. मी माझ्या श्रीशेषाश्रमाच्या अभ्यासिकेत गडद काळोख होईल अशी व्यवस्था केली. एका मोठ्या टिनाच्या पेटीला सर्व बाजूंनी कॉर्बन पेपर लावून, आत वर–खाली असे जाडे कागद कॉर्बन पेपरांनी झाकून ठेवले आणि पेटीला कुलूप ठोकून ते सीलबंद केले आणि मग मी त्या माझ्या अंधार कोठडीत, त्या पेटीशेजारीच असलेल्या खाटेला मच्छरदाणी लावून, दुपारी २ वा. २९ मि. ला, त्या खाटेवर पूर्वाभिमुख पहुडून, कसले तरी चिंतन करीत, मच्छरदाणीच्या छतावर एका विशिष्ट केन्द्रभागी माझे लक्ष केन्द्रित केले. तोच एक छोटेसे तांबूस रंगी गोल बिम्ब त्या केन्द्रस्थानी उमटले, आणि त्यातून काही तेजस्वी किरण विस्तारू लागले; आणि ते माझ्या नेत्र ज्योतीने टिपून घेऊ लागलो. ती पूर्ण अभ्यासिका सुगंधाने बंदिस्त झाली. मी हळूच माझ्या उजव्या हाताच्या मध्यमा – अंगुलीने त्या उमटलेल्या गोल बिम्बाला स्पर्श करतो न करतो, तोच सीलबंद पेटीत खळखळ झाल्याचा ध्वनी माझ्या कर्णी आदळला. मी भयभीत झालो. मी एक बिलोरी आरसा भिंतीच्या अशाच एका जागी टांगून ठेवला होता की जेथे पेटी नि माझ्यासकट मच्छरदाणी प्रतिबिम्बित होईल. त्या माझ्या भयग्रस्त अवस्थेत माझी नजर त्या आरशावर केन्द्रित झाली. तेव्हा सूर्यग्रहण होताना, चन्द्रमीलनाच्या छायेतील दृश्याची विविध रंगी पडछाया त्या आरशात प्रतिबिम्बित होऊ लागली; आणि त्या आरशातून परिवर्तित होणारे तेजस्वी किरण सीलबंद पेटीवर लखलखू लागले.

पेटीच्या आत त्या वेळी कसली तरी चाळवा–चाळव होत असल्याची खळखळ मला स्पष्टपणे ऐकायला येत होती. ठीक ३ वा. २० मि. नी अभ्यासिकेत बेगुमानपणे दरवळणारा सुगंध लुप्त झाला आणि बिलोरी आरशाच्या छोटया मोठया मनोहारी बिम्बा बिम्बातून एक अत्यंत देखणी स्त्री–आकृती विलसू लागली; त्या अत्यंत विलोभनीय व चित्ताकर्षक दृश्याने मी पूर्णत: भारावून गेलो पण त्या-बरोबर माझे शरीरही कंपित झाले. खोलीत सूंऽसूंऽऽ अशी एक चैतन्यलहर घोंगावू लागली. केवळ तीनच मिनिटे काय ती. ३–२० ते ३–२३ या तीन मिनिटांच्या अवधीत अन्तराळातील विविध चैतन्यलहरींसह एक दृश्य क्षणा क्षणात विविध रूपे धारण करीत सरकू लागले. बिलोरी आरशातील ती रंगीबेरंगी दृश्ये पर्यायाने पेटीकडे सरकताना आढळू लागली आणि एका मागून एक अशी अदृश्यही होऊ लागली. बरोबर ४ वा. २१ मि. नी अंधारासाठी अभ्यासिका काळचा आच्छा-दांनी मंडित केली होती ती आच्छादने एकाएकी गळून पडली व अभ्यासिकेत लख्ख प्रकाश पडला. अर्थात त्याच क्षणी खग्रास सूर्यग्रहणही समाप्त झाले. या साऱ्या प्रत्यक्ष घडलेल्या अनाकलनीय प्रकारांनी मी भांबावून गेलो. सूर्यग्रहणाच्या अवधीत अन्तराळात घडणाऱ्या घडामोडींचे सूक्ष्म दर्शन घडावे म्हणून मी तशी दृश्ये एका वेगळ्याच आध्यात्मिक व अतीन्द्रिय शक्तीने टिपून घेण्यासाठी बंदिस्त पेटीचा एक स्वत:पुरता प्रयोग केला होता. ती सीलबंद पेटी मी सतत तीन दिवस म्हणजे तब्बल ७२ तास तशीच ठेवली व अभ्यासिकेत त्या कालावधीत कोणीच प्रवेश करू नये, अशी जागरूकतेने दखल घेतली. मी मात्र रोज खाटे-वरील मच्छरदाणीत दडून, त्या पेटीचे दुरूनच निरीक्षण करण्यात रात्र घालवीत असे. २४ तासांनंतर मी सहजच मध्यरात्रीच्या सुमारास पेटीत पुन्हा कसली तरी खळखळ होत आहे म्हणून उठलो व पेटीला हलकेच स्पर्श करण्याचा धैर्य राखून यत्न केला. तो पेटी अगदी तप्त झाली होती व बोटाला जबर चटका बसला. मी घाबरून गेलो. कंपित झालो. घामाघूम होऊन खाटेवर तळमळत पडलो ! ४८ तासानंतर मी पुन्हा धाडस केले. कागदाचे व खडर्याचे काही तुकडे व एक फूल मी वरूनच पेटीवर टाकले तो ते जळून खाक झाले. ७२ तास झाल्यानंतर, मी माझी अभ्यासिका पूर्णत: कार्बन पेपरांनी व मेणकापडांनी आच्छादून स्वत:ला कोंडून घेतले आणि मग अगदी मध्यरात्री, घडयाळात बाराचे ठोके पडत असताना, प्रथम एक रेशमी रुमाल पेटीवर टाकला पण तो जशाच्या तसा राहिला. मग एक अर्धोन्मीलित पुष्पकळी हळूच पेटीवर टाकली पण तीही तशीच टवटवीत राहिली. नंतर मी भीत भीतच मध्यम–अंगुलीने पेटीला हलकाच स्पर्श केला तो ती अगदी थंडगार वाटली. आणि मग मी फार मोठे धाडस करून सीलबंद पेटीचे कुलूप काढले आणि थरथरत्या हाताने पेटी उघडली; तोच मी अगदी चकित झालो ! कार्बन पेपरसह जे कोरे कागद तेथे ठेवले होते त्यावर

सूर्यग्रहणाच्या प्रभावदर्शक अन्तराळातील विविध चैतन्यलहरींनी अव्यक्तपणे निर्माण केलेली अत्यंत सूचक व वेधक दृश्ये उमटलेली होती; पण कॉर्बन पेपर मात्र जळून त्यांची राख झाली होती. परंतु ती राखसुद्धा विशेषत्वाने चकाकत होती. आणि विशेष चमत्काराची बाब की, सूर्यग्रहणाच्या अवधीत बिलोरी आरशावर अतीन्द्रिय विश्वातील ज्या सुंदर स्त्रीआकाराचे मनोवेधक दृश्य मी अवलोकिले होते ते, एका कागदावर एखाद्या अप्सरेप्रमाणे, सप्तरंग–मिश्रित चित्रित झाले होते. पण त्याचा बराचसा भाग जळला होता. परंतु पाश्चात्य राष्ट्रातील कुण्यातरी विल्यम जेम्स नामक एका विज्ञान शास्त्रज्ञाने सागरातील एका बेटावरच्या दीपगृहावरून, कसल्या तरी अतीन्द्रिय लहरीच्या साह्याने, एक प्रबल चैतन्यलहर माझ्या प्रयोगाच्या विनाशासाठी वा तो पूर्णत: असफल होण्यासाठी अव्यक्त रूपाने पाठविली असल्याचे व त्यामुळे अंकित झालेल्या, एक वेगळी चैतन्य शक्ती राखणाऱ्या स्त्री–चित्राला जाळून टाकण्याचा प्रयत्न झाला असल्याचे, मी निसर्गाचा सूक्ष्म वेध घेतला असता, आढळून आले. तसेच विल्यम जेम्स यांनी आपल्या प्रतापी अतीन्द्रिय शक्तीच्या प्रभावाने हिमालयाच्या एका दुर्गम पायथ्याशी असलेल्या एका भयानक गुहेत निसर्गातील विविध चैतन्यशक्तींना अंकित करू पाहणाऱ्या रिबेका आणि समिधा या दोन युवतींनी खग्रास सूर्यग्रहणाच्या प्रसंगी निर्माण केलेल्या एका अतीन्द्रिय चैतन्यलहरीला, आपल्या स्वत:च्या चैतन्यलहरीकडे वळते करून, माझ्या अध्यात्मशक्तीवर आणि त्या पार्श्वभूमीवरील अतीन्द्रिय शक्तीवर मात करण्याचा दुष्ट प्रयत्न केला असल्याचेही माझ्या निदर्शनास आले. सूर्यग्रहणाच्या वेळी जी विविध रंगीत चित्रे अव्यक्तपणे अंकित केली होती, त्यातील काही अनेक जाणत्या व्यक्तींना मी दक्षतेने व विशेष जपणुकीने दाखविण्याचा यत्न केला होता. आणि मग ती सर्व दृश्ये सीलबंद करून घेतली. पण त्यानंतर, दुसऱ्याच दिवशी मध्यरात्री मला कसला तरी संकेत झाला म्हणून मी सीलबंद केलेले एक थोरले पाकीट उघडून पाहिले तो त्या सुंदर तरुणीचे अन् त्याबरोबर विल्यम जेम्स याचे जे जळके छायाचित्र लाभले होते ते अदृश्य झाल्याचे मला आढळून आले !

माझ्या आध्यात्मिक आणि साहित्यिक जीवनात एक विशेष छंद म्हणून, मी लोककल्याणासाठी आत्मशक्तीचे जे प्रयत्न केले ते अर्थातच माझ्यापुरते मर्यादित अगदी सीमितच राखले गेले. पण तशा विविध प्रकारच्या अनुभूतींवर मात्र मी माझे लेखनकार्य करण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

एके दिवशी अखिल भारतीय आकाशवाणी केंद्र, औरंगाबादचे एक हृदयवंत व बुद्धिवंत संचालक श्री. के. डी. जोशी यांची एका निवड समितीचा सभासद म्हणून मान्यता देण्याबद्दल मला हाक आली. श्री. के. डी. जोशी यांचे गेल्या तीस वर्षांपूर्वीचे माझे निकटचे संबंध लक्षात घेऊन, प्रकृती बरी नसताही, मी मान्यता

दिली आणि दि. ७ व ८ एप्रिल १९८० रोजी औरंगाबाद आकाशवाणी केंद्राच्या होणाऱ्या निवड समितीच्या बैठकीसाठी मी गेलो. संचालक श्री. के. डी. जोशी व प्रोग्राम एक्झिक्युटिव्ह ऑफिसर श्री. कांबळे यांनी माझे हार्दिक स्वागत केले. त्याच वेळी नांदेड येथील 'प्रजावाणी' दैनिकाचे एक व्यासंगी संपादक श्री. सुधाकर डोईफोडे यांचीही योगायोगाने भेटगाठ झाली. आजचे मराठी साहित्य कोणत्या दिशेने कसे धाव घेत आहे आणि त्यामुळे साहित्यात मनोविकृतीचे कसे दर्शन घडते याबाबत मोठी उद्‌बोधक मीमांसा झाली. त्या दृष्टीने स्वातंत्र्यापूर्वीचे साहित्य मनावर कसा ठसा उमटवून घेत असे आणि कशी अवीट गोडी निर्माण होत असे, यावर भर देऊन त्यांनी माझ्या साहित्याची प्रशंसा केली. पण आत्मस्तुतीचा भाग वगळून, गेल्या पन्नास वर्षांपासून अत्यंत दाहक परिस्थितीत स्वतःचे काही शिक्षण झाले नसले तरी, 'मी आणि माझे लेखन' याचा एक जळजळता आलेख त्या विचक्षणांना दर्शविला.

मी औरंगाबाद आकाशवाणी केंद्राच्या निवड समितीच्या बैठकीसाठी गेलो असताना 'अस्मितादर्श' या दर्जेदार नियतकालिकाचे विद्वान संपादक प्रा. गंगाधर पानतावणे, ख्यातनाम कवी प्रा. केशव मेश्राम आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'बहिष्कृत भारतातील अग्रलेख' या जाडच्या ग्रंथाचे संपादक श्री. रत्नाकर गणवीर-प्रभृती साहित्यिकांची प्रा. गंगाधर पानतावणे यांच्या निवासस्थानी भेट झाली. माझे लेखन आणि दलित साहित्य यावर त्यांनी केलेले टीकात्मक भाष्य मला विशेषत्वाने जाणवले. प्रा. गंगाधर पानतावणे हे व्यासंगी वृत्तीचे टीकाकार व विचारवंत भाष्यकार आहेत. 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' या त्यांच्या मौलिक ग्रंथाने आणि 'दलितांचे प्रबोधन' व 'मूकनायक' या त्यांच्या वैचारिक पुस्तकांनी त्यांचा साहित्यिक क्षेत्रातील दर्जा सिद्ध केला आहे आणि गेल्या एका तपापूर्वीपासून त्यांनी मोठ्या धाडसाने फार मोठा खस्ता सहन करून, मराठवाड्यासारख्या मागास भागात 'अस्मितादर्श' नावाचे दर्जेदार नियतकालिक अखंड संपादित करून साहित्यविषयक क्षेत्रात मोलाची भर टाकली. त्याचप्रमाणे प्रा. केशव मेश्राम यांनी आपल्या काहीशा विद्रोही पण मर्मभेदी काव्यसंपदेने तरुण साहित्यिकांच्या मंडळात आपले एक आगळे स्थान निर्माण केले आहे आणि तप्त जीवनस्पर्शी 'पोखरण' या कादंबरीच्या निर्मितीने एक वेगळी दिशाही दर्शविली आहे. तद्वतच मूळचे भंडाऱ्याचे पण मनमाड येथे रेल्वेच्या नोकरीत असलेले व्यासंगी वृत्तीचे व शालीन प्रकृतीचे एक विचारवंत संशोधक श्री. रत्नाकर गणवीर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'बहिष्कृत भारतातील अग्रलेख' सूक्ष्म जाणिवेने संपादित करून एक जाडा मौलिक ग्रंथ निर्माण केला आहे. या तीनही मान्यवर साहित्यिकांशी मी आणि माझे लेखन या संबंधी जी सर्वस्पर्शी चर्चा झाली त्यावरून आज या परिवर्तनाच्या काळात दलितांचे दमदार विद्रोही साहित्य कोणत्या दिशेने

कसे जात आहे याची जाणीव मला झाली. पण अशा या चर्चेतून प्रा. गंगाधर पानतावणे व प्रा. केशव मेश्राम हे मुंबईच्या पाप्युलर प्रकाशनतर्फे माझ्यावर या वृद्धापकाळी काही जबाबदारी टाकतील याची मला मुळीच कल्पना नव्हती. त्यांनी मला पाप्युलर प्रकाशनतर्फे प्रकाशित होऊ घातलेल्या एका पुस्तकासाठी ‘ आत्मकथन ’ लिखाणाची लेखी मागणी केली. मी पुन्हा पेचात पडलो. ‘ मी आणि माझे लेखन ’ हे माझे आत्मपर लेखन प्रा. गंगाधर पानतावणे यांनी १९७६ सालच्या आपल्या ‘ अस्मितादर्श ’ या दिवाळी अंकात प्रसिद्ध केले होते व आता ते पुस्तकरूपाने प्रकाशित झाले आहे आणि म्हणून दुसरे आत्मकथन दर्शविण्याची काही आवश्यकता नसल्याचे मी सांगितले. पण त्यांच्या आत्मीयतेने केलेल्या मागणीला मला नकार देता आला नाही आणि जर्जरावस्थेतही औरंगाबाद ते नागपूर या दि. ९ एप्रिल १९८० च्या प्रवासात मी ‘ आत्मकथन ’ आगगाडीच्या वेगाबरोबर लिहून काढले.

दि. ९ एप्रिल १९८० रोजी मध्येच माझी प्रकृती बिघडल्यामुळे मी मनमाडला श्री. रत्नाकर गणवीर या साहित्यकाराकडे मुक्कामाला राहिलो. पण हा माझा मुक्काम मला जेवढा महाग तेवढाच काहीसा लाभदायकही ठरला. मनमाडला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला श्री. गणवीर हे संचालित करीत होते. दि. ९ एप्रिलला प्रा. जनार्दन वाघमारे यांचे व्याख्यान होते. पण ऐनवेळी ते येऊ न शकल्यामुळे श्री. प्रभाकर गणवीर यांनी व्याख्यानमालेची ती उणीव मी भरून काढावी अशी विनंती केली. मी त्यांच्याचकडे मुक्कामाला असल्यामुळे त्यांनी जिव्हाळ्याने दिलेली हाक मला नाकारता आली नाही. मनमाड रेल्वे हॉस्पिटलचे सुहृद डॉक्टर सोमकुंवर यांनी माझी प्रथम तपासणी करून अविलंब औषधोपचार केला आणि नंतर, मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्याख्यानमालेतील तिसरे पुष्प, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर : अध्यात्म, साहित्य आणि संस्कृती ’ या विषयावर बोललो. दोन तास मी भाष्य केले. माझ्या त्या भाषणानंतर उपस्थित असलेल्या काही सुविद्य तरुणींनी माझी भेट घेऊन त्या विषयावर मी एक छोटा तरी प्रबंध लिहावा अशी विनयपूर्वक गळ घातली. हाच विषय मी ‘ विलासिनी ’ या कादंबरीत आविष्कृत केल्याचे सांगितल्यावरही, त्या तरुणींनी मी स्वतंत्र प्रबंधच लिहावा यावर भर दिला. आणि माझी प्रकृती थोडी बरी राहिली तर निर्दिष्ट विषयासंबंधी मी एक प्रबंध लिहीन असे त्यांना आश्वासन दिले. माझ्या गेल्या ७२ वर्षांच्या जीवनात ध्यानीमनी काही नसताना योगायोगाने लेखनविषयक काही घटना घडत आल्या आहेत आणि उत्तर आयुष्याच्या माझ्या या शेवटल्या पर्वात लेखनासाठी महाराष्ट्राच्या चारही दिशांतून जिव्हाळ्याची हाक येतच आहे. दि. १० एप्रिल १९८० रोजी औरंगाबाद ते मनमाड व मनमाड ते नागपूरला, स्टेशनावर माझे पाऊल पडते न पडते तोच, एक जाडी विचावंत व्यक्ती

माझ्यापुढे उभी राहिली आणि तिने 'गीतांजलीने मुंबई सोडली' या माझ्या भावी कादंबरीची अपेक्षा बाळगली. दोन वर्षांपूर्वी मुंबई येथील वरळी विभागात गीतांजली नावाच्या एका देखण्या पदवीधर तरुणीची तिच्या आईकडून विक्री झाली होती. त्या तरुणीला मुक्त करून, तिच्या स्त्रीत्वाचे रक्षण व्हावे आणि समाजात तिला प्रतिष्ठेने जगता यावे यासाठी जो मी प्रयत्न केला होता, त्यावर 'गीतांजलीने मुंबई सोडली' ही कादंबरी निर्माण करण्याचे मी ठरविले होते व श्रीशेष प्रकाशनने ती प्रसिद्ध करण्याचे मान्यही केले होते. आज ना उद्या गीतांजलीने मुंबई सोडली असा प्रत्यय वाचकांना यावा अशी दखल मी घेत आहे.

माझ्या ७२ वर्षांच्या प्रदीर्घ जीवनात मी जनहिताचे कसलेच पुण्यप्रद कार्य करू शकलो नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. 'मी आणि माझे लेखन' हा जीवनविषयक छोटा प्रबंध सादर करताना, ज्या काही घटना, जे काही प्रसंग अथवा जी काही विधाने दर्शविली आहेत त्यात कुणाला आत्मस्तुतीचा वा आत्मप्रौढीचा वास येऊ शकेल, हेही मी जाणून आहे. पण स्वत:संबंधी काही नमूद करताना, अनुभवास आलेल्या वस्तुस्थितीला दृष्टीआडही करता येत नाही. ज्या मार्गाने ज्याची वाटचाल आहे; ज्या ध्यासाने व ध्यानाने जो आपला मार्ग, मग तो कोणत्याही परिस्थितीत कसा का असेना, तसल्या ध्येयप्रवणतेने दुसरी व्यक्ती गेली नसल्यास अथवा तशा अनुभूतीचा प्रत्यय आला नसल्यास, तशी व्यक्ती काही बाबतीत साशंक राहून, तर्ककुतर्क करीत राहणार, प्रखर टीकास्त्रीही सोडू शकणार याचीसुद्धा मला नीट कल्पना आहे. पण स्वत:चे हृदय पवित्र व कोणतीही कृती विशुद्ध आणि मन इतरांच्या कल्याणाचेच चिंतन करीत असल्यास, मजसारखी खेडूत व्यक्ती, कोणत्याही पाशवी प्रहाराला डगमगत नाही; उलट टीकाकारांचे वा निंदकांचे सहर्ष स्वागतच करून, आपल्या जीवनाच्या अत्यंत रखरखीत चिंचोळ्या वाटेने जात, इतरांचे कल्याण चिंतितच आपले पाऊल पुढे टाकील !*

* *

### आध्यात्मिक पर्व

बालपणापासून माझे तप्त जीवन बरेचसे विचित्रच ! आधीच कथिले : काहीसे चमत्कृतिजन्य पण वस्तुस्थितिदर्शक.

प्रखर अनुभूतीशिवाय अन्यत्रांना, ते त्या दिशेने जात नसल्यामुळे, मोठे विलक्षण नि अद्भुत वाटणे स्वाभाविकच !

ऑक्टोबर ते डिसेंबर १९७९ आणि जानेवारी ते फेब्रुवारी १९८० चा

---

** प्रस्तुत 'मी आणि माझे लेखन' हा छोटा आत्मप्रबंध १९७६ च्या 'महासागर' दैनिक व औरंगाबादच्या 'अस्मितादर्श'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला आहे. नंतरचा चार वर्षांचा लेखनकार्यभाग अधिकचा जोडला आहे.*

कालखंड. मतलई वाऱ्याने वेष्टिलेले पाच महिने. माझ्या आध्यात्मिक मनाची व जीवनाची जणू प्रखर सत्त्वपरीक्षाच घेणारे.

१२ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर १९७९ हे नऊ दिवस हेलिकॉप्टरने मी हिमालयाचा निसर्गरम्य आध्यात्मिक संपूर्ण पायथा पालथा घातलेला. मानस सरोवर गुलमर्ग, काराकोरम खिड, दम चौक, जन्मोत्री, बद्रिनाथ, केदारनाथ, नंदादेवी, सिमला, हरिद्वार, हृषिकेशच्या भ्रमंतीनंतर, गोरखपूर, तेजपूर, सिकीम, शिलाँग, कोहिमा, दिब्रूगड आणि मग ब्रह्मदेशाच्या उत्तरेस अरुणाचल प्रदेशाच्या सीमारेषेवर असलेल्या ब्रह्मकुंडाला मी गाठले.

अमेरिकेची विद्यासंपन्न व धनसंपन्न रिबेका, एक देखणी युवती आध्यात्मिक बलप्राप्तीसाठी भारतात येऊन, तेजपूरपासून सुमारे ४३ कि. मि. अन्तरावर गुहेत हिमालयाच्या पायथ्याशी, १३ कि. मी. लांबच्या लांब असलेल्या एका भयानक निसर्गाचा वेध घेत वास्तव्य करीत असलेली. अव्यक्त रूपाने तिने माझ्याशी संपर्क साधलेला आणि हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या अनेक चित्तवेधक स्थळांचे मला दर्शन घडविण्यास नेतृत्व केलेले.

रिबेका आणि तिची एक जिवलग मैत्रीण समिधा व अन्य पाच तरुणी अशा सात तपस्विनींचे हिमालयाच्या त्या भयाण गुहेत, निसर्गातील विविध चैतन्य-लहरींना आत्मसात करण्याचे प्रखर प्रयत्न होते. मी जेव्हा तेजपूरच्या उत्तरेस येऊन ठेपलो तेव्हा एक योगी पुरुष एका पायावर उभा राहून घोर तपस्या करीत अगदी ताठ उभा होता त्याचे रात्रंदिवस सतत उघडे असलेले नेत्र आभाळाकडे वेधले गेले होते. संपूर्ण शरीर फुगले होते व नेत्र तारवटलेले अन् बुबुळं बाहेर आलेली व नेत्रकडा सुजून होत्या. त्याच्या जटा भुईत रुतल्या गेल्या होत्या; अन् शरीरावर वारूळ चढत होते. मोठे भेसूर दृश्य होते ते ! ना तो अन्न–पाणी ग्रहण करीत होता अन् ना तो कधी बोलू चालू शकत होता. २४ वर्षांपासूनची त्याची ती अत्यंत कठोर तपस्या होती !

दि. १४–१२–७९ रोजी मी जेव्हा तेजपूरजवळील त्या भयप्रद गुहेपाशी येऊन पोचलो तेव्हा सायंकाळ होऊ घातली होती. चार गलेलठ्ठ वाघांनी गगनभेदी आरोळी ठोकून अकस्मात मला घेरले होते. आपला काळ वेगाने धावून आला असे मला वाटले. पण रिबेकाने एका आत्मशक्तीच्या बळावर त्या व्याघ्रांची पाचदहा मिनिटांतच पांगापांग केली नि मला हायसे वाटले !

गुहेच्या प्रवेशद्वाराशी मोठमोठाले दगडी चट्टाण होते. दगडातच त्यांची अळणं वळणं घेतलेली अशी रचना होती की कुणालाही त्याआड गुहा आहे याचा बाहेरून थोडासुद्धा भास होत नव्हता. १३ कि. मि. लांब असलेल्या गडद अंधारातील त्या गुहेत प्रवेश करणे म्हणजे स्वतःचे प्राण गमावणे असेच वाटायचे, पण रिबेका आणि तिच्या सहा मैत्रिणी आपल्या सत्त्वशक्तीने तिथे नग्नावस्थेत

वास्तव्य करीत होत्या. गुहेतून अंधाराला मनोधैर्याने चिरत जाऊन काही अंतर चालून गेल्यावर तांबूस रंगी नागांचा सुळसुळाट असल्याचे प्रत्ययास येत होते. कुणाजवळ आत्मबळ असल्याशिवाय तो ती गुहा आक्रमूच शकत नव्हता. गुहेच्या अगदी शेवटच्या टोकाला पुरुषभर उंचीची फसफसून फणा काढलेली श्रीशेष काया डोलत असायची आणि त्याच्या दैदीप्यमान कंठमण्याने गुहेत प्रकाश प्रवर्तित व्हायचा. श्रीशेषापुढे जमिनीतूनच एक नैसर्गिक ज्योत अखंड तेवत असायची. तिच्यावर नजर गेली की नेत्र दीपून अंधारी वाटायची. रिबेकाने त्या स्थळाचे आध्यात्मिक माहात्म्य विशद केल्यावर हेलीकॉप्टरनेच आम्ही मध्यरात्री ब्रह्मकुंडाकडे प्रयाण केले.

त्या प्रवासात, कोहिमा ते तेजपूर अशा मार्गावर असताना त्या सात तपस्विनींची आराध्य देवता 'अस्मिता' अभावितपणेच, दि. १५–१२–७९ रोजी मनश्चक्षूपुढे तरळली. अत्यंत तेजस्वी कांतीची, सहजतेने मन जिंकून घेणारी अस्मिता अवलोकून, तिच्यासंबंधीची एक हृदयस्पर्शी स्मृती जागृत झाली आणि माझ्या ओठावर शब्द तरंगले :

> देखता मैं नशेली मदभरी तेरी आँखें
> जिंदगी की दास्ता तेरी पलकों से कुछ कहें

उसने एक दिन यूंही कहा था–

> हूं हसीन फिर भी वह दर्द छिपाऊं कैसे ?

तब मैंने उसे आध्यात्मिक जिंदगी की कुछ चमकीली, चैतन्यमय रेखाएँ स्पष्ट की थी। और फिर कुछ दिन बाद वह कुछ बदलती नजर आयी। उस वक्त मैंने कहा था–

> याद है तुझे वो दिन
> पल को की छाया में डूबी तू कुछ मांग रही थी
> दर्द की दवा तूने अनजाने ही मांगी थी
> हुस्न के खुशबू से लपेटे दिल से तू कुछ बोली थी
> तब–
> जिग्र की जखमों को यूंही पलको से इशारा किया
> मांगी तो तू कुछ, कुछ और ही रंग रंगाया था
> दिल के धड़कन से एक रसीला सपना सजाया था
> झुमती हुई जवानी की महकती लकेर लपेट दी
> वह नशे में मैं मुसाफीर ताकता रहा
> और तूने दर्द की दवा मांगते हुये
> तड़पाते, तरसाते मजाक से ही तूने मुझे छोड दिया
> फिर भी मैं ढूंडता हूँ अकेला दवा दर्द की तेरे लिये

दामन थाम के तू छुप गयी, गिरफ्तार मुझे किया
तूने ही मांगी थी दवा दर्द की, कुछ और दर्द की
लेकीन आज–तू हट गयी किसी अनजाने राह से
फिर्याद अब किस से करू, क्या तेरे नूर के रूहसे ?

ब्रह्मकुंडाला आम्ही रामप्रहरी पोचलो. सर्वत्र उंचच्या उंच डोंगरराजी, अत्यंत आल्हाददायी निसर्गसौंदर्य, आजूबाजूला जोडलेले चट्टाण. एकाही चट्टाणावर न कळत जर का एखादे पाऊल पडले तर त्या दगडासह व्यक्ती पृथ्वीच्या पोटात खाली खाली जाऊन नामशेषच व्हायची ! पण अशाच संरक्षणस्थळी, प्रखर अध्यात्मवादी आणि अलौकिक आत्मशक्ती प्राप्त झालेली लावण्यमयी अस्मिता एकटीच. त्या निसर्गाच्या कुशीत लोककल्याणार्थ ध्यानमग्न असलेली सात तपस्वीनींची आराध्य देवता अन् स्वामी शेषाद्रीची प्रेरणाशक्ती असलेली ती प्रभावशाली योगिनी अस्मिता ?

पण त्या अस्मितेचे दर्शन मला त्या वेळी घडू शकले नाही; पण एक तेजस्वी आकृती मात्र एका रम्य कुजस्थळी प्रकट झाली अन् तिथेच एक काव्य मला स्फुरले :

पाहिली मी मूर्ती तुझी
रूप तुझं आगळं
तांबूस छटांची पीत कांती
मधुगंध ओसंडतसे
नेत्रपल्लवीची आभा
एक शून्य दर्शवितसे
नेत्रज्योतीची दीप्ती
हृदय मंदिरी प्रकाशतसे

एक संकेत होत असे तो
ज्योत ज्योतीशीं भिडता
शेषाकृती ती प्रगटतसे
अन्तर्मनाला स्पर्शूनी
चैतन्य मनी बिम्बतसे
सुप्त शक्ती जागवोनी
रूप, रंग, गंध तुझे
सत्त्वशक्तीही तुझी
अन्तरीच्या वेदनांना
शमवोनी त्या उबेसह
सुगंध फवारा निर्मितसे

सत्त्वशक्तीची ती प्रभा
नयनी कशी डोलतसे
नेत्रज्योतीच्या प्रभावे
अभय दान ती देतसे

* *

तुझी ती नेत्रज्योत
रंग तीन घेतसे
तांबूस पीत वर्णात त्या
नील वर्ण प्रवेशतसे
अन्--
मम हृदयाची लुप्त ज्योत
पवित्र तुझ्या ज्योतीने
प्रज्वलित केली जातसे
अन् अवचितच
अध्यात्माची एक खिडकी
सहज उघडली जातसे
आणि तुझी काया तेजासह
मग खिडकीतून प्रवेशतसे

मंद मंदशा वायुलहरी सवे
सत्त्वशक्तीचा पावन सुगंध
हृदय भरून टाकितसे
अन् माझ्या फडफडत्या ज्योतीला
तुझी ज्योत धाव घेत भिडतसे
शून्यातूनी एक ध्वनी उमटतसे
आगळा आत्मप्रत्यय लाभतसे

* *

अन् उभय मीलनाच्या प्रभावे
एक दिव्य शक्ती प्रगटतसे
तू अन् मी, मी अन्, तू ते तेज
एक रंगी एक रूप होतसे
त्याच क्षणी–
चैतन्य लहरीचे एक वलय

चारही दिशा व्यापूनी
मृत्यूलाही सहजतेने जिंकितसे
एक रूप, एक तेज
अन् एक ध्यास एक ध्यान
ध्यानात त्या गवसतसे
सत्त्वशक्तीची ती एक ज्योत
अन् ज्योतीतही तरळतसे
मूर्ती तुझी दिव्य ती
अमरत्वाच्या सुगंधे डोलतसे

* *

हिमालयाच्या संपूर्ण पायथ्याचा प्रवास करून आणि अनेक योगी-योगिनींच्या भेटीगाठी घेऊन, एका चैतन्यलहरीच्या वलयातच मी माझ्या श्रीशेषाश्रमात परतलो. तोच एक लखोटा हाती पडला. मी चकित झालो !

तिने सुबक हस्ताक्षरात लिहिले होते–

' स्वामीजी, मी मोठ्या संकटात आहे. माझी आर्त हाक आहे.
मला वाचवा. तुम्ही जाणीव करून दिली होती. पण थोडी
भूल झाली. ती भूल मला नि माझ्या इभ्रतीला धुळीला मिळवेल–
असं वाटलं नव्हतं. पण विपरीत घडलं !
आपल्या भेटीची उत्कंठा आहे. संकेत द्यावा. मी भेटते.'

तो सांकेतिक लखोटा मी पुनः पुन्हा वाचला. काही विशेष जाणवले. थोडा कंपही सुटला.

चिराग जलती थी कल रोशनी को कुछ कहना था
लेकीन,
होठोंपर शब्द अंकित होने के पहले ही वह रो पडी
अंधेरा छा गया, रोशनी को धुंवा लपेट पड़ा

माझ्या मनात, संकेतदर्शक या शब्दांनी, एक वेगळाच संकेत दर्शविला. मी तो लखोटा अविलंब जाळला !

कागदाने पेट घेतला. हलकीशी ज्वाला उफाळली !

त्या ज्वाळेच्या मंद प्रकाशात–

७ डिसेंबर १९७८ चा दिवस उभा राहिला. एक आकृती नजरेपुढं तरळली. गुलाबी थंडीच्या मध्यान्ही.

एका सत्त्वशील तरुणीने माझ्या श्रीशेषाश्रमात अभावितपणेच प्रवेश केला. प्रवेशद्वारावरच दोन्ही बाजूंना असलेल्या मधुमालतीने आपल्या सुगंधित पुष्प-

गुच्छांनी त्या अनामिकेचे सहर्ष स्वागत केले; आणि तिची विलोभनीय कायाही सुगंधमय झाली. त्या अत्यंत मधुर सुगंधाने श्रीशेषाश्रमाचा सारा परिसर भारावून गेला !

सुहास्य वदनाने ती डोलतच आली.

तांबूस रंगी वस्त्र तिने परिधान केले होते अन् केशरी रंगाचा ब्लाऊज तिने घातला होता. भरदार वेणी कटिखाली रुळत होती, तिच्या सुंदर माथी कुंकुम तिलक लकाकत होता. पण–

पण तिच्या गळ्यात मगळसूत्र नव्हते.

ती आली अन् माझ्या अभ्यासिकेतील बिछायतीवर असलेल्या शुभ्र लोडाशी किंचित लवंडून बसली. मला तिचे रंगरूप माझी प्रेरणा शक्ती असलेल्या अध्यात्मवादी अस्मितेसारखे वाटले; जणू अस्मितेच्याच रूपाने तिने प्रवेश केला होता; परंतु मंगळसूत्रविरहित असलेल्या तिच्या गळ्याने माझे मन वेधून घेतले. नाही म्हणायला किटलेली काळी पोत गळ्याभवती होती पण ती मला डागळलेली भासली !

आणि मग ती सत्त्वशील आकृती माझ्या आध्यात्मिक जीवनाभवती एक आध्यात्मिक वलयच म्हणून वावरू लागली.

७ डिसेंबर १९७८ ते ७ मार्च १९८० या सव्वा वर्षाच्या कालखंडात अनेक आध्यात्मिक नि सत्त्वशक्तीच्या घटना घडून आल्या.

तिलाही तिच्या स्त्रीत्वाला अन् सत्त्वशक्तीला कसलाही उपसर्ग पोचू नये, कसलीही झळ लागू नये, अशी तीव्र जाणीव करून दिली होती.

प्राण गेला तरी बेहत्तर पण सत्त्वशक्ती अबाधित राखण्याची तिने श्रीशेष ज्योतीपुढे प्रतिज्ञा केली होती. ती पतिनिष्ठ होती. पतीवर तिची असीम श्रद्धा.

आणि नंतर,

११ डिसेंबर १९७९ रोजी ती आपल्या एका सहेलीसवे दुपारच्या एका चित्रपटासाठी, विशेष जाणीव असूनही, गेली होती.

अगदी क्षुल्लकशी ही भूल !

पण–

त्यानंतर ज्या अनेक घटना घडल्या त्यासंबंधी...

आध्यात्मिक बैठकीवरून सत्त्वशक्ती प्रदान करणारा आत्मबलधारी साधक उद्गारतो,

'करना था क्या और क्या हो गया
ऐऽ तूने यह क्या किया ?

जाग उठा था सत्त्व तेरा
किस्मत की चिराग जलायी थी
अंधेरे में उजाला आ रहा था
अनजाने ही चिराग बुझा दी
ऐऽ तूने यह क्या किया ?

कल की बात कुछ और थी
आज की कुछ थी और
झोली भरी थी कुदरते शक्ति से
वह तूने उंडेल दी
ऐऽ तूने यह क्या किया ?

याद है, वह एक दिन था ...
दामन फैलायी थी तूने
मांगी थी जिंदगी कुछ और
वह दामन ही तूने छोड़ दी
ऐऽ तूने यह क्या किया ?

ना कोई दे सकेगा
ब्रह्म या यमराज भी
अञ्जुली में प्राण पाये थे
मिला था उसे ही खो दिया
ऐऽ तूने यह क्या किया ?

भाग्य की लकेर चमक उठी थी
माथे का सिंदूर महक उठा था
झोली भरी थी किस्मते वैभव से
उलटी कर दी पल में उसे
ऐऽ तूने यह क्या किया ?

जिंदगी भरी थी अमृते खुशबू से
सत्त्वशक्ति पायी थी तूने
ना किसे मिल सकती थी
वह ब्रह्मफूल यूंही ठुकरा दिया
ऐऽ तूने यह क्या किया ?

तेरा हुस्न पाने के लिये
कुछ दिवाने मंडरा रहे थे

दिखाते थे कुछ और करना चाहते थे कुछ
वह दरवाजा बंद किया था, खोल दिया तूने
ऐऽ तूने यह क्या किया ?

दुष्ट ग्रह से घेरी थी तसबीर तेरी
हर कोई कहता था, हम हमदर्द है
दिखावा कुछ और था, नजरे कुछ और थी
तोड़ दिया था जाल वह, उसे ही अपना लिया
ऐऽ तूने यह क्या किया ?

आसक्ति से भरी तसबीर तेरी
तकदीर से सजायी थी
षड्यंत्र को मिटाकर, नयी तसबीर खिंची थी
वही तसबीर यूंही फोड़ दी तूने
ऐऽ तूने यह क्या किया ?

एक साल पहले कौन थी तू और क्या थी
मंझिल क्या थी तेरी
माथे का सिंदूर ढल रहा था
उसे संवराया था, वही तूने मिटा दिया
ऐऽ तूने यह क्या किया ?

तेरे ज़िगर के प्यारे शोहर के लिये
गिड़गिड़ाते कुछ और मांगी थी
हस्ती–शक्ति के बलिदान से, वरदान तू पायी थी
वही वरदान यूंही प्रचल दिया
ऐऽ तूने यह क्या किया ?

अध्यात्म के ऊंचे चोटी से
आत्मशक्ति को तूने पाया था
तकदीर का सितारा माथेपर टपका था
उसे तूने यूंही ढकेल दिया
ऐऽ तूने यह क्या किया ?

दुनिया में ना मिले वह चीजे तूने पायी थी
मांगे वह शक्ति तूझे भरकस मिलती थी
तेरे अरमान क्षणों में सफल होते थे
वही अनमोल चीजे तूने ठुकरा दी
ऐऽ तूने यह क्या किया ?

याद है ना –
सत्त्वशक्ति के बलपर वह सुगंध पाया था
सारा संसार तेरा पावन सुगंध से छाया था
अमरत्व की उस सुगंध से तेरी काया भी चमकी थी
वरदान की वह सुगंध तूने यूंही खो दिया
ऐऽ तूने यह क्या किया ?

अस्मिता तेरे रोम रोम में लहू के कण कण में
छायी थी, समायी थी तेरे तनबदन मन में
नेत्रज्योति की कुछ और पावन प्रभा पायी थी
जलती शमा को यूंही फूंक दिया
उजाले में अंधेरा छा दिया
ऐऽ तूने यह क्या किया ?

* *

एक देखणा तरुण होता. सत्प्रवृत्त होता, सच्छील होता. त्याची धर्मपत्नीही सत्त्वशील होती, पतिनिष्ठ होती.

उभयता प्रेमळांची मजवर मोठी निष्ठा, मोठी श्रद्धा.

५ जानेवारी १९८० रोजी, त्याच्या सत्त्वशील पत्नीने महर्षी अरविंद घोषांच्या 'सावित्री' या महाकाव्याचे तद्रूप होऊन वाचन–मनन केले होते. ती आपल्या पतीला जणू सत्यवानच मानत होती. सावित्रीने आपल्या सत्त्वशक्तीने अल्पायुषी असलेल्या स्वामी सत्यवानाचे प्राण हरण करू पाहणाऱ्या यमालाही जिंकून आपल्या पतीला दीर्घायुष्य प्राप्त होणारे वरदान पदरी पाडून घेतले होते.

तशीच ६ जानेवारी १९८० रोजी भंडारा येथे घडलेली अद्भुत पण वास्तव घटना.

तिन्ही सांजेची वेळ.

ती आपल्या पतीची आतुरतेने वाट पाहत दाराच्या उंबरठ्यावर उभी होती. तिचा पती ऑफिसमधून घरी यायला निघाला होता. तो जवळपास आपल्या निवासस्थानानजीक येऊन ठेपला होता. इतक्यात एक सप्तरंगी वलय त्याच्या निवासाच्या अंगणी चक्राकार गतीने फिरले नि अन्तराळातून एक भेसूर ध्वनी निनादला : 'तुला यायचं आहे, तुला यायचं आहे ?'

त्याच वेळी मी सावित्रीच्या तपोबलावर एक छोटेसे भाष्य करून, एक विशेष संकेत देत, दाराबाहेर पडून अंगणात येतो न येतो तोच, तिच्या पतीचे दोन-तीन क्षणांत प्राण हरण करू पाहणारा ध्वनी निनादणे अन् तो मृत्युध्वनी तत्क्षणीच हृदयाला घरे करून जाणे, एकच गाठ पडली आणि 'नाही, नाही; ते कदापि

शक्य नाही ' या संदर्भात नकळतच आत्मशक्तीचा मंत्रध्वनी माझ्या ओठावरून तरंगत एका चैतन्यलहरीत सामावला; अन् मला जोराची ठेच लागली. उजव्या पायाचा अंगठा अगदी ठेचाळून गेला, रक्तबंबाळ झाला नि हृदयात कळ उठली !

तिच्या पतीचा मृत्यू टळला, त्याला जीवदान लाभले !

पण मी–

शरीराचा कसाबसा तोल सावरीत त्याच वेळी क्षणाक्षणाला घट्ट घट्ट होत जाणाऱ्या कडक थंडीच्या त्या अंधारात काध्र्याच्या पुलानजीक, वैनगंगेच्या तीरावर असलेल्या स्मशानघाटावरून, नदीच्या पात्रात असलेल्या एका खडकावर काळी शाल ओढून कसले तरी चिंतन केले; निसर्गातील सत्त्वशक्तीच्या एका चैतन्य-लहरीला ताब्यात घेऊन, यमरूपी एका श्वानाशी तुंबळ झुंज घेतली नि यश:श्री प्राप्त केली. त्या समयी त्या भयाण मध्यरात्री नियती मला खड्सावून जाब विचारते,

' प्रबल सत्त्वशक्ती खर्चून व प्राण पणाला लावून एकाला जीवदानाचे वरदान दिलेस, अरे असे तू का केलेस ?'

त्या वेळी न डगमगता मी निर्भयतेने आणि काहीशा अभिमानाने उत्तर दिले :

हाँ, क्या कहूँ कैसा कहूँ
तप्त राह थी मेरी, मंझिल कुछ और थी
अकेला भटकता जा रहा था
ना इधर कुछ, ना उधर कुछ
चारो और अंधेरा छाया था

एक दो नहीं, साठ साल की तपस्या थी
अध्यात्म के बल पर अतीन्द्रिय शक्ति झुकती थी
धन दौलत, सत्ता और अधिकार भी क्या
उंगली पर नाचा करते थे

मांगू वही मिले, चाहू वैसा ही हो
लेना कतई नहीं सिर्फ देना ही जानता था
किसी को पलभर में जीवदान देकर
मृत्यु पर भी विजय पाता था

और आज–

चारों और घना अंधेरा छा गया
नियति अब क्रुद्ध होकर पूछती है–
' इन्सान को ना मिले वह शक्ति तूने पायी थी
तेरे एक शब्दमंत्र पर सारी प्रकृति भी झुमती थी
पर आज यह गजब कैसा हुआ

निष्प्रभ होकर, ऐसा अंधेरा कैसा छा गया
अरे, तूने ऐसा क्यों किया ?'

मैं उछल कर जबाब दिया–
कैसा कहूँ, क्या कहूँ, बयान दूं तो कैसा दूं
पाया था सारा खो दिया, उसका नतीजा क्या कहूँ ?
पूछती हो अधिकार से तू नियति
तो हाँ,
समयचक्र की बेलीपर
प्रकृति की डाली-डाली पर
अणु रेणु के केन्द्र-केन्द्र पर
तेरी सूक्ष्म नजरों में कुछ छुपा न होने पर
मेरी आखरी धडकन् से पूछती है तू मतवाली
अरे, तूने ऐसा क्यों किया ?

हाँ तो मैं ओछा इन्सान, क्या कहे
लेकीन,
मेरे जिगर जख्म से तड़फती धड़कन कहती है–
लहू का आखरी शोला उछल कर कहता है,
वह एक नेक इन्सान मरा था
उसमें जान फूंक दी

तू तो बडे चाव से देखती थी नियति
किसी शीलवती का सिंदूर मिटता था
उस माथें पर सिंदूर भर दिया, वरदान दे दिया
कर्क क्या, जालीम महारोग क्या
चिर निद्रा से लपेटते जाता था
बुझते हुए चिराग को फिर से जला दिया
किस मासूम की आबरू लूटी जाती थी
अपहरण, छलना और बलात्कार भी क्या
उसके आर्त पुकार से
उसकी सत्त्वरक्षा की, उसे प्रदीप्त बना दिया
किसी का मदभरा हुस्न पाने, इश्क के उन्माद से
महकते हुए यौवन की लूट करने
किसी दुष्मनों ने षड्यंत्र रचाया था
इज्जत की बरबादी और खून खराबी का फांसा था

क्षण में मैंने उसे तोड़ दिया
नयी रोशनी से नया बेहतरीन चित्र बना दिया
था कोई इन्सान गरीब पिसा जाता था
था कोई दरिद्री भिकारी कुचला जाता था
रोती थी कुटिया अंधेरे में ढलकी हुई
जिंदगी जिस की थी बिघडी
उसे ऊंचा उठा दिया
दुर्गंधि की नाली में सुगंध का फवारा उडा दिया
और तू पूछती है नियति
अरे, तूने ऐसा क्यों किया ?
और जरा ध्यान से सुन
जिंदगी बिघाड दी मेरी खुद मैंने
और किसी की भरकस सुधार दी
रोता था मैं, लेकीन—
और किसी को हंसाता रहा
दु:ख दर्द लेता था मैं, और किसी को सुख चैन देता था
बदबू से लपेटता रहा मैं, और खुशबू से किसी को महका दिया
फिर भी—
दुर्गंधि मे सुगंध पाया, दु:ख दर्द में आनंद
अंधेरे में भी कुछ और पाया
यही मेरी शक्ति थी, यही मेरी असीम भक्ति थी
तू तो जानती हो नियति
मैं कौन हूँ और क्या हूँ
प्रकृति की सत्त्वशक्तिने जो कुछ भी दिया
उसे मैं जिसका उस को हृदय से लौटा दिया
दिल के किसी कोने में
छुपा हुआ था सिर्फ एक कण
था शेष, वह भी किसी पवित्र चरणों पर अर्पित कर दिया
हाँ, और अब
दिल का दिया बुझता रहा
उसका धुंआ सिर्फ फैलते रहा
और अंधेरा छा गया
वह धुंआ ही अब मेरे रूह के साथ
घने अंधेरे में टटोलते जा रहा

और तू पूछती है नियति
अरे, तूने यह क्यों किया ?

तुझे याद है नियति
वह दिन, वह समय और वह दर्दभरी घटना
दे दी थी शक्ति
दे दिया था वरदान
किसी को
फिर–
मैं तो चला था मेरी कब्र की ओर
फिर भी यमदूत को तूने भेजा था
आहत ना मिली, ना अरमान रहा, ना कुछ उमंगे
एक सांस भर बाकी थी
यमदूत झल्लाते कहता था, तुझे अब चलना है
मैं कुछ समय की याचना की थी
करुणता से मैंने कहा था–
अय् यमराज के अक्राल दूतों, काल पुरुषों
मैंने सौदा किया वादा किया
अरे, उसे निभाने तो जा रहा हूँ...
शायद तुम्हें मालूम नहीं,
चित्रलेखा के जरिये चित्रगुप्त को जताया हूँ
तमन्ना है, अरमान है थोडी
मेरी प्रेरणा शक्ति अस्मिता के आखरी मुलाकात की
उसे एक बार देखूं, उससे कुछ कहूँ
इतना ही समय तो मांग रहा
लेकीन याद रखो–
समय चाहे दो या न दो
मुझे अस्मिता का दर्शन पाना है
और मैं जा रहा, दिल की धडकन के साथ
खून का तिलक लगाया
मिटते जा रहे तकदीर के हाथ
जाते समय मुझे जलील न करो
शेषज्योत का उजाला साथ है, हाँ शेषज्योत
और हाँ नियति,

प्रकृति की ए मलका–ए–आलम्
तू तो ठिकसे जानती हो, पहचानती हो
ना जादू टोना, ना तंत्रमंत्र मैंने पाया है
अध्यात्म के सत्त्वपिंड से अतीन्द्रिय शक्ति अपनायी है
पर्यावरण की दस दिशा से चैतन्य लहरें समेटी है
एक जमाने का उस प्रबल अध्यात्म चोटी का
मैं भी एक युगपुरुष हूँ
लेकीन आज निष्प्रभ होने पर भी
चाहूं तो दम छोडते वख्त
यमराज पर भी विजय पा सकूं
क्या कहा नियति ?
छी छी ! यह गर्व नहीं, घमंड नहीं
मैं बुझदिल नहीं
मैं कौन हूँ और क्या हूँ, मेरी मर्यादा जानता हूँ
हाँ तेरे सर्वस्पर्शी शक्ति का मुझे ध्यान है
तेरे दिल में क्या घटित कराना है
इसकी मुझे खबर है, जलती निशानी याद है
फिर भी तूने बेरहम
अतीन्द्रिय शक्ति के दुष्टों का मेल जुडाया है
मायावी गरुड के जरिये मुझे जाल में फसाना है
सप्त शृंगेरी के सप्त योगिनीओं का सत्त्व तुझे
भाया नहीं, इसलिये
अमरत्व की सुगंध फिर से मुझे ना मिले
यह करतूद तूने भरकस करायी है
सो ठीक है
तुझे ऐसा करना ही चाहिए
मैं भीक तो मांगता नहीं
ना मैंने कभी मांगी है
कोई मांगे तो मैं कुछ और दे सकूं
इसी क्षण में
और अस्मिता का दर्शन पा सकूं
इसी हालत में
उस राह से बा कदम मैं जा रहा हूँ
कहना ना चाहता था फिर भी कुछ कह दिया

लेकीन याद रख–
मेरे मर मिटने पर भी, मेरी सत्त्वशक्ति का रूह,
मेरा पवित्र मनोद्रव्य
कुछ और शक्ति पाये गा
अन्तराळ से भी मृत्युपर विजय पायेगा
और – और नियति,
तेरा आँचल बेहतरीन खुशबू से महका देगा
अमरत्व की सुगंध चैतन्य लहरों में समा देगा
वह मैं हूँ
नियति, सत्त्वशक्ति की पावन सुगंध का मैं
हां हां मैं शहेनशहा हूँ

* *

दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. ७ जानेवारी १९८० रोजी मी त्या उभयता पतिपत्नीच्या परामर्षासाठी, शरीरात कसले त्राण नसताही गेलो असताना, त्याच्या अस्मितारूपी धर्मपत्नीने विचारले,

'हे असे कसे अचानक घडले ? का घडले ?'

काही क्षण मी स्तब्ध राहिलो आणि मग राहवले नाही म्हणून स्पष्ट बजावून म्हटले :

हाँ, तो अब तू पूछती है प्रेरणा शक्ति
तू ऽऽ...?
यह ऐसा कैसा हुआ और क्यों हुआ ?
ओ प्रकृति की चमकेली रेखा, याद है वह दिन ?
एक साल की तो बात है
दिल टटोलते जा रहा था किस और राह से
और भटकते चल पडा किसी और ही राह से
तो अनजाने ही तेरे सत्त्वशील हुस्न से
मेरे अध्यात्म की छबी यूंही टकरा गयी
सत्त्व सत्त्व का मेल हुआ, और–
तूने जो चाहा मैंने शबनम के समय दे दिया
प्रेरणा शक्ति बन गयी अस्मिता का रूप लेकर
तूने ही तो दी थी प्रेरणा अध्यात्म के अंकपर
और तूने ही तो उसे पल में मिटा दिया
ब्रह्मरेखा खो दी, लक्ष्मणरेषा तोड़ दी

घायल मैं हो गया
कहाँ का अब मैं न रहा
बिदा कर दे ओ प्रेरणा शक्ति
यह ओछा इन्सान अब अपने आखरी मंझिल जा रहा
कुछ करना था और ही तेरी सत्त्वशक्ति के लिए
लेकीन यह अज्ञ इन्सान कुछ कर न सका
यह मेरी भूल थी
तेरे पवित्र चरणों पर
साठ साल की तपस्या का ब्रह्मफूल चढ़ाया था
यह मेरा गुनाह था
तुझे न पहचानते हुए
सत्त्वसुगंध से तेरी काया महका दिया था।
निसर्ग की पवित्र प्रकृति तुझे मानी थी
तेरी सत्त्वशक्ति के खातर
मैं मूर्खता से, तेरी नेत्रज्योत प्रदीप्त करायि थी
सत्त्वशक्ति के सागर पर
अमरत्व के सुगंधी तरंगे लहरायी थी
अंग प्रत्यंग के तेरे हुस्न में सत्त्वशक्ति झांकी थी
अब-यह अच्छा किया
मेरे अध्यात्मपिंड को ठोकर मार दी
और मुझे मेरे आखरी जिंदगी के पर्व में
इन्सानियतका परदा टरका दिया
था अकेला
और आज अकेला ही रह गया
गुनहगार तेरा
नियति की अदालत में अब खड़ा रहा
क्या कहूँ ?
दिल की जखमों से खून बहता जा रहा
लहू की बूंद-बूंद भी अब रोने लगी
जो वरदान न देना था वह दे दिया, और में घायल होकर
प्राणदण्ड भुगतने जा रहा, मुझे तो जाना ही चाहिए
फिर भी मेरी आखरी सांस
तुम दोनों हृदयवंत को दुवा देती रहेगी
और तू तो–

अपनी सत्त्वशक्ति की झलक दिखाती रही
मरियल को भी ऊंचा उठाती रही
आत्मबल से दोनों आगे बढते रहो
बुझते हुए दिया को हमेशा जलाते रहो
और अपनी जिंदगी में खूशबों की महंक फैलाते रहो
और मेरी कभी याद आयी तो
उसके रूह पर भी थूंकते हुए—
खुद की प्रसन्नता दुहराते रहो, सदा खूष रहो

* *

ज्या प्रसन्न व्यक्तित्वाच्या तरुणाला जीवदान लाभले होते त्याची पत्नी दि. ९ जानेवारी १९८० रोजी, सत्त्वशक्तीच्या साधकाने स्मशान–घाटाजवळील वैनगंगेच्या पात्रातील खडकावर श्वानरूपाने प्रकटलेल्या यमाशी प्रखर झुंज घेतली होती त्या स्थळी, सूर्य मावळतीच्या समयी गेली होती, त्याचे स्मरण त्या युवतीला करून देताना साधक उद्गारतो—

त्या तिन्ही सांजेला
स्मशानघाटाच्या उतरणीवर
वैनगंगेच्या विशाल पात्रात
तू गेली होतीस
अन् एका काळ्या चट्टाणाच्या
जलप्रवाहाच्या कडेशी असलेल्या
मऊ वाळूवर बसून, तू सूर्यास्त
अनिमिष नेत्राने पाहत होतीस
एका छोट्या जलप्रवाहात एक सहल काठी
रोवली होती अन्
मावळत्या सूर्याच्या नेत्रवेधक रेशमी किरणांची
एक अत्यंत तेजस्वी रेखा
अगदी समांतर रेषेत
सहल काठीशी एकवटली होती;
त्या वेळी जलप्रवाहात—
सप्तरंग प्रतिबिम्बित झाले होते,
तू हरखून गेली होतीस
सूक्ष्मतेने ते तू न्याहाळत असतानाच
एक अक्राळ विक्राळ काळाकुट्ट श्वान

अचानकच पाण्यावर तरंगत, विरुद्ध दिशेने
झेप घेऊन–
तुझ्याकडे धाव घेऊ पाहत होता
त्याचे ते भेसूर रूप अन् अत्यंत भेदक नेत्र
आणि त्याची ती कमालीची झेप
वेगाने धाव घेण्याची धडपड पाहून
तुझे हृदय धडधडले होते
अन् तू कंपित झाली होतीस
तो तुला, श्वान नव्हे, त्या रूपाने
काळपुरुष झेप घेत असल्याचे वाटले
' नाही, नाही, नाही
तू इथवर कोणत्याही अवस्थेत
झेप घेऊ शकणार नाहीस
आता तुला,
कोणाचा प्राण हरण करता येणार नाही '
ध्वनी आसमंतात उमटले होते
बरे झाले होते
तू आपल्या अपवित्र वस्तू, निष्प्रभ वस्तू
विशुद्ध अन् प्रभावी करून घेतल्या होत्यास
काळरूपी तो भयंकर श्वान पाहून
तू थरथरतच उठलीस, अन् पाठ फिरविलीस
तो, अन्य दुसऱ्या दिशांनी आणखी दोन श्वान
तुला कोंडी करून झेप घेऊ पाहत होते
त्या वेळी अंधार एकवटू लागला होता
नदीपात्राचा परिसर भयाण वाटत होता
' मागे वळून पाहू नकोस '
तुला एक संकेत झाला होता
तरी त्या काळपुरुषाला
पुन्हा एकदा पाहण्याची तुला इच्छा झाली
तोच एक संकेतदर्शक रेघ
सहलकाठीने वाळूवर रेखाटल्या गेली
तू मागे वळून टवकारून पाहिलेस
तुला परत धडकी भरली
पण मंत्रशक्ती राखणाऱ्या त्या सहलकाठीने

तुला पुढे नेले
अन् सुखरूप नदीतीरावरील पुलापाशी आणले
तेव्हा कुठे तुला हायसे वाटले ! ...
त्या काळपुरुषाचे,
जो तुझ्या पतीचे प्राण हरण करू पाहत होता,
त्याचे तू प्रत्यक्ष दर्शन घेतलेस !
आणि मग दुसऱ्याच दिवशी–
तशाच तिन्ही सांजेला
त्याच स्थळी, त्याच जलप्रवाहाकाठी
तू आपल्या पतीला घेऊन गेली होतीस;
अन् मग त्या नदीच्या पात्रावरून
एक हितचिंतक धवल श्वान
नकळतच अभय देत, पुढे सरकला होता
सूर्यास्त झाला; अंधार एकवटू लागला
तुझे लक्ष पूर्वेकडे गेले
अन् एका लखलखणाऱ्या तांबूस ताऱ्यावर
ते केन्द्रित झाले
पूर्व–वायव्य दिशेच्या पंचेचाळीस अंश कोनावर
तो देदीप्यमान तारा अढळ होता
अन् तोच तुझा पावन जीवनतारा होता !
तो अबाधित राहावा म्हणून
त्याच्या जोडीला त्याच्या पाठीशी
एक संरक्षक शुभ्र तारा लकाकत होता
कोणत्याही परिस्थितीत–
'कुणाचा उपसर्ग पोचू देऊ नकोस
सत्त्वशक्तीला कसली झळ लागू देऊ नकोस'
असा दिव्य संकेत
तुझा जीवनतारा तुला दर्शवीत होता
तू अत्यादरे हात जोडून प्रणाम केला होतास
अल्पावधीत
अध्यात्माच्या एका उदात्त बैठकीवरून
तू केवढे आत्मबल कमावले होतेस
निमित्त कुणी प्रबल आत्मशक्तिधारी व्यक्ती असली
तरी, तू आपल्या स्त्रीसत्त्वशक्तीच्या प्रभावाने

पतीच्या प्राणाचे रक्षण केले होतेस
तुझ्या प्रतापी सत्त्वानेच
तू आपल्या जीवनाची अस्मिता
तेजोवर्धित केली होतीस
आणि हरप्रसंगी पावन ठरणारा, अभय देणारा
नागमणी
नागीण मणी
वेधमणी नि संकेतमणी
तू प्राप्त केला होतास
प्रापंचिक जीवनातही तपस्विनी म्हणून
तू आपली एक तेजस्वी अन् प्रभावी अध्यात्मरेखा
निर्माण करून–
अस्मितेत अस्मिता आकारली होतीस
आलंकृत झाली होतीस
आणि कधी कुणाला न लाभणारे
प्रेरक नि पावन भाग्य तुला लाभले होते
निसर्गसत्त्वशक्तीची तू प्रत्यक्ष तेजस्वी आकृती
अन्
आत्मशक्तीची तू एक प्रबल अस्मिताच ठरलीस !

* *

आणि मग मी, अत्यंत जराजर्जर होऊन, रक्ताच्या गुरळ्या टाकीत, नियतीच्या संकेतानुसार, श्रीनगर, गुलमर्ग आणि नंतर एस्कीमोचे शिखर दि. १७ ते २५ जानेवारी १९८० रोजी, कधी व्यक्त तर कधी अव्यक्त रूपाने गाठले. प्रथम नागपूर ते मुंबई आणि नंतर मुंबई ते पुणे व पुन्हा पुणे ते मुंबई असा प्रवास करावा लागला. त्या आगगाडीच्या प्रवासात दुपारी डब्याच्या एका खिडकीवरील काचेच्या तावदानावर एक अत्यंत सुंदर व मोहक आकृती तरळली. मी त्या खिडकीजवळच बसलो होतो. ‘ उद्याचे काय ?’ हा एकच प्रश्न त्या अत्यंत क्षीण व दुर्बल अवस्थेत मला भंडावून सोडत होता. एकाच्या प्राणाचे रक्षण करून त्याला जीवदान दिले, भरघोस आयुष्याचे वरदान दिले, तो नियतीशी झालेला सौदा मला निभविणे अत्यावश्यक होते. केवळ सतरा महिन्यांचे आयुष्य मला नियतीने खास सवलत म्हणून प्रदान केले होते आणि त्याच संदर्भात गुलमर्ग नि एस्कीमोच्या शिखरावर मला जाणे भाग होते. त्याचाच मी त्या पुणे– मुंबई प्रवासात आत्मलक्षी होऊन विचार करीत होतो. तो त्या खिडकीच्या तावदानावरील स्वच्छंदतेने डोलणाऱ्या यौवनेने

माझे लक्ष वेधून घेतले. गाडी वेगाने धाव घेत होती अन् वाऱ्याच्या झोताबरोबर माझे विचारही सैरावैरा धाव घेत होते. त्या तावदानावरील दृश्याशी मी एकजीव झालो का ? काहीच उमगले नाही. आणि... ते विलोभनीय पण अत्यंत सूचक दृश्यचित्र माझ्या हृत्पटलावर स्वाभाविकत:च अंकित झाले :

धरती पर तू खडा, आसमाँ और देखता क्या है
कंगाल तो बन गया, चैतन्यशक्ति खो दिया है
एक सांस शेष है, वह तुझे किसे अर्पित करना है
छाया भी अब रो रही, शून्य की ओर तुझे जाना है

* *

६ जानेवारी १९८० रोजी स्मशानघाटानजीकच्या सरितेतील प्रवाहाच्या काळचा चट्टाणावर मी मध्यरात्री यमाशी झुंज घेऊन ध्यानस्थ झालो असताना, अन्तराळात मला केवळ सतरा महिन्यांचे अत्यल्प आयुष्य प्रदान केले गेल्याची घोषणा आर्त वाणीत करण्यात आली होती. पण मला निसर्गात विलीन होण्यापूर्वी अस्मितेच्या दर्शनाने सत्त्वशक्तीचा आणि अमरत्वाचा सुगंध पुनश्च लाभावा म्हणून आयुर्मर्यादा थोडी वाढवून देण्याची माझी नियतीला आराधना होती पण ती मान्य होईना. यास्तव एका विशेष संकेतानुसार गुलमर्ग नि मग तेथून एस्कीमोचा उत्तुंग हिमशिखर गाठणे प्राप्त झाले होते. त्या प्रवासासाठी तपस्विनी रिबेका आणि समिधा यांनी जाणिवेने दखल घेतली होती. पण एस्कीमोचा गगनचुंबी हिमशिखराचा कळस गाठूनही ईप्सित साध्य झाले नव्हते. कसा बसा परत आलो हेच मोठे भाग्याचे !

१६ फेब्रुवारी १९८० हा खग्रास सूर्यग्रहणाचा महत्त्वपूर्ण दिन. तो निसर्ग चैतन्यलहरींनी अन्तराळ आच्छादून टाकणार असल्यामुळे आध्यात्मिक दृष्टीने पण विज्ञानशास्त्रीय पद्धतीने काही विशेष संशोधन करण्याचे मी निश्चित केले. माझा तो शेवटला प्राणघातक तप्त प्रयोग होता. त्या प्रयोगाची, निसर्गाचा एक सूक्ष्म वेध घेऊन, सुसज्जता केली. अभ्यासिकेत सूर्यग्रहणाचा नि मी आच्छादून टाकलेल्या कॉर्बानचा गडद अंधार एकवटला असताना, त्या विशेष ग्रहणकाळात, गेल्या एका वर्षातील विविध आध्यात्मिक घटनांचे एक चित्र साकल्याने, त्या अंधारातही मजपुढे उभे ठाकले ! ते मी समन्वयाने काव्यबद्ध केले :

ए आत्मशक्तिके दिलवर सितारो
अब क्या पूछते हो दास्ताँन मेरी
जिंदगी तो ढल गयी, नहीं, जल गयी
अस्थि की राख अब रो रही ऽ ऽ

रोना है उसे रोने ही दीजिये
टपकते आँसू से खून बहता है
उसे बहने ही दीजिये
परसो की तो बात है
कुछ याद है या नहीं
पूर्णिमा का चांद आसमां पर
हँस रहा था
तब धरती की छाया में मेरा मन
क्षण में खोया था
एक छाया सिर्फ कांपती थी
वह अपने जखमों की कहानी
सुनाते गयी
अपने खून की लकिरों से
कराहते हुए
उसने एक दर्द भरा चित्र
खिचा था
और मेहरबानो,
आपके पवित्र चरणों पर वह
रखा था
करुणा से भरा वह आध्यात्मिक
चित्र था
तब आपने ना जुबान कुछ
खोली थी
ना रहम की पट्टी उस जखमों पर
बांधी थी
किसी के प्राणदण्ड भुगतने के
सौदे पर
किसी इन्सान को प्राणदान
मिला था
और किसी के माथे का सिंदूर
भर कर
उसकी रक्षा के लिए
किसी ने अपनी
सत्त्वशक्ति समर्पित कर दी थी

रास्ते का वह एक अनजान
भिकारी था
मिली थी कुछ भीक उसे ही
प्रदान कर
वह भिकारी, भिकारी ही रहा
और भूखा–प्यासा रहकर अंधेरा
टटोलते रहा
गुनहगार वह बन गया
और जिसके लिए उसने प्राण की
बाजी लगायी थी
आज उसे ही मुजरीम बनना हुआ
अदालत में खडा
होना पडा
कल की पहचान आज कोई
दे न रहा
दर दर के ठोकरों से वह कुचलता
जा रहा
हाँ किसी पवित्र ज्योति को
साक्ष रखकर
किसीने अपने हृत्पटलों पर
कसम की रेखा खिंची थी
उस भिकारी के अंतिम सांस तक
किसीने उसे किसी भी हालत में
निभाने की
और मौका पडा तो
प्राण का भी बलिदान
करने की
भरकस प्रतिज्ञा ललाट पर
लिखी थी
लेकीन आज–
वह यूंही मिटा दी गयी
जो कुछ हुआ, वह ठीक ही हुआ
कहकर
भिकारी जखमों को सम्हलते

बढते रहा
कुचलने वाले को
कसम खा कर बदलने वाले को
वह भिकारी दुवाएँ देता
भटकते रहा
और अब–
किसी घने अंधेरे कोने से
अन्तराल की किसी भयानक
दिशा से
एक ध्वनि आ रही
किसी को प्राणदान देने के
सौदे पर
वादा निभाने के लिए
बुलाया जा रहा
और उसे किसी हालत में
जाना ही होगा
और, अपने राह पर वह भिकारी
आगे बढ रहा
उसकी अस्थि की राख आँसूओं से
भिगकर
हवा के साथ उडते उडते
कह रही
ना अब बकाया एक शब्द है
ना अब बकाया एक कंठध्वनि
ना मैं किसी का, ना कोई मेरा
चारो और अंधेरा छाया है
अब कुछ सूझता नहीं
मै हूँ अकेला
अन्तरिक्ष के अंधेरे में
अकेला ही जा रहा
नियती के मखमली आँचल में
समा रहा

* *

ओ ए प्रेरणाशक्ति,
एक मास पूर्व
बिते एक साल की
आध्यात्मिक रहस्य की
एक कहानी मैं ने सुनायी थी
समझा था, तुम दोनों
उसका मर्म जान लोगे
अध्यात्मशक्ति की और
अतीन्द्रिय शक्ति की
कुछ पहचान करोगे
कुछ सोचोंगे
लेकीन वह पृष्ठ
कोरा का कोराही रह गया
कहानी के शब्दमंत्र
सांस लेते लेते
लुप्त हो गयेऽ
वह कहानी प्रचीति के साथ
प्रतीत करने का मेरा प्रयास
धूल गया
और दिल की धडकन बढती गयी
ग्लानि छा गयी

* *

ओ प्रेरणाशक्ति
तू तो निसर्ग की प्रकृति
और आध्यात्मपिंड की संस्कृति
याने सत्त्वशक्ति की मलिका थी
शलाका थी
फिर भी नियति की मर्यादा
समझी नहीं
सुनती गयी
और उसे भुलाते भी रही
प्रकृति की तो यह खुदरते
बडी भूल थी

आध्यात्मिकता के ऊँचे शिखरों से
कुछ और सत्त्वशक्ति तू प्राप्त
करती गयी
उसे तू ठुकराती गयी
भूल करते गयी
जो किसे इस दुनिया में ना मिले
वह सत्त्वपुष्प तेरे चरणों पर
चढाते गया
और तू उसे कुचलती ही गयी
षड्यंत्र के किसी के जाल में
तू फसती जा रही थी
सौभाग्य तिलक मिटते जा रहा था
आबरू की लूट के लिए कोई ताकता रहा
अच्छा हुआ
किसी सत्त्वशक्तिने तुझे सम्हाल लिया
तेरी रक्षा की
फिर भी तूने कुछ पहचाना नहीं
हर पावन चीजे निष्प्रभ
करती गयी
खैर
लेकीन जिस सत्प्रवृत्त पति पर
तू निर्भर है
उसे सत्वशक्ति के बलपर
प्राणदान प्राप्त हुआ
यह तेरा सब से बड़ा
सौभाग्य था
वरदान था
उसका मर्म तुझे मालूम था
उसे
नियति की मर्यादा रख कर
निभाना था
सत्त्व का पालन करना था
फिर भी तेरी भूल होती गयी
और उसे, तेरे ही खातिर

एक प्रबल शक्ति सम्हालती गयी
सत्त्वरक्षा करती गयी
क्षण क्षण की चंचलता से
और पल पल की बदलती
भावनाओं से
तू मर्यादों का उल्लंघन करती गयी
ब्रह्मफूल तुड़ाती गयी
किस्मत की भाग्यरेखा मिटाती गयी
और इसी लिए
मैंने कहा था—
ऐऽ तूने यह क्या किया ?

※ ※

याद होगा तुझे
रिबेका ने तुझे टॅलेक्स–केबिल
भेजा था
और तुझे कुछ और जानकारी
दी थी
संकेत दिया था
लेकीन दूसरे ही दिन उसे भी तू
भूल गयी
माफ करना, कुछ और कहूँ—
तेरी सत्त्वशक्ति की रक्षा के लिए
और तेरे हृदयस्वामी के लिए
वरदान प्राप्त करने
कितनी आपत्तियों से, संकटों से
मुकाबला करना पड़ा
एक देहाती भिकारी ने
विदेही अवलियाने
कौनसी और कैसी
जालीम मुसिबतें उठायी
प्राण की भी बाजी लगायी
लेकीन तुम दोनों दिलवरोंने
उसे पहचाना नहीं

ना अब भी उसे पहचाना
यह अच्छा ही हुआ
लेकीन प्राप्त सत्त्वशक्ति की
पहचान भी
ना रखी
यह भूल,
हो सकता कौनसे वख्त
क्या बरबादी कर बैठे
और फिर–
होना था क्या और क्या हो गया
ऐसा दु:खद क्षण उभर न आवे
तो ए प्रेरणाशक्ति
मैं अब अपनी आखरी मंझिलपर
जा रहा हूँ
दोनों सुहृदों के प्रति
लाख लाख शुक्रिया

* *

तेरी प्रकृति की सत्त्वशक्ति की
पलकों की छाया में
मैं कुछ दिन गुजारा किया
वह ऊब का आसरा
मैं कभी भूल न सकूंगा
और तेरे उदात्त हृदय के
स्वामीने
मुझे कुछ दिन नैतिक
सहारा दिया
याद है मुझे
वह भी मैं विस्मृत होने न दूंगा
तुम दोनों के सत्त्वबल पर
तो मैं कुछ दिन
एक साल तीन मास गर्व से
खड़ा था
और आज छुटकारा पा कर

उस कब्र की ओर जा रहा
जहाँ कोई आ न सके...

* *

मेरे आध्यात्मिक बन्धन से
तुम दोनों बंधे हुए थे
आज मुक्त हो रहे हो
मेरी मर्यादों की सीमा में तुम
जखडे हुए थे
आज आजाद हो रहे हो
मेरे कोपिष्ट शब्दों से तुम
तंग आये थे
आज छुटकारा पा रहे हो
एक साल पूर्व की तुम्हारी
आजादी
तुम्हारी मुक्त स्वच्छंदता
तुम्हारा पूर्व प्रापंचिक जीवन
तुम्हें फिरसे प्राप्त हो रहा
तुम जो चाहते थे वह
अब हो रहा
मुझे प्रसन्नता है.
परंतु तीव्र वेदना भी है
मेरे लिए नहीं, आपके लिए
इसलिये अच्छा याद रखना–
कभी ऐसी भूल न होवे
की तेरी सत्त्वशक्ति का भंग हो
मर्यादा का ऐसा उल्लंघन न होवे
जिससे अकस्मात्,
आबरू पर मुसिबत आवे
और ऐसा न हो
की संबंधितों का कुछ ऐसा संबंध
न आवे
जिस से संसार बरबाद हो
और ऐसा भी वख्त न आवे

जिससे लाचारी से हाथ फैलाये जाय
इसलिए—
जाते जाते पवित्र मन से
जता रहा हूँ
भविष्य का धोका...
क्या जाने, कौन जाने
नियति क्या कर बैठे

* *

तो हाँ
आपके दरवाजे पर खड़ा हुआ
मैं एक कोपिष्ट
और दुष्ट भिकारी
घबराओ नहीं,
अब कुछ मांगता नहीं
टरकी हुई खाली झोली लेकर
अपनी तप्त राह से
अकेला
मंझिल की ओर
आप दोनों सत्त्वशील महाभागों को
दुवा देते हुए
फटे कलेजे को सम्हालते हुए
दर दर की ठोकरे खाते खाते
जा रहा हूँ
और कभी याद आयी
तो कहा था ना,
दो झुठे आँसू बहाने के बदले
उस भिकारी के रूह पर
थूंक देना
तुम मानो या न मानो
अन्तराल में मेरा रूह
याने मेरा अव्यक्त मनोद्रव्य
प्रसन्नता से मंडराता हुआ
तुम्हारा शुभ चिंतन

वह विरल विरल होने तक,
करता रहेगा
और हाँ,
जिंदगी में जो दे न सका
वह अव्यक्त रूप से कुछ और
देता रहेगा
सत्त्वशक्ति के मेरे मालिक
सदा खुष रहो
सदा हँसते रहो, फुलते रहो

* *

बिते हुए सुनहरे दिन आज सताते हैं
उस जमाने के सुखद क्षण आज रूलाते हैं
अब वह दिन नष्ट हुए
और दुःख में मैं छा गया
तप्त लोहे के गलते कुंड में
अब तडपते रह गया
कल का मीठा रंगीला सपना अब टूट गया
और गहरे यज्ञ की ज्वाला में आज मैं लपेटा गया
दिल की धडकन के साथ
आँसू भी रो रहे हैं
साठ साल की तपस्या की
आहुति भी आज सिसक रही है
कुछ घटनाएँ यूंही याद आती हैं—
किसी युवती का मदभरा यौवन लुटा जा रहा था
कर्जे के पल्ले में आकर उसकी आबरू का
सौदा हो रहा था
और किसी का
सौभाग्य का मंगलसूत्र कहाँ गिरकर पडा था
घर तो उसका मुक्तद्वार था
दिखावा कर के कोई उसे रखेली समजता था
मद की मदिरा की नशा में उसका शोहर जखडा था
वह कौन है, क्या है
और घरमें क्या हो रहा है

कौन आता, कौन जाता, क्यों आता
किसकी जहरिली नजर रखी जाती है
ना इसकी शोहर को फिक्र थी, ना होश हवाश था
संसार तबा होने का यह चित्र
एक इन्सान के सामने आया था
उसने अपनी आत्मशक्ति के बलपर
उन दोनों को
जान की बाजी लगाकर बचाया था
मंगलसूत्र प्राप्त कर
उनके चरणों पर रखा था

* *

और वह एक याद
एक साल पूर्व–
शरद पूर्णिमा का पवित्र दिन था
वह बहोत सुनहरी, बहोत मंगल
घटिका थी
और दोपहर को वह यौवना
आश्रम पधारी थी
उसके आगमन का वह प्रथम दिन था
प्रेरणाशक्ति बनकर
वह सस्मित डुलते हुए आयी थी
तो अकस्मात्,
प्रवेशद्वार पर आते ही
द्वार पर खडे मधुमालतीवृक्ष के
पुष्पगुच्छों ने
प्रकृति की अनोखी आसमानी
मधुर सुगंध से
उसका सहर्ष स्वागत किया था
वह अस्मिता की पावन सुगंध थी
और उस प्रथम दिन ही उसने
आत्मशक्ति का कुछ अनुभव
प्राप्त किया था
उसने उसी वक्त कुछ मांगा था

तो उसकी वह मांग
उसके भांग का सिंदूर देखकर
आध्यात्मिक वेध लेते हुए
उसके कोमल चरणों पर रख दी थी
वह एक पवित्र नुख्ता था
निछावर कर दिया
प्रेरणाशक्ति के नाते, उसने
जिंदगी में पहले ही बार
सत्त्वशक्ति का एक सूत्र
अपने हाथ लिया था
वह निरामय आनंद
सौभाग्य की वह ऊंची देन
उसने अपनायी थी
खुषी से वह बेहोष हुई थी
और फिर—
उसकी सत्त्वशक्ति अध्यात्म के
पथ पर
धीरे धीरे प्रभावित होती गयी
वह सत्त्वशील प्रकृति की
खुबसुरत यौवना
आश्रम में रोजाना आया करती थी
अध्यात्म की, अतीन्द्रिय विश्व की
चर्चा होती थी
निसर्ग की कुछ चैतन्य—लहरोंसे
परिचित होती थी
और सत्त्वशक्ति की कुछ सुगंध
धीरे धीरे पाती थी
फिर पूर्णिमा के एक मंगल प्रहर में
उसकी आत्मा उसे कुछ कह गयी
पवित्र श्रीशेष ज्योति को
उसने आध्यात्मिक सोपान पर
खडे हुए
ध्यानावस्था में अपना लिया
और उसी पावन क्षण में

उसकी कोमल पलके झुकते ही
अन्तराल में एक ध्वनि गूंज उठी
एक चैतन्य-लहर दौड़ गयी
और उस प्रकृति की देह से
एक ऐसा सुगंध महक गया
जिस से
धरती और आकाश का अन्तराल भी
महक उठा
यह सपना नहीं, वास्तवता थी
चैतन्यमयी सत्त्वशक्ति की प्रचीति थी
उस प्रेरणाशक्ति को मैंने
कुछ हिदायते दी थी
आध्यात्मिकता की मर्यादा बतायी थी
चैतन्य-लहरों की खूबी जतायी थी
उस प्रेरणाशक्ति को
प्रापंचिक जीवन सुचारू ढंग से
निभाने के साथ ही
असीम पतिनिष्ठा रखकर
तपस्विनी होना था
तेजस्विनी बनना था
स्त्रीसत्त्वशक्ति का प्रभाव
रखना था
अपनी आत्मशक्ति के सत्त्व से
किसी दुखिया का कल्याण
करना था
इसिलिए मैंने कुछ संकेत
दर्शाये थे
और कहा था—
ना कोई उससे मिले
और ना वह किससे मिलने जाय
ना वह अकेली बाहर निकले
और ना किसके साथ कहाँ जाय
खून का नाता छोड़कर,
वह किसी को आने न देवे

किसी का उपसर्ग ना पहुंचे
किसी की नज़र ना लगे
द्वार हमेशा बन्द रहे
और हरवख्त वह सतर्क रहे
हमेशा सावध रहे
स्त्रीसत्त्वशक्ति भरकस जागृत हो
अपनी प्रबल आत्मशक्ति से,
स्वरक्षा के लिए सत्त्वरक्षा के लिए
वह खुद समर्थ बने
स्वयं तेजस्विनी बने
इस मर्यादा का, इस व्रत का
पालन करने के लिए
उसने कई बार श्रीशेष ज्योति के
सामने, कसम खायी थी
उसके दिलेर स्वामीने भी उसे
उस मर्यादों के लिए जताया था
वह व्रत उसे निभाना था
तपस्विनी जैसे रहना था
इस लिए कि वह मामुली युवती
न रही थी
वह कुछ और थी
उसकी सत्त्वशक्ति कुछ और रूप
लेकर उभरी थी
हाँ, प्रबल सत्त्वशक्ति की
ऊंचे कोटी की अस्मिता
उसके रोम रोम में, नब्ज़ नब्ज़ में
समायी थी
और उसपर किसी की छाया
पड़ना
किसी पराये का संपर्क रहना
या उससे और कहाँ कदम रखना
उसे और उसकी सत्त्वशक्ति को
जहरीली बाधा है
ऐसा बार बार, समय समय पर

जताया था
लेकीन–
कसम खा कर भी
उसका पालन वह कर न सकी
मर्यादा वह निभा न सकी
उस बारे में मैं अब कुछ
कह न सकूंगा
लेकीन,
उसका गहरा असर
मुझपर होना था, वह हो गया
दिल जखमों से फट गया
और सारी आध्यात्मिक शक्ति
पलभर में ही मट्टी पलिद हो गयी
ओऽ, ढलते हुए सूरज की ओर
जानेवाली प्रेरणाशक्ति
मेरे इस प्रयाण के समय
आध्यात्मिक शक्ती के प्रभाव की
कुछ और कश्मकश घटनाएँ
तेरी जानकारी के लिए
फिर से एकबार दोहरा दूं–
शके अठरासौ एक्क्यानवे–ब्यानवेमें
आश्विन मास, अमावस के शुभ दिन
मैं हिमालय के किनारे गया था
सिर्फ तेरे खातीर
और हाँ,
तेरह किलोमीटर खतरनाक लंबी
गुहा में, मुसिबतों को सहते हुए
जान से मुकाबला करते हुए
वहाँ, उस दरी में, खाई में
मैंने प्रवेश किया था
सात योगिनीयों से मुलाकत की थी
और शेष कंठे का
उसके फणपर अपनी और दीप्तिसे
प्रकाशमान हुआ नागमणी

तेरे सत्त्व के खातिर लाया था
और इतना ही नहीं
कार्तिक मास की पूर्णिमा को
फिरसे उसी स्थल जाकर
व्याघ्रों के जालों में फंसता हुआ भी
उस खाई से
सात योगिनीयों की सत्त्वधारा
इकठ्ठा कर, और,
निसर्ग का वेध लेनेवाला;
अव्यक्त रूप से प्रत्यक्ष प्रचीति
देनेवाला
वेधमणी भी तेरे पवित्र चरणों पर
अर्पित किया था
और बाद में,
तूने अपने शोहर के लिए
अब क्या कहूँ,
दामन फैलाते हुए, कुछ शक्ति
मांगी थी
संकटों से मुकाबला करते हुये
मैंने सिर्फ तेरे लिए ही नहीं
तेरे स्वामी के – तेरे पति के लिए भी
प्रबल शक्तिधारी नागिनी का
कंठमणी लाया था
और दोनों की हो सकी उतनी
रक्षा की थी
यह उपकार नहो, मेरा कर्तव्य था
मनुष्य धर्म था
और ए प्रेरणा शक्ती,
तेरे गले में, अपने प्रभाव से
चमकीली. रूलने वाली
जिसका मूल्य ना हो सके
वह आस्मिन मणिओं की कंठमाला,
तेरे मंगलसूत्र से भी कई गुना
सत्त्वगुण रखनेवाली शक्तिधारिणी,

मैंने तुझ से
केवल मर्यादा की भीक
मांगी थी
लेकीन तूने बेरहम वह भीक
ठुकरा दी
अच्छा किया
अब तो मैं जा रहा हूँ
और तू...
नियतिपर ही छोड देता हूँ
आशीष देना था, दे दिया हूँ
जहाँ कहीं मैं और मेरा रूह
भटकते रहेगा
तुम दोनों दिलवरों को हमेशा
दुवाएँ देता रहेगा

* *

माझ्या प्रखर आध्यात्मिक जीवनाची आणि लेखनाची वाटचाल, माझ्या या ७२ वर्षांपर्यंत, अशीच होत गेली आहे.

ज्या एका अज्ञात थोर योगीपुरुषाने मला बालपणी अध्यात्मशक्ती आणि अतीन्द्रिय शक्तीसंबंधी, मानव व निसर्गसत्त्व यांचा अन्योन्य दुवा लक्षात घेऊन जे ज्ञान प्रत्यक्षात दिले होते, त्याच योगी पुरुषाने अदृश्य होण्यापूर्वी, भंडारा शहरापासून, अंभोरा तीर्थक्षेत्रामार्गे असलेल्या अवघ्या १० कि. मी. अंतरावरील तिड्डीच्या डोहात जलसमाधी घेण्याचा एक संकेत, त्याच बालपणी दिला होता.

' तुला यायचे आहे, यायचे आहे ' असा एक भेसूर ध्वनी जवळपास रोजच मध्यरात्रीच्या सुमारास माझ्या भवती सारखा घोंगावून, माझ्या अंतिम क्षणाची तीव्रतेने जाणीव करून देत आहे आणि मी त्याबाबत अगदी सावध आहे.

मृत्यूलाही जिंकणारा मी, मृत्यूकडेच जात आहे.
मेलेल्यालाही उठवणारा मी, मरणासाठी जात आहे.

माझे हे वचन मला चांगले ज्ञात आहे. पण तत्पूर्वी, जलसमाधीचे ते पावन स्थळ आधी प्रत्यक्ष पाहून घ्यावे, असे माझ्या मनाने घेतले.

साथ देण्याबद्दल अनेक सुहृदांना विनविले. सर्वांनी नकार दिला पण त्या अन्यत्रांच्या नकारातूनही एक वेगळा आकार मला आढळून आला.

१ एप्रिल १९८० : चैत्र पौर्णिमा, शके १९०२ रोजी भर दुपारी मी तिड्डीचा डोह गाठला.

तेरे सत्त्व के खातिर लाया था
और इतना ही नहीं
कार्तिक मास की पूर्णिमा को
फिरसे उसी स्थल जाकर
व्याघ्रों के जालों में फंसता हुआ भी
उस खाई से
सात योगिनीयों की सत्त्वधारा
इकठ्ठा कर, और,
निसर्ग का वेध लेनेवाला;
अव्यक्त रूप से प्रत्यक्ष प्रचीति
देनेवाला
वेधमणी भी तेरे पवित्र चरणों पर
अर्पित किया था
और बाद में,
तूने अपने शोहर के लिए
अब क्या कहूँ,
दामन फैलाते हुए, कुछ शक्ति
मांगी थी
संकटों से मुकाबला करते हुये
मैंने सिर्फ तेरे लिए ही नहीं
तेरे स्वामी के – तेरे पति के लिए भी
प्रबल शक्तिधारी नागिनी का
कंठमणी लाया था
और दोनों की हो सकी उतनी
रक्षा की थी
यह उपकार नहो, मेरा कर्तव्य था
मनुष्य धर्म था
और ए प्रेरणा शक्ती,
तेरे गले में, अपने प्रभाव से
चमकीली, रूलने वाली
जिसका मूल्य ना हो सके
वह आस्मिन मणिओं की कंठमाला,
तेरे मंगलसूत्र से भी कई गुना
सत्त्वगुण रखनेवाली शक्तिधारिणी,

तुझे प्रदान की थी
अब यह सब सपना सा नजर आता है
दिल की धडकन बढ रही है
नेत्रज्योत फडक रही है
उजाला नष्ट हो रहा है
और सूरज का वेधकिरण
कुछ और याद करा दे रहा है
तेरे सत्यवान स्वामी को प्राणदान,
हाँ, वरदान देने के बाद
नियति से जो वादा मैंने किया था
और उस बदले में
केवल सतरह मास ही
मेरी आखरी जिंदगी के लिए
प्रदान किये गये थे
फिर भी नियति मुझे
समय को ताकते, न जाने क्यों
बीचमें ही ले जाना चाहती है
और कुछ अजीब से संकेत से
पौष मास की पूर्णिमा को
एस्कीमो के बर्फिले ऊंचे से
ऊँचे पहाड पर
सिर्फ चार फूट लंबी और
चौडी आसमान से टकरानेवाली
जगह पर
आप दोनों के खातिर
मजबुरन जाना पडा...
अब आगे कुछ कहा नहीं जाता
इन सब घटनाओं की
और परिणामों की
तुझे अच्छी और सच्ची
जानकारी है
मेरी अध्यात्मशक्ति के लिए
तेरी सत्त्वशक्ति के लिए
तेरे स्वामी के कल्याण के लिए

मैंने तुझ से
केवल मर्यादा की भीक
मांगी थी
लेकीन तूने बेरहम वह भीक
ठुकरा दी
अच्छा किया
अब तो मैं जा रहा हूँ
और तू...
नियतिपर ही छोड देता हूँ
आशीष देना था, दे दिया हूँ
जहाँ कहीं मैं और मेरा रूह
भटकते रहेगा
तुम दोनों दिलवरों को हमेशा
दुवाएँ देता रहेगा

* *

माझ्या प्रखर आध्यात्मिक जीवनाची आणि लेखनाची वाटचाल, माझ्या या ७२ वर्षांपर्यंत, अशीच होत गेली आहे.

ज्या एका अज्ञात थोर योगीपुरुषाने मला बालपणी अध्यात्मशक्ती आणि अतीन्द्रिय शक्तीसंबंधी, मानव व निसर्गसत्त्व यांचा अन्योन्य दुवा लक्षात घेऊन जे ज्ञान प्रत्यक्षात दिले होते, त्याच योगी पुरुषाने अदृश्य होण्यापूर्वी, भंडारा शहरापासून, अंभोरा तीर्थक्षेत्रामार्गे असलेल्या अवघ्या १० कि. मी. अंतरावरील तिड्डीच्या डोहात जलसमाधी घेण्याचा एक संकेत, त्याच बालपणी दिला होता.

‘ तुला यायचे आहे, यायचे आहे ’ असा एक भेसूर ध्वनी जवळपास रोजच मध्यरात्रीच्या सुमारास माझ्या भवती सारखा घोंगावून, माझ्या अंतिम क्षणाची तीव्रतेने जाणीव करून देत आहे आणि मी त्याबाबत अगदी सावध आहे.

मृत्यूलाही जिंकणारा मी, मृत्यूकडेच जात आहे.
मेलेल्यालाही उठवणारा मी, मरणासाठी जात आहे.

माझे हे वचन मला चांगले ज्ञात आहे. पण तत्पूर्वी, जलसमाधीचे ते पावन स्थळ आधी प्रत्यक्ष पाहून घ्यावे, असे माझ्या मनाने घेतले.

साथ देण्याबद्दल अनेक सुहृदांना विनविले. सर्वांनी नकार दिला पण त्या अन्यत्रांच्या नकारातूनही एक वेगळा आकार मला आढळून आला.

१ एप्रिल १९८० : चैत्र पौर्णिमा, शके १९०२ रोजी भर दुपारी मी तिड्डीचा डोह गाठला.

ज्या नकारात आकार आला होता, त्या आकारात दोन सत्त्वशील व्यक्ती साकारास आल्या होत्या. श्री. प्रेमानंद बोरकर आणि सौ. जयश्री बोरकर या उभयता सुहृद पति-पत्नींनी मला मोलाची साथ दिली.

एका रेड्वर म्हणजे एका घोडीच्या टांग्यावर आम्ही तिड्डीचा मार्ग आक्रमिला होता. भंडारा ते मानेगाव ६ कि. मि. आणि तेथून उजव्या बाजूला केवळ २ कि. मि. अंतरावर तिड्डीचा डोह. वैनगंगेत असलेला, अथांग जलाने विराजमान झालेला, उंचच्या उंच अभ्रकी चट्टाणांनी घेरलेला.

तिथे मी माझी जागा निवडली. मोठी प्रसन्नता वाटली. मन हरखून गेलं !

तिन्ही सांजेला त्या स्थळी, सरितेचे जल ओंजळीत घेऊन मावळत्या तांबड्या सूर्यबिंबाचा वेध घेऊन, मी ध्यानस्थ झालो. माझे वय ७२. एका वर्षाला एक मिनिट. ७२ वर्षांना ७२ मिनिटे. ५.५५ ते ७.७ ही ती संध्यासमयीची वेळ. ध्यानावस्था संपली तेव्हा एक विचित्र पाखरू चिव चिवत गेले. पौर्णिमेचा चन्द्र पूर्वेच्या क्षितिजावरून ५ फूट ५ इंच वर सरकला होता. सर्वत्र निरवता पण त्या निरवतेत भयाणता जाणवत होती. मी ध्यानस्थळावरून उठलो तो चिंचचिव करीत वेगाने उड्डाण घेणाऱ्या त्या पाखरानं एक संकेत दर्शविला.

‘ तुला यायचे आहे, यायचे आहे.’

मी रात्री माझ्या श्रीशेषाश्रमात परतलो. मध्यरात्री निसर्ग आराधना केली; तोच पुन्हा, ‘ तुला यायचे आहे, यायचे आहे ’ हा भेसूर ध्वनी आसमंतात निनादला. मी कंपित झालो. दरदरून घाम सुटला. हातपाय लटलटू लागले. हृदय धडधडू लागले !

मी माझ्या अभ्यासिकेचा आधार घेऊ लागलो तेव्हा तोच ध्वनी पुन्हा घोंगावला.

मी माझ्या शय्येकडे वळलो.

एक श्रीशेष ज्योती ग्रंथांच्या चळतीवर तेवत होती.

आणि, तिच्या मंद प्रकाशात एक नाग फणा काढून डोलत होता !

मी अत्यादरे प्रणाम केला.

अन् परिसर अस्मितेच्या मधुर सुगंधाने क्षणातच भारावून गेला.

नेत्र काहीसे मिटून, मी जागच्या जागी अगदी स्तब्ध, निश्चल उभा होतो. प्रत्येक ग्रंथ काही बोलू पाहत होता; माझे लिखाण मला काही विचारू पाहत होते. कोऱ्या कागदावर एक लेखणी टेकली होती. ती आ वासून मजकडे पाहत होती.

पण कोरा कागद कोराच राहिला ! झरणी झरली नाही, पाझरलीच नाही !

‘ तुला जायचे आहे, जायचे आहे ’ हा आता एकच ध्यास !

मी एकटा आहे.

पूर्वीही एकटाच होतो.

अन् एकटयालाच जायचे आहे.

अध्यात्माच्या तप्त चिंचोळया वाटेने मी एकटाच जात आहे; आपणा सर्व सुहृदांचे स्मरण करून, कल्याणाचे हृदयपूर्वक चिंतन करीत, एकटाच जात आहे !

□ □ □

२८७०
२२९८२
निबंध

REFBK-0022982

सर्ग ८

---

# तीन
# गद्य काव्ये

१. शेतकऱ्यास पहिला मुजरा !
२. कंगालाचे समाधान !
३. आराधना

# १.

## शेतकऱ्यास पहिला मुजरा !

बंधुराया, तुला लवून मुजरा करताना अत्यानंद वाटतो आहे मला.

भारताचे सौभाग्य टिकवणारा तूच ना रे एक ?...

किती हाल हाल सहन करतोस गड्या ! अन् चारही बाजूंनी तुला चेंगरण्यात येत असतानाही आपली निधडी छाती कुणाचाही वार सहन करण्यास सताड उघडी ठेवतोस ! धन्य आहे तुझी !

--विश्वालाही मोलणारी डोक्याला गुंडाळलेली चिंधी, घामाने अठरा ठिगळी जीर्ण सदरा, अन् कमरेभवती गुंडाळलेला भरतभूचा रखरखीत पंचा, कोणत्याही वैभवाला–कुणाच्याही ऐटीला लाजवीत ठेवतोस ना ! त्यातून, अर्धपोटी असताही तुझे ते धीराचे बोल ! तो प्रामाणिकपणा ! अब्रूची ती चाड ! तो धर्माभिमान ! अहाहा ! तुझी थोरवी कशी गावी !

—तुझा एकेक धर्मबिंदू माणिक-मोत्यांच्या स्वरूपात रोज क्षणाक्षणाला अन् या पवित्र भरतखंडाच्या कणाकणाला पावन करतो ! हे काय तुझे कमी मोल ?

अन् हो !... खेडूत म्हणून तुला हिणवणाऱ्यांना तू आपल्या उज्ज्वल करणीने नि संस्कृतीने कसा आदर्श ठेवतोस ! अभिमान वाटतो मला...

— निसर्ग आणि तू. तुझ्याशिवाय निसर्ग काय करणार ? तू स्वस्थ बसलास की सारे संपले ! तेव्हा तुझ्या श्रमाचे गोडवेच गात बसावेसे वाटते. असा तू श्रेष्ठ गडी ! तुला आमचा सादर पहिला मुजरा असो ! !

□ □ □

---

*श्रीगुरुदेव : १९४५, सप्टेंबर*

# २.

## कंगालाचे समाधान !

मित्रा, कंगाल म्हणून तुझी किंमत नाही म्हणतोस ? किंमत व्हावी म्हणून का आपण काही करायचे ?

अरे वेड्या, तुझा दिग्विजय काय कमी आहे ?

तो उंची पोशाख, ते वैभव, तो दिमाख तुला प्राप्त नाही; पण हे विशाल हृदय यज्ञेशाने तुला दिले. किती दैवी पुरुष तू !

त्या दीनांच्या आर्त करुण स्वराची ओळख–हाकेला ओ देण्याची जागरूकता–आज्ञा पालन करण्याची तत्परता तुझ्या या कंगाल शरीरात सामावून भगवंताने तुला हृदयाने किती ऐश्वर्यसंपन्न बनविले !

—ऐक ती पहाटेची जात्याची घरघर–पीडितांचे भेसूर विव्हळणे–अर्धनग्न, अर्धपोटी झोपी गेलेल्या उद्याच्या राष्ट्राच्या आधारस्तंभांचे उफाळणारे उच्छ्वास !

ही धगधगणारी आग कशी लागली ? —कोणी लाविली ? कोणी रे तुला कंगाल बनविले ?...

मित्रा, असा दचकू नकोस. मीही एक दु:खी जीव आहे—कंगाल आहे. पण अभिमानी आहे. मानाचे मरण इच्छिणारा कंगाल मी ! अरे भीकही मागतो पण मानाची,मी आज्ञाही पाळतो ती सेवकांची–गुलामांची नाही ! साक्षी आहे ना तो सच्चिदानंद !

विधात्याने दोन जीव का निर्मिले ? कंगाल आणि धनवान ! अरेरे ! परंतु... पैसा जीविताचे सर्वस्व नाही. अन् हृदय ?...

न्यायनिष्ठुर जगच्चालकाने चित्रगुप्ताला ही नोंद करायला लावले आहे बरे ! चल त्याच्या मंदिरात अनुभवलेली

आपली कथा प्रभूलाच सादर करू. म्हणू, आपली अगाध लीला याची देही याची डोळां पाहिली !

—— आणि प्रार्थू——एक वरदान मागू——

हे दयाघना, एवढे भाग्य उपभोगण्यास आता आमच्यात सामर्थ्य नाही. फार थकलोत आम्ही.

आणखी एक वर देऊन आम्हाला मुक्ती दे.

बघ. रक्ताचा हा एक थेंब-अगदी निष्कलंक, अस्सल असा-जपून साठवून ठेवला आहे——आमच्या मातृभूमीसाठी ! देवा, तो आमच्या पुण्यभूला आदराने अर्पू दे नि त्यात आमच्या पूर्णत्वाची छाया अवलोकू दे. काय, देशील हे मानाचे वरदान ?——करशील हे दिव्य ! !

□ □ □

---

*श्रीगुरुदेव : नोव्हेंबर-डिसेंबर, १९४६.*

# ३.

## आराधना

हे निसर्गसंपन्न कलामयी, अध्यात्म-वादी सौंदर्यशालिनी, विद्या, प्रज्ञा नि धनसंपन्न भारत माते,

तुझ्या स्वातंत्र्याच्या अन् स्वयं-प्रज्ञेच्या कुशीत विसावून तुझे पुत्र तुला अत्यादरे मानवंदना करीत आहेत.

हे शुचित्वदायिनी मंगलकारिणी विधात्रे—

तुझ्या शूरत्व, दातृत्व नि सहिष्णुता-वर्धी परोपकारी सत्त्वगुणांनी, तुझे पुत्र कल्पनातीत राष्ट्राभिमानानं डोलून, या आध्यात्मिक पिंडाच्या तेजस्वितेने जन्म-साफल्याचे पूर्ण समाधान मानून, अखिल जगाला

आपल्या न्यायी, उदार, पराक्रमी व संस्कृतिपूर्ण उदात्त आचारविचारानं आपलं असीम महत्त्व दर्शविण्याचा, नव्हे ते आपल्या धवल कर्तृत्वाच्या प्रखर तेजानं सिद्ध करण्याचा दावा करू पाहत आहेत;

त्यांना तू समर्थ करून, यश:सिद्धी-साठी आशीर्वाद दे.

हे पुण्यपावन माते,

तुझ्या पवित्र उदरी जन्मास आलेल्या या एकरक्ती, एकमनी बालकांच्या सुख—दु:खाच्या वाट्यात घरच्या अन्न, वस्त्र, निवारा नि संपत्ती यांचे समान हक्क त्यांना प्राप्त होऊ दे. तुझ्या भाकरी-वर एका अमुकाचा अधिकार अधिक; तुझ्या पावन अंकावर एक श्रेष्ठ व दुसरा कनिष्ठ, एक उच्च व दुसरा नीच अशी विषमता न राहता, सर्वांना—

एक वाक्यतेचे, जन्मजननीचे आम्ही शौर्यशाली सुपुत्र आहोत, आम्ही एक आहोत, एकच राहू अन् एकसंध राहून मानवी धर्माचा हिरिरीनं पुरस्कार करू, अशी उच्च व उदात्त भावना त्यांच्यात

सतत जागृत ठेव; मानवतेचा आविष्कार घडू दे.

हे हृदयवंत माते,

तुझ्या ऊबदार कुशीत मानानं विसावणारे हे बालक तुला अभय मागत आहेत. त्यांना तो वर प्रदान करून वीरोचित मरण लाभू दे !

तुझ्या वात्सल्यपूर्ण मायेची पाखर उपभोगताना त्यांची हृदये नि मने विशाल अन् उन्नत होत असून आलेल्या कोणत्याही दुर्धर प्रसंगात आपल्या मातृभूमीचं रक्षण करण्यास, ती बालके आपले शीर तुझ्या पवित्र चरणी मोठ्या अभिमानानं आणि आनंदानं अर्पण करतील !

पण शौर्यशालिनी माते,

भारतात दुर्भाग्य मात्र त्यांना अनुभवू देऊ नकोस एवढं वरदान दे !

□ □ □

---

*पूजा : १९४८, सप्टेंबर*